सिम्बायोसिस महाविद्यालयातील कला शाखेसाठी ९६.२० टक्के, वाणिज्य शाखेसाठी ९३.४० टक्के पात्रता गुण आहेत. आबासाहेब गरवारे महाविद्यालयातील कला शाखेसाठी ६७.२० टक्के, विज्ञान शाखेसाठी ९३.८० टक्के, फर्ग्युसन महाविद्यालयातील विज्ञान शाखेसाठी ९६.४० टक्के, मॉडर्न महाविद्यालयातील कला शाखेसाठी ६६.२० टक्के, वाणिज्य शाखेसाठी ८७.८० टक्के, विज्ञान शाखेसाठी ९२.४० टक्के, स. प. महाविद्यालयातील कला शाखेसाठी ८३ टक्के, वाणिज्य शाखेसाठी ९२.४० टक्के आणि विज्ञान शाखेसाठी ९३.२० टक्के, नेस वाडिया वाणिज्य महाविद्यालयातील वाणिज्य शाखेसाठी ७२.२० टक्के गुण आवश्यक आहेत.

लोकसत्ता Sun, 06 December 2020
https://epaper.loksatta.com/c/56856222

# अकरावी प्रवेशाने महाविद्यालये गजबजली

▪ लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे: मराठा आरक्षणाला स्थगिती मिळाल्यामुळे रखडलेली इयत्ता अकरावी प्रवेशाची प्रक्रिया पुन्हा सुरू झाल्याने विद्यार्थ्यांबरोबर पालकही कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये येत आहेत. त्यामुळे सुमारे आठ महिन्यांनंतर महाविद्यालये विद्यार्थ्यांच्या गर्दीने गजबजू लागली आहेत.परंतु,प्रवेशाची तिसरी व विशेष फेरी संपल्यानंतरच विद्यार्थ्यांचे वर्ग सुरु होणार आहेत.

कोरोनामुळे व मराठा आरक्षणाला स्थगिती मिळाल्याने राज्यातील इयत्ता अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेवर परिणाम झाला. परंतु, पुन्हा एकदा प्रवेश प्रक्रिया सुरू झाली. दुस-या फेरीतून 23 हजार विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला. त्यामुळे विद्यार्थी फर्ग्युसन, स. प. महाविद्यालय, मॉडर्न महाविद्यालय आदी महाविद्यालयात जाऊन प्रवेश निश्चित करून घेत आहेत. काही महाविद्यालयाच्या प्रवेशद्वारावर विद्यार्थी व पालकांना नोंदणी करून आणि थर्मल स्कॅनने तपासणी करून पाठविले जात आहे.

महाविद्यालये बंद असली तरी विद्यार्थ्यांना सह्याद्री वाहिनीवरून ऑनलाईन मार्गदर्शन केले जात आहे. राज्य शासनाने नववी ते बारावी पर्यंच्या विद्यार्थ्यांचे वर्ग सुरू करण्यास परवानगी दिली आहे. परंतु, प्रवेशच न झाल्यामुळे अद्याप महाविद्यालयांकडून प्रत्यक्ष वर्ग सुरू केले नाहीत.अकरावीत गेलेल्या विद्यार्थ्यांना वर्गात जाऊन शिक्षण घेण्यासाठी आणखी काही दिवस प्रतीक्षा करावी लागणार आहे.

Lokmat: 8.12.2020



## *News Paper Clippings Related to MCASC (Autonomous), Pune- 5*

पुढारी



वर्ष संपत आले; परीक्षा कधी होणार?

# प्रवेशप्रक्रियेचे गुऱ्हाळ थांबेना

पुणे : गणेश खळदकर

**कोरोना, मराठा आरक्षण आणि प्रशासनाचे ढिसाळ नियोजन अशा त्रांगड्यात सापडलेली विविध अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया यंदा वर्ष संपत आले तरी सुरू आहे. त्यामुळे प्रवेशप्रक्रिया कधी पूर्ण होणार, अभ्यासक्रमांची सुरुवात, शेवट आणि परीक्षा कधी होणार, असा सवाल पालक आणि विद्यार्थी उपस्थित करीत आहेत. परंतु प्रवेशप्रक्रिया कमीत कमी कालावधीत पूर्ण करण्याचे कोणतेही नियोजन संबंधित यंत्रणांकडे नसल्याचे चित्र दिसून येत आहे.**

दरवर्षी जून महिन्यात सुरू होणाऱ्या विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशप्रक्रिया यंदा अडीच महिने उशिरा सुरू झाल्या आणि पुढे मराठा आरक्षणाच्या प्रश्नामुळे रखडल्या. १ ऑगस्टपासून सुरू झालेल्या अकरावी प्रवेशाची तिसरी फेरी सुरू आहे. आयटीआय प्रवेशाची चौथी व डी. एड. प्रवेश तिसरी फेरी चालू आहे. पदवी आणि पदव्युत्तरच्या प्रवेशप्रक्रियेसाठी ३० डिसेंबरची डेडलाईन असून तंत्रशिक्षणच्या विविध अभ्यासक्रमांच्या प्रवेशाला नुकतीच सुरुवात झाली आहे. त्यामुळे शालेय शिक्षण विभाग, उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष अर्थात सीईटी सेल आणि व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयासमोर प्रवेशप्रक्रिया तत्काळ पूर्ण करण्याचे मोठे आव्हान आहे. यंदा शैक्षणिक वर्षातील केवळ पाच महिने शिल्लक आहेत. या काळात अभ्यासक्रम, सत्र परीक्षा आणि अंतिम वर्षाची परीक्षा राबविण्याचे आव्हान शिक्षणाशी संबंधित सर्वच यंत्रणांसमोर राहणार आहे.

प्रवेशप्रक्रिया उरकण्यासाठी नियोजन नाही

पुढारी विशेष

१ सध्या केवळ ५० टक्के शिक्षकांच्या उपस्थितीची परवानगी आहे. १०० टक्के उपस्थितीची परवानगी देण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

२ शैक्षणिक वर्षाबद्दल अनिश्चितता आहे. त्यात आधीच कोरोनामुळे आर्थिक संकटात सापडल्यामुळे लाखो रुपयांचे शिक्षण शुल्क कसे भरायचे, असा प्रश्न विद्यार्थी आणि पालकांना सतावत आहे.

" सीईटीचा निकाल लागल्यानंतर नोंदणी प्रक्रिया सुरू केली होती. परंतु मागणीमुळे अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देणार आहे. १५ जानेवारीपर्यंत प्रवेशप्रक्रिया पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. काही ठराविक अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया आणखी पुढे जाण्याची शक्यता आहे.

**- चिंतामणी जोशी,**
आयुक्त, सीईटी सेल

पदवी आणि पदव्युत्तर प्रवेशाच्या प्रथम वर्षाची प्रक्रियेची ३० डिसेंबर डेडलाईन आहे. यंदा १५ मेपर्यंत अभ्यासक्रम पूर्ण करायचा आहे, तर जून-जुलैमध्ये परीक्षा होतील. ऑनलाइन शिक्षणाच्या माध्यमातून जास्तीत जास्त अभ्यासक्रम पूर्ण करण्यावर भर आहे.

**- डॉ. राजेंद्र झुंजारराव,**
प्राचार्य, मॉडर्न कॉलेज

Pune Edition
Dec 15, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings Related to MCASC (Autonomous), Pune- 5*

पुढारी

# विज्ञान शाखेचा कटऑफ नव्वदीपारच

## कला, वाणिज्य शाखेचा कटऑफही कमी होईना

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**अकरावी प्रवेशासाठी तिसरी गुणवत्ता यादी जाहीर झाली असून शहरातील नामांकित महाविद्यालयांच्या विज्ञान शाखेचा कटऑफ अद्यापही नव्वदीच्या पलीकडेच आहे. तर कला आणि वाणिज्य शाखेचा कटऑफदेखील ८५ ते ९० टक्क्यांच्या पुढेच आहे. त्यामुळे तिसऱ्या फेरीतदेखील विद्यार्थी आणि पालकांची निराशा झाली आहे. तर नामांकित महाविद्यालयांच्या हट्टापायी प्रवेशप्रक्रिया रेंगाळली असल्याचे चित्र दिसून येत आहे.**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात महाविद्यालयांमध्ये अकरावीमध्ये प्रवेश घेण्यासाठी अकरावी प्रवेश नियंत्रण समितीकडून तिसरी गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली. यामध्ये नामांकित महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी आवश्यक असणारे कटऑफ तिसऱ्या फेरीत कमी होतील, अशी अपेक्षा विद्यार्थी आणि पालकांना होती. परंतु काही महाविद्यालयांच्या ठराविक शाखांचे कटऑफ कमी होण्याऐवजी वाढले आहेत. तर काही महाविद्यालयांचे कटऑफ जैसे थे आहेत. त्यामुळे कटऑफ कमी होऊन ठराविक महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळेल याचा विचार करून पसंतीक्रम भरलेल्या विद्यार्थी आणि पालकांच्या पदरी निराशाच पडली असल्याचे दिसून येत आहे.

| कॉलेजचे नाव खुल्या गटाची टक्केवारी | कला | वाणिज्य | विज्ञान |
|---|---|---|---|
| सिंबायोसिस कॉलेज | ००० | ९३.२० | ००० |
| आबासाहेब गरवारे कॉलेज | ६८.६० | ०००० | ९३.२० |
| फर्ग्युसन कॉलेज | ९० | ०००० | ९६.०० |
| मॉडर्न कॉलेज | ६४.८० | ८७.२० | ९१.४० |
| सीटी प्राईड ज्युनिअर कॉलेज | ०००० | ८२.२० | ९१.८० |
| डॉ. कलमाडी श्यामराव हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज | ९३.२० | ८७.६० | ९३.८० |
| सर परशुरामभाऊ ज्युनिअर कॉलेज | ०००० | ९२.२० | ९३.२० |
| एस.एम.जोशी कॉलेज | ०००० | ८१.०० | ८७.२० |
| नेस वाडीया कॉलेज ऑफ कॉमर्स | ०००० | ६७.४० | ००० |
| एस.एम.चोकसी हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज | ००० | ८९.४० | ९०.०० |

Pune Edition
Dec 16, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# अकरावी प्रवेशाच्या तिसऱ्या फेरीत १२ हजार ४६१ विद्यार्थ्यांना प्रवेश

## २ हजार ५४३ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयांतील अकरावीच्या प्रवेशासाठीच्या तिसऱ्या गुणवत्ता यादीत १२ हजार ४६१ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर करण्यात आला आहे. २ हजार ५४३ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले आहे.

केंद्रीय अकरावी ऑनलाइन प्रवेश समितीच्या माध्यमातून अकरावी प्रवेशाची प्रक्रिया राबवण्यात येत आहे. ३०४ महाविद्यालयांमध्ये १ लाख ७ हजार ३० जागा उपलब्ध आहेत. केंद्रीय प्रवेशाच्या पहिल्या फेरीत प्रवेश जाहीर झालेल्या ४० हजार १३ विद्यार्थ्यांपैकी २३ हजार १५६, दुसऱ्या फेरीत प्रवेश जाहीर झालेल्या २३ हजार १२० विद्यार्थ्यांपैकी ९ हजार ९४४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. तिसऱ्या फेरीसाठी ३३ हजार ६६१ विद्यार्थी पात्र होते. त्यापैकी १२ हजार ४६१ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर केल्याची माहिती प्रवेश समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिली. प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांना १८ डिसेंबरपर्यंत प्रवेश निश्चित करता येणार आहे.

**शाखानिहाय प्रवेश**

- जाहीर झालेले विद्यार्थी
- कला : १ हजार ३४३
- वाणिज्य : ५ हजार ३०३
- विज्ञान : ५ हजार ६८३
- व्यवसाय शिक्षण : १३२

**पात्रता गुण ९० टक्क्यांच्या पुढेच...**

प्रवेश प्रक्रियेतील दुसऱ्या गुणवत्ता यादीप्रमाणेच तिसऱ्या यादीतही नामांकित महाविद्यालयातील पात्रता गुण अद्यापही ९० टक्क्यांच्या पुढेच आहेत.

सिम्बायोसिस महाविद्यालयात कला शाखेसाठी ९६.२० टक्के, वाणिज्य शाखेसाठी ९३.४० टक्के, आबासाहेब गरवारे महाविद्यालयात विज्ञान शाखेसाठी ९३.८० टक्के, फर्ग्युसन महाविद्यालयात विज्ञान शाखेसाठी ९६.४० टक्के, मॉडर्न महाविद्यालयात विज्ञान शाखेसाठी ९२.४० टक्के, सिटी प्राईड महाविद्यालयात विज्ञान शाखेसाठी ९२.६० टक्के, तर स. प. महाविद्यालयात वाणिज्य शाखेसाठी ९२.४० टक्के आणि विज्ञान शाखेसाठी ९३.२० टक्के गुण प्रवेशासाठी आवश्यक आहेत.

लोकसत्ता Wed, 16 December 2020
https://epaper.loksatta.com/c/57059038



## *News Paper Clippings Related to MCASC (Autonomous), Pune- 5*

प्रभात पुणे, बुधवार, दि. १६ डि

# विद्यार्थ्यांची विज्ञान शाखेला पसंती

## अकरावी प्रवेशाची तिसरी नियमित फेरी | १२ हजार ४६१ विद्यार्थ्यांचा समावेश

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १५ - इयत्ता अकरावीच्या तिसऱ्या नियमित प्रवेश फेरीची गुणवत्ता यादी जाहीर झाली. यात १२ हजार ४६१ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला आहे. [illegible]

३०४ कनिष्ठ महाविद्यालयात १ लाख ७ हजार ३० प्रवेशाच्या जागा आहेत. [illegible]

अर्ज नोंदविले होते. यातील प्रवेश जाहीर झालेल्यांना प्रवेश निश्चित करण्यासाठी १८ डिसेंबरपर्यंत मुदत आहे. [illegible] त्यानंतर २० डिसेंबर रोजी प्रवेशासाठी विशेष फेरीसाठी रिक्त जागांचा तपशील जाहीर होणार आहे.

पहिल्या पसंती क्रमानुसार २ हजार ५४३ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला आहे. दुसऱ्या पसंती क्रमानुसार २ हजार ७७३, तिसऱ्या पसंती क्रमांकानुसार १ हजार ९६८, चौथ्या क्रमांकानुसार १ हजार ४०७, पाचव्या क्रमांकानुसार १ हजार १४७ विद्यार्थ्यांना प्रवेश वाटप झाले आहे.

खुल्या प्रवर्गासाठी १२ हजार ९७४ जागा होत्या. त्यासाठी २४ हजार ७७१ अर्ज आले. त्यातील ७ हजार १९९ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाले.

| तिसरी नियमित प्रवेश फेरी | | | |
|---|---|---|---|
| शाखा | प्रवेशासाठी उपलब्ध जागा | विद्यार्थ्यांचे अर्ज | प्रवेश जाहीर |
| कला | [illegible] | [illegible] | [illegible] |
| वाणिज्य | [illegible] | [illegible] | [illegible] |
| विज्ञान | [illegible] | [illegible] | [illegible] |
| एचएसव्हीसी | [illegible] | [illegible] | [illegible] |
| एकुण | [illegible] | [illegible] | [illegible] |





## तिसऱ्या प्रवेश फेरीचे कट ऑफ जाहीर

पुणे - इयत्ता अकरावी प्रवेशासाठी तिसरी नियमित फेरीचे कट ऑफ जाहीर झाले आहेत. यातही सोयीच्या व नामांकित महाविद्यालयात प्रवेशासाठी विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा असल्याचे दिसून येते.

सर्वच शाखेच्या विद्यार्थ्यांना गुणही चांगले मिळाले आहेत. त्यामुळे सर्व शाखांचा कट ऑफ ८० टक्क्यांच्या पुढे आहे. पसंतीक्रम बदलूनही बऱ्याचशा विद्यार्थ्यांना पाहिजे त्या महाविद्यालयात प्रवेश जाहीर झालेला नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी आणखी प्रतीक्षा पाहण्यालाच प्राधान्य दिले आहे.

राज्यातील विविध बोर्डांचा विचार करता राज्य मंडळाच्या एसएससी बोर्डाच्या २८ हजार ७८३ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. त्यातील १० हजार ७३० जणांना प्रवेश जाहीर झाला. सीबीएसई बोर्डाच्या ३ हजार ११५ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. त्यातील १ हजार २०६ जणांना प्रवेश जाहीर झाला.

| नामांकित महाविद्यालयांचा शाखानिहाय कट ऑफ टक्केवारीत | | | |
|---|---|---|---|
| महाविद्यालय | कला | वाणिज्य | विज्ञान |
| सिम्बायोसिस | ९६.२० | ९३.४० | --- |
| आबासाहेब गरवारे | ६७.२० | --- | ९३.८० |
| फर्ग्युसन | --- | --- | ९६.४० |
| मॉडर्न | ६६.२० | ८७.८० | ९२.४० |
| सिटी प्राईड | --- | ८२.८० | ९२.६० |
| डॉ. श्यामराव कलमाडी | ९३.४० | ८८.४० | ९४.०० |
| सर परशुरामभाऊ | ८३.०० | ९२.४० | ९३.२० |
| एस.एम.जोशी | --- | ८२.०० | ८७.८० |
| नेस वाडिया | --- | ७२.२० | --- |
| एस.एम.चोकसी | --- | ८७.२० | ९०.२० |

Prabhat: 16.12.2020

# Over 23k get seats, cut-offs in big colleges at high 90s

SwatiShindeGole
@timesgroup.com

**Pune:** As many as 23,120 students in Pune and Pimpri Chinchwad were allotted seats in the first year junior college (FYJC, Std XI) third merit list announced by the centralised admissions process (CAP) committee on Tuesday.

Over 8,929 of the total applicants were given colleges based on their first preference.

The cut-off in many popular colleges in the city continued to remain in the 90s and the highest cut-off was 96.4 for science stream in Fergusson College.

In charge of the CAP committee, Meena Shendkar, said, "There were a total of 46,794 applications for FYJC in Pune and Pimpri Chinchwad. Accordingly, nearly 50% of these applicants have been allotted seats in the third round. There are enough seats vacant so students whose names have not figured in the third list need not worry as we will have a special round when they can try for a better chance."

The highest number of seats were allocated in science stream with over 10,000 applicants getting an allotment. There are a total of 304 colleges in Pune region for FYJC seats with an intake of 1.07 lakh.

The seats for inhouse and management quota are being filled at college level. Students allotted the colleges can go to their online form application and click on 'proceed' button to confirm their seat.

They have time till December 18 for confirming their seats, Shendkar said.

**IN THE THIRD ROUND**

**INTAKE AND ALLOTMENT**

| Stream | Seats | Applications | Allotted |
|---|---|---|---|
| Arts | 10,075 | 4,351 | 2,672 |
| Commerce | 24,052 | 20,348 | 9,762 |
| Science | 23,170 | 21,192 | 10,089 |
| MCVC | 3,302 | 903 | 597 |
| Total | 60,599 | 46,794 | 23,120 |

**CUT-OFFS IN TOP TEN COLLEGES**

| College | Arts | Commerce | Science |
|---|---|---|---|
| Symbiosis College | 96.20 | 93.40 | NA |
| Abasaheb Garware | 67.20 | NA | 93.80 |
| Fergusson College | NA | NA | 96.40 |
| Modern College | 66.20 | 87.80 | 92.40 |
| City Pride, Nigdi | NA | 82.80 | 92.60 |
| Kalmadi Shamarao | 93.40 | 88.40 | 94.00 |
| SP College | 83.00 | 92.40 | 93.20 |
| SM Joshi, Hadapsar | NA | 82.00 | 87.80 |
| Ness Wadia | NA | 72.20 | NA |
| S M Choksey | NA | 87.20 | 90.20 |

The Times of India: 16.12.2020

## News Paper Clippings Related to MCASC (Autonomous), Pune- 5

# प्रत्यक्ष होऊ द्या प्रात्यक्षिक

## व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये सुरू करण्याची मागणी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

इंजिनीअरिंग, फार्मसी, आर्किटेक्चर, विज्ञान आदी प्रात्यक्षिकांवर भर असणाऱ्या अभ्यासक्रमांचे किमान अंतिम वर्षाचे वर्ग तरी आता सुरू करा, अशी आग्रही मागणी विद्यार्थ्यांकडून होत आहे. प्रात्यक्षिके झाली नाहीत, तर उपयोजित ज्ञानाअभावी कॅम्पस इंटरव्ह्यूमध्ये नोकरीच्या संधी गमाविण्याची वेळ येऊ शकते, अशी विद्यार्थ्यांना भीती आहे.

एकूणच 'अनलॉक'च्या प्रक्रियेतून विद्यापीठे आणि महाविद्यालयांना वगळले की काय, अशी शंका विद्यार्थ्यांकडून उपस्थित करण्यात येत आहे. राज्यातील बहुतांश महाविद्यालयांना अजूनही टाळेच असून, विद्यार्थी वर्ग सुरू होण्याच्या प्रतीक्षेत आहेत.

पालकांचा विरोध असतानाही राज्य सरकारने नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांच्या शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला. असे असताना महाविद्यालयांमध्ये जाऊन पारंपरिक पद्धतीने शिक्षण घेण्याबाबत अजूनही कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. 'आयआयटी मुंबई'देखील विद्यार्थ्यांसाठी खुले करण्यात आले. असे असताना राज्यातील महाविद्यालये बंद का ठेवण्यात येत आहेत, असा प्रश्न तज्ज्ञांकडून उपस्थित होत आहे.

'प्रात्यक्षिकांवर भर असणाऱ्या अभ्यासक्रमांचे अंतिम वर्ष महत्त्वाचे असते. त्यामुळे अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके करण्याची संधी मिळाली पाहिजे. योग्य शिक्षण न मिळाल्यास शैक्षणिक नुकसान होईल. त्यामुळे राज्य सरकारने सर्व नियम पाळून, महाविद्यालये सुरू करण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे जाहीर करावीत,' असे मत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेचे प्रदेशमंत्री स्वप्नील बेगडे यांनी व्यक्त केले.

### विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष महत्त्वाचे

संशोधक विद्यार्थी आणि विज्ञान तंत्रज्ञान शाखेतील पदव्युत्तर पदवी विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्याने आणि अंतराचे नियम पाळून त्यांना पहिल्या टप्प्यात महाविद्यालयांमध्ये प्रवेश देण्यात येईल. उच्च शिक्षणाच्या संधी आणि त्यांच्यासाठी उपलब्ध असणाऱ्या नोकरीच्या संधींचा विचार करून अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना बोलवता येईल, अशा स्पष्ट सूचना 'यूजीसी'कडून देण्यात आल्या. अंतिम वर्ष महत्त्वाचे असल्याने, या विद्यार्थ्यांचे महाविद्यालय सुरू करण्यावर भर देण्याची आवश्यकता आहे, असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले.

### 'यूजीसी'च्या निर्णयाला केराची टोपली

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) विद्यापीठे, महाविद्यालये सुरू करण्याबाबतची कार्यपद्धती पाच नोव्हेंबरला जाहीर केली. त्यानुसार करोना रोखण्यासाठी सर्व नियम पाळून विद्यापीठे आणि महाविद्यालये टप्प्याटप्प्याने सुरू करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. मात्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठासोबतच राज्यातील इतर विद्यापीठांकडून महाविद्यालये सुरू करण्याबाबत अद्याप कोणतेही आदेश देण्यात आलेले नाहीत. त्यामुळे 'यूजीसी'च्या आदेशाकडे सपशेल दुर्लक्ष करण्यात आले आहे.



" ऑनलाइन पद्धतीने आमचे शिक्षण सुरू आहे. मात्र, प्रात्यक्षिकांचे काय होणार, याची चिंता आहे. त्यासाठी महाविद्यालये सुरू व्हायला हवीत. ऑनलाइन शिक्षणामुळे प्रत्यक्ष कामाचा अनुभव मिळत नसल्याने आमचे शैक्षणिक नुकसान होत आहे. आम्हाला प्रयोगशाळेत 'कोडिंग'ची प्रात्यक्षिके करावी लागतात; मात्र ऑनलाइन शिक्षणाद्वारे या गोष्टी समजण्यात अडचणी येतात. अशा परिस्थितीत इंजिनीअरिंग, आर्किटेक्चर अशा अभ्यासक्रमांची महाविद्यालये सुरू करायला हवीत.

– संभाजी शेडगे, डॉ. डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पिंपरी

ऑनलाइन शिक्षण हा मोठा बदल स्वीकारण्यासाठी विद्यार्थी आणि पालक तयार आहेत का, याचा विचार व्हावा. परीक्षा ऑनलाइन घेता येईल; पण प्रात्यक्षिकांबाबत काय करायचे हा प्रश्न आहे. प्रात्यक्षिके महाविद्यालयात जाऊन करावी लागतात. महाविद्यालये बंद असतील, तर विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके करणे शक्य नाही. यात विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा, गुणवत्ता घसरण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये यासाठी विद्यापीठांनी योग्य ती पावले उचलावीत.

– ज्ञानेश्वर निकम, ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे





सुरुवातीला पीएचडी अभ्यासक्रमासाठी आणि नंतर पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालये सुरू करता येतील. अंतिम वर्षाला शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष महत्त्वाचे असते. त्यामुळे त्यांना बॅचेसमध्ये प्रात्यक्षिकांचे शिक्षण देणे गरजेचे आहे.

– डॉ. राजेंद्र झुंजारराव, प्राचार्य, मॉडर्न कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स

Maharashtra Times: 17.12.2020

# प्राचार्य, प्राध्यापक महाविद्यालय सुरू करण्यास अनुकूल; तयारीला सुरुवात

फॉलो अप

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर बंद असलेली महाविद्यालये सुरू करण्याबाबत प्राचार्य व प्राध्यापक संघटनेने अनुकूलता दाखविली आहे. विद्यापीठासह महाविद्यालय प्रशासनाने सुद्धा त्या दृष्टीने तयारी सुरू केली आहे. त्यामुळे जानेवारी महिन्यात सर्व महाविद्यालये विद्यार्थ्यांच्या उपस्थितीने पुन्हा गजबजून जाणार आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ प्रशासनाने डिसेंबर महिन्यात सर्व संलग्न महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. परंतु, कोरोनाची दुसरी लाट येण्याच्या भीतीमुळे महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय रद्द केला. मात्र, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी जानेवारी महिन्यात महाविद्यालये खुली होणार असल्याचे संकेत दिले असून त्यासाठी जिल्हाधिकारी व पालिका आयुक्तांशी चर्चा करणार असल्याचेही स्पष्ट केले आहे. तसेच विद्यार्थी सुध्दा प्रत्यक्ष वर्गात येऊन शिक्षण घेण्यास उत्सुक आहेत. तर डिसेंबरमध्ये महाविद्यालये उघडण्यास विरोधात असणाऱ्या प्राचार्य व प्राध्यापकांनी जानेवारीत प्रत्यक्ष वर्ग सुरू करण्यास हरकत नसल्याचे सांगितले आहेत.

महाविद्यालये सुरु करताना सुरुवातीला पदव्युत्तर पदवी, अंतिम वर्ष पदवी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी बोलवून प्रत्यक्ष वर्ग सुरू केले तर अडचण येणार नाही, मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव म्हणाले.

### नियम पाळून महाविद्यालये सुरु करावे

काही दिवसांपासून कोरोना रुग्णांच्या संख्येत घट झाल्याचे पाहायला मिळत आहे. त्यामुळे आरोग्यविषयक नियम पाळून महाविद्यालये सुरु करण्यास हरकत नाही. शासन व विद्यापीठ प्रशासनाकडून दिल्या जाणाऱ्या आदेशाचे पालन करून जानेवारी महिन्यात माहविद्यालये सुरु केली जातील.

- डॉ. सुधाकर जाधवर, सचिव, प्राचार्य महासंघ

येत्या १ डिसेंबरपासून नवीन शैक्षणिक सत्र सुरु होत आहे. तसेच कोरोना रुग्णांची संख्याही घटली आहे. त्यामुळे टप्प्या-टप्प्याने महाविद्यालये सुरु करण्यास हरकत नाही. परंतु, शासन आदेशाचे पालन करून आरोग्याची काळजी घेत सर्वांना महाविद्यालयात काम करावे लागेल.

- डॉ. एस. एम. राठोड, अध्यक्ष, पुटा

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना महाविद्यालयांत येण्यासाठी एस.टी. बसची सुविधा उपलब्ध करून द्यावी लागेल. तसेच जिल्हा प्रशासनाच्या ताब्यात असलेली महाविद्यालयांची वसतिगृहे खुली करावी लागतील.

- डॉ. के. सी. मोहिते, प्राचार्य, सी. टी. बोरा, महाविद्यालय, शिरूर

Lokmat: 17.12.2020



## News Paper Clippings Related to MCASC (Autonomous), Pune- 5

# 'पुरुषोत्तम'ला मुहूर्त मिळेना, विद्यार्थी मात्र स्पर्धेसाठी तयार

## कोरोनानंतरचे जग : महाराष्ट्र कलोपासक आयोजकांशी साधला संवाद

अतुल चिंचली
लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : "आम्ही पुरुषोत्तमची वाट पाहतोय. या स्पर्धेत एक वेगळीच ऊर्जा असते. 'पुरुषोत्तम'साठीच महाविद्यालयात प्रवेश घेतो," अशी भूमिका घेणारे विद्यार्थी अत्यंत उत्साहाने पुरुषोत्तम स्पर्धेसाठी तयार आहेत, स्पर्धेची वाट पाहत आहेत. आयोजक महाविद्यालये सुरू होण्याच्या प्रतीक्षेत असल्याने त्यांना 'पुरुषोत्तम'साठी मुहूर्तच मिळत नसल्याची स्थिती आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर टप्प्याटप्प्याने सर्व गोष्टी सुरू झाल्या. चित्रपट, नाटक या मनोरंजनालाही परवानगी मिळाली. महाविद्यालये सुरू होण्यासाठी सकारात्मक प्रतिसाद दिसून येत आहे. महाविद्यालयाच्या कला मंडळातील कलाकार 'पुरुषोत्तम'सारख्या एकांकिका स्पर्धेची आतुरतेने वाट पाहत असतात. जानेवारीत महाविद्यालये सुरू होण्याची चिन्हे दिसू लागल्याने विद्यार्थ्यांना आशेचा किरण दिसू लागला आहे. या पार्श्वभूमीवर 'लोकमत'ने महाविद्यालयातल्या कला मंडळातील विद्यार्थी प्रतिनिधी आणि महाराष्ट्रीय कलोपासकच्या आयोजकांशी संवाद साधला.

"यंदा कला मंडळात येणारी नवीन मुले पुरुषोत्तम स्पर्धेबाबत विचारत आहेत. आमच्याकडून चाळीस टक्के नाटक लिहून झाले आहे. स्पर्धा झाली तर एक चांगले नाटक सादर करण्याच्या तयारीने स्पर्धेत सहभागी होणार आहोत," असे मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स अँड कॉमर्सचा विद्यार्थी सौरभ गायकवाड म्हणाला. बृहन महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाच्या योगेश सप्रे याने सांगितले की, पुरुषोत्तम स्पर्धेतून वेगळीच ऊर्जा मिळते. स्पर्धा सुरु होणार असेल तर बरेच बदल होण्याची शक्यता आहे. अशा वेळी ते स्वीकारून स्पर्धेत उतरण्याची आमची तयारी असेल. विद्यार्थ्यांकडे नाटकांचे विषय असले तरी कमी वेळात नाटक बसवण्याचे आव्हान असेल.



आम्ही नाटकासाठी महाविद्यालयात जातो. दरवर्षी स्पर्धा ऑगस्टमध्ये असते. त्यामुळे आमच्या मीटिंग मार्चमध्ये होतात. यंदाही मीटिंग झाल्या. "पुरुषोत्तम"ला दुसरा पर्यायच नाही. महाविद्यालयाने सरावाला जागा नाही दिली तरी आम्ही बाहेर कुठेही सराव करु. आम्ही 'पुरुषोत्तम' होणार याच आशेवर आहोत.

-प्रणव करे, गरवारे वाणिज्य महाविद्यालय

यंदा आम्ही सिम्बायोसिस, थेस्पो या स्पर्धा केल्या आहेत. काही ना काही चालू आहे. 'पुरुषोत्तम'साठी आम्ही उत्सुक आहोत. स्पर्धा झाली तर काळजी घेऊन नाटक सादर करु. 'पुरुषोत्तम'साठी काही विषय तयार आहेत. आयोजकांच्या निर्णयावर पुढची तयारी सुरु होईल.

-रितिका श्रोत्री, सर परशुरामभाऊ महाविद्यालय

नाट्यगृहांना परवानगी मिळाली तरी महाविद्यालये अजून सुरु झाली नाहीत. पुरुषोत्तम करंडक एकांकिका ही जिवंत स्पर्धा आहे. महाविद्यालये सुरु झाल्याशिवाय आम्ही निर्णय घेऊ शकत नाही.

- राजेंद्र ठाकूरदेसाई, चिटणीस, महाराष्ट्रीय कलोपासक

Lokmat: 18.12.2020

## *News Paper Clippings Related to MCASC (Autonomous), Pune- 5*

# बारावी विद्यार्थ्यांच्या टेन्शनमध्ये वाढ

## ६० टक्के अभ्यासक्रम पूर्ण; परीक्षेबाबत संभ्रम

सकाळ EXCLUSIVE

पुणे, ता. १७ : दरवर्षी डिसेंबर म्हटलं की बारावीचा अभ्यासक्रम जवळपास शिकवून पूर्ण झालेला असतो आणि विद्यार्थ्यांचा 'स्टडी पिरियड' सुरू होतो. अर्थात, या काळात विद्यार्थी वर्षभर केलेल्या अभ्यासाची उजळणी, सराव करायला सुरुवात करतात. यंदा मात्र, डिसेंबर सुरू झाला तरी अद्याप केवळ ६० ते ७० टक्के अभ्यासक्रम ऑनलाइनद्वारे शिकवून झाल्याची माहिती समोर येत आहे. एकीकडे ऑनलाइनद्वारे उर्वरित अभ्यासक्रम शिकणे आणि दुसरीकडे परीक्षेबाबत असणारा संभ्रम, अशा वातावरणामुळे बारावीच्या परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचे 'टेन्शन' वाढू लागले आहे.

**आतापर्यंत ६० ते ७० टक्के अभ्यासक्रम शिकवून पूर्ण झाला आहे. परंतु ऑनलाइन शिक्षणात कला शाखेच्या विद्यार्थ्यांना भाषा, तर वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना अकाउंट्स आणि विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्यांना गणित, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र हे विषय शिकणे अवघड जात असल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.**
**– राजकुमार गायकवाड,**
मुख्याध्यापक, श्री सयाजी नाथ महाराज विद्यालय, आळंदी रोड

ऑनलाइन शिक्षणाद्वारे बारावीचा बऱ्यापैकी म्हणजे साधारणतः ६० ते ७० टक्के अभ्यासक्रम पूर्ण झाला आहे. अद्याप परीक्षेबाबत विद्यार्थी संभ्रमात आहेत. विद्यार्थ्यांचा लेखी आणि प्रात्यक्षिक परीक्षेचा सराव कनिष्ठ महाविद्यालयामार्फत सुरू आहे. परंतु परीक्षा ऑनलाइन होणार की ऑफलाईन? यंदाचे ऑनलाइन शिक्षण, कमी केलेला अभ्यासक्रम याचा विचार करता, परीक्षा नेमक्या कशा होणार? याबाबत विद्यार्थ्यांमध्ये अद्याप गोंधळाचे वातावरण आहे. अर्थात, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर यंदा एप्रिल-मे मध्ये बारावी आणि दहावीच्या परीक्षा होतील, अशी शक्यता वर्तविली जात आहे. बारावीच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचे (नियमित) परीक्षा अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने नुकतीच सुरवात केली आहे. परीक्षेचा अर्ज भरण्याबाबत विद्यार्थी प्रचंड उत्सुक असल्याचे निरीक्षण प्राचार्यांनी नोंदवले आहे. यानिमित्ताने विद्यार्थ्यांशी संवाद साधला असता, त्यांनी परीक्षा पद्धती आणि स्वरूप याबाबत प्रचंड संभ्रम असल्याचे सांगितले.

विज्ञान शाखेतून बारावीच्या परीक्षेची तयारी करणारी ओमिका काळे म्हणाली, "ऑनलाइन शिक्षणात बऱ्याच अडचणी येत आहेत. मोबाईल स्टोरेज, नेटवर्कची समस्या सातत्याने भेडसावत आहे. महाविद्यालयामार्फत नियमितपणे शिकविले जात आहे. परंतु ऑनलाइन शिक्षणाचा फारसा सराव नसल्याने ग्रास्पिंग पॉवर कमी पडत आहे. त्यामुळे अभ्यासक्रम पूर्ण करणे, त्यानंतर सराव आणि मग बोर्डाच्या परीक्षा कशा होणार, याची चिंता सतावत आहे."

शिवाजीनगर येथील मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव म्हणाले, "या कालावधीत दरवर्षी विद्यार्थ्यांचा अभ्यासाचा सराव सुरू झालेला असतो. परंतु यंदा ऑनलाइन शिक्षण असले, तरी याद्वारे विद्यार्थ्यांपर्यंत अधिक सक्षमपणे कन्टेंट पोचत आहे. सध्या प्रात्यक्षिक परीक्षेचा सराव ऑनलाइन पद्धतीने सुरू आहे. परंतु जानेवारीपासून नियमितपणे वर्ग सुरू झाल्यास प्रात्यक्षिकांचा सराव करून घेण्यावर भर दिला जाईल."

Sakaal: 18.12.2020



## *News Paper Clippings Related to MCASC (Autonomous), Pune- 5*

# Colleges prep to reopen in-person lectures for Classes 11 and 12

**Dheeraj Bengrut**
puneletters@htlive.com

Junior colleges in the city are about to start 'live', in-person classes from January 4, for Class 11 and Class 12 students, following the Pune Municipal Corporation (PMC) permission to start the same.

Now college administrations are gearing up to resume classroom lectures given the Covid protocols issued by the state government.

"We are all set to begin offline classes and practicals for Class 12 students initially at our college. Accordingly, preparations have begun to sanitise each and every bench and have sanitisers on the college premises. Thermal checking of each student will be done on the college premises. We are following all the guidelines given by the state government. Also, medical equipment like thermometer and oxymeter are on hand if any student is found with symptoms. Social distancing will be maintained in the classroom as students will be called in batches," said S P College principal V M Solapurkar.

Aftab Anwar Shaikh, principal of Poona College of Arts, Commerce and Science said, "We are following the Covid guidelines for starting-up of the colleges, but 90 per cent of our students come via public transport buses; and some of them from slum areas. Along with safety precautions inside the colleges, it is also necessary to provide students a safe travelling mode. As schools and colleges start from January 4, thousands of students will travel across the city. We will be checking and doing thermal scanning inside the college, but at the same time it is necessary to have their travelling exposure to the infection secure."

Meanwhile, college principals are also worried about completing of the syllabus for FYJC students.

Due to the Maratha reservation case, admissions were on hold for two months, and the re-started from November 26.

"It is a challenge for all the colleges to complete the syllabus for FYJC students due to the delayed admission process. Now we are planning extra classes to cover the syllabus. Also our preparations for starting offline classroom lectures are on in full swing. Daily, each and every classroom bench will be sanitised," said Rajendra Zunjarrao, principal, Modern College of Arts Science and Commerce, Shivajinagar.

Hindustan Times: 30.12.2020

## News Paper Clippings During December 2020

### Section: Education

# आमच्यासाठी नवीन वर्षाचे गिफ्टच

## महाविद्यालयात येण्यास विद्यार्थी उत्सुक, विद्यापीठाच्या भूमिकेचे स्वागत

**पुणे, ता. ३० : घरात बसून ऑनलाइन शिक्षण घेताना अडचणी येत आहेत, विषय समजत नाही, लक्ष लागत नाही. जानेवारीमध्ये महाविद्यालय पुन्हा सुरू होणार असेल, तर हे आमच्यासाठी नव्या वर्षाचे गिफ्ट असेल. महाविद्यालयांनी सुरक्षेची तयारी करावी, आम्ही त्यांना सहकार्य करू, अशा शब्दांत विद्यार्थ्यांनी महाविद्यालय सुरू करण्याच्या निर्णयाला पाठिंबा दिला.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रत्यक्ष महाविद्यालय सुरू करण्यासाठी प्राचार्यांशी दोन दिवस संवाद साधला. त्यांची मते, सूचना जाणून घेतल्या. अनेक प्राचार्यांनी महाविद्यालय सुरू करण्यास अनुकूलता दर्शविली आहे. नववी ते बारावीपर्यंत शाळा व महाविद्यालय सुरू होत असताना उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थाही सुरू व्हाव्यात, अशी भूमिका कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी बैठकीत मांडली होती. याबाबत 'सकाळ'ने विद्यार्थ्यांचीही भूमिका जाणून घेतली.

बीएच्या तृतीय वर्षात शिकणारी शर्वरी ढोले म्हणाली, "ऑनलाइन शिक्षणामुळे अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. विषयदेखील पूर्ण समजत नाही. आमचे शेवटचे वर्ष असल्याने कॉलेज सुरू होणार असेल तर ही आमच्यासाठी आनंदाची गोष्ट आहे. कॉलेजने सुरक्षेच्या उपाययोजना कराव्यात आम्हीही स्वतःची काळजी घेऊ."

बीएस्सी तृतीय वर्षात शिकणारी भक्ती सत्तीकर म्हणाली, "ऑनलाइन शिक्षणात अडचणी येत आहेत, तसेच प्रॅक्टिकल पण होत नाहीत. त्यामुळे महाविद्यालय सुरू होणार असेल तर हे आमच्यासाठी नव्या वर्षाचे गिफ्ट आहे. योग्य काळजी घेतली तर कोरोनाचा धोका टाळता येईल."

इंजिनिअरिंग करणारा गणेश कुलकर्णी म्हणाला, "कोरोनाच्या दुसऱ्या लाटेचा अंदाज घेऊन, महाविद्यालय सुरू करण्यास काही हरकत नाही. तसेच पहिल्या सेमिस्टरची परीक्षा झाल्यानंतर दुसऱ्या सेमिस्टरमध्ये कॉलेज सुरू करावेत."

'कोरोना'ची लागण होणार नाही अशी व्यवस्था करून व नियमांचे पालन करून थेट महाविद्यालय सुरू करावे. तसेच पुणे विद्यापीठाचे विभाग सुरू करतानाही सर्व तयारी करावी, असे एम.कॉम. करणारा सौरभ शिंदे याने सांगितले.

Sakaal: 1.12.2020

# अंतिमपूर्व वर्षातील विद्यार्थ्यांना दिलासा

## बॅकलॉग परीक्षेत अडथळा आला तरी सोडविलेले प्रश्न होणार 'सेव्ह'

**पुणे, ता. ३० :** अंतिमपूर्व वर्षातील विद्यार्थ्यांची ऑनलाइन बॅकलॉग किंवा श्रेणीसुधार परीक्षा घेताना त्यामध्ये तांत्रिक अडचणी आल्यास विद्यार्थ्यांनी सोडवलेले प्रश्न आपोआप सेव्ह होणार आहेत. तसेच, विद्यार्थ्यांना संगणकीय प्रणालीतून वेळ वाढवून दिली जाईल, असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

**येथे नोंदवा अडचणी**

परीक्षा आयोजनापूर्वी किंवा परीक्षेदरम्यान येणाऱ्या अडचणी व शंकांचे निरसन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी sps.unipune.ac.in मध्ये लॉगइन करून तक्रारी नोंदवाव्यात. तसेच, विद्यार्थ्यांनी संबंधित महाविद्यालयाशी संपर्क साधावा, असे परिपत्रकात नमूद केले आहे.

**महत्त्वाच्या तारखा**

- **सराव परीक्षा :** ३ ते ५ डिसेंबर
- **बॅकलॉग व श्रेणीसुधार परीक्षा :** ८ ते २३ डिसेंबर

पुणे विद्यापीठातर्फे ८ ते २३ डिसेंबर या कालावधीत बॅकलॉग आणि श्रेणीसुधारसाठी विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जाणार आहे. ही परीक्षा बहुपर्यायी प्रश्न पद्धतीने फक्त ऑनलाइन माध्यमातून होणार आहे. यासाठी एका तासाचा कालावधी असून, ६० प्रश्नांपैकी ५० प्रश्न सोडविण्यासाठी अनिवार्य आहे. या ६० पैकी ४० टक्के सोपे, ४० टक्के मध्यम तर २० टक्के अवघड प्रश्न विचारले जातील.

अंतिम वर्षाची परीक्षा घेताना मोठ्याप्रमाणात विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागले. त्यामध्ये अनेक विद्यार्थ्यांना लॉगइन करता आले नाही, परीक्षा मध्येच बंद पडली, पेपर सेव्ह झाला नाही यासह इतर तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागले होते. त्यामुळे विद्यापीठाने संबंधित एजन्सीला यातील त्रुटी शोधून काढून सुधारणा करण्यास सांगितले होते. अंतिम पूर्व वर्षाच्या बॅकलॉग व श्रेणीसुधार परीक्षेसाठी सुमारे अडीच लाख विद्यार्थी आहेत, ही संख्या अंतिम वर्षाएवढीच आहे. त्यामुळे परीक्षा सुरळीत पार पाडण्याचे आव्हान आहे. ऑनलाइन परीक्षा सुरू असताना तांत्रिक कारणांमुळे परीक्षा बंद पडल्यास तेवढाच कालावधी संगणकीय प्रणालीतून वाढवून दिला जाईल. तसेच यापूर्वी सोडविलेले प्रश्न सेव्ह होऊन खंड पडल्यापासून परीक्षा पुन्हा सुरू होईल, असे परीक्षा विभागाने काढलेल्या परिपत्रकात नमूद केले आहे.

Sakaal: 1.12.2020



## News Paper Clippings During December 2020

### Section: Education

# नऊ महिन्यांनंतर वाजली तिसरी घंटा; रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## ललित कला केंद्र : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ खुला मंच

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : त्रिपुरी पौर्णिमेनिमित्त लक्ष लक्ष दिव्यांच्या तेजाने उजळलेला ललित कला केंद्रातील खुल्या रंगमंचाचा संपूर्ण आसमंत. आठ ते नऊ महिन्यांनंतर वाजलेली 'तिसरी घंटा'. रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सर्व नियमांचे पालन करून सादर झालेली आरती अंकलीकर-टिकेकर यांची सुरेल मैफल... तर दुसरीकडे सुदर्शन रंगमंच येथे 'शब्दांची रोजनिशी'चा रंगलेला प्रयोग... अशा आश्वासक वातावरणात कला क्षेत्राचा श्रीगणेशा झाला.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्रातील खुल्या रंगमंचावर रविवारी (३० नोव्हेंबर) भारतीय अभिजात संगीत क्षेत्रातील प्रतिभावंत गायिका आरती अंकलीकर-टिकेकर यांची सुश्राव्य मैफल रंगली. ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर यांच्या हस्ते तिसरी घंटा देऊन कार्यक्रमास प्रारंभ झाला.

शांत कातरवेळी मिट्ट काळोखात प्रकाशमान झालेल्या दिव्यांच्या तेजात ही स्वरमैफल रसिकांसाठी अविस्मरणीय ठरली. ललित गौरी रागात बडा आणि छोटा ख्यालचे त्यांनी प्रभावीपणे सादरीकरण केले. चैतन्य कुंटे रचित भूप रागातील तराणा सादर करून त्यांनी मैफल सजवली. अनेक महिन्यांनी मैफल प्रत्यक्ष अनुभवल्याचा आनंद रसिकांचा चेहऱ्यावर होता.

### सुदर्शन रंगमंचावर प्रयोग

- शनिवार पेठेतल्या महाराष्ट्र कल्चरल सेंटरच्या सुदर्शन रंगमंचावर 'शब्दांची रोजनिशी' हा नाट्यप्रयोग तीन दिवस रंगला. १० मार्चला याच रंगमंचावर नाटकाचा चौदावा प्रयोग झाला होता. त्यानंतर २८ नोव्हेंबरला पंधरावा प्रयोग सादर झाला. प्रेक्षकांनी या प्रयोगांना चांगला प्रतिसाद दिला.
- पहिल्या दिवशी २०, दुसऱ्या दिवशी ३० आणि आणि तिसऱ्या दिवशी (३० नोव्हेंबर) चाळीस प्रेक्षक उपस्थित होते. प्रेक्षकांच्या प्रतिसादामुळे कलाकारांमध्ये देखील आत्मविश्वास निर्माण झाला असल्याचे दिग्दर्शक अतुल पेठे यांनी सांगितले.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर बंदिस्त सभागृहात कार्यक्रम न करता खुल्या रंगमंचावर केला. रंगमंचाची आसन क्षमता चारशे-साडेचारशे ते आहे. पण आम्ही शंभर जणांनाच प्रवेश दिला. सोमवारपासून लोककला उत्सवाला प्रारंभ झाला. डिसेंबरमध्ये नृत्य आणि नाटकाचे नियोजन केले आहे

- प्रा. डॉ. प्रवीण भोळे, विभागप्रमुख, ललित कला केंद्र गुरुकुल

Lokmat: 1.12.2020

पुनिता जैन : भारताला अमर्याद संधी

# आता रंग, गंध-सुवास, आवाजाचीही बौद्धिक संपदा !

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : चित्रपट, पुस्तकांचे कॉपीराईट किंवा वैज्ञानिक शोध, उपकरणांच्या पेटन्टपुरते मर्यादित असलेले बौद्धिक संपदेचे जग आता इतके विस्तारले आहे, की पुढच्या काळात एखादा रंग, गंध, सुवास आणि विशिष्ट आवाजाचीही नोंद इंटेलेक्चुअल प्रॉपर्टी म्हणजे 'आयपी'अंतर्गत होईल. पाश्चात्य जग याबाबत खूप पुढे असून, खानपान, वेशभूषा आदींबाबत प्रचंड विविधता असलेल्या भारताला सजग राहावे लागेल. या क्षेत्रात अमर्याद संधी असतील, असे या विषयाच्या तरुण अभ्यासक, रायपूरच्या पुनिता जैन यांचे म्हणणे आहे.



मुंबईच्या किरीट मेहता विधी महाविद्यालयातून फॅशन लॉमध्ये कायद्याची पदवी घेतलेल्या पुनिता जैन यांनी नुकतीच अमेरिकेतील येशिवा विद्यापीठाच्या बेंजामिन कार्डोझो स्कूल ऑफ लॉमधून एलएलएम पदवी प्राप्त केली असून, युवा पिढीच्या दृष्टीने या अगदीच नव्या विषयाच्या संधीची क्षितिजे त्यांनी 'लोकमत'शी बोलताना उलगडून सांगितली. यवतमाळ येथील ॲड. अमरचंद दर्डा यांची पुनिता ही नात आहे.

### युवा पिढीपुढे कर्तबगारीचे नवे अवकाश

नानाविध प्रकारचे खाण्याचे पदार्थ, विविधरंगी वेशभूषा, लोकसंस्कृतीची अनेक वैशिष्ट्ये अशा विविधतेने नटलेल्या भारतात या बौद्धिक संपदेच्या नव्या जागतिक प्रवाहामुळे अमर्याद संधी आहेत. प्रत्येक प्रदेशाची काही खास वैशिष्ट्ये आहेत. अगदी गंगाजलालादेखील जीआय मानांकन मिळू शकते. तेव्हा या सगळ्यांची योग्य नोंदणी व रक्षणाच्या निमित्ताने युवा पिढीसमोर कर्तबगारीचे नवे अवकाशही खुले होणार आहे, असे पुनिता जैन म्हणाल्या.

त्या म्हणाल्या, की साधारणपणे आयपी म्हणजे पेटन्ट एवढेच शिकल्यासवरल्या लोकांनाही वाटते. प्रत्यक्षात रोजच्या जगण्यातल्या प्रत्येक गोष्टीचा संबंध बौद्धिक संपदेशी आहे. खाण्यापिण्याच्या चिजा, वस्त्रप्रावरणे, फॅशनमधील प्रत्येक वस्तूंचा यात समावेश होतो. आता तर रंग, गंध, आवाज अशा कल्पनेपलीकडील बाबींची आयपी म्हणून नोंद होते. उदा. डेअरी मिल्कच्या उत्पादनांचा खास जांभळा रंग ही त्या कंपनीची बौद्धिक संपदा आहे. टिफनीचा परफ्यूम उत्पादनांचा निळा रंग ही त्यांचीच खासियत आहे. ख्रिश्चन लोब्युटिन पादत्राणांच्या तळव्याचा रंग हा त्यांचा आयपी आहे. युरोप, अमेरिका याबाबत अधिक जागरूक आहेत. भारतात दिवाणी व फौजदारी स्वरूपाचे कायदे असले तरी या विषयाची सखोल माहिती व्यावसायिक व तज्ज्ञांना नाही. दहा-बारा वर्षांपूर्वी ट्रेडमार्कबाबत सिंगापूर करार झाला. परंतु, भारताने तो अद्याप मान्य केलेला नाही.

Lokmat: 1.12.2020

# News Paper Clippings During December 2020

## Section: Education

### 8,900 more open category seats for FYJC admissions

Ardhra.Nair@timesgroup.com

Pune: Tuesday is the last day to submit part I of the First Year Junior College online admission forms, and December 2 is the last date for making changes in the option form (part II).

But officials said since the number of seats under the open category have increased, students must check the first cut-off list for each college and then change their preferences in the form.

Meena Shendkar, assistant deputy director for Pune division, said there are more seats in

**Education officers said the software will change the SEBC students' status into the open category**

the open category and students applying for the second round can review their option form.

"About 8,900 seats were reserved for SEBC students which are now converted into the open category in Pune and Pimpri Chinchwad. Hence, there are more seats in the open category and students who missed out on admission by a small difference of marks can reapply. Secondly, students who had previously applied under SEBC quota need to now review their own preferences in the option form and equate it with the open category first cut-off before submitting form 2. Depending upon the vacancy of seats in a college and the closeness of your SSC marks to the first cut-off marks in a college, the students should fill up their option form," she added.

Previously unregistered students, those whose admissions were rejected or cancelled in the first round and those who were out of the CAP process because they did not take admission in a college of first preference can also apply in the second round.

The Times of India: 1.12.2020

### SPPU PLANS FYJC FIRST-TERM EXAMS FROM DECEMBER 8

PUNE: The examination department of Savitribai Phule Pune University (SPPU) has declared tentative dates of the first term exams of this academic year. As per the schedule, the exams will start from December 8 and go on till December 20. While the results will be declared in the first week of January 2021. The exams will be held as per the multiple choice question (MCQ) method.

SPPU has instructed its affiliated colleges to conduct the exams in both online and offline mode. "Each college needs to follow safety arrangements for conducting offline exams as per the guidelines given by UGC. Exams will be for one hour and question paper should be set by the college itself," said Mahesh Kakade, director of the board of examination and evaluation.

"It is a challenge for colleges to complete FYJC syllabus due to delayed admissions. If the education department issues circular for extra classes, it would help colleges," said Rajendra Zunjarrao, principal, of Moder College of Arts Science and Commerce, Shivajinagar. HTC

Hindustan Times: 1.12.2020

### अध्यासन केंद्रासाठी समिती

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात भटक्या आणि विमुक्त प्रवर्गाच्या प्रश्नांना वाहिलेले स्वतंत्र अध्यासन केंद्र सुरू करण्यासाठी समिती स्थापन करण्याचा निर्णय विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने घेतला. त्याचप्रमाणे पुणे विद्यापीठातील विभागांमध्ये शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांची शुल्कवाढ स्थगित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बुधवारी झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या समितीमध्ये व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. संजय चाकणे, डॉ. व्ही. बी. गायकवाड, डॉ. सुधाकर जाधवर, विलास उगले, प्रा. विनायक लष्कर, डॉ. सुनील भणगे, सुषमा अंधारे प्रा. मिलिंद कांबळे आदींचा समावेश आहे.

दरम्यान, विद्यापीठाने पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा यशस्वीपणे पार पाडल्या. याबाबत व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांनी कुलगुरू, प्र-कुलगुरू आणि परीक्षा संचालक डॉ. महेश काकडे यांच्या अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात आला.

Maharashtra Times: 1.12.2020

### यूजीसी नेट परीक्षेची अंतिम उत्तरतालिका जाहीर

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

यूजीसी नेट परीक्षेची अंतिम उत्तरतालिका प्रसिद्ध केली आहे. एनटीएच्या अधिकृत संकेतस्थळावर nta.ac.in वर ही उत्तरतालिका विद्यार्थ्यांना पाहता येणार आहे. याबाबत माहिती नॅशनल टेस्टिंग एजन्सीने फिली आहे.

यूजीसी नेट ही राष्ट्रीय स्तरावरील परीक्षा २४ सप्टेंबर ते १३ नोव्हेंबरदरम्यान घेण्यात आली होती. देशभरातून एकूण आठ लाख ६० हजार ९७६ उमेदवारांनी या परीक्षेसाठी नोंदणी केली होती. त्यापैकी केवळ पाच लाख २६ हजार ७०७ उमेदवारच परीक्षेला बसले. विविध ८१ विषयांमध्ये ही संगणकीकृत परीक्षा झाली होती. एनटीएनेही यासंदर्भात जारी केलेल्या परिपत्रकात असे म्हटले आहे की तात्पुरत्या उत्तरतालिकेवर नोंदवलेल्या सर्व हरकतींचे परीक्षण करून त्यांचे निराकरण करून ही अंतिम उत्तरतालिका तयार केली गेली आहे.

या आधारे निकाल तयार करण्यात आला आहे. यूजीसी नेट २०२० चा निकाल एनटीएकडून लवकरच जाहीर केला जाईल. हा निकाल एनटीए आणि यूजीसी नेटची अधिकृच वेबसाइट nta.ac.in आणि ugcnet.nta.nic.in वर पाहवयास मिळेल.

Pudhari: 1.12.2020



News Paper Clippings During December 2020

Section: Education

### अंतिम वर्षाच्या परीक्षेचा विद्यापीठाकडून सुधारित निकाल जाहीर

त्रुटी केल्या दुरुस्त : विद्यार्थ्यांच्या 'लॉगिन'मध्ये दिसतो निकाल; सुमारे सहा हजार आल्या होत्या तक्रारी

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या अंतिम वर्षाच्या परीक्षेच्या निकालात त्रुटी असल्याचे समोर आले होते. त्यावर येत्या ३ डिसेंबरपर्यंत सुधारित निकाल जाहीर केला जाणार असल्याचे विद्यापीठातर्फे स्पष्ट करण्यात आले होते. त्यानुसार विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने दोन हजारांहून अधिक विद्यार्थ्यांचा सुधारित निकाल मंगळवारी (दि. १) प्रसिद्ध केला आहे.

पुणे विद्यापीठातर्फे पुणे, अहमदनगर व नाशिक या तीनही जिल्ह्यांतील अंतिम वर्षाच्या सुमारे अडीच लाख विद्यार्थ्यांची ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षा घेण्यात आली. परंतु, परीक्षा देऊनही काही विद्यार्थ्यांची अनुपस्थिती लागली. त्यामुळे विद्यार्थ्यांनी विद्यापीठाने जाहीर केलेल्या निकालावर आक्षेप घेतला. त्यामुळे निकालात चूक झाली असल्याचे वाटत विद्यार्थ्यांकडून विद्यापीठाने तक्रारी स्वीकारल्या.

विद्यापीठाकडे सुमारे ५ ते ६ हजार तक्रारी प्राप्त झाल्या. त्यातील २ हजाराहून अधिक विद्यार्थ्यांचा सुधारित निकाल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर तसेच संबंधित विद्यार्थ्यांच्या प्रोफाईलवर पाठविण्यात आला असल्याचे विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे म्हणाले की, ऑनलाइन परीक्षा देताना अनेक चुका केल्या आहेत. सुमारे दीड हजार विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्ज भरताना विषयच निवडलेले नाही. तर २७६ विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्जात भरलेला विषय सोडून दुसऱ्याच विषयाची परीक्षा दिली आहे. त्याचप्रमाणे ३७२ विद्यार्थ्यांनी स्वतःच्या ई-मेल आयडीवर परीक्षा देता दुसऱ्याच्या ई-मेल आयडीवरून परीक्षा दिली आहे. विद्यापीठाने २ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांचा सुधारित निकाल जाहीर केला असून इतर विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

### बॅकलॉगची परीक्षा 'प्रॉक्टर्ड' पद्धतीनेच

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे पुणे, नगर व नाशिक जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांची बॅकलॉग व श्रेणी सुधार परीक्षा येत्या ८ डिसेंबरपासून ऑनलाइन व प्रॉक्टर्ड पद्धतीने घेतली जाणार आहे. त्यामुळे ऑनलाइन परीक्षेदरम्यान गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांना कारवाईला सामोरे जावे लागणार आहे.



परीक्षेदरम्यान इमेज प्रोसेसिंग करण्यात येईल. त्यात परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्याव्यतिरिक्त दुसऱ्या व्यक्तीचा चेहरा दिसून आल्यास संबधित विद्यार्थ्यावर कारवाई केली जाईल.

- महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने घेण्यात आली. सुमारे अडीच लाख विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली. विद्यापीठाने कोरोनामुळे विद्यार्थ्यांना घरी बसून परीक्षा देण्याची संधी उपलब्ध करून दिली होती. परंतु, या परीक्षेत प्रॉक्टर्ड पद्धतीचा वापर करण्यात आला नव्हता. परिणामी परीक्षेदरम्यान अनेक विद्यार्थ्यांनी गैरप्रकार करता आले, अशी चर्चा शिक्षण वर्तुळात झाली. त्यामुळे या पुढील परीक्षांसाठी प्रॉक्टर्ड पद्धतीचा अवलंब करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे.

काही विद्यार्थ्यांनी गुगलवर प्रश्नांची उत्तरे शोधून अंतिम वर्षाची परीक्षा दिली. तसेच, काहींनी मित्रांच्या मदतीने पुस्तकात प्रश्नांची उत्तरे शोधून प्रश्नपत्रिका सोडवली. त्यामुळे परीक्षेचा निकाल ३० ते ३५ टक्क्यांनी वाढला. परीक्षा विशिष्ट वातावरणात कोणताही गैरप्रकार करता येणार नाही, अशा पद्धतीने घेणे अपेक्षित आहे. परंतु कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा अनेकांनी गैरफायदा घेतल्याचे दिसून आले. त्यामुळे विद्यापीठाने प्रॉक्टर्ड पद्धतीने परीक्षा घेण्याची तयारी केली आहे.

Lokmat: 2.12.2020

### सहा हजार विद्यार्थ्यांच्या तक्रारींचे निवारण

पुणे विद्यापीठाकडून दोन हजार जणांचे निकाल अपलोड

पुणे, ता. १ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम वर्ष परीक्षेच्या निकालातील त्रुटींमुळे आलेल्या सुमारे सहा हजार तक्रारींचे निवारण करत सुधारित निकाल तयार केला आहे. त्यातील दोन हजार विद्यार्थ्यांचा ऑनलाइन निकाल जाहीर केला आहे. परीक्षा विभागाने जाहीर केलेल्या तारखेपेक्षा दोन दिवस आधीच निकाल तयार केल्याने विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

पुणे विद्यापीठाने ऑक्टोबर महिन्यात अंतिम वर्षाची परीक्षा बहुपर्यायी प्रश्न (मल्टिपल च्वाइस क्वेश्चन- एमसीक्यू) पद्धतीने ऑनलाइन माध्यमातून घेतली होती. यामध्ये तांत्रिक अडचणींमुळे विद्यार्थ्यांना परीक्षेत अडथळे आले. त्याचा परिणाम निकाल जाहीर झाल्यानंतर समोर आले. अनेक विद्यार्थ्यांना एकाच विषयात शून्य गुण मिळाले होते, तसेच परीक्षा देऊनही अनुपस्थित दाखवणे, चुकीचा विषय गुणपत्रिकेत दाखवणे अशा अनेक तक्रारी विद्यापीठाकडे विद्यार्थ्यांनी केल्या होत्या.

अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना पुढील अभ्यासक्रमासाठी प्रवेश घ्यायचा असल्याने गडबड असताना चुकीच्या निकालामुळे त्यांना मनस्ताप सहन करावा लागला. विद्यार्थ्यांच्या तक्रारी वाढत असल्याने विद्यापीठाने त्यांचे विश्लेषण करून त्याची कारणे शोधण्यास सुरूवात केली. यात काही तक्रारी तांत्रिक चुका, विद्यार्थ्यांनी दोन ई-मेल देणे, वारंवार पेपर सोडविणे या कारणांमुळे निकाल बदलला असल्याचे स्पष्टीकरण विद्यापीठाने दिले होते. विद्यापीठाकडे आलेल्या सर्व तक्रारींचे ३ डिसेंबरपर्यंत निवारण केले जाईल, असे परीक्षा विभागाने परिपत्रक काढून स्पष्ट केले होते. परंतु, दोन दिवस आधीच हे काम पूर्ण केले आहे.

**निकालपत्र वाटपास सुरुवात**

पुणे विद्यापीठाने निकाल जाहीर केले, पण अजून अनेक विद्यार्थ्यांना गुणपत्रिका उपलब्ध झालेली नाही. परदेशी शिक्षण, पदव्युत्तर पदवीचा प्रवेश, बार काउन्सिलकडे विधीच्या विद्यार्थ्यांना करावी लागणारी नोंदणी व त्याची संपत आलेली मुदत यासाठी गुणपत्रिका आवश्यक आहे. फार्मसी, इंजिनिअरिंगच्या गुणपत्रिका छापून पूर्ण केल्या आहेत, त्या संबंधित महाविद्यालयांकडे पाठविण्यात आल्या आहेत. उर्वरित अभ्यासक्रमाच्या गुणपत्रिका काही दिवसांत उपलब्ध होतील, असे काकडे यांनी सांगितले.

परीक्षा विभागाचे संचालक डॉ. महेश काकडे म्हणाले, "विद्यापीठाने दोन दिवस आधीच सुमारे सहा हजार जणांचा सुधारित निकाल तयार केला आहे. हा निकाल अपलोड करण्याचे काम सुरू असून, आतापर्यंत दोन हजार जणांचा निकाल जाहीर केला आहे. उर्वरित निकालही लवकरच अपलोड केला जाईल."

Sakaal: 2.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# तांत्रिक अडचण आल्यास विद्यार्थ्यांना वाढीव वेळ

## बॅकलॉग, श्रेणीसुधार परीक्षांबाबत विद्यापीठाची माहिती

पुणे, दि. १ (प्रतिनिधी) – अंतिम पूर्व वर्षातील विद्यार्थ्यांची ऑनलाइन बॅकलॉग किंवा श्रेणीसुधार परीक्षा घेताना त्यामध्ये तांत्रिक अडचणी आल्यास विद्यार्थ्यांनी सोडवलेले प्रश्न आपोआप सेव्ह होणार आहेत. विद्यार्थ्यांना संगणकीय प्रणालीतून वेळ वाढवून दिली जाईल, असे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे. परीक्षा आयोजनापूर्वी किंवा परीक्षेदरम्यान येणाऱ्या अडचणी व शंकांचे निरसन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी sps.unipune.ac.in मध्ये लॉगइन करून तक्रारी नोंदवाव्यात. तसेच विद्यार्थ्यांनी संबंधित महाविद्यालयास संपर्क साधावा, असे परिपत्रकात नमूद केले आहे.

पुणे विद्यापीठातर्फे ८ ते २३ डिसेंबर या कालावधीत बॅकलॉग आणि श्रेणीसुधारसाठी विद्यार्थ्यांची परीक्षा घेतली जाणार आहे. ही परीक्षा बहुपर्यायी प्रश्न (मल्टिपल चॉइस क्वेश्चन एमसीक्यू) पद्धतीने फक्त ऑनलाइन माध्यमातून होणार आहे. यासाठी एका तासाचा कालावधी असून, ६० प्रश्नांपैकी ५० प्रश्न सोडविण्यासाठी अनिवार्य आहे. या ६० पैकी ४० टक्के सोपे, ४० टक्के मध्यम, तर २० टक्के अवघड प्रश्न विचारले जातील.

अंतिम वर्षाची परीक्षा घेताना मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागले. त्यामध्ये अनेक विद्यार्थ्यांना लॉगइन करता आले नाही, परीक्षा मध्येच बंद पडली, पेपर सेव्ह झाला नाही यासह इतर तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागले होते. त्यामुळे विद्यापीठाने संबंधित एजन्सीला यातील त्रुटी शोधून काढून सुधारणा करण्यास सांगितले होते.

अंतिम पूर्व वर्षाच्या बॅकलॉग व श्रेणीसुधार परीक्षेसाठी सुमारे अडीच लाख विद्यार्थी आहेत, ही संख्या अंतिम वर्षाएवढीच आहे. त्यामुळे परीक्षा सुरळीत पार पाडण्याचे आव्हान आहे. ऑनलाइन परीक्षा सुरू असताना तांत्रिक कारणांमुळे परीक्षा बंद पडल्यास तेवढाच कालावधी संगणकीय प्रणालीतून वाढवून दिला जाईल. तसेच यापूर्वी सोडविलेले प्रश्न सेव्ह होऊन खंड पडल्यापासून परीक्षा पुन्हा सुरू होईल, असे परीक्षा विभागाने काढलेल्या परिपत्रकात नमूद केले आहे.

Saamana: 2.12.2020

# विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांचा पेच

## 'यूजीसी'चे नियम कडक; सरकारच्या धोरणाकडे संस्थांचे लक्ष

ब्रिजमोहन पाटील : सकाळ वृत्तसेवा

सकाळ EXCLUSIVE

**पुणे, ता. १ : कोरोनामुळे बंद पडलेली महाविद्यालये, विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग येत्या जानेवारी महिन्यापासून सुरू होण्याची शक्यता आहे. विद्यार्थीही थेट शिक्षण घेण्यासाठी इच्छुक आहेत. पण, पुण्याबाहेरून येणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ, महाविद्यालयांचे वसतिगृह सहज उपलब्ध होणार नसल्याने निवासाचा मोठा पेच निर्माण होण्याची शक्यता आहे.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात राज्याच्या ग्रामीण भागातून मोठ्याप्रमाणात विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. विद्यापीठाचे वसतिगृह सवलतीच्या शुल्कात उपलब्ध होत असल्याने विद्यार्थ्यांचा मोठा खर्च वाचतो. पुण्यातील अनेक महाविद्यालयांचे वसतिगृह महाविद्यालयांच्या आवारात आहेत. त्यामुळे पालक विद्यार्थ्यांना तेथेच राहण्याची सोय करतात.

मार्च महिन्यात कोरोनाचा पहिला रुग्ण सापडला आणि तेव्हापासून पुणे विद्यापीठासह सर्व महाविद्यालयांचे वसतिगृह बंद आहेत. येत्या जानेवारीत कमी विद्यार्थी संख्येमध्ये महाविद्यालये सुरू होण्याची शक्यता आहे. महाविद्यालये, प्राध्यापक, विद्यार्थी यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.

पुणे विद्यापीठातील वसतिगृहात साडेतीन हजार विद्यार्थी-विद्यार्थिनी राहतात. शैक्षणिक विभाग सुरू करताना एका खोलीमध्ये एकच विद्यार्थी असला पाहिजे, खोली शेअरिंग करता येणार नाही, वसतिगृहात आल्यावर विद्यार्थ्याला १४ दिवस क्वारंटाइन करणे, त्याचा कोरोना रिपोर्ट निगेटिव्ह आहे का? हे तपासणे अशा अनेक अटी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) घातल्या आहेत. मात्र, विद्यापीठात मुलांच्या वसतिगृहांमध्ये ७२१ खोल्या आहेत तर मुलींच्या वसतिगृहात ५१५ खोल्या आहेत. म्हणजे साडेतीन हजार विद्यार्थ्यांपैकी केवळ एक हजार २३६ विद्यार्थ्यांचीच सोय होणार आहे. अनेक महाविद्यालयांच्या वसतिगृहांमध्ये खोल्यांची संख्या १०० च्या आत आहे, तेथे व्यवस्था कशी करायची, असा पेच त्यांच्यासमोर निर्माण झाला आहे.




| | मुलांचे | मुलींचे |
|---|---|---|
| संख्या | १ | १ |
| क्षमता | २०१९ | १४६५ |
| खोली संख्या | ७२१ | ५१५ |

**नियम बदलतील?**

अनलॉकची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर वाहनांमधून प्रवास करताना प्रवासी संख्येवर मर्यादा होती, कालांतराने ती १०० टक्के प्रवासी वाहतूक सुरू झाली. त्याचप्रमाणे 'यूजीसी'ने आता एका खोलीत एकच विद्यार्थी राहील असे सांगितले असले तरी, कोरोनाच्या संसर्गाचा आढावा घेऊन या नियमांत बदल होऊन खोली शेअरिंग सुविधा उपलब्ध होऊ शकते, असे काही अधिकाऱ्यांनी सांगितले.

**२१७७ विद्यार्थ्यांनी साहित्य नेले**

पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना त्यांचे साहित्य घेऊन जाण्यास २ डिसेंबरची मुदत दिली आहे. त्यानंतर ज्यांचे साहित्य राहिले असेल ते एका खोलीत एकत्र ठेवून खोल्या रिकाम्या केल्या जाणार आहेत. आतापर्यंत ८१२ मुलींनी व एक हजार ३६५ मुलांनी साहित्य नेले आहे.

पुणे विद्यापीठातील अंतिम वर्षाची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना आठ दिवसांत वसतिगृह रिकामे करण्याची सूचना दिली आहे. वसतिगृहांची देखभाल व सॅनिटायझेशन करून ते विद्यार्थ्यांसाठी तयार करून ठेवले जातील.
- डॉ. प्रफुल्ल पवार, कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

महाविद्यालयांच्या वसतिगृहातील कोविड सेंटर आता बंद झाले आहे. ते सॅनिटायझर करून व्यवस्थित केले जात आहेत. महाविद्यालये सुरू करताना प्रथम पुण्यातील विद्यार्थ्यांना बोलविले जाईल. पुण्याबाहेरील विद्यार्थ्यांना स्थिती सुधारल्यानंतर सूचना दिल्या जातील.
- डॉ. पी. बी. बुचडे, प्राचार्य, गरवारे महाविद्यालय

जानेवारीत विभाग सुरू करताना वसतिगृह उपलब्ध करून द्यावे. अनेक विद्यार्थी हे सामान्य घरातील आहेत, त्यांना बाहेर राहावे लागणे परवडणारे नाही. याचा विचार सरकारने करावा.
- दयानंद शिंदे, विद्यार्थी

Sakaal: 2.12.2020



*News Paper Clippings During December 2020*

Section: Education

# 'बॅकलॉग'ची परीक्षा प्रॉक्टर्ड पद्धतीनेच

## गैरप्रकार रोखण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा निर्णय

**पुणे, ता. १ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिमपूर्व वर्षातील बॅकलॉग व श्रेणीसुधार परीक्षा ऑनलाइन घेताना त्यात गैरव्यवहार होऊ नये, यासाठी प्रॉक्टर्ड मेथडचा वापर केला जाणार आहे. कॉपी होत असल्याचे लक्षात आल्यास विद्यार्थ्यांवर कारवाई केली जाणार आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने घेतली. त्यात अडीच लाख पैकी सुमारे दोन लाख विद्यार्थ्यांनी ऑनलाइन परीक्षा दिली. पण ही परीक्षा देताना विद्यार्थ्यांवर कोणतेही नियंत्रण नव्हते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी वॉट्सॲप ग्रुपवर चर्चा करून, गुगलद्वारे उत्तर शोधून घोळक्याने बसून परीक्षा दिल्याचे प्रकार समोर आले होते. तसेच विद्यार्थ्यांनी कॉपी कशी करावी याचा व्हिडिओ देखील व्हायरल झाला होता. यामुळे बऱ्याच विद्यार्थ्यांचा इतर वर्षातील निकाल व अंतिम वर्षाचा निकाल यात मोठ्याप्रमाणात सुधारणा झाल्याचेही लक्षात आले आहे. विद्यापीठाला या ऑनलाइन परीक्षेतील मर्यादा समोर आल्याने प्रॉक्टर्ड पद्धतीचा वापर करण्याबाबत विचार करण्यात आला आहे. याबाबत कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी काही दिवसांपूर्वी याबाबत सूतोवाच ही केले होते.

**तीन वेळा इशारा, नंतर कारवाई**

परीक्षा विभागातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, ८ डिसेंबरपासून सुरू होणाऱ्या बॅकलॉग परीक्षेत विद्यार्थ्यांना कॉपी करता येणार नाही. परीक्षा सुरू झाल्यावर त्यांचा फ्रंट कॅमेरा सुरू होईल. मोबाईल स्क्रिनमध्ये विद्यार्थी वगळता इतर कोणी दिसल्यास त्यांचा फोटो निघेल. तसेच विद्यार्थ्यांनी परीक्षा देताना परीक्षेच्या ॲपऐवजी गुगल, वॉट्सॲप किंवा इतर कोणतीही विंडो ओपन केली तर ते देखील परीक्षा विभागला कळणार आहे. या विद्यार्थ्यांनी गैरप्रकार करताना त्यांना दोन ते तीन वेळेस इशारा दिला जाईल, त्यानंतर कारवाई केली जाईल. सराव परीक्षेसाठीचा ईमेल विद्यार्थ्यांना पाठवताना या सूचना विद्यार्थ्यांना दिल्या जाणार आहेत.

**एक-दोन दिवसात वेळापत्रक**

बॅकलॉगची परीक्षा ८ डिसेंबरपासून सुरू होणार असली तरी विद्यापीठाने अद्याप परीक्षेचे वेळापत्रक जाहीर केलेले नाही. बुधवार किंवा गुरुवारी सर्व अभ्यासक्रमांचे वेळापत्रक जाहीर होण्याची शक्यता आहे.

Sakaal: 2.12.2020

*News Paper Clippings During December 2020*

Section: Education

# Errors in exam results annoy students at FC

**The provisional numbers and actual results do not match, leading to many missing admission deadlines**

Sukhada.Khandge
@timesgroup.com
TWEETS @Sukhadak_Mirror

Students of Fergusson College have complained about discrepancy in the results, which has subsequently led to issues in admission to further courses.

It has been a week since the autonomous college announced results for various final-year courses. Since then, many students have said that the provisional results do not match their actual marklists. A few of them do not have marks of all semesters.

Vishal Palve, a final-year BSc physics student, said, "Before I had asked for the marks, the college informed me that my cumulative grade point average (CGPA) is 8.46. But, when I received the final marklist, it showed 8.43. I had already applied to SP College, Modern College and Nagar College with the 8.46 score. Now, Nagar College has informed that the admission for grantable batch is full. I will have to apply to the non-grant section."

Another student of final-year BA (Hindi) student said, "I want to apply for my masters course and a job, but the college is yet to announce the overall result. I had also emailed my query. It remains unanswered. I have already missed a few deadlines. I fear I will miss more."

A final-year statistics student said he has already missed the deadline to apply for the post of a guard. "Now there is a problem with the result. We have to approach the college if we want to change the result. They should announce the final result soon," he added.

The students have also asked college to conduct the backlog examinations. These demands were taken to the officials.

Sandhya Sonawne, one of the students who represented the aggrieved students, said, "There are many students who have backlogs from their previous examination. The college has promised us that they will conduct the tests soon."

NM Kulkarni, vice principal of Fergusson College, said the provisional results are being provided to those who need it. He claimed that these are correct 99 per cent of the times. "We are helping those who approach us with problems. The backlog exams will take place in January so that students get a fair chance," he added.



Students took these issues to officials at Fergusson College

Pune Mirror: 2.12.2020

# यूजीसी नेट परीक्षेत ४७ हजार १५७ उमेदवार पात्र

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राष्ट्रीय परीक्षा मंडळाने (एनटीए) घेतलेल्या राष्ट्रीय पात्रता परीक्षेचा (नेट) निकाल जाहीर झाला आहे. त्यात सहायक प्राध्यापक पदासाठी ४० हजार ९८६ आणि कनिष्ठ संशोधक पाठ्यवृत्ती, सहायक प्राध्यापक पदासाठी ६ हजार १७१ असे एकूण ४७ हजार १५७ उमेदवार पात्र ठरले आहेत.

करोना संसर्गामुळे जूनमध्ये होणारी परीक्षा यंदा २४ सप्टेंबर ते १३ नोव्हेंबरदरम्यान बारा दिवसांमध्ये देशभरातील २२५ शहरांतील १ हजार ११९ केंद्रांवर घेण्यात आली.

परीक्षेसाठी एकूण ८ लाख ६० हजार ९७६ उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ५ लाख २६ हजार ७०७ उमेदवारांनी परीक्षा दिली. त्यात सहायक प्राध्यापक पदासाठी नोंदणी केलेल्या २ लाख ५९ हजार ७३४ उमेदवारांपैकी १ लाख ४० हजार ४७९ उमेदवारांनी, तर कनिष्ठ संशोधक पाठ्यवृत्ती, सहायक प्राध्यापक पदासाठी नोंदणी केलेल्या ६ लाख १ हजार २४२ उमेदवारांपैकी ३ लाख ८६ हजार २२८ उमेदवारांनी परीक्षा दिली.

कनिष्ठ संशोधक पाठ्यवृत्ती, सहायक प्राध्यापक पदासाठी अर्ज केलेल्या आणि सहायक प्राध्यापक पदासाठी पात्र ठरलेल्या ३६ हजार १३८ उमेदवारांपैकी ४ हजार २९ उमेदवारांची एनएफएससी पाठ्यवृत्तीसाठी, ४३१ उमेदवारांची एनएफओबीसी पाठ्यवृत्तीसाठी आणि ४७५ उमेदवारांची एमएएनएफ पाठ्यवृत्तीसाठी निवड झाली असल्याचे एनटीएने प्रसिद्धिपत्रकाद्वारे नमूद केले आहे.

लोकसत्ता Wed, 02 December 2020
https://epaper.loksatta.com/c/5(



*News Paper Clippings During December 2020*

Section: Education

## प्रवेश प्रक्रिया लांबल्याने आर्थिक फटका

# महाविद्यालय, विद्यार्थ्यांपुढे शुल्कपेच

रसिका मुळ्ये, लोकसत्ता

**मुंबई :** व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या लांबलेल्या प्रवेश प्रक्रियेमुळे एका बाजूला लाखो विद्यार्थ्यांवर आलेला दोन अभ्यासक्रमांच्या शुल्कांचा भुर्दंड तर दुसऱ्या बाजूला प्रवेश रद्द करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या रिक्त जागांमुळे महाविद्यालयांची कोंडी, असे चित्र उच्च शिक्षण क्षेत्रात दिसत आहे.

राज्यातील पारंपरिक आणि स्वयंअर्थसाहाय्यित अभ्यासक्रमांचे अध्यापन सुरू होऊन पहिले सत्र आता संपत आले आहे. बहुतेक सर्व विद्यापीठांनी पहिल्या सत्राच्या परीक्षांचेही नियोजन केले आहे. मात्र, आता अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, कृषी, विधि, शिक्षणशास्त्र, ललित कला, वास्तुकला, हॉटेल मॅनेजमेंट, व्यवस्थापन पदव्युत्तर यांसह विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू होणार आहे. करोनाच्या प्रादुर्भावामुळे यंदा या अभ्यासक्रमांच्या प्रवेश परीक्षा रखडल्या. परीक्षा झाल्यानंतरही मराठा आरक्षणाबाबतच्या पेचामुळे ही प्रवेश प्रक्रिया यंदा लांबली. या अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियांबाबत अनिश्चितता असल्यामुळे बहुतेक विद्यार्थ्यांनी पारंपरिक अभ्यासक्रमांना प्रवेश निश्चित केले. आता व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया सुरू झाल्यानंतर आधीचे प्रवेश रद्द करून विद्यार्थ्यांना नव्याने प्रवेश घ्यावे लागणार आहेत. एक सत्र जवळपास संपल्यानंतर दुसऱ्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेताना आधीच्या अभ्यासक्रमाचे संपूर्ण वर्षाचे शुल्क परत मिळणार का याबाबत संभ्रम आहे. त्याच वेळी विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द केल्यास आता नव्याने प्रवेश कसे होणार, असा प्रश्न महाविद्यालयांनाही सतावत आहे.

**विद्यार्थ्यांना भुर्दंड**

पारंपरिक अभ्यासक्रमाचे अनुदानित महाविद्यालयांचे शुल्क तुलनेने कमी आहे. मात्र, अनेक विद्यार्थ्यांनी *(पान २ वर)*



**'यूजीसी'ची सूचना काय?**

विद्यापीठ अनुदान आयोगाने सप्टेंबरमध्ये जाहीर केलेल्या शैक्षणिक वेळापत्रकानुसार नोव्हेंबरअखेरपर्यंत प्रवेश रद्द केल्यास संपूर्ण शुल्क परत करण्यात यावे, असे स्पष्ट करण्यात आले होते. तसेच विद्यार्थ्याने डिसेंबरअखेरपर्यंत प्रवेश रद्द केल्यास एक हजार रुपये प्रक्रिया शुल्क वजा करून बाकी शुल्क परत करण्यात यावे, असे आयोगाने नमूद केले. मात्र, त्याबाबत विद्यापीठांनी भूमिका स्पष्ट केलेली नाही.

epaper.loksatta.com
लोकसत्ता Thu, 03 December 2020
https://epaper.loksatta.com/c/5(

# महाविद्यालय, विद्यार्थ्यांपुढे शुल्कपेच

**(पान १ वरून)** स्वयंअर्थसाहाय्यित अभ्यासक्रमांना प्रवेश घेतले आहेत. यातील काही अभ्यासक्रमांचे शुल्क हे लाखो रुपयांच्या घरात आहे. त्याचप्रमाणे व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शुल्कही २५ हजार रुपयांपासून सुरू होते. आधीचे शुल्क परत न मिळाल्यास दोन्ही अभ्यासक्रमांचे शुल्क भरावे लागणार आहे. 'आम्ही सध्या ऑनलाइन शिकत आहोत. महाविद्यालयांनी शुल्क घेतलेल्या अनेक सुविधा या सत्रात वापरलेल्या नाहीत. नव्या महाविद्यालयात प्रवेश घेताना तेथेही अनेक सुविधा लगेच वापरात येणार नाहीत. मात्र, दोन अभ्यासक्रमांचे शुल्क भरावे लागणार आहे,' असे औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या एका विद्यार्थ्याने सांगितले.

**महाविद्यालयांची कोंडी**

महाविद्यालये सत्र किंवा वर्षाचे शुल्क घेतात. दरवर्षी साधारणपणे महाविद्यालय सुरू झाल्यानंतर एक ते तीन महिन्यात विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास त्याला काही प्रमाणात शुल्क देण्यात येते. यंदा संपूर्ण सत्र महाविद्यालयाने अध्यापन केले आहे. आता विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द केल्यास त्यांच्या जागी दुसरे विद्यार्थी मिळण्याची शक्यता कमी आहे. असे असताना विद्यार्थ्याला त्याचे सर्व शुल्क देणे शक्य नाही. महाविद्यालयांना रिक्त जागांवर प्रवेश करण्याची मुभा मिळाली तरीही नामवंत महाविद्यालयातील प्रवेश होतील. म्हणजेच सध्या मधल्या फळीतील महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेले विद्यार्थी काही प्रमाणात महाविद्यालय बदलतील. मात्र, त्यामुळे मधल्या फळीतील महाविद्यालयांना फटका बसेल, असे एका महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी सांगितले. 'विद्यापीठ अनुदान आयोगाने वेळापत्रक जाहीर केले तेव्हा नोव्हेंबरमध्ये महाविद्यालये सुरू होणे अपेक्षित होते. त्यामुळे प्रवेश झाल्यानंतर एक ते दोन महिन्यांचा कालावधीत प्रवेश रद्द झाल्यास काही प्रमाणत पुन्हा विद्यार्थी मिळणे शक्य असते. पारंपरिक अभ्यासक्रमांचे प्रवेश आयोगाच्या वेळापत्रकापूर्वीच झाले आहेत. तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांचे अजूनही झालेले नाहीत. त्यामुळे साधारण एका सत्राचा फरक पडणार आहे,' असेही एका प्राचार्यांनी नमूद केले.

लोकसत्ता Thu, 03 December 2020
https://epaper.loksatta.com/c/56761818

# कायदा सुधार समिती काम सुरू

## अहवाल तयार करणार : ४ डिसेंबरपर्यंत सूचना मागविल्यात

■ लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** राज्याच्या उच्च शिक्षण विभागातर्फे विद्यापीठ कायद्यातील सुधारणेसाठी स्थापन केलेल्या विविध समित्यांच्या कामाला सुरुवात झाली आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार कायद्यात कोणते बदल करावेत, ऑनलाइन परीक्षा संदर्भात कायद्यात कोणती तरतूद करावी, इतर विद्यापीठांमध्ये असणाऱ्या चांगल्या गोष्टींचा समावेश राज्याच्या शिक्षण क्षेत्रात कसा करावा, याबाबत समितीकडून अहवाल तयार करण्याचे काम केले जात आहे, असे समितीतील सदस्यांनी सांगितले.

शिक्षण क्षेत्रातील बदलते प्रवाह व नवीन शैक्षणिक धोरणाला अनुसरण महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मध्ये आवश्यक सुधारणा करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांची समिती स्थापन केली आहे.

विद्यापीठ कायद्यात सुधारणा करताना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमावली व मार्गदर्शक तत्त्वे यांचा विचार केला जाणार आहे. तसेच महाराष्ट्रासह इतर ठिकाणच्या विद्यापीठांमध्ये असणाऱ्या चांगल्या गोष्टींचा अंतर्भाव महाराष्ट्रातील शिक्षण क्षेत्रामध्ये करता यावा; या दृष्टीनेही समितीकडून चाचपणी केली जाणार आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घ्याव्या लागल्या. मात्र, विद्यापीठ कायद्यात ऑनलाइन परीक्षा संदर्भात कोणतीही तरतूद नाही. त्यामुळे विद्यापीठ कायद्यात बदल करताना ऑनलाइन परीक्षाबाबतही सविस्तर मांडणी केली जाणार आहे. शासनातर्फे स्थापन केलेल्या समिती बरोबरच सध्या उपसमित्यांच्या बैठका घेतल्या जात आहेत. येत्या जानेवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात समितीचा अंतरिम अहवाल शासनाला सादर केला जाणार आहे, असे समितीतील एका सदस्याने सांगितले.

**शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांचा समावेश**

या समितीमध्ये विविध विद्यापीठांच्या आजी-माजी कुलगुरूंसह कायदे अभ्यासक व शिक्षण क्षेत्रात कार्यरत असलेल्या तज्ज्ञ प्राध्यापकांचा समावेश केला आहे. तंत्रशिक्षण संचालक डॉ. अभय वाघ हे या समितीचे सदस्य तर उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने हे या समितीचे सदस्य सचिव आहेत. विद्यापीठ कायद्यातील सुधारणांच्या दृष्टीने शिक्षक-शिक्षकेतर सेवक, विविध शैक्षणिक संघटना यांच्याकडून येत्या ४ डिसेंबरपर्यंत सूचना मागविल्या आहेत.

Lokmat: 3.12.2020

## News Paper Clippings During December 2020

### Section: Education



THE TIMES OF INDIA, PUNE
THURSDAY, DECEMBER 3, 2020

# SPPU to give avg of marks if pupil fails in one subject

Ardhra.Nair @timesgroup.com

**Pune:** The Savitribai Phule Pune University (SPPU) has decided to give students the average marks obtained in the other subjects in the subject they have failed to clear and pass them.

The move comes after the university received complaints that students have failed in just one subject due to a technical glitch or have been awarded zero marks.

"If there was a technical glitch like the student was unable to submit the answer sheet in one examination or was awarded zero marks by the system in just one subject, and if the student has submitted such a complaint, then the board of examination has decided to pass the student by giving average marks obtained in the rest of the subjects. We do not want to unnecessarily trouble the students or make them give a re-examination for no mistake of theirs," Mahesh Kakade, director of the board of examination and evaluation at SPPU, said.

After receiving over thousands of complaints from students regarding errors in their final-year mark sheets, Savitribai Phule Pune University's examination department has started releasing the corrected mark sheets. Till now, about 3,500 such mark sheets have been uploaded online, the examination department said.

"The students can route their complaints via their respective colleges, and we will take a look. Of about 14 lakh examinations conducted, we have received 6,000 complaints and we are ready to rectify the mistake if it was on our part," Kakade said.

**BACKLOG EXAMS**

File photo

Proctored online examination for backlogs set to begin on December 8

- Schedule would be out late on Wednesday night on the university website
- The mock tests will start on Thursday

The software would show about 15-20 warnings if the student opens another website or does anything else which can be termed as cheating, post which they would be logged out



# Parents and teachers want clarity on format for boards

Vinamrata.Borwankar @timesgroup.com

**Mumbai:** Come December, the countdown to the board exams begins and prelims and doubt-solving sessions are on in full swing. But, schedules are not yet announced for class X and XII boards this year, making stakeholders uneasy over the lack of clarity. Parents want the state education department to announce a tentative timetable and paper pattern for the SSC and HSC board exams to help students prepare.

HSC exams usually begin in the third week of February, while SSC exams start in the first week of March. However, school education minister, Varsha Gaikwad, has said the board exams are likely to be pushed to May this academic year owing to the Covid-19 pandemic. Teachers, however, want the government to plan ahead. "There is uncertainty about when the exams will be held, but the government must prepare and plan for any changes that would be required this year. The paper pattern may be tweaked, or the time duration of an exam may be changed. These changes must be planned in advance so that students and schools are not hassled at the last minute," said a teacher from a suburban school. The Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education has cut the syllabus by 25%.

**SCHEDULES NOT YET ANNOUNCED**

While education department has permitted physical classes for grades IX to XII, most local bodies have not allowed schools to function at least up to December 31. "While many have adapted to online learning, it doesn't reach all students. In our house, there are three children and just one phone. Our son is going to a tutor for help with board exam," said Dhairya Shah, parent of Kandivli-based SSC student.

Over 17 lakh and 13 lakh students appear for SSC and HSC exams each year. Board chairperson, Shakuntala Kale, said no changes are likely in the paper pattern. "Our paper patterns have been revamped recently and they already focus on application-based questions. We will decide the timetable soon."

The Times of India: 3.12.2020



News Paper Clippings During December 2020

Section: Education



# विद्यार्थिदशेतील व्यायामाचा उपयोग आजही जाणवतो – श्रीरंग गोडबोले

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** विद्यार्थिदशेत महाराष्ट्रीय मंडळात व्यायाम करण्यासाठी जात असे, त्या वेळी केलेल्या व्यायामाचा उपयोग आजही जाणवतो. जिथे व्यायाम केला, त्याच ठिकाणी पुरस्काराने सन्मान होणे ही आनंदाची बाब असल्याची भावना रंगकर्मी श्रीरंग गोडबोले यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्रीय मंडळाचे माजी सरचिटणीस कै. रमेश शिवरामपंत दामले यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ कै. रमेश दामले स्मृती प्राइड ऑफ महाराष्ट्रीय मंडळ हा पुरस्कार देदीप्यमान कामगिरी करणाऱ्या माजी विद्यार्थ्याला दिला जातो. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते श्रीरंग गोडबोले यांना यंदाच्या वर्षीचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या वेळी महाराष्ट्रीय मंडळाचे अध्यक्ष निवृत्त एअर मार्शल भूषण गोखले आणि संस्थेचे कार्यवाह धनंजय दामले उपस्थित होते.

निवृत्त एअर मार्शल भूषण गोखले म्हणाले, व्यायाम, खेळ आणि सुदृढपणा यांच्या जोपासनेत महाराष्ट्रीय मंडळ सातत्याने कार्यरत आहे. श्रीरंग गोडबोले यांनी पुरस्काराचे महत्त्व वाढवले असून परिपूर्ण आयुष्य कसे जगावे हे त्यांच्याकडून शिकले पाहिजे, असेही गोखले म्हणाले. डॉ. नितीन करमळकर म्हणाले, महाराष्ट्रीय मंडळ या संस्थेला लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, भोपटकर यांच्यासारख्या देशभक्तांचा सहवास लाभला. अशा संस्थेत येण्याची संधी मिळाल्याबाबत आनंद व्यक्त करून पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी ई-कंटेंट तयार करण्याच्या कामी श्रीरंग गोडबोले यांनी दिलेल्या योगदानाचे कौतुकही करमळकर यांनी केले. कार्यवाह धनंजय दामले यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले, तसेच महाराष्ट्रीय मंडळाच्या कारकीर्दीचा आढावा घेतला.

कै. रमेश दामले स्मृती प्राइड ऑफ महाराष्ट्रीय मंडळ हा पुरस्कार डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते श्रीरंग गोडबोले यांना प्रदान करण्यात आला, या वेळी धनंजय दामले आणि निवृत्त एअर मार्शल भूषण गोखले उपस्थित होते.



१० प्रभात पुणे, शुक्रवार, दि. ४ डिसेंबर २०२०

# नॉन मायनॉरिटी शब्द २०१४ पासून वापरात

- राज्य शिक्षण मंडळाकडून स्पष्टीकरण
- हिंदू शब्द वगळल्याने सोशल मीडियावर निषेधाचे मेसेज व्हायरल

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ३ -** राज्य शिक्षण मंडळाच्या दहावी व बारावीच्या परीक्षा अर्जात मुस्लीम, ख्रिश्चन, बौद्ध, शीख, पारसी, जैन या घटकांसाठी मायनॉरिटी, तर उर्वरित सर्व घटकांसाठी २०१४ पासून नॉन मायनॉरिटी हा शब्द वापरण्यात येत आहे. याची माहिती विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका व प्रमाणपत्रावर नमूद करण्यात येत नसल्याचे स्पष्टीकरण राज्य शिक्षण मंडळाने दिले आहे.

राज्य शिक्षण मंडळाच्या दहावी, बारावीच्या परीक्षा अर्जात मायनॉरिटीच्या वर्गीकरणात हिंदू शब्द वगळून नॉन मायनॉरिटीचा उल्लेख केल्याने सोशल मीडियावर निषेधाचे मेसेज व्हायरल झाले. यामुळे संभ्रम निर्माण झाला आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्य शिक्षण मंडळाने खुलासा प्रसिद्ध केला. हिंदू शब्दाऐवजी नॉन मायनॉरिटी हा शब्द २०१४ पासून वापरण्यात येत असल्याचे बोर्डाने स्पष्ट केले आहे.

राज्य मंडळाच्या वतीने परीक्षांचे अर्ज ऑनलाइन भरून घेण्याची प्रक्रिया राबविण्यात येत असते. या अर्जात मायनॉरिटी रिलीजन यात मुस्लीम, ख्रिश्चन, बौद्ध, शीख, पारसी, जैन असे धर्म नमूद केले आहे. यात हिंदू धर्माचा स्वतंत्रपणे उल्लेख नाही. त्याऐवजी नॉन मायनॉरिटी असा उल्लेख आहे. त्यासंदर्भात बोर्डाने प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले की, विद्यार्थ्यांची माहिती मंडळाच्या परीक्षा अर्जात शाळा व महाविद्यालयांमार्फत भरून घेण्यात येत आहे. परंतु, केंद्र सरकारच्या अल्पसंख्याक मंत्रालय व महाराष्ट्र शासनाच्या अल्पसंख्याक विभागाने स्पर्धा परीक्षांसाठी अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचा तपशील मंडळाकडे मागितला होता. त्यामुळे मंडळाच्या परीक्षा समितीच्या दि. ७ सप्टेंबर २०१३ च्या सभेत हा शब्दाचा समावेश आहे. त्यात अन्य घटकांतील विद्यार्थ्यांना माहिती भरण्यासाठी नॉन मायनॉरिटी हा रकाना उपलब्ध करून दिला आहे. त्याचा उपयोग अल्पसंख्याक विभागाच्या माहितीसाठी करण्यात येतो, असे राज्य शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी सांगितले.

## *News Paper Clippings During December 2020*

Section: Education

# जानेवारीपासून शाळा अंशतः उघडाव्यात

■ 'सीआयएससीई'चे सर्व मुख्यमंत्र्यांना आवाहन

नवी दिल्ली, दि. ३ - जानेवारीपासून सर्व शाळा अंशतः उघडाव्यात. विशेषतः बोर्डाच्या परीक्षेला बसणाऱ्या इयत्ता १० वी आणि १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी तरी शाळा उघडण्यात याव्यात असे आवाहन भारतीय शालेय प्रमाणपत्र परीक्षा सचिव परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना केले आहे.

बोर्ड परीक्षांचे तारीखपत्रक निश्चित करण्यासाठी एप्रिल आणि मे महिन्यात होणाऱ्या राज्यांमधील विधानसभांच्या निवडणुकांचे वेळापत्रक समजावे यासाठी परिषदेने देशाच्या मुख्य निवडणूक आयुक्तांनाही पत्र लिहिले आहे.

कोविड-१९ च्या साथीमुळे यावर्षी मार्च महिन्यापासून सर्व शाळा बंद आहेत. मात्र, तरीही सर्व शाळांचे कामकाज ऑनलाइन माध्यमातून सुरू आहे. त्याचा आढावाही घेण्यात आला आहे, असे 'सीआयएससीई'चे मुख्य कार्यकारी गेरी अरॅथोन म्हणाले.

Prabhat: 4.12.2020

# राज्यामध्ये अकरावीचे ऑनलाइन वर्ग पुन्हा सुरू

सकाळ IMPACT

पुणे, ता. ३ : अकरावीच्या ऑनलाइन वर्गांना गुरुवारपासून पुन्हा सुरुवात झाली. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व शाळा व महाविद्यालये बंद आहेत. अशात अकरावीच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेतर्फे ऑनलाइन वर्ग दोन नोव्हेंबरला सुरू केले होते. पण, विद्यार्थ्यांना पूर्वसूचना न देता १० नोव्हेंबरला हे वर्ग अचानकपणे बंद केले होते.

याबाबत 'सकाळ'ने 'अकरावीच्या ऑनलाइन वर्गाला ब्रेक' या शीर्षकाखाली २५ नोव्हेंबरला वृत्त प्रसिद्ध केले होते. त्याची दखल घेत शिक्षण विभागाने अचानक बंद केलेले अकरावीचे ऑनलाइन वर्ग पुन्हा सुरू केले आहेत. यात कला, वाणिज्य, विज्ञान शाखेच्या मराठी व इंग्रजी माध्यमासाठी ऑनलाइन (युट्युब लाइव्हच्या माध्यमातून) तासिका घेण्यात येत आहेत. या तासिकांचे तपशीलवार वेळापत्रक हे एससीईआरटीच्या https://covid19.scertmaha.ac.in/eleventh या लिंकवर पाहता येणार आहे. तसेच, शाखानिहाय दैनिक युट्युब लिंकही या तपशीलवार वेळापत्रकात नमूद केली आहे, अशी माहिती 'एससीईआरटी'चे उपसंचालक विकास गरड यांनी दिली आहे.

Sakaal: 4.12.2020

# देशातील शाळा चार जानेवारीपासून सुरू करा

## सीआयएससीईने पाठवले राज्यांना पत्र

■ एस. के. गुप्ता
लोकमत न्यूज नेटवर्क

नवी दिल्ली : कौन्सिल फॉर दी इंडियन स्कूल सर्टिफिकेट एक्झामिनेशनने (सीआयएससीई) बोर्ड परीक्षांची अंतिम तयारीच्या पार्श्वभूमीवर राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना पत्र लिहून ४ जानेवारी, २०२१ पासून शाळा पुन्हा सुरू करण्याचा आग्रह केला आहे.

परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व सचिव गैरी अराथून यांनी 'लोकमत'ला सांगितले की, आम्ही सगळी राज्ये, केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्यमंत्र्यांना आवाहन केले की, दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी शाळा पुन्हा सुरू करण्याचा विचार करावा.

मुख्य निवडणूक आयुक्तांनाही आवाहन करण्यात आले आहे की, राज्यांत येत्या एप्रिल-मे महिन्यात होणाऱ्या निवडणुकांच्या तारखांची माहिती द्यावी. त्यातून बोर्ड परीक्षांमध्ये होणारी अडचण टाळता येईल.

गैरी अराथून म्हणाले की, कोरोना महामारीमुळे मार्च २०२० पासून देशातील शाळा बंद करण्यात आल्या आहेत. मोजक्या राज्यांनी त्या पुन्हा सुरू केल्या. हिमाचल प्रदेशने शाळा, महाविद्यालयांसह सगळ्या शैक्षणिक संस्था ३१ डिसेंबरपर्यंत बंद ठेवण्याची घोषणा केली होती.

दिल्लीचे उपमुख्यमंत्री व शिक्षणमंत्री मनीष सिसोदिया म्हणाले की, जोपर्यंत कोरोना लस येत नाही तोपर्यंत राज्यात सगळ्या शाळा बंद राहतील. गैरी अराथून म्हणाले की, जर शाळा पुन्हा सुरू करण्याची परवानगी दिली जात असेल तर सुरक्षा नियमांचे आणि सरकारने घालून दिलेल्या एसओपीचे पालन करावे लागेल.

Lokmat: 4.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

Section: Education

# विद्यापीठ अधिनियम समिती अध्यक्षपदी डॉ. सुखदेव थोरात

■ लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : उच्च शिक्षण क्षेत्रातील बदलते प्रवाह व नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यांना अनुसरून उच्च शिक्षणातील नवे प्रवाह सामावून घेण्यासाठी तसेच राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मध्ये सुधारणा केली जाणार आहे. त्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमण्यात आली आहे.

Lokmat: 4.12.2020

# सरकारच्या परीक्षा अर्जात 'हिंदू' का नाही?

## शिक्षण मंडळाचा खुलासा : अल्पसंख्याकांसाठीची तरतूद

■ लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : इयत्ता दहावी व बारावीच्या परीक्षा अर्जामध्ये २०१४ पासूनच मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, शीख, पारसी व जैन यासाठी 'मायनॉरिटी रिलिजन' व इतर सर्व घटकांसाठी 'नॉन मायनॉरिटी' असे रकाने समाविष्ट करण्यात आले आहेत, असे स्पष्टीकरण महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दिले आहे. ही माहिती विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका व प्रमाणपत्रावर नमूद करण्यात येत नसल्याचेही मंडळाने स्पष्ट केले आहे.

परीक्षा अर्जामध्ये 'हिंदू' शब्द वगळल्याच्या बातम्या प्रसिद्ध होत असल्याच्या पार्श्वभूमीवर मंडळाने हा खुलासा केला आहे. मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी दिलेल्या माहितीनुसार, अर्जातील मायनॉरिटी रिलीजन या रकान्यात मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, शीख, पारसी व जैन या उपरकान्यांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त उर्वरित सर्व घटकांसाठी नॉन मायनॉरिटी हा रकाना २०१४ पासून समाविष्ट आहे. तेव्हापासूनच प्रत्येक विद्यार्थ्यांची माहिती मंडळाच्या परीक्षा अर्जामध्ये भरून घेण्यात येते.

केंद्रीय अल्पसंख्यांक कार्य मंत्रालय व राज्याच्या अल्पसंख्याक विभागाने २०१३ मध्ये स्पर्धा परीक्षांसाठी अल्पसंख्याक विद्यार्थ्यांची माहिती मंडळाकडे मागितली होती. त्यानुसार मंडळाच्या परीक्षा समितीच्या ठरावाने परीक्षा अर्जामध्ये उपरकान्यांचा समावेश केले. मुस्लिम, ख्रिश्चन, बौद्ध, शीख, पारसी व जैन हे अल्पसंख्याक समुदाय शासनाच्या अधिसूचनेनुसार अर्जामध्ये घेतले आहेत. याव्यतिरिक्त अन्य विद्यार्थ्यांना माहिती भरण्यासाठी नॉन मायनॉरिटी हा रकाना उपलब्ध करून देण्यात आला आहे, असे भोसले यांनी स्पष्ट केले आहे.

Lokmat: 4.12.2020



# सोलापुरातील शिक्षक रणजितसिंह डिसले यांना ७ कोटींचा ग्लोबल टीचर पुरस्कार

पंढरपूर, दि. ३ (प्रतिनिधी) – युनेस्को व लंडन येथील वार्की फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा 'ग्लोबल टीचर प्राईझ' हा ७ कोटी रुपयांचा पुरस्कार सोलापूरच्या परितेवाडी येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक रणजितसिंह डिसले यांना जाहीर झाला. लंडनमधील नॅचरल हिस्ट्री म्युझियममध्ये झालेल्या समारंभात अभिनेते स्टीफन फ्राय यांनी याबाबत अधिकृत घोषणा केली. हा पुरस्कार मिळवणारे ते पहिलेच हिंदुस्थानी शिक्षक ठरले आहेत. महाराष्ट्रातील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकाचा जागतिक सन्मान झाला आहे.

जगभरातील १४० देशांतील बारा हजारांहून अधिक शिक्षकांच्या नामांकनातून अंतिम विजेता म्हणून डिसले गुरुजींच्या नावाची घोषणा करण्यात आली. कोडेड पुस्तकांच्या माध्यमातून त्यांनी देशातील शिक्षण क्षेत्रात अभिनव क्रांती केलेल्या कामाची दखल घेत त्यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

पुरस्काराच्या एकूण रकमेपैकी ५० टक्के रक्कम अंतिम फेरीतील ९ शिक्षकांना देण्याचे डिसले यांनी जाहीर केले आहे. यामुळे ९ देशांतील हजारो मुलांना गुणवत्तापूर्ण शिक्षण दिले जाईल. तर, मिळालेली रक्कम टीचर इनोव्हेशन फंडसाठी वापरणार आहे. त्यामुळे शिक्षकांमधील उपक्रमशीलतेला चालना मिळण्यास मदत होणार आहे. डिसले गुरुजींचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

Saamana: 4.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# निकालातील त्रुटी दूर करून विद्यापीठाकडून सुधारित निकाल

## अंतिम वर्ष परीक्षांचे सहा हजार निकाल जाहीर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घेतलेल्या अंतिम वर्ष परीक्षांच्या निकालातील त्रुटींमुळे गोंधळ निर्माण झाला होता. विद्यार्थ्यांनी दाखल केलेल्या तक्रारींची दखल घेऊन विद्यापीठाकडून सुधारित निकाल जाहीर करण्यात येत असून, आतापर्यंत सहा हजार विद्यार्थ्यांचे सुधारित निकाल जाहीर करण्यात आले आहेत.

विद्यापीठाने पुणे, नगर आणि नाशिक जिल्ह्यातील अंतिम वर्ष विद्यार्थ्यांच्या ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने परीक्षा घेतल्या. मात्र परीक्षा देऊनही गुणपत्रिकेवर अनुपस्थित असल्याचा शेरा, शून्य गुण नमूद करण्यात आल्याचे आढळून आले. त्या बाबत विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे तक्रारी दाखल केल्या. त्यानंतर विद्यापीठाने १८ हजार विद्यार्थ्यांच्या निकालांची पुनर्पडताळणी केली. त्यात काही विद्यार्थी परीक्षेला अनुपस्थित असल्याचे, परीक्षा अर्ज भरताना विषयच निवडले नसल्याचे, दोन ई मेल आयडी नोंदवल्याचे असे प्रकार आढळून आले होते. सुधारित निकाल ३ डिसेंबरपर्यंत जाहीर करण्यात येणार असल्याचे विद्यापीठाकडून परिपत्रकाद्वारे स्पष्ट करण्यात आले होते.

विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे म्हणाले, की सुधारित निकाल १ डिसेंबरपासून जाहीर करण्यात येत आहेत. आतापर्यंत ६ हजार निकाल सुधारित झाले आहेत. सुधारित निकाल विद्यार्थ्यांच्या प्रोफाईलमध्ये देण्यात आले आहेत. तसेच महाविद्यालय स्तरावरून तक्रारी मागवण्यात आल्या असल्याने आणखी काही तक्रारी येत आहेत. त्यासाठी स्वतंत्र यंत्रणा करण्यात आली आहे.

लोकसत्ता Fri, 04 December 2020
https://epaper.loksatta.com/c/56783948

# श्रेणीसुधार, विषय राहिलेल्या विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठाकडून सराव परीक्षा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने विद्यार्थ्यांवर लक्ष**

श्रेणीसुधार आणि विषय राहिलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा 'प्रॉक्टर्ड' पद्धतीने घेतली जाणार आहे. त्यात कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने परीक्षार्थींवर लक्ष ठेवले जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्याव्यतिरिक्त अन्य हालचाली झाल्याचे आढळून आल्यास त्याबाबतचा इशारा विद्यार्थ्याला दिला जाणार आहे. त्यामुळे या परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांना गैरप्रकार करता येणार नसल्याचे स्पष्ट होत आहे.

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या प्रथम वर्ष ते अंतिम पूर्व विद्यार्थ्यांच्या विषय राहिलेल्या (बॅकलॉग) आणि श्रेणी सुधार परीक्षा ८ ते २३ डिसेंबर दरम्यान होणार आहेत. ऑनलाइन पद्धतीने होणाऱ्या परीक्षांचा विद्यार्थ्यांना अंदाज येण्यासाठी विद्यापीठाने विद्यार्थ्यांना ३ ते ५ डिसेंबर दरम्यान सराव परीक्षेची संधी उपलब्ध करून दिली असून, पहिल्या दिवशी ४५ हजार ५०५ विद्यार्थ्यांनी सराव परीक्षा दिली.

विद्यापीठाने ऑक्टोबरमध्ये अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने घेतल्या. त्यानंतर आता विषय राहिलेल्या (बॅकलॉग) आणि श्रेणीसुधार परीक्षा होणार आहेत. अंतिम वर्षाच्या परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागला होता. त्यामुळे श्रेणीसुधार आणि विषय राहिलेल्या परीक्षांमध्ये या अडचणींची पुनरावृत्ती न होण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे. जवळपास अडीच लाख विद्यार्थी या परीक्षा देणार आहेत.

'श्रेणीसुधार आणि विषय राहिलेल्या परीक्षांची तयारी करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांसाठी सराव परीक्षा सुरू करण्यात आल्या आहेत. त्यात पहिल्या दिवशी ४५ हजार ५०५ विद्यार्थ्यांनी सराव परीक्षा दिली,' अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली.

लोकसत्ता Fri, 04 December 2020
https://epaper.loksatta.com/c/56781616

पुढारी

# अकरावीचे ऑनलाइन वर्ग पुन्हा सुरू

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेतर्फे अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन मार्गदर्शन शुक्रवारपासून (४ डिसेंबर) पुन्हा सुरू करण्यात आले आहे. त्यामुळे आता राज्यभरातील अकरावीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळू शकणार आहे. ०२ नोव्हेंबरपासून सुरू करण्यात आलेले ऑनलाइन मार्गदर्शन दीपावलीच्या सुट्ट्यांमुळे तसेच तज्ज्ञ मार्गदर्शक शिक्षकांच्या इतर शालेय कामकाजामुळे थांबविण्यात आले होते.

मराठा आरक्षणाला सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या अंतरिम स्थगितीमुळे अकरावीची प्रवेशप्रक्रिया स्थगित करण्यात आली होती. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेकडून तज्ज्ञ शिक्षकांच्या मदतीने झूम आणि यूट्यूबच्या माध्यमातून कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेच्या विषयांचे ऑनलाइन वर्ग २ नोव्हेंबरपासून सुरू करण्यात आले होते. मात्र दिवाळीच्या सुटीमुळे हे वर्ग ११ नोव्हेंबरपासून थांबवण्यात आले होते. मात्र आता हे ऑनलाइन वर्ग शुक्रवारपासून पुन्हा सुरू करण्यात येत असल्याची माहिती राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे उपसंचालक विकास गरड यांनी दिली. ऑनलाइन वर्गांच्या तासिकांचे तपशीलवार वेळापत्रक https://covid19.scertmaha.ac.in/eleventh लिंकवर देण्यात आले आहे.

Pune Edition
Dec 4, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# SPPU admn releases 6,000 revised marksheets

ALIFIYA KHAN
PUNE, DECEMBER 3

THE SAVITRIBAI Phule Pune University's administration released the revised marksheets of thousands of students on December 3. At least 6,000 revised results were published by the SPPU on Thursday.

The Indian Express was the first to report that an analysis of 18,000 students' marksheets at SPPU had revealed that while at least 10,000 students didn't log in to the system or take exams, at least 8,000 cases were being verified since they appeared to have taken the exams but were marked absent or given zero marks.

Mahesh Kakade, director, examinations and evaluations, SPPU, said, "At least 6,000 marksheets have been published but some of them may have no changes, I will get the detailed report tomorrow."

Meanwhile, as the university is set to conduct proctored online examinations for the first time for at least 1.5 lakh students who are to take their backlog examinations, students were given the option of giving an online mock test for practice from Thursday. At least 45,500 students took the mock tests on December 3, said Kakade.

"Students are required to keep their front mobile camera or laptop turned on during the exams. Also, the access to other browser windows would be closed and students would get a maximum of 20 warnings. Since it is the first time that exams are being conducted in online proctored manner, we thought it fit to give them practice," said Kakade.

Meanwhile, scores of students emailed the university administration against the decision to conduct proctored examinations but Kakade said there is no question of revising the decision.

Indian Express: 4.12.2020

# Principals wary about reopening after festive season for stds X, XII

Ardhra.Nair@timesgroup.com

Pune: Principals of schools affiliated to the Council for the Indian School Certificate Examinations (CISCE) will be cautious about reopening their schools for standards X and XII.

The Pune Municipal Corporation (PMC) has told all schools to remain shut till December 13. The latest circular by CISCE has urged states to allow schools to reopen partially for standards X and XII from January 4 so that the students can prepare for the board examinations.

But principals are wary about reopening just after the festive season. Covid-19 cases may rise after Christmas and New Year celebrations which can affect the students. Some said in-person classes are necessary for X and XII students.

Sujata Mallick Kumar, principal of St Mary's School said they would wait as they do not want to risk the health of their students at any cost.

"The board has given a date, but schools can gauge the local situation and decide in the best interest of their students. We are conducting the first prelims online, but instead of students writing the answers online, we have told them to use a pen-and-paper format. The students need to get used to the idea of sitting and writing a full-length paper," she said.

Rita Katawati, principal of Hutchings High School and Junior College, said most of their parents are against reopening now.

"We can ensure social distancing and a strict adherence to other safety measures when the students are in the school. But it may not be feasible when they are outside, while on their way in or out of the school. We will watch the situation, seek parents' consent, and then decide about the reopening just for the students taking the board exam," she said.

Chandrika Banerjee, principal at VP Magarpatta City Public School, said more than 50% parents of the standard X in her school have consented to sending their wards to school if it reopens. "Parents know the importance of physical school sessions for a standard X or XII student, and hence they have consented to sending their children when we reopen. The school is a safe place, and we will take all precautions to ensure that the students are in a secure environment here. If we get well-adjusted to the board classes, we will also think about gradually reopening for other classes, if permitted," she added.

**SOME PARENTS AGREE, OTHERS DON'T**



We do not want the schools to reopen at all. There are risks in sending children to school as they will invariably come into contact with others, if not in the school, then while commuting to and from the school. It is better to continue online education for all purposes at least for some more time
**– A parent who requested anonymity**

**FAITH IN HEADS TAKING A DECISION**

"It is too early to predict whether schools must reopen or not. Heads of schools will decide based on how the situation unravels. They won't want to harm the students and hence we will accept their wisdom, whatever it may be
**– Saachi Shevate** | A PARENT

"The pandemic situation in the city is a worry. However, our children are in senior classes, and I would send them to school just for examinations or practicals. Schools will take precautions. Online classes for the others are being executed well by the schools across the city
**– Manisha Soy** | A PARENT

The Times of India: 4.12.2020

## News Paper Clippings During December 2020

### Section: Education

# 'बॅकलॉग'ची परीक्षा 'प्रॉक्टर्ड' पद्धतीने

**विद्यापीठाची 'परीक्षा'**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ८ ते २३ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या प्रथम वर्ष ते अंतिम वर्ष पूर्वमधील 'बॅकलॉग'च्या विद्यार्थ्यांच्या राहिलेल्या परीक्षा आणि श्रेणीसुधार परीक्षा 'ऑनलाइन प्रॉक्टर्ड' पद्धतीने घेतल्या जाणार आहेत.

'ऑनलाइन प्रॉक्टर्ड'मुळे परीक्षेत होणाऱ्या गैरप्रकारांवर विद्यापीठ प्रशासनाचे लक्ष राहणार आहे. ऑनलाइन पद्धतीने होणाऱ्या परीक्षांचा अंदाज विद्यार्थ्यांना येण्यासाठी विद्यापीठाकडून ३ ते ५ डिसेंबर दरम्यान सराव परीक्षा घेण्यात येत आहे. यामध्ये पहिल्या दिवशी ४५ हजार ५०५ विद्यार्थ्यांनी सराव परीक्षा दिली. विद्यापीठाने ऑक्टोबरमध्ये अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने घेतल्या. त्यानंतर आता विषय राहिलेल्या (बॅकलॉग) आणि श्रेणीसुधार परीक्षा होणार आहेत.

'श्रेणीसुधार आणि 'बॅकलॉग'ची परीक्षा पावणेतीन लाख विद्यार्थी देणार आहेत. विद्यार्थ्यांना परीक्षेच्या तंत्रज्ञानाची माहिती होण्यासाठी सराव परीक्षा सुरू करण्यात आल्या आहेत,' अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली आहे.

### पुन्हा शून्य गुण आणि अनुत्तीर्ण?

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या ऑनलाइन परीक्षेत तांत्रिक समस्या उद्भवल्याने अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सुधारित निकाल जाहीर केला असून, तो पाहण्यासाठी विद्यार्थ्यांच्या स्टुडंट प्रोफाइलवर उपलब्ध केला आहे. निकालात नियमानुसार काही विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. मात्र, अजूनही विद्यार्थ्यांच्या शून्य गुण मिळाल्याच्या; तसेच कमी गुण मिळाल्याच्या तक्रारी विद्यापीठाकडे येत आहेत. या विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर व उच्च शिक्षणासाठी प्रवेश घेतले आहे. त्यामुळे याबाबत विद्यापीठ काय निर्णय घेते, हे पाहणे महत्त्वाचे आहे.

Maharashtra Times: 5.12.2020

# अकरावी प्रवेशाची दुसरी यादी आज

पुणे : अकरावी प्रवेशाच्या दुसऱ्या फेरीची गुणवत्ता यादी आज (शनिवारी) जाहीर करण्यात येणार आहे. एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रवेश खुल्या प्रवर्गातून करण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत. त्यामुळे गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांना महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेता येणार आहे.

अकरावी ऑनलाइन प्रवेशासाठी पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात महाविद्यालयांमध्ये १ लाख ७ हजार ३० जागा उपलब्ध आहेत. त्यापैकी पहिल्या फेरीत ३० हजार ५४४ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. तर, ७६ हजार ४८६ जागा रिक्त आहेत. या जागांसाठी एक लाख एक हजार १९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यातील ६४ हजार २२६ विद्यार्थ्यांनी अर्ज भरून लॉक केले आहेत. ८३ हजार ६७३ विद्यार्थ्यांच्या अर्जांची पडताळणी झाली आहे. त्यातील ७६ हजार ७५४ विद्यार्थ्यांनी पसंतिक्रम भरले आहेत. दुसऱ्या फेरीतील प्रवेशासाठी ४६ हजार २१० विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यायचा आहे, असे प्रवेश नियंत्रण समितीच्या वतीने सांगण्यात आले आहे.

Maharashtra Times: 5.12.2020



## News Paper Clippings During December 2020

### Section: Education

# शून्याचा तिढा कायम

## अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या गुणांत घोळ; वर्ष वाया जाण्याची भीती

ब्रिजमोहन पाटील : सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. ४ : "बी. फार्मसीच्या सगळ्या विषयांत मला चांगले गुण मिळाले. पण, एकाच विषयात शून्य गुण मिळाले. याची विद्यापीठाकडे तक्रार केली. मात्र, निकालात सुधारणा झालीच नाही. मला अनुत्तीर्ण दाखविले जात आहे. माझा खासगी विद्यापीठात एमबीए प्रवेश झाला आहे. साडेतीन लाख रुपये शुल्क भरले आहे. पण, मला नापास केल्याने प्रवेश अडचणीत आला आहे. पेपर पूर्ण सोडवून देखील शून्य गुण मिळाले कसे, याचा उलगडा विद्यापीठाने केला पाहिजे," ही मागणी आहे यश चव्हाण या विद्यार्थ्याची.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाची ऑनलाइन व ऑफलाइन माध्यमातून बहुपर्यायी प्रश्न (मल्टिपल चॉइस क्वेश्चन-एसीक्यू) पद्धतीने परीक्षा घेतली. निकालात झालेला तांत्रिक घोळ संपलेला नाही. विद्यापीठाने निकाल जाहीर केला तेव्हा त्यात परीक्षा देऊनही विद्यार्थी अनुपस्थितीत दाखवणे, एका विषयात शून्य गुण, अशा अनेकांच्या तक्रारी आल्या.

पुणे विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने या निकालाचे विश्लेषण करण्यासाठी खास कक्ष स्थापन केला होता. त्यामध्ये तक्रारींचे विश्लेषण करण्यात आले. पान ५ वर »

**'त्या' विद्यार्थ्याला ३८ गुण**

आदित्य तांगडे पाटील याला एका विषयात शून्य तर इतर पाच विषयांत ४० पैकी ३४ पेक्षा जास्त गुण होते; शून्य गुण पडल्याने त्याने विद्यापीठात तक्रार केली. याचा पाठपुरावा सुरू असताना सुरक्षारक्षकांतर्फे मारहाण झाल्याने वाद निर्माण झाला. या विद्यार्थ्याला सुधारित गुणपत्रिका मिळाली असून, त्याला ज्या विषयात शून्य गुण होते, त्यात ३८ गुण मिळाले असल्याचे आदित्यने सांगितले.

**परीक्षार्थी आणि तक्रारी**




ज्या तक्रारी वास्तववादी आहेत अशा विद्यार्थ्यांची तपासणी केली जाईल. त्यांना इतर विषयांत किती गुण मिळाले आहेत, याची सरासरी किंवा ग्रेस मार्क देऊन उत्तीर्ण केले जाईल.
- डॉ. महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन विभाग

# शून्याचा तिढा कायम

» पान १ वरून

त्याचा सुधारित निकाल ३ डिसेंबरपर्यंत जाहीर केला जाईल, असे असे परिपत्रक काढून विद्यापीठाने स्पष्ट केले. त्यानुसार सुमारे ६ हजार तक्रारींचा निकाल अपडेट केला आहे. पण यातही १०० टक्के तक्रारी सुटलेल्या नाहीत. शून्य गुण आणि परीक्षा देऊनही अनुपस्थिती दाखवणे यामुळे अनेक विद्यार्थी नापास झाले आहेत.

स्नेहा भागवत म्हणाली, "बी. कॉम.च्या इको पेपरमध्ये इंटरनलला १६ गुण आहेत; पण ऑनलाइन परीक्षेत शून्य गुण मिळाले. विद्यापीठाने सुधारित निकाल दिला. त्यातील शून्य गायब करून मोकळी जागा सोडून मला नापास केले आहे. नापास झाल्याने माझे एक वर्ष वाया जाणार आहे. विद्यापीठाने यावर तोडगा काढला पाहिजे." प्रगती खडसे म्हणाली, "माझा द्वितीय वर्षाचा एक पेपर बॅकलॉग होता. त्यात मला शून्य गुण पडले आहेत. मी आता चंद्रपूरला असल्याने याची तक्रार करण्यासाठी विद्यापीठात देखील येऊ शकत नाही."

अशाच प्रकारे अन्य विद्यार्थ्यांनीही त्यांची कैफियत मांडली.

**ऑफलाइन परीक्षा देऊनही अनुपस्थित**

बंटी भोळे याने नाशिक येथील एका परीक्षा केंद्रावर १२ ऑक्टोबरला बिझनेस कम्युनिकेशनची ऑफलाइन परीक्षा दिली होती; पण त्याच्या गुणपत्रिकेवर अनुपस्थित शेरा मारून नापास केले आहे. त्यात बदल झाला नाही असे त्याने सांगितले.

Sakaal: 5.12.2020

# Software to bridge urban-rural education

## State minister Varsha Gaikwad made the announcement while in the city for a budget meeting with deputy CM

Sukhada.Khandge@timesgroup.com
TWEETS@Sukhadak_Mirror

As the coronavirus pandemic situation has changed the mode of education, making it now focussed primarily online, the state education department is working to bridge the gap between what is imparted in cities and the rural parts of the state.

To ensure that the same kind of education is imparted in all schools and to avoid any kind of discrimination, education minister Varsha Gaikwad informed that a special software programme for the unique educational needs of the state is being developed.

Unlike other existing software programmes which are dependent on internet connectivity and fail to function properly in the areas where internet connectivity is weak, this will work fine even in situations where there is no internet access.

Gaikwad was in the city on Friday for a budget meeting with deputy chief minister Ajit Pawar where they discussed different possibilities in the education sector.



Gaikwad and Ajit Pawar discussed possibilities in the education sector on Friday




Pawar said, "The software which will be developed by various educational offices like Balbharati, State Council of Educational Research and Training (SCERT) among others in the state will ensure that the way of thinking at education changes. New things in syllabus will reach students through pen drive if there is no internet access. The new form of e-learning will be developed by taking all the agencies' suggestions into consideration. Education can also reach students through television."

This software specially meant to bridge the gap between rural and city education so that every student and school gets same form of education.

Pawar also informed that as 95 per cent of education budget is used for teachers' salaries, local authorities and leaders should use their personal budget also to improve access in their area.

Gaikwad said, "It is also important that the teachers' recruitment starts as soon as possible to fill up the vacant position."

Due to vacant positions, candidates are also demanding that recruitment efforts be kickstarted. While the recruitment is online, candidates have asked the state government to give a fillip to the process.

Santosh Magar, an aspirant, said, "We have been behind the state government to start the teachers' recruitment. Due to the vacant posts, it has become difficult for the schools to run."

Taking cue from the civic and state-run schools in Delhi, Maharashtra will also develop the public education sector on the same lines.

Gaikwad has also demanded a Vidnyan Nagari in the state on 20-acre plot of land which will have various projects and experiments revolving around education sectors. This will be a model education town which will have state-of-the-art educational projects and schools which can also train teachers and educationists in the field and take their suggestions.

Pune Mirror: 5.12.2020

## News Paper Clippings During December 2020

Section: Education

# SPPU to hold current semester exam in Jan

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** The Savitribai Phule Pune University (SPPU) will conduct examinations for the current semester in January 2021. A notification was issued on Thursday night by the examination department.

Students who have backlogs in the final-year examinations conducted in October and regular students can fill up the exam forms starting from December 5.

The examination will be conducted in a proctored online model with multiple-choice questions.

Mahesh Kakade, director of the board of examination and evaluation, said, "AI-based image proctoring and analyses of data will be used for proctoring the examination. Hence, it is compulsory for the students to use a gadget with its front camera always on."

The students have been told to use the same email ID as was registered in the student portal system. However, if, for any reason, the student wants to change his registered email id, he or she must write to Lalit Pawar and Swati Barhate, both officials from the examination department.

SPPU has come out with a list of pointers which will help the students understand how best to study for and attempt an MCQ-based examination.

"Earlier the students could write long essay-type answers. But now they must know the exact answer to a question. Hence, the students should prepare well," Kakade added.

### A 50-MARK TEST WITH MCQS

- The marks obtained in the examination would be converted according to the total marks each subject assigned
- For example, if a student obtains 50/50 in the online examination and the subject is for 100 marks, then the student's marks will be converted out of 100
- Passing marks will also be calculated as per the total marks that the subject has been assigned



File photo

The Times of India: 5.12.2020

# Edu minister speaks on NEP 2020 at AMU

**ALIGARH :** "The implementation of National Education Policy (NEP) 2020 will transform India as it connects the past with the future and focuses on leading India to the top," said Union education minister, Shri Ramesh Pokhriyal 'Nishank on Friday'.

He was speaking at the online seminar on 'National Education Policy-2020' of the Aligarh Muslim University and the virtual book release function of 'Physics of Neutrino Interactions' (Cambridge University Press) authored by Prof M Sajjad Athar and Prof S K Singh.

Stressing that National Education Policy was based on concepts of equity, quality and accessibility, the minister said that the education policy was aimed at bringing India's diverse nature in terms of regional languages with the benefit of providing primary education in mother tongue.

He urged people to look at the successes of countries like Japan, Germany, France, and Israel, which had progressed in science and education with the use of their mother tongues. HTC

Hindustan Times: 5.12.2020



## News Paper Clippings During December 2020

Section: Education

# UGC EXTENDS TIME TO SUBMIT THESIS BY SIX MONTHS

Press Trust of India

letters@hindustantimes.com

**NEW DELHI:** The University Grants Commission has granted a six month extension for submission of thesis to MPhil and PhD students in wake of prolonged closure of universities due to the Covid-19 pandemic.

Earlier, the students were granted extension till December 31. However, the same has been extended till June 30 now but the tenure of fellowship for PhD and MPhil will remain the same -- 5 years.

"Due to Covid-19 pandemic, the universities have remained closed for the past several months. Therefore, the students have not been able to conduct their research or experiments in the university laboratories nor they were able to access library services that are critical for completion of thesis," UGC Secretary Rajnish Jain said.

The UGC had on April 29 issued guidelines on exams and academic calendar for universities in view of the pandemic and lockdown. As per these guidelines, extension of six months was conveyed for submission of dissertation or thesis.

Hindustan Times: 5.12.2020

# FYJC second merit list out today after 3-mth delay

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** The directorate of secondary and higher secondary education will declare the second merit list for First Year Junior College admissions online on Saturday after a delay of nearly three months. As many as 76,486 seats are up for grabs in 304 colleges in Pune and Pimpri Chinchwad limits.

Students can check their allotment status online at 11am after logging on to https://pune.11thadmission.org.in

They can complete the admission process by December 9. They must click on 'Proceed For Admission' if they are willing to accept the allotted junior college and confirm their admission. Meanwhile, registration and part-I form filling will also start for new applicants for the next round.

As per the original schedule, the second merit list was supposed to be declared on September 10. However, the Supreme Court's interim decision to stay the Maratha reservation in admissions led to the cancellation of the first schedule and the delay.

About 8,900 seats which were previously reserved for SEBC students in Pune and Pimpri Chinchwad junior colleges have now been merged with the open category.

The admission process restarted on November 26, with the display of vacancies and also the restart of the online form filling process which continued till December 2.

The Times of India: 5.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

पुढारी

# अंतिम पूर्व वर्षाच्या परीक्षा प्रॉक्टर्ड पद्धतीने

## ८ ते २३ डिसेंबरदरम्यान बॅकलॉग, श्रेणीसुधार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ८ ते २३ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या प्रथम वर्ष ते अंतिम पूर्व वर्ष विद्यार्थ्यांच्या विषय राहिलेल्या (बॅकलॉग) आणि श्रेणीसुधार परीक्षा या ऑनलाइन अंशत: प्रॉक्टर्ड पद्धतीने होणार आहेत. यामध्ये एआय बेस्ड इमेज प्रॉक्टरिंग ॲण्ड ॲनालिसीस ऑफ डेटा पध्दतीचा वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे ऑनलाइन परीक्षेत होणाऱ्या गैरप्रकारांवर विद्यापीठ प्रशासनाचे लक्ष राहणार असून परीक्षांचा ऑनलाइन परीक्षेचा दर्जा वाढणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

विद्यार्थ्यांना अनेक दिवस अभ्यासाला मिळाल्याने, अनेक विषयांच्या परीक्षा १०० टक्के अभ्यासक्रमावर होणार आहेत. ऑनलाइन पद्धतीने होणाऱ्या परीक्षांचा विद्यार्थ्यांना अंदाज येण्यासाठी विद्यापीठाने विद्यार्थ्यांना ३ ते ५ डिसेंबरदरम्यान सराव परीक्षेची संधी उपलब्ध करून दिली असून, पहिल्या दिवशी ४५ हजार ५०५ विद्यार्थ्यांनी सराव परीक्षा दिली. विद्यापीठाने ऑक्टोबरमध्ये अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने घेतल्या. त्यानंतर आता विषय राहिलेल्या (बॅकलॉग) आणि श्रेणीसुधार परीक्षा होणार आहेत. अंतिम वर्षाच्या परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागला होता. त्यामुळे श्रेणीसुधार आणि विषय राहिलेल्या (बॅकलॉग) परीक्षांमध्ये या अडचणींची पुनरावृत्ती न होण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे. श्रेणीसुधार आणि विषय राहिलेल्या (बॅकलॉग) परीक्षांची तयारी करण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना परीक्षेच्या तंत्रज्ञानाची माहिती होण्यासाठी सराव परीक्षा सुरू करण्यात आल्या आहेत. त्यात पहिल्या दिवशी ४५ हजार ५०५ विद्यार्थ्यांनी सराव परीक्षा दिली, अशी माहिती विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ महेश काकडे यांनी दिली आहे.

**परीक्षेतील गैरप्रकारांना आळा बसणार...**

या परीक्षा पद्धतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने परीक्षार्थींवर लक्ष ठेवले जाणार आहे. त्यासाठी कॅमेराचा वापर करण्यात येणार असून, विद्यार्थ्यांची काही छायाचित्रेदेखील काढण्यात येतील. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्याव्यतिरिक्त अन्य हालचाली झाल्याचे आढळून आल्यास त्याबाबतचा इशारा विद्यार्थ्यांना दिला जाणार आहे. साधारण वीस इशारे देण्यात येणार आहेत. त्यामुळे या परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांना गैरप्रकार करता येणार नसल्याचे स्पष्ट होत आहे. प्रामाणिक विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये; तसेच पदवी आणि पदव्युत्तर परीक्षांचा दर्जा राखण्यासाठी विद्यापीठाने चांगला निर्णय घेतल्याची चर्चा आहे.

Pune Edition
Dec 5, 2020 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

# FYJC 2nd merit list out; slight dip in cutoffs likely

**Ankita Bhatkhande**
ankita.bhatkhande@htlive.com

**MUMBAI:** Nearly two months after admissions to first-year junior college (FYJC) were stayed owing to the Supreme Court's (SC) interim stay on Maratha quota, the education department will finally release the second merit list for admissions at 11am today (November 5) without the 12% reservation. After the first admission round, which completed in September, nearly 2.42 lakh seats remained vacant for admissions in the Mumbai Metropolitan Region (MMR).

Principals of coveted city colleges said they were expecting a marginal dip in their cut-offs. "We already had a considerable number of admissions in the first round, so the dip in cut-offs should not be a lot," said Ashok Wadia, principal, Jai Hind College, Churchgate. The college closed its first merit list at 89.4% for science and 92.6% for both commerce and arts streams.

> MOST PROMINENT COLLEGES SAID THEY ONLY HAD ABOUT 30-40% SEATS VACANT AFTER THE FIRST ROUND OF ADMISSIONS WHICH CAN BE FILLED IN THIS AND THE UPCOMING ROUNDS

Most prominent colleges also said they only had about 30-40% seats vacant after the first round of admissions which can be filled in this and the upcoming rounds.

"Since we had already completed minority admissions and general admissions in the first round, nearly 70% of the total seats were taken up. We hope that the remaining seats will be filled in the days to come so that online lectures for FYJC can begin soon," said Satram Verhani, vice-principal of CHM college in Ulhasnagar.

Some principals said students are likely to prioritise getting into a college and beginning the new academic year soon. "Due to the delay, students are now looking forward to the year to begin. Many students might also be willing to compromise on their college preferences as the mode of learning is going to be online at least for the current year," said the principal of a South Mumbai-based college.

On September 9, in line with the Apex court's interim stay on Socially and Educationally Backward Classes (SEBC) quota in jobs and education, the state education department had stayed the admission process for FYJC until further orders. While the state government has revealed that admissions to all courses will now take place without the quota, it has also clarified that students whose admissions in the first merit list were confirmed under the quota will remain intact.

Hindustan Times: 5.12.2020



*News Paper Clippings During December 2020*

Section: Education

पुढारी

# अकरावीची आज दुसरी गुणवत्ता यादी

**पुणे :** अकरावीची रखडलेली प्रवेश प्रक्रिया पुन्हा सुरू करण्यात आली आहे. त्यानुसार दुसऱ्या फेरीची गुणवत्ता यादी शनिवारी (दि.५) जाहीर करण्यात येणार आहे. राज्य सरकारने एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रवेश खुल्या प्रवर्गातून करण्याचे आदेश दिले असून गुणवत्ता यादी जाहीर झाल्यानंतर विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार आहे.

अकरावी प्रवेशासाठी पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात ३०४ महाविद्यालयांमध्ये १ लाख ७ हजार ३० जागा उपलब्ध आहेत. त्यापैकी पहिल्या फेरीत ३० हजार ५४४ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झालेले आहेत. तर ७६ हजार ४८६ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. एकूण जागांसाठी १ लाख १ हजार १९ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. त्यातील ८४ हजार २२६ विद्यार्थ्यांनी अर्ज भरून लॉक केले आहेत. तर ८३ हजार ६७३ विद्यार्थ्यांच्या अर्जांची पडताळणी झालेली आहे. त्यातील ७६ हजार ७५४ विद्यार्थ्यांनी पसंतीक्रम भरलेले आहेत. म्हणजेच प्रवेशाच्या शर्यतीत केवळ ७६ हजार ७५४ विद्यार्थी आहेत. यातील दुसऱ्या फेरीतील प्रवेशासाठी ४६ हजार २१० विद्यार्थ्यांना प्रवेश घ्यायचा आहे.

प्रवेशासंदर्भात समितीच्या सचिव मीना शेंडकर म्हणाल्या, ३ आणि ४ डिसेंबरला प्रवेशाचे सेटमॅट्रीक्स तयार केले आहे. तसेच सॉफ्टवेअरचे ऑडिटदेखील झाले आहे. ५ डिसेंबरला दुपारी १२ वाजेपर्यंत गुणवत्ता यादी जाहीर केली जाणार आहे.

Pune Edition
Dec 5, 2020 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

# अकरावी प्रवेशाची दुसरी गुणवत्ता यादी आज जाहीर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाला सप्टेंबरमध्ये अंतरिम स्थगिती दिल्यानंतर रखडलेली अकरावीची प्रवेश प्रक्रिया पुन्हा सुरू झाली आहे. त्यानुसार प्रवेश प्रक्रियेतील दुसरी गुणवत्ता यादी तीन महिन्यांनंतर आज (५ डिसेंबर) जाहीर होणार आहे. एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना खुल्या गटातून प्रवेश देण्याचा राज्य सरकारने आदेश दिल्याने गुणवत्ता यादी जाहीर झाल्यावर विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश घेता येणार आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात अकरावी प्रवेशासाठी ३०४ महाविद्यालयांमध्ये १ लाख ७ हजार ३० जागा उपलब्ध आहेत. त्यापैकी पहिल्या फेरीत ३० हजार ५४४ विद्यार्थ्यांचे प्रवेश निशि ?चत झालेले आहेत. ७६ हजार ४८६ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. या जागांसाठी अर्ज केलेल्या १ लाख १ हजार १९ विद्यार्थ्यांपैकी ८४ हजार २२६ विद्यार्थ्यांनी अर्ज भरून अंतिम केले आहेत. तर, ८३ हजार ६७३ विद्यार्थ्यांच्या अर्जांची पडताळणी झालेली आहे. ७६ हजार ७५४ विद्यार्थ्यांनी पसंतीक्रम भरलेल्या ३० हजार ५४४ विद्यार्थ्यांनी पहिल्या फेरीत प्रवेश घेतला आहे.

५ डिसेंबरला दुपारी बारापर्यंत गुणवत्ता यादी जाहीर होईल. त्यानंतर महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यासाठी पुढील प्रक्रिया सुरू केली जाणार आहे, अशी माहिती प्रवेश समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिली.

लोकसत्ता Sat, https

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# अकरावी प्रवेशाची दुसरी यादी जाहीर

## आतापर्यंत २३,१२० विद्यार्थ्यांना मिळाला प्रवेश

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. ५ -** पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील इयत्ता अकरावीच्या केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत दुसऱ्या नियमित प्रवेश फेरीची गुणवत्ता यादी शनिवारी जाहीर करण्यात आली. यात २३ हजार १२० विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. विज्ञान शाखेत प्रवेश घेण्याला विद्यार्थ्यांनी सर्वाधिक पसंती दिली असून, या शाखेतील १०,०८९ विद्यार्थ्यांचा यादीत समावेश आहे.

पुणे विभागात ३०४ कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रवेशासाठी नोंदणी केली असून, यात एकूण १ लाख ७ हजार ३० जागा आहेत. यासाठी १ लाखापुढे विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. प्रवेशाच्या पहिल्या फेरीत ३० हजार ५४४ प्रवेश निश्चित झाले आहेत. दुसरी फेरी अडीच महिन्यांपूर्वीच पूर्ण करण्यात येणार होती. मात्र, मराठा आरक्षण स्थगितीमुळे प्रवेश प्रक्रियेला स्थगिती देण्यात आली. शासनाने पुन्हा प्रवेश प्रक्रिया सुरू करण्याचे आदेश दिल्याने त्याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना खुल्या प्रवर्गातून प्रवेश घ्यावा लागत आहे.

दुसऱ्या प्रवेश फेरीसाठी ६० हजार ५०० जागा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. त्यासाठी ४६ हजार ७९४ विद्यार्थ्यांनी अर्ज नोंदवले होते. त्यातील

**दुसऱ्या नियमित फेरीतील शाखानिहाय प्रवेश**

| शाखा | जागा | अर्ज | पात्र विद्यार्थी |
|---|---|---|---|
| कला | १०,०७५ | ४३५१ | २६७२ |
| वाणिज्य | २४,०५२ | २०३४८ | ९७६२ |
| विज्ञान | २३,१७० | २११९२ | १००८९ |
| एचएसव्हसी | ३,३०२ | ९०३ | ५९७ |
| एकूण | ६०,५९९ | ४६७९४ | २३१२० |

काही विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झालेले आहेत. पहिल्या पसंतीक्रमानुसार ८ हजार ९२९, दुसऱ्या पसंतीक्रमानुसार ४ हजार १४७, तिसऱ्या पसंतीक्रमाने २ हजार ८६५, चौथ्या क्रमांकाने २ हजार ६४, (पान २ पहा) ▶▶

### अकरावी प्रवेशाची दुसरी यादी जाहीर

पाचव्या क्रमांकाने १ हजार ६१२ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर करण्यात आलेला आहे. या गुणवत्ता यादीत प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या लॉग-इनमध्ये प्रवेशाची माहिती उपलब्ध असून, त्यांनी प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे. यासाठी ९ डिसेंबरपर्यंत मुदतआहे.

Prabhat: 6.12.2020

# अकरावीची दुसरी यादी जाहीर

## २३ हजार १२० विद्यार्थ्यांना प्रवेश; आठ हजार ९२९ जणांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय

**पुणे, ता. ५ : अकरावी प्रवेशाच्या प्रतीक्षेत असलेल्या विद्यार्थ्यांना तब्बल तीन महिन्यांनंतर काहीसा दिलासा मिळाला. यापूर्वीच्या वेळापत्रकानुसार १० सप्टेंबरला जाहीर होणारी दुसरी नियमित गुणवत्ता यादी शनिवारी जाहीर झाली. यात २३ हजार १२० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला आहे. या विद्यार्थ्यांना बुधवारपर्यंत (ता. ९) कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेता येणार आहे.**

सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाला अंतरिम स्थगिती दिल्याने अकरावीची प्रवेश प्रक्रियाही स्थगित केली होती. त्यामुळे १० सप्टेंबरला दुसरी गुणवत्ता यादी जाहीर होऊ शकली नाही. मात्र राज्य सरकारच्या आदेशानुसार नोव्हेंबरच्या अखेरीस ही प्रक्रिया पुन्हा सुरू केली. त्यानुसार पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील अकरावी प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीची यादी जाहीर झाली असून त्यात २३ हजार १२० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला आहे. त्यातील आठ हजार ९२९ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय, तर चार हजार १४७ विद्यार्थ्यांना दुसऱ्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय मिळाले आहे.

प्रवेश प्रक्रियेअंतर्गत दुसऱ्या फेरीतील ६० हजार ५९९ जागांसाठी जवळपास ४६ हजार ७९४ अर्ज होते. दुसऱ्या फेरीत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना बुधवारी सायंकाळी पाचवाजेपर्यंत प्रवेश घेता येणार आहे. याची सविस्तर माहिती https://pune.११thadmission.org.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, अशी माहिती अकरावी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिली.

**ही दक्षता घ्यावी**

- पहिला पसंतीक्रम मिळाल्यास विद्यार्थ्यांनी निवड झालेल्या महाविद्यालयात प्रवेश घेणे.
- पहिला पसंतीक्रम मिळूनही विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला नाही अथवा नाकारला, तर अशा विद्यार्थ्यांना पुढील नियमित फेऱ्यांमध्ये संधी दिली जाणार नाही. त्यांना केवळ विशेष फेरीमध्ये संधी मिळू शकेल.
- विद्यार्थ्यास घेतलेला प्रवेश रद्द करायचा असल्यास संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात विनंती करावी आणि प्रवेश रद्द करावा.
- घेतलेला प्रवेश रद्द केलेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढील नियमित फेऱ्यांसाठी प्रतिबंधित करण्यात येतील. अशा विद्यार्थ्यांना विशेष फेरीपर्यंत थांबावे लागेल.

**प्राधान्यक्रमानुसार मिळालेले अ‍ॅलॉटमेंट**




**विद्यार्थी/पालकांसाठी सूचना**

- दुसऱ्या फेरीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी आपल्या लॉगिनमध्ये जाऊन प्रोसिड फॉर अ‍ॅडमिशन करणे.
- विद्यार्थ्यांनी मिळालेल्या उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये प्रवेश निश्चित करणे.
- विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित करणे, घेतलेला प्रवेश रद्द करणे; तसेच प्रवेश नाकारता येणे, या सुविधा उपलब्ध.
- नवीन विद्यार्थी नोंदणी व प्रवेश अर्जाचा भाग-एक भरणे सुरू (पुढील प्रवेश फेरीसाठी).

**दुसऱ्या फेरीत शाखानिहाय अ‍ॅलॉट झालेल्या जागांचा तपशील**




Sakaal: 6.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# अकरावी प्रवेशाची दुसरी गुणवत्ता यादी जाहीर

## २३ हजार विद्यार्थ्यांना मिळाला प्रवेश

**पुणे :** अकरावी प्रवेशाच्या प्रतीक्षेत असलेल्या विद्यार्थ्यांना तब्बल तीन महिन्यांनंतर काहीसा दिलासा मिळाला आहे. यापूर्वीच्या वेळापत्रकानुसार १० सप्टेंबरला जाहीर होणारी दुसरी नियमित गुणवत्ता यादी शनिवारी जाहीर झाली असून, यात २३ हजार १२० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. या विद्यार्थ्यांना दि. ९ डिसेंबरपर्यंत कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेता येणार आहे. दुसऱ्या फेरीत सर्वाधिक १० हजार प्रवेश विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना मिळाले आहेत.

केंद्रीय प्रवेश समितीमार्फत पुणे व पिंपरी चिंचवडमधील इयत्ता अकरावी प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे. या प्रक्रियेतील पहिली फेरी काही दिवसांपूर्वीच पूर्ण झाली होती. मात्र मराठा आरक्षणासंदर्भातील उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर ही प्रक्रिया पुन्हा सुरू झाली. पहिल्या फेरीमध्ये एकूण ३० हजार ५४४ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केले आहेत. दुसऱ्या फेरीत एकूण ६० हजार ५९९ जागा उपलब्ध होत्या. त्यासाठी ४६ हजार ७१४ विद्यार्थ्यांचे अर्ज आले. त्यातून गुणवत्तेनुसार २३ हजार १२० विद्यार्थ्यांची प्रवेशासाठी निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये १० हजार ८९ विद्यार्थी विज्ञान शाखेतील तर ९ हजार ७६२ विद्यार्थी वाणिज्य शाखेतील आहेत. एकुण अर्जांपैकी ५० टक्के विद्यार्थ्यांची प्रवेशासाठी निवड करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी दिलेल्या पसंतीक्रमानुसार पहिल्या पसंती दिलेल्या ८ हजार ९२९ विद्यार्थ्यांना संबंधित महाविद्यालयात प्रवेश मिळणार आहे. दरम्यान, निवड झालेल्या विद्यार्थ्यांना दि.९ डिसेंबरपर्यंत संबंधित महाविद्यालयात प्रवेश निश्चित करावा लागणार आहे. या कालावधीत विद्यार्थ्यांना घेतलेला प्रवेश रद्द व नाकारताही येऊ शकतो. तसेच पुढील प्रवेश फेरीसाठी नवीन विद्यार्थी नोंदणी व प्रवेश अर्जाचा भाग १ भरता येईल. प्रवेशाची नियमित तिसऱ्या फेरीसाठी रिक्त जागांची माहिती दि. १० डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता जाहीर केली जाणार आहे.

प्रवेश प्रक्रियेतंर्गत दुसऱ्या फेरीतील ६० हजार ५९९ जागांसाठी जवळपास ४६ हजार ७९४ अर्ज होते. दुसऱ्या फेरीत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना दि. ९ डिसेंबरपर्यंत सायंकाळी पाच वाजेपर्यंत प्रवेश घेता येणार आहे. या प्रवेश फेरीची सविस्तर माहिती https://pune.11thadmission.org.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, अशी माहिती इयत्ता अकरावी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिली.

Kesari: 6.12.2020

# दुसऱ्या गुणवत्तायादीत २३ हजार विद्यार्थ्यांना प्रवेश

पुणे, दि. ५ (प्रतिनिधी) – अकरावी प्रवेशाच्या प्रतीक्षेत असलेल्या विद्यार्थ्यांची दुसरी नियमित गुणवत्तायादी शनिवारी जाहीर झाली. यात २३ हजार १२० विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे.

### अकरावी प्रवेशप्रक्रिया

मराठा आरक्षणाला सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिल्याने अकरावीची प्रवेशप्रक्रियादेखील स्थगित करण्यात आली होती. त्यामुळे यापूर्वीच्या नियोजित वेळापत्रकानुसार १० सप्टेंबरला दुसरी गुणवत्तायादी जाहीर होऊ शकली नाही. गेल्या तीन महिन्यांपासून ही प्रवेशप्रक्रिया ठप्प होती. मात्र, राज्य सरकारच्या आदेशानुसार आता नोव्हेंबरच्या अखेरीस ही प्रक्रिया पुन्हा सुरू करण्यात आली. पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालय व उच्च माध्यमिक शाळांमधील ऑनलाइन अकरावी प्रवेशप्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीत २३ हजार १२० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला आहे. त्यातील आठ हजार ९२९ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय, तर ४ हजार १४७ विद्यार्थ्यांना दुसऱ्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय मिळाले आहे.

प्रवेशप्रक्रियेअंतर्गत दुसऱ्या फेरीतील ६० हजार ५९९ जागांसाठी जवळपास ४६ हजार ७९४ अर्ज होते. ९ डिसेंबर सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्रवेश घेता येणार आहे. या प्रवेश फेरीची सविस्तर माहिती https:/pune.11thadmission.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, अशी माहिती इयत्ता अकरावी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिली.

**अ‍ॅलॉट झालेल्या जागांचा तपशील**

| शाखा | प्रवेशक्षमता | पात्र अर्ज | विद्यार्थिसंख्या |
|---|---|---|---|
| कला | १०,०७५ | ४,३५१ | २,६७२ |
| वाणिज्य | २४,०५२ | २०,३४८ | ९,७६२ |
| विज्ञान | २३१७० | २१,१९२ | १०,०८९ |
| एचएसव्हीसी | ३,३०२ | ९०३ | ५९७ |
| एकूण | ६०,५९९ | ४६,७९४ | २३,१२० |

### विद्यार्थी-पालकांसाठी सूचना

▮ दुसऱ्या फेरीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी आपल्या लॉगिनमध्ये जाऊन प्रोसिड फॉर अ‍ॅडमिशन करणे. ▮ विद्यार्थ्यांनी मिळालेल्या उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये प्रवेश निश्चित करणे. ▮ विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित करणे, घेतलेला प्रवेश रद्द करणे तसेच प्रवेश नाकारता येणे, या सुविधा उपलब्ध. ▮ दरम्यान, नवीन विद्यार्थी नोंदणी व प्रवेश अर्जाचा भाग-एक भरणे सुरू (पुढील प्रवेश फेरीसाठी)

### प्रवेशादरम्यान ही काळजी घ्यावी

▮ पहिला पसंतीक्रम मिळाला असल्यास विद्यार्थ्यांना निवड झालेल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेणे बंधनकारक –पहिला पसंतीक्रम मिळूनही विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला नाही अथवा नाकारला तर अशा विद्यार्थ्यांना पुढील नियमित फेऱ्यांमध्ये संधी दिली जाणार नाही. त्यांना केवळ विशेष फेरीमध्ये संधी मिळू शकेल.

Saamana: 6.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

## अकरावीचे ऑनलाइन वर्ग सुरू

पुणे, दि. ५ (प्रतिनिधी) - अकरावीच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेतर्फे ऑनलाइन वर्ग २ नोव्हेंबरला सुरू करण्यात आले होते. पण विद्यार्थ्यांना पूर्वसूचना न देता १० नोव्हेंबरला हे वर्ग अचानक बंद करण्यात आले होते. अकरावीचे हे ऑनलाइन वर्ग पुन्हा सुरू केले आहेत. यात कला, वाणिज्य, विज्ञान शाखांच्या मराठी व इंग्रजी माध्यमांसाठी ऑनलाइन ('यू ट्यूब लाइव्ह'च्या माध्यमातून) तासिका घेण्यात येत आहेत.

अकरावीच्या प्रवेशप्रक्रिया सुरू असताना विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी सुरू केलेले ऑनलाइन वर्ग दिवाळीपूर्वीच अचानक बंद पडले होते. मात्र, आता बंद पडलेले हे ऑनलाइन वर्ग पुन्हा सुरू करण्यात आले आहेत. गेल्या काही दिवसांपासून स्थगित असलेली अकरावी प्रवेशाची प्रक्रियादेखील पुन्हा सुरू झाली आहे. या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये आणि घरी राहून विद्यार्थ्यांना आवश्यक ते मार्गदर्शन मिळावे, या दृष्टीने हे ऑनलाइन वर्ग सुरू केले आहेत. अकरावीच्या तिन्ही विद्याशाखांच्या तासिकांचे तपशीलवार वेळापत्रक हे 'एससीईआरटी'च्या 'https://covid19.scertmaha.ac.in/eleventh' या लिंकवर पाहता येणार आहे. शाखानिहाय यू ट्यूब लिंकदेखील या तपशीलवार वेळापत्रकामध्ये नमूद केलेली आहे, अशी माहिती 'एससीईआरटी'चे उपसंचालक विकास गरड यांनी दिली आहे.

Saamana: 6.12.2020

पुढारी

# २३ हजार विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर

## अकरावी प्रवेशासाठी दुसरी गुणवत्ता यादी जाहीर; ९ डिसेंबरपर्यंत प्रवेश घेता येणार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**अकरावी प्रवेश नियंत्रण समितीकडून शनिवारी अकरावीच्या दुसऱ्या फेरीसाठी गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली. दुसऱ्या निवड यादीत २३ हजार १२० विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला आहे. या विद्यार्थ्यांना येत्या ९ डिसेंबरपर्यंत ज्युनिअर कॉलेजमध्ये कागदपत्रे व शुल्कासह प्रवेश घेता येणार असल्याचे समितीमार्फत जाहीर करण्यात आले आहे.**

पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरातील ज्युनिअर कॉलेजमध्ये प्रवेशासाठी अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे प्रवेश खुल्या प्रवर्गातून करण्याचे आदेश राज्य सरकारने दिले आहेत. त्यानंतर शनिवारी ही निवड यादी जाहीर झाली आहे. त्यामुळे निवड यादीत नाव जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये प्रवेश घेता येणार आहे. प्रवेशासाठी १ लाख ७ हजार ३० जागा उपलब्ध आहेत. त्यापैकी पहिल्या फेरीत ३० हजार ५४४ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झालेले आहेत. दुसऱ्या फेरीत ६० हजार ५९९ जागा उपलब्ध होत्या. त्यासाठी ४६ हजार ७९४ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले होते. त्यापैकी २३ हजार १२० विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाले आहेत. या विद्यार्थ्यांना ९ डिसेंबरपर्यंत प्रवेश घ्यायचा आहे. दरम्यान, या कालावधीत कोटा प्रवेश प्रक्रिया सुरू राहणार असून, मॅनेजमेंट कोट्यातील जागा प्रत्यार्पण करता येणार आहेत. त्याचप्रमाणे प्रवेश प्रक्रियेत सहभागी न झालेल्या विद्यार्थ्यांना अर्जातील भाग एक आणि भाग दोन भरण्याची संधी आहे. कॉलेजमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती कॉलेज प्रशासनाला ९ डिसेंबरला सायंकाळी ५ ते ८ या वेळेत प्रवेश प्रक्रियेच्या पोर्टलवर अपलोड करायची आहे. त्यानंतर १० डिसेंबर रोजी तिसऱ्या फेरीसाठी प्रवेशक्षमता जाहीर करण्यात येईल, अशी माहिती

| शाखा | निवड यादीतील विद्यार्थी |
|---|---|
| कला | २६७२ |
| वाणिज्य | ९६७२ |
| विज्ञान | १००८९ |
| एचएसव्हीसी | ५९७ |
| एकूण | २३१२० |

| कोटा | प्रवेशक्षमता | झालेले प्रवेश |
|---|---|---|
| इनहाउस | ७४८७ | ४११७ |
| मॅनेजमेंट | ४७२० | ५४९ |
| अल्पसंख्याक | १०६८३ | २३३७ |
| कॅप | ८४१४० | २३५४१ |
| एकूण | १०७०३० | ३०५४४ |

अकरावी प्रवेश नियंत्रण समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिली.

### ८ हजार १२१ विद्यार्थ्यांना पसंतीचे कॉलेज

अकरावी प्रवेश नियंत्रण समितीकडून २३ हजार १२० विद्यार्थ्यांचे प्रवेश जाहीर झाले असून ८ हजार १२१ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले आहे. त्यामुळे त्यांना प्रवेश घ्यावाच लागेल. अन्यथा विशेष फेरीपर्यंत ते प्रवेश प्रक्रियेतून बाहेर पडणार आहेत. ४ हजार १४७ विद्यार्थ्यांना दुसऱ्या, २ हजार ८५३ विद्यार्थ्यांना तिसऱ्या, २ हजार ६४ विद्यार्थ्यांना चौथ्या, १ हजार ६१२ विद्यार्थ्यांना पाचव्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले आहे. अन्य विद्यार्थ्यांना ५ ते १० व्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले आहे. विद्यार्थ्यांना त्याच महाविद्यालयात प्रवेश घेता येईल किंवा पुढच्या फेरीची वाट पाहता येणार आहे.

Pune Edition
Dec 6, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# विद्यार्थ्यांनो, असा करा अभ्यास!

## बॅकलॉगच्या परीक्षेसाठी विद्यापीठाकडून टिप्स

**पुणे, ता. ५ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची बॅकलॉगची परीक्षा ८ डिसेंबरपासून सुरू होणार आहे. बहुपर्यायी प्रश्न (मल्टिपल चॉईस क्वेश्चन-एमसीक्यू) पद्धतीने परीक्षा कशी द्यावी, याच्या टिप्स विद्यापीठाने जाहीर केल्या आहेत.

'कोरोना'च्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पुणे विद्यापीठाने 'एमसीक्यू' पद्धतीने परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला. अंतिम वर्षाची परीक्षा घेताना यात अनेक समस्यांना सामोरे जावे लागले होते; पण त्या वेळी अशा पद्धतीने विद्यार्थ्यांना परीक्षेबाबत टिप्स दिल्या नव्हत्या.

परीक्षेसाठी अभ्यास कसा करावा, प्रश्न कसे विचारले जाणार, याबाबत विद्यार्थ्यांमध्ये संभ्रम आहे. त्यामुळे परीक्षा संचालक डॉ. महेश काकडे यांनी हे परिपत्रक जाहीर केले आहे. याबाबत अधिक माहिती पुणे विद्यापीठाच्या unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

### सूचना महिनाभर आधी हव्यात

परीक्षा व मूल्यमापन मंडळाने 'एमसीक्यू'बाबत माहिती देणारे परिपत्रक काढले; पण परीक्षेच्या आधी एक आठवडा. गेले महिनाभर परीक्षेबाबत चर्चा सुरू असताना तेव्हाच अभ्यास कसा करावा, हे सांगितले असते तर विद्यार्थ्यांना परीक्षा देणे आणखी सोपे गेले असते, असे विद्यार्थ्यांनी सांगितले. दरम्यान, परीक्षा विभागाने हे पाऊल उचलल्याबद्दल त्यांनी स्वागत केले.

### काय आहेत टिप्स...

#### अभ्यास कसा करावा?

- सर्व व्याख्या, संज्ञा, कन्सेप्ट, महत्त्वाची सूत्रे लक्षात ठेवावीत
- महत्त्वाच्या मुद्द्यांवर 'एमसीक्यू' प्रश्न कसा येऊ शकतो व त्याचे उत्तर कसे असेल, याचा विचार करा
- स्वतः प्रश्न व त्याचे चार पर्याय काढण्याचा सराव करा
- इंटरनेटवर संबंधित विषयाचे 'एमसीक्यू' शोधा

#### 'एमसीक्यू' प्रश्न कसे सोडवावेत?

- परीक्षेत प्रश्न आल्यानंतर सर्व सूचनांचे व्यवस्थित वाचन करा
- प्रश्न व पर्याय नीट वाचा. गृहितकाच्या आधारे उत्तर न देता प्रश्न समजून घ्या
- 'मेथड ऑफ एलिमिनेशन' म्हणजे चुकीचे पर्याय बाजूला करून योग्य उत्तराकडे जावे, त्यामुळे वेळेची बचत होईल

Sakaal: 6.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

पुढारी

# विद्यार्थ्यांना दिलासा

## पीएच.डी., एम.फिल. शोधनिबंध सादर करण्यास यूजीसीची मुदतवाढ

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**देशातील कोरोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेता विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) पीएच.डी. आणि एम.फिल. चा शोधनिबंध सादर करण्याची मुदत ३० जून २०२१ पर्यंत वाढवली आहे. या निर्णयाचे परिपत्रक प्रसिद्ध केले असून, त्याबाबत योग्य कार्यवाही करण्याचे आदेश विद्यापीठांना दिले आहेत. त्यामुळे पीएच.डी., एम.फिल. करणाऱ्या देशातील हजारो संशोधक विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.**



संग्रहित छायाचित्र

देशात कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे आठ महिने लॉकडाऊन होते. या काळात विद्यापीठे, संशोधन केंद्रे आणि महाविद्यालये बंद होती. त्यामळे पीएच.डी. आणि एम.फिल. च्या विद्यार्थ्यांना संशोधनात अडचणी आल्याने शोधनिबंध तयार करता आला नाही. याबाबत यूजीसीकडे तक्रारी देखील करण्यात आल्या होत्या. देशातील कोरोनाबाबत एकूणच परिस्थितीचा आढावा घेतल्यावर यूजीसीने सहा महिन्यांची मुदतवाढ जाहीर केली होती. त्यानुसार ३० जून २०२० पर्यंत शोधनिबंध सादर करणाऱ्या विद्यार्थ्यांना सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आली होती. त्यातच आता नव्या परिपत्रकाद्वारे ३१ डिसेंबर २०२० पर्यंत शोधनिबंध सादर करण्याची मुदत असणाऱ्या विद्यार्थ्यांनाही सहा महिन्यांची मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार या विद्यार्थ्यांना ३० जून २०२१ पर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्याचप्रमाणे पब्लिकेशन्स दोन कॉन्फरन्समध्ये सादरीकरण करण्याची मुभा दिली आहे. या निर्णयाचा फायदा संशोधन करणाऱ्या देशातील हजारो विद्यार्थ्यांना होणार आहे. दरम्यान, पीएचडीसाठी फेलोशिपचा कालावधी पाच वर्षांचाच ग्राह्य धरण्यात आला आहे, अशी माहिती यूजीसीचे सचिव प्रा. रजनीश जैन यांनी परिपत्रकाद्वारे दिली आहे.

Pune Edition
Dec 6, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# अकरावीच्या दुसऱ्या गुणवत्ता यादीत २३ हजार १२० विद्यार्थ्यांना प्रवेश

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावीच्या प्रवेशासाठीच्या ऑनलाइन प्रक्रियेतील दुसऱ्या गुणवत्ता यादीत २३ हजार १२० विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला आहे. या विद्यार्थ्यांना ९ डिसेंबरपर्यंत कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश निश्चित करायचा आहे.

केंद्रीय अकरावी प्रवेश नियंत्रण समितीकडून शनिवारी दुसरी गुणवत्ता यादी जाहीर झाली. सर्वोच्च न्यायालयाने सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) आरक्षणाला सप्टेंबरमध्ये अंतरिम स्थगिती दिल्यानंतर जवळपास तीन महिने प्रवेश प्रक्रिया स्थगित होती. अखेर एसईबीसी आरक्षणातील विद्यार्थ्यांचे प्रवेश खुल्या गटातून करण्याचे निर्देश राज्य शासनाने दिल्यानंतर पुन्हा प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील महाविद्यालयांमध्ये १ लाख ७ हजार ३० जागांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. पहिल्या फेरीत ३० हजार ५४४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. दुसऱ्या फेरीतील ६० हजार ५९९ जागांसाठी अर्ज केलेल्या ४६ हजार ७९४ विद्यार्थ्यांपैकी २३ हजार १२० विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाले आहेत. या विद्यार्थ्यांना ९ डिसेंबरपर्यंत प्रवेश घ्यायचे आहेत.

दरम्यान, या कालावधीत राखीव जागांवरील (कोटा) प्रवेश प्रक्रिया सुरू राहणार आहेत. व्यवस्थापन कोट्यातील जागा प्रवेश प्रक्रियेत प्रत्यार्पित करता येतील. तसेच प्रवेश प्रक्रियेत सहभागी न झालेल्या विद्यार्थ्यांना अर्जातील भाग एक आणि भाग दोन भरण्याची संधी आहे. महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती महाविद्यालयांना ९ डिसेंबरला सायंकाळी पाच ते आठ या वेळेत संकेतस्थळावर अपलोड करायची आहे. १० डिसेंबरला तिसऱ्या फेरीच्या जागा जाहीर करण्यात येतील, अशी माहिती प्रवेश समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिली.

| शाखानिहाय विद्यार्थी | |
|---|---|
| कला | २ हजार ६७२ |
| वाणिज्य | ९ हजार ६७२ |
| विज्ञान | १० हजार ०८९ |
| व्यवसाय शिक्षण | ५९७ |

लोकसत्ता Sun, 06 December 2020
https://epaper.loksatta.com/c/56857254



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

पुढारी

# नॉन मायनॉरिटीचा उल्लेख २०१४ पासून आदेशानुसारच

**राज्य मंडळाचे सचिव भोसले यांचे स्पष्टीकरण**

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी व बारावीच्या परीक्षांसाठीच्या अर्जामध्ये विद्यार्थ्यांना धर्माची माहिती देण्यासाठीच्या रकान्यात हिंदू हा पर्याय नसल्याने सोशल मीडियावर सध्या मोठी चर्चा सुरू आहे. परंतु हा बदल २०१४ पासून व शासकीय आदेशानुसारच करण्यात आलेला आहे, असे स्पष्टीकरण राज्य मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी दिले आहे.

मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या दहावी व बारावीच्या परीक्षांसाठी प्रत्येक विद्यार्थ्याचा अर्ज संबंधित माध्यमिक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयामार्फत ऑनलाइन पद्धतीने भरून घेतला जातो. या अर्जामध्ये विविध माहितीचा समावेश असतो. या अर्जात मायनॉरिटी रिलिजन हा रकाना २०१४ पासून समाविष्ट करण्यात आलेला आहे. या रकान्यात मुस्लिम, ख्रिश्चन, बुद्धिस्ट, शीख, पारशी, जैन या उपरकान्यांचा समावेश आहे. या व्यतिरिक्त उर्वरित सर्व घटकांसाठी नॉन मायनॉरिटी हा एकच रकाना सन २०१४ पासूनच वापरला जातो, असे मंडळाने स्पष्ट केले आहे.

२०१३ मध्ये केंद्र सरकारच्या अल्पसंख्याक मंत्रालयाने व राज्य शासनाच्या अल्पसंख्यांक विभागाने स्पर्धा परीक्षांसाठी अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांचा तपशील मागवला होता. त्यामुळे मंडळाच्या परीक्षा समितीच्या दिनांक ७ सप्टेंबर, २०१३ च्या सभेतील ठरावानुसार वरील उपरकान्यांचा समावेश परीक्षेसाठीच्या अर्जामध्ये करण्यात आलेला आहे. या अर्जात नमूद केलेले अल्पसंख्यांक समुदाय महाराष्ट्र शासनाच्या अधिसूचनेनुसार मंडळाच्या अर्जात घेण्यात आलेले आहेत. याव्यतिरिक्त अन्य विद्यार्थ्यांना या रकान्यातील माहिती भरण्यासाठी नॉन मायनॉरिटी हा रकाना उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. ही माहिती विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका व प्रमाणपत्रावर नमूद करण्यात येत नाही, असेही डॉ. भोसले यांनी स्पष्ट केले.

My Pune Edition
Dec 6, 2020 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# परीक्षेतील अडचणी सोडविण्याची मागणी

**पुणे, ता. ६ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने अंतिम पूर्व वर्षातील बॅकलॉग आणि श्रेणी सुधारसाठी सराव परीक्षा घेताना पुन्हा एकदा तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागले आहे. मुख्य परीक्षेत अडचणी येऊन विद्यार्थ्यांचे पुन्हा नुकसान होणार असल्यास यास जबाबदार कोण, असा प्रश्न महाराष्ट्र स्टुडंट्स वेलफेअर असोसिएशनने केला आहे.

याबाबत कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना निवेदन पाठविले आहे. दरम्यान, ८ डिसेंबरपासून बॅकलागची मुख्य परीक्षा सुरू होणार आहे.बॅकलॉगच्या व श्रेणीसुधारची परीक्षा ऑनलाइन माध्यमातून होणार आहे. यावेळी प्रॉक्टर्ड मेथडचा वापर केला जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मोबाईलचा फ्रंट कॅमेरा सुरू राहणार असून, गैरप्रकार होत असल्याचे लक्षात येताच कारवाई होणार आहे.

विद्यापीठाने ३ ते ५ डिसेंबर या कालावधीत या विद्यार्थ्यांची सराव परीक्षा घेतली. त्यामध्ये लॉगइन न होणे, प्रश्नांचे पॅनल न दिसणे, फ्रंट कॅमेरा आपोआप बंद होत असल्याने विद्यार्थ्यांना इशारा येत आहे. एकाच विद्यार्थ्याला दोन लॉगइन आयडी प्राप्त होणे अशा समस्या आल्या आहेत.

ज्या कंपनीने अंतिम वर्षाची परीक्षा घेतली, त्याच कंपनीला या परीक्षांचे काम दिले आहे. पुन्हा गोंधळ झाल्यास याची जबाबदारी कोण घेणार. तसेच तांत्रिक अडचणींना तोंड द्यावे लागू नये यासाठी ही परीक्षा नॉन प्रॉक्टर्ड पद्धतीने घ्यावी अशी मागणी संघटनेचे सचिव हर्षल अग्रवाल यांनी कुलगुरूंकडे केली आहे.

Sakaal: 7.12.2020

# अंतिम वर्षाच्या सुधारित निकालाची टोलवाटोलवी

## विद्यार्थ्यांकडून विद्यापीठात आंदोलनाचा इशारा

**पुणे, ता. ६ :** अंतिम वर्षाचा निकाल जाहीर झाला असला, तरी त्यातील अडचणी दूर झालेल्या नाहीत. याबाबत महाविद्यालयाकडे विचारणा केल्यास, विद्यापीठाकडून अजून काही सूचना आलेली नाही, असे उत्तर विद्यार्थ्यांना दिले जात आहे. तर, सुधारित निकालासाठी महाविद्यालयाकडे चौकशी करा, असे उत्तर विद्यार्थ्यांना दिले जात आहे.

अंतिम वर्षाच्या निकालात अनेक विद्यार्थ्यांना एका विषयात शून्य गुण, परीक्षेस अनुपस्थित दाखविणे या कारणांमुळे ते अनुत्तीर्ण झाले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाकडे तसेच विद्यापीठाकडे लेखी तक्रार केली आहे. महाविद्यालयांनी या तक्रारी विद्यापीठाकडे पाठविल्या आहेत. परंतु निकालात सुधारणा झालेली नाही.

तक्रार करून पंधरा दिवस झाले. याबाबत महाविद्यालयाकडे चौकशी केली असता तुमचा सुधारित निकाल विद्यापीठाने अजून पाठवलेला नाही, असे उत्तर विद्यार्थ्यांना देण्यात येत आहे. तर विद्यापीठाने निकाल महाविद्यालयाकडे पाठविले आहेत, असे आम्हाला सांगितल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. हा घोळ लवकर मिटावा यासाठी सोमवारी (ता. ७) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आंदोलन केले जाणार आहे.

Sakaal: 7.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# विद्यार्थ्यांना उमगणार भारतीय संविधान

## द्वितीय वर्षाला अभ्यासक्रम अनिवार्य; पुणे विद्यापीठाचे विधायक पाऊल

ब्रिजमोहन पाटील : सकाळ वृत्तसेवा

सकाळ EXCLUSIVE

पुणे, ता. ६ : पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करूनही विद्यार्थ्यांचा आपल्या संविधानाचा अभ्यास अतिशय कमी असतो. हे अज्ञान दूर करण्याचा निर्णय सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घेतला आहे. कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखेतून पदवीचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना हा अभ्यासक्रम अनिवार्य केला आहे. द्वितीय वर्षात हा दोन श्रेयांकाचा (क्रेडिट कोर्स) अभ्यासक्रम शिकवला जाईल.

भारतीय संविधानात नागरिकांचे मूलभूत हक्क, अधिकार, कर्तव्य यांचा समावेश आहेच; पण त्याशिवाय देशाचा आदर्श राज्य कारभार कसा चालावा, याचे नियम घालून दिले आहेत. समता, बंधुता याचीं शिकवणही संविधानात आहे. कोणत्या गोष्टी संवैधानिक व कोणत्या असंवैधानिक आहेत, हे विद्यार्थ्यांना कळणे महत्त्वाचे आहे.

शालेय शिक्षणात नागरिकशास्त्र हा विषय असला तरी त्यामध्ये अतिशय कमी अभ्यासक्रम आहे. उच्च शिक्षणात देखील हा विषय शिकवला जात नाही. त्यामुळे भारतीय संविधान नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील अविभाज्य घटक असताना देखील त्याची फारशी माहिती नागरिकांना नाही.

पुणे विद्यापीठाच्या मानव विज्ञान विद्या शाखेने विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयात विद्यार्थ्यांना भारतीय संविधानाचा व्यवस्थित अभ्यास करता यावा, त्यांना त्यातील तरतुदी समजाव्यात, यासाठी पुढाकार घेतला आहे. त्यास मान्यता देखील मिळाली आहे.

दोन श्रेयांक (क्रेडिट) असलेला 'भारतीय संविधान' हा विषय बीए, बीएससी आणि बी. कॉम.च्या द्वितीय वर्षात शिकवला जाणार आहे. यामध्ये साधारणपणे ३० तासांचे शिक्षण विद्यार्थ्यांना दिले जाईल. यात असाईनमेंट, प्रॅक्टिकल, प्रोजेक्ट आदींचा समावेश असणार आहे.




### विधी विभागाकडे जबाबदारी

भारतीय संविधान विषय विद्यार्थ्यांना शिकवताना तो कशा पद्धतीने शिकवला पाहिजे, त्याची पद्धत कशी असेल, अभ्यासक्रम, महाविद्यालयांना त्यासाठी देण्यात येणाऱ्या सूचना ही सर्व जबाबदारी विद्यापीठातील विधी विभागाकडे देण्यात आली आहे. त्याचा अभ्यासक्रम विद्यापीठाच्या संकेतस्थळावर टाकण्यात आला आहे.

**'भारतीय संविधान' आणि 'डेमोक्रॅटिक इलेक्शन अँड गव्हर्नन्स' या दोन क्रेडिट कोर्सचा समावेश पदवी शिक्षणात केला आहे. २०२१-२२ ला द्वितीय वर्षात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना हे दोन्ही अभ्यासक्रम शिकणे अनिवार्य आहे.**
- डॉ. अंजली कुरणे, अधिष्ठाता, मानव विज्ञान, पुणे विद्यापीठ

**या अभ्यासक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व घटकांचा विचार करून भारतीय समाज एकसंध कसा राहील, याचा विचार कसा केला? यांसह इतर गोष्टी विद्यार्थ्यांना शिकवल्या जातील.**
-डॉ. विजय खरे, प्रमुख, सामरिक व संरक्षणशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ

**पुणे विद्यापीठाने संविधानाचा परिचय करून देण्यासाठी त्याचा अभ्यासक्रमात समावेश केला हा निर्णय महत्त्वाचा आहे. उद्याचा भारत कसा घडला पाहिजे, याचे स्वप्न संविधानाने दिले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी तो तपशिलात समजून घ्यावा.**
- सुभाष वारे, संविधान अभ्यासक

Sakaal: 7.12.2020

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ बॅकलॉगच्या परीक्षा उद्यापासून

## तीन जिल्हे : दोन लाख १८ हजार विद्यार्थी परीक्षा देणार

■ लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमधील प्रथम ते अंतिम पूर्व वर्षातील विद्यार्थ्यांच्या बॅकलॉग व श्रेणीसुधार परीक्षा येत्या ८ डिसेंबरपासून केवळ ऑनलाईन पध्दतीने घेतल्या जाणार आहेत. तसेच यावेळी परीक्षेसाठी प्रॉक्टर्ड पध्दतीचा वापर करणार आहे. पुणे, अहमदनगर व नाशिक या तीन जिल्ह्यांमधील सुमारे २ लाख १८ हजार विद्यार्थी ही परीक्षा देणार आहेत.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांनी निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे प्रथम ते अंतिम पूर्व वर्षातील विद्यार्थ्यांच्या बॅकलॉग आणि श्रेणी सुधार परीक्षा येत्या ८ ते २३ डिसेंबर या कालावधीत घेतल्या जात आहेत. सर्व विषयांची परीक्षा एमसीक्यू स्वरुपाची असणार आहे. विद्यापीठाने विद्यार्थ्यांना लॉग इन आयडी दिला असून परीक्षेचा सराव करण्यासाठी सुविधा उपलब्ध करून दिली आहे.तीनही जिल्ह्यातील सुमारे १ लाख ६० हजार विद्यार्थ्यांनी परीक्षेचा सराव केला आहे. विद्यापीठातर्फे घेण्यात आलेली अंतिम वर्षाची ऑनलाईन परीक्षा देताना विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. सुमारे सहा हजार विद्यार्थ्यांनी निकालात त्रुटी राहिल्याबाबत विद्यापीठाकडे तक्रार केली. त्यामुळे या पुढील परीक्षा घेताना अडचणी येऊ नयेत,या दृष्टीने विद्यापीठाने आवश्यक तयारी केली आहे. त्यात एका दिवशी ५० हजारांपेक्षा कमी विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा घेणे, एका दिवसात केवळ १०० ते १२० विषयांचीच परीक्षा घेणे आदी गोष्टींची विचार केला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना लॉग इन करताना आणि परीक्षा एजन्सीला परीक्षा घेताना कोणत्याही अडचणी येणार नाहीत,असे विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

### गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यावर कारवाई करणार

परीक्षा पारदर्शक वातावरणात होतील आणि कोणताही गैरप्रकार होणार नाही, यासाठी येत्या ८ डिसेंबरपासून सुरु होणाऱ्या परीक्षा प्रॉक्टर्ड पध्दतीने घेणार आहेत. त्यामुळे परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना फ्रंट कॅमेरा असणाऱ्या इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर करावा लागेल. परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांचे फोटो काढले जातील. त्यात विद्यार्थ्यांच्या संशयास्पद हालचाली दिसून आल्यास फोटोंची सखोल तपासून करून गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यावर कारवाई केली जाणार आहे.

Lokmat: 7.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# बॅकलॉग परीक्षा उद्यापासून सुरू

प्रभात वृत्तसेवा



**पुणे विद्यापीठाचे सुमारे पावणेतीन लाख विद्यार्थी देणार परीक्षा**

पुणे, दि. ६ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बॅकलॉग आणि श्रेणी सुधार परीक्षा दि. ८ डिसेंबरपासून सुरू होत आहे. ही परीक्षा 'प्रॉक्टर्ड' पद्धतीने होणार आहेत. यासाठी विद्यापीठाची यंत्रणा सज्ज झाली आहे. या परीक्षेपूर्वी सराव परीक्षा झाल्याने या परीक्षा सुरळीत होण्याची चिन्हे आहेत.

विद्यापीठाच्या दि. ८ ते २३ डिसेंबर दरम्यान होणाऱ्या प्रथम वर्ष ते अंतिम वर्ष पूर्व विद्यार्थ्यांच्या विषय राहिलेल्या (बॅकलॉग) आणि श्रेणी सुधार परीक्षा या ऑनलाइन पद्धतीने होणार आहेत. विद्यार्थ्यांना अभ्यासाला लॉकडाउनमुळे वेळ मिळाल्याने, अनेक विषयांच्या परीक्षा १०० टक्के अभ्यासक्रमावर होणार आहे. ऑनलाइन परीक्षांचा अंदाज येण्यासाठी विद्यापीठाने विद्यार्थ्यांना सराव परीक्षेची संधी उपलब्ध करून दिली आहे. या परीक्षा बहुपर्यायी प्रश्न (मल्टिपल चॉइस क्वेश्चन म्हणजेच एमसीक्यू) पद्धतीने होणार आहे.

विद्यापीठाने ऑक्टोबरमध्ये अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने घेतल्या होत्या. त्यावेळी तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागला होता. त्यामुळे आता या अडचणींची पुनरावृत्ती टाळण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे. जवळपास पावणेतीन लाख विद्यार्थी या परीक्षा देणार आहेत.

### एमसीक्यू प्रश्न कसे सोडवावेत ?

- परीक्षेत प्रश्न आल्यानंतर सर्व सूचना व्यवस्थित वाचन करा.
- प्रश्न व पर्याय नीट वाचा, गृहितकाच्या आधारे उत्तर देऊ नका
- एमसीक्यू पद्धतीत वेळेला महत्त्व आहे, त्यामुळे सोपे प्रश्न आधी सोडवा.

### गैरप्रकार थांबणार

या परीक्षा पद्धतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहाय्याने परीक्षार्थींवर लक्ष ठेवले जाणार आहे. त्यासाठी कॅमेराचा वापर करण्यात येणार असून, विद्यार्थ्यांचे काही छायाचित्रे देखील काढण्यात येतील. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्याव्यतिरिक्त अन्य हालचाली झाल्याचे आढल्यास त्याबाबतचा इशारा विद्यार्थ्यांना दिला जाणार आहे. त्यामुळे या परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांना गैरप्रकार करता येणार नाही.

Prabhat: 7.12.2020

# ३२ हजार ९७२ विद्यार्थ्यांचे अकरावीसाठी प्रवेश निश्चित

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ६ - पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील कनिष्ठ महाविद्यालयात आत्तापर्यंत ३२ हजार ९७२ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत.

प्रवेशासाठी ३०४ कनिष्ठ महाविद्यालयांनी नोंदणी केली असून यात १ लाख ७ हजार ३० जागा दर्शविण्यात आल्या आहेत. प्रवेशासाठी १ लाख १ हजार ६३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून ८४ हजार ५९० विद्यार्थ्यांचे अर्ज लॉक करण्यात आले आहेत. त्यातील ८४ हजार २८५ अर्जांची पडताळणीही पूर्ण झाली आहे. ७६ हजार ७५४ विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांचे पसंतीक्रम नोंदविलेले आहेत.

प्रवेशाची दुसरी गुणवत्ता यादी नुकतीच जाहीर करण्यात आली आहे. दोन दिवसांत २ हजार ४२८ विद्यार्थ्यांनी नव्याने प्रवेश नोंदविले आहेत. ९ डिसेंबरपर्यंत या फेरीतील प्रवेश प्रक्रिया सुरु राहणार आहे. पहिला पसंतीक्रम मिळाला असल्यास विद्यार्थ्यांनी निवडलेल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेणे बंधनकारक आहे. अन्यथा या विद्यार्थ्यांना पुढील नियमित फेऱ्यांमध्ये संधी दिली जाणार नाही. त्यांना केवळ विशेष फेरीत संधी मिळू शकणार आहे. १० डिसेंबरला प्रवेशाच्या नियमित तिसऱ्या फेरीतील रिक्त जागांचा तपशील जाहीर करण्यात येणार आहे.

Prabhat: 7.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education



# प्राध्यापकांना खूषखबर

## संपकाळातील थकीत वेतन मिळणार

**पुणे, ता. ६ : राज्यातील प्राध्यापकांनी २०१३ मध्ये केलेल्या ७१ दिवसांच्या संपकाळातील वेतन राज्यातील १२ हजार ५१५ प्राध्यापकांना देण्यात येणार असून, त्यासाठी सरकारने तब्बल १९१ कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिला आहे. मात्र, लेखी आदेशातील अटी काय असतील, हे माहीत नसल्याने प्राध्यापक संघटनांनी याबाबत सावध भूमिका घेतली आहे.**

राज्यातील प्राध्यापकांनी त्यांच्या वेतन व इतर प्रश्नासाठी ४ फेब्रुवारी २०१३ पासून बेमुदत संप सुरू केला होता. सरकार व प्राध्यापक संघटना यांच्यातील चर्चा फिसकटल्याने हा संप १० मे, २०१३ पर्यंत चालू होता. त्यानंतर राज्य सरकारने आंदोलन काळातील प्राध्यापकांचा पगार दिला जाणार नाही, अशी भूमिका घेतली होती. त्यामुळे प्राध्यापक संघटनांनी याविरोधात न्यायालयात याचिका दाखल केली. उच्च न्यायालयासह सर्वोच्च न्यायालयातही प्राध्यापकांच्या बाजूने निकाल लागला. यामध्ये प्राध्यापकांना त्यांचा ७१ दिवसांचा पगार द्यावा, तसेच या रकमेवर ८ टक्के व्याज द्यावे, असे आदेश काही महिन्यांपूर्वी दिले होते.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी ट्विटरद्वारे प्राध्यापकांना संप काळातील ७१ दिवसाचा पगार दिला जाणार आहे. याचा फायदा राज्यातील १२ हजार ५१५ प्राध्यापकांना होणार आहे. अशी माहिती ट्विटद्वारे दिली. शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सातवा वेतन देण्यासंदर्भात शासन निर्णय येत्या चार दिवसात काढण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

“ संपकाळातील पगार मिळवा, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यानुसार सरकार पैसे कसे देणार, हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.
- के. एल. गिरमकर, अध्यक्ष, स्पुफ्टो

“ या काळात परीक्षेच्या कामावर बहिष्कार होता. इतर काम सुरूच होते, पण आमचे वेतन न देता अन्याय केला.
- प्रा. सोपान राठोड, अध्यक्ष, पुणे विद्यापीठ शिक्षक संघ

“ प्राध्यापकांनी त्यांच्या हक्कासाठी आंदोलन केले होते, त्यांचा पगार मिळणे गरजेचे होते.
- प्रा. सुरेश देवडे पाटील, नेट-सेट, पीएचडीधारक संघर्ष समिती

Sakaal: 7.12.2020



# प्राध्यापकांना संपकाळातील वेतन

## शिक्षणमंत्री सामंत यांचा निर्णय; २०१३ मधील प्रकरण

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ६ - राज्यातील प्राध्यापकांनी २०१३ मध्ये केलेल्या ७१ दिवसांच्या संपकाळातील वेतन राज्यातील १२ हजार ५१५ प्राध्यापकांना देण्यात येणार असल्याचा निर्णय उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांन घेतला आहे. यासाठी सरकारने तब्बल १९१ कोटी रुपये निधी उपलब्ध करून दिल्याने संप काळातील वेतन प्राध्यापकांना देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

राज्यातील प्राध्यापकांनी त्यांच्या वेतन व अन्य प्रश्नांसाठी ४ फेब्रुवारी २०१३ पासून बेमुदत संप सुरू केला होता. सरकार व प्राध्यापक संघटना यांच्यातील चर्चा फिस्कटल्याने हा संप १० मे पर्यंत सुरू होता. संप झाल्यानंतर राज्य सरकारने आंदोलन काळातील प्राध्यापकांचा पगार दिला जाणार नाही, अशी भूमिका घेतली होती. त्यामुळे प्राध्यापक संघटनांनी याविरोधात न्यायालयात याचिका दाखल केली. उच्च न्यायालयासह सर्वोच्च न्यायालयातही प्राध्यापकांच्या बाजूने निकाल लागला. यामध्ये प्राध्यापकांना त्यांचा ७१ दिवसांचा पगार द्यावा, तसेच या रकमेवर ८ टक्के व्याज द्यावे, असे आदेश काही महिन्यांपूर्वी दिले होते.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी आज ट्विटरद्वारे प्राध्यापकांना संप काळातील ७१ दिवसाचा पगार दिला जाणार असल्याची माहिती दिली. त्यामुळे संप काळातील प्राध्यापकांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे.

“ प्राध्यापकांना संप काळातील पगार मिळवा, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. या आदेशानुसार सरकार पैसे देणार आहे की अन्य पद्धतीने हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. त्यासाठी आदेश कसा काढला जातो, हे महत्त्वाचे आहे.
- के. एल. गिरमकर, अध्यक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व महाविद्यालयीन अध्यापक संघटना (स्पुफ्टो)

Prabhat: 7.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education



# बॅकलॉग परीक्षेतील अडचणी सोडवा

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रथम वर्ष ते अंतिम पूर्व वर्षातील बॅकलॉग आणि श्रेणीसुधार परीक्षेसाठी उपलब्ध केलेली सराव परीक्षा देताना विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणींना सामोरे जावे लागले आहे. अंतिम वर्षाच्या परीक्षेत अडचणी आल्यानंतरही विद्यापीठाच्या चुकीमुळे विद्यार्थ्यांचे पुन्हा नुकसान होणार असेल तर त्यास जबाबदार कोण? असा प्रश्न महाराष्ट्र स्टुडंट्स वेलफेअर असोसिएशनने उपस्थित केला आहे.

पुणे विद्यापीठातर्फे बॅकलॉगच्या व श्रेणीसुधारची ऑनलाइन परीक्षा येत्या ८ डिसेंबरपासून घेतली जाणार आहे. विद्यापीठाने ३ ते ५ डिसेंबर कालावधीत सराव परीक्षा घेतली. त्यामध्ये लॉगइन न होणे, प्रश्नांचे पॅनल न दिसणे, फ्रंट कॅमेरा आपोआप बंद होत असल्याच्या तक्रारी विद्यार्थ्यांकडून केल्या जात आहे. अंतिम वर्षाची परीक्षा घेताना गोंधळाची पुनरावृत्ती झाल्यास याची जबाबदारी कोण घेणार? असा प्रश्न विद्यार्थी संघटनेने उपस्थित केला तसेच तांत्रिक अडचणींना तोंड द्यावे लागू नये, यासाठी ही परीक्षा नॉन प्रॉक्टर्ड पद्धतीने घ्यावी, असे निवेदन महाराष्ट्र स्टुडंट्स वेलफेअर असोसिएशनतर्फे कुलगुरूंना दिले आहे.

Lokmat:: 7.12.2020



# नामांकित कॉलेजच्या आग्रहामुळे प्रवेश कमी

## अकरावी प्रवेश नियंत्रण समितीचे निरीक्षण

म. टा. प्रतिनिधी, पुणे

अकरावी प्रवेश नियंत्रण समितीने अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीसाठी शनिवारी निवड यादी जाहीर झाल्यानंतर, दोन हजार ४२८ विद्यार्थ्यांनी विविध ज्युनिअर कॉलेजांमध्ये प्रवेश निश्चित केला. प्रवेशासाठी तीन दिवस शिल्लक असले, तरी विद्यार्थ्यांनी नामांकित कॉलेज मिळण्याचा आग्रह सोडून गुणवत्तेनुसार मिळालेल्या कॉलेजांमध्ये प्रवेश घ्यावा, असे आवाहन अकरावी प्रवेश नियंत्रण समितीच्या वतीने यांनी केले आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील ज्युनिअर कॉलेजांमध्ये प्रवेशासाठी अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. प्रवेशासाठी एक लाख ७ हजार ३० जागा उपलब्ध आहेत. त्यापैकी पहिल्या फेरीत ३० हजार ५४४ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झालेले आहेत. दुसऱ्या फेरीत ६० हजार ५९९ जागा उपलब्ध होत्या. त्यासाठी ४६ हजार ७९४ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले होते. त्यापैकी २३ हजार १२० विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाले आहेत. यातील पहिल्या दिवशी २ हजार ४२८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. तर, उर्वरित विद्यार्थ्यांना ९ डिसेंबरपर्यंत प्रवेश घ्यायचे आहेत. शेवटच्या दिवशी आढावा घेऊन राज्यस्तरावर प्रवेशाच्या मुदतवाढीविषयी निर्णय घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले आहे. प्रवेश प्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर होतात. मात्र, प्रत्यक्षात विद्यार्थी कमी प्रवेशित होतात. प्रवेश प्रक्रियेत सहभागी झालेल्या अनेक विद्यार्थ्यांना नामांकित महाविद्यालयांमध्येच प्रवेश हवा असतो. मात्र, नामांकित महाविद्यालयांचे कटऑफ गुण अजूनही नव्वदीपार आहेत.

Maharashtra Times: 7.12.2020

## News Paper Clippings During December 2020

Section: Education

पुढारी

# नामांकित महाविद्यालयांचा आग्रह विद्यार्थ्यांनी सोडावा

## अकरावी प्रवेश नियंत्रण समितीच्या सचिव शेंडकर यांचे आवाहन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

अकरावी प्रवेश नियंत्रण समितीकडून शनिवारी (दि. ५) अकरावीच्या दुसऱ्या फेरीसाठी गुणवत्ता यादी जाहीर झाली. पहिल्याच दिवशी २ हजार ४२८ विद्यार्थ्यांनी विविध महाविद्यालयांमध्ये प्रवेश निश्चित केला. प्रवेशासाठी अजून तीन दिवस शिल्लक आहेत. विद्यार्थ्यांनी नामांकित महाविद्यालयांचा आग्रह सोडून मिळालेल्या महाविद्यालयांमध्ये प्रवेश घ्यावा, असे आवाहन समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी केले आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील ज्युनिअर कॉलेजांमध्ये प्रवेशासाठी अकरावी ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया राबविण्यात येत आहे. प्रवेशासाठी १ लाख ७ हजार ३० जागा उपलब्ध आहेत. त्यापैकी पहिल्या फेरीत ३० हजार ५४४ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. दुसऱ्या फेरीत ६० हजार ५९९ जागा उपलब्ध होत्या. त्यासाठी ४६ हजार ७९४ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले होते. त्यापैकी २३ हजार १२० विद्यार्थ्यांचे प्रवेश जाहीर झाले आहेत. यातील २ हजार ४२८ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. उर्वरित विद्यार्थ्यांना ९ डिसेंबरपर्यंत प्रवेश घ्यायचे आहेत. शेवटच्या दिवशी आढावा घेऊन राज्यस्तरावर प्रवेशाच्या मुदतवाढीविषयी निर्णय घेण्यात येणार आहे. प्रवेशप्रक्रियेला मुदतवाढ नाही मिळाली, तर १० डिसेंबर रोजी तिसऱ्या फेरीसाठी प्रवेशक्षमता जाहीर करण्यात येणार आहे.

प्रवेशप्रक्रियेत मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर होतात. मात्र प्रत्यक्षात प्रवेश घेणारे विद्यार्थी कमी असतात. याविषयी शेंडकर म्हणाल्या, "पहिल्या फेरीत काही तांत्रिक कारणे निर्माण झाली होती. यामध्ये ऑनलाइन शुल्क भरण्यात अडचणी येत होत्या. परंतु प्रवेश कमी होण्याचे मुख्य कारण वेगळे आहे. प्रवेशप्रक्रियेत सहभागी झालेल्या असंख्य विद्यार्थ्यांना नामांकित महाविद्यालयांमध्येच प्रवेश हवा असतो. परंतु नामांकित महाविद्यालयांचे कटऑफ नव्वद टक्क्यांच्यादरम्यान असते. फेरीनुसार यामध्ये केवळ १ ते २ टक्क्यांचा फरक पडत असतो. त्यामुळे ज्यांना अगदी ८५ टक्केदेखील असतील, अशा विद्यार्थ्यांनी संबंधित महाविद्यालयांचे कटऑफ तपासून प्राधान्यक्रम भरणे आवश्यक आहे."

नामांकित महाविद्यालयांचा आग्रह न धरता मिळालेल्या गुणांवर कोणत्या महाविद्यालयामध्ये प्रवेश मिळेल याची चाचपणी करून घराजवळील महाविद्यालयामध्ये प्रवेश घेण्याचा प्रयत्न केला तर मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांचे प्रवेश होतील. याचा विद्यार्थी तसेच पालकांनीदेखील गांभीर्याने विचार करण्याची आवश्यकता असल्याचेदेखील शेंडकर यांनी स्पष्ट केले.

Pune Edition
Dec 7, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

महाराष्ट्र टाइम्स । पुणे । सोमवार, ७ डिसेंबर २०२० ३

# 'यूजीसी'तर्फे आता दरमहा फेलोशिप

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) दिल्या जाणाऱ्या विविध स्कॉलरशिप आता दर महिन्याला विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहेत. यापूर्वी फेलोशिप तीन महिन्यांतून एकदा एकत्रितपणे जमा व्हायच्या. करोनाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या परिस्थितीत विद्यार्थ्यांना आर्थिक बळ मिळण्यासाठी यूजीसीने हा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे संशोधक विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे.

यूजीसीचे सचिव प्रा. रजनीश जैन यांनी निर्णयाचे परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. युजीसीकडून दिल्या जाणाऱ्या फेलोशिप या तीन महिन्यांपासून एकदा बँक खात्यात जमा होत होती. मात्र, विद्यार्थ्यांना लागणाऱ्या आर्थिक मदतीची गरज लक्षात घेता, फेलोशिपची रक्कम दर महिन्याला डीबीटीद्वारे बँक खात्यात जमा होणार आहे. त्याचप्रमाणे पात्र विद्यार्थ्यांची जानेवारी, फेब्रुवारी, मार्च अशा तीन महिन्यांची; तसेच एप्रिल २०२० पासूनची फेलोशिपची रक्कम बँकेत जमा करण्यात येणार असल्याचे प्रा. जैन यांनी सांगितले आहे. यासोबतच ऑक्टोबर २०२० साठीची फेलोशिप रक्कम डीबीटीद्वारे बँक खात्यात पाठवण्यात आली असून, नोव्हेंबरची रक्कम येत्या काही दिवसांत जमा होईल, अशी माहिती प्रा. जैन यांनी परिपत्रकाद्वारे दिली आहे.



### 'ई-मेलवर तक्रार करा'

विद्यार्थ्यांना फेलोशिप मिळण्यात काही अडचणी असतील किंवा फेलोशिप मिळत नसल्यास, त्यांनी यूजीसीच्या fellowshiphelpline.ugc@gmail.com या ई-मेल आयडीवर तक्रारी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे १८००११६५७ या हेल्पलाइन क्रमांकावर कार्यालयीन दिवशी सकाळी ९ ते सायंकाळी ६ या वेळेत संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

Maharashtra Times: 7.12.2020



## News Paper Clippings During December 2020

Section: Education

# Pune varsity to introduce new subjects

**Dheeraj Bengrut**
puneletters@htlive.com

**PUNE:** The Savitribai Phule Pune University (SPPU) will be introducing two subjects on the "Constitution of India," as a credit course in the second year for all undergraduate students of Arts, Science and Commerce streams. From the next academic year of 2021-22, these two subjects will be added to the syllabus, said the administration.

The subjects will be compulsory for all the students at SPPU and affiliated colleges.

The decision was taken on the occasion of the death anniversary of Dr Babasaheb Ambedkar (on December 6).

The SPPU's department of anthropology has taken a lead in this project to design the syllabus of this credit course. It will be a two-credit course which will be taught in the second year of bachelor of Commerce, Arts and Science courses.

In these subjects around 30 hours lectures will be conducted for students, which will include assignments, practical, projects and others.

he responsibility of how to teach the subjects, what method to use, syllabus and instructions given to colleges will be taken care of by the law department of SPPU.

"It is noticed that students don't even know basic things about the Constitution of India, so we have decided to introduce these subjects. These include the Constitution of India and democratic election and governance. It will be compulsory for all the students of the second year from the academic year 2021-22," said Anjali Kurne, dean, humanities at SPPU.

Subhash Ware, a scholar, said, "It is an important decision taken by SPPU to introduce these new subjects in its syllabus. It will create awareness about the subject among the students about the principles by which a country is governed. I hope that students too take the subject seriously."

> It will be compulsory for all the students of the second year from the academic year 2021-22.
>
> **ANJALI KURNE,** dean, humanities at SPPU

> It will create awareness about the subject among the students about the principles by which a country is governed. They should take it seriously.
>
> **SUBHASH WARE,** scholar

Hindustan Times: 7.12.2020

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची आजपासून बॅकलॉगची परीक्षा



पुणे, दि. ७ (प्रतिनिधी) - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची बॅकलॉगची परीक्षा उद्यापासून (दि. ८)॰सुरू होणार आहे. पुणे विद्यापीठाचे सुमारे पावणेतीन लाख विद्यार्थी परीक्षा देणार असून, ही परीक्षा प्रॉक्टर्ड पद्धतीने होणार आहेत. यासाठी विद्यापीठाची यंत्रणा सज्ज झाली आहे. या परीक्षेपूर्वी सराव परीक्षा झाल्याने या परीक्षा सुरळीत होण्याची चिन्हे आहेत.

विद्यापीठाच्या दि. ८ ते २३ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या प्रथम वर्ष ते अंतिम वर्ष पूर्व विद्यार्थ्यांच्या विषय राहिलेल्या (बॅकलॉग) आणि श्रेणी सुधार परीक्षा या ऑनलाइन पद्धतीने होणार आहेत. विद्यार्थ्यांना अभ्यासाला लॉकडाऊनमुळे वेळ मिळाल्याने अनेक विषयांच्या परीक्षा १०० टक्के अभ्यासक्रमावर होणार आहे.

विद्यापीठाने ऑक्टोबरमध्ये अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाइन आणि ऑफलाइन पद्धतीने घेतल्या होत्या. त्यावेळी तांत्रिक अडचणींचा सामना करावा लागला होता. त्यामुळे आता या अडचणींची पुनरावृत्ती टाळण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील आहे. जवळपास पावणेतीन लाख विद्यार्थी या परीक्षा देणार

### गैरप्रकारावर लक्ष

▮ या परीक्षा पद्धतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने परीक्षार्थींवर लक्ष ठेवले जाणार आहे. त्यासाठी कॅमेऱ्याचा वापर करण्यात येणार असून, विद्यार्थ्यांची काही छायाचित्रेदेखील काढण्यात येतील. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्याव्यतिरिक्त अन्य हालचाली झाल्याचे आढळल्यास त्याबाबतचा इशारा विद्यार्थ्यांना दिला जाणार आहे. त्यामुळे या परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांना गैरप्रकार करता येणार नाही.

Saamana: 8.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# 'एमपीएससी'मार्फत व्हावी प्राध्यापक भरती

## भ्रष्टाचार बंद करण्यासाठी विद्यापीठ कायद्यात बदल करण्याची मागणी

**पुणे, ता. ७ : महाविद्यालयात एखाद्या विषयाची जागा निघाली, की त्यासाठी लाखो रुपयांचा भाव ठरतो. अनेक पात्रताधारक शेती विकून पैसे द्यायला तयार होतात. पण, ज्यांच्याकडे काहीच नाही ते या स्पर्धेत टिकत देखील नाहीत. प्राध्यापक भरती प्रक्रियेच्या नियमांत पारदर्शकता आणा आणि महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यात सुधारणा करून महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) ही भरती करण्याच्या मागणीने आता जोर धरला आहे.**

महाराष्ट्र सरकारने विद्यापीठ कायद्यात बदल करण्यासाठी समिती गठित केली आहे. त्यावर सूचना देण्यासाठी १३ डिसेंबरपर्यंत मुदत दिली आहे. त्यामुळे सेट, नेट, पीएचडी पात्रताधारक तरुण पुन्हा एकदा प्राध्यापक भरतीत पारदर्शकता आणावी यासाठी प्रयत्न करत आहेत.

विवेक नागरगोजे म्हणाले, "प्राध्यापक भरतीत पारदर्शकता नसल्याने भ्रष्टाचार होतो. त्यामुळे गुणवत्ता असलेले उमेदवार वंचित राहतात. सरकारने विद्यापीठ कायद्यात सुधारणा करून त्वरित 'एपीएससी'मार्फत प्राध्यापक भरती सुरू करावी. राज्यातील अनेक तरुणांनी याबाबत समितीकडे सूचना कराव्यात असे आवाहन केले आहे."

**इथे नोंदवा सूचना**

विद्यापीठ कायद्यात सुधारणा करण्यासाठी ऑनलाइन सूचना मागविण्यात आल्या आहेत. त्याची लिंक १३ डिसेंबरपर्यंत पुणे विद्यापीठाच्या unipune.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध केली आहे.

**काय आहे मागणी?**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६मध्ये कलम १०२, १०३, १०४ आणि १०५ हे विद्यापीठ आणि विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापकांसह इतर पदांच्या निवडीबाबत अधिकार दिले आहेत. ही सर्व कलमे रद्द करून त्याऐवजी भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद ३२० नुसार राज्य 'एमपीएससी'कडून प्राध्यापक भरतीची मागणी होत आहे.

महाराष्ट्र राज्य प्राध्यापक भरती संघर्ष कृती समितीचे कार्यकारी अध्यक्ष मनोज मुनेश्वर म्हणाले, "यूजीसी'ने भरती पारदर्शकपणे करावी असे निर्देश दिले आहेत, पण राज्य सरकार त्याकडे दुर्लक्ष करत आहे. बहुसंख्य संस्था राजकारणी लोकांच्या आहेत. त्यांना भरतीतून पैसा मिळतो. त्यामुळे यात सुधारणा केल्या जात नाहीत."

> सध्याच्या प्राध्यापक भरतीत पारदर्शकता येणे आवश्यक आहे. त्यासाठी 'एमपीएससी'तर्फे भरती हा एक मार्ग झाला. पण त्याचसोबत प्राध्यापकाची शिकविण्याची कला, संवाद, मानसशास्त्र याचीही इन कॅमेरा प्रात्यक्षिकाद्वारे चाचणी घेतली, तर गुणवत्ता वाढेल.
> – डॉ. अरुण अडसूळ, शिक्षण तज्ज्ञ

**सुमारे ५५०००** राज्यातील सेट-नेट पात्रताधारक

**सुमारे १५०००** रिक्त जागा

**१५०००** तासिका तत्त्वावर काम करणारे प्राध्यापक

**१०७७** ८ वर्षांत भरलेल्या जागा

Sakaal: 8.12.2020

# हो; पण आम्ही शिकवायचं काय?

## सुरू झालेल्या शाळांतील शिक्षकांपुढे प्रश्न; सरकारकडून स्पष्टीकरणाची अपेक्षा

**पुणे, ता. ७ :** राज्यातील २९ जिल्ह्यांतील नववी ते बारावीच्या शाळा काही प्रमाणात सुरू झाल्या; पण शाळेत शिकवायचे काय, याबाबत शिक्षकांत संभ्रम आहे. ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने आत्तापर्यंत झालेल्या अभ्यासाची उजळणी घ्यावी की पुढील अभ्यासक्रम पूर्ण करावा, असा प्रश्न शिक्षकांना पडला आहे.

कोरोनाच्या संकटामुळे आठ महिन्यांपासून शाळा बंद होत्या. मात्र ऑनलाइन आणि इंटरनेटची यंत्रणा नसलेल्या ठिकाणी ऑफलाइन पद्धतीने शिक्षण सुरू होते. दरम्यान, कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने राज्यातील नववी ते बारावीचे वर्ग सुरू करण्याला सरकारने मान्यता दिली. त्यानुसार २३ नोव्हेंबरला राज्यातील काही जिल्ह्यांमधील शाळा सुरू झाल्या. मागील आठवड्यातील आकडेवारीनुसार राज्यातील ११ हजार ३२२ शाळांमधील वर्ग सुरू झाले आहेत; परंतु शाळा सुरू होऊन चौदा दिवस झाले तरी अद्याप शाळेत काय शिकवावे, याबाबत शिक्षक पेचात आहेत. जून महिन्यापासून ऑनलाइन वर्ग सुरू झाले असले तरी प्रत्यक्षात शाळा नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस सुरू झाल्या आहेत. दिवाळीनंतर शाळा सुरू झाल्या म्हणजे नेहमीच्या पद्धतीने प्रथम सत्र संपले आणि दुसरे सत्र सुरू झाले, असे समजून त्याप्रमाणे शिकविले जात आहे; पण पहिल्या सत्राच्या समाप्तीबाबत सरकारने कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. या सत्राच्या मूल्यमापनावर विद्यार्थ्यांचा निकाल अवलंबून आहे. म्हणून नेमका कोणता अभ्यासक्रम शिकवणे अपेक्षित आहे, परीक्षेचे कामकाज काय अपेक्षित आहे, याबाबत स्पष्ट आदेश नसल्याने संस्थाचालक, मुख्याध्यापक व शिक्षक संभ्रमात आहेत.

**सरकारने धोरण स्पष्ट करावे : गणपुले**

दहावी आणि बारावीची परीक्षा वर्षभराच्या अभ्यासक्रमावर असते. त्यामुळे त्यांची अडचण नाही. अकरावी प्रवेश प्रक्रिया अद्याप पूर्ण नाही. त्यामुळे त्यांचे प्रत्यक्ष कामकाज सुरू होण्यासही अवधी आहे. त्यामुळे सरकारने प्रत्यक्ष सुरू झालेल्या वर्गात काय शिकवावे, याचे धोरण स्पष्ट करावे, अशी मागणी पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघाचे प्रवक्ते व माजी अध्यक्ष महेंद्र गणपुले यांनी केली आहे.

Sakaal: 8.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# राज्यामध्ये संविधान विषय अनिवार्य करण्याची मागणी

पुणे, ता. ७ : राज्यातील सर्व महाविद्यालयात ५० गुणांचा भारतीय संविधान हा सक्तीचा करा, अशी मागणी प्रयास मागासवर्गीय बहुउद्देशीय सामाजिक संस्थेने उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांच्याकडे केली आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पदवीच्या द्वितीय वर्षात भारतीय संविधान हा दोन क्रेडिटचा विषय अनिवार्य केला आहे. त्यामध्ये संविधानाची ओळख, निर्मिती, तरतुदी, सामाजिक व राजकीय भान निर्माण करणारा अभ्यासक्रम शिकवला जाणार आहे. याबाबत 'सकाळ'मध्ये वृत्त प्रकाशित झाले आहे. प्रयास संस्थेने नोव्हेंबर महिन्यात याबाबत उदय सामंत यांना भेटून राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविद्यालयात ५० गुणांचा भारतीय संविधान शिकवला जावा, अशी मागणी केली आहे. संस्थेचे अध्यक्ष सचिन शिंदे म्हणाले, "संविधानाबद्दल जनजागृती महत्त्वाची आहे, त्याची माहिती मिळाल्यास विद्यार्थ्यांच्या आचरणात बदल होईल. त्यासाठी हा महाविद्यालयीन शिक्षणात विषय अनिवार्य करणे आवश्यक आहे."

Sakaal: 8.12.2020

# पुन्हा सुधारित निकाल

## पुणे विद्यापीठाकडून अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना दिलासा

सकाळ IMPACT

पुणे, ता. ७ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षेत विद्यार्थ्यांना शून्य गुण मिळणे, परीक्षा देऊनही अनुपस्थित दाखवणे, असे प्रकार घडले आहेत. अशा सुमारे पाच ते सहा हजार विद्यार्थ्यांचा पुन्हा एकदा सुधारित निकाल १५ डिसेंबरपर्यंत जाहीर केला जाईल, असे परीक्षा विभागाने स्पष्ट केले. 'सकाळ'ने याबाबत 'शून्याचा तिढा कायम' या मथळ्याखाली विद्यार्थ्यांची कैफियत मांडली होती. त्यानंतर विद्यापीठाने सुधारित परिपत्रक आज जाहीर केले आहे.

पुणे विद्यापीठाने ऑक्टोबर महिन्यात अंतिम वर्षाची परीक्षा ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने घेतली. या परीक्षेच्या निकालात अनेकांना गैरहजर दाखविले, तर अनेकांना शून्य गुण व कमी गुण मिळाले असल्याचे समोर आले. यामुळे सुमारे सहा हजार विद्यार्थ्यांनी विद्यापीठाकडे तक्रारी केल्या. या विद्यार्थ्यांचे सुधारित निकाल ३ डिसेंबरपर्यंत जाहीर केले जातील, असे परीक्षा विभागाने सांगितले. पण, या सुधारित निकालात पूर्वीच्याच चुका कायम होत्या. त्यामुळे याविरोधात युवक क्रांती दलाने सोमवारी विद्यापीठात आंदोलन केले. परीक्षा विभागाला धारेवर धरून विद्यार्थ्यांना न्याय दिला पाहिजे, अशी मागणी करत कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना निवेदन दिले.

विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी परिपत्रक काढले आहे. विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या तक्रारींची दखल घेतली आहे. तांत्रिक प्रक्रियेचा अवलंब करीत सुमारे पाच ते सहा हजार विद्यार्थ्यांचे सुधारित निकाल १५ डिसेंबरपर्यंत जाहीर होतील. तसेच, या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या अजून काही तक्रारी असतील, तर त्यांनी osd.exm@unipune.ac.in यावर ९ डिसेंबरपर्यंत ई-मेल करावे, असे आवाहन काकडे यांनी केली आहे.

**बॅकलॉगच्या आजपासून परीक्षा**

अंतिम पूर्व वर्षातील बॅकलॉग आणि श्रेणीसुधार परीक्षा मंगळवारपासून सुरू होणार आहेत. गैरप्रकार टाळण्यासाठी ही परीक्षा ऑनलाइन असून, प्रॉक्टर्ड मेथडने होणार आहे. २३ डिसेंबरपर्यंत ही परीक्षा चालणार असून, २२०० विषयांसाठी अडीच लाख विद्यार्थी परीक्षा देणार आहेत.

**शून्याचा तिढा कायम**

Sakaal: 8.12.2020

# प्रवेशासाठी ७ हजार विद्यार्थ्यांची सहमती

## अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची दुसरी फेरी; ४६ हजार ७९४ जण पात्र

सकाळ EXCLUSIVE

पुणे, ता. ७ : अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या नियमित गुणवत्ता यादीत निवड झालेल्या सुमारे सात हजार ५५८ विद्यार्थ्यांनी (३२.६९ टक्के) प्रवेशासाठी संमती दर्शविली आहे. त्यातील सुमारे पाच हजार ३४२ विद्यार्थ्यांनी प्रवेशाची प्रक्रिया सुरू केली आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयात अकरावी प्रवेशासाठी इयत्ता अकरावी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीमार्फत प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे.

या अंतर्गत दुसरी नियमित गुणवत्ता यादी शनिवारी जाहीर करण्यात आली. या फेरीसाठी जवळपास ४६ हजार ७९४ विद्यार्थी पात्र ठरले होते. त्यातील २३ हजार १२० विद्यार्थ्यांची दुसऱ्या फेरीसाठी निवड झाली. त्यातील सात हजार ५५८ विद्यार्थ्यांनी 'कन्सर्न गिवेन'ची प्रक्रिया केली आहे. तर पाच हजार ३४२ विद्यार्थ्यांनी प्रवेशाची प्रक्रिया सुरू केली आहे. मात्र गुणवत्ता यादी जाहीर होऊन तीन दिवस उलटले, तरी देखील गुणवत्ता यादीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी १५ हजार ५६२ विद्यार्थ्यांनी अद्याप कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

दुसऱ्या फेरीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी ४४८ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष प्रवेश घेतला असल्याची माहिती केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिली आहे.



- अकरावी ऑनलाइन प्रवेशासाठी संकेतस्थळ : https://pune.११thadmission.org.in/
- दुसऱ्या नियमित गुणवत्ता यादीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी मुदत : ९ डिसेंबर (सायंकाळी पाच वाजेपर्यंत)

**विद्यार्थी-पालकांसाठी सूचना...**

- दुसऱ्या फेरीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी लॉगिनमध्ये जाऊन प्रोसिड फॉर ॲडमिशन करायचे आहे.
- विद्यार्थ्यांनी उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये प्रवेश निश्चित करणे
- पहिला पसंतीक्रम मिळाला असल्यास विद्यार्थ्यांना त्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेणे बंधनकारक आहे.
- पहिला पसंतीक्रम मिळूनही विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला नाही अथवा नाकारला तर अशा विद्यार्थ्यांना पुढील नियमित फेऱ्यांमध्ये संधी दिली जाणार नाही. त्यांना केवळ विशेष फेरीमध्ये संधी मिळू शकेल.
- विद्यार्थ्यांनी घेतलेला प्रवेश रद्द करायचा असल्यास संबंधित कनिष्ठ महाविद्यालयात विनंती करावी आणि आपला प्रवेश रद्द करून घ्यावा.
- घेतलेला प्रवेश रद्द केलेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढील नियमित फेऱ्यांसाठी प्रतिबंधित करण्यात येतील, अशा विद्यार्थ्यांना विशेष फेरीपर्यंत थांबावे लागेल.

Sakaal: 8.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# परीक्षा शुल्कवाढीला स्थगिती

## पुणे विद्यापीठाकडून लाखो विद्यार्थ्यांना दिलासा

पुणे, ता. ७ : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने प्रथम सत्राच्या परीक्षा शुल्कवाढीस स्थगिती आणली आहे. विद्यार्थ्यांकडून गतवर्षीप्रमाणे शुल्क घ्यावेत आदेश महाविद्यालयांना देण्यात आले आहेत.

पुणे विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून शैक्षणिक शुल्कात वाढ केली होती. मात्र, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर या शुल्कवाढीवर स्थगिती आणली होती. परंतु, परीक्षा शुल्काबाबत कोणताही निर्णय घेण्यात आला नव्हता.

ऑगस्ट महिन्यापासून महाविद्यालयांनी ऑनलाइन शिक्षण सुरू केले आहे. पहिल्या सत्रातील बराचसा अभ्यासक्रम शिकवून पूर्ण झाला आहे. त्यावर जानेवारी महिन्यात पहिल्या सत्रांची परीक्षा होण्याची शक्यता आहे. परीक्षांबाबत विद्यापीठाने स्पष्टता आणलेली नसली तरी महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क जमा करण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये गेल्यावर्षीपेक्षा जास्त शुल्क घेतले जात असल्याचे समोर आल्याने विद्यार्थ्यांनी या शुल्कवाढीस विरोध केला होता.

या शुल्कवाढीमध्ये प्रकल्प फीच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात वाढ केल्याचेही समोर आले आहे. याबाबतही खुलासा करण्याची मागणी केली होती.

एकीकडे कोरोनासारखे जागतिक महामारीचे संकट असताना दुसरीकडे ओला दुष्काळ, व कोरोना अशा दुहेरी संकटात पैशाची अडचण आहे. तसेच ऑनलाइन परीक्षा पद्धतीमध्ये खर्च कमी येत असताना, ऑफलाइन परीक्षेपेक्षा ऑनलाइन परीक्षा पद्धतीत शुल्क जास्त का? असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता.

> विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाची बैठक झाली. त्यामध्ये परीक्षा शुल्काच्या वाढीवर चर्चा करण्यात आली. कोरोनाच्या संकटामुळे विद्यार्थ्यांच्या पालकांपुढे आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थी हितासाठी २०२०च्या प्रथम सत्राच्या परीक्षांसाठी सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा शुल्कात व आनुषंगिक शुल्कात वाढ करण्यात आलेली नाही, असा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे महाविद्यालयांनी गेल्यावर्षी प्रमाणे शुल्क आकारावे.
> - डॉ. महेश काकडे

Sakaal: 8.12.2020

सजगतेसाठी निर्णय : विद्यार्थ्यांनी घाबरु नये, कुलगुरुंचे आवाहन

# प्रॉक्टर्ड परीक्षेची विद्यार्थ्यांना धास्ती

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे मंगळवारपासून (दि. ८) प्रथम वर्ष ते अंतिम पूर्व वर्षाच्या विद्यार्थ्यांची प्रॉक्टर्ड पध्दतीने परीक्षा घेतली जाणार आहे. त्यामुळे काही विद्यार्थ्यांनी धास्ती घेतली आहे. परंतु, विद्यार्थ्यांनी घाबरून जाऊ नये. परीक्षेतील सजगतेसाठी विद्यापीठाने 'प्रॉक्टर्ड'चा पर्याय स्वीकारला आहे, असे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी सांगितले.

विविध शैक्षणिक संस्थांकडून व प्रवेश पूर्व परीक्षांसाठी प्रॉक्टर्ड पध्दतीचा वापर केला जातो. त्यात व्हिडिओ प्रॉक्टर्ड, इमेज प्रॉक्टर्ड आणि ॲक्टिव्हिटी प्रॉक्टर्ड परीक्षा घेतल्या जातात. केवळ इमेज पॉक्टर्ड पध्दतीचा अवलंब केला जाणार आहे. त्यात परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्याला फ्रंट कॅमेरा असलेले इलेक्टॉनिक उपकरण आवश्यक आहे. परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्याच्या कॅमेराला एकच विद्यार्थी दिसणे अपेक्षित आहे. ऑनलाईन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्याच्या कॅमेरा समोर एका पेक्षा जास्त व्यक्ती आल्यास सॉफ्टवेअरकडून फोटो काढून घेतात.



- व्हिडिओ प्रॉक्टर्ड परीक्षेसाठी ब्रॅण्ड विर्डथ जास्त लागते. त्यामुळे व्हिडिओ प्रॉक्टर्ड परीक्षा घेणे सोपे नाही. या उलट इमेज प्रॉक्टर्ड परीक्षा घेणे सहज शक्य आहे. विद्यापीठाकडून आता परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या हालचाली टिपल्या जाणार आहेत.
- परिणामी विद्यापीठाला परीक्षेत झालेल्या गैरप्रकाराचे पुरावे जमा करता येतील. ॲक्टीव्हिटी प्रॉक्टर्ड मध्ये विद्यार्थी परीक्षा देताना मोबाईल, लॅपटॉप किंवा संगणकावर परीक्षे ऐवजी इतर कोणती विण्डो ओपन करतो का? हे तपासले जाते.

**एक ते दोन मिनिटांनी विद्यार्थ्यांचे फोटो काढणार**

> सजगतेच्या दृष्टिकोनातून विद्यापीठाने प्रॉक्टर्ड पध्दतीने परीक्षा घेण्याचा निर्णय घेतला आहे. एक ते दोन मिनिटांनी विद्यार्थ्यांचे फोटो काढले जातील. परंतु, योग्य मार्गाने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी घाबरून जाऊ नये.
> - डॉ. नितीन करमळकर, कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Lokmat: 8.12.2020

# प्रथम सत्र परीक्षा शुल्क वाढीस स्थगिती; विद्यापीठाचा निर्णय

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ७ - करोना पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने प्रथम सत्राच्या परीक्षा शुल्क वाढीस स्थगिती दिली आहे. विद्यार्थ्यांकडून गतवर्षीप्रमाणे परीक्षा शुल्क आकारावेत, अशा सूचना विद्यापीठाने महाविद्यालयांना दिल्या आहेत.

पुणे विद्यापीठाने यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून शैक्षणिक शुल्कात वाढ करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, करोना पार्श्वभूमीवर या शुल्कवाढीवर स्थगिती आणली होती. मात्र, परीक्षा शुल्काबाबत कोणताही निर्णय झाला नव्हता. परीक्षा शुल्काबाबत विद्यापीठाने कोणतीच स्पष्टता दिली नसल्याने महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क जमा करण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये गेल्यावर्षी पेक्षा जास्त शुल्क घेतले जात असल्याचे विद्यार्थ्यांच्या तक्रारी होत्या. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने परीक्षा शुल्कासंदर्भात स्पष्टीकरण करण्याची मागणी होत होती.

दरम्यान, करोना पार्श्वभूमीवर उद्‌भवलेल्या आर्थिक अडचणी विचारात घेऊन विद्यार्थी हितासाठी शैक्षणिक वर्ष २०२० मधील प्रथम सत्रामध्ये होणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांमधील परीक्षांची परीक्षा शुल्क व अन्य शुल्क यात कुठल्याही प्रकारची वाढ झालेली नाही. महाविद्यालयांनी मागील वर्षाप्रमाणेच शुल्क विद्यार्थ्यांकडून घ्यावेत, असे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले. त्यामुळे आता कोणत्याही महाविद्यालयांना परीक्षा शुल्काच्या नावाखाली कोणतेही शुल्क घेता येणार नाही.

Prabhat: 8.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# अव्वल शिक्षणाचा आराखडा तयार करू

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरे : रणजितसिंह डिसले यांचा मंत्रालयात सत्कार

लोकमत न्युज नेटवर्क

मुंबई : जागतिक स्तरावरील शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार रणजितसिंह डिसले यांना मिळाला याबद्दल अभिमान असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी काढले. डिसले यांच्यासारखे उपक्रम राबविणाऱ्या शिक्षकांना सोबत घेऊन शेवटच्या विद्यार्थ्यांपर्यंत अव्वल दर्जाचे शिक्षण पोहोचविण्यासाठी आराखडा तयार करू, असे मुख्यमंत्री म्हणाले.

**सृजनशील शिक्षक घडवणार**

या सत्काराला उत्तर देताना, जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांमधून जास्तीत जास्त तंत्रस्नेही व सृजनशील शिक्षक निर्माण करण्यासाठी मी प्रयत्न करणार, अशी भावना रणजीतसिंह डिसले यांनी व्यक्त केली.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज युनेस्को व लंडनस्थित वार्की फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दिला जाणारा ग्लोबल टीचर पुरस्कार मिळालेल्या रणजीतसिंह डिसले यांचा शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूलमंत्री बाळासाहेब थोरात, शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड, नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे, परिवहनमंत्री अनिल परब, पर्यटनमंत्री आदित्य ठाकरे उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले, डिसले यांनी शिक्षण क्षेत्रातील उत्तम कामाने हा पुरस्कार मिळविला आहे. पुरस्काराची रक्कम या स्पर्धेतील इतर नऊ स्पर्धकांमध्ये वाटून दिली. त्यांनी केलेले कार्य हे ध्येयवेडाचे उदाहरण आहे. मुंबई महानगरपालिकेतील शाळांमधून व्हर्च्युअल क्लासरूम ही संकल्पना राबविली गेली होती, याच धर्तीवर कोविडनंतरचे शिक्षण राज्यातील शेवटच्या विद्यार्थ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी डिसले यांच्यासारखे तंत्रज्ञानस्नेही आणि नावीन्यपूर्ण विचार करणाऱ्या शिक्षकांची मदत घेऊन शिक्षण विभागाने काम करावे, असेही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सुचविले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, बाळासाहेब थोरात, वर्षा गायकवाड यांनीही डिसले यांचे कौतुक केले.

Lokmat: 8.12.2020

# 'बॅकलॉग'च्या परीक्षा आजपासून

**'प्रॉक्टर्ड मेथड'चाही करणार वापर**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील अंतिम वर्षाचे विद्यार्थी वगळता अन्य वर्षाच्या राहिलेल्या विषयांच्या (बॅकलॉग) आणि श्रेणीसुधार परीक्षेला आज, मंगळवारपासुन (८ डिसेंबर) सुरुवात होत आहे. ही परीक्षा ऑनलाइन माध्यमातूनच होणार असून, तांत्रिक अडचणी येऊ नयेत यासाठी आवश्यक खबरदारी घेतली जात आहे. त्याचबरोबर गैरप्रकार टाळण्यासाठी या परीक्षेत 'प्रॉक्टर्ड मेथड'चाही वापर करण्यात येणार आहे.

अंतिम पूर्व स्तरावरील राहिलेल्या विषयांच्या (बॅकलॉग) आणि श्रेणीसुधार परीक्षा ८ ते २३ डिसेंबर दरम्यान घेण्यात येत आहेत. एकूण दोन लाख २८ हजार विद्यार्थ्यांनी राहिलेल्या विषयांच्या परीक्षेसाठी आणि श्रेणीसुधार परीक्षेसाठी १७ हजार विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या वेळापत्रकानुसार सकाळी नऊ ते बारा आणि सायंकाळी दोन ते पाच या वेळेत परीक्षा देता येईल.

परीक्षेदरम्यान तांत्रिक अडचणी येऊ नयेत, यासाठी आवश्यक ती खबरदारी घेण्यात आली आहे. तसेच ऑनलाइन बहुपर्यायी परीक्षा कशा पद्धतीने द्यावी याबाबत मार्गदर्शक सूचनाही विद्यार्थ्यांना देण्यात आल्या आहेत. एकादिवशी दोनपेक्षा जास्त विषयांची परीक्षा नसावी, या दृष्टीने नियोजन केले होते. परंतु, काही दिवशी तीन विषयांची परीक्षा असल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी केली आहे. त्यामुळे वेळापत्रकात काही बदल करण्यात आल्याचेही विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी सांगितले.

**सुधारित निकाल १५ डिसेंबरपर्यंत**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने घेतलेल्या अंतिम वर्षाच्या परीक्षेच्या निकालात काही विद्यार्थ्यांना शून्य गुण, कमी गुण दिल्याचे निदर्शनास आले. या सर्व विद्यार्थ्यांच्या तक्रारीची दखल घेऊन सुमारे पाच ते सहा हजार विद्यार्थ्यांचा सुधारित निकाल १५ डिसेंबरपर्यंत जाहीर करण्यात येईल. या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांना अजून काही अडचणी अथवा तक्रारी असतील, त्यांनी osd.exm@unipune.ac.in या ई-मेल आयडीवर नऊ डिसेंबरपर्यंत पाठवाव्यात असे आवाहन डॉ. महेश काकडे यांनी केले आहे.

**गैरप्रकार करणाऱ्यांवर कारवाई**

परीक्षा पारदर्शक वातावरणात होणार असून, कोणताही गैरप्रकार होणार नाही याची दक्षता बाळगण्यात येणार आहे. परीक्षा प्रॉक्टर्ड मेथडने होणार असल्याने विद्यार्थ्यांनी फ्रंट कॅमेरा असणाऱ्या उपकरणांचा वापर करावा. परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांचे फोटो काढण्यात येतील. त्यात विद्यार्थ्यांच्या संशयास्पद हालचाली दिसून आल्यास फोटोंची सखोल तपासणी करून गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचे विद्यापीठाकडून स्पष्ट करण्यात आले.

Maharashtra Times: 8.12.2020

पुढारी

# अंतिमपूर्व बॅकलॉग, श्रेणीसुधार परीक्षा आजपासून

पुणे : पुढारी वृत्तसेवा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे अंतिमपूर्व स्तरावरील राहिलेल्या विषयांची (बॅकलॉग) आणि श्रेणीसुधार परीक्षा मंगळवारी (दि. ८) सुरू होत आहे. अंतिम वर्ष परीक्षांप्रमाणेच ऑनलाइन होणाऱ्या या परीक्षांमध्ये तांत्रिक अडचणी येऊ नयेत, तसेच विद्यार्थ्यांना पारदर्शक पद्धतीने परीक्षा देता यावी यासाठी विद्यार्थ्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवणाऱ्या प्रॉक्टर्ड पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे. त्यामुळे परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांवर विद्यापीठाची करडी नजर राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

अंतिम वर्ष परीक्षांनंतर विद्यापीठाकडून अंतिमपूर्व स्तरावरील राहिलेल्या विषयांची (बॅकलॉग) आणि श्रेणीसुधार परीक्षा ८ ते २३ डिसेंबरदरम्यान घेण्यात येत आहे. २ लाख २८ हजार विद्यार्थी राहिलेल्या विषयांची, तर १७ हजार विद्यार्थी श्रेणीसुधार परीक्षा देणार आहेत. विद्यार्थ्यांना त्यांच्या वेळापत्रकानुसार सकाळी नऊ ते बारा आणि दुपारी दोन ते पाच या वेळेत परीक्षा देता येणार आहे, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली. परीक्षेचे वेळापत्रक तयार करताना एका दिवशी दोनपेक्षा जास्त विषयांची परीक्षा न घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र काही दिवशी तीन विषयांची परीक्षा असल्याची तक्रार विद्यार्थ्यांकडून करण्यात आली आहे. त्यामुळे वेळापत्रकात काही बदल करण्यात येणार असल्याचे डॉ. काकडे यांनी स्पष्ट केले.

Pune Edition
Dec 8, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

Maharashtra Times: 8.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

### विद्यापीठाचा सुधारित निकाल १५ डिसेंबरपर्यंत

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे ऑक्टोबर २०२० मध्ये घेतलेल्या अंतिम वर्षाच्या परीक्षेच्या निकालात त्रुटी राहिल्या आहेत. त्यामुळे सुमारे पाच ते सहा हजार विद्यार्थ्यांचे सुधारित निकाल येत्या १५ डिसेंबरपर्यंत जाहीर केले जाणार आहेत, असे विद्यापीठाच्या परीक्षा मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे. विद्यार्थ्यांची अंतिम वर्षाची परीक्षा घेण्यात आली. काही विषयांच्या परीक्षा तांत्रिक कारणास्तव पूर्ण न होणे, प्रश्न न दिसणे, वेळेपूर्वी प्रश्नपत्रिका सबमिट होणे आदी कारणांमुळे विद्यार्थ्यांना निकालांमध्ये अनुपस्थित किंवा शून्य व कमी गुण मिळाले असल्याचे निदर्शनास आले. निकालाव्यतिरिक्त विद्यार्थ्यांना कोणत्याही अडचणी किंवा तक्रारी असतील तर त्यांनी osd.exam@unipune.ac.in या मेल आयडीवर येत्या ९ डिसेंबरपर्यंत पाठवाव्यात, असे आवाहन काकडे यांनी केले आहे.

Lokmat: 8.12.2020

### अकरावीचे ५३४२ प्रवेश निश्चित

पुणे : अकरावीच्या प्रवेशप्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीत आतापर्यंत २३ हजार १२० विद्यार्थ्यांपैकी केवळ पाच हजार ३४२ विद्यार्थ्यांनीच प्रवेश निश्चित केले आहेत, तर १५ हजार ५६२ विद्यार्थ्यांनी प्रवेश जाहीर होऊनही प्रवेश निश्चित केलेला नाही. या विद्यार्थ्यांना नऊ डिसेंबरपर्यंत प्रवेश निश्चित करता येईल.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील महाविद्यालयांमध्ये एक लाख सात हजार ३० जागांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. पहिल्या फेरीत ३० हजार ५४४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. प्रवेश नियंत्रण समितीने शनिवारी दुसरी गुणवत्ता यादी जाहीर केली. दुसऱ्या फेरीतील १५ हजार ५६२ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठीची हालचालच केलेली नाही, असे प्रवेश समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी स्पष्ट केले.

Maharashtra Times: 8.12.2020

पुढारी

### साडेपाच हजार विद्यार्थ्यांकडून प्रवेश निश्चित

पुणे : अकरावीची दुसऱ्या फेरीची गुणवत्ता यादी शनिवारी (दि. ५)जाहीर झाल्यानंतर दोन दिवसांत ५ हजार ६०१ विद्यार्थ्यांनी विविध महाविद्यालयांमध्ये प्रवेश निश्चित केला आहे. ही यादी २३ हजार १२० विद्यार्थ्यांची होती. या फेरीतील प्रवेशासाठी प्रवेशासाठी ९ डिसेंबरपर्यंतची मुदत असून विद्यार्थ्यांचा प्रतिसाद अल्पच असल्याचे दिसत आहे.

**दुसऱ्या फेरीसाठी दोनच दिवस शिल्लक**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील महाविद्यालयांमध्ये अकरावीच्या १ लाख ७ हजार ३० जागांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. पहिल्या फेरीत ३० हजार ५४४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

दुसऱ्या फेरीतील ६० हजार ५९९ जागांसाठी अर्ज केलेल्या ४६ हजार ७९४ विद्यार्थ्यांपैकी २३ हजार १२० विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाले आहेत. त्यापैकी ७ हजार ५५८ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठीची मान्यता दिली आहे. अद्याप १५ हजार ५६२ विद्यार्थी प्रवेशासाठी महाविद्यालयांकडे फिरकलेच नसल्याचे स्पष्ट झाले, प्रवेश नियंत्रण समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिली.

My Pune Edition
Dec 8, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in



*News Paper Clippings During December 2020*

Section: Education

## पाच ते सहा हजार विद्यार्थ्यांचा १५ डिसेंबरपर्यंत सुधारित निकाल

### विद्यापीठाच्या परीक्षा विभागाकडून माहिती; निकालात त्रुटी आढळलेल्या विद्यार्थ्यांना दिलासा

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : अंतिम वर्ष परीक्षेच्या निकालात त्रुटी असलेल्या सुमारे ५ ते ६ हजार विद्यार्थ्यांचा सुधारित निकाल १५ डिसेंबरपर्यंत जाहीर करण्यात येणार असल्याचे विद्यापीठाच्या परीक्षा विभागाने परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले असून, निकालात त्रुटी असलेल्या विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

विद्यापीठाने ऑक?टोबरमध्ये घेतलेल्या अंतिम वर्ष ऑनलाइन आणि ऑफलाइन परीक्षांच्या निकालात त्रुटी असल्याचे आढळून आले. परीक्षा देऊनही गुणपत्रिकेवर अनुपस्थितीची नोंद, शून्य गुण किंवा कमी गुण असे प्रकार झाल्याने विद्यार्थ्यांपुढे शैक्षणिक भवितव्याचा प्रश?न निर्माण झाला. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून विद्यापीठाकडे तक्रारी करण्यात आल्या. तसेच विद्यार्थी संघटनांनीही विद्यापीठाच्या परीक्षा विभागाला धारेवर धरले. त्यानुसार विद्यापीठाकडून निकालाची पुनर्तपासणी करण्यात आली.

**युक्रांदचे आंदोलन**

अंतिम वर्ष परीक्षेच्या निकालातील त्रुटीबाबत युवक क्रांती दलाने विद्यापीठात सोमवारी आंदोलन केले. कार्यवाह संदीप बर्वे, राज्य संघटक जांबुवंत मनोहर, पुणे जिल्हा अध्यक्ष सचिन पांडुळे, उपाध्यक्ष कमलाकर शेटे, नीलम पंडित आदी या वेळी उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या समस्यांची दखल घेऊन त्या तातडीने सोडवण्याची मागणी करण्यात आली.

**सुधारित निकाल दिसत नसल्याची तक्रार**

विद्यार्थ्यांच्या तक्रारींनंतर विद्यापीठाकडून निकालांची पुनर्तपासणी करण्यात आली. त्यानंतर जवळपास सहा हजार विद्यार्थ्यांचा सुधारित निकाल देण्यात आला आहे. मात्र विद्यापीठाने दिलेला सुधारित निकाल लॉगीनमध्ये दिसत नसल्याचे काही विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.

या संदर्भात विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी परिपत्रक प्रसिद्ध केले. परीक्षा मंडळाच्या निर्णयानुसार तांत्रिक प्रक्रियेचा अवलंब करीत सुमारे ५ ते ६ हजार विद्यार्थ्यांचे सुधारित निकाल १५ डिसेंबरपर्यंत जाहीर होतील. तसेच या व्यतिरिक्त विद्यार्थ्यांना अजून काही अडचणी अथवा तक्रारी असल्यास त्यांनी त्या osd.exZ@unipune.ca.in या ई मेलवर ९ डिसेंबरपर्यंत पाठवाव्यात असे परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

लोकसत्ता Tue, 08 December 2020
https://epaper.loksatta.com/c/56876824

## परीक्षा शुल्कवाढीला विद्यापीठाची स्थगिती

### करोनाच्या पार्श्वभूमीवर निर्णय

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : करोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने प्रथम सत्राच्या परीक्षा शुल्कवाढीला स्थगिती दिली आहे. विद्यार्थ्यांकडून गेल्यावर्षीप्रमाणेच शुल्क आकारण्याची स्पष्ट सूचना विद्यापीठाने महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे दिल्या आहेत. त्यामुळे महाविद्यालयांना परीक्षा शुल्काच्या नावाखाली जास्तीचे शुल्क घेता येणार नाही.

यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून विद्यापीठाने शैक्षणिक शुल्कात वाढ करण्याचा निर्णय घेतलेला निर्णय 'करोना'मुळेच स्थगित केला. मात्र परीक्षा शुल्कात वाढ करण्याबाबत निर्णय घेण्यात आला नव्हता. परीक्षा शुल्काबाबत विद्यापीठाकडून कोणतीच स्पष्टता देण्यात आली नसल्याने महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क भरण्याची सूचना केली होती. मात्र महाविद्यालयांकडून गेल्यावर्षीपेक्षा जास्त शुल्क घेतले जात असल्याच्या विद्यार्थ्यांच्या तक्रारी होत्या. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने परीक्षा शुल्कासंदर्भात निर्णय घेतला आहे. करोनाच्या पार्श्वभूमीवर उद्भवलेल्या आर्थिक अडचणी विचारात घेऊन विद्यार्थी हितासाठी शैक्षणिक वर्ष २०२० मधील प्रथम सत्रामध्ये होणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांमधील परीक्षांची परीक्षा शुल्क व अन्य शुल्क यात कुठल्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही. महाविद्यालयांनी मागील वर्षाप्रमाणेच शुल्क विद्यार्थ्यांकडून घ्यावे, असे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी स्पष्ट केले आहे.

लोकसत्ता Tue, 08 December 2020
https://epaper.loksatta.com/c/56876879

## News Paper Clippings During December 2020

Section: Education

# अकरावीचे प्रवेश मंदगतीने

**पुणे :** अकरावीच्या दुसऱ्या गुणवत्ता यादीत प्रवेश जाहीर झालेल्या २३ हजार १२० विद्यार्थ्यांपैकी ५ हजार ३४२ विद्यार्थ्यांनी आतापर्यंत प्रवेश निश्चित केले आहेत. त्यामुळे प्रवेश मंदगतीने होत असून, प्रवेशासाठी ९ डिसेंबरपर्यंतची मुदत आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील महाविद्यालयांमध्ये १ लाख ७ हजार ३० जागांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. पहिल्या फेरीत ३० हजार ५४४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. सामाजिक व आर्थिक मागास आरक्षणाला सर्वोच्च न्यायालयाने सप्टेंबरमध्ये स्थगिती दिल्याने जवळपास तीन महिने प्रवेश प्रक्रिया स्थगित करावी लागली होती. अखेर सामाजिक व आर्थिक मागास आरक्षणातील (एसईबीसी) विद्यार्थ्यांना खुल्या गटातून प्रवेश देण्याच्या राज्य शासनाच्या निर्णयानंतर अकरावीची प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीने शनिवारी दुसरी गुणवत्ता यादी जाहीर केली. दुसऱ्या फेरीतील ६० हजार ५९९ जागांसाठी अर्ज केलेल्या ४६ हजार ७९४पैकी २३ हजार १२० विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाले आहेत. त्यापैकी ७ हजार ५५८ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठीची मान्यता दिली आहे. १५ हजार ५६२ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठीची हालचालच केलेली नाही. चार विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारण्यात आला आहे, अशी माहिती प्रवेश समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिली.

लोकसत्ता Tue, https

Pune Mirror: 8.12.2020

City | Pune Mirror | Tuesday, December 8, 2020 | 3

# Final-year SPPU students protest over result issues

**57 pupils came to the varsity campus on Monday to ask for various discrepancies to be sorted**

| Sukhada.Khandge @timesgroup.com
TWEETS @Sukhadak_Mirror

Various final-year students from Nashik, Ahmednagar and Pune districts participated in a protest at Savitribai Phule Pune University (SPPU) on Monday over issues with the declared results and demanded that their rectified results be given to them as soon as possible.

This comes after the students waited for almost a week for the university administration to sort out the issues but it failed to do so.

Students from various courses had complained to SPPU about various discrepancies in the results as soon as it was out. It was found that there are many students had been marked either absent or have received zero marks in at least one subject despite appearing for the examination, due to which their result was shown failed.

At least 57 students on Monday visited the university campus and protested about the fact that the issue they pointed had not been rectified.

Kamalakar Shete, one of the protesting students, said, "We have to submit our results for our further studies and also for various job offers and if the results show that we failed, then we would not be able to submit it anywhere."

He added, "Many students have complained that the marks received for particular subject is either zero or they have been marked absent even after the examination was attempted and submitted successfully."

After various complaints SPPU had informed that after verifying them, the university would rectify the results and submit it to students by December 3. Also, it had taken the decision that average marks for all the subjects would be taken into consideration and in case a test which is marked absent or a score of zero, that subject would be marked accordingly.

SPPU has now also assured the aggrieved students that an email id will be given to them where they can now send more complaints if and when they crop up.

The 57 students signed and presented a complaint letter to SPPU officials, while also informing them that there are many more with similar grievances who were not able to come to the university. Therefore, SPPU should take the demands into consideration and verify and rectify the result as soon as possible, they said.

A third-year BSc student said, "I had submitted all the papers successfully without any problem and the software showed that the entire process had been completed. Despite this, I have received zero marks in one subject. While I have complained to SPPU, I am yet to get any response. Therefore I signed the complaint letter today and hope that we get the result soon."

Mahesh Kakade, director, examination department, SPPU, said, "While students have complained about the technical glitches which they faced and if it has resulted in the final marksheet showing they have failed, then the same would be verified and results will be given to students by December 15. Results of at least 5,000 students will be accordingly rectified before the given date."





Many students were marked either absent or received zero marks in at least one subject despite appearing for the exam

# SPPU to send corrected mark sheets by Dec 15

**Ardhra.Nair@timesgroup.com**

**Pune:** Some 50 students from Savitribai Phule Pune University (SPPU) staged a protest on the campus on Monday alleging errors in their results for the final-year examinations held in October.

The agitation was called off after the university officials met the students and assured them of some action.

"We would reissue the corrected mark sheets to around 6,000 students by December 15," Mahesh Kakade, director of department of examination and evaluation, said.

Students can still write to the examination department at osd.exam@unipune.ac.in till December 9, a circular on Monday said.

The Times of India: 8.12.2020



News Paper Clippings During December 2020

Section: Education

# SPPU to calculate average marks for students contesting results



Members of the Yuvak Kranti Dal stage a protest at the SPPU on Monday demanding students be allowed to re-evaluate their TY results. SHANKAR NARAYAN/HT PHOTO

Dheeraj Bengrut
puneletters@htlive.com

PUNE: In a bid to resolve the problems and technical issues related to the results of final year students of the Savitribai Phule Pune University (SPPU) and its affiliated colleges, the university has decided to give average marks for a subject in which a student has some issues.

At least 5,000 students have registered complaints with the SPPU as regardes the results, and currently, 3,000 students are still demanding their results be rechecked.

"We got a total of 5,064 complaints through various mediums from students about issues with their results, of which 2,000 have been resolved. Still there are 3,000 students who have demanded a recheck and re-evaluation of papers where most have either got zero marks. For all these students we have decided to give average marks from the total of all the other subjects s/he appeared for," said Mahesh Kakade, director of the board of examination and evaluation.

AT LEAST 5,000 STUDENTS HAVE REGISTERED COMPLAINTS WITH THE SPPU AS REGARDS RESULTS, AND CURRENTLY, 3,000 ARE STILL DEMANDING THEIR RESULTS BE RECHECKED

From October 12, SPPU started its final year exams in 3,300 subjects, for which 2.5 lakh students enrolled.

For the offline exams, 113 centres were identified where physical exams were conducted in Pune, Nashik and Ahmednagar districts. These exams are of 50 marks each with multiple choice questions (MCQ) over a duration of one hour.

"Today we have issued a circular in which an email id is given for students to register their complaints related to results – osd.exam@unipune.ac.in. We are taking note of each and every complaint registered and try to resolve it as early as possible. We will try to announce the revised results by December 15," added Kakde.

Meanwhile, on Monday, a protest was held by the Yuvak Kranti Dal at the SPPU main building against the mismanagement of the SPPU administration. Later, the students held a meeting with SPPU vice-chancellor Prof Nitin Karmalkar.

Kamlakar Shete, Pune city vice-president of the Yuvak Kranti Dal said, "Thousands of students are facing problems to get their incorrect results revised by the examination department.

"Students want to take admission for further studies but due to wrong results they cannot do anything."

Hindustan Times: 8.12.2020

# Govt: FYJC can start when 75% seats fill up

**Vinamrata.Borwankar @timesgroup.com**

**Mumbai:** Education department said junior colleges can begin the academic year for class XI students as soon as they fill up 75% seats. With Covid-19, junior colleges were seeking clarity from government before starting online classes.

School education secretary Vandana Krishna said, "Junior colleges can start whenever they are ready. There is no need to wait for government directions."

While the rulebook allows junior colleges to start classes when they fill up 75% seats, college heads were unsure about directives this year. Usually, education department after the second or third round of admissions, allows junior colleges to start.

Teachers had yet not started online sessions as State Council of Educational Research and Training is hosting them for FYJC students.

The Times of India: 8.12.2020

# किरकोळ तक्रारी वगळता, विद्यापीठ परीक्षा सुरळीत

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे प्रथम वर्ष व अंतिम पूर्व वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या बॅकलॉग व श्रेणी सुधार परीक्षा किरकोळ तक्रारी वगळता मंगळवारपासून सुरळीतपणे सुरू झाल्या. त्याचप्रमाणे परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना अडचणी येऊ नयेत; यासाठी विद्यापीठाने नव्या दोन सुविधा सुरू केल्या आहेत.

पुणे विद्यापीठातर्फे पुणे, अहमदनगर व नाशिक या तीन जिल्ह्यांमधील सुमारे २ लाख १८ हजार विद्यार्थ्यांची ऑनलाइन परीक्षा येत्या ८ ते २३ डिसेंबर या कालावधीत घेतली जाणार आहे. अंतिम वर्षाच्या परीक्षेमध्ये झालेल्या गोंधळाच्या पार्श्वभूमीवर मंगळवारपासून होणारी परीक्षा सुरळीतपणे पार पडणार का ? याकडे सर्वांचे लक्ष होते.

अंतिम वर्षाची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना परीक्षा देऊन पेपर सबमिट केलेला असताना अनुपस्थित दाखविण्यात आले. त्यामुळे विद्यापीठाने पेपर दिलेल्या प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या लॉगीन मध्ये दिलेला पेपर व्यवस्थित सबमिट झाला किंवा नाही याची माहिती २४ तासाच्या आत उपलब्ध करून दिली जाणार आहे. स्वतःच्या पीआरएन नंबर चा वापर करूनच परीक्षा देता येणार आहे. **- महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

Lokmat: 9.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# शिक्षक भरतीचा मार्ग मोकळा

## शिक्षणमंत्री गायकवाड : राज्यात सहा हजार जागा भरणार

▪ लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई/यवतमाळ : राज्यातील प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक सेवक भरतीचा मार्ग मोकळा झाला असून, पवित्र पोर्टलच्या माध्यमातून सहा हजार शिक्षक सेवक भरतीची प्रक्रिया सुरू होत असल्याचे शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी सांगितले.

दहा वर्षांच्या प्रतीक्षेनंतर सुरू झालेली भरतीची प्रक्रिया कोरोनामुळे अडखळली होती. मात्र आता कोरोना काळातील पदभरतीवरील बंदीतून पवित्र पोर्टल प्रक्रिया वगळण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत. त्यामुळे अर्धवट असलेली भरती प्रक्रिया पूर्णत्वास जाणार आहे. शासनाने पारदर्शकपणे भरती करण्यासाठी २०१७ मध्ये अभियोग्यता चाचणी घेतली होती. त्यात पात्र ठरलेल्या पावणेदोन लाख उमेदवारांना पवित्र पोर्टलवर घेऊन त्यांच्याकडून शाळांचे प्राधान्यक्रम भरून घेतले होते. मुलाखतीविना होणाऱ्या प्राथमिक शिक्षकांच्या भरतीसाठी यादी जाहीर करून साडेतीन हजार उमेदवारांना प्रत्यक्ष नियुक्तीही दिली. मात्र मुलाखतीसह होणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षकांच्या भरतीची प्रक्रिया बाकी होती. त्यातच कोरोनाचा कहर सुरू झाल्याने शासनाच्या वित्त विभागाने मे २०२० मध्ये सर्व प्रकारच्या पदभरतीवर बंदी घातली होती.

Lokmat: 9.12.2020

# पदवी प्रमाणपत्र अर्जासाठी ३१ डिसेंबरपर्यंत मुदत

पुणे, ता. ८ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ११८वा पदवीप्रदान समारंभ यंदा मार्च-एप्रिल २०२१ मध्ये होणे अपेक्षित आहे.

विद्यापीठाच्या ११८व्या पदवीप्रदान समारंभासाठी पदवी आणि पदविका प्रमाणपत्र प्राप्त करू इच्छिणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. अर्जाचा नमुना, शुल्क इत्यादीबाबतची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या 'convocation.unipune.ac.in' या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यापीठाचे पदवी किंवा पदविका प्रमाणपत्र मिळविण्याकरिता विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने अर्ज योग्य शुल्कासह भरल्यानंतर अंतिम वर्षाच्या गुणपत्रिकेची छायांकीतप्रत संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक आहे, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली आहे.



**प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज करण्याबाबतचा तपशील**

- नियमित शुल्कासह : ३१ डिसेंबर २०२० पर्यंत
- विलंब शुल्कासह : १ ते १५ जानेवारी २०२१ पर्यंत

Sakaal: 9.12.2020

# प्रथम सत्र परीक्षेच्या शुल्कवाढीला स्थगिती

पुणे : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने प्रथम सत्र परीक्षेच्या शुल्कवाढीस स्थगिती आणली आहे. विद्यार्थ्यांकडून गतवर्षीप्रमाणे शुल्क घ्यावे, असे आदेश महाविद्यालयांना देण्यात आले आहेत.

पुणे विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून शैक्षणिक शुल्कात वाढ केली होती. मात्र, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर या शुल्कवाढीवर स्थगिती आणली होती. परंतु, परीक्षा शुल्काबाबत कोणताही निर्णय घेण्यात आला नव्हता. ऑगस्ट महिन्यापासून महाविद्यालयांनी ऑनलाईन शिक्षण सुरू केले आहे. पहिल्या सत्रातील बराचसा अभ्यासक्रम शिकवून पूर्ण झाला आहे. त्यावर जानेवारी महिन्यात पहिल्या सत्राची परीक्षा होण्याची शक्यता आहे. परीक्षेबाबत विद्यापीठाने स्पष्टता आणलेली नसली, तरी महाविद्यालयांनीं विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क जमा करण्याचे आदेश दिले आहेत. यामध्ये गेल्यावर्षी पेक्षा जास्त शुल्क घेतले जात असल्याचे समोर आल्याने विद्यार्थ्यांनी या शुल्कवाढीस विरोध केला होता. या शुल्कवाढीमध्ये प्रकल्प शुल्काच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात वाढ केल्याचेही समोर आले आहे. याबाबतही खुलासा करण्याची मागणी केली होती.

ऑनलाईन परीक्षा पद्धतीमध्ये खर्च कमी येत असताना, ऑफलाईन परीक्षा पेक्षाही ऑनलाईन परीक्षा पद्धतीसाठी शुल्क जास्त का? असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. त्यामुळे पुणे विद्यापीठाच्या परीक्षा मंडळाची बैठक झाली. त्यामध्ये परीक्षा शुल्कवाढीवर चर्चा करण्यात आली. कोरोनाच्या संकटामुळे विद्यार्थ्यांच्या पालकांपुढे आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थी हितासाठी २०२० च्या प्रथम सत्राच्या परीक्षांसाठी सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा शुल्कात व अनुषंगिक. शुल्कात वाढ करण्यात आलेली नाही, असा निर्णय घेण्यात आला.

Kesari: 9.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# बॅकलॉग श्रेणीसुधार परीक्षेस सुरुवात

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून अंतिम वर्ष वगळता इतर सर्व वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या बॅकलॉग विषयांच्या आणि श्रेणीसुधार परीक्षांना मंगळवारपासून सुरुवात झाली. परीक्षेदरम्यान तांत्रिक अडचणी आल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी केली आहे. मात्र, संस्कृत विषय वगळता इतर विषयांच्या परीक्षेदरम्यान अडचणी आल्या नसल्याचे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

परीक्षेतील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी 'प्रॉक्टर्ड' पद्धतीचा वापर ऑनलाइन परीक्षेदरम्यान केला जात आहे. पहिल्या दिवशी दोन सत्रांमध्ये ३१ हजार २३९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिल्याची माहिती विद्यापीठाकडून देण्यात आली. लॉ अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेदरम्यान प्रश्नपत्रिका सबमिट न होणे, एरर येणे असे प्रकार झाले.

'संस्कृत वगळता अन्य विषयाच्या परीक्षेत अडचणी आल्याच्या तक्रारी आलेल्या नाहीत. विद्यार्थ्यांना अडचणी आल्या असल्यास तक्रार नोंदवण्याची सुविधा त्यांच्या लॉगइनमध्येच आहे. प्रश्नपत्रिका सबमिट झाली की नाही, याची माहिती लॉगइनमध्येच मिळणार आहे. तक्रारींची पडताळणी करुन, योग्य तो निर्णय घेतला जाईल,' असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून सांगण्यात आले.

Maharashtra Times: 9.12.2020

# परीक्षा शुल्कवाढीस विद्यापीठाची स्थगिती

पुणे : करोनाच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाने प्रथम सत्राच्या परीक्षा शुल्कवाढीस स्थगिती दिली आहे. विद्यार्थ्यांकडून गेल्या वर्षीप्रमाणे परीक्षा शुल्क आकारावे, अशी स्पष्ट सूचना विद्यापीठाने महाविद्यालयांना केली आहे.

विद्यापीठाने यंदाच्या शैक्षणिक वर्षापासून शैक्षणिक शुल्कात वाढ करण्याचा निर्णय घेतला होता. मात्र, करोनाच्या पार्श्वभूमीवर शुल्कवाढीस स्थगिती दिली होती. मात्र, परीक्षा शुल्काबाबत कोणताही निर्णय घेण्यात आला नव्हता. परीक्षा शुल्काबाबत विद्यापीठाने कोणतेही स्पष्टीकरण न दिल्याने महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क जमा करण्याचे आदेश दिले. परंतु, गेल्या वर्षीपेक्षा जास्त शुल्क घेतले जात असल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी केली होती. यंदा प्रथम सत्रामध्ये होणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांमधील परीक्षांचे परीक्षा शुल्क व अन्य शुल्क यात कुठल्याही प्रकारची वाढ करण्यात आलेली नाही. महाविद्यालयांनी मागील वर्षाप्रमाणेच शुल्क विद्यार्थ्यांकडून घ्यावे, असे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी स्पष्ट केले आहे.

Maharashtra Times: 9.12.2020

# No hike in exam fee this academic year: SPPU

TIMES NEWS NETWORK

Pune: The Savitribai Phule Pune University (SPPU) has decided to not hike the exam fee this academic year for those studying at the university or its affiliated colleges.

The director of examination at SPPU, Mahesh Kakade, said, "Considering the pandemic situation, the SPPU has decided that there will not be any hike in the exam fees or any other charges related to the examinations. The charges for this for the 2020-21 academic year will be the same as the previous year."

The examination fee varies for around 300 courses provided by the varsity and the colleges affiliated to it.

The university had earlier issued a notification stating that there would be no hike in the tuition fee for the 2020-21 academic year. owing to the pandemic situation.

The varsity, however, had not taken any decision on the exam fee then.

Students had complained to the university regarding some colleges that were charging higher examination fees than earlier. As a result, the Savitribai Phule Pune University issued a circular to all the colleges to charge the same fee.

The Times of India: 9.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# विद्यार्थ्यांचे म्हणणे विद्यापीठाला अमान्य

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून अंतिमपूर्व राहिलेल्या विषयांची (बॅकलॉग) आणि श्रेणीसुधार परीक्षा मंगळवारपासून सुरू झाली. या परीक्षेदरम्यान तांत्रिक अडचणी आल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. मात्र एखादा अपवाद वगळता परीक्षेदरम्यान अडचणी आल्या नसल्याचे सांगत विद्यापीठाने विद्यार्थ्यांचे म्हणणे अमान्य केले.

अंतिम वर्षाच्या परीक्षांनंतर आता अंतिम पूर्व राहिलेल्या विषयांची (बॅकलॉग) आणि श्रेणीसुधार परीक्षा ८ ते २३ डिसेंबरदरम्यान होणार आहे. विद्यार्थ्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवणाऱ्या प्रॉक्टर्ड पद्धतीचा वापर या ऑनलाइन परीक्षेदरम्यान केला जात आहे. मंगळवारी पहिल्या दिवशी दोन सत्रांमध्ये ३१ हजार २३९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिल्याची माहिती विद्यापीठाने दिली.

परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणी आल्या. विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेदरम्यान प्रश्नपत्रिका सबमिट न होणे, एरर येणे असे प्रकार झाले. यात विद्यार्थ्यांचा तासभर वाया गेला अशी माहिती विद्यार्थ्यांनी दिली.

> संस्कृत विषय वगळता अन्य परीक्षेदरम्यान अडचणी आल्याच्या तक्रारी आल्या नाहीत. विद्यार्थ्यांना अडचणी आल्या असल्यास तक्रार नोंदवण्याची सोय त्यांच्या लॉगीनमध्येच करून देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी त्या प्रणालीद्वारेच तक्रार नोंदवायची आहे. तसेच परीक्षेनंतर प्रश्नपत्रिका सबमिट झाली की नाही याची माहिती लॉगीनमध्येच मिळणार आहे. त्यासाठीची प्रणाली विकसित करण्यात आली आहे.
>
> – डॉ. महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

लोकसत्ता Wed, 09 December 2020 https://epaper.loksatta.com/c/56891980

# व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने

## स्मार्टफोनद्वारेही नोंदणी, कागदपत्र पडताळणी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया संपूर्णपणे ऑनलाइन पद्धतीने करण्याचा निर्णय राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी सेल) घेतला आहे. त्यात प्रवेश जाहीर झाल्यावर विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चितीही ऑनलाइनच करावी लागणार असून, स्मार्टफोनद्वारे अर्ज नोंदणी आणि कागदपत्र पडताळणी करण्याची सुविधा देण्यात आली आहे.

सीईटी सेलकडून राबवण्यात येणाऱ्या अभियांत्रिकी-तंत्रज्ञान पदवी (बी.ई./बी.टेक.), औषधनिर्माणशास्त्र पदवी (बी.फार्म), औषधनिर्माणशास्त्र पदविका (फार्म.डी.), वास्तुकला पदवी (बी.आर्च.), हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी, अभियांत्रिकी-तंत्रज्ञान पदव्युत्तर पदवी (एम.ई./एम.टेक.) औषधनिर्माणशास्त्र पदव्युत्तर पदवी (एम. फार्म), वास्तुकला पदव्युत्तर पदवी (एम.आर्च.)

व्यवस्थापनशास्त्र पदव्युत्तर पदवी (एमएबीए), संगणकशास्त्र पदव्युत्तर पदवी (एमसीए) अशा अभ्यासक्रमांसाठी संपूर्ण ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राहणार आहे. त्याबाबत सीईटी सेलने परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांना सुविधा केंद्रावर जाण्याची गरज राहणार नाही. प्रवेशासाठी ऑनलाइन नोंदणी करून आवश्यक कागदपत्रे अपलोड करायची आहेत. त्यानंतर ई पडताळणी केंद्राद्वारे कागदपत्र पडताळणी करून त्याची माहिती विद्यार्थ्यांना कळवण्यात येईल. त्याची पावतीही विद्यार्थ्यांना त्यांच्या लॉगीनमध्ये दिली जाईल. कागदपत्र पडताळणीमध्ये समस्या आल्यास, त्याचे निराकरण करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे जमा करण्याची सोय प्रणालीमध्ये उपलब्ध असेल. प्राथमिक गुणवत्ता यादी जाहीर करून त्यावर आक्षेप विद्यार्थी नोंदवू शकतील. त्यानंतर अंतिम गुणवत्ता यादी आणि अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता जाहीर करण्यात येईल. या प्रवेश क्षमतेच्या आधारावर केंद्रीय फेरीत (कॅप राउंड) सहभागी होऊन पसंतीच्या महाविद्यालयाचे पर्याय निवडता येतील, असे परिपत्रकाद्वारे स्पष्ट करण्यात आले आहे.

### पहिल्या पसंतीच्या महाविद्यालयात प्रवेश घेणे अनिवार्य

निवड यादीत पर्यायातील पहिल्या क्रमांकाचे महाविद्यालय प्रवेशासाठी मिळाल्यास प्रवेश घेणे अनिवार्य आहे. त्यासाठी पहिल्या पसंतीला ऑटोफ्रीज केले जाणार आहे. तसेच प्रवेश जाहीर झाल्यावर विद्यार्थ्यांना निश्चित करावा लागेल. या प्रक्रियेनंतर महाविद्यालयांनी प्रसिद्ध केलेल्या वेळापत्रकानुसार आवश्यक कागदपत्रांसह महाविद्यालयात जाऊन शुल्क भरून प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी लागेल.



लोकसत्ता Wed, 09 December 2020 https://epaper.loksatta.com/c/56898498

# पाचवी ते आठवीचे वर्ग जानेवारीपासून

## एप्रिलअखेरीस बोर्डाच्या परीक्षा



मृणालिनी नानिवडेकर : सकाळ न्यूज नेटवर्क

मुंबई, ता. ८ : कोविडबाधितांचा आकडा समाधानकारकरीत्या खाली येत असल्याने शाळांचे दरवाजे पाचवी ते आठवीतल्या मुलांसाठी एक जानेवारीपासून उघडण्याचे निश्चित झाल्याचे समजते. बारावी व दहावीच्या या विद्यार्थी जीवनातील अत्यंत महत्त्वाच्या परीक्षा एप्रिल-मेमध्ये घेण्यात येणार आहेत.

या शैक्षणिक वर्षात अभ्यासक्रमात कपात केली जाणार असून, १५ एप्रिलपर्यंत शिकवण्यात येणाऱ्या अभ्यासक्रमावर परीक्षा घेण्यात येईल. सीबीएसई आणि आयसीएसई अभ्यासक्रमांबाबत केंद्र शासनाने असेच धोरण ठरवले असून केंद्र आणि राज्य सरकारदरम्यान यासंदर्भात सातत्याने चर्चा सुरी आहे.

सध्या नववी आणि दहावीचे जे वर्ग सुरू झाले आहेत. त्यात पहिल्या आठवड्यात तीन लाख तर दुसऱ्या आठवड्यात ५ लाख विद्यार्थ्यांची दररोज उपस्थित होती. शालेय शिक्षण विभाग या विद्यार्थ्यांची आरोग्य चाचणी करत असून, एकाही विद्यार्थ्याने आजवर 'कोविड'बद्दल

पान ६ वर »

> बारावीची परीक्षा एप्रिलअखेरीस, तर दहावीची परीक्षा मेच्या पहिल्या आठवड्यात घेण्याचा मानस आहे. कोकणात मॉन्सून लवकर सुरू होतो, त्यामुळे परीक्षा उशिरात उशिरा मेच्या पहिल्या आठवड्यात होईल. राज्याच्या बहुतांश भागांत शाळा सुरू होऊ शकल्या अन् संसर्गाच्या एकाही घटनेची तक्रार आलेली नाही.
>
> – वर्षा गायकवाड, शालेय शिक्षणमंत्री

# पाचवी ते आठवीचे वर्ग जानेवारीपासून

» पान १ वरून

तक्रार केलेली नाही. नववी, दहावी, अकरावी, बारावी या चार वर्गांची राज्य अभ्यासक्रमाअंतर्गत पटसंख्या ५५ लाख आहे. त्यातील १७ लाख विद्यार्थी अकरावीचे आहेत. या वर्गाचे प्रवेश अद्याप पूर्ण झालेले नाहीत. ३८ लाख विद्यार्थ्यांपैकी जवळपास ३५ टक्के उपस्थितीचा आकडा गाठला गेल्यानंतर शाळा सुरु करण्याबाबत केंद्राच्या सूचना आहेत. अकरावीचे ७५ टक्के प्रवेश पूर्ण झाल्यानंतर त्या त्या संस्थेत वर्ग सुरु होतील. या संदर्भात पालकांना विश्वासात घेऊनच पुढील पावले टाकली जातील. महाराष्ट्र सरकारच्या २३ नोव्हेंबरच्या निर्णयानुसार ९ वी ते १२ वीचे वर्ग सुरु झाले. त्यासंदर्भात महाराष्ट्राने तयार केलेल्या नियमावलीची केंद्राने प्रशंसा केली आहे. केंद्रीय शिक्षण मंत्री प्रकाश जावडेकर हे सातत्याने महाराष्ट्राच्या शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांच्या संपर्कात असतात.

सरकारने तयार केलेल्या नियमावलीची काटेकोर अंमलबजावणी शिक्षकांनी सुरु ठेवली आहे. हा प्रतिसाद अत्यंत उत्साहवर्धक असल्याचे शालेय शिक्षण विभागाचे अधिकारी वंदना कृष्णा आणि विशाल सोळंकी यांचे मत असल्याचे समजते. मुलांची काळजी घेऊन यासंबंधात पावले उचलली जातील असे एका वरिष्ठ संबंधिताने नमूद केले. दहावी आणि बारावीचा अभ्यासक्रम कमी कसा करायचा याबद्दलही तज्ज्ञसमिती विचारविनिमय करीत आहे.

Sakal 9.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education



टिळक रस्ता : 'गोष्टीतून शिकूया' या पुस्तकाचे प्रकाशन कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते झाले. शेजारी नेहा दामले.

# नेहा दामले यांच्या 'गोष्टीतून शिकूया' पुस्तकाचे कुलगुरूंच्या हस्ते प्रकाशन

पुणे : महाराष्ट्रीय मंडळाच्या शिक्षण विभागाच्या संचालिका नेहा दामले यांच्या 'गोष्टीतून शिकूया' या पुस्तकाचे प्रकाशन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या हस्ते नुकतेच झाले. या वेळी नाट्य अभिनेते श्रीरंग गोडबोले, एअर मार्शल (निवृत्त) भूषण गोखले आणि महाराष्ट्रीय मंडळाचे सरचिटणीस धनंजय दामले उपस्थित होते. या पुस्तकात लहान मुलांसाठी भारतीय संस्कृतीतील मूल्य आणि संस्कार या विषयावर लिखाण केले आहे. मुलांना आवडतील अशा गोष्टी स्वरूपात त्याची मांडणी करण्यात आली आहे. "शिक्षण क्षेत्रात अनेक वर्ष काम केल्याने विद्यार्थ्यांना अगदी छोट्या छोट्या बालकांना खूप जवळून बघण्याची संधी मला मिळाली. मुले कशी शिकतात, कोणकोणत्या गोष्टींचा त्यांचा मनावर परिणाम होतो, संस्कारातून त्यांचे व्यक्तिमत्त्व कसे घडले जाते, याचा कानमंत्र जणू या पुस्तकातून देण्याचा प्रयत्न केला असल्याचे दामले यांनी सांगितले.

Sakaal: 9.12.2020

# १२ हजार विद्यार्थ्यांची प्रवेशाकडे पाठ

पुणे : अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीत १२ हजार ६४२ विद्यार्थ्यांनी ज्युनिअर कॉलेजांमध्ये प्रवेश घेण्याकडे पाठ फिरवली आहे. ९ हजार ९५४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

केंद्रीय अकरावी प्रवेश नियंत्रण समितीमार्फत पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरातील ३०४ शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांतील १ लाख ७ हजार ३० जागांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. पहिल्या फेरीत ३० हजार ५४४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले. दुसऱ्या फेरीची गुणवत्ता यादी शनिवारी जाहीर झाली होती. त्यात ६० हजार ५९९ जागांसाठी अर्ज केलेल्या ४६ हजार ७९४ विद्यार्थ्यांपैकी २३ हजार १२० विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाले. या विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित करण्यासाठी ९ डिसेंबरची मुदत देण्यात आली होती. या फेरीत ९ हजार ९५४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला, १२ हजार ६४२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला नाही. १३ विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारण्यात आला. आता प्रवेश प्रक्रियेतील तिसऱ्या फेरीसाठीच्या उपलब्ध जागा आणि पुढील वेळापत्रक गुरुवारी जाहीर करण्यात येणार आहेत, अशी माहिती समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिली.

Maharashtra Times: 10.12.2020

पुढारी

# बॅकलॉग परीक्षेत तांत्रिक अडथळे

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे अंतिम पूर्व स्तरावरील राहिलेल्या विषयांची (बॅकलॉग) आणि श्रेणीसुधार परीक्षेला मंगळवार दि. ८ पासून सुरूवात झाली. पहिल्या दिवशी ३१ हजार २३९ विद्यार्थी उपस्थित होते. परीक्षेदरम्यान तांत्रिक अडचणी आल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. मात्र एखादा अपवाद वगळता परीक्षेदरम्यान कोणत्याही अडचणी आल्या नसल्याचे विद्यापीठ प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

अंतिम वर्षाच्या परीक्षांनंतर आता अंतिम पूर्व राहिलेल्या विषयांची (बॅकलॉग) आणि श्रेणीसुधार परीक्षा ८ ते २३ डिसेंबरदरम्यान होणार आहे. विद्यार्थ्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवणाऱ्या प्रॉक्टर्ड पद्धतीचा वापर या ऑनलाइन परीक्षेदरम्यान केला जात आहे. परीक्षेदरम्यान विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणी आल्या. विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना परीक्षेदरम्यान प्रश्नपत्रिका सबमिट न होणे, एरर येणे असे प्रकार झाले. यात विद्यार्थ्यांचा बराचसा वेळ वाया गेला अशी माहिती विद्यार्थ्यांनी दिली.

> परीक्षेदरम्यान संस्कृत विषय वगळता अन्य विषयांना कोणत्याही अडचणी आल्या नाहीत. अडचणी आल्यास तक्रार नोंदवण्याची सोय स्टूडंट प्रोफाईलमध्ये करून दिली आहे. विद्यार्थ्यांनी त्या प्रणालीद्वारेच तक्रार नोंदवायची आहे. तसेच परीक्षेनंतर प्रश्नपत्रिका सबमिट झाली की नाही याची माहिती लॉगीनमध्येच मिळणार आहे. त्यासाठीची प्रणाली विकसित करण्यात आली आहे. आलेल्या तक्रारींची पडताळणी करून तक्रार आलेल्या विद्यार्थ्यांच्या तक्रारी सोडविण्यात येतील.
>
> – डॉ. महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

Pune Edition
Dec 9, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2020*

**Section: Education**

### पदवी प्रमाणपत्रांसाठी ऑनलाइन अर्ज

पुणे, दि. ९ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ११८ वा पदवीप्रदान समारंभ येत्या मार्च-एप्रिलमध्ये होणार आहे. यासाठी पदवी व पदविका प्रमाणपत्र प्राप्त करू इच्छिणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. अर्ज ऑनलाइनद्वारे करणे आवश्यक आहे. अर्जाचा नमुना, शुल्काची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. पदवी व पदविका प्रमाणपत्रासाठी नियमित शुल्कासह अर्ज करण्यासाठी ८ ते ३१ डिसेंबर असा कालावधी आहे. तर विलंब शुल्कासह १ ते १५ जानेवारी अशी मुदत आहे. प्रमाणपत्र मिळविण्यासाठी ऑनलाइन अर्ज शुल्कासह भरल्यानंतर अंतिम वर्षाच्या गुणपत्रिकेची छायांकित प्रत अपलोड करणे आवश्यक आहे.

Prabhat: 10.12.2020

### बॅकलॉग परीक्षेतही तांत्रिक अडचणी?

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ९ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून अंतिम पूर्व राहिलेल्या विषयांची (बॅकलॉग) आणि श्रेणीसुधार परीक्षा मंगळवारपासून सुरू झाली. पण, यादरम्यान तांत्रिक अडचणी आल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. मात्र, एखादा अपवाद वगळता अडचणी आल्या नाहीत, असा दावा विद्यापीठाने केला आहे.

अंतिम वर्षाच्या परीक्षांनंतर आता अंतिम पूर्व राहिलेल्या विषयांची (बॅकलॉग) आणि श्रेणीसुधार दि.८ ते २३ डिसेंबरदरम्यान होत आहे. पहिल्या दिवशी दोन सत्रांमध्ये ३१ हजार २३९ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. यावेळी विधी अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेदरम्यान प्रश्नपत्रिका सबमिट न होणे, एरर येणे असे प्रकार झाले. यात तासभर वेळ गेल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. दरम्यान, संस्कृतवगळता अन्य परीक्षेदरम्यान अडचणी आल्याच्या तक्रारी आल्या नाहीत. विद्यार्थ्यांना अडचणी आल्या असल्यास तक्रार नोंदवण्याची सोय त्यांच्या लॉग-इनमध्येच करण्यात आली आहे.

Prabhat: 10.12.2020

### दुसऱ्या फेरीअखेर ४१ हजार प्रवेश

प्रभात वृत्तसेवा

**अकरावी प्रवेश : ६६ हजार ९ जागा अद्याप रिक्त**

**पुणे, दि. ९ - अकरावी प्रवेशाच्या दुसऱ्या नियमित फेरीअखेर ४१ हजार २१ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले. अद्यापही ६६ हजार ९ जागा रिक्त आहेत. प्रवेशाकडे विद्यार्थ्यांनी पाठ फिरविल्याचे उघड होऊ लागले आहे.**



पुणे विभागात ३०४ कनिष्ठ महाविद्यालयांत १ लाख ७ हजार ३० जागा आहेत. यासाठी १ लाख १ हजार १५७ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली. विद्यार्थ्यांची सोयीच्या व नामांकित महाविद्यालयात प्रवेशासाठी स्पर्धा लागली आहे. कॅपअंतर्गत प्रवेशासाठी ८४ हजार २८४ जागा उपलब्ध झाल्या. त्यातील ३३ हजार १६३ विद्यार्थ्यांचे प्रवेश झाले असून ५१ हजार १२१ जागा रिक्त आहेत. इन हॉऊस कोट्याअंतर्गत ७ हजार ४८७ जागा होत्या. त्यातील ४ हजार ९० जागांवर प्रवेश झाले असून ३ हजार ३९७ जागा रिक्त आहेत. अल्पसंख्याक कोट्यांतर्गत १० हजार ६८३ जागा होत्या. त्यातील २ हजार ७०० जागांवर प्रवेश निश्चित झाले असून ७ हजार ९८३ जागा रिक्त आहेत. व्यवस्थापन कोट्यांतर्गत ४ हजार ५७६ जागा दर्शवल्या होत्या. त्यातील १ हजार ६८ जागांवर प्रवेश झाले असून ३ हजार ५०८ जागा रिक्त आहेत.

दुसऱ्या नियमित फेरीसाठी ४६ हजार ७९४ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. त्यातील २३ हजार १२० जणांना प्रवेश जाहीर झाला होता. त्यातल्या १० हजार ६५८ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी इच्छुकता दर्शविली. मात्र, त्यातील ९ हजार ९५४ जणांनीच प्रवेश घेतला. ५५ विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द झाले आहेत.

१३ विद्यार्थ्यांनी प्रवेश नाकारले आहेत. १२ हजार ४५२ विद्यार्थ्यांनी प्रवेशाला काहीच प्रतिसाद दिला नाही. आता गुरुवारी (दि.१०) प्रवेशाच्या नियमित तिसऱ्या फेरीसाठी रिक्त जागांचा तपशील जाहीर होणार आहे. प्रवेशाचे पुढील वेळापत्रकही जाहीर होण्याची शक्यता आहे.

Prabhat: 10.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

**Section: Education**

### अकरावीला ४१ हजार प्रवेश निश्चित

#### दुसऱ्या फेरीत ४३ टक्के विद्यार्थ्यांना संधी; साडेबारा हजार जणांची पाठ

**पुणे, ता. ९ : पुणे व पिंपरी-चिंचवडमधील कनिष्ठ महाविद्यालयांमधील अकरावी प्रवेशाच्या दुसऱ्या फेरीत ९ हजार ५४ जणांनी प्रवेश निश्चित केला आहे. तर पहिल्या आणि दुसऱ्या फेरीत ४१ हजार २१ जणांनी प्रवेश घेतला असल्याचे अकरावी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीने स्पष्ट केले. दुसऱ्या फेरीत पात्र ठरलेल्या केवळ ४३ टक्के विद्यार्थ्यांनीच प्रवेश घेतला आहे.**

**तिसऱ्या फेरीचे वेळापत्रक आज**

अकरावी प्रवेशाच्या दोन फेऱ्या पूर्ण झाल्यानंतर आता तिसऱ्या फेरीच्या प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक गुरुवारी (ता. १०) सकाळी ११ वाजता ऑनलाइन जाहीर केले जाणार आहे. यामध्ये रिक्त असलेल्या ६६ हजार जागांवर प्रवेश घेता येणार आहे.

राज्य सरकारने ठप्प झालेली अकरावी प्रवेशाच्या दुसऱ्या फेरीची प्रवेश प्रक्रिया २६ नोव्हेंबरपासून सुरू केली होती. विद्यार्थ्यांनी पसंतीक्रम भरल्यानंतर दुसऱ्या फेरीसाठी ४६ हजार ७९४ विद्यार्थी पात्र ठरले होते, त्यातील २३ हजार १२० जणांची या फेरीसाठी निवड झाली. त्यामध्ये १० हजार ६५८ विद्यार्थ्यांनी संमती दर्शवली; पण त्यापैकी ९ हजार ९५४ विद्यार्थ्यांचे प्रवेश अखेरच्या दिवसापर्यंत निश्चित झाले आहेत. १३ विद्यार्थ्यांचे अर्ज नाकारले आहेत, ५५ जणांनी प्रवेश रद्द केला तर १२ हजार ४६२ विद्यार्थ्यांनी दुसऱ्या फेरीच्या प्रवेशास कोणताही प्रतिसाद दिलेला नाही.

पहिल्या आणि दुसऱ्या फेरीमध्ये कॅप राऊंडमधून ३३ हजार १६३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. इन हाउस कोट्यातून ४ हजार ९०, अल्पसंख्याक कोट्यातून २ हजार ७००, तर व्यवस्थापन कोट्यातून १ हजार ६८ जण अशा ४१ हजार ३२ जणांनी प्रवेश घेतला आहे.

| | |
|---|---|
| ३०४ महाविद्यालये | १०७०३० क्षमता |
| ४१०२१ प्रवेश निश्चित | |

**कोटानिहाय रिक्त जागा**

| | |
|---|---|
| ५११२१ कॅप राउंड | ७९८३ अल्पसंख्याक |
| ३३९७ इनहाउस | ३५०८ व्यवस्थापन |
| ६६००९ एकूण रिक्त जागा | |

Sakaal: 10.12.2020

### शिक्षक भरतीचे वेळापत्रक जाहीर करण्याची मागणी

**पुणे, ता. ९ :** राज्य सरकारने आता संचमान्यतेचे काम सुरू केले आहे; त्याचा परिणाम शिक्षक भरतीवर होऊ नये. जेवढ्या जागा ठरल्या आहेत; त्याची त्वरित भरती करण्यासाठी त्याचा कार्यक्रम जाहीर करावा, अशी प्रतिक्रिया शिक्षक संघटनांनी व्यक्त केली आहे.

पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष हरिश्चंद्र गायकवाड म्हणाले, "शिक्षक भरती रखडली असल्याने अर्जदार वैतागलेले आहेत. यापूर्वी कोर्ट कचेऱ्या व इतर कारणांमुळे भरती लांबलेली होती, आता अशा अडचणी येऊ नयेत यासाठी शासनाने त्वरित वेळापत्रक जाहीर करून प्रक्रिया पूर्ण करावी व संस्थांना संबंधित शिक्षकांची नावे पाठवून द्यावेत. भरतीचे वेळापत्रक जाहीर करून लवकर भरती करावी."

महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन महासंघाचे सचिव संतोष फासगे म्हणाले, "एकीकडे शिक्षक भरतीची घोषणा केलेली असताना दुसरीकडे शाळेतील विद्यार्थी संचाची मान्यतेची प्रक्रिया शिक्षण विभागाने सुरू केली आहे. कोरोनामुळे अनेक विद्यार्थी शाळेत गेले नाहीत, त्यामुळे विद्यार्थी संख्या कमी झाल्याचा परिणाम शिक्षक भरतीवर होऊ नये. सरकारने भरतीचे वेळापत्रक जाहीर केल्यास उमेदवारांना दिलासा मिळेल."

Sakaal: 10.12.2020

## News Paper Clippings During December 2020

### Section: Education

कायद्याचे उल्लंघन : कारवाई होऊ शकते

# पीडीएफ वृत्तपत्र सोशल मीडियावर प्रसारित करणे बेकायदा

■ लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** लॉकडाऊनच्या सुरुवातीला दररोज सकाळी वर्तमानपत्राला मुकणारे लोक आवर्जून आपल्या पसंतीच्या वृत्तपत्राची पीडीएफ आवृत्ती वाचायचे. वृत्तपत्रापासून कोरोनाचा संसर्ग होत नाही आणि वृत्तपत्रे सुरक्षित आहेत, हे अध्ययनातून स्पष्ट झाल्यानंतरही आजही अनेक जण सर्रास बेकायदेशीरपणे सुवाह्य प्रलेख स्वरूपातील (पीडीएफ) वृत्तपत्र डाऊनलोड करतात. तथापि, असे करणे व्हॉटस्ॲप ग्रुप्ससारख्या ॲडमिन्स आणि सदस्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई होऊ शकते, असा इशारा तज्ज्ञांनी दिलेला असताना हा प्रकार चालू आहे.

सर्वोच्च न्यायालयातील वरिष्ठ वकील पवन दुग्गल यांनी म्हटले आहे की, विनापरवानगी वृत्तपत्रांच्या पीडीएफ आवृत्तीच्या सशुल्क सामग्रीचे परिसंचारण कायद्याचे उल्लंघन ठरते. मालकाच्या परवानगीशिवाय वृत्तपत्राच्या डिजिटल आवृत्तीचे परिसंचारण करणे, मालकीहक्क अधिनियम (कॉपीराईट ॲक्ट) तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमातील (इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ॲक्ट) कलम ४३ चे उल्लंघन होय.

माहिती तंत्रज्ञान अधिनियमातील (इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ॲक्ट) कलम ४३ यात स्पष्ट म्हटले आहे की, एखाद्याने संगणकीत स्रोतातील एखादी माहिती नष्ट करण्याचा किंवा हटविणे किंवा त्याचे मूल्य वा उपयोगिता कमी करण्याचा प्रयत्न करणे, अवैध आहे. असे करणारी व्यक्ती तिच्या या कृतीने प्रभावित झालेल्या व्यक्तीला नुकसानभरपाई देण्यास उत्तरदायी आहे. वृत्तपत्र वाचण्याची ही पद्धत जोखमीची आहे. कारण वृत्तपत्रातील सामग्रीशी एखादी व्यक्ती छेडछाड करण्याची शक्यता आहे.

### ...तर ग्रुप ॲडमिन दोषी

इंडियन न्यूजपेपर सोसायटीनेही (आयएनएस) स्पष्ट केले आहे की, अनधिकृतपणे ई-पेपर किंवा यातील माहिती सामग्रीची नक्कल करून सोशल मीडियावर प्रसारित करणे बेकायदेशीर आहे. पीडीएफ वृत्तपत्र संपर्क-संदेशात्मक व्यासपीठावर प्रसारित केल्यास ग्रुप ॲडमिन दोषी असेल. अशा लोकांना कठोर कारवाईसोबत जबर दंडही सोसावा लागू शकतो.

Lokmat: 10.12.2020

# तक्रार नोंदविण्यासाठी विद्यार्थ्यांना आठ पर्याय

■ लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने प्रथम वर्ष ते अंतिमपूर्व वर्षातील बॅकलॉगच्या परीक्षेसाठी ऑनलाइन प्रणालीत सुधारणा केली असून परीक्षा दिल्यानंतर निकालासाठी अधिक काळ वाट पाहावी लागणार नाही, अशी यंत्रणा उभी केली आहे. विद्यार्थ्यांना परीक्षेत अडचणी आल्यास त्यांना त्यांच्या 'स्टुडंट लॉगइनमध्ये' आठ पर्यायांपैकी एक पर्याय निवडून आपली तक्रार नोंदवता येणार आहे.

प्रथम वर्ष ते अंतिम पूर्व वर्षातील बॅकलॉग व श्रेणीसुधारची परीक्षा मंगळवारपासून सुरू झाली. विद्यापीठातर्फे घेतलेल्या अंतिम वर्ष परीक्षेत अनेक तांत्रिक अडचणीमुळे विद्यार्थ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला होता. विद्यापीठ हेल्पलाईनवर संपर्क साधल्यानंतर फोन न उचलणे, योग्य उत्तर न मिळणे यामुळे विद्यार्थी हैराण झाले होते.

बॅकलॉग किंवा श्रेणी सुधार परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना अडचणी आल्यास त्यांना आपल्या स्टुडंट लॉगइनमध्ये जाऊन 'ऑनलाइन एक्झाम ग्रेव्हेयन्स' यावर क्लिक केल्यास अडचणींचे पर्याय दिसणार आहेत. त्यात लॉगइन न होणे, वेगळ्या विषयाचा पेपर येणे, अचानक लॉग आउट होणे, रिलॉगीन न होणे, प्रश्नांमध्ये आकृती न दिसणे, विषयाबाहेरचे प्रश्न येणे, पेपर सबमीट न होणे आणि इतर असे आठ पर्याय दिसतील. त्यातील एक पर्याय निवडून विद्यार्थ्यांना तक्रार नोंदविता येईल, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

Lokmat: 10.12.2020

# अकरावीत दुसऱ्या फेरी अखेर ४१ हजार प्रवेश

■ लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रातील अकरावी प्रवेशासाठी ऑनलाईन केंद्रीय प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे. दुसऱ्या प्रवेश फेरी अखेरपर्यंत ४१ हजार २१ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. आता प्रवेशाची तिसरी फेरी सुरू होणार असून उर्वरित ६६ हजार जागांवर विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येणार आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमिवर अकरावीची प्रवेश प्रक्रिया उशीर सुरू झाली. त्यातच सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षणाला स्थगिती दिल्यामुळे प्रवेश प्रक्रिया ठप्प झाली. परंतु, एसईबीसी आरक्षणा शिवाय प्रवेश प्रक्रिया सुरू करण्याबाबत शासनाने परिपत्रक जाहीर केल्यानंतर अकरावीच्या दुसऱ्या फेरीस सुरूवात झाली दुसऱ्या फेरीतून प्रवेशासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी ९ डिसेंबरपर्यंत मुदत दिली होती. त्यानुसार आत्तापर्यंत ४१ हजार २१ विद्यार्थ्यांना अकरावीत प्रवेश मिळाला आहे. पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रातील ३०४

**अकरावीत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांची संख्या आणि रिक्त जागा**

- **कॅप राऊंड मधील प्रवेश :** ३३ हजार १६३, कॅप राऊंड रिक्त जागा : ५१ हजार १२१
- **इन हाऊसचे प्रवेश :** ४ हजार ९० ; इनहाऊसच्या रिक्त जागा : ३ हजार ३९७
- **अल्पसंख्याचे प्रवेश :** २ हजार ७०० ; अल्पसंख्याकच्या रिक्त जागा : ७ हजार ९८३
- **व्यवस्थापनचे प्रवेश :** १ हजार ६८ ; व्यवस्थापनच्या रिक्त जागा: ३ हजार ५०८

Lokmat: 10.12.2020



News Paper Clippings During December 2020

Section: Education

डॉ. प्रशांत नारनवरे : प्रलंबित अर्जांबाबत महाडीबीटीचा घेतला आढावा

# विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून वंचित ठेवणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाई

■ लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देणे हे महाविद्यालयांचे कार्यच आहे. मात्र, एखाद्या महाविद्यालयाच्या दिरंगाईमुळे विद्यार्थी शासनाच्या शिष्यवृत्ती किंवा इतर लाभापासून वंचित राहिल्यास अशा महाविद्यालयांवर कारवाई करण्याचे प्रस्तावित करावेत, अशा सक्त सूचना राज्याचे समाज कल्याण आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी बुधवारी दिल्या.

पुणे विभागातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर या जिल्ह्यातील समाज कल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा डॉ. नारनवरे यांनी आढावा घेतला.

यावेळी सहआयुक्त भारत केंद्रे, सहआयुक्त वृषाली शिंदे, उपायुक्त प्रशांत चव्हाण, प्रादेशिक उपायुक्त बाळासाहेब सोळंकी यांच्यासह पुणे विभागातील सर्व सहायक आयुक्त व सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी उपस्थित होते.

### महाडीबीटीचा आढावा

डॉ. नारनवरे यांनी आढावा बैठकीत शिष्यवृत्तीच्या प्रलंबित अर्जांबाबत महाडीबीटीचा आढावा घेतला. तसेच कोरोनासाठी दिलेल्या शासकीय वसतीगृहे, निवासी शाळा सुरु करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना, रमाई घरकुल योजना, कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबळीकरण योजना, ५०० क्षमतेची नव्याने उभारण्यात येणारे वसतीगृह, समाज कार्य महाविद्यालय, अनुदानित वसतीगृह, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक विकास योजना, ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्व असलेल्या स्थळांचा विकास करणे, आंतरजातीय विवाह प्रोत्साहन अनुदान आदी योजनाबाबत आढावा घेतला.

Lokmat: 10.12.2020

पुढारी

# दुसऱ्या फेरीत ९ हजार ९५४ विद्यार्थ्यांचेच प्रवेश

## अकरावीसाठी तिसऱ्या फेरीतील जागांचा तपशील आज




**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

अकरावी प्रवेशप्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीत केवळ ९ हजार ९५४ विद्यार्थ्यांनीच प्रवेश घेतला आहे. १२ हजार ४६२ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी पुढील फेरीचा पर्याय निवडल्याचे दिसत आहे.

अकरावीच्या केंद्रीय प्रवेश नियंत्रण समितीमार्फत पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील ३०४ शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांतील १ लाख ७ हजार ३० जागांसाठी प्रवेशप्रक्रिया सुरू आहे. पहिल्या फेरीत ३० हजार ५४४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. दुसऱ्या फेरीची गुणवत्ता यादी शनिवारी (दि. ५) जाहीर झाली होती. त्यात ६० हजार ५९९ जागांसाठी अर्ज केलेल्या ४६ हजार ७९४ विद्यार्थ्यांपैकी २३ हजार १२० विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाले. या विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित करण्यासाठी ९ डिसेंबरची मुदत होती.

समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, दुसऱ्या फेरीत ९ हजार ९५४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. या फेरीत १२ हजार ४६२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला नाही. १३ विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारण्यात आला. आता प्रवेशप्रक्रियेतील तिसऱ्या फेरीसाठीच्या उपलब्ध जागा गुरुवारी (दि. १०) जाहीर होणार असून पुढील फेऱ्यांचे वेळापत्रक त्यानंतर जाहीर करण्यात येणार आहे.

Pune Edition
Dec 10, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During December 2020*

## Section: Education

WWW.LOKSATTA.COM ५
गुरुवार, १० डिसेंबर २०२०

### १२ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांची प्रवेशाकडे पाठ

**दुसऱ्या फेरीत ९ हजार ९५४ विद्यार्थ्यांचे अकरावी प्रवेश**

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** अकरावी प्रवेश प्रक्रियेच्या दुसऱ्या फेरीत प्रवेश जाहीर होऊनही १२ हजार ६४२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्याकडे पाठ फिरवली आहे. तर केवळ ९ हजार ९५४ विद्यार्थ्यांनीच प्रवेश घेतला असल्याचे स्पष्ट झाले आहे.

केंद्रीय अकरावी प्रवेश नियंत्रण समितीमार्फत पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील ३०४ शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांतील १ लाख ७ हजार ३० जागांसाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. पहिल्या फेरीत ३० हजार ५४४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतले आहेत. दुसऱ्या फेरीची गुणवत्ता यादी शनिवारी जाहीर झाली होती. त्यात ६० हजार ५९९ जागांसाठी अर्ज केलेल्या ४६ हजार ७९४ विद्यार्थ्यांपैकी २३ हजार १२० विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाले. या विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित करण्यासाठी ९ डिसेंबरची मुदत देण्यात आली होती.

केंद्रीय प्रवेश समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिलेल्या माहितीनुसार दुसऱ्या फेरीत प्रवेश जाहीर झालेल्या २३ हजार १२० विद्यार्थ्यांपैकी ९ हजार ९५४ विद्यार्थ्यांनीच प्रवेश घेतला, तर १२ हजार ६४२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला नाही. तांत्रिक कारणांमुळे १३ विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारण्यात आला. आता प्रवेश प्रक्रियेतील तिसऱ्या फेरीसाठीच्या उपलब्ध जाग आणि पुढील फे ऱ्यांचे वेळापत्रक गुरुवारी (१० डिसेंबर) जाही करण्यात येणार आहेत.

**यंदा प्रवेशांसाठी मुदतवाढ न मिळण्याची शक्यता**

दरवर्षी प्रवेश प्रक्रियेच्या फेऱ्यांदरम्यान प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी मुदतवाढ दिली जाते. मात्र यंदा प्रवेश प्रक्रिया करोना संसर्ग आणि सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास आरक्षणाच्या अंतरिम स्थगितीमुळे बराच काळ रखडली आहे. त्यामुळे आता प्रवेश प्रक्रिया आणखी न रखडता लवकर पूर्ण करण्याचे आव्हान आहे. त्यासाठी वेळापत्रकानुसार प्रक्रिया राबवून प्रवेशांसाठी मुदतवाढ न मिळण्याची शक्यता असल्याची माहिती शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.

लोकसत्ता Thu, 10 December 2020 https://epaper.loksatta.com/c/56926279

पुढारी

### विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे त्यांच्या वजनाच्या १० टक्क्यांहून जास्त नको

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

**नवीन शिक्षण धोरणाच्या अंमलबजावणीचे निर्देश केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने दिले आहेत. नव्या धोरणानुसार इयत्ता पहिली ते १० वीपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे त्यांच्या शारीरिक वजनाच्या १० टक्क्यांहून जास्त नको, असे स्पष्ट करण्यात आले आहे. केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने सर्व राज्य, केंद्रशासित प्रदेशांना नवीन शैक्षणिक सत्रापासून नियमांचे कडेकोट पालन करण्याचे आदेश जारी केले आहेत.**

शिक्षण मंत्रालयाने नवीन स्कूल बॅग धोरणांतर्गत अनेक उपाययोजनांची घोषणा केली आहे. विद्यार्थ्यांच्या दप्तराचे ओझे तपासण्यासाठी शाळेत वजनकाटे ठेवण्यात येतील. शाळेत नियमितरीत्या स्कूल बॅगच्या वजनावर लक्ष ठेवावे लागेल. प्रकाशकांना शैक्षणिक पुस्तकांच्या मागे त्याचे वजनही छापील स्वरूपात द्यावे लागेल.



- **केंद्रीय शिक्षण मंत्रालयाचे नवे स्कूल बॅग धोरण जाहीर**
- **इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना नियम लागू**
- **राज्य, केंद्रशासित प्रदेशांना अंमलबजावणीचे निर्देश**

पहिलीतील मुलांसाठी एकूण १,०७८ ग्रॅम वजनाची तीन पुस्तके राहतील. इयत्ता बारावीतील विद्यार्थ्यांसाठी एकूण सहा पुस्तके असतील. त्यांचे वजन ४ हजार १८२ ग्रॅम राहील. शाळकरी मुलांच्या बॅगमध्ये पुस्तकांचे वजन ५०० ग्रॅम ते ३.५ किलोग्रॅमपर्यंतच राहील. तर वह्यांचे वजन २०० ग्रॅम ते २.५ किलोग्रॅम राहील. यात जेवणाचा डबा तसेच पाण्याच्या बॉटलचे वजनही समाविष्ट आहे.

नवीन धोरणानुसार पायऱ्या चढताना चाके असलेली बॅग मुलांना जखमी करू शकते. त्यामुळे तिच्या वापरावर बंदी घालण्यात येणार आहे. शाळांकडून मुलांना जी सुविधा उपलब्ध करवून देणे आवश्यक आहे ती मुबलक प्रमाणात तसेच चांगल्या गुणवत्तेत उपलब्ध करवून देण्याचे निर्देशही मंत्रालयाने दिले आहेत.

**दुसरीपर्यंत गृहपाठ देण्यास मनाई**

इयत्ता दुसरीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना गृहपाठ देण्यात येणार नाही. इयत्ता तिसरी ते सहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना आठवड्यात २ तासांपर्यंतचा गृहपाठ, इयत्ता ६ वी ते ८ वीकरिता दररोज १ तासाचा गृहपाठ तसेच इयत्ता ९ वी ते १२ वीकरिता दररोज जास्तीत जास्त २ तासांपर्यंतचा गृहपाठ देण्याची मर्यादा घालून देण्यात आली आहे.

Pune Edition
Dec 10, 2020 Page No. 2
newspaper.pudhari.co.in



*News Paper Clippings During December 2020*

Section: Education

### FYJC exams likely on small part of syllabus

Vinamrata.Borwankar
@timesgroup.com

**Mumbai:** With the FYJC academic year cut to just about three months, school education minister Varsha Gaikwad said the department is looking to tweak the assessment pattern.

"We have already cut the syllabus by 25%, so any further reduction is unlikely... While colleges will have only a few months to teach, we want to ensure students don't miss out. We could instead consider testing students only on select parts of the syllabus," said Gaikwad.

The minister added that continuous comprehensive evaluation is being considered as a form of assessment as well, and discussions with department officials are underway.

Gaikwad said the department was considering a proposal to adapt assessment patterns to ensure students are not stressed about examinations.

The FYJC admissions resumed last week, after a three-month break due to the Supreme Court's interim stay on the Maratha quota.

The second round of FYJC admissions wrapped up on Wednesday, and the department will soon announce the schedule for the next round. "We understand that this month too will be spent in the admissions process. However, if colleges want, they can start their online classes for the admitted students. In parts of the state where class IX-XII have been allowed to reopen, junior colleges can start physical classes too. For those who can't, the department's online classes will continue until the colleges reopen," said Gaikwad.

The Times of India: 10.12.2020

### In first step towards transitioning to 'school system', 18 additional directors appointed by SPPU

ALIFIYA KHAN
PUNE, DECEMBER 9

THE WHEELS have been set in motion for the regrouping of 46 departments at the Savitribai Phule Pune University (SPPU) into 18 schools, for better management of resources and workforce as well as cohesive functioning.

The plan, which has been in the offing for the last couple of years, seems to finally be taking shape, as 18 senior officials and academicians have been given the responsibility of additional director of the schools through an official circular released by the SPPU administration on Wednesday.

SPPU Vive-Chancellor Dr Nitin Karmalkar said the appointments are being made to start working towards establishing the schools formally. "While on one hand, we will continue with the full-time appointment process for directors, on the other, the temporary appointments will help us in starting work in this direction," he said.

It is the first major restructuring process for the university, said Karmalkar, adding that such a move will not only help in cohesive work but also avoid duplication and wasting of resources. Under the new system, university departments which are inter-disciplinary will come under the common umbrella of one school. While the existing departments will have their functional heads, together they will form a board with the director of the respective schools.

**Experts said the conversion to school system can benefit SPPU students**

Meanwhile, experts said the conversion to school system can benefit SPPU students. They pointed out that even though the choice-based credit system is in place, it isn't being implemented fully because of mismatch in timetables or gaps between departments but with the school system, students within one school can have more mobility within departments.

The Indian Express: 10.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

**Section: Education**

# शाळा सुरू करण्याबाबत समन्वयाने निर्णय घ्यावा

**डॉ. नीलम गोऱ्हे यांचे निर्देश**

मुंबई, दि. १० - करोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील शाळा पुन्हा सुरू करत असताना शाळा संस्थाचालक आणि पालकांचे मत विचारात घेऊन परस्पर समन्वयाने शाळा उघडण्याबाबत निर्णय घ्यावा, असे निर्देश विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले आहे.

राज्यातील शाळांच्या समस्यांसंदर्भात त्यांनी आज दूरदृश्य प्रणालीमार्फत आढावा घेतला. या बैठकीला शालेय शिक्षण विभागाचे सहसचिव राजेंद्र पवार यांच्यासह संबधित अधिकारी व शाळा संस्थाचालक प्रतिनिधी उपस्थित होते. शिक्षण विभागाने नववी ते बारावीपर्यंतची शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. इतर वर्गाच्या शाळांबाबत निर्णय घेतांना सर्व घटकांचे मत विचारात घेऊन निर्णय घेण्याबाबत डॉ. गोऱ्हे यांनी सुचविले. डॉ. गोऱ्हे म्हणाल्या दहावी आणि बारावीचे महत्त्वाचे वर्ष असल्याने त्यांच्या परीक्षांबाबत प्राधान्याने निर्णय घ्यावा. त्याचप्रमाणे इतर वर्गांच्या शाळा सुरू करताना शाळांचे निर्जंतुकीकरण, शौचालयाची व्यवस्था, मुलांची वाहतूक व्यवस्था या सर्व बाबी विचारात घेणे आवश्यक आहे. मुंबई, पुणे येथे तसेच इतर ग्रामीण भागातील परिस्थितीचा विचार करून टप्प्याटप्प्याने वर्ग सुरू करण्याबाबत विचार व्हावा, असेही डॉ. गोऱ्हे यांनी यावेळी सांगितले.

Prabhat: 11.12.2020

# शाळा सुरू करण्याबाबत पालक व संस्थाचालकांची बैठक : गोऱ्हे

पुणे : इयत्ता दहावी व बारावीच्या शाळा येत्या २१ डिसेंबरपासून सुरू करण्यासाठी पालक व संस्थाचालकांची बैठक घेण्यात येईल. आवश्यक काळजी घेऊन शाळा सुरू करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे विधान सभेच्या उपसभापती डॉ. निलम गोऱ्हे यांनी सांगितले.

कोविडमध्ये बंद झालेल्या शाळा, पुन्हा नव्याने सुरु करताना घ्यावयाच्या दक्षताबाबत विचार करण्यासाठी गुरुवारी वेबिनार घेण्यात आला. त्यावेळी गोऱ्हे बोलत होत्या. दहावी आणि बारावीचे वर्ग सुरु करण्यासाठी संस्थाचालक व पालकांची सभा घेणार व



आवश्यक काळजी घेऊन शाळा सुरू करण्यासाठी प्रयत्न करणार, असे डॉ. गोऱ्हे यांनी सांगितले.

तसेच ९ वी व ११ वीच्या शाळा ३ जानेवारीपासून सुरु करण्याच्या अनुषंगाने शिक्षण विभागाने प्रयत्न करावेत, असे निर्देशही डॉ. गोऱ्हे यांनी दिले. यावेळी शिक्षण विभागाचे उपसचिव राजेंद्र पवार, माजी शिक्षण संचालक वसंत काळपांडे, शिरीष फडतरे, जयश्री देशपांडे, शीतल बापट, राजेंद्र कांबळे उपस्थित होते.

शाळा सुरु करताना आवश्यक काळजी घेण्यासाठी सर्व शैक्षणिक संस्था तयार आहेत.

मात्र शैक्षणिक फी पालकांनी भरावी कारण त्याशिवाय शिक्षकांचे पगार व इतर अनुषंगिक खर्च कसा करणार? याबाबत शासनाने निर्देश द्यावेत असे राजेंद्र कांबळे म्हणाले. जयश्री देशपांडे म्हणाल्या की, अनेक पालकांना पाल्याचे शुल्क भरताना आर्थिक अडचणी आहेत त्यामुळे शाळांनी शुल्कवाढ करू नये.

Kesari: 11.12.2020

# शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाइन

## दहावी, बारावीतील गुणवंतांसाठी २९ जानेवारीपर्यंत मुदत

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पुणे महापालिकेकडून शहरातील दहावी आणि बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्तीसाठी आज, शुक्रवारपासून ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले आहेत. महापालिकेच्या dbt. punecorportation.org या वेबसाइटवर शिष्यवृत्तीसाठी थेट अर्ज करता येणार असून, त्यासाठी आवश्यक कागदपत्रे आणि प्रक्रियेची माहितीही देण्यात आली आहे. विद्यार्थ्यांना अर्ज करण्याची मुदत २९ जानेवारीपर्यंत असल्याचे महापालिका प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

महापालिकेतर्फे दर वर्षी दहावी आणि बारावीतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद योजना व लोकशाहीर अण्णा भाऊ साठे या योजनांतर्गत शैक्षणिक अर्थसाह्य देण्यात येते. विद्यार्थ्यांनी dbt.punecorporation.org या संकेतस्थळावर जाऊन आपला अर्ज भरावा. या योजनांकरिता आवश्यक ती शिफारस, अर्जदाराची स्वाक्षरी या पानांची संगणक प्रणालीतून प्रिंट काढावी. संबंधितांची शिफारस सही आणि शिक्क्यासह घेऊन ही कागदपत्रे संगणक प्रणालीमध्ये अपलोड करण्याची जबाबदारी अर्जदाराची आहे.

दहावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद शैक्षणिक अर्थसाह्य योजना; तर बारावी उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना लोकशाहीर अण्णा भाऊ साठे शैक्षणिक अर्थसाह्य योजनेंतर्गत हा लाभ देण्यात येणार आहे. या योजनांतर्गत दहावीतील विद्यार्थ्यांना १५ हजार रुपये; तर बारावीतील विद्यार्थ्यांना २५ हजार रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : १८००१०३०२२२.(टोल फ्री क्रमांक)

### पात्रतेसाठीचे निकष



- विद्यार्थी महापालिकेच्या हद्दीतील रहिवासी असावा.
- फेब्रुवारी-मार्च २०२० या शैक्षणिक वर्षात दहावी किंवा बारावीमध्ये किमान ८० टक्के गुण.
- पुणे महापालिकेच्या शाळेतील किंवा रात्रशाळेतील विद्यार्थी, मागासवर्गीय विद्यार्थी असल्यास किमान ७० टक्के गुण
- ४० टक्के अपंग विद्यार्थी / विद्यार्थिनींना किमान ६५ टक्के गुण
- पुढील शिक्षणासाठी मान्यताप्राप्त संस्थत प्रवेश घेतलेला असावा.

### 'डीबीटी'द्वारे रक्कम

शिष्यवृत्तीची रक्कम थेट संबंधित विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा होणार आहे. त्यासाठी अर्जदारांनी अर्जात आपल्या बँक खात्याची आवश्यक ती माहिती बिनचूक भरणे गरजेचे आहे. अर्जात काही चूक असेल तर दिलेल्या मुदतीतच समाज विकास विभागाकडे संपर्क साधावा.

Maharashtra Times: 11.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

**Section: Education**

# अकरावी प्रवेशाच्या तिसऱ्या फेरीला सुरुवात

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता अकरावी प्रवेशाच्या तिसऱ्या फेरीचे वेळापत्रक जाहीर झाले असून, विद्यार्थ्यांना येत्या १२ डिसेंबरपर्यंत तिसऱ्या फेरीतील प्रवेशासाठी ऑनलाइन अर्जाचा पहिला व दुसरा भाग भरता येणार आहे. केंद्रीय प्रवेश समितीतर्फे तिसऱ्या फेरीच्या रिक्त जागांची माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे.

अकरावी प्रवेशाच्या दोन फेऱ्यांनंतर ४१ हजार विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रवेश प्रकियेतून प्रवेश मिळाला असून, ६६ हजारांपेक्षा अधिक जागा रिक्त आहेत. प्रवेश समितीने तिसऱ्या प्रवेश फेरीचे वेळापत्रक प्रसिद्ध करून विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरावा. नियोजित कालावधीत अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांची प्रवेश यादी येत्या १५ डिसेंबर रोजी प्रसिद्ध केली जाणार आहे.तर प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना १५ ते १८ डिसेंबर या कालावधीत प्रवेश घ्यावा लागणार आहे.

Lokmat: 11.12.2020

# बाळ बोठेचे पुस्तक अभ्यासक्रमातून हद्दपार

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा निर्णय : राज्यशास्त्राच्या संदर्भग्रंथाच्या यादीत होते

राहुल शिंदे
लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यपीठाने राज्यशास्त्र विषयाच्या अभ्यासक्रमासाठी संदर्भ ग्रंथ म्हणून निवडलेले पत्रकार बाळ बोठेचे पुस्तक अभ्यासक्रमातून हद्दपार करण्याचा निर्णय घेतला आहे. विद्या परिषदेतही हे पुस्तक रद्दची प्रक्रिया पूर्ण केली जाईल, असे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी सांगितले.

यशस्विनी महिला ब्रिगेडच्या अध्यक्षा रेखा जरे यांच्या हत्येतील संशयीत मुख्य सूत्रधार म्हणून समोर आलेला बाळ बोठे अद्याप फरार आहे. त्याचे 'राजकीय पत्रकारिता' हे पुस्तक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विषयाच्या 'पॉलिटिकल जर्नलिझम' या विशेष अभ्यासक्रमासाठी (एस-२) नेमण्यात आले आहे. गेल्या वर्षीपासूनच हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला.

नवीन विद्यापीठ कायद्यानुसार अभ्यास मंडळातील काही सदस्यांची निवड नॉमिनेशन मधून केली जाते. विद्यापीठाच्या राज्यशास्त्र विषयाच्या अभ्यास मंडळाचे सदस्य म्हणून बोठेला नॉमिनेट करण्यात आले होते. विद्यापीठ कायद्यातील तरतुदीनुसार गंभीर गुन्ह्यातील आरोपीला विद्यापीठाच्या अधिकार मंडळाच्या बैठकीस उपस्थित राहण्यापासून मज्जाव करता येतो. तसेच अशा व्यक्तीचे सदस्यपद विद्यापीठाचे कुलगुरू रद्द करू शकतात, असे सूत्रांनी सांगितले.

### सदस्यत्वही जाणार

बाळ बोठेचे संदर्भग्रंथ म्हणून नियुक्त केलेले पुस्तक रद्द करण्याचा निर्णय घेतला असून विद्या परिषदेच्या बैठकीत यावर शिक्कामोर्तब करण्यात येईल. बोठेचे अभ्यास मंडळ सदस्यत्व रद्द करण्याचाही निर्णय लवकरच घेण्यात येईल.

- डॉ. नितीन करमळकर, कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Lokmat: 11.12.2020

*News Paper Clippings During December 2020*

Section: Education

# विद्यापीठात आता प्रशाळा प्रणाली

## चार विद्याशाखाअंतर्गत अठरा प्रशाळांची स्थापना

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** शैक्षणिक विभाग यंत्रणेऐवजी विद्याशाखांनिहाय प्रशाळा यंत्रणा निर्माण करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पाऊल टाकले आहे. त्यासाठी चार विद्याशाखांतर्गत अठरा प्रशाळांची स्थापना केली आहे.

विद्यापीठात मानव्यता, वाणिज्य आणि व्यवस्थापन, विज्ञान आणि तंत्रज्ञान, आंतरविद्याशाखीय या चार विद्याशाखांअंतर्गत जवळपास ५४ शैक्षणिक विभाग आहेत. अनेक वर्षांपासून असलेली प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र विभाग ही यंत्रणा बदलून प्रशाळा यंत्रणा (स्कूल सिस्टिम) निर्माण करण्यासाठी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी पुढाकार घेतला होता. त्यानुसार आता विद्यापीठाने रसायनशास्त्र, भूशास्त्र, आरोग्यशास्त्र, जीवनशास्त्र, गणित आणि संगणकशास्त्र, भौतिकशास्त्र, तंत्रज्ञान, बिझनेस, समाजशास्त्र, इंग्रजी आणि परकीय भाषा, भारतीय भाषा, विधी, सामाजिक न्याय, संज्ञापनशास्त्र, ललित कला, शिक्षणशास्त्र, मुक्त आणि दूरशिक्षण, आंतरविद्याशाखीय अभ्यास या अठरा प्रशाळांची स्थापना केली आहे. तसेच या प्रशाळांच्या कामकाजासाठी तात्पुरती व्यवस्था म्हणून संचालकांची नियुक्ती केली आहे.

> परदेशातील विद्यापीठांमध्ये प्रशाळा पद्धत बऱ्याच वर्षांपासून आहे. प्रशाळा यंत्रणेअंतर्गत श्रेयांक गुणपद्धतीमुळे विद्यार्थ्यांना वेगवेगळे विषय शिकण्याची संधी प्राप्त होईल. सुविधांचा सामायिक वापर करता येईल, खर्चातही बचत होईल.
>
> – डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू

लोकसत्ता Fri, 11 December 2020 https://epaper.loksatta.com/c/

### शिष्यवृत्ती रखडल्याने शुल्कप्रतिपूर्तीला फटका

# गुणपत्रिका देण्यास महाविद्यालयांचा नकार

देवेश गोंडाणे, लोकसत्ता

**नागपूर :** मागासवर्गीय विद्यार्थ्यांची दोन वर्षांची शिष्यवृत्ती रखडल्याने शैक्षणिक शुल्कप्रतिपूर्ती न झालेली महाविद्यालये विद्यार्थ्यांना गुणपत्रिका आणि मूळ प्रमाणपत्रे देण्यास नकार देत आहेत. गुणपत्रिका हवी असेल तर शैक्षणिक शुल्क भरा किंवा शिष्यवृत्ती जमा न झाल्यास फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबतचे हमीपत्र द्या, अशी सक्ती विद्यार्थ्यांवर केली जात आहे.

राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांची सन २०१८-१९ व २०१९-२०ची शिष्यवृत्ती रखडल्याने महाविद्यालयांची शुल्कप्रतिपूर्ती झालेली नाही. काही महाविद्यालयांमधील २०१८-१९च्या शिष्यवृत्तीचे काही हप्ते सरकारने दिले, तर काही महाविद्यालयांतील २०१९-२०चे काही हप्ते मिळाले आहेत. मात्र, पूर्ण शिष्यवृत्ती अद्यापही विद्यार्थ्यांच्या खात्यावर जमा झालेली नाही.

राज्यातील बहुतांश व्यावसायिक महाविद्यालयांतील प्रवेश सरकारकडून येणाऱ्या शिष्यवृत्तीच्या भरवशावरच होतात. विद्यार्थ्यांना प्रवेश देताना त्यांच्याकडून शिक्षण शुल्क न घेता महाविद्यालये त्यांची शिष्यवृत्ती स्वतःकडे ठेवतात. मात्र, दोन वर्षांपासून सरकारने शिष्यवृत्ती दिलेली नाही. त्यामुळे महाविद्यालयांची शुल्कप्रतिपूर्ती होऊ शकलेली नाही. त्यामुळे महाविद्यालये गुणपत्रिका आणि अन्य मूळ कागदपत्रे देण्यास नकार देत आहेत. परिणामी विद्यार्थ्यांना पदव्युत्तर प्रवेश घेताना अडचण येत आहे.

विद्यार्थी महाविद्यालयांकडे अंतिम वर्षाची गुणपत्रिका आणि महाविद्यालय सोडल्याचा दाखला मागण्यास गेले तर त्यांना नकार दिला जात आहे. शिष्यवृत्ती न मिळाल्याने ''आधी थकित शिक्षण शुल्क भरा नंतरच कागदपत्रे मागा'', असे सांगून त्यांना वाटेला लावले जात आहे. काही महाविद्यालये तर विद्यार्थ्यांवर ''शुल्क न मिळाल्यास फौजदारी गुन्हा दाखल करा'', असे हमीपत्र देण्याची सक्ती करीत आहेत. त्यासाठी महाविद्यालयांनी छापील हमीपत्रही तयार केले आहे.

राज्यातील इतर

### गुन्हा दाखल करण्याच्या हमीपत्राची मागणी

एक तर शैक्षणिक शुल्क भरा किंवा सरकारकडून शिष्यवृत्ती न आल्यास, ''आमच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करा'' असे हमीपत्र द्या, अशा प्रकारे काही महाविद्यालये मागासवर्गीय विद्यार्थ्यांची अडवणूक करीत आहेत. शैक्षणिक शुल्क भरण्याची आर्थिक परिस्थिती नसल्याने आणि सरकार शिष्यवृत्ती केव्हा जमा करील, याचा अंदाज नसल्याने विद्यार्थी हतबल आहेत. त्यांना पदव्युत्तर प्रवेशाची चिंता आहे.

Maharashtra S... Corporat... Mechanical Engineering Depart...

लोकसत्ता Fri, 11 December 2020 https://epaper.loksatta.com/c/56949382

# तिसऱ्या फेरीची यादी मंगळवारी

## शेवटच्या विद्यार्थ्याला प्रवेश मिळेपर्यंत सुरू राहणार प्रक्रिया

**» अकरावी प्रवेश**

**पुणे, ता. १० :** अकरावी प्रवेशाची तिसरी नियमित प्रवेश फेरी मंगळवारी (ता. १५) जाहीर केली जाणार आहे.

एक लाख सात हजार ३० जागांकरिता राबविण्यात येत असलेल्या या प्रक्रियेत आतापर्यंत ४१ हजार २१ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. उर्वरित ६६ हजार नऊ विद्यार्थ्यांसाठी प्रवेश फेऱ्या होणार आहेत.

पुणे, पिंपरी-चिंचवडसह मुंबई, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर महापालिका क्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयांसाठी ही प्रक्रिया राबविली जात आहे. पहिल्या फेरीत २४ हजार दोन, तर दुसऱ्या फेरीत दहा हजार ८६१ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. बारा हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी दुसऱ्या प्रवेश फेरीत निवड होऊनही प्रवेश घेतलेला नाही.

तिसऱ्या फेरीसाठी अर्ज भाग-एकमध्ये आवश्यक ते बदल करण्यास आणि नियमित फेरीसाठी पसंतीक्रम नोंदविण्यास विद्यार्थ्यांना गुरुवारपासून तीन दिवसांची मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर प्रवेशाची गुणवत्ता यादी मंगळवारी जाहीर केली जाणार आहे.

### असे आहे वेळापत्रक

- **१० ते १२ डिसेंबर :** प्रवेश अर्ज भाग एक मध्ये आवश्यकता असल्यास बदल करणे आणि नियमित तिसऱ्या फेरीसाठी पसंतीक्रम नोंदविणे. यापूर्वी भरलेल्या भाग दोनमध्ये पसंतीक्रम बदलता येतील. मार्गदर्शन केंद्र/माध्यमिक शाळा विद्यार्थ्यांचे अर्ज प्रमाणित करतील.

पान ४ वर »

### गुणवत्तेच्या आधारेच निर्णय

करावी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया समितीच्या सचिव मीना शेंडकर म्हणाल्या, ''राज्य सरकारने अकरावी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचे स्वरूप यापूर्वी जाहीर केले आहे. त्यानुसार प्रवेशाच्या नियमित तीन फेऱ्या होतील. त्यानंतर विशेष फेऱ्या राबविण्यात येतील. यंदा प्रवेश प्रक्रियेत काहीसा बदल केलेला आहे. यापूर्वी विशेष फेऱ्यांमध्ये प्रथम येणाऱ्या प्रथम प्राधान्य अशी पद्धत होती; परंतु यंदा विद्यार्थ्यांना गुणवत्तेच्या आधारेच प्रवेश दिला जाणार आहे. त्यामुळे शेवटच्या विद्यार्थ्यांचा प्रवेश होईपर्यंत विशेष फेऱ्या होतील.''

### ऑनलाइन प्रवेशाच्या फेऱ्यांचा तपशील




Sakaal: 11.12.2020



*News Paper Clippings During December 2020*

Section: Education

# तिसऱ्या फेरीची यादी मंगळवारी

» पान १ वरून

या कालावधीत नवीन विद्यार्थी प्रवेश अर्ज भाग-एक आणि भाग-दोन भरू शकतील. व्यवस्थापन आणि अल्पसंख्याक कोट्यांतर्गत प्रवेशासाठी विद्यालयांना अर्ज मागविता येतील.

- **१३ ते १४ डिसेंबर :** डेटा प्रोसेसिंगसाठी राखीव वेळ
- **१५ डिसेंबर :** प्रवेश फेरीअंतर्गत प्रवेशासाठी निवड/गुणवत्ता यादी प्रदर्शित करणे. विद्यार्थी लॉगिनमध्ये त्याला प्रवेशासाठी मिळालेले उच्च माध्यमिक विद्यालय दर्शविणे. संबंधित उच्च माध्यमिक विद्यालयास प्रवेशासाठी मिळालेल्या विद्यार्थ्यांची यादी कॉलेज लॉगिनमध्ये दर्शविणे. कट ऑफ संकेतस्थळावर दर्शविणे आणि विद्यार्थ्यांना मोबाईल संदेश पाठविणे.
- **१५ डिसेंबर (सकाळी साडेअकरा वाजल्यापासून) ते १८ डिसेंबर (सायंकाळी पाच वाजेपर्यंत) :** प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी प्रोसिड फॉर ॲडमिशन करणे. विद्यार्थ्यांनी मिळालेल्या उच्च माध्यमिक विद्यालयात प्रवेश निश्चित करणे.
- **१८ डिसेंबर :** झालेले प्रवेश संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदविण्यासाठी उच्च माध्यमिक विद्यालयांना अतिरिक्त वेळ.
- **१८ ते १९ डिसेंबर :** अल्पसंख्याक कोटा आणि इनहाऊस कोटा अंतर्गत रिक्त राहिलेल्या जागा प्रत्यार्पित करण्यासाठी राखीव वेळ
- **२० डिसेंबर :** प्रवेशाच्या विशेष फेरीसाठी रिक्त जागांचा तपशील जाहीर करणे. (यात व्यवस्थापन, अल्पसंख्याक आणि इनहाऊस कोट्यातून प्रत्यर्पित केलेल्या रिक्त जागांचाही समावेश असेल.)

पुढारी

# विद्यार्थ्यांसाठी इंटर्नशिप असलेले अभ्यासक्रम राबवा

## यूजीसीकडून देशभरातील विद्यापीठांना निर्देश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**



उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पदवीपूर्व स्तरापासूनच रोजगारक्षम करण्यासाठी कार्यपरिचयाचा (इंटर्नशिप/ॲप्रेंटिसशिप) समावेश असलेले पदवी अभ्यासक्रम विकसित करण्याचे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) देशभरातील विद्यापीठांना दिले आहेत. या अभ्यासक्रमातील मार्गदर्शक सूचना यूजीसीने प्रसिद्ध केल्या असून, तीन वर्षे मुदतीच्या, १३२ श्रेयांकांच्या अभ्यासक्रमातील २० टक्के श्रेयांक इंटर्नशिपसाठी असतील, असे म्हटले आहे.

देशातील पारंपरिक पदवीधर रोजगारक्षम नसल्याचे सातत्याने दिसून आले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना पारंपरिक पदवीसह अन्य कौशल्ये मिळवणे आवश्यक झाले आहे. त्यामुळेच उद्योगांना शिक्षणाशी जोडून घेणे, विद्यार्थ्यांची पदवीपूर्व स्तरापासूनच रोजगारक्षमता वाढवण्याचे उद्दिष्ट यूजीसीने ठेवले आहे. इंटर्नशिप हा विद्यार्थ्यांना रोजगारक्षम करण्यासाठी महत्त्वाचा घटक ठरू शकतो, हे लक्षात घेऊन इंटर्नशिपचा समावेश असलेल्या पदवी अभ्यासक्रमाचा आराखडा यूजीसीकडून मांडण्यात आला आहे. विद्यापीठांना या आराखड्यानुसार अभ्यासक्रम विकसित करायचे आहेत. कला, वाणिज्य, विज्ञान, आंतरविद्याशाखीय अशा कोणत्याही विद्याशाखेत हा पदवी अभ्यासक्रम सुरू करता येणार आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण करून पदवी मिळवलेल्या विद्यार्थ्याला ट्रान्सडिसिप्लिनरी म्हणून ग्राह्य धरले जाणार असून, पदवीसाठी त्याने निवडलेल्या विषयात किंवा २४ श्रेयांक मिळवलेल्या विषयात पदव्युत्तर पदवीलाही प्रवेश घेता येईल. या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक किंवा अव्यावसायिक संस्थांच्या कार्यालयात जाऊन इंटर्नशिपचा कालावधी पूर्ण करावा लागेल. त्यासाठी शिक्षण संस्थांना व्यावसायिक किंवा अव्यावसायिक संस्थांशी सामंजस्य करार करता येतील. तीन वर्षांच्या अभ्यासक्रमातील इंटर्नशिपचा कालावधी एक सत्राचा असेल. इंटर्नशिपच्या सत्रांची तीन वर्षांमध्ये वेगवेगळ्या टप्प्यात किंवा सलग अशा कोणत्याही पद्धतीने विभागणी करता येईल.

इंटर्नशिपसाठी नॅशनल ॲप्रेंटिसशिप ट्रेनिंग स्कीमचाही वापर करता येऊ शकतो. विद्यार्थ्याने केलेल्या इंटर्नशिपचे मूल्यमापन संबंधित व्यावसायिक किंवा अव्यावसायिक संस्थेकडून करण्यात येईल. विद्यार्थ्यांनी इंटर्नशिपमध्ये मिळवलेले गुण गुणपत्रिकेवर नमूद केले जातील. पदवी मिळविण्यासाठी विद्यार्थ्याला इंटर्नशिपमध्ये उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल, असे यूजीसीने स्पष्ट केले आहे.

Pune Edition
Dec 11, 2020 Page No. 9
newspaper.pudhari.co.in

# SPPU: Facility for start-ups inaugurated

EXPRESS NEWS SERVICE
PUNE, DECEMBER 10

AN INCUBATION facility for start-ups was inaugurated at the Centre for Innovation, Incubation and Enterprise at Savitribai Phule Pune University on Thursday. Funded by the Maharashtra State Innovation Society, its objective is to promote budding entrepreneurs with innovative ideas.

SPPU is the first university in the state to have created this facility and is working with 40 start-ups. The facility was inaugurated by Dr Vinay Sahasrabuddhe, president ICCR and Dr Anand Deshpande, founder and managing director, Persistent Systems.

"Entrepreneurs are confined to ideas and concepts without really knowing the market's needs. The university should share successful as well as non-success stories for start-ups to get the right lessons on do's and don'ts...A combination of passion, mission, profession and vocation are the four factors needed for the success of a start-up," said Sahasrabudhe.

The Indian Express: 11.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

Section: Education

पुढारी

११ वीची तिसरी फेरी

# पसंतीक्रम नोंदविण्यास सुरुवात

पुणे : पुढारी वृत्तसेवा

अकरावी प्रवेशासाठी तिसरी फेरी घेण्यात येत असून विद्यार्थ्यांकडून पसंतीक्रम नोंदविण्यास सुरुवात झाली आहे. १२ डिसेंबरपर्यंत पसंतीक्रम नोंदविता येईल तसेच यापूर्वी भरलेल्या भाग-२ मधील पसंतीक्रमही बदलता येईल. अर्ज तपासणीबरोबरच नवीन विद्यार्थ्यांना भाग १ व भाग २ भरता येणार आहे. तिसरी गुणवत्ता यादी १५ डिसेंबरला जाहीर होणार असल्याची माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिकचे शिक्षण संचालक दत्तात्रय जगताप यांनी दिली.

पुणे व पिंपरी-चिंचवडमधील कनिष्ठ महाविद्यालयांसाठी अकरावीच्या दोन फेऱ्या बुधवारी (दि.९) पूर्ण झाल्या. आता उर्वरित जागांसाठी तिसरी फेरी घेण्यात येत आहे. अद्याप ६५ हजार ९९२ जागा रिक्त आहेत. दि. १३ व १४ डिसेंबर रोजी पात्र उमेदवारांची गुणवत्ता यादी अंतिम केली जाणार आहे.

१५ डिसेंबर रोजी विद्यार्थ्यांना लॉगीनमध्ये प्रवेशासाठी मिळालेले उच्च माध्यमिक विद्यालय दर्शविण्यात येणार आहे. तसेच, दुसऱ्या नियमित फेरीचे कट-ऑफ संकेतस्थळावर दशविण्यात येणार आहेत. १५ ते १८ डिसेंबरदरम्यान प्रवेश निश्चित करता येणार आहे.

यादरम्यान, व्यवस्थापन व अल्पसंख्याक कोट्यातील प्रवेश सुरू राहतील, तसेच नवीन विद्यार्थी नोंदणी व प्रवेश अर्जाचा भाग-१ भरणे सुरू होणार आहे. २० डिसेंबर रोजी विशेष फेरीसाठी रिक्त जागांचा तपशील जाहीर होणार आहे. यानंतर विशेष फेरीचे वेळापत्रक जाहीर होणार असल्याचे देखील जगताप यांनी स्पष्ट केले.

My Pune Edition
Dec 11, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

# Over 60k FYJC seats vacant mostly in tier II, III colleges

## Head Of CAP Tells Pupils To Check Entry Marks

TIMES NEWS NETWORK

**Pune:** As many as 60,000 seats have remained vacant in the first year junior college (FYJC, std XI) admissions at the end of the second round on Wednesday.

A total of 40,000 students confirmed their admissions so far in the centralised admission process. Education experts said the demand for popular colleges in the city left many seats vacant in tier II and III colleges.

There are 304 colleges in Pune region for FYJC with an intake of 1.07 lakh seats. Meenakshi Shendkar, in-charge of the CAP committee, said, "There is huge competition for seats in the popular colleges. Students should take a look at the cut-offs and then fill up the preference forms."

The seats for in-house and management quota are being filled at the college level. The cut-offs for the second round also remained above 90% in many of the reputed colleges due to improved results this year in the secondary school certificate (SSC, std X) exams.

A principal of a tier III college in the city said they still had 50% vacancy in their college, especially for the science stream.

"The trend is pretty much as it was in the previous years, but the problem is with students who do not fill the form preferences based on their scores. Even those scoring in the 80s are aiming for the popular colleges despite knowing that it will not be possible to get admissions there."

For the second round, 46,794 applications were received and 23,120 students were allotted colleges. Of these, 9,954 students have confirmed the admissions in the colleges allotted.

The applications of 13 students were rejected due to some flaws, and 12,452 students did not respond to the admissions allotted to them.

Shendkar said, "These students are mostly those who have applied to other courses as well and may have confirmed their admissions elsewhere and may have filled up the FYJC form only as another option."

### FILL THIRD ROUND FORMS BY SATURDAY

- Complete your application form for FYJC, Part-1, and updating of option form (Part-2) by Dec 12
- New students can submit both forms in this period
- Verification of the application form by the guidance centre/ secondary schools
- Application for management or minority quota

**DECEMBER 13 & 14**

- Data processing, preparation of merit list of eligible candidates
- Audit of allocation by divisional CAP committees

**DECEMBER 15**

- Display of junior college allotment list in students' and colleges' login, cut-off list for the admission round with SMS to students

**DECEMBER 15 TO 18**

- Students to click "Proceed For Admission"

**CONFIRMATION OF ADMISSION**

- Admission Confirmation, rejection of admission or cancellation at colleges' login
- Management & Minority quota admissions continue
- Part-1 form filling will start for next round

**CANCELLATION PROCESS**

- If a student wishes to cancel his/her confirmed admission, he/she can request the junior college

**DIGITAL PAYMENT**

- Colleges should collect their admission fees only through digital payment modes to contain coronavirus

- **December 18** | Colleges to upload status of admitted students
- **December 18 and 19** | Surrender of minority and in-house quota seats
- **December 20** | Display of vacancy list for special round, including management, minority and in-house quota seats

The Times of India: 11.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

Section: Education

## News Paper Clippings During December 2020

### Section: Education

## 'कनिष्ठ महाविद्यालयांना विनाविलंब निधी द्यावा'

पुणे, ता. ११ : अनुदान पात्र आणि अनुदान मंजूर केलेल्या प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांना अनुदान वितरित करण्यापूर्वी तपासणी करण्यात येणार असल्याचे शिक्षण विभागाने मागील आठवड्यात जाहीर केले. या तपासणीसाठी पथकही कार्यान्वित केले आहे. मात्र, याला महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक महासंघाने विरोध दर्शविला आहे. घोषित कनिष्ठ महाविद्यालयांना विनाविलंब निधी वितरित करण्याचा आदेश द्यावा, अशी मागणी देखील महासंघाने केली आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांच्यासमवेत महासंघाच्या कार्यकारिणीची नुकतीच बैठक झाली. या वेळी महासंघाच्या विविध मागण्यांवर चर्चा करण्यात आली. तपासणी पथक थांबवावे, प्रचलित धोरणाखाली निधी वितरणाचा पुढील टप्पावाढ विनाअट लागू करावा, येत्या हिवाळी अधिवेशनात तसा प्रस्ताव सादर करण्यात यावा, अशा मागण्या बैठकीत केल्याची माहिती महासंघाचे राज्य अध्यक्ष डॉ. संजय शिंदे, सरचिटणीस संतोष फाजगे आणि समन्वयक मुकुंद आंधळकर यांनी दिली आहे.

Sakaal: 12.12.2020

## चार विद्याशाखांतर्गत अठरा प्रशाळांची स्थापना

प्रभात वृत्तसेवा



पुणे, दि. ११ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने चार विद्याशाखांतर्गत अठरा प्रशाळांची स्थापना केली. तसेच या प्रशाळांच्या संचालकांची नियुक्ती केली आहे. त्याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाने प्रसिद्ध केले आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात मानव्यता, वाणिज्य आणि व्यवस्थापन, विज्ञान आणि तंत्रज्ञान, आंतरविद्याशाखीय या चार विद्याशाखाअंतर्गत जवळपास ५४ शैक्षणिक विभाग आहेत. अनेक वर्षांपासून असलेली प्रत्येक विषयासाठी स्वतंत्र विभाग ही यंत्रणा बदलून प्रशाळा यंत्रणा (स्कूल सिस्टिम) निर्माण करण्यासाठी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी पुढाकार घेतला होता. त्यानुसार आता विद्यापीठाने रसायनशास्त्र, भूशास्त्र, आरोग्यशास्त्र, जीवशास्त्र, गणित आणि संगणकशास्त्र, भौतिकशास्त्र, तंत्रज्ञान, बिझनेस, समाजशास्त्र, इंग्रजी आणि परकीय भाषा, भारतीय भाषा, विधी, सामाजिक न्याय, संज्ञापनशास्त्र, ललित कला, शिक्षणशास्त्र, मुक्त आणि दूरशिक्षण, आंतरविद्याशाखीय अभ्यास या अठरा प्रशाळांची स्थापना केली. तसेच, या प्रशाळांच्या कामकाजासाठी तात्पुरती व्यवस्था म्हणून संचालकांची नियुक्ती केली आहे, असे विद्यापीठाने स्पष्ट केले.

Prabhat: 12.12.2020

## पुणे विद्यापीठाचे सुधारित निकाल जाहीर

पुणे, ता. ११ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने ज्या विद्यार्थ्यांना शून्य गुण, कमी गुण मिळाले आहेत किंवा अनुपस्थिती दर्शविली आहे, अशा विद्यार्थ्यांचा सुधारित निकाल जाहीर करण्यास सुरवात केली आहे. पुढील चार पाच दिवसांत सुमारे साडेपाच हजार विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर केला जाईल. तसेच सरासरीने गुण देण्याच्या पद्धतीला परीक्षा मंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

पुणे विद्यापीठाने ऑक्टोबर महिन्यात अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची ऑनलाइन व ऑफलाइन परीक्षा घेतली होती. या परीक्षेचा निकाल जाहीर झाला तेव्हा त्यास अनेक विद्यार्थ्यांना एकाच विषयात शून्य गुण मिळणे, अपेक्षेपेक्षा कमी गुण देणे, परीक्षा देऊनही अनुपस्थितीत लागणे असे प्रकार घडले होते. याबाबत विद्यापीठाकडे तक्रार केली असता त्यास व्यवस्थित उत्तरे दिली जात नव्हती, त्यामुळे विद्यार्थ्यांना आंदोलनही करावे लागले. या परीक्षेचा सुधारित निकाल जाहीर झाल्यानंतरही त्यातही त्याच चुका कायम होता, त्यामुळे गोंधळ निर्माण झाला. 'सकाळ'ने याबाबत वृत्त प्रकाशित करून विद्यार्थ्यांची कैफियत मांडली होती. शून्य व अनुपस्थितीचा फटका सुमारे साडे पाच हजार विद्यार्थ्यांना बसला होता. त्यामध्ये बदल करण्याची भूमिका परीक्षा विभागाने घेत १५ डिसेंबर पर्यंत सुधारित निकाल पुन्हा एकदा जाहीर केला जाईल असे सांगितले.

Sakaal: 12.12.2020



## News Paper Clippings During December 2020

### Section: Education

## अकरावीचे वर्ग कधीपासून?

### विद्यार्थ्यांसह पालकांचा सवाल; सरकारकडून सूचना नसल्याने संभ्रम

**पुणे, ता. ११ : इयत्ता अकरावीच्या प्रवेशाचा तिसरा टप्पा सुरू झाला, तरी अद्याप राज्य सरकारकडून अकरावीचे शैक्षणिक वर्ष कधीपासून सुरू होणार? वर्ग कसे सुरू करायचे? याबाबत कोणतीही सूचना कळविण्यात आली नाही. त्यामुळे अकरावीच्या शैक्षणिक वर्षाबाबत विद्यार्थी व पालक यांच्यात संभ्रम असल्याचे दिसून येत आहे.**

**अकरावीच्या शैक्षणिक वर्षाबाबत राज्य सरकारने अद्याप कोणत्याही मार्गदर्शक सूचना दिलेल्या नाहीत. त्यामुळे माझ्यासह अनेक मुलांचे पालक सध्या संभ्रमात आहोत. त्यामुळे शिक्षण विभागाने तातडीने याबाबत निर्णय जाहीर करावा.**
**- विनोद सोनावणे, पालक**

इयत्ता अकरावीचे वर्ष म्हटले की, शालेय जीवनातून महाविद्यालयीन जीवनात प्रवेश करण्याचा 'एंट्री पॉइंट' आणि करिअरचा देखील 'टर्निंग पॉईंट'. म्हणून विद्यार्थ्यांना इतकेच त्यांचे पालकही मुलांच्या अकरावी प्रवेशाबाबत उत्सुक असतात. परंतु, यंदा या उत्सुकतेपेक्षा विद्यार्थ्यांचा अकरावी प्रवेश एकदाचा निश्चित व्हावा, अशी शहरी भागातील पालकांची भावना असल्याचे दिसून येत आहे. पालक सरोज भगत म्हणले, "कोरोनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होत आहे. डिसेंबर महिना सुरू झाला, तरीही अद्याप अकरावीची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. विद्यार्थ्यांचे ऑनलाइन का होईना, परंतु नियमित वर्ग कधी सुरू होणार, हा प्रश्न कायम आहे. राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत ऑनलाईन वर्ग सुरू आहेत. पण त्याचा म्हणावा तसा फायदा होत नसल्याचे दिसून येत आहे. यंदा अकरावीच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष कधीपासून सुरू होणार, याबाबत सरकारने अद्याप कोणत्याही सूचना दिलेल्या नाहीत."

महादेव मेश्राम यांनी विद्यार्थी शिक्षणापासून दुरावले जाण्याची भिती व्यक्त केली आहे. ते म्हणाले, "माझी मुलगी वृषाली हिच्या अकरावीच्या प्रवेशाबाबत मी तिच्या इतका उत्सुक होतो. परंतु यंदा कोरोनामुळे उद्‌भवलेल्या परिस्थितीत तिचा प्रवेश पहिल्या फेरीत निश्चित झाल्याने निर्धास्त आहे. अद्यापही प्रवेश फेऱ्या सुरू आहेत. असे असताना अकरावीचे शैक्षणिक वर्ष कधीपासून सुरू करायचे, याबाबत सरकारकडून कोणत्याही हालचाली होताना दिसत नाही. त्यामुळे अकरावीचे शैक्षणिक वर्ष कधी सुरू होणार याबाबत संभ्रम आहे."

Sakaal: 12.12.2020

## दहावी-बारावीच्या वर्गाबाबत सभा घेणार : डॉ. नीलम गोऱ्हे



पुणे, ता. ११ : 'मुलांच्या करिअरच्या दृष्टीने दहावी आणि बारावीचे वर्ष महत्त्वाचे आहे. त्यामुळे पुणे शहरामधील दहावी-बारावीच्या शाळा २१ डिसेंबरपासून सुरू करण्यासाठी संस्थाचालक आणि पालकांची सभा घेण्यात येणार आहे. तसेच, कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी आवश्यक काळजी घेऊन शाळा सुरू व्हाव्यात, यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत,' अशी माहिती विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिली.

कोरोनाच्या संसर्गामुळे बंद झालेल्या शाळा पुन्हा नव्याने सुरू करताना घ्यावयाच्या दक्षताबाबत विचारविनिमय करण्यासाठी नुकताच वेबिनार आयोजित करण्यात आला होता, त्या वेळी डॉ. गोऱ्हे बोलत होत्या. इयत्ता नववी आणि अकरावीचे वर्ग ३ जानेवारीपासून सुरू करण्याच्या अनुषंगाने शिक्षण विभागाने प्रयत्न करावेत, असेही डॉ. गोऱ्हे यांनी सुचविले आहे.

या वेळी शिक्षण विभागाचे उपसचिव राजेंद्र पवार, सहसंचालक दिनकर टेमकर, माजी शिक्षण संचालक वसंत काळपांडे आदी मान्यवर उपस्थित होते. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये, म्हणून शाळा आणि पालकांनी एकत्रित येऊन तोडगा काढावा, पालकांनी शाळांचे शुल्क न भरल्यास शिक्षकांचे पगार कसे देणार?, शाळांनी शुल्क वाढ करू नये, अशा विविध विषयांवर या वेबिनारमध्ये चर्चा करण्यात आली.

Sakaal: 12.12.2020

## 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचारविश्व मार्गदर्शक'



पुणे : डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या विविध पैलूंच्या माध्यमातून साकारलेले आंबेडकरी विचारविश्व हे पुस्तक सर्वांसाठी मार्गदर्शक आहे, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यसनाच्या वतीने डॉ. धनंजय लोखंडे आणि डॉ. दीपक गरुड यांनी संपादित केलेल्या आंबेडकरी विचारविश्व या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. करमळकर यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, आंतरविद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजीव सोनवणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन प्रमुख डॉ. मनोहर जाधव, तसेच विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. विद्यापीठातील शिक्षकांनी एकत्रित येऊन पुस्तक निर्मितीचा असा प्रकल्प सिध्दीस नेला, ही अभिमानास्पद बाब आहे असेही यावेळी डॉ. करमळकर यांनी नमूद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. दीपक गरुड यांनी केले, तर अध्यासन प्रमुख डॉ. मनोहर जाधव यांनी पुस्तकातील अंतरंगाविषयी मनोगत व्यक्त केले. डॉ. गीता शिंदे यांनी सूत्रसंचालन व आभार मानले.

Kesari: 12.12.2020

# News Paper Clippings During December 2020

## Section: Education

### अकरावी प्रवेशाची तिसरी गुणवत्ता यादी १५ डिसेंबरला

**पुणे :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयातील अकरावीच्या प्रवेशासाठीच्या प्रक्रियेतील तिसरी गुणवत्ता यादी १५ डिसेंबरला जाहीर होणार आहे. त्यापूर्वी पसंतीक्रम नोंदवणे आणि पसंतीक्रम बदलणे, नव्या विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जाचा भाग एक आणि भाग दोन भरण्यासाठी १२ डिसेंबर ही अंतिम मुदत आहे.

दोन फेऱ्यांनंतर अद्याप ६५ हजार ९९२ जागा रिक्त आहेत. १५ डिसेंबरला गुणवत्ता यादी जाहीर होऊन विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी जाहीर झालेले महाविद्यालय, दुसऱ्या फेरीचे पात्रता गुण त्यांच्या लॉगइनमध्ये दिसेल. तिसऱ्या फेरीत प्रवेश जाहीर झालेल्या विद्यार्थ्यांना १५ ते १८ डिसेंबरदरम्यान प्रवेश निश्चित करावा लागेल. २० डिसेंबरला विशेष फेरीच्या रिक्त जागांचा तपशील आणि वेळापत्रक जाहीर होईल, अशी माहिती दत्तात्रय जगताप यांनी दिली.

लोकसत्ता Sat, https

### SPPU's satellite centre coming up in Pimpri-Chinchwad



SPPU's satellite centre will come up in the auto cluster hub. *File*

ALIFIYA KHAN
PUNE, DECEMBER 11

THE SAVITRIBAI Phule Pune University (SPPU) will open a satellite centre in Pimpri-Chinchwad in the next couple of weeks. Dr Nitin Karmalkar, vice chancellor, SPPU, said the satellite centre will come up in the auto cluster hub.

"We plan to offer highly skilled, technical and industry oriented courses from this centre. For the beginning, we are looking at starting foreign language, entrepreneurship, machine learning and data science courses...it provides new opportunities for students to learn and get hands-on training," he said.

Apoorva Palkar, director, Centre Innovation, Incubation and Linkages, who is co-ordinating the project on behalf of SPPU, said the auto cluster has certain equipment and machinery that will be beneficial to students. "It is not the kind of technical training for blue collared jobs but for white collar jobs. For example, state-of-the-art 3D printing machinery and such equipment," she said.

The Indian Express: 12.12.2020

### खासगी परीक्षा देणाऱ्यांनाही मिळणार एमबीएला प्रवेश

■ लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे:** बनावट गुणपत्रिका सादर करून एमबीए अभ्यासक्रमास प्रवेश मिळवणे, गुणपत्रिका पडताळणीसाठी ऑनलाइन सुविधा उपलब्ध न करून देणे आदी कारणांमुळे अॅटमा,जी मॅट, मॅट आणि झॅट या चार खासगी प्रवेश परीक्षांद्वारे महाराष्ट्रात प्रवेश घेण्यावर उच्च व तंत्र शिक्षण विभागाने घातलेली बंदी मुंबई उच्च न्यायालयाने उठवली आहे.

त्यामुळे आता या चारही परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांच्या 'एमबीए/एमएमएस' अभ्यासक्रमाच्या प्रवेशाचा मार्ग मोकळा झाला आहे.

राज्याच्या प्रवेश परीक्षा कक्षातर्फे राज्यातील 'एमबीए/एमएमएस'ची प्रवेश प्रक्रिया राबविली जाते. एमबीए सेट सह 'कॅट', 'सीमॅट' या शासकीय परीक्षांसह खासगी संस्थांतर्फे जीमॅट, झॅट, मॅट आणि अॅटमा या चार परीक्षांचाही अंतर्भाव आहे.

परंतु, राज्यात २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात २६ विद्यार्थ्यांनी तर २०१९-२० मध्ये २१ विद्यार्थ्यांनी अॅमाची बनावट गुणपत्रिका देऊन प्रवेश घेतला होता. पुण्यात बनावट गुणपत्रिका सादर करून पाच विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. त्यामुळे खासगी संस्थांद्वारे घेतल्या जाणा-या प्रवेश परीक्षेतून राज्यात एमबीए अभ्यासक्रमास प्रवेश दिले जाणार नसल्याचे उच्च व तंत्र शिक्षण विभागाने स्पष्ट केले होते.

#### बरेच विद्यार्थी परराज्यातील



१ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पराग काळकर म्हणाले, खासगी संस्थांच्या परीक्षा देणारे बरेच विद्यार्थी हे परराज्यातील असतात. परंतु, या विद्यार्थ्यांनी शासकीय परीक्षा न दिल्यामुळे पुण्यासह राज्यातील इतर व्यवस्थापन संस्थामध्ये त्यांना प्रवेश घेता येत नव्हता. त्यामुळे शैक्षणिक संस्थांचेही नुकसान होत होते.

२ एआयसीटीईने निर्देश देऊनही तंत्र शिक्षण विभागाने याबबात निर्णय घेतला नव्हता. मात्र, उच्च न्यायालयाने याबाबत निर्णय दिल्याने अॅटमा, जी मॅट, मॅट आणि झॅट या चार खासगी संस्थांच्या प्रवेश परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचा राज्यातील प्रवेशचा मार्ग मोकळा झाला आहे.



एमबीए अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना आता अधिक परीक्षांचे पर्याय उपलब्ध होतील. त्यामुळे विद्यार्थी चांगले गुण मिळवून दर्जेदार संस्थेत प्रवेश घेऊ शकतील.तसेच शैक्षणिक संस्थांनाही अधिकाधिक विद्यार्थी मिळतील.

- रवी चिटणीस, प्र-कुलगुरु, एमआयटी

Lokmat: 13.12.2020



News Paper Clippings During December 2020

Section: Education

### बारावीच्या परीक्षेचाही बिगुल वाजला

■ दि. १५ डिसेंबरपासून भरता येणार ऑनलाइन अर्ज ■

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १२ -** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने सन २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या इयत्ता बारावीच्या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचे ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी दि. १५ डिसेंबरपासून सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

कनिष्ठ महाविद्यालयातील कला, वाणिज्य, विज्ञान शाखेतील नियमित विद्यार्थ्यांचे नियमित शुल्कासह अर्ज भरण्यासाठी ४ जानेवारीपर्यंत मुदत देण्यात आलेली आहे. व्यवसाय अभ्यासक्रम शाखेचे नियमित विद्यार्थी, फेरपरीक्षार्थी, यापूर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खासगी विद्यार्थी, श्रेणी सुधार व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरण्यासाठी ५ ते १८ जानेवारी असा कालावधी निश्चित करण्यात आलेला आहे. कनिष्ठ महाविद्यालयांनी चलन डाउनलोड करून चलनाद्वारे बँकेत शुल्क भरण्यासाठी दि. १५ डिसेंबर ते २५ जानेवारी असा कालावधी देण्यात आलेला आहे.

विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांमार्फत अर्ज भरून घ्यावेत. महाविद्यालयाच्या प्राचार्यांना ऑनलाइन अर्ज भरण्याबाबत आवश्यक त्या सूचनाही देण्यात आलेल्या आहेत. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांच्या अर्जांची प्रिंट काढून विद्यार्थ्यांमार्फत अर्जात नमूद केलेली माहिती जनरल रजिस्टरच्या माहितीनुसार पडताळून अचूक असल्याची खात्री करावी व त्याबाबत प्री-लिस्टवर विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी.

त्यानंतर प्री-लिस्ट चलनासोबत विभागीय मंडळात जमा करावी लागणार आहे, असे राज्य मंडळाच्या सचिव डॉ. अशोक भोसले यांनी स्पष्ट केले आहे.

Prabhat: 13.12.2020

### 'एमबीए'च्या प्रवेशाचा मार्ग मोकळा

#### अॅटमा, जीमॅट, मॅटसह चार परीक्षांवरील बंदी उच्च न्यायालयाने उठवली

**पुणे, ता. १२ : एमबीए प्रवेशासाठी बनावट गुणपत्रिका सादर करणे, गुणपत्रिका पडताळणीसाठी ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून न देणे, यासह अन्य कारणांमुळे उच्च व तंत्र शिक्षण विभागाने अॅटमा, जीमॅट, मॅट आणि झॅट या चार खासगी प्रवेश परीक्षांद्वारे महाराष्ट्रात प्रवेश घेण्यावर बंदी घालण्यात आली होती. मात्र, मुंबई उच्च न्यायालयाने ही बंदी उठवली असून, या परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना एमबीए किंवा एमएमएसला प्रवेश घेईल, असे स्पष्ट केले आहे.**

राज्यात एमबीए किंवा एमएमएसची प्रवेश प्रक्रिया सीईटी सेलमार्फत केली जाते. राज्य सरकारतर्फे घेण्यात येणारी 'एमबीए सेट'सह 'कॅट', 'सीमॅट' या शासकीय परीक्षांसह खासगी संस्थांतर्फे घेण्यात येणाऱ्या जीमॅट, झॅट, मॉट आणि अॅटमा या चार परीक्षांचाही यात अंतर्भाव होता. राज्यात २०१८-१९मध्ये २६ जणांनी अॅटमाची बनावट गुणपत्रिका देत प्रवेश घेतला होता, तर २०१९-२०मध्ये अशाच प्रकारे २९ जणांनी प्रवेश घेतला. यापैकी पाच जण पुण्यातील असल्याने या संदर्भात चतुःशृंगी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. त्यामुळे खासगी संस्थांद्वारे घेतल्या जाणाऱ्या प्रवेश परीक्षेतून राज्यात एमबीएला प्रवेश दिले जाणार नाही, असे आदेश उच्च व तंत्र शिक्षण विभागाने १६ मार्च रोजी दिले होते.



राज्यात या प्रवेशाची सुमारे ५० हजार विद्यार्थी क्षमता आहे. त्यापैकी १७ टक्के प्रवेश हे अॅटमा परीक्षेच्या माध्यमातून केले जातात. यात परप्रांतीय विद्यार्थ्यांची संख्या जास्त असल्याने त्याचा फटका पुणे व मुंबईतील व्यवस्थापन संस्थांना बसणार होता. दरम्यान, या संदर्भात विद्यार्थ्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर न्यायालयाने दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेत अॅटमा, जीमॅट, मॅट आणि झॅट या चार खासगी संस्थांच्या प्रवेशावरील बंदी उठवली असून, २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना या परीक्षांच्या माध्यमातून प्रवेश घेता येणार आहे.

“ गुणपत्रिकेची पडताळणी आणि प्रवेश देणे याच्याशी आमचा काही संबंध नसतो. हे सर्व संबंधित संस्थेकडून केले पाहिजे. तरीही आमच्या परीक्षांद्वारे होणाऱ्या प्रवेशावर बंदी घातली होती. उच्च न्यायालयाने ही बंदी उठवल्याने शैक्षणिक संस्थांना दिलासा मिळाला आहे. एमबीए प्रवेशासाठी नोंदणी करण्यासाठी १३ डिसेंबरपर्यंत मुदत असून, त्यामध्ये शासनाने वाढ करावी.

- डी. वाय. पाटील, अध्यक्ष, अॅटमा

Sakaal: 13.12.2020

## News Paper Clippings During December 2020

Section: Education

# गुणपत्रिकेअभावी प्रवेशाचा गोंधळ!

## एमबीए, एमफार्मसह इतर विद्यार्थी अडचणीत | मुदतवाढ देण्याची मागणी

सकाळ EXCLUSIVE

पुणे, ता. १२ : ''सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून बी.कॉम. उत्तीर्ण झालो. पुढे एमबीएला प्रवेश घ्यायचाय; पण मला अद्याप गुणपत्रिका मिळाली नसल्याने पुढची प्रक्रिया करता येत नाही. अर्ज भरण्यासाठी १३ डिसेंबरपर्यंतच मुदत आहे. गुणपत्रिका नसेल तर आमचे वर्ष वाया जाईल, त्यामुळे मुदतवाढ दिली पाहिजे,'' असे अक्षय जेरे हा विद्यार्थी सांगत होता. 'ही केवळ माझी अडचणी नाही तर अनेक विद्यार्थ्यांना या समस्येला सामोरे जावे लागत आहे,' असेही त्याने सांगितले.

राज्य सीईटी सेलने पदवी व पदव्युत्तर पदवींच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांची केंद्रीय प्रवेश प्रक्रिया सुरू केली आहे. राज्यात पुणे विद्यापीठासह इतर विद्यापीठांनी अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाइन घेतल्या. त्यांचे निकाल जाहीर केले जात आहेत. राज्य सरकारने २०२०-२१ चे शैक्षणिक प्रवेश करण्यासाठी एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना खुल्या गटातून प्रवेश देण्याचे आदेश काढल्यानंतर सीईटी सेलने एमबीए, एम. फार्म., एमटेक, एम. आर्किटेक्टरसह इतर पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे प्रवेश सुरू केले आहेत. यात एमबीए प्रवेशाची नोंदणी करण्यासाठी १३ डिसेंबर, एम. टेक. १७ डिसेंबर, तर एम. फार्म., एमसीएसाठी १६ डिसेंबरची मुदत आहे.

विद्यापीठांनी निकाल उशिरा लावल्याने राज्यातील पदवीधर विद्यार्थ्यांना अद्याप गुणपत्रिका मिळाल्या नाहीत. तसेच महाविद्यालयांकडून 'टीसी'ही देण्यात आले नाहीत. एमबीए, एम. टेक., एम. फार्म.साठी अर्ज करताना गुणपत्रिका व टीसी हे दोन्ही आवश्यक आहे; पण अनेक विद्यार्थ्यांकडे ती नसल्याने त्यांना प्रवेश अर्ज भरण्यामध्ये अडचणी येत आहेत. एमबीएची मुदत रविवारी रात्री संपणार आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थी सीईटी सेलच्या हेल्पलाइनला फोन करून मुदतवाढीची मागणी करत आहेत; पण त्याबाबत काहीही निर्णय झालेला नाही, असे सांगितले जात आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांना वर्ष वाया जाण्याची शक्यता आहे.

" मला बी.फार्मसीला एका विषयात शून्य गुण मिळाले. सुधारित निकाल व गुणपत्रिका अजूनपर्यंत मिळालेली नाही. त्यामुळे एम.फार्म. चा अर्ज भरता येत नाही. विद्यापीठाने १५ तारखेपर्यंत निकाल लावले जातील, असे सांगितले आहे. त्यामुळे सीईटी सेलने मुदत वाढवावी, अन्यथा वर्ष वाया जाईल.
- वैशाली जठार, विद्यार्थिनी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

" विद्यार्थ्यांना प्रवेश घेताना काही प्रमाणात अडचणी येत आहेत; पण विद्यापीठांनी गॅझेटवर निकाल जाहीर केलेले आहेत. त्यामुळे विद्यार्थी संबंधित महाविद्यालयांच्या प्राचार्यांशी संपर्क साधून निकाल सर्टिफाय करू शकतात. त्यामुळे प्रवेश प्रक्रिया पूर्ण करता येईल. तसेच विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ दिले जाणार नाही.
- चिंतामणी जोशी, आयुक्त, सीईटी सेल

Sakaal: 13.12.2020

# आता इंटर्नशिपसह पदवी अभ्यासक्रम

## 'यूजीसी'कडून मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध

म. टा. प्रतिनिधी, पुणे

देशातील विद्यार्थ्यांना पदवीपूर्व स्तरापासूनच रोजगारक्षम करण्यासाठी इंटर्नशिप/अॅप्रेंटिसशिपचा समावेश असलेले पदवी अभ्यासक्रम विकसित करण्याचे आदेश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) देशभरातील विद्यापीठांना दिले. कला, वाणिज्य, विज्ञान, आंतरविद्याशाखीय अशा कोणत्याही विद्याशाखेत हा पदवी अभ्यासक्रम सुरू करता येणार आहेत. तीन वर्षे मुदतीच्या १३२ श्रेयांकांच्या अभ्यासक्रमातील २० टक्के श्रेयांक इंटर्नशिपसाठी असतील, असे 'यूजीसी'ने प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकात सांगितले.

इंटर्नशिप हा विद्यार्थ्यांना रोजगारक्षम करण्यासाठी महत्त्वाचा घटक ठरू शकतो, हे लक्षात घेऊन इंटर्नशिपचा समावेश असलेल्या पदवी अभ्यासक्रमाचा आराखडा 'यूजीसी'कडून मांडण्यात आला आहे. विद्यापीठांना या आराखड्यानुसार अभ्यासक्रम विकसित करायचे आहेत. कला, वाणिज्य, विज्ञान, आंतरविद्याशाखीय अशा कोणत्याही विद्याशाखेत हा पदवी अभ्यासक्रम सुरू करता येणार आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण करून पदवी मिळवलेल्या विद्यार्थ्यांना ट्रान्सडिसिप्लिनरी म्हणून ग्राह्य धरले जाणार असून, पदवीसाठी त्याने निवडलेल्या विषयात किंवा २४ क्रेडिट मिळवलेल्या विषयात पदव्युत्तर पदवीलाही प्रवेश घेता येईल. या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना व्यावसायिक किंवा अव्यावसायिक संस्थांच्या कार्यालयात जाऊन कार्यपरिचयाचा कालावधी पूर्ण करावा लागेल. त्यासाठी शिक्षण संस्थांना व्यावसायिक किं वा अव्यावसायिक संस्थांशी करार करता येतील. तीन वर्षांच्या अभ्यासक्रमातील कार्यपरिचयाचा कालावधी एका सत्राचा असेल.

Maharashtra Times: 13.12.2020



## News Paper Clippings During December 2020

Section: Education

# पदवीपूर्वीच विद्यार्थी रोजगारक्षम

## अभ्यासक्रमात 'कार्य परिचय'; 'यूजीसी'ची मार्गदर्शक सूचना

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना पदवीपूर्व स्तरापासूनच रोजगारक्षम करण्यासाठी 'कार्यपरिचया'चा (इंटर्नशीप/ अॅप्रेंटिसशीप) समावेश असलेले पदवी अभ्यासक्रम विकसित करण्याचे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) देशभरातील विद्यापीठांना दिले आहेत.

'कार्यपरिचय' हा विद्यार्थ्यांना रोजगारक्षम करण्यासाठी महत्त्वाचा घटक ठरू शकतो हे लक्षात घेऊन त्याचा समावेश असलेल्या पदवी अभ्यासक्रमाचा आराखडा 'यूजीसी'ने मांडला आहे. विद्यापीठांना या आराखड्यानुसार अभ्यासक्रम विकसित करावे लागणार आहेत. 'यूजीसी'ने या अभ्यासक्रमाबाबत मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या आहेत. तीन वर्षे मुदतीच्या, १३२ श्रेयांकांच्या अभ्यासक्रमातील २० टक्के श्रेयांक 'कार्यपरिचया'साठी असतील असे 'यूजीसी'ने नमूद केले आहे.

### पदव्युत्तर पदवीला प्रवेश

**अभ्यासक्रम पूर्ण करून पदवी मिळवलेल्या विद्यार्थ्याला 'ट्रान्सडिसिप्लिनरी' म्हणून ग्राह्य धरले जाणार असून, पदवीसाठी त्याने निवडलेल्या विषयात किंवा २४ श्रेयांक मिळवलेल्या विषयात पदव्युत्तर पदवीलाही प्रवेश घेता येईल.**

कला, वाणिज्य, विज्ञान आंतरविद्याशाखीय अशा कोणत्याही विद्याशाखेत हा पदवी अभ्यासक्रम सुरू करता येणार आहे. या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनि व्यावसायिक किंवा अव्यावसायिक संस्थांच्या कार्यालयात जाऊन कार्यपरिचयाचा कालावधी पूर्ण करावा लागेल. त्यासाठी शिक्षण संस्थांना व्यावसायिक किं वा अव्यावसायिक संस्थांशी सामंजस्य करार करता येतील. तीन वर्षांच्या अभ्यासक्रमातील (पान ४ वर)



# पदवीपूर्वीच विद्यार्थी रोजगारक्षम

*(पान ३ वरून)* कार्यपरिचयाचा कालावधी एक सत्राचा असेल. कार्यपरिचयाच्या सत्राचे तीन वर्षांमध्ये वेगवेगळ्या टप्प्यात किंवा सलग अशा कोणत्याही पद्धतीने नियोजन करता येईल.

देशातील पारंपरिक पदवीधर रोजगारक्षम नसल्याचे आढळते. त्यामुळे विद्यार्थ्यांना पारंपरिक पदवीसह अन्य कौशल्ये प्राप्त करणे आवश्यक झाले आहे. त्यामुळेच उद्योगांना शिक्षणाशी जोडून घेणे, विद्यार्थ्यांची पदवीपूर्व स्तरापासूनच रोजगारक्षमता वाढवण्याचे उद्दिष्ट 'यूजीसी'ने ठेवले आहे.

'कार्यपरिचया'साठी नॅशनल अॅप्रेंटिसशीप ट्रेनिंग स्कीमचाही वापर करता येऊ शकतो. विद्यार्थ्याने केलेल्या 'कार्यपरिचया'चे मूल्यमापन संबंधित व्यावसायिक किंवा अव्यावसायिक संस्थेकडून करण्यात येईल. विद्यार्थ्याने 'कार्यपरिचया'साठी मिळवलेले गुण गुणपत्रिकेवर नमूद केले जातील. पदवी मिळवण्यासाठी विद्यार्थ्याला 'कार्यपरिचया'मध्ये उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल, असे 'यूजीसी'ने स्पष्ट केले आहे.

# News Paper Clippings During December 2020

## Section: Education

### विद्यापीठ करणार आद्यक्रांतिगुरू लहुजी वस्ताद यांच्या कार्याचे संशोधन -कुलगुरू

पुणे, दि. १२ (प्रतिनिधी) - आद्यक्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे व मुक्ता साळवे यांच्या कार्याचे अधिकाधिक संशोधन विद्यापीठाकडून करून त्यांच्या कार्याची ओळख जगाला करून देऊ, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी व्यक्त केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि मातंग विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आद्यक्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल मान्यवरांच्या सत्कार समारंभात कुलगुरू डॉ. नितीन करमळकर बोलत होते. संस्थेचे संस्थापक-अध्यक्ष राजेश रासगे यांनी कुलगुरूंना मुक्ता साळवे यांची प्रतिमा भेट देऊन सत्कार केला.

यावेळी कुलगुरू डॉ. करमळकर, प्रभारी कुलगुरू डॉ. एन. एस. उमरानी, रजिस्ट्रार प्रफुल्ल पवार, नवसंशोधन प्रकल्पाच्या डायरेक्टर अपूर्वा पालकर व राजेश रासगे उपस्थित होते.

'अण्णाभाऊ साठे फाऊंडेशन'चे संस्थापक-अध्यक्ष भाऊसाहेब सोनवणे, पूजा मनीष आनंद, डॉ. उज्ज्वला हातागळे, सुरेश नाना पवार, आश्रू खवळे, सुजित रणदिवे, विजय साळवे, राजू दावरे, सचिन तायडे आदींचा यावेळी सत्कार करण्यात आला. माउली बोजवारे, राजेंद्र सोनवणे, सचिन कांबळे, रोहित जडुल, महेंद्र पाटोळे, कवी दत्ता अडागळे, गणेश मोरे, दत्ता घडे, रोहित भिसे आदी मान्यवर उपस्थित होते.

Saamana: 13.12.2020

### 'कोचिंग क्लासना परवानगी द्या'

पुणे : 'पुरेशी काळजी घेऊन आणि सर्व नियम पाळून खासगी शिकवणी वर्ग सुरू करण्यास परवानगी द्यावी,' अशी मागणी 'कोचिंग क्लासेस टीचर्स फेडरेशन अँड सोशल फोरम'तर्फे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे करण्यात आली आहे.

फोरमचे अध्यक्ष बंडोपंत भुयार व सचिव रफिक शेख यांनी निवेदनाद्वारे ही मागणी मुख्यमंत्र्यांकडे आणि शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांच्याकडे केली आहे. 'क्लासचालकांसमोर अडचणींचा डोंगर उभा राहिला आहे. २३ नोव्हेंबरपासून ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी शाळांमध्ये नियमितपणे जात आहेत. याच धर्तीवर सर्व नियम पाळून खासगी शिकवणी वर्गही सुरू केले जाऊ शकतात,' असे भुयार यांनी म्हटले आहे.

Maharashtra Times: 14.12.2020

### विद्यापीठ कायद्यामधील सूचना २१ डिसेंबरपर्यंत स्वीकारणार

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मध्ये सुधारणा करण्यासाठी राज्य शासनातर्फे स्थापन केलेल्या समितीस सूचना सादर करण्यासाठी येत्या २१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ दिली आहे, असे उच्च शिक्षण संचालक कार्यालयाकडून कळविले आहे.

उच्च शिक्षण क्षेत्रातील बदलते प्रवाह व नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यांना अनुसरून उच्च शिक्षणातील नवे प्रवाह सामावून घेण्यासाठी आणि विद्यापीठ कायद्यात सुधारणा करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे.

सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी, पालक आणि समाजातील विविध घटकांकडून विद्यापीठ कायद्यातील सुधारणांबाबत १३ डिसेंबरपर्यंत ऑनलाइन पद्धतीने सूचना मागवल्या होत्या, असे उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांनी सांगितले.

Lokmat: 14.12.2020

### एमबीएची प्रवेशप्रक्रिया स्थगित

#### राज्य सरकारच्या निर्णयानुसार पुन्हा प्रवेश होणार

मुंबई, ता. १३ : व्यवस्थापन अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष (सीईटी) किंवा केंद्रीय प्रवेश परीक्षाच (कॅट, सीमॅट) प्रवेशासाठी ग्राह्य धरण्याचा सरकारचा निर्णय पुढील वर्षापासून लागू करण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे एमबीएची प्रवेशप्रक्रिया तात्पुरती सीईटी सेलने स्थगित केली आहे. प्रवेशप्रक्रियेबाबत राज्य सरकारच्या सूचनांनंतर पुन्हा प्रवेश सुरू करण्यात येतील, असे सीईटी सेलने स्पष्ट केले.

गेल्या वर्षीपर्यंत खासगी संस्था, संस्थांच्या संघटना यांच्याकडून घेण्यात येणाऱ्या ॲटमा, सॅट, मॅट यांसारख्या अनेक परीक्षांचे गुण प्रवेशासाठी ग्राह्य धरण्यात येत होते; परंतु गेल्या वर्षी सुमारे ४० विद्यार्थ्यांनी खासगी संस्थांच्या परीक्षांची खोटी गुणपत्रके जोडून नामवंत संस्थांमध्ये प्रवेश घेतल्याचे उघड झाले होते. यावर काही विद्यार्थ्यांनी न्यायालयात आव्हान दिले होते. त्यानंतर याप्रकरणी तीनच प्रवेश परीक्षा ग्राह्य धरण्याच्या आदेशाची पुढील वर्षापासून अंमलबजावणी करावी, असा निर्णय दिला आहे.

**फार्मसी, इंजिनिअरिंगसाठी आवाहन**

व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेश परीक्षेच्या सीईटी निकालानंतर सीईटी सेलने इंजिनिअरिंग आणि फार्मसी अभ्यासक्रमाची प्रवेशप्रक्रिया सुरू केली आहे. फार्मसी आणि इंजिनिअरिंगचे अर्ज भरण्यास काही तासांचा अवधी शिल्लक राहिल्याने या अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांनी अर्ज भरावेत, असे आवाहन सीईटी सेलमधील अधिकाऱ्यांनी केले आहे.

Sakaal: 14.12.2020



News Paper Clippings During December 2020

Section: Education

### बारावी परीक्षेचे अर्ज उद्यापासून भरता येणार

पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून २०२१ आयोजित करण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (बारावी) परीक्षेचे अर्ज उद्या (मंगळवार) पासून भरता येणार आहे.

बारावीच्या नियमित विद्यार्थ्यांनी त्यांचे अर्ज उच्च माध्यमिक शाळा किंवा कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत सरल डेटाबेसवरून उद्या (मंगळवार) पासून ते दि. ४ जानेवारी, २०२१ पर्यंत भरायचे आहेत, तर व्यवसाय अभ्यासक्रम शाखेचे नियमित विद्यार्थी, पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खासगी विद्यार्थी, खासगी विद्यार्थी, श्रेणी सुधार, तसेच काही विषय घेऊन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी दि. ५ ते १८ जानेवारी, २०२१ दरम्यान ऑनलाइन अर्ज भरायचे आहेत. 'महाएसएससीबोर्ड डॉट इन' या संकेतस्थळावर अर्ज भरता येतील.

विद्यार्थ्यांचे अर्ज भरल्यानंतर त्यांना महाविद्यालयीन लॉगिनमधून प्री-लिस्ट उपलब्ध करून दिली जाईल. प्री-लिस्टवरील माहिती आणि जनरल रजिस्टरमधील माहिती विद्यार्थ्यांनी पडताळून पाहून खात्री करून अर्ज निश्चित करायचा आहे. अर्ज ऑनलाइन पद्धतीने स्वीकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी उच्च माध्यमिक किंवा कनिष्ठ महाविद्यालयांमार्फतच अर्ज भरावे, असे आवाहन राज्य मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी केले.

**फॉर्म १७ भरणाऱ्यांसाठी स्वतंत्र वेळापत्रक**

फॉर्म नंबर १७ द्वारे नोंदणी करणाऱ्या खासगी विद्यार्थ्यांची २०२१ मधील परीक्षेची आवेदनपत्रे भरण्याचा कालावधी स्वतंत्रपणे निश्चित केला जाईल. त्यामुळे जाहीर केलेल्या कालावधीत या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरू नयेत, असेही मंडळाने स्पष्ट केले.

Kesari: 14.12.2020

### विद्यापीठ अधिनियमात सुधारणासाठी मागवल्या सूचना

पुणे, दि. १३ - महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनयम २०१६ मध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने सर्व घटकांकडून ऑनलाइन सूचना मागवल्या आहेत. यासाठी २१ डिसेंबरपर्यंत मुदत असणार आहे.

राज्यातील उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियात सुधारणा करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाचे (युजीसी) माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. सूचना www.unipune.ac.in या संकेतस्थळावरील लिंकद्वारे सादर करता येणार आहे.

Prabhat: 14.12.2020

{ JAIL TOURISM }

### Yerawada jail to soon open for researchers, history students

Dheeraj Bengrut

dheeraj.bengrut@htlive.com

PUNE: History research students and researchers from across the country will be able to visit the historic barracks of the Yerawada Central Jail and other prisons in Nashik and Thane with the jail authorities submitting a proposal to the state government for it. Eminent leaders who took part in India's freedom struggle and even post-Independence were housed at the Yerawada jail at some point and in a bid to provide a hurdle free access to researchers, the decision has been taken.

"We have submitted a detailed proposal to the state government regarding starting this facility for individuals, students, historians and researchers to visit the cells where historic people once stayed during the British era. These tour visits will be free and the timings will be between 12noon and 3pm. Once all the barracks are locked and it is safe for visitors, these visits will be planned," said Sunil Ramanand, additional director general of police (prisons).

This 'jail tourism' concept will be implemented only post-Covid, said Ramanad. Visitors will be allowed to enter the jail premises in the restricted areas only, where the historic leaders were locked up. They won't be allowed to talk to any other prisoners inside the jail. Currently, there are around 5,500 prisoners at the Yerawada Jail.

Yerawada Jail has a long history before the independence, and was built by the British in the year 1871 when it was outside the city limits of Pune. Mahatma Gandhi was locked up in this jail for several years during the 'Quit India Movement' in 1942. Similarly other freedom fighters including Jawaharlal Nehru, Netaji Subhash Chandra Bose, Bal Gangadhar Tilak, Vinayak Damodar Sawarkar and several others have put behind bars in this jail by British government.

"We are waiting for the state government's clearance. We hope that historians and researchers will benefit from these visits," added Ramanand.

Welcoming this move, city-based history research student Kushal Das, said, "I am currently doing research on India's freedom struggle with special focus on Mahatma Gandhi. He was locked up at Yerawada jail and to get access for our research is a critical process. Now through this new initiative if we can get easy access to the historic cells, then, it would certainly benefit our research. Having the real experience of those barracks where these historic leaders stayed is something brilliant."




Yerawada Jail has a long history before the independence, and was built by the British in the year 1871 when it was outside the city limits of Pune. AFP FILE PHOTO

Hindustan Times: 14.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# खासगी परीक्षांद्वारे 'एमबीए' प्रवेशाचा मार्ग मोकळा

प्रभात वृत्तसेवा

**मुंबई उच्च न्यायालयाने उठवली बंदी; विद्यार्थ्यांकडून याचिका**

पुणे, दि. १३ - बनावट गुणपत्रिकाच्या पार्श्वभूमीवर तंत्रशिक्षण विभागाने 'एमबीए' प्रवेशासाठी अँटमा, जी-मॅट, मॅट आणि झॅट या चार खासगी प्रवेश परीक्षांद्वारे महाराष्ट्रात प्रवेश घेण्यावर बंदी घातली होती. मात्र, मुंबई उच्च न्यायालयाने ही बंदी उठवली असून, ही परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना 'एमबीए'ला प्रवेश घेण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

राज्य सीईटी सेलमार्फत राज्यात 'एमबीए व एमएमएस'ची प्रवेश प्रक्रिया राबविली जाते. राज्य शासनातर्फे घेण्यात येणारी 'एमबीए सीईटी'सह 'कॅट', 'सीमॅट' या शासकीय परीक्षांसह खासगी संस्थांतर्फे घेण्यात येणाऱ्या जीमॅट, झॅट, मॅट आणि अँटमा या चार परीक्षांचाही समावेश आहे. राज्यात २०१८-१९ मध्ये २६ जणांनी अँटमाचे बनावट गुणपत्रिका देत प्रवेश घेतला होता. तर, २०१९-२० मध्ये २९ जणांनी प्रवेश घेतला आहे. त्यामुळे खासगी संस्थांद्वारे घेतल्या जाणाऱ्या प्रवेश परीक्षेतून राज्यात 'एमबीए'ला प्रवेश दिले जाणार नसल्याचे उच्च व तंत्र शिक्षण विभागाने स्पष्ट केले होते.

दरम्यान, यासंदर्भात विद्यार्थ्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर न्यायालयाने दोन्ही बाजूचे म्हणणे ऐकून घेत अँटमा, जी मॅट, मॅट आणि झॅट या चार खासगी संस्थांच्या प्रवेश परीक्षांद्वारे प्रवेशावरील बंदी उठवली असून, २०२०-२१ या वर्षात प्रवेश घेता येणार आहे. त्यामुळे एमबीएला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढेल आणि शैक्षणिक संस्थांना प्रवेशाचा कोटा पूर्ण होणे शक्य होणार आहे.

Prabhat: 14.12.2020

पुढारी

# कॅसअंतर्गत प्राध्यापकांच्या मुलाखती २१ डिसेंबरपासून

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाने कॅसअंतर्गत प्राध्यापकांच्या पदोन्नती मिळवण्यासाठी मुलाखतीचा कार्यक्रम येत्या २१ डिसेंबरपासून आखण्याचे प्रस्तावित केले आहे. या मुलाखतीसाठी आवश्यक कार्यवाही न केलेल्या पात्र प्राध्यापकांना १६ डिसेंबरपर्यंत माहिती सादर करावी, अशा सूचना शैक्षणिक विभागाकडून देण्यात आल्या आहेत. दरम्यान, या मुलाखतीचे सविस्तर वेळापत्रक येत्या काही दिवसांत जाहीर करण्यात येईल, अशाही सूचना विभागाकडून देण्यात आल्या आहेत.

विद्यापीठाच्या पुणे, नगर आणि नाशिकच्या कार्यक्षेत्रातील प्राध्यापक अंतिम वर्षाच्या परीक्षांचे नियोजन करण्यात व्यस्त असतांना, विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाने कॅस अंतर्गत प्राध्यापकांच्या पदोन्नती मिळवण्यासाठी मुलाखती कार्यक्रम जाहीर केला होता. त्यामुळे परीक्षांची तयारी करायची की कॅससाठी मुलाखत द्यावी, अशा अडचणीत प्राध्यापक वर्ग सापडला होता. त्यातच कोरोनाचा प्रादुर्भाव अधिक होता. विद्यापीठ प्रशासनाने हा मुलाखतीचा कार्यक्रम परीक्षा झाल्यानंतर आखावा, अशी मागणी प्राध्यापक, सिनेट सदस्य, संस्थाचालकांकडून केल्यानंतर मुलाखतीचा कार्यक्रम स्थगित करण्यात आला होता. त्यानंतर आता हा मुलाखतीचा कार्यक्रम पुन्हा जाहीर करण्यात आला आहे.

Pune Edition
Dec 14, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

GET UNTANGLED ADVERTORIAL, EDUCATION PROMOTIONAL FEATURE

# UGC to disburse stipend sans institute's monthly confirmation

**The research scholars will no longer have to submit multiple documents signed by the university officials to receive the fellowship stipend amid the pandemic, reports Sheetal Banchariya**

The University Grants Commission (UGC) has decided to release the research fellowship funds without the monthly confirmation from institutions. The stipend is being released through Direct Benefit Transfer (DBT) mode, which credits the stipend amount directly to the bank accounts of the research scholars.

Bhushan Patwardhan, vice chairman, UGC, tells *Education Times* that since institutions are involved at all the important junctures in the fellowship process, there is no dire need for monthly confirmation and most often there are no major changes in the details of bonafide scholars on a monthly basis. "As pandemic has made it difficult for the institutes to function and no scholars can visit the campuses, it is practical to move ahead with an alternative approach. Earlier, there was a delay in transferring the stipend due to some technical problems and issues with Canara bank. But, now things have been sorted," Patwardhan says.

Faisal Nazir from Sitamarhi, Bihar, a recipient of Senior Research Fellowship (SRF) pursuing PhD from Jamia Millia Islamia (JMI) faced tremendous problems in getting the stipend in the last five months. He hopes the move will help him receive his stipend without hassle. "We submit forms of continuation, HRA and contingency after getting the documents signed from the supervisor, HoD and registrar. This is a tedious process for those away from the campus as it involves paperwork and frequent visits to the university," he says.

While there is relief among scholars regarding timely disbursal of stipend, direct transfer of amounts without institutes' monthly confirmation may lead to financial chaos.

Patwardhan says that the paperwork including the details of bank account and fellowships are completed by the institutes and there are no frequent changes. Besides, the UGC follows an evaluation process where review reports are to be submitted by the institutes, which negates any possibility of unethical practice.

Shamim Ahmad received Junior Research Fellowship (JRF) at JNU but could not upgrade to SRF due to the pandemic. He has not received any stipend since November 2019.

"The SRF meeting was fixed on March 24, 2020, but was cancelled due to coronavirus. After the second meeting in October, I got the SRF committee report after one month, which I summited to the university branch. However, I have not been upgraded yet. I was unable to pay the mess bill and faced difficulties in continuing my research; hence I returned to my hometown in Bihar, but I want to return to Delhi as soon as possible," Ahmad says.




The Times of India:14.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

पुढारी

# विद्यापीठ कायद्यातील बदल : एक अपेक्षा

***महाराष्ट्र शासनाने अलीकडेच महाराष्ट्र पब्लिक युनिव्हर्सिटीज अ‍ॅक्ट-२०१७ मध्ये दुरुस्त्या सुचविण्यासाठी एका सक्षम समितीची नियुक्ती केली आहे. महाराष्ट्राचा पहिला समावेशक विद्यापीठ कायदा-१९७४ मध्ये झाला. तो पुढच्या २२/२१ वर्षांसाठी कार्यवाहीत राहिला. नंतर त्यात सुधारणा करण्यासाठी प्रा. निगवेकर समिती, मा. काकोडकर समिती व श्रीमती कुसुम बन्सल समिती - अशा तीन उच्च-पात्रता तज्ज्ञ समितीच्या प्रगाढ चिंतनानंतर २०१६-१७ चा महाराष्ट्र पब्लिक युनिव्हर्सिटीज अ‍ॅक्ट तयार झाला.***



उपरोक्त दुरुस्ती प्रस्ताव पूर्वीच्या शासनाखाली (काँग्रेस प्रभावित) सुरू झाला. त्याला अंतिम स्वरूप प्राप्त झाले, राष्ट्रीय विकास आघाडीच्या (आजच्या प्रणिता) सत्ता काळात. आता सकृतदर्शनी असे दिसते की, ३/४ वर्षांतच या कायद्यात दुरुस्ती करण्याची आवश्यकता 'राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२०' मध्ये सुचविण्यात आलेले, उच्चतर शिक्षण व्यवस्थेतील मूळगामी, दूरगामी व समावेशक बदल, यातून निर्माण झाली. मधल्या काळात झालेल्या कुलगुरू नियुक्त्या, कुलपती नामनिर्देशन व नव्या कायद्याच्या अव्यवहार्य तरतुदी व त्यामुळे विद्यापीठ - साधारण प्रशासन व परीक्षा प्रशासन यातील अडचणी, हीही कारणे असू शकतात.

राष्ट्रीय शिक्षण धोरण-२०२० चा अंतिम मान्य मसुदा लक्षात घेता, देशाच्या उच्चतर शिक्षण व्यवस्थेत मोठे बदल झालेत. ते पुढीलप्रमाणे- उच्चतर शिक्षण संस्था तीन प्रकारच्या असतील. संशोधन प्राधान्य विद्यापीठ, अध्यापन प्राधान्य विद्यापीठ, पदवी प्रदान करू शकणारी स्वायत्त महाविद्यालये, आंतरशास्त्रीय अध्ययन - अध्यापन - संशोधन आवश्यकता, संलग्न महाविद्यालये ही व्यवस्था बंद, स्टँड अलोन किंवा एक शास्त्रीय महाविद्यालये बंद होणार, एम.फील. अभ्यासक्रम बंद, उच्चतर शिक्षण व्यवस्थेचे नियमन-करणारी नवी व्यवस्था, राष्ट्रीय संशोधन प्राधिकरणाची स्थापना, याखेरीज इतरही अनेक बदल तपशिलात आहेत.

स्वायत्त विद्यापीठे वा विद्यापीठे या व्यवस्थेच्या भवितव्याबद्दल हे धोरण जसे संदिग्ध आहे, तसेच शाखा निहाय (कृषी, आरोग्य, अभियांत्रिकी, कला, क्रीडा इ.) विद्यापीठांचे भविष्यही अस्पष्ट आहे. प्रकारात्मक वा रचनात्मक स्वरूपाच्या मोठ्या बदलांमुळे उच्चतर शिक्षण संस्थांचे अर्थकारण आमूलाग्र बदलणार. विशेषत: संलग्न महाविद्यालये/ संस्था यांच्या अप्रत्यक्ष महसूल पुरवठ्यावर विद्यापीठ व्यवस्थेचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात अवलंबून असते. नोंदणी, मान्यता, परीक्षा, पदवी प्रदान, शुल्क इ. विद्यापीठांचे उत्पन्न घटणार. संलग्न महाविद्यालये/ मान्यता प्राप्त संस्था नसल्यामुळे, स्वायत्त महाविद्यालये परीक्षा स्वत: घेणार इ. कारणांमुळे विद्यापीठांच्या शिक्षकेतर कर्मचारी संख्येचे वाजवीकरण करावे लागणार. त्यामुळे काही प्रमाणात खर्च कमी होईल, पण उत्पन्न घटीच्या तुलनेत कमीच.

सर्वात महत्त्वाचे, उपरोक्त खासगी, सार्वजनिक, अनुदानित, विना अनुदानित, स्वायत्त अशा विविध उच्चतर शिक्षण संस्थांमध्ये आपसात कोणतेच संबंध असणार नाहीत, ते स्पष्ट करण्याची गरज आहे. ही सर्व पार्श्वभूमी लक्षात घेता, प्रस्तुत लेखकाच्या मते सध्याच्या 'विद्यापीठ कायदा दुरुस्ती समितीने (२०२०) उच्चतर शिक्षण संस्थांचे नियमन करण्यासाठी' चार स्तरीय नियंत्रण व्यवस्था निर्माण करणे आवश्यक आहे.

- राज्य उच्चतर शिक्षण धोरण नियंत्रण मंडळ - छत्र स्वरूप शिखर संस्था.

- संशोधन - प्राधान्य विद्यापीठ व्यवस्था, अध्ययन - प्राधान्य विद्यापीठ व्यवस्था, सार्वजनिक खासगी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे वरील राज्य उच्चस्तर शिक्षण धोरण नियंत्रण मंडळाची रचना.

मुख्यमंत्री - अध्यक्ष, शिक्षणमंत्री (उच्च शिक्षण) - उपाध्यक्ष, सचिव (उच्च शिक्षण) - सचिव, संशोधन प्राधान्य विद्यापीठाचे एक कुलगुरू-चक्रिय पद्धतीने, अध्यापन प्राधान्य विद्यापीठाचे एक कुलगुरू-चक्रिय पद्धतीने, ज्येष्ठ उद्योजक-१ यांची नेमणूक राज्यपाल, ज्येष्ठ बँकर-१ मुख्य न्यायाधीश, ज्येष्ठ कृषीपंडित-१ विधानपरिषदेचे अध्यक्ष, ज्येष्ठ सहकार तज्ज्ञ-१ यांच्या निवड समितीने करावी. ख्यातनाम शास्त्रज्ञ-१, ख्यातनाम अर्थतज्ज्ञ-१, ज्येष्ठ लेखा परीक्षक-१, ज्येष्ठ आर्किटेक्ट-१, ज्येष्ठ राष्ट्रीय क्रीडापटू-१ असे गठित व्हावे. त्याची मुदत ५ वर्षांची असावी. त्याची वर्षातून किमान एक शक्यतो मे महिन्यात सभा व्हावी. या सर्वच स्तरावर उच्चतर शिक्षण संस्थांसाठी समान नियंत्रण रचना असावी. ती पुढीलप्रमाणे - नियामक मंडळ, विद्या परिषद, अभ्यास मंडळे, परीक्षा मंडळ, वित्त समिती, विविध समित्या, खरेदी समिती, नियोजन समिती, क्रीडा समिती, विद्यार्थी कल्याण समिती, मानव संसाधन नियोजन समिती, ग्रंथालय समिती, तक्रार निवारण समिती, संशोधन/ प्रकाशन समिती, परीक्षा व्यवहार समिती, गरजेप्रमाणे विशेष त्या योजनांसाठी समिती नेमण्याचा अधिकार संस्था प्रमुखाला असावा. उपरोक्त सर्व मंडळाच्या सदस्यांची नेमणूक अनुभव, शैक्षणिक पात्रता या निकषांच्या आधारे व्हावी. त्या विशेष उपलब्धी बाबतीत सध्याच्या समितीने पारदर्शित्व नियमावली करावी.

म्हणजेच आताच्या समितीला एकाच कायद्याची फेररचना करून थांबता येणार नाही. चार कायदे करावे लागतील. असे कायदे करताना - नेमकी उद्दिष्टे, मर्यादित घटक रचना, स्पष्ट अधिकार विभागणी, अंतर्गत अधिकार मंडळात पदसिद्ध व नामनिर्देशित सदस्यत्व, शिक्षकेतर अधिकाऱ्यांचे किमान प्रमाण, मर्यादित नि:संदिग्ध मांडणी या निकषांचा विचार करावा. नव्या रचनेत शिक्षक पदे वाढवावीत. शिक्षकेतर पदे आहे तशी ठेवावीत. त्यासाठी विद्यार्थी संख्येचा निकष द्यावा. जुन्या रचनेतून नव्या रचनेत जाताना निर्माण होणारे मनुष्य बळाचे विशेषत: अतिरिक्त मनुष्य बळाच्या पुनर्योजनेसंबंधीचे, मालमत्तेच्या मालकीचे/ हस्तांतरणाचे, नुकसान भरपाईचे, कज्जे खटल्याचे इ. संबंधित प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी एका अस्कार्या लवादाची Transitory Tribunal (५ वर्षांसाठी) नेमणूक व्हावी. या संबंधात एक पोट-नियमावली शासन करेल, अशी तरतूद सर्व संबंधित कायद्यात करावी.

थोडक्यात, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा-२०१७ मध्ये दुरुस्ती करण्याऐवजी, चार स्वतंत्र नवीन कायदे करणे आवश्यक आहे. १९२४ च्या महाराष्ट्र विद्यापीठे कायद्यातील अनेक तरतुदी उत्तम, नि:संदिग्ध व परिणामकारक आहेत. त्यांचा सीमांत बदल करून वापर करावा. विद्याशाखा कमी करू नयेत. अधिष्ठातांची निवड गुणवत्तेच्या निकषावर व्हावी. त्यासाठी कुलगुरू, प्र-कुलगुरू व कुलसचिव यांच्या समितीने निर्णय घ्यावा. अधिष्ठाता पदावर काम व नेहमीचे अध्यापनाचे काम याचे पर्याप्तीकरण करणे शहाणपणाचे ठरेल. या समितीने प्रस्तावित मर्यादित संदर्भ कक्षांच्या बाहेर पडून अहवाल लिहिण्याची गरज आहे; अन्यथा आणखी ३/४ वर्षांत पुन्हा येरे माझ्या मागल्या म्हणण्याची वेळ येऊ शकते. वरचेवर बदलणाऱ्या कायद्यामुळे कार्याची हाती व घटकावर अन्याय होण्याची शक्यता वाढते.

**- प्रा. डॉ. जे. एफ. पाटील**

Pune Edition
Dec 14, 2020 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# कुलपती, कुलगुरूंच्या अधिकारांना कात्री?

## विद्यापीठ कायद्यातील बदलांची शिक्षण वर्तुळात चर्चा

**रसिका मुळ्ये, लोकसत्ता**

**मुंबई :** राज्यात विद्यापीठ कायद्यानुसार असलेले कुलपती आणि कुलगुरूंचे अधिकार कमी करून विद्यापीठाच्या कामकाजात हस्तक्षेप वाढवण्याच्या सरकारच्या हालचाली सुरू असल्याची चर्चा शिक्षक, कर्मचारी संघटना आणि विद्यापीठातील अधिकाऱ्यांमध्ये सुरू आहे.

राज्याच्या विद्यापीठ कायद्यात बदल करण्यासाठी उच्च आणि तंत्रशिक्षण विभागाने काही महिन्यांपूर्वी समिती नेमली. राज्यातील परीक्षांच्या मुद्यावरून विद्यापीठावर नेमका अधिकार कुलपती, कुलगुरू की शासनाचा, यावर झालेल्या वादंगानंतर लगेच कायद्यातील बदलांसाठी सुरू झालेल्या हालचालींनी विभागाच्या उद्देशाबाबत संशयाचे वातावरण निर्माण झाले होते. त्यात सध्या शिक्षक, प्राचार्य, कर्मचारी, अधिकारी, विविध संघटना यांच्यापर्यंत कायद्यातील मूळ तरतूद आणि प्रस्तावित बदलांचे तपशील असलेले एक 'अनधिकृत' पत्र आणि संदेशांनी संशयात भर घातल्याचे दिसते. कुलगुरू निवडीमध्ये असलेले कुलपतींचे अधिकार कमी करून मुख्यमंत्री किंवा शासनाचा हस्तक्षेप वाढवणे, विद्यापीठांच्या अधिष्ठात्यांची संख्या वाढवणे, अधिकार मंडळांमध्ये कुलगुरूंनी *(पान ८ वर)*

लोकसत्ता Mon, 14 December 2020
https://epaper.loksatta.com/c/57011720

# कुलपती, कुलगुरूंच्या अधिकारांना कात्री?

*(पान १ वरून)* नामनिर्देशन केलेल्या सदस्यांची संख्या कमी करणे, अधिसभेचे अधिकार वाढवणे असे बदल करण्याच्या हालचाली सुरू असल्याची चर्चा विद्यापीठांमध्ये आहे.

**कोणत्या बदलांची चर्चा?**

सध्या राज्यातील विद्यापीठांच्या कुलगुरूंची निवड कुलपती म्हणजेच राज्यपाल करतात. कुलपतींनी नेमलेल्या समितीतील सदस्य कुलगुरूंच्या नावाची शिफारस कुलपतींकडे करतात. त्याऐवजी मुख्यमंत्र्यांनी नामनिर्देशित केलेला सदस्य निवड समितीचा अध्यक्ष असावा आणि समितीने शिफारस केलेल्या उमेदवारांपैकी एका उमेदवाराच्या नावाची शिफारस मुख्यमंत्री कुलपतींना करतील, अशी तरतूद करण्यात येण्याची चर्चा आहे. तसेच सध्याच्या कायद्यानुसार सर्व अभ्यासक्रम चार विद्याशाखांमध्ये विभागण्यात आले असून, प्रत्येक विद्याशाखेसाठी एक याप्रमाणे अधिष्ठात्यांची नियुक्ती कुलगुरू करतात.

अधिष्ठात्यांची संख्या वाढवण्यात यावी, प्रत्येक विद्याशाखेने त्यांच्या सदस्यांमधून अधिष्ठात्यांची निवड करावी, अधिसभेतील विविध घटकांचे प्रतिनिधीत्व वाढवण्यात यावे, कुलगुरू नामनिर्देशित सदस्यांची संख्या कमी करण्यात यावी, असे बदल प्रस्तावित असल्याची चर्चा आहे.

आतापर्यंत साधारण अडीचशे सूचना समितीकडे आल्याची माहिती विभागातील अधिकाऱ्यांनी दिली. 'फिरत असलेल्या प्रस्तावित बदलांबाबत कल्पना नाही. सूचना काय आहेत याची छाननी अद्याप करण्यात आलेली नाही.

आलेल्या सर्व सूचना समिती शंभर टक्के स्वीकारेल किंवा नाकारेल असेही नाही,' असेही विभागातील एका वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सांगितले. कायद्यात काय बदल व्हावेत याबाबत www.unipune.ac.in या संकेतस्थळावर सूचना पाठवता येतील.

**सूचना पाठवण्यास मुदतवाढ**

शिक्षक, प्राचार्य, कर्मचारी, अधिकार मंडळांचे सदस्य, विविध संघटना यांना कायद्यातील बदलांबाबत सूचना पाठवण्याचे आवाहन उच्चशिक्षण विभागाने केले होते. सूचना पाठवण्यासाठी रविवारपर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र, आता सूचना पाठवण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली असून २९ डिसेंबरपर्यंत सूचना पाठवण्यात येणार आहेत.

epaper.loksatta.com

लोकसत्ता Mon, 14 December 2020
https://epaper.loksatta.com/c/57011769

# व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशअर्जास मुदतवाढ

**पुणे, ता. १४ :** सीईटी सेलची साईट हँग होणे, कागदपत्र अपलोड न होणे आणि विद्यापीठांकडून निकालपत्र न मिळणे या कारणामुळे विद्यार्थी हैराण झाले आहेत. अर्ज भरण्यासाठी काही अभ्यासक्रमांची आज शेवटची तारीख होती. त्यामुळे विद्यार्थी हवालदिल झाले होते. त्यानंतर सीईटी सेलने व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवीच्या अर्ज भरण्याच्या मुदतीत वाढ केली आहे, अशी माहिती सीईटी सेलचे आयुक्त चिंतामणी जोशी यांनी दिली.

गेल्या आठवड्याभरापासून सीईटी सेलने व्यावसायिक अभ्यासक्रमांचे अर्ज भरण्यास सुरवात केली आहे. राज्यातील विद्यापीठांनी पदवीच्या अंतिम वर्षाचे निकाल जाहीर केले असले तरी गुणपत्रिका विद्यार्थ्यांना मिळालेल्या नाहीत. त्यामुळे मुदतवाढ द्यावी, अशी मागणी केली जात होती. सोमवारी (ता. १४) थेट द्वितीय वर्ष इंजिनिअरिंग प्रवेश अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असताना संकेतस्थळ दुपारपासून हँग झाले. त्यामुळे सीईटी सेलकडे तक्रार केली. त्याची दखल घेऊन, मुदतवाढ दिली. एमबीए प्रवेशासाठी उच्च न्यायालयाने ॲटमा, सीमॅट आणि मॅट परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावेत, असे आदेश दिल्याने त्यातही मुदतवाढ दिली आहे.

**गुणपत्रिकेअभावी प्रवेशाचा गोंधळ!**

**अभ्यासक्रम व अर्ज भरण्याची सुधारित मुदत**

**पदवी**
- अभियांत्रिकी प्रथम वर्ष : २२ डिसेंबर
- अभियांत्रिकी द्वितीय वर्ष : २१ डिसेंबर
- फार्मसी प्रथम वर्ष : २१ डिसेंबर
- फार्मसी थेट द्वितीय वर्ष : २१ डिसेंबर
- आर्किटेक्चर : २० डिसेंबर
- हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी : २३ डिसेंबर

**पदव्युत्तर पदवी**
- एमबीए-एमएमएस : २० डिसेंबर
- एमई-एमटेक : २४ डिसेंबर
- एमसीए : २३ डिसेंबर
- एम. फार्म : २३ डिसेंबर
- एम. आर्किटेक्चर : २३ डिसेंबर

Sakaal: 15.12.2020



*News Paper Clippings During December 2020*

Section: Education

## पहिल्या, दुसऱ्या फेरीत एकूण ४१ हजार ३८ विद्यार्थ्यांचे प्रवेश

# अकरावी प्रवेशाची आजपासून तिसरी फेरी

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १४ -** इयत्ता अकरावीच्या तिसऱ्या नियमित प्रवेश फेरीची गुणवत्ता यादी मंगळवारी जाहीर होणार आहे.

अकरावीसाठी ३०४ कनिष्ठ महाविद्यालयांत १ लाख ७ हजार ३० प्रवेशाच्या जागा आहेत. आतापर्यंत १ लाख १ हजार ३६२ विद्यार्थ्यांनी ऑनलाइन नोंदणी केली. यातील ८५ हजार ८ जणांचे अर्ज लॉक झाले असून त्यातील ८४ हजार ७१० अर्जांची पडताळणी पूर्ण झाली. ७७ हजार २२२ विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांची पसंती नोंदवली. पहिली व दुसऱ्या नियमित प्रवेश फेरीत मिळून एकूण ४१ हजार ३८ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले. ६५ हजार ९९२ प्रवेशाच्या जागा रिक्त आहेत. तिसऱ्या फेरीला १० डिसेंबरपासून सुरुवात झाली. पात्र, विद्यार्थ्यांची यादी अंतिम करण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर मंगळवारी (दि.१५) सकाळी ११ वा. गुणवत्ता यादी प्रदर्शित होणार आहे. त्यानंतर लगेचच. या फेरीतील उर्वरित प्रवेश प्रक्रिया २० डिसेंबरपर्यंत पूर्ण होणार आहे.

Prabhat: 15.12.2020

# आद्यक्रांतिगुरू लहुजी वस्ताद व मुक्ता साळवे यांच्या कार्याचे संशोधन करू : डॉ. करमळकर



**येरवडा :** आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे व मुक्ता साळवे यांच्या कार्याचे संशोधन विद्यापीठाकडून करून त्यांच्या कार्याची ओळख जगाला पटवून देऊ, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे विद्यापीठ व मातंग विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने, आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल अनेकांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला कुलगुरूंच्या हस्ते क्रांतिगुरू लहुजी वस्ताद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष राजेश रासगे यांनी कुलगुरूंना मुक्ता साळवे यांची प्रतिमा भेट देऊन सत्कार केला. याप्रसंगी प्रभारी कुलगुरू डॉ. एन.एस. उमरानी, प्रफुल्ल पवार, नवसंशोधन प्रकल्पाच्या व्यवस्थापक अपूर्वा पालकर व राजेश रासगे आदी व्यासपीठावर उपस्थित होते.

यावेळी अण्णा भाऊ साठे फाऊंडेशनचे संस्थापक, अध्यक्ष–ज्येष्ठ सामाजिक नेते भाऊसाहेब सोनवणे, नगरसेविका पूजा मनीष आनंद, डॉ. उज्ज्वला हातागळे, सुरेश नाना पवार, आश्रू खवळे, सुजित रणदिवे, विजय साळवे, राजू ढावरे, सचिन तायडे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक राजेश रासगे यांनी तर सूत्रसंचालन व आभार प्रा. सुनील मोरे यांनी केले.

Kesari: 15.12.2020

## News Paper Clippings During December 2020

Section: Education

15/12/2020

# 600 stressed colleges in SPPU study

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** A six-member committee appointed by the Savitribai Phule Pune University will look into financial problems faced by unaided colleges and recommend improvements in 15 days.

Colleges must send their grievances and suggestions via email or a letter by December 18. Chairman Gajanan Ekbote said, "SPPU has about 800 affiliated colleges. Only 200-odd colleges are aided. The non-grant colleges, especially those in rural areas, are under financial stress. We had made a representation to the higher education minister and the vice-chancellor who appointed a committee on Saturday."

The Times of India: 15.12.2020

# प्राध्यापक भरतीही सुरू करा!

## राज्यातील पात्रताधारकांची मागणी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** राज्य शासनाने राज्यातील शाळांतील शिक्षकांची पवित्र संकेतस्थळाद्वारे भरती प्रक्रिया राबवण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे राज्यातील महाविद्यालये आणि विद्यापीठांतील प्रलंबित प्राध्यापक भरतीचे काय, असा प्रश्न उपस्थित करण्यात येत असून, प्राध्यापक भरती तातडीने सुरू करण्याची मागणी राज्यातील पात्रताधारक करत आहेत.

राज्यातील विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये प्राध्यापकांच्या जागा मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. त्यातील रिक्त जागांच्या ४० टक्के जागा भरण्यास शासनाने मान्यता दिली होती. त्यासाठीची मान्यता प्रक्रिया करोना संसर्गापूर्वी सुरू होती. मात्र करोना संसर्गामुळे निर्माण झालेल्या आर्थिक अडचणीनंतर पदभरती न करण्याचा निर्णय राज्य शासनाने मे महिन्यात घेतला. त्यानंतर काही दिवसांपूर्वी शिक्षक भरतीची प्रक्रिया सुरू करण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. त्यामुळे ही प्रक्रिया आता पुन्हा सुरू करण्यात आली आहे. मात्र प्राध्यापक भरती प्रक्रियेबाबत अद्याप काहीच हालचाल होत नसल्याने अस्वस्थता असून, शिक्षक भरतीला मान्यता दिली जाते तर प्राध्यापक महत्त्वाचे नाहीत का, असा प्रश्न पात्रताधारकांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) गेल्या वर्षी विद्यापीठे आणि महाविद्यालयांतील प्राध्यापकांच्या रिक्त जागा शंभर दिवसांत भरण्याचे निर्देश दिले होते. त्यासाठीच्या मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या होत्या. त्यानंतर या भरती प्रक्रियेसाठी मुदतवाढ देण्यात आली. आता शिक्षक भरती प्रक्रिया सुरू करण्यात आल्याने प्राध्यापक भरतीलाही मान्यता देण्याची मागणी राज्यभरातील पात्रताधारकांकडून करण्यात येत आहे.

> मंत्र्यांच्या गाड्यांच्या खर्चासाठी शासनाकडे निधी आहे. पण वरिष्ठ महाविद्यालये आणि विद्यापीठांतील रिक्त असलेल्या १५ हजार सहायक प्राध्यापकांच्या जागा भरण्यासाठी वित्त विभागाकडे निधी नाही का? नेट, सेट, पीएच.डी. धारकांबाबत हा दुजाभाव का?
>
> - प्रा. सुरेश देवढे पाटील, राज्य समन्वयक, नेट-सेट-पीएच.डी. धारक, संघर्ष समिती

लोकसत्ता Tue, 15 December 2020 https://epaper.loksatta.com/c/57029498



News Paper Clippings During December 2020

Section: Education

# Special rounds to begin from Dec 18 after third FYJC list for 66k seats

Times News Network

**Pune:** The third merit list for the first year junior college (FYJC, std XI) admissions for nearly 66,000 seats will be announced on Tuesday by the centralised admissions committee.

Students can confirm their seats up to December 18 after which the CAP will conduct special rounds for the remaining admissions.

There are a total of 304 colleges in Pune region for FYJC seats with an intake of 1.07 lakh. The seats for in-house and management quota are being filled at college level.

The cut-offs for the second round also remained above 90% in many reputed colleges due to improved results this year in the secondary school certificate (SSC, std X) exams.

For the second round, 46,794 applications were received and 23,120 students were allotted colleges of which 9,954 students have confirmed the admissions in the colleges allotted.

Incharge of the CAP in Pune region, Meena Shendkar, said students must fill up the forms looking at the trends in admissions based on the percentages.

'After two rounds, the picture is clear and students can judge which college they would fit best. While filling the preference forms, they should give priority to the top three colleges which has the cut-off near about their percentages scored," she said.

## WHAT COMES NEXT FOR STUDENTS ?

**FROM DECEMBER 15 TO 18**

- **Students to click (proceed for admission) if ok with allotted junior college**
- Confirm admission in the allotted junior college by the student
- **Admission confirmation, rejection of admission or admission cancellation at junior college login**
- Quota admission process also continues for management & minority seats
- **Management quota seats can be surrendered**
- Registration part-1 filling will start for new applicants for the next round

**FOR STUDENTS** ➤ If a student wishes to cancel his/her confirmed admission, he/she can request the college

**FOR COLLEGES** ➤ Collect admission fees only through digital payment modes




**DECEMBER 18**

- Colleges to upload status of admitted students on the website

**DECEMBER 18 AND 19**

- Time reserved for surrender of minority quota seats, surrender of in-house quota seats

**DECEMBER 20**

- Display of vacancy list for special round including management, minority and in-house quota seats surrendered

15/12/2020

The Times of India: 15.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# विद्यापीठ कायद्यात सुधारणा सुचविणार

## सुखदेव थोरात : 'विद्यापीठ कायदा मूल्यमापन समिती'च्या बैठकीस प्रारंभ

लोकमत न्युज नेटवर्क

कोल्हापूर : सार्वजनिक विद्यापीठे कायद्याच्या सर्वच घटकांचे पुनरावलोकन करावे लागणार आहे. त्याहष्टीने या घटकांच्या लेखी सूचनांचा विचार करून त्यातील योग्य व चांगल्या सूचना विचारात घेऊन कायद्यात सुधारणा सुचविण्यात येतील, असे विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांनी सोमवारी येथे सांगितले.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम-२०१६ मध्ये सुधारणा करण्यासाठी डॉ. थोरात यांच्या अध्यक्षतेखाली 'महाराष्ट्र राज्य विद्यापीठ कायदा मूल्यमापन समिती' ही उपसमिती स्थापन केली आहे. या समितीच्या दोन दिवसीय बैठकांना सोमवारी सकाळी विद्यापीठ अधिकाऱ्यांसमवेत बैठकीने प्रारंभ झाला. त्या वेळी डॉ. थोरात यांनी ऑनलाइन मार्गदर्शन केले. आतापर्यंत समितीला विविध सुमारे २५० सूचना प्राप्त झाल्या आहेत. आणखी सूचना अपेक्षित आहेत. कुलगुरू, कुलसचिव, अधिसभा, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आदी सर्व संबंधित घटकांचे या कायद्याच्या अनुषंगाने गेल्या वर्षभरातील अनुभव, अडचणी विचारात घेऊन त्यांनी केलेल्या सूचनांवर विचारविनिमय करण्यात येईल, असे डॉ. थोरात यांनी सांगितले. या वेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदींसह समिती सदस्य उपस्थित होते.

### उपसमितीतील सदस्य

या उपसमितीच्या सदस्यांमध्ये मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. विजय खोले, डॉ. राजन वेळूकर, माजी प्र-कुलगुरू डॉ. नरेश चंद्रा, अधिसभा सदस्य शीतल देवरुखकर-शेठ, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. बी. पी. साबळे, विल्सन महाविद्यालयाचे शिक्षण संचालक डॉ. टी. ए. शिवारे यांचा समावेश आहे.

### विद्यार्थी निवडणुका सुरू करा

विद्यार्थी निवडणुका सुरू करा. अधिकार मंडळांमध्ये शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रतिनिधी वाढवा यासह बृहत् आराखडा, परीक्षा प्रमाद समितीशी संबंधित विविध सूचना या समितीकडे करण्यात आल्या. समिती सदस्य आज (मंगळवारी) सकाळी अकरा ते साडेअकरा दरम्यान विविध विद्यार्थी संघटनांच्या प्रतिनिधींसोबत संवाद साधणार आहेत.

Lokmat: 15.12.2020

# नव्या शिक्षण धोरणामुळे देशाला नवी दिशा

## मणिपूरच्या राज्यपाल डॉ. नजमा हेपतुल्ला : 'नॅशनल टीचर्स काँग्रेस'चे उद्घाटन

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १५ - देशाच्या प्रगतीसाठी वर्तमानकाळात नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाची अत्यंत गरज आहे. २१ व्या शतकात देशाला दिशा देण्यासाठी ते महत्त्वाचे आहे. सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या या लोकशाही देशात शिक्षणाची सुविधा, गुणवत्तापूर्ण शिक्षण, समग्र शिक्षण, नीतिशास्त्र व कायद्याचे ज्ञान देणेसुद्धा गरजेचे आहे, असे विचार मणिपूरच्या राज्यपाल डॉ. नजमा हेपतुल्ला यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणेतर्फे आयोजित ऑनलाइन चौथ्या 'नॅशनल टीचर्स काँग्रेस'च्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. माजी केंद्रीय मंत्री डॉ. मुरली मनोहर जोशी, तसेच डॉ. टोमियो मिझोकामी, दिल्ली येथील युनेस्कोचे संचालक एरिक फाल्ट, आणि संगणकतज्ज्ञ डॉ. विजय भटकर यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थेचे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड हे अध्यक्षस्थानी होते. याप्रसंगी सिटी मॉन्टेसरी स्कूलचे संस्थापक डॉ. जगदीश गांधी व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे अध्यक्ष डॉ. के. कस्तुरीरंगन यांना 'जीवनगौरव पुरस्काराने' सन्मानित केले. यावेळी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कार्याध्यक्ष प्रा. राहुल कराड, कुलगुरू डॉ. एन. टी. राव, प्र-कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस व प्रा. सुहासिनी देसाई हे उपस्थित होते.

### डॉ. के. कस्तुरीरंगन, डॉ. जगदीश गांधी यांना 'जीवनगौरव'

डॉ. नजमा हेपतुल्ला म्हणाल्या, मुलांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्वासाठी व प्रगतीसाठी मातृभाषेतून सर्वांना शिक्षण देण्यात यावे. तसेच, व्यावसायिक व पर्यावरण विषयक ज्ञान असलेले शिक्षण द्यावे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी उच्च शिक्षण व्यवस्थेत बदल घडावयास हवेत. जेणे करून देश विदेशातील विद्यार्थी येथे येऊन शिक्षण घेतील. या देशाला तक्षशिला आणि नालंदा सारख्या विद्यापीठांची परंपरा आहे. ती आता परत आणण्याची वेळ आली आहे.

डॉ. मुरली मनोहर जोशी म्हणाले, शिक्षण हेच देशाच्या प्रगतीचे द्योतक आहे. त्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण हा त्याचा गाभा आहे. २१ व्या शतकात गुणवत्तापूर्ण शिक्षणाची विशेष गरज आहे. यामध्ये विज्ञानाला अग्रक्रम दिला पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे सुद्धा एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. हे धोरण औद्योगिक क्षेत्रासाठीसुद्धा उपयुक्त आहे.

Prabhat: 16.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

ऑनलाइन शिक्षणाचा आला कंटाळा; शहरात फिरतो महाविद्यालयात का नाही ?

# जानेवारीत उघडणार महाविद्यालये

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : आम्ही शहरातील हॉटेलमध्ये मित्रांना भेटतो, बाजारात खरेदीला गर्दी करतो, एवढेच नाही तर पर्यटनस्थळांनाही भेटी देतो. कुठेही जाण्यास आम्हाला बंदी नाही; मग कॉलेजमध्ये जाण्यावरच बंदी का? आता बस... आम्हाला ऑनलाईन शिक्षणाचाही कंटाळा आलाय... कॉलेज उघडा आम्हाला वर्गात बसून शिक्षण घेऊ द्या, अशा प्रतिक्रिया आता महाविद्यालयीन विद्यार्थ्यांकडून व्यक्त केल्या जात आहेत. त्याचप्रमाणे विद्यापीठानेही जानेवारीत महाविद्यालय सुरू करण्याच्या दृष्टीने तयारीला लागले आहे.

### दुसऱ्या लाटेच्या भीतीने निर्णय स्थगित

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने डिसेंबर महिनाअखेरीस संलग्न महाविद्यालये सुरु करण्याची तयारी केली होती. परंतु, कोरोनाची दुसरी लाट येण्याची भीती व्यक्त झाल्याने महाविद्यालये सुरु करण्याचा निर्णय स्थगित करण्यात आला. प्राचार्य व प्राध्यापक संघटनेनी महाविद्यालय सुरु करण्यास विरोध दर्शविला होता. परंतु, जानेवारी महिन्यात पुणे,अहमदनगर व नाशिक या तीनही जिल्ह्यातील महाविद्यालये सुरु करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

कोरोनाबाबत आवश्यक काळजी राज्यातील शाळा सुरु करण्यात आल्या आहेत. आवश्यक खबरदारी घेऊन जानेवारी महिन्यात तीनही जिल्ह्यांतील संलग्न महाविद्यालये सुरु करण्याचा विद्यापीठाचा मानस आहे. परंतु, पालिका आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करूनच महाविद्यालये सुरु केली जातील.

- डॉ. नितीन करमळकर, कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

शाळा सुरु होत असतील तर महाविद्यालये सुरु करण्यास कोणतीही हरकत नाही. अनेक विद्यार्थी आरोग्याची काळजी घेऊन पालकांच्या समतीने घराबाहेर पडत आहेत. त्यातच बरेच विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणाला कंटाळले आहेत. त्यामुळे आता महाविद्यालये सुरु करावीत.

- अजय उमरगे, विद्यार्थी

कोरोनामुळे तब्बल आठ महिन्यांपासून घराबाहेर न पडलेली तरुणाई कोरोनाच्या रुग्णांची संख्या घटल्याने बाहेर पडत आहे. शहरातील रस्त्यांवर, हॉटेलमध्ये, एवढेच नाही तर विद्यार्थी आता महाविद्यालयाच्या आवरात मित्रांना भेटून गप्पा मारताना दिसत आहे. त्यातच राज्य शासनाने इयत्ता नववी ते बारावीपर्यंतचे वर्ग सुरू करण्यास परवानगी दिल्यामुळे पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागासह राज्यात अनेक ठिकाणी शाळा सुरू झाल्या आहेत. शालेय विद्यार्थी शाळेत जातात मग आम्ही का नाही? असा प्रश्न आता विद्यार्थी शिक्षकांना विचारू लागले आहेत.

Lokmat: 16.12.2020

# अकरावीची तिसरी फेरी; १२ हजार प्रवेश

## पुढील वर्षीच होणार प्रवेश प्रक्रिया पूर्ण ; ५० हजार विद्यार्थी प्रवेशाच्या प्रतीक्षेत

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रातील अकरावी प्रवेशाच्या तिसऱ्या फेरीतून केवळ १२ हजार ४६१ विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला आहे. त्यामुळे अजूनही तब्बल ५० हजार विद्यार्थी प्रवेशाच्या प्रतीक्षेत आहेत. परिणामी अकरावी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पूर्ण होण्यास जानेवारी उजाडणार असल्याचे दिसून येत आहे.

राज्याच्या शालेय शिक्षण विभागातर्फे ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे. मंगळवारी अकरावी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश समितीतर्फे तिसऱ्या फेरीच्या प्रवेशाची यादी जाहीर केली. या फेरीसाठी ५१ हजार १०७ जागा उपलब्ध होत्या. त्यासाठी अर्ज केलेल्या ३३ हजार ६६१ विद्यार्थ्यांपैकी केवळ १२ हजार ४६१ विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला आहे. त्यात कला शाखेच्या १ हजार ३४३ वाणिज्य शाखेच्या ५ हजार ३०३ तर विज्ञान शाखेच्या ५ हजार ६८३ विद्यार्थ्यांचा समावेश आहे. सर्वच (पान ३ वर)

### अकरावीची तिसरी फेरी; १२ हजार प्रवेश

(पान १ वरून) विद्यार्थ्यांना शहरातील नामांकित महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळावा, असे वाटते. मात्र, नामांकित महाविद्यालयांचा कट ऑफ आणि विद्यार्थ्यांना मिळालेले गुण यात खूप मोठी तफावत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांचा कट ऑफ विचारात घेऊन प्रवेश अर्जात योग्य पसंती क्रम भरले तरच विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मिळालेल्या गुणांचा विचार करून अर्ज भरावेत, असे आवाहन शिक्षण उपसंचालक कार्यालयातील अधिकाऱ्यांनी केले आहे.

**प्रवेश मिळण्याच्या संख्येत घट; घेणारेही झाले कमी**

ऑनलाईन प्रवेशासाठी घेतल्या जात असलेल्या प्रवेश फेऱ्यांमधून प्रवेश मिळणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत घट होत चालली आहे. पहिल्या फेरीतून ४० हजार विद्यार्थ्यांना दुसऱ्या फेरीतून २३ हजार तर तिसऱ्या फेरीतून केवळ १२ हजार ४६१ विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला आहे. पहिल्या फेरीतून ऑनलाईन प्रवेश फेरीतून प्रवेश मिळालेल्या विद्यार्थांपैकी २३ हजार विद्यार्थ्यांनी तर दुसऱ्या फेरीतून ९ हजार ९४४ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला.

**पसंतीक्रमानुसार मिळालेल्या प्रवेशाची माहिती**

पहिला - २,५४३ दुसरा - २,७७३
तिसरा - १,९६८ चौथा - १,४०७ पाचवा - १,१४७

Lokmat: 16.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# 'गुणवत्तेनुसारच पसंतिक्रम भरा'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

अकरावी प्रवेशासाठी कमी न होणारे गुणांचे कटऑफ; तसेच विद्यार्थ्यांचा नामांकित कॉलेजांमध्ये प्रवेश घेण्याच्या आग्रहामुळे प्रवेशाच्या तिसऱ्या फेरीत केवळ १२ हजार ४६१ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर होऊ शकला आहे. त्यातही तिसऱ्या फेरीत नामांकित कॉलेजांचे कटऑफ गुण ८५ टक्क्यांच्या आसपासच आहेत. या फेरीत दोन हजार ५४३ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे कॉलेज मिळाले आहे. त्यामुळे नामांकित ज्युनिअर कॉलेजांमध्ये प्रवेश घेण्याचा आग्रह सोडून विद्यार्थ्यांनी गुणवत्तेनुसार पसंतिक्रम भरावेत, असे आवाहन अकरावी प्रवेश नियंत्रण समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील ज्युनिअर कॉलेजांमध्ये प्रवेशासाठी अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. यातील तिसऱ्या फेरीची गुणवत्ता यादी मंगळवारी जाहीर झाली आहे. अकरावी प्रवेशासाठी ३०४ कॉलेजांमध्ये १ लाख ७ हजार ३० जागा उपलब्ध आहेत. यातील ४१ हजार ९१२ विद्यार्थ्यांनी मंगळवारपर्यंत प्रवेश घेतला आहे. तिसऱ्या फेरीसाठी ३३ हजार ६६१ विद्यार्थी पात्र होते. त्यापैकी १२ हजार ४६१ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर करण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांना १८ डिसेंबरपर्यंत प्रवेश निश्चित करता येणार आहे. त्यानंतर २० डिसेंबरला विशेष फेरीचा तपशील आणि वेळापत्रक जाहीर करण्यात येणार आहे. दोन हजार ५४३ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे कॉलेज मिळाले आहे. त्यामुळे त्यांना प्रवेश घ्यावाच लागेल. अन्यथा विशेष फेरीपर्यंत ते प्रवेश प्रक्रियेतून बाहेर पडणार आहेत.

त्यानंतर दोन हजार ७७३ विद्यार्थ्यांना दुसऱ्या, एक हजार ९६८ विद्यार्थ्यांना तिसऱ्या, एक हजार ४०७ विद्यार्थ्यांना चौथ्या, एक हजार १४७ विद्यार्थ्यांना पाचव्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले आहे, असे समितीच्या वतीने सांगण्यात आले आहे.

**शाखानिहाय प्रवेश जाहीर झालेले विद्यार्थी**

| | |
|---|---|
| कला | एक हजार ३४३ |
| वाणिज्य | पाच हजार ३०३ |
| विज्ञान | पाच हजार ६८३ |
| व्यवसाय शिक्षण | १३२ |
| एकूण | : १२ हजार ४६१ |



**अकरावी प्रवेश प्रक्रियेत आतापर्यंत झालेले प्रवेश**

| कोटा | प्रवेशक्षमता | झालेले प्रवेश |
|---|---|---|
| इनहाउस | ७४८७ | ४०९० |
| मॅनेजमेंट | ४५७६ | १०७० |
| अल्पसंख्याक | १०६८३ | २७०१ |
| कॅप | ८४२८४ | ३३१७७ |
| एकूण | १०७०३० | ४१०३८ |

Maharashtra Times: 16.12.2020

# विद्यापीठात आता 'प्रशाळा'

## मूळ अभ्यासक्रमाबरोबरच विद्यार्थ्यांना आवडीचे विषय शिकता येणार

सकाळ वृत्तसेवा

सकाळ EXCLUSIVE

**पुणे, ता. १५ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात ज्या विभागात प्रवेश मिळाला आहे, तेथेच शिक्षण घेता येईल. इतर विभागातील आवडता विषय शिकता येणार नाही, या नियमाच्या भिंतीचा अडसर दूर होणार आहे. विद्यार्थ्यांना त्यांच्या मूळ अभ्यासक्रमासह आवडीचे इतर पूरक विषयदेखील शिकता येणार आहेत. त्यासाठी विद्यापीठात 'प्रशाळा व्यवस्था' (स्कूल सिस्टिम) विकसित करण्यात आली आहे.**

देशातील केंद्रीय विद्यापीठांमध्ये प्रशाळा व्यवस्थेनुसार शिक्षण देण्याची पद्धत आहे. पुणे विद्यापीठात 'प्रशाळा व्यवस्था' असावी, अशी सूचना 'नॅक'तर्फे करण्यात आली होती. त्यानुसार गेल्या महिन्यापासून कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी नियोजन करून, प्रशाळेची निर्मिती केली आहे. कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी याबाबत नुकताच आदेश काढला आहे. यात ५२ विभाग, अध्यासन केंद्र व अभ्यास केंद्रनिहाय १८ प्रशाळा स्थापन करून प्रत्येक प्रशाळेसाठी एका संचालकांची नियुक्ती केली आहे.

**प्रशाळेचा उद्देश**

- समान अभ्यासक्रम, मूलभूत ज्ञानासारखे असणारे विषय एकत्र शिकविणे
- मनुष्यबळ, भांडवल आणि निधीचा योग्य वापर
- एकाच विभागाचा विचार न करता सर्व विभागांचा विचार करून धोरण

**प्रशाळेचे फायदे**

- विविध विभागांच्या सहकार्याने संशोधनास गती येईल
- विद्यार्थ्यांना विषय निवडीचे स्वातंत्र्य मिळेल
- आंतरराष्ट्रीय संस्थांशी करार करताना फायदेशीर

"शिक्षण क्षेत्रात होत असलेल्या बदलामुळे प्रशाळेचा निर्णय महत्त्वाचा आहे. समान हेतू असलेल्या विषयांच्या प्राध्यापकांमध्ये ज्ञानाची देवाणघेवाण होईल, संशोधनाच्या कामात मदत होईल. तसेच, आंतरराष्ट्रीय संस्थांशी करार करताना प्रशाळा महत्त्वाची ठरेल.
- डॉ. एन. एस. उमराणी, प्र-कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

"प्रशाळेत जे समांतर विषय आहेत, त्यांचे एकत्रीकरण करण्यात आले आहे. उदा. शारीरिक शिक्षण, शिक्षण, निरंतर शिक्षण या विभागांसाठी 'स्कूल ऑफ एज्युकेशन' स्थापन करण्यात आले आहे. विभागांचे एकत्रीकरण झाल्याने प्रयोगशाळा, ग्रंथालय यांसह इतर सुविधाही उपलब्ध होतील. प्रत्यक्ष शिक्षण सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांना याचा अनुभव घेता येईल.
- डॉ. संजीव सोनवणे, संचालक, स्कूल ऑफ एज्युकेशन

"प्रशाळा व्यवस्थेमुळे अधिकार व निर्णयांचे विकेंद्रीकरण झाल्याने विद्याशाखांना आवश्यकतेनुसार निर्णय घेता येतील. विद्यापीठाच्या अंदाजपत्रकात प्रत्येक स्कूलसाठी निधी उपलब्ध होणार असल्याने शैक्षणिक कामाचे व्यवस्थित नियोजन करता येईल.
- डॉ. आदित्य अभ्यंकर, संचालक, स्कूल ऑफ टेक्नॉलॉजी

Sakaal: 16.12.2020

# 'अकरावी प्रवेशासाठी पसंतीक्रम आवश्यक'

**पुणे, ता. १५ :** "अकरावी प्रवेशाच्या प्रतीक्षेत असणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांना शहरातील नामांकित महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळावा, अशी अपेक्षा असते. मात्र, नामांकित महाविद्यालयांचा कट ऑफ आणि विद्यार्थ्यांना मिळालेले गुण यांत मोठा फरक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांचा कट ऑफ विचारात घेऊन प्रवेश अर्जात योग्य पसंतीक्रम भरले, तरच विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार आहे," असे शिक्षण उपसंचालक कार्यालयातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

ऑनलाइन प्रवेशासाठी घेतल्या जात असलेल्या प्रवेश फेऱ्यांमधून प्रवेश मिळणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत घट होत असल्याचे समोर येत आहे. याबद्दल शिक्षण उपसंचालक कार्यालयाला विचारले असता विद्यार्थी महाविद्यालयांचा पसंतीक्रम योग्यरित्या भरत नसल्याचे निरीक्षण संबंधित अधिकाऱ्यांनी नोंदविले आहे. पहिल्या फेरीत ४० हजार १३ विद्यार्थ्यांना, दुसऱ्या फेरीत २३ हजार १२० तर तिसऱ्या फेरीतून केवळ १२ हजार ४६१ विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला आहे. पहिल्या फेरीतून ऑनलाइन प्रवेश फेरीतून जवळपास २३ हजार विद्यार्थ्यांनी तर दुसऱ्या फेरीतून नऊ हजार ९४४ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे. अद्यापही बहुसंख्य विद्यार्थ्यांनी नियमित प्रवेश फेऱ्यांमध्ये निवड होऊनही प्रवेश घेतला नाही. या विद्यार्थ्यांनी नामांकित महाविद्यालयांचा कट-ऑफ पाहून आपल्या अर्जात त्याप्रमाणे महाविद्यालयांच्या योग्य पसंतीक्रम निवडणे महत्त्वाचे असल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे.

Sakaal: 16.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

पुढारी

# महाविद्यालये पसंत पडेनात

## तिसऱ्या फेरीत केवळ १२ हजार ४६१ जणांचे प्रवेश जाहीर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**महाविद्यालयांचे कमी न होणारे कटऑफ आणि विद्यार्थ्यांचा ठराविक महाविद्यालयांमध्येच प्रवेश घेण्याचा हट्ट याचा परिणाम म्हणजे तिसऱ्या फेरीत केवळ १२ हजार ४६१ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर होऊ शकला आहे. त्यातही केवळ २ हजार ५४३ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले आहे. त्यामुळे यापुढे तरी नामांकित महाविद्यालयांचा हट्ट सोडून विद्यार्थ्यांनी मिळालेल्या गुणांचा आणि महाविद्यालयांच्या कटऑफचा विचार करून पसंतीक्रम भरावेत, असे आवाहन प्रवेश समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी केले आहे.**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील ज्युनिअर कॉलेजांमध्ये प्रवेशासाठी अकरावी ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया राबविण्यात येत आहे. यातील तिसऱ्या फेरीची गुणवत्ता यादी मंगळवारी जाहीर झाली आहे. अकरावी प्रवेशासाठी ३०४ महाविद्यालयांमध्ये १ लाख ७ हजार ३० जागा उपलब्ध आहेत. यातील ४१ हजार ९१२ विद्यार्थ्यांनी मंगळवारपर्यंत प्रवेशदेखील घेतला आहे. तिसऱ्या फेरीसाठी ३३ हजार ६६१ विद्यार्थी पात्र होते. त्यापैकी १२ हजार ४६१ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना १८ डिसेंबरपर्यंत प्रवेश निश्चित करता येणार आहे. त्यानंतर २० डिसेंबरला विशेष फेरीचा तपशील आणि वेळापत्रक जाहीर करण्यात येणार आहे.

**मिशन ॲडमिशन**



**शाखानिहाय प्रवेश जाहीर झालेले विद्यार्थी**

कला : **1,343**
वाणिज्य : **5,303**
विज्ञान : **5,683**
व्यवसाय शिक्षण : **132**
एकूण : **12,461**

**आतापर्यंत झालेले प्रवेश**

| कोटा | प्रवेशक्षमता | झालेले प्रवेश |
|---|---|---|
| इनहाउस | ७४८७ | ४०९० |
| मॅनेजमेंट | ४५७६ | १०७० |
| अल्पसंख्याक | १०६८३ | २७०१ |
| कॅप | ८४२८४ | ३३१७७ |
| एकूण | १०७०३० | ४१०३८ |

**२ हजार ५४३ विद्यार्थ्यांना पसंतीचे कॉलेज**

अकरावी प्रवेश नियंत्रण समितीकडून १२ हजार ४६१ विद्यार्थ्यांचे प्रवेश जाहीर केले असले, तरी यातील २ हजार ५४३ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले आहे. त्यामुळे त्यांना प्रवेश घ्यावाच लागेल. अन्यथा विशेष फेरीपर्यंत ते प्रवेशप्रक्रियेतून बाहेर पडणार आहेत. २ हजार ७७३ विद्यार्थ्यांना दुसऱ्या, १ हजार ९६८ विद्यार्थ्यांना तिसऱ्या, १ हजार ४०७ विद्यार्थ्यांना चौथ्या, १ हजार १४७ विद्यार्थ्यांना पाचव्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले आहे. यासह अन्य विद्यार्थ्यांना ५ ते १० व्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले आहे. संबंधित विद्यार्थ्यांना त्याच महाविद्यालयात प्रवेश घेता येईल किंवा पुढच्या फेरीची वाट पाहता येणार आहे.

Pune Edition
Dec 16, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# Parents of Class XI ask for clarity over admission

**State edu dept has given just 3 days to pupils after 2nd list**

Sukhada.Khandge
@timesgroup.com
TWEETS @Sukhadak_Mirror

A parents' association, representing those whose children are taking admission in Class XI, has raised questions about the admission process after the second list was announced. The state education department has given only three days for students who received their preferred colleges to take the admission due to which the association is asking for clarity.

Akash Shinde from Vidyarthi Palak Sahay Sangh said, "We have been working for the parents of students who are in the Class XI admission process. We have received complaints that students need to confirm the admission within three days of the announcement of the second list. If they receive the same college as preferred, then they have to confirm the admission within three days. It is completely injustice on the parents as many colleges have been asking for fees on time and confirming and paying fees within stipulated time is difficult."

Parents also complain that even after scoring more than 90 per cent, students have not received the college of their choice. Also, if they miss to confirm their admission within three days, then they have to wait for the special round which will be conducted after the completion of first three rounds.

Shinde said, "Teaching at various colleges started after first round and students who got admission in the second round are now also wondering if their syllabus would be completed as their academic year is almost coming to an end. As students have not received colleges of their choice, they are also not willing to confirm the admission even if the second list is announced."

FILE PHOTO



**About 23,120 students were allotted seats in the second round for various streams like arts, science and commerce**

About 23,120 students were allotted seats in the second round for various streams like arts, science, commerce and vocational stream. In Arts, total number of 2,672 students were allotted, in commerce 9,762 students were allotted, 10,089 in science stream and for vocation 597 students were allotted in the second round.




Vaijnath Khandke, deputy director, education department, Pune, said, "The list has been there for only those students who have received first preference need to take admission within three days. Students who wish to change the college may wait till third round. As of now the admission process has not been completed."

Pune Mirror: 16.12.2020

# News Paper Clippings During December 2020

## Section: Education

# शिक्षण धोरणामुळे देशाला नवी दिशा : डॉ. नजमा हेपतुल्ला

### ऑनलाईन 'नॅशनल टीचर्स कॉँग्रेस'चे उद्घाटन



पुणे : देशाच्या प्रगतीसाठी वर्तमानकाळात नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाची गरज आहे. २१ व्या शतकात देशाला दिशा देण्यासाठी ते महत्वाचे आहे. सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या या लोकशाही देशात शिक्षणाची सुविधा, गुणवत्तापूर्ण शिक्षण, समग्र शिक्षण, नीतिशास्त्र व कायद्याचे ज्ञान देणेसुद्धा गरजेचे आहे. असे मत मणिपूरच्या राज्यपाल डॉ. नजमा हेपतुल्ला यांनी व्यक्त केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणे तर्फे आयोजित ऑनलाईन चौथ्या 'नॅशनल टीचर्स कॉँग्रेस'च्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०: उपलब्ध संधी' या परिषदेचा विषय आहे.

या समारंभासाठी डॉ. मुरली मनोहर जोशी, कन्साई जपान इंडिया कल्चर सोसायटीचे अध्यक्ष डॉ. टोमियो मिझोकामी, एरिक फाल्ट, डॉ. जगदीश गांधी, डॉ. विजय भटकर उपस्थित होते. अध्यक्षस्थानी एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष व युनेस्को अध्यासन प्रमुख डॉ. विश्वनाथ कराड होते. या प्रसंगी डॉ. जगदीश गांधी व राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे अध्यक्ष डॉ. के.कस्तुरीरंगन यांना 'जीवन गौरव पुरस्काराने' सन्मानित करण्यात आले.

डॉ. नजमा हेपतुल्ला म्हणाल्या, मुलांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्वासाठी व प्रगतीसाठी मातृभाषेतून सर्वांना शिक्षण देण्यात यावे. तसेच, व्यावसायिक व पर्यावरण विषयक ज्ञान असलेले शिक्षण द्यावे. गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी उच्च शिक्षण व्यवस्थेत मोठ्या प्रमाणात बदल घडावयास हवेत. जेणे करून देश विदेशातील विद्यार्थी येथे येऊन शिक्षण घेतील. या देशाला तक्षशिला आणि नालंदा सारख्या विद्यापीठांची परंपरा आहे. ती आता परत आणण्याची वेळ आली आहे.

डॉ. मुरली मनोहर जोशी म्हणाले, शांतीपूर्ण समाज निर्मितीसाठी शिक्षण महत्वाचे आहे. त्यासाठीच अटल बिहारी बाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली या दिशेने पाऊले टाकले गेले होते. शिक्षण हेच देशाच्या प्रगतीचे द्योतक आहे. त्यासाठी गुणवत्ता-पूर्ण शिक्षण हा त्याचा गाभा आहे. २१ व्या शतकात गुणवत्ता-पूर्ण शिक्षणाची विशेष गरज आहे. यामध्ये विज्ञानाला अग्रक्रम दिला पाहिजे. कृत्रिम बुद्धिमत्ता हे सुद्धा महत्वाचे क्षेत्र आहे. ते औद्योगिक क्षेत्रासाठी सुद्धा उपयुक्त आहे. तत्वज्ञानावर आधारलेल्या शिक्षणाचे धोरण हे चिरकाल टिकून राहील. त्यासाठी आम्हाला गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यावर भर दिला पाहिजे

Kesari: 17.12.2020

# गाइड नेमणुकीच्या नियमांना फाटा

### विद्यापीठाकडून विविध अटी घातल्याचे उघड

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्या परिषदेने एमफिल/ पीएचडी अभ्यासक्रमांच्या गाइडशिपबाबत घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी शैक्षणिक विभागाकडून होत नसल्याचे समोर आले.

एमफिल/पीएचडी अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना गाइड म्हणून मान्यता मिळण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) शिकविण्याच्या अनुभवाची कोणतीही अट घातली नसताना, पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाने पाच व दहा वर्षे अनुभवाची अट घातली आहे. पुणे विद्यापीठाच्या विद्या परिषदेने १ नोव्हेंबर २०१६ रोजी केंद्र सरकारच्या ५ जुलै २०१६ रोजीच्या राजपत्रानुसार निर्णय घेतला. या निर्णयानुसार एमफिल किंवा पीएचडीप्राप्त सहायक प्राध्यापकांना संशोधक मार्गदर्शक म्हणून मान्यता देण्याचा ठराव मंजूर केला. त्यात कोणतीही अनुभवाची अट नाही.

मात्र, शैक्षणिक विभागाच्या उपकुलसचिवांनी नियम करताना सेवेत रुजू होतांना पीएचडी असल्यास पाच वर्षाचा अनुभव; तसेच सेवेत रुजू होण्यापूर्वी पीएचडी नसल्यास १० वर्षाचा अनुभव पाहिजे, अशी अट घातली. केंद्र सरकारच्या राजपत्रात आणि विद्या परिषदेने मार्गदर्शकबाबत मांडलेल्या ठरावात अशी कोणतीही अट नाही. त्यामुळे शैक्षणिक विभाग अधिकार मंडळांना डावलून स्वतःचे नियम तयार करून प्राध्यापकांचे शैक्षणिक नुकसान करीत असल्याची टीका बेस्टा संस्थेचे अध्यक्ष डॉ. अजय दरेकर यांनी केली. या पूर्ण प्रकारात तातडीने लक्ष घालून विद्या परिषदेने मंजूर केलेल्या ठरावाची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी डॉ. दरेकर यांनी केली आहे.

### सहयोगी प्राध्यापक पदासाठी अपात्र

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या या चुकीच्या अटींमुळे विद्यापीठासह संलग्न महाविद्यालयातील अनेक सहायक प्राध्यापकांकडे अनुभव असतानाही ते देशातील इतर विद्यापीठांमध्ये सहयोगी प्राध्यापक किंवा प्राध्यापक पदासाठी पात्र ठरत नाहीत. या सर्वांमुळे विद्यापीठाशी संलग्न प्राध्यापकांचे नुकसान होत असल्याची टीका डॉ. दरेकर यांनी केली.



संग्रहित छायाचित्र

Maharashtra Times: 17.12.2020

पुढारी

# पुस्तकांच्या पायरेटेड पीडीएफचा काळाबाजार थांबेना

पुणे : पुढारी वृत्तसेवा

कोरोना काळात सुरू झालेला पुस्तकांच्या पायरेटेड पीडीएफचा काळाबाजार सुरूच असून अनेक नामवंत लेखकांच्या आणि प्रकाशकांच्या पुस्तकांचे पायरेटेड पीडीएफ विविध मोबाईल ॲप्लिकेशनवर उपलब्ध करून दिली जात आहे. सायबर पोलिसांकडे तक्रार करूनही हा प्रश्न अजूनही सुटलेला नाही. त्यामुळे लाखो रुपयांचे नुकसान सहन करावे लागत असल्याचे प्रकाशकांचे म्हणणे आहे.

### सायबर पोलिसांना निवेदन देऊनही कारवाई नाही

कॉपीराईट कायद्याचा भंग करून पुस्तकांना स्कॅन करून त्याला पीडीएफ स्वरूप दिले जात आहे. याची प्रकाशक ते ग्रंथालयांपर्यंतच्या घटकांना मोठी आर्थिक झळ बसत आहे. असे प्रकार करणाऱ्यांवर सरकारने आणि पोलिसांनी कडक कारवाई करावी, अशी मागणी प्रकाशकांनी केली आहे. याविरुद्ध मध्यंतरी अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघाने आवाज उठवला होता. तसे निवेदन सायबर पोलिसांकडे दिले. मात्र, त्याचे पुढे काहीच झाले नाही, असे प्रकाशकांकडून सांगण्यात आले.

याविषयी अखिल भारतीय प्रकाशक संघाचे अध्यक्ष राजीव बर्वे म्हणाले, पायरेटेड पुस्तकांमुळे नुकसान होत आहे. आमच्या शिष्टमंडळाने सायबर पोलिसांना निवेदन दिले होते. पण, त्याचे काहीच झाले नाही. सध्या पुस्तकांच्या पायरेटेड पीडीएफचीही विक्रीही सर्रास होत आहे. जवळजवळ पाच हजार पुस्तके पायरेटेड करण्यात आली आहेत.

प्रकाशक सुनील मेहता म्हणाले, आजही रस्त्यावर पायरेटेड पुस्तके विकली जात आहेत. याविरुद्ध प्रकाशक, लेखक आणि वाचकांनी एकत्र येऊन लढा दिला पाहिजे. तरच त्यावर काहीतरी होऊ शकेल. सर्वच घटकांना मोठा आर्थिक फटका बसत आहे.

> आमच्याच प्रकाशनातील पुस्तकांच्या पायरेटेड पीडीएफ माझ्याकडे विक्रीसाठी आल्याचा अनुभव मला नुकताच आला. एका व्यक्तीला मी सोशल मीडियावर आमच्या पुस्तकांच्या पायरेटेड पीडीएफ विकताना पाहिले. पुस्तक स्कॅन करून तो विकत होता. हे पाहून धक्काच बसला. म्हणूनच असे प्रकार समक्षपणे घडताना पाहून प्रकाशकांनीही काळजी घेतली पाहिजे हे कळले.
>
> \- चेतन कोळी, प्रकाशक

Pune Edition
Dec 17, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in



News Paper Clippings During December 2020

Section: Education

VISHAL SOLANKI | STATE EDUCATION COMMISSIONER

# 'Student safety first; need to avoid academic loss'

Recruitment of 6,000 posts from Class 1 to Class 12 across managements, government and private, will be carried out in three months, says Solanki

Dheeraj Bengrut
dheeraj.bengrut@htlive.com



A classroom of a school that reopened in rural Pune. The state education commissioner said that resuming classes in rural areas was not difficult, as the population density is lower than cities. HT

**PUNE:** Maharashtra state education commissioner Vishal Solanki speaks on issues facing the education system post the Covid outbreak.

**How are schools and junior colleges in rural parts faring after it resumed classes?**

Almost 15,000 schools have restarted which is 60% of total schools in the state imparting education to Class 9 to Class 12. Almost 8 lakh students have resumed offline classroom classes, which is 15% of student population covering Class 9 to Class 12. So, the progress is gradual, but we have to observe the local situation which is changing every day and the decision cannot be made at central or state levels.

Hence, we have given the responsibility to local authorities like collectors, municipal commissioners and CEOs to take the call. I assure parents that their wards' mental and health well-being is our top most priority. At the same time, we have to ensure that their academic progress is not hampered, especially in rural areas where we see prolonged break from academics result in rise in dropout figure.

**Your appeal to civic bodies who have not yet allowed schools to reopen?**

Though many municipal corporations have already restarted schools, some like Pune and Pimpri-Chinchwad are yet to do so. My opinion is to review the Covid situation, but at the same time take steps to ensure that children from weak socio-economic background do not end up being dropouts because of gap in classes. As they won't be able to compete with children who take digital classes, we need to walk the extra mile to see how we can tap into possibilities of reopening schools.

**Update on teacher recruitment process.**

We had advertised for 12,000 odd posts of which almost more than 6,000 posts have already been filled through portal "Pavitra Portal" launched as per the directions of the high court. With reports of corruptions and irregularities, the court sought a transparent process for recruitment. It is a merit-based online system and recruitments were done in last two years (before Covid). Ban on further recruitment in government posts was imposed because of Covid situation.

As many teachers are due to retire, we may face shortage in our schools and have put up the matter before the government. The state allowed us to go ahead with the remaining recruitment of 6,000 posts from Class 1 to Class 12 across all managements, government and private. So, the process is on and, hopefully, in the next three months we would be able to recruit teachers, subject to high court petitions.

> VISHAL SOLANKI | EDU COMMISSIONER
>
> 
>
> We have to ensure that prolonged break from academics does not result in rise in dropout figure.
>
> HT

**Advice to parents who are reluctant to send their children to schools?**

Our school management committees and education officers are regularly interacting with parents. In rural areas, resuming classes was not difficult as there is not much density and children are studying on farm lands. Reopening in cities is a problem because of population. We are trying to motivate them, but cannot force them. We are taking steps to provide a risk-free environment on campuses.

**What will you appeal to students of the state?**

I would like to tell students to make the most of this opportunity of being at homes as it is a rare occasion to remain indoors for such a long period. So, take care of your mental, social and physical well-being and emotional stability. Try to develop hobbies, help parents so that you learn dignity of labour and learn new things. I wish them a Happy New Year and hopefully the next year brings us good health and prosperous way ahead.

Hindustan Times:17.12.2020

## News Paper Clippings During December 2020

### Section: Education

# प्रवेशासाठी आज शेवटचा दिवस

**तिसऱ्या फेरीत केवळ ३,४११ प्रवेश**



संग्रहित छायाचित्र

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील ज्युनिअर कॉलेजांमध्ये अकरावी प्रवेशासाठी घेण्यात येत असलेल्या ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेत तिसऱ्या फेरीत १२ हजार ४६१ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला आहे. मात्र, गुरुवारपर्यंत केवळ तीन हजार ४११ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. त्यामुळे प्रवेशासाठी आज, शुक्रवार (१८ डिसेंबर) शेवटचा दिवस राहणार आहे.

तिसऱ्या फेरीच्या मुदतवाढीबाबत अद्याप कोणतीही सूचना वरिष्ठ पातळीवरून आली नाही. त्यामुळे २० तारखेपासून अकरावीची विशेष फेरीची प्रक्रिया सुरू होणार असल्याची शक्यता आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील कॉलेजांमध्ये प्रवेशासाठी अकरावी ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया राबविण्यात येत आहे. अकरावी प्रवेशासाठी ३०४ महाविद्यालयांत एक लाख सात हजार ३० जागा उपलब्ध आहेत. यातील ४१ हजार ३८ विद्यार्थ्यांचे प्रवेश दुसऱ्या फेरीत झाले होते, तर तिसऱ्या फेरीसाठी १२ हजार ४६१ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर करण्यात आला. मात्र, प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी पाठ फिरवली असल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रवेशप्रक्रियेत आतापर्यंत ४४ हजार ४४९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून, ६२ हजार ५८१ जागा रिक्तच असल्याचे दिसून येत आहे.

**यामुळे प्रवेश कमी झाल्याची शक्यता**

प्रवेश जाहीर झालेले विद्यार्थी कॉलेजांमध्ये प्रवेश घेत नाहीत. त्यासाठी कॉलेजांचे कमी न होणारे गुणांचे कटऑफ, विद्यार्थ्यांचा ठरावीक कॉलेजांतच प्रवेशाचा हट्ट या प्रमुख कारणांसह अनेक विद्यार्थी ग्रामीण भागांत अकरावी प्रवेशासाठी प्रयत्न करीत आहेत. त्यामुळे प्रवेशाचा टक्का कमी होत असल्याचा अंदाज अकरावी प्रवेश नियंत्रण समितीच्या वतीने व्यक्त केला आहे.

Maharashtra Times: 18.12.2020

# सावित्रीबाई फुले जन्मदिन आता महिला शिक्षण दिन

## छगन भुजबळ यांनी दिली माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : क्रांतिज्योती सावित्रिबाई फुले यांचा जन्मदिन आता 'महिला शिक्षण दिन' म्हणून साजरा केला जाणार आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी याला मंजुरी दिली आहे, अशी माहिती अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी ट्विटरद्वारे दिली.

भुजबळ म्हणाले, "महात्मा जोतीराव फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी बहुजन समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आपले संपूर्ण जीवन वेचले आहे. स्त्रियांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम फुले दाम्पत्याने केले. त्यामुळे सावित्रीबाई फुले यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी त्यांचा जन्मदिन हा 'महिला शिक्षण दिन' म्हणून साजरा करण्यात यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री यांच्याकडे केली.

मुख्यमंत्र्यांनी हे निवेदन स्वीकारत मागणीही मान्य केली." त्याचबरोबर हा दिवस देशभरात 'महिला शिक्षण दिन' म्हणून साजरा केला जावा यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने केंद्र सरकारकडे मागणी करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले आहे.

Lokmat: 18.12.2020



News Paper Clippings During December 2020

Section: Education

# नवे शैक्षणिक धोरण देशाला प्रगतिपथावर नेणारे

## डॉ. के. कस्तुरीरंगन यांचे प्रतिपादन

पुणे : भारताच्या नव्या शैक्षणिक धोरणाची निर्मिती ही देशातील प्रत्येक नागरिकाच्या आयुष्यावर सकारात्मक परिणाम घडवून आणण्याच्या दृष्टीने करण्यात आलेली आहे. एक न्याय समाज निर्माण करणे हा त्यामागचा हेतू आहे. आपल्या देशाची मूल्यप्रणाली व नीतिशास्त्र यांना धक्का न लावता २१ व्या शतकातील प्रगत शिक्षणाच्या दिशेने वाटचाल करणे हा या मागचा दृष्टिकोन आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय शिक्षण धोरणाचे अध्यक्ष व राजस्तान आणि एनआयआयटी विद्यापीठाचे कुलपती डॉ. के. कस्तुरीरंगन यांनी केले.

सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या १७ व्या पदवीदान समारंभ ऑनलाइन पद्धतीने झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. कस्तुरीरंगन बोलत होते. यावेळी सिंबायोसिसचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार, सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आदर पूनावाला, विद्यापीठाच्या प्र-कुलपती डॉ. विद्या येरवडेकर आदी उपस्थित होते. यंदाचा सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय विद्यार्थी पुरस्कार अफगाणिस्तानच्या हबीबा हुसैनी यांना प्रदान करण्यात आला.

विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. रजनी गुप्ते, यांनी विद्यापीठाच्या वार्षिक अहवालाचे सादरीकरण केले. डॉ.अनिता पाटणकर यांनी सूत्रसंचालन केले. तर डॉ. भामा वेंकटरमणी यांनी आभार मानले.




सिंबायोसिस विद्यापीठातर्फे डी.लिट पदवी देऊन सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदर पूनावाला यांना गौरवण्यात आले. यावेळी डॉ. शां. ब. मुजुमदार, डॉ. रजनी गुप्ते, डॉ. विद्या येरवडेकर उपस्थित होत्या.

> आम्ही राष्ट्राच्या आणि जगाच्या सुरक्षिततेसाठी व आरोग्यासाठी विक्रमी वेळेत लस विकसित केली आहे. कोविड १९ लशीच्या वापरासाठी आवश्यक असेलला परवाना मिळवण्याच्या अगदी समीप आम्ही पोचलो आहोत. नजीकच्या काळात क्लिनिकल चाचण्या, संशोधन आणि शैक्षणिकदृष्ट्या अनेक प्रकल्पांवर सिंबायोसिसबरोबर काम करण्यास आम्ही उत्सुक आहोत.
>
> **आदर पूनावाला**, मुख्य कार्यकारी अधिकारी, सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया

'शेतकऱ्यांशी चर्चा करून कृषी

Kesari: 18.12.2020

# नव्या शैक्षणिक धोरणामुळे प्रगत शिक्षणाच्या दिशेने वाटचाल : डॉ. के. कस्तुरीरंगन

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १७ - नव्या शैक्षणिक धोरणाची निर्मिती ही देशातील प्रत्येक नागरिकाच्या आयुष्यावर सकारात्मक परिणाम घडवून आणण्याच्या दृष्टीने झाली आहे. न्याय्य समाज निर्माण करणे हा त्यामागचा हेतू आहे. आपल्या देशाची मूल्यप्रणाली व नीतिशास्त्र यांना धक्का न लावता २१ व्या शतकातील प्रगत शिक्षणाच्या दिशेने वाटचाल करणे हा या मागचा दृष्टिकोन आहे, असे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० चे अध्यक्ष व राजस्थान आणि एनआयआयटी विद्यापीठाचे कुलपती डॉ. के. कस्तुरीरंगन यांनी सांगितले.

सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या १७ व्या पदवीदान समारंभास प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. हा सोहळा ऑनलाइन पद्धतीने झाला. यात अध्यक्ष डॉ. शां. ब. मुजुमदार यांच्या हस्ते सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया मुख्य कार्यकारी अधिकारी अदर पूनावाला यांना डी.लिट पदवी प्रदान करण्यात आली. यावेळी विद्यापीठाच्या प्र-कुलपती डॉ. विद्या येरवडेकर, कुलगुरू डॉ. रजनी गुप्ते, शैक्षणिक आणि प्रशासन विभागाच्या अधिष्ठाता डॉ. भामा वेंकटरमणी, सिंबायोसिस स्कूल फॉर लिबरल आर्टस्च्या संचालिका डॉ. अनिता पाटणकर आदींनी सहभाग घेतला. यावर्षीचा सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय विद्यार्थी हा पुरस्कार अफगाणिस्तानच्या हबीबा हुसैनी यांना प्रदान केला.




अदर पूनावाला म्हणाले, राष्ट्र आणि जगाच्या सुरक्षितता व आरोग्यासाठी विक्रमी वेळेत करोनावर लस विकसित केली आहे. आमच्यासाठी हा खरोखरच अभिमानाचा क्षण आहे. लसीच्या वापरासाठी आवश्यक असलेला परवाना मिळवण्याच्या अगदी समीप आम्ही पोहोचलो आहोत. भविष्यात क्लिनिकल चाचण्या, संशोधन आणि शैक्षणिकदृष्ट्या अनेक प्रकल्पांवर सिंबायोसिसबरोबर काम करण्यास उत्सूक आहे.

डॉ. शां.ब.मुजुमदार म्हणाले, साधेपणा, अध्यात्मिकता आणि अनिश्चितता हे आपल्या जीवनाचे प्रमुख अंग आहेत. करोनाने आपल्याला अनेक गोष्टी शिकविल्या. करोनामुळे झालेले नुकसान विचारात घेतानासुद्धा त्यामुळे नकळत घडलेल्या सकारात्मक बाजूंकडेदेखील आपण पाहणे गरजेचे आहे.

Prabhat: 18.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# प्रगत शिक्षणासाठीच नवीन शैक्षणिक धोरण

## डॉ. कस्तुरीरंगन यांचे प्रतिपादन; आदर पूनावाला यांना डी. लिट. प्रदान

पुणे, ता. १७ : ''भारताच्या नव्या शैक्षणिक धोरणाची निर्मिती ही देशातील प्रत्येक नागरिकाच्या आयुष्यावर सकारात्मक परिणाम घडवून आणण्याच्या दृष्टीने करण्यात आली आहे. आपल्या देशाची मूल्यव्यवस्था व नीतिमत्ता यांना धक्का न लावता २१व्या शतकातील प्रगत शिक्षणाच्या दिशेने वाटचाल करणे, हा यामागील दृष्टिकोन आहे,'' असे मत नव्या राष्ट्रीय शिक्षण धोरण समितीचे अध्यक्ष डॉ. के. कस्तुरीरंगन यांनी केले.

सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या १७व्या पदवीदान ऑनलाइन समारंभावेळी ते बोलत होते. सिंबायोसिसचे संस्थापक डॉ. शां. ब. मुजुमदार, विद्यापीठाच्या प्र-कुलपती डॉ. विद्या येरवडेकर, कुलगुरू डॉ. रजनी गुप्ते, अधिष्ठाता डॉ. भामा वेंकटरमणी आदी या वेळी उपस्थित होते. विद्यापीठातर्फे 'सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया'चे मुख्य कार्यकारी अधिकारी आदर पूनावाला यांना डी. लिट. प्रदान केली. या वर्षीचा 'सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय विद्यार्थी' हा पुरस्कार अफगाणिस्तानच्या हबीबा हुसैनी यांना देण्यात आला.




लवळे : सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठातर्फे आदर पूनावाला यांना डी. लिट. पदवी प्रदान करण्यात आली. या वेळी (डावीकडून) डॉ. रजनी गुप्ते, डॉ. शां. ब. मुजुमदार, पूनावाला आणि डॉ. विद्या येरवडेकर.

डॉ. कस्तुरीरंगन म्हणाले, ''उदारमतवादी शिक्षण या संकल्पनेची उत्पत्ती जवळपास चौदाशे वर्षांपूर्वीच्या भारताच्या उदारवादी कला कल्पनांमध्ये आहे.''

डॉ. मुजुमदार म्हणाले, ''साधेपणा, आध्यात्मिकता आणि अनिश्चितता हे आपल्या जीवनाचे प्रमुख अंग आहेत. विद्यार्थ्यांनी तीन गोष्टी आवर्जून कराव्यात.'' सूत्रसंचालन डॉ. अनिता पाटणकर यांनी केले.

**सिंबायोसिसबरोबर काम करणार!**

आदर पूनावाला म्हणाले, ''आम्ही राष्ट्राच्या आणि जगाच्या सुरक्षिततेसाठी व आरोग्यासाठी विक्रमी वेळेत लस विकसित केली आहे. हा आमच्यासाठी खरोखर अभिमानाचा क्षण आहे. भविष्यात क्लिनिकल टेस्ट, संशोधन आणि शैक्षणिकदृष्ट्या अनेक प्रकल्पांवर सिंबायोसिसबरोबर काम करण्यास आणि त्यांच्याशी सहयोग करण्यास आम्ही उत्सुक आहोत.''

Sakaal: 18.12.2020

**पुढारी**

# नवे शैक्षणिक धोरण सकारात्मक परिणामांसाठीच : डॉ. कस्तुरीरंगन

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

देशातील प्रत्येक नागरिकाच्या आयुष्यावर सकारात्मक परिणाम घडवून आणण्याच्या दृष्टीने भारताच्या नव्या शैक्षणिक धोरणाची निर्मिती करण्यात आली आहे. एक न्याय्य समाज निर्माण करणे हा त्यामागचा हेतू आहे. आपल्या देशाची मूल्यप्रणाली व नीतिशास्त्र यांना धक्का न लावता २१ व्या शतकातील प्रगत शिक्षणाच्या दिशेने वाटचाल करणे, हा यामागचा दृष्टिकोन असल्याचे मत राजस्थान आणि एनआयआयटी विद्यापीठाचे कुलपती आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० चे अध्यक्ष डॉ. के. कस्तुरीरंगन यांनी व्यक्त केले.

सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या १७ व्या पदवीप्रदान समारंभात प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. हा संपूर्ण सोहळा ऑनलाइन पद्धतीने संपन्न झाला.

डॉ. के. कस्तुरीरंगन म्हणाले, ''उदारमतवादी शिक्षण या संकल्पनेची उत्पत्ती जवळपास चौदाशे वर्षांपूर्वीच्या भारताच्या उदारमतवादी कला- कल्पनांमध्ये सापडते. आजच्या आधुनिक काळात या जुन्या भारतीय संकल्पनेला नव्या स्वरूपात मान्यता मिळू लागली आहे. उदारमतवादी शिक्षण विज्ञान आणि मानवता, गणित आणि कला, औषध आणि भौतिकशास्त्र इत्यादींमधील उल्लेखनीय नाती शोधून काढते आणि सामान्यत: मानवी प्रयत्नांच्या सर्व क्षेत्रांत आश्चर्यकारक ऐक्य असल्याचे दाखवते.'' सिंबायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठातर्फे देण्यात येणारी 'डी. लिट' पदवी यावर्षी सीरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदर पूनावाला यांना प्रदान करण्यात आली. पूनावाला म्हणाले, ''आम्ही राष्ट्राच्या आणि जगाच्या सुरक्षिततेसाठी व आरोग्यासाठी विक्रमी वेळेत लस विकसित केली आहे. आमच्यासाठी हा खरोखरच अभिमानाचा क्षण आहे. कोरोना लसीच्या वापरासाठी आवश्यक असलेला परवाना मिळवण्याच्या अगदी समीप आम्ही पोहचलो आहोत. येत्या काळात क्लिनिकल चाचण्या, संशोधन आणि शैक्षणिकदृष्ट्या अनेक प्रकल्पांवर सिंबायोसिसबरोबर काम करण्यास आणि त्यांच्याशी सहयोग करण्यास आम्ही उत्सुक आहोत.''

यावर्षीचा सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय विद्यार्थी हा पुरस्कार अफगाणिस्तानच्या हबीबा हुसैनी यांना प्रदान करण्यात आला. सिंबायोसिसचे संस्थापक अध्यक्ष डॉ. शां. ब. मुजुमदार यांनी स्वागतपर भाषण केले. विद्यापीठाच्या प्र.कुलपती डॉ. विद्या येरवडेकर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. रजनी गुप्ते यांनी विद्यापीठाच्या वार्षिक अहवालाचे सादरीकरण केले. डॉ. भामा वेंकटरमणी, (अधिष्ठाता शैक्षणिक आणि प्रशासन) यांनी आभारप्रदर्शन केले, तर डॉ. अनिता पाटणकर यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

Pune Edition
Dec 18, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

**लोकमत**

# परीक्षा अन् शिक्षणही हवे मातृभाषेत

## भाषा अभ्यासकांचे मत : जेईई, नीट परीक्षेला मराठीचा पर्याय

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : अभियांत्रिकी आणि वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी घेतल्या जाणाऱ्या जेईई मेन्स व नीट या प्रवेश पूर्व परीक्षा मराठी भाषेची निवड करून देता येतात, याबाबत प्रथमत: जागृती झाली पाहिजे. त्याचप्रमाणे केवळ परीक्षा देण्याची संधी नाही, तर तत्पूर्वी विद्यार्थ्यांना संबंधित विषयाचे शिक्षणही मराठीतून द्यावे लागेल. तेव्हा या परीक्षा मातृभाषेतून देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होईल, असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले.

विद्यार्थ्यांना मातृभाषेतून प्रवेश पूर्व परीक्षा देता यावी; या उद्देशाने नॅशनल टेस्टिंग एजन्सीने (एनटीए) सकारात्मक निर्णय घेतला. त्यामुळे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना जेईई परीक्षा मराठी भाषेची निवड करून देता येणार आहे. विद्यार्थ्यांनी या संधीचा फायदा करून घेतला पाहिजे. परंतु, गेल्या काही वर्षांत इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढले आहे. परिणामी, विद्यार्थ्यांना मराठीऐवजी इंग्रजी भाषा जवळची वाटू लागली आहे. त्यामुळे मातृभाषेची निवड करण्याचा पर्याय उपलब्ध असूनही विद्यार्थी तो स्वीकारत नसल्याचे गेल्या दोन वर्षांतील आकडेवारीवरून समोर आले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे माजी प्रमुख डॉ. मनोहर जाधव म्हणाले की, अभियांत्रिकी विषयातील पारिभाषिक शब्दांना पर्याय देऊन ते शब्द रूढ करण्याची आवश्यकता आहे. परीक्षेची संधी नाही, तर संबंधित विषयसुद्धा मातृभाषेतून शिकवला गेला पाहिजे.

### मातृभाषेतून जेईई परीक्षा

महाराष्ट्रात मातृभाषेतून शिक्षण घेण्याची संकल्पनाच तयार झाली नाही. गुजरातमध्ये ८० टक्के विद्यार्थी गुजरातीतून शिक्षण घेतात. नीट-जेईई परीक्षेसाठी मराठीचा पर्याय निवडला, तर मराठी व इंग्रजी अशा दोन्ही भाषेत प्रश्नपत्रिका उपलब्ध होतील. याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागृतीची गरज आहे. गेल्या काही वर्षांपासून जनजागृती केल्यामुळेच मातृभाषेतून इयत्ता बारावीची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत आहे.

**- अनिल गोरे, सदस्य, भाषा सल्लागार समिती, महाराष्ट्र शासन**

### इंग्रजीचा पाया हवा

जेईई परीक्षेसाठी मराठी भाषेचा पर्याय ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना काही प्रमाणात उपयुक्त ठरेल. परंतु, पुढील सर्व शिक्षण इंग्रजीतच घ्यावे लागणार असल्याने विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेचा पाया करावा.

**- डॉ. वासुदेव गाडे, माजी कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

Hello Pune
Page No. 1 Dec 18, 2020
Powered by: erelego.com

# संपूर्ण शुल्क परत करा; यूजीसीचे संस्थांना निर्देश

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : कोरोनाकाळात आर्थिक अडचणीमुळे प्रवेश रद्द केलेल्या विद्यार्थ्यांना त्यांनी भरलेले संपूर्ण शैक्षणिक शुल्क परत करण्याचा आदेश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) शैक्षणिक संस्थांना दिला आहे. या आदेशामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

मागील ९ महिन्यांपासून राज्यात व देशात कोरोनाचा प्रादुर्भाव कायम असल्याने अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षण अर्धवट सोडण्याचा निर्णय घेत प्रवेश रद्द केले. मात्र, घेतलेले प्रवेश रद्द करताना शैक्षणिक संस्थांकडून त्यांना शुल्क कपात करून उर्वरित रक्कम देण्यात आली. याबाबत अनेक विद्यार्थ्यांनी यूजीसीकडे तक्रारी केल्या होत्या. अनेकदा हे प्रवेश खासगी, व्यावसायिक संस्थांतील असतात. त्यामुळे एकूण शुल्काच्या काही टक्के रक्कम कपात करून काहीच रक्कम विद्यार्थ्यांना परत दिली जाते. मात्र, या

### एक हजार रुपयांपर्यंत प्रक्रिया शुल्क कमी करावे

अनेक विद्यार्थी, पालकांची आर्थिक स्थिती हलाखीची असल्याने ते व्यावसायिक अभ्यासक्रमांकडून साधारण अभ्यासक्रमांकडे वळण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर प्रवेश रद्द केले, म्हणून त्यांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागू नये, म्हणून डिसेंबरअखेरपर्यंत प्रवेश रद्द करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही केवळ एक हजार रुपयांपर्यंत प्रक्रिया शुल्क कमी करून बाकी सर्व शुल्क परत करावे, असे यूजीसीने म्हटले आहे.

कोरोना काळात पालक - विद्यार्थ्यांची आणखी आर्थिक परवड होऊ नये, याकरिता ३० नोव्हेंबरपर्यंत रद्द केलेल्या प्रवेशांवर कोणत्याही शैक्षणिक संस्थांनी कोणतीही कपात न करता ते परत करावेत, असे यूजीसीने स्पष्ट केले आहे.

Lokmat: 19.12.2020

# शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण ही काळाची गरज

## ऑनलाइन चौथ्या नॅशनल टीचर्स काँग्रेस परिषदेत तज्ज्ञांनी मांडली मते

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. १८ - भारताने शिक्षण क्षेत्रात आंतरराष्ट्रीयीकरणासाठी उचललेले पाऊल भविष्यासाठी सर्वांनाच लाभदायी असेल. त्यामुळे देशात परदेशी विद्यार्थ्यांच्या प्रमाणात वाढ होऊन परदेशी चलनात मोठी वृद्धी होईल. शैक्षणिक क्षेत्रात गुणवत्तापूर्ण संशोधन व कौशल्यांचा विकास झाल्याने भारतीय विद्यार्थी हा जागतिक नागरिक बनेल. त्यामुळे शिक्षणाचे जागतिकीकरण हेही अत्यंत महत्त्वाचे आहे, असे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले.**

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणेतर्फे आयोजित ऑनलाइन चौथ्या नॅशनल टीचर्स काँग्रेस'च्या तिसऱ्या दिवसाच्या सत्रात असा सूर मान्यवरांनी काढला. ही परिषद 'राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) २०२०: उपलब्ध संधी' या विषयावर आहे. यावेळी शैक्षणिक तंत्रज्ञान: उच्च शिक्षण आणि शालेय शिक्षणामध्ये मूलभूत परिवर्तन आणि भारतीय शिक्षणाचे जागतिकीकरण या विषयांवर मान्यवरांनी विचार मांडले. या समारंभासाठी पॅरिस येथील सहयोगी प्राध्यापिका भूमिका गुप्ता, एआययूच्या महासचिव डॉ. पंकज मित्तल, न्यूझीलंड युनिव्हर्सिटीच्या फायनॅन्शियल एज्युकेशन अ‍ॅण्ड रिसर्च सेंटरच्या संचालिका डॉ. पुष्पा वूड, मिलर कॉलेज ऑफ बिजनेसचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुशील शर्मा, प्रदीप कुमार, अहमदाबाद येथील आयआयएमचे प्राध्यापक सॅबेस्टियन मॉरियस, एसएनडीटी युनिव्हर्सिटीच्या एज्युकेशन टेक्नॉलॉजी विभागाच्या संचालिका जयश्री शिंदे, ईएमएमआरसी पुणेचे संचालक समीर सहस्त्रबुद्धे, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या शिक्षणविभागाच्या संचालिका डॉ. सुहासिनी देसाई उपस्थित होते.

भूमिकागुप्ताम्हणाल्या, भारतीय शिक्षणाचे आंतरराष्ट्रीयीकरण करणे हे आमच्या समोरील मोठे आव्हान आहे. त्यासाठी येथील शैक्षणिक संस्थांनी जागतिक दर्जाचे अध्यापन करावे. एकीकडे सरकारने उच्च शिक्षणावरील परिणामाचे सखोल अध्ययन केले आहे. त्यमुळे आंतरराष्ट्रीय करणाचा भारतीय दृष्टिकोन जगासमोर आला पाहिजे. जागतिकी करणामुळे विद्यार्थ्यांना विशेष अभ्यासक्रम निवडण्याची सोय आहे, असे त्यांनी सांगितले.

जागतिकीकरण आणि आंतरराष्ट्रीयीकरण या दोन्हींमध्ये सूक्ष्म फरक आहे. आज ज्या पद्धतीने आंतरराष्ट्रीयीकरण मोठ्या प्रमणात होत आहे ते जागतिकीकरणाच्या दिशेने उचललेले पाऊल आहे, असे सुशील शर्मा यांनी सांगितले.

Prabhat: 19.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# शिक्षणाचे जागतिकीकरण महत्त्वाचे

## पुण्यात झालेल्या 'नॅशनल टीचर्स कॉंग्रेस'मध्ये उमटला सूर

■ लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : भारताने शिक्षण क्षेत्रात आंतरराष्ट्रीयीकरणासाठी उचललेले पाऊल भविष्यासाठी सर्वांनाच लाभदायी असेल. शैक्षणिक क्षेत्रात गुणवत्तापूर्ण संशोधन व कौशल्यांचा विकास झाल्याने भारतीय विद्यार्थी हा जागतिक नागरिक बनेल. त्यामुळे शिक्षणाचे जागतिकीकरण हेही अत्यंत महत्वाचे आहे, असा सूर 'एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीतर्फे आयोजित ऑनलाईन 'नॅशनल टीचर्स कॉंग्रेस'मध्ये उमटला.

'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० : उपलब्ध संधी' या विषयावर ही परिषद आहे. तिसऱ्या दिवशी शैक्षणिक तंत्रज्ञान : उच्च शिक्षण आणि शालेय शिक्षणामध्ये मूलभूत परिवर्तन व भारतीय शिक्षणाचे जागतिकीकरण' चर्चासत्र झाले. पॅरिस येथील सहयोगी प्राध्यापिका भूमिका गुप्ता, एआययूच्या महासचिव डॉ. पंकज मित्तल, न्यूझीलँड युनिव्हर्सिटीतील डॉ. पुष्पा वूड, मिलर कॉलेज ऑफ बिजनेसचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. सुशील शर्मा, प्रदिप कुमार, अहमदाबाद येथील आयआयएमचे प्राध्यापक सॅबेस्टियन मॉरियस, एसएनडीटी युनिव्हर्सिटीतील जयश्री शिंदे, ईएमएमआरसी पुणेचे संचालक समीर सहस्त्रबुद्धे यांनी सहभाग घेतला.

### कालानुरूप पारंपरिक विद्यापीठे नाहीशी होतील

नव्या शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांचे मन व बुद्धि घडविले जात आहे, असे वुड म्हणाल्या. येथील शिक्षण पद्धती आणि पाश्चात्य शिक्षण पद्धतीत खूप मोठे अंतर आहे. आंतरराष्ट्रीयकरणामुळे आपल्या येथे मूल्याधिष्ठित शिक्षण पद्धतीची जडण घडण होण्यास मदत होईल, असेही त्यांनी नमुद केले. भारताच्या शिक्षणाला आंतरराष्ट्रीय स्वरूप येत आहे. तरीही या संदभार्तील देशातील कायदे शिथिल करण्याची गरज असल्याचे मत मित्तल यांनी मांडले. शिक्षणाच्या प्रवाहात आपण विद्यार्थ्यांच्या कौशल्याकडे दुर्लक्ष केले आहे. ऑनलाइन शिक्षण पद्धतीच्या काळात कालानुरूप पारंपारिक विद्यापीठे नाहिशी होतील, अशी भिती मॉरियस यांनी व्यक्त केली.

Lokmat :19.12.2020

# 'प्रोजेक्ट करायचे कसे ?'

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पुण्यासह राज्यातील इंजिनीअरिंग कॉलेज अजूनही बंद असल्याने, अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याची तक्रार विद्यार्थ्यांकडून करण्यात आली आहे. कॉलेज बंद असल्याने मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक्स, सिव्हिल, इलेक्ट्रिकल अशा विद्याशाखांची प्रॅक्टिकल्स विद्यार्थ्यांना करता येत नसून, अंतिम वर्षातील प्रोजेक्ट तयार करण्यात मोठ्या अडचणी येत असल्याचे गाऱ्हाणे विद्यार्थ्यांनी मांडले.

### अविद्येचे 'प्रात्यक्षिक'

करोनामुळे शाळा, कॉलेज, विद्यापीठे मार्च महिन्यापासून बंद आहेत. त्यानंतर २३ नोव्हेंबरपासून नववी ते बारावीच्या काही शाळा सुरू करण्यात आल्या. मात्र, कॉलेज व विद्यापीठे विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी बंदच आहेत. पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरात मोठ्या प्रमाणात इंजिनीअरिंग कॉलेज आहेत. मात्र, कॉलेज सुरू झाली नसल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य अधांतरी आहे.

प्रत्यक्ष होऊ द्या प्रात्यक्षिक

"आम्हाला अंतिम वर्षाला मशिन लर्निंगची प्रॅक्टिकल आहेत. मात्र, ऑनलाइन शिक्षणामुळे प्रॅक्टिकल्सचे ज्ञान मिळत नाही. शिक्षकांकडून केवळ प्रात्यक्षिकांच्या असाइनमेंट पाठविण्यात येत असून, त्या आपापल्या पद्धतीने आम्ही करतो.

– प्रज्ज्वल शेळके, अंतिम वर्ष विद्यार्थी, इंजिनीअरिंग

इंजिनीअरिंगच्या अंतिम वर्षाला चार विद्यार्थी मिळून प्रकल्प सादर करतात. मात्र, कॉलेज बंद असल्याने प्रकल्प करण्यात अडचणी येत आहेत. अंतिम वर्षाची प्रॅक्टिकल समजण्यात अडचणी येत आहेत.

– निशिगंधा चव्हाण, अंतिम वर्ष विद्यार्थिनी, इंजिनीअरिंग

इंजिनीअरिंग कॉलेजांमध्ये सुरक्षित वावराचे नियम पाळून प्रॅक्टिकल होऊ शकतात. प्रात्यक्षिके वेळेत झाली, तर लेखी परीक्षेपूर्वी प्रात्यक्षिकांची परीक्षा होऊ शकते. विद्यापीठ आणि कॉलेजांनी समन्वयातून प्रॅक्टिकलला परवानगी देण्याची गरज आहे.

– डॉ. एम. जी. चासकर, अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

इंजिनीअरिंगमध्ये अंतिम वर्ष विद्यार्थ्यांसाठी नोकरीच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. त्यामुळे या वर्षात अधिकाधिक चांगले गुण घेऊन, उत्तीर्ण होण्यासाठी विद्यार्थी प्रयत्नशील असतात. आता करोनाचा प्रादुर्भाव कमी झाला असून, कॉलेज टप्प्याटप्प्याने सुरू करावीत, अशी भूमिका विद्यार्थ्यांनी मांडली.

Maharashtra Times: 19.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# कागदपत्रांविना प्रवेश नाहीच

### सीईटी सेलकडून मार्गदर्शक सूचना

म. टा. प्रतिनिधी, पुणे

इंजिनीअरिंग, फार्मसी, आर्किटेक्चर अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी पहिल्या फेरीत पसंतिक्रम दिलेल्या महाविद्यालयात क्रमांक लागला; मात्र प्रवेशासाठी मूळ प्रमाणपत्रे फेरीच्या अंतिम मुदतीपर्यंत जमा न केल्यास अशा उमेदवारांना प्रवेश देऊ नये, असे स्पष्ट आदेश सीईटी सेलकडून देण्यात आले आहेत. या विद्यार्थ्यांना पुढील फेरीची प्रवेश प्रक्रिया शिक्षण संस्थांनी समजावून सांगण्यात यावी, अशीही सूचना सीईटी सेलकडून देण्यात आली आहे.

सीईटी सेलकडून व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ऑनलाइन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरताना जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर, आर्थिकदृष्ट्या दुर्बल या प्रमाणपत्रांची पावती पहिल्या फेरीच्या अंतिम तारखेपर्यंत ग्राह्य धरावी, तोपर्यंत जे विद्यार्थी मूळ प्रमाणपत्र सादर करणार नाहीत अशांना प्रवेश देऊ नयेत. प्रवेश दिल्यानंतर विद्यार्थ्यांनी दिलेली कागदपत्रे खोटी निघाल्यास त्याचा प्रवेश तत्काळ रद्द करावा, अशाही सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्याने वाटप झालेल्या जागेची चुकीच्या पद्धतीने पडताळणी करून संस्थेत प्रवेश केल्यास हा प्रवेश रद्द करून, त्याबाबत त्वरित हरकत नोंदवावी, अशाही सूचना देण्यात आल्या आहेत.

### 'शुल्कासाठी तगादा नको'

विद्यार्थ्याने कोणत्याही कारणास्तव प्रवेश रद्द केल्यानंतर, अनेक महाविद्यालये पूर्ण वर्षाचे शैक्षणिक शुल्क भरण्यासाठी विद्यार्थ्यांकडे तगादा लावतात. तर, काही महाविद्यालये जादा शुल्क वसूल करतात. त्यामुळे या सर्वांवर उपाय म्हणून प्रवेश रद्द होताच दोन दिवसांत संस्था प्रक्रिया शुल्क म्हणून एक हजार रुपये वजा करून उर्वरित शुल्क परत द्यावे, अशी सूचना देण्यात आली आहे.

### महत्त्वाच्या सूचना

- प्रवेश रद्द होताच दोन दिवसांत संस्था प्रक्रिया शुल्क म्हणून एक हजार रुपये वजा करावे.
- प्रवेश रद्द झाल्यानंतर शुल्क व मूळ कागदपत्रे परत करण्याची कार्यवाही करावी.
- प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाइन विनंती ग्राह्य धरण्यात येईल.
- प्रवेश रद्द केल्यानंतर संस्थेने मूळ कागदपत्र व शुल्क परत देताना विद्यार्थ्यांवर दबाव आणू नये.
- प्रवेश रद्द झाल्यानंतर, पुढील वर्षाचे शुल्कही मागता येणार नाही.

Maharashtra Times: 19.12.2020

पुढारी

# व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रियेला गती

## अभियांत्रिकी प्रवेशासाठी लाखाहून अधिक नोंदणी

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

सीईटी सेलच्या अखत्यारित असलेल्या सर्वच प्रवेश परीक्षांचे निकाल जाहीर केल्यानंतर पदवी आणि पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करण्याच्या प्रक्रियेला गती मिळाली आहे. अभियांत्रिकी पदवी प्रवेशासाठी आता पर्यंत १ लाख १० हजार विद्यार्थ्यांनी शुक्रवार दुपारपर्यंत नोंदणी केली आहे.

राज्य प्रवेश परीक्षा कक्षाकडून (सीईटी सेल) ने निकाल जाहीर केले. त्यावेळी प्रवेश केव्हा सुरू होणार आहेत, याच्या प्रतीक्षेत हजारो विद्यार्थी व पालक होते. या अभ्यासक्रमांची प्रवेशासाठी ऑनलाइन अर्ज संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहेत.

कोरोनाचा काळ आणि प्रवेशाला उशिरा सुरुवात म्हणून कॅप राउंड यंदा कमी केले आहेत मात्र प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना नुकतीच मुदतवाढ दिली आहे त्यानंतर प्रत्यक्ष कॅप राउंडला सुरुवात होणार आहे. त्याचे वेळापत्रकाही टप्याटप्याने जाहीर होणार आहे. बीई/बीटेक, एमबीए, एमसीए, बी.फार्मा, हॉटेल मैनेजमेंट एंड कैटरिंग टेक्नोलॉजी (बीएचएमसीटी) अशा अभ्यासक्रमांना आता विद्यार्थी ओढा दिसत आहे. तब्बल २० अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची धडपड सुरु आहे. तंत्रशिक्षण संचालनालयाअंतर्गत येणारे ११, उच्च शिक्षण विभागाच्या अंतर्गत ८, फाईन आर्ट १ मेडिकल २, कृषी १ अशा अभ्यासक्रमांचे प्रवेश प्रक्रिया सुरु आहे.

**असे आले आहेत अर्ज (शुक्रवार दुपारपर्यंत)**

| अभ्यासक्रम | आलेले अर्ज | शेवटची तारीख |
|---|---|---|
| एमबीए | ४८३९४ | २० डिसेंबर |
| बीई/टेक | ११००६९ | २२ डिसेंबर |
| बी फार्मसी | ७७५६५ | २१ डिसेंबर |
| बी.आर्च | ८०८८ | २० डिसेंबर |
| बी.एचएमसीटी | ९१३ | २३ डिसेंबर |
| डीएसई | ५६३७२ | २१ डिसेंबर |
| डीएसपी | १०४२३ | २१ डिसेंबर |
| एमई/एमटेक | ६१११ | २४ डिसेंबर |
| एमसीए | १००८५ | २३ डिसेंबर |
| एम फार्मा | ४५९२ | २३ डिसेंबर |
| एमआर्च | ६४५ | २३ डिसेंबर |
| एलएलबी ३ वर्ष | २५८८६ | २२ डिसेंबर |
| बीएड | २८६५२ | २५ डिसेंबर |
| एलएलबी ५ वर्ष | १०४५३ | २५ डिसेंबर |

"विद्यार्थ्यांना अर्ज करण्याची मुदत वाढ केली आहे. त्यामुळे अर्ज करण्यासाठी आणखी वेळ मिळाला आहे. सर्व अभ्यासक्रमांचे मुदत संपल्यानंतर टप्प्याटप्प्याने प्रवेशाचे पुढील वेळापत्रक जाहीर केले जाणार आहे.

-**चिंतामणी जोशी**, आयुक्त सीईटी सेल

Pune Edition
Dec 19, 2020 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2020*

Section: Education

### तिसऱ्या फेरीत केवळ चार हजार ६३३ प्रवेश

**पुणे :** ज्युनिअर कॉलेजांमध्ये इयत्ता अकरावीला प्रवेश घेण्यासाठी १२ हजार ४६१ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाल्यानंतर, त्यापैकी आठ हजार १७६ विद्यार्थी कॉलेजांकडे प्रवेशासाठी फिरकलेच नसल्याची माहिती समोर आली आहे. अपेक्षेप्रमाणे कॉलेज जाहीर न झाल्यामुळे, विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्याचे टाळले आहे. या फेरीत कोटा आणि कॅप राउंडचे विद्यार्थी मिळून केवळ चार हजार ६३३ विद्यार्थ्यांनीच प्रवेश घेतला असल्याचे स्पष्ट झाले आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील ज्युनिअर कॉलेजांमध्ये प्रवेशासाठी अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. अकरावी प्रवेशासाठी ३०४ महाविद्यालयांमध्ये एक लाख सात हजार ३० जागा उपलब्ध आहेत. यातील ४१ हजार ३८ विद्यार्थ्यांचे प्रवेश दुसऱ्या फेरीत झाले होते; तर तिसऱ्या फेरीसाठी १२ हजार ४६१ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला. यातील केवळ चार हजार २८५ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी संमती दिली. यातील तीन हजार ९७५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला; तर सात विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारण्यात आला; तसेच १७ विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात आले. त्याचप्रमाणे २८६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला नाही.

Maharashtra Times: 19.12.2020

### सर्वच प्रवर्गांची माहिती 'सरल'वर

#### शालेय शिक्षण विभागाची सारवासारव

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'सरल' पोर्टलवर सर्व प्रवर्गांतर्गत सुमारे १२०२ प्रमुख जाती या विद्यार्थ्यांची जात नोंद करण्यासाठी उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यामुळे शाळेतील सर्वच जाती-धर्मांतील विद्यार्थ्यांची माहिती पोर्टलवर संकलित करण्यात येते. ही माहिती सरकारच्या विविध योजना, शिष्यवृत्ती आणि लाभांच्या योजनांसाठी आवश्यक आहे, अशी सारवासारव शालेय शिक्षण विभागाकडून शुक्रवारी करण्यात आली.

'सरल' पोर्टलवर विद्यार्थ्यांच्या नोंदणीसाठी अर्ज भरताना, विद्यार्थ्यांच्या जातीचा उल्लेख करण्यासाठी केवळ ब्राह्मण किंवा इतर असे दोनच पर्याय शालेय शिक्षण विभागाकडून उपलब्ध करून दिले होते. या नव्या पर्यायांमुळे समाजात चुकीचा संदेश जात असून, सामाजिक तेढ निर्माण होत असल्याची तक्रारदेखील करण्यात आली. या पर्यायामध्ये तातडीने बदल करून, चूक दुरुस्त करण्याची मागणी गुरुवारी संघटनांकडून करण्यात आली होती. याबाबतचे वृत्त 'महाराष्ट्र टाइम्स'मध्ये शुक्रवारी प्रसिद्ध झाले. त्यानंतर शालेय शिक्षण विभाग खडबडून जागा झाला.

'सरल' पोर्टलवर शाळेने विद्यार्थ्यांची माहिती भरताना प्रवर्गांअंतर्गतच्या सर्व जाती उपलब्ध होतात. विद्यार्थ्यांची धर्म, प्रवर्ग, जातनिहाय सांख्यिकीय माहिती आवश्यक असल्याने ही माहिती सरल प्रणालीअंतर्गत घेण्यात येते, अशी माहिती प्राथमिक शिक्षण संचालनालयाचे शिक्षण सहसंचालक दिनकर टेमकर यांनी पत्राद्वारे दिली आहे.

'सरल पोर्टलद्वारे सामाजिक तेढ'

Maharashtra Times: 19.12.2020

पुढारी

### कागदपत्रे नसल्यास प्रवेश लटकणार

#### फेरीच्या अंतिम मुदतीपर्यंत कागदपत्रे जमा करावी लागणार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

इंजिनिअरिंग, फार्मसी, आर्किटेक्चर अशा व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पहिल्या फेरीत पसंतीक्रम दिलेल्या महाविद्यालयात क्रमांक लागला. मात्र, प्रवेशासाठी मूळ प्रमाणपत्रे फेरीच्या अंतिम मुदतीपर्यंत जमा न केल्यास अशा उमेदवारांना प्रवेश देऊ नये, असे स्पष्ट आदेश सीईटी सेलकडून देण्यात आले आहे. या विद्यार्थ्यांना पुढील फेरीची प्रवेशप्रक्रिया शिक्षणसंस्थांनी समजावून सांगावी, अशा सूचना सीईटी सेलकडून देण्यात आली आहे.

सीईटी सेलकडून व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ऑनलाइन पद्धतीने प्रवेशप्रक्रिया राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरताना जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमिलेअर,



आर्थिकदृष्ट्या दुर्बल या प्रमाणपत्रांची पावती पहिल्या फेरीच्या अंतिम तारखेपर्यंत ग्राह्य धरावी, तोपर्यंत जे विद्यार्थी मूळ प्रमाणपत्र सादर करणार नाहीत अशांना प्रवेश देऊ नयेत. प्रवेश दिल्यानंतर विद्यार्थ्यांनी दिलेली कागदपत्रे खोटी निघाल्यास त्याचा प्रवेश तत्काळ रद्द करावा, अशाही सक्त सूचना देण्यात आल्या आहेत. विद्यार्थ्याने वाटप झालेल्या जागेची चुकीच्या पद्धतीने पडताळणी करून संस्थेत प्रवेश केल्यास हा प्रवेश रद्द करून, त्याबाबत त्वरित हरकत नोंदवावी, अशाही सूचना देण्यात आल्या आहेत.

**एक हजार वजा करावे...**

विद्यार्थ्याने कोणत्याही कारणास्तव प्रवेश रद्द केल्यानंतर, अनेक महाविद्यालये पूर्ण वर्षाचे शैक्षणिक शुल्क भरण्यासाठी विद्यार्थ्यांकडे तगादा लावतात. तर, काही महाविद्यालये जादा शुल्क वसूल करतात. त्यामुळे या सर्वांवर उपाय म्हणून प्रवेश रद्द होताच दोन दिवसांत संस्था प्रक्रिया शुल्क म्हणून एक हजार रुपये वजा करून उर्वरित शुल्क परत द्यावे, अशी सूचना देण्यात आली आहे.

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

- प्रवेश रद्द झाल्यानंतर शुल्क व मूळ कागदपत्रे परत करण्याची कार्यवाही करावी.
- प्रवेश रद्द करण्यासाठी ऑनलाइन विनंती ग्राह्य धरण्यात येईल
- प्रवेश रद्द केल्यानंतर संस्थेने मूळ कागदपत्र व शुल्क परत देताना विद्यार्थ्यांवर दबाव आणू नये
- प्रवेश रद्द झाल्यानंतर, पुढील वर्षाचे शुल्कही मागता येणार नाही.

Pune Edition
Dec 19, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in



## *News Paper Clippings During December 2020*

Section: Education

पुढारी

### आठ हजार विद्यार्थी पुढील फेरीच्या प्रतीक्षेत

#### अकरावीच्या तिसऱ्या फेरीत ४ हजार ६३३ प्रवेश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

अकरावी प्रवेशासाठी तीन फेऱ्यांनंतरही महाविद्यालयांचे कटऑफ कमी झालेले नाहीत, तर विद्यार्थ्यांचा ठराविक महाविद्यालयांमध्येच प्रवेश घेण्याचा निश्चय मात्र कायम आहे. यामुळे अकरावीसाठी तिसऱ्या फेरीत १२ हजार ४६१ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर होऊनही तब्बल ८ हजार १७६ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केलेला नाही. कोटा आणि कॅप राउंडचे विद्यार्थी मिळून केवळ ४ हजार ६३३ विद्यार्थ्यांनीच या फेरीत प्रवेश घेतल्याचे स्पष्ट झाले आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयांमधील अकरावी प्रवेशासाठी ऑनलाइन प्रक्रिया राबविण्यात येत आहे. अकरावी प्रवेशासाठी ३०४ महाविद्यालयांमध्ये १ लाख ७ हज[...] ३० जागा उपलब्ध आहेत. यातील ४[...] हजार ३८ विद्यार्थ्यांचे प्रवेश दुसऱ्या फेरी[...] झाले होते. तर तिसऱ्या फेरीसाठी १२ हज[...] ४६१ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाल[...] यातील केवळ ४ हजार २८५ विद्यार्थ्यां[...] प्रवेशासाठी संमती दिली. यातील [...] हजार ९७५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. [...] विद्यार्थ्यांना प्रवेश नाकारण्यात आला. त[...] १७ विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करण्यात आले[...] २८६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला नाही, त[...] कोटा प्रवेश प्रक्रियेत ६५८ विद्यार्थ्यां[...] प्रवेश घेतला असून, ५ विद्यार्थ्यांनी प्रवेश र[...] केला आहे. २० तारखेपासून विशेष फेरी[...] प्रक्रिया सुरू होणार असल्याचे उपसंचाल[...] कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.

Pune Edition
Dec 19, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

सामायिक शिकवणी - महाविद्यालयातील स्थिती

### बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षाचिंता

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** प्रवेश परीक्षांसाठी शिकवणी आणि कनिष्ठ महाविद्यालय (इंडिग्रेटेड) एकत्रित असणाऱ्या मुंबईतील नामांकित संस्थांतील बारावीच्या विद्यार्थ्यांवर यंदा टांगती तलवार आहे. काही संस्थांना राज्य मंडळाकडून अनुक्रमांक न मिळाल्यामुळे शेकडो विद्यार्थ्यांना बारावी परीक्षेचे अर्ज भरण्यात अडचणी येत आहेत.

प्रवेश परीक्षांची तयारी करून घेणाऱ्या अनेक खासगी शिकवण्यांनी गेल्या काही वर्षांत कनिष्ठ महाविद्यालये थाटली आहेत. कनिष्ठ महाविद्यालय सुरू करण्यासाठी आवश्यक त्या सुविधा न देताच सुरू झालेल्या या महाविद्यालयांना शिक्षण विभागाने जुलैमध्ये नोटीस दिली होती. पालक आणि विद्यार्थ्यांचा ओढाही या संस्थांकडे वाढला आहे. लाखो रुपयांचे शुल्क भरून या संस्थांमध्ये विद्यार्थी प्रवेश घेतात. मात्र, यातील अनेक संस्थांनी आवश्यक निकषांची पूर्तता न केल्यामुळे त्यांच्या मान्यतेचा प्रश्न निर्माण झाला असून काही संस्थांना राज्यमंडळाकडून अनुक्रमांकही मिळाला नसल्याचे सूत्रांनी सांगितले.

**परिणाम काय?**



- राज्य मंडळाकडून अनुक्रमांक न मिळाल्यास विद्यार्थ्यांना बारावी परीक्षा देता येणार नाही. त्यामुळे अनेक नामांकित संस्थांच्या ठाणे आणि मुंबईतील शाखांतील विद्यार्थी चिंताग्रस्त आहेत.
- राज्य मंडळाचे बारावी परीक्षा अर्ज भरण्यास ४ जानेवारीपर्यंत मुदत आहे. मात्र, या संस्थांनी अर्ज भरण्यास सुरुवात केली नसल्याचे पालकांनी सांगितले.
- मुंबई आणि परिसरातील साधारण चार संस्थांच्या विविध शाखांमधील शेकडो विद्यार्थ्यांचे नुकसान होण्याची शक्यता आहे.

**ठाण्यातील संस्थेला टाळे**

ठाणे, बोरिवली, अंधेरी अशा अनेक ठिकाणी शाखा असलेल्या एका संस्थेने अचानक ठाण्यातील शाखा बंद केली. गेल्या वर्षीही या संस्थेला मंडळाचा अनुक्रमांक न मिळाल्यामुळे बारावीच्या विद्यार्थ्यांना दुसऱ्या महाविद्यालयांतून अर्ज भरण्याची वेळ आली होती. या संस्थेला अद्यापही अनुक्रमांक मिळाला नाही. या संस्थेने ठाण्यातील कार्यालय अचानक बंद केल्याची तक्रार पालकांनी केली आहे. आर्थिक फसवणूक झाल्याची तक्रारही पालकांनी पोलिसांकडे केली आहे.

लोकसत्ता Sat, 19 December 2020
https://epaper.loksatta.com/c/57131317

## News Paper Clippings During December 2020

### Section: Education

# सावित्रीबाई फुले यांचा जन्मदिन 'शिक्षण दिवस'

**मुंबई :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा ३ जानेवारी हा जन्मदिन यापुढे सर्व शाळांमध्ये 'शिक्षण दिवस' म्हणून साजरा करण्याचे ठरविण्यात आले आहे. दोन-तीन दिवसांत त्याबाबतचे परिपत्रक काढले जाईल, अशी माहिती राज्याचे शालेय शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी दिली.

भारताचे माजी राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा ५ सप्टेंबर हा जन्मदिवस 'शिक्षक दिन' म्हणून साजरा केला जातो. सर्वच समाजातील महिलांच्या शिक्षणाची अत्यंत कष्टाने जोतीराव फुले आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या या क्रांतिकारी सामाजिक कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणाऱ्यांसाठी सावित्रीबाई फुले यांचा ३ जानेवारी हा जन्मदिवस राज्यात शिक्षण दिन म्हणून साजरा करावा, अशी मागणी पुढे आली. मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू आणि माजी खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांना पत्र पाठविले आहे. राज्याचे अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांनीही याबाबत शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर ३ जानेवारी हा 'शिक्षण दिवस' म्हणून साजरा केला जाणार असल्याचे गायकवाड यांनी सांगितले.

लोकसत्ता Sat, 1 https:

[ MEENA SHENDKAR ] ASSISTANT DIRECTOR OF EDUCATION, PUNE

# 'College seats are solely based on marks and cut-offs'

**PUNE:** With the admission process for First Year Junior College (FYJC) or Class II going on in the state, 1,07,030 seats are available for the academic year at 304 junior colleges spread across Pune division, including Pune and Pimpri- Chinchwad. The admissions were halted due to the Maratha reservation case being heard by the Supreme Court, before it resumed from November 26.

Post three rounds of admissions, a special round started from December 20. Meena Shendkar, assistant director of education, Pune and incharge of admission process, gives details to **Dheeraj Bengrut** about the process this year.

**How is the FYJC admission process being conducted in Pune division during the unprecedented Covid period?**

We are following the safety precautions as per the guidelines given by the state and central governments for the admission process. We completed the first round and had to stop on September 9 because of Maratha reservation issue. Admissions resumed from November 26 and the second and third rounds were conducted smoothly despite the Covid-19 pandemic. The admission percentage will increase when the students' marks and college cut-off lists will match. Students are waiting to get into prominent colleges, but their marks are less than cut-offs. As students are waiting to take the final step, we have to wait and watch.

The main reason behind low admission numbers even after the third round is because though seats are available students are waiting for their preferred colleges. I have requested parents to look at your child's marks, cut-offs and distance from house before confirming admission. There is a need to maintain balance between students' marks and college cut-off to confirm admission.

**What will be the next step for students who have not yet completed their admissions even after the end of all the rounds?**

Students have been given choice of colleges as per marks obtained and the cut-offs released by various colleges during the three rounds of admission. Going forward, in the first special round, only those non-admitted students who have given their "consent" for special round will be allowed to process their admission. Those who have not given consent in the earlier rounds will be given chance only in the next special rounds.

The first special round of admission process will start on December 20.

Parents need to understand that most of the prominent colleges in Pune and Pimpri-Chinchwad have already surrendered their management quota seats to us.

So, those admissions will also happen from the centralised admission process only.

Hence, parents should not waste time in waiting for prominent college admission seats.

**Challenges faced this year because of the Covid outbreak.**

The entire admission process, from registration of colleges to student admission, was online, unlike the pre-Covid situation. I made it clear to colleges and students that in-person meets posed spread of infection, so a dedicated email was sent to students to highlight the issue. We started an online grievance address cell. I have replied to more than 5,000 emails of students and parents regarding admission queries. Earlier, there were 46 guidance centres to help students in the admission process. We verified all Secondary School Certificate (SSC) board students at the school level itself, a process earlier done by guidance centres. I took eight webinars for around 1,100 school principals in Pune and Pimpri-Chinchwad areas.

[ MEENA SHENDKAR ] ASST DIR OF EDUCATION

**Parents should look at child's marks, cut-offs and distance from house before confirming admission.**



### FYJC ADMISSION THIRD ROUND ENDS, 61,359 SEATS VACANT IN PUNE REGION

**PUNE:** The third round of FYJC admissions ended on December 18 and 45,671 students have completed their admissions. Of the 12,461 available seats in the third round, 4,633 students completed their admissions and 61,359 seats are vacant across the streams in Pune and Pimpri-Chinchwad region. From December 20, the special round of FYJC admissions will start.

For this year's Class 11 admissions, 72,820 students are eligible for the first round of admission in 304 colleges of Pune and Pimpri-Chinchwad areas. The total intake of seats is 1,07,030 in Pune region. At least 41,021 students have completed admissions in the second round and 66,009 seats are vacant.

Due to the interim stay given by (SC on the implementation of the quota for Maratha community, the state education department had stopped the admission process for Class 11 (FYJC) since September 9 and it resumed from November 26. HTC

Hindustan Times: 19.12.2020



## News Paper Clippings During December 2020

### Section: Education

# प्रवेशासाठी मूळ कागदपत्रे आवश्यकच

## व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी 'सीईटी'कडून सूचना

पुणे, ता. १८ : व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पहिल्या फेरीत पसंतीक्रम दिलेल्या महाविद्यालयात क्रमांक लागला. मात्र, प्रवेशासाठी मूळ प्रमाणपत्रे पहिल्या फेरीच्या अंतिम तारखेपर्यंत जमा न केल्यास अशा उमेदवारांना प्रवेश देऊ नये. त्यांना पुढील फेरीची प्रक्रिया शिक्षण संस्थांनी समजावून सांगावी असे सूचना 'सीईटी सेल'मार्फत महाविद्यालयांना देण्यात आली आहे.

'सीईटी सेल'तर्फे व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू केली आहे. विद्यार्थ्यांचे प्रवेश, शुल्क यासंदर्भात सूचना देण्यात आलेल्या आहेत. विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरताना जात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर, आर्थिकदृष्ट्या दुर्बल या प्रमाणपत्रांची पावती पहिल्या फेरीच्या अंतिम तारखेपर्यंत ग्राह्य धरावी, तो पर्यंत जे विद्यार्थी मूळ प्रमाणपत्र सादर करणार नाहीत अशांना प्रवेश देऊ नयेत. प्रवेश दिल्यानंतर विद्यार्थ्यांनी दिलेली कागदपत्रे खोटी निघाल्यास त्याचा प्रवेश तत्काळ रद्द करावा. विद्यार्थ्यानि वाटप झालेल्या जागेची चुकीच्या पद्धतीने पडताळणी करून संस्थेत प्रवेश केल्यास हा प्रवेश रद्द करावा व त्याबाबत तातडीने हरकत नोंदवावी. याची सविस्तर माहिती www.mahacet.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**शुल्क व कागदपत्रांसबंधी सूचना**

- प्रवेश रद्दसाठी विद्यार्थ्यांची ऑनलाइन विनंती ग्राह्य धरण्यात येईल.
- विनंती मान्य केल्यानंतर या जागेवरच पुन्हा हक्क सांगता येणार नाही, ती जागा इतरांना उपलब्ध होईल.
- प्रवेश रद्द होताच दोन दिवसात संस्था प्रक्रिया शुल्क व मूळ कागदपत्रे परत करावीत.
- कागदपत्र व शुल्क परत देताना संस्थेने विद्यार्थ्यांवर दबाव आणू नये.

Sakaal: 19.12.2020

# कॉलेज सुरू होण्याची प्रतीक्षा

## व्यवस्थापन परिषद सदस्यांची समिती; विद्यापीठाला अहवाल सादर होणार

सकाळ EXCLUSIVE

**पुणे, ता. १८ : ''जानेवारीत प्रत्यक्ष महाविद्यालय सुरू होणार असे कळाले आहे. ऑनलाइन क्लासमुळे प्रॅक्टिकल बंद झाले, विषय पूर्ण समजत नाही आणि आता कंटाळाही आला आहे. सुरक्षेची काळजी घेऊन, नियमांचे पालन करून महाविद्यालये सुरू झाली पाहिजेत...' 'बी. एस्सी.'च्या अंतिम वर्षात शिकणारी निकिता कदम सांगत होती. तर, विद्यापीठाने महाविद्यालयांना तयारीसाठी वेळ दिला पाहिजे, असे प्राचार्यांचे म्हणणे आहे.**



महाविद्यालये सुरू व्हावेत यासाठी गेल्या महिन्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी दोन दिवस प्राचार्यांची ऑनलाइन बैठक घेतली होती. त्यानंतर जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात महाविद्यालये सुरू होतील, असे संकेत देण्यात आले.

त्यानंतर व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत देखील यावर चर्चा करण्यात आली. त्यामध्ये प्राचार्य डॉ. विश्वास गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. महाविद्यालये सुरू करताना काय काळजी घ्यायला हवी?, त्यात कोणती आव्हाने आहेत?, त्यावर उपाय काय असतील? प्राध्यापक, विद्यार्थी यांचे म्हणणे काय?, या सर्वांचा विचार करून ही समिती पुणे विद्यापीठाला अहवाल सादर करणार आहे. पण व्यवस्थापन समितीच्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर न झाल्याने समितीच्या सदस्यांना अधिकृत पत्रही मिळालेले नाहीत. त्यामुळे महाविद्यालये सुरू करण्यासाठी प्राचार्य, प्राध्यापकांसोबत समिती सदस्यांची एकही बैठक झालेली नाही. पुढील आठवड्यात व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत इतिवृत्त मंजूर होतील. त्यानंतर या समितीचे कामकाज सुरू होऊन महाविद्यालये सुरू करण्यासाठी शिफारशींसह अहवाल सादर केला जाणार आहे. त्यामुळे जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात महाविद्यालये सुरू करण्याचा मुहूर्त हुकणार असल्याची शक्यता आहे.

**किमान १० दिवसांची पूर्वकल्पना आवश्यक**

पुण्यातील एका प्राचार्यांनी सांगितले, की महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय झाला तरी आदेशाची प्रत्यक्ष अंमलबजावणी आम्हाला करायची आहे. त्यानुसार वेळापत्रक ठरविणे, सुरक्षेसाठी उपाययोजना, स्वच्छता करण्यासाठी किमान १० दिवसांचा कालावधी आवश्यक आहे.

**येत्या काळात महाविद्यालये काही प्रमाणात सुरू झाली पाहिजेत, त्यासाठी आम्ही सकारात्मक आहोत. व्यवस्थापन समितीच्या बैठकीचे मिनिट्स मंजूर झाले की समितीचे नियुक्तीचे पत्र मिळेल. त्यानंतर लगेच जिल्हानिहाय प्राचार्यांशी चर्चा करून महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भात अहवाल सुरू केला जाईल. त्यामध्ये काय काळजी घ्यावी याबाबत शिफारशी केल्या जातील.**

**- प्राचार्य डॉ. विश्वास गायकवाड**, सदस्य, व्यवस्थापन समिती सदस्य

Sakaal: 19.12.2010

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# सरल पोर्टलवरील जातीद्वेष थांबवा

## ब्राह्मण सेवा संघाची मागणी

**पुणे :** शालेय शिक्षण विभागाने सरल पोर्टलवर सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांची माहिती घेण्यास सुरुवात केली आहे. मात्र या पोर्टलवर जात या रकान्यात ब्राह्मण आणि इतर असे दोनच पर्याय दिले आहेत. राज्यात अनेक जाती असताना केवळ ब्राह्मण व ब्राह्मणेतर असे पर्याय देणे ही गंभीर बाब आहे. लोकशाही शासन ब्राह्मण समाजाला सापत्न वागणूक देत आहे. त्यामुळे शिक्षण क्षेत्रातील हा जातीद्वेष तात्काळ थांबवावा, अशी मागणी ब्राह्मण सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष सु.द. पुराणिक यांनी शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांच्याकडे केली आहे.

पुराणिक म्हणाले, सरल पोर्टलवर विद्यार्थ्यांचे नाव, पत्ता, वय, जात इत्यादी माहिती घेण्यात येते. मात्र यंदा जात रकान्यात बदल करण्यात आला आहे. ब्राह्मण व इतर असे का केले हे अनाकलनीय आहे. इतर मराठा, माळी, धनगर अशा विविध जाती असताना फक्त ब्राह्मण व ब्राह्मणेतर हेच कां? ही गंभीर बाब आहे. यामुळे ब्राह्मण व ब्राह्मणेतर असा भेदभाव शासनाकडूनच केला जातो आहे, असा भ्रम निर्माण होत आहे. जातीयद्वेषाचा बळी ठरलेल्या ब्राह्मण समाजाला आता शासन देखील सापत्न वागणूक देणार की काय असा प्रश्न ब्राह्मण समाजाच्या मनात निर्माण होव असल्याचेही पुराणिक यांनी नमूद केले.

शासन या पोर्टलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची माहिती घेत आहेत की ब्राह्मण जातीची माहिती घेत आहे. विद्यार्थ्यांची अशी विभागणी करून आपले हे लोकशाही शासन नक्की काय साध्य करणार आहे? भविष्यात या जातीपातीची विभागणी करून ब्राह्मण समाजाच्या विद्यार्थ्यांना सापत्न वागणूक देण्याचा शासनाचा मानस असल्याची शंका येते. असे गंभीर प्रश्न व शंका यामुळे निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे सरल पोर्टलमध्ये तातडीने योग्य ते बदल करावेत, अशी मागणीही पुराणिक यांनी शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांच्याकडे केली आहे.

Kesari: 19.12.2020

# 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण व्यावसायिक शिक्षणासाठी उपयुक्त'

पुणे : नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाने व्यावसायिक शिक्षणाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले आहे. शिक्षण क्षेत्रासाठी हे चांगले पाऊल आहे. पण, सद्यःपरिस्थितीत व्यावसायिक शिक्षणासाठी गरजची असणारी लवचिकता आपल्या शिक्षण रचनेत नाहीत, असे मत एम्परसँड समूहाच्या ईसीईच्या संचालिका डॉ. रीटा सोनवत यांनी व्यक्त केले.

नवीन शैक्षणिक धोरणला मंत्रिमंडळाची मान्यता मिळाली आहे. या नवीन धोरणानुसार सहावीनंतरच्या किमान पन्नास टक्के विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणामध्ये समाविष्ट करावे असा आहे. सध्या केवळ सीबीएसईच्या शाळाच विद्यार्थ्यांना पर्यायी म्हणून काही व्यावसायिक अभ्यासक्रम घेण्याची परवानगी देतात.

डॉ. सोनवत म्हणाल्या, व्यावसायिक अभ्यासक्रम निवडताना विद्यार्थी हे भौगोलिक स्थान, पायाभूत सुविधाची उपलब्धता आणि प्रशिक्षित शिक्षक या गोष्टी पाहतात; पण बऱ्याच शाळात व्यावसायिक शिक्षणासाठी आवश्यक अशा या पायाभूत सुविधांचा आणि शिक्षकांचा अभाव आहे. शहरांमधील बऱ्याच सरकारी शाळांनी विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याच्या बाबतीत बऱ्यापैकी काम केले आहे. परंतु काही कारणांमुळे ग्रामीण भागात बहुतांशी खासगी आणि सरकारी शाळा या विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यात अपयशी ठरल्या आहेत. ग्रामीण भागातील खासगी आणि सरकारी शिक्षकांमध्ये नियमितपणा, वक्तशीरपणा आणि व्यावसायिकतेचा अभाव आहे. ज्याचा शिक्षण प्रणालीवर परिणाम झाला आहे.

Kesari: 19.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# केवळ ३२ टक्के विद्यार्थ्यांचा प्रवेश

## अकरावी प्रवेशाच्या तिसऱ्या फेरीत तीन हजार ९७५ विद्यार्थी

**पुणे, ता. १८ :** अकरावी प्रवेशाच्या तिसऱ्या फेरीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी केवळ ३१.८९ टक्के विद्यार्थ्यांनी शुक्रवारपर्यंत प्रवेश घेतल्याची माहिती समोर आली आहे. केंद्रीय पद्धतीने राबविण्यात येणाऱ्या प्रवेश फेऱ्यांमध्ये निवड होऊनही प्रत्यक्ष प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पहिल्या फेरीपासूनच तुलनेने कमी असल्याचे दिसून येत आहे.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या अकरावी प्रवेशाच्या तिसऱ्या फेरीत ३३ हजार ६६१ विद्यार्थी पात्र ठरले होते. त्यापैकी १२ हजार ४६१ विद्यार्थ्यांची या फेरीअंतर्गत निवड झाली होती. विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी शुक्रवारपर्यंतच मुदत देण्यात आली होती. तिसऱ्या फेरीदरम्यान तीन हजार ९७५ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. या फेरीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांपैकी केवळ ३१.८९ टक्के विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे.

**प्रतिसाद न देण्याची कारणे**

- शहरालगतच्या गावांमधील कनिष्ठ महाविद्यालयात किंवा केंद्रीय विद्यालयात विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्याची शक्यता
- आयटीआय, पदविका अशा विविध अभ्यासक्रमांकडे कल
- शहरातील नामांकित आणि पसंतीच्या महाविद्यालयात प्रवेश न मिळाल्याने

शहरातील नामांकित महाविद्यालयात प्रवेश मिळावा, या अपेक्षेने महाविद्यालयात प्रवेशासाठी निवड होऊनही अनेक विद्यार्थी प्रवेश नाकारत आहेत किंवा प्रवेशासाठी संमती देत नसल्याची माहिती समोर येत आहे. तिसऱ्या फेरीत आठ हजार १७६ विद्यार्थ्यांनी प्रवेश यादीत निवड होऊनही कोणताही प्रतिसाद दिला नाही. तर पहिल्या फेरीत १४ हजार ३५७, दुसऱ्या फेरीत १२ हजार ४५२ विद्यार्थ्यांनी प्रवेश यादीत निवड झाली असतानादेखील प्रवेशासाठी प्रतिसाद दिला नसल्याचे निदर्शनास आले आहे.

**विशेष फेरी तपशील शनिवारी**

राज्य सरकारने यापूर्वी जाहीर केल्यानुसार अकरावी प्रवेशाच्या नियमित तीन फेऱ्या पूर्ण झाल्या आहेत. प्रवेश प्रक्रियेंतर्गत पहिल्या विशेष फेरीचा तपशील शनिवारपर्यंत (ता. १९) जाहीर होण्याची शक्यता आहे, अशी माहिती सचिव मीना शेंडकर यांनी दिली आहे.

Sakaal: 19.12.2020

# पीएचडी गाइडसाठी अटीचा अडसर

## पुणे विद्यापीठाने निर्णय घेण्याची बेस्टाची मागणी

पुणे, ता. १८ : केंद्र सरकारच्या राजपत्रात आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्या परिषदेने केलेल्या ठरावात सहायक प्राध्यापकांना पीएचडी, एमफीलचे गाइड म्हणून काम करण्यासाठी वयाची अट टाकलेली नाही. मात्र, शैक्षणिक विभागाने गाइड म्हणून मान्यता मिळविण्यासाठी पाच आणि दहा वर्षांच्या अनुभवाची अट टाकून अडसर निर्माण केला आहे. ती रद्द करा अशी मागणी बेस्टा संस्थेचे अध्यक्ष डॉ. अजय दरेकर यांनी प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांच्याकडे केली आहे.

केंद्र सरकारने ६ जुलै २०१६मध्ये पीएचडी, एमफील गाईडसंदर्भात नियम जाहीर केले. त्यास पुणे विद्यापीठाच्या विद्या परिषदेने ९ नोव्हेंबर २०१६ रोजी मान्यता दिली. यामध्ये एमफिल किंवा पीएचडीप्राप्त सहायक प्राध्यापकांना संशोधक मार्गदर्शक म्हणून मान्यता देण्याचा ठराव मंजूर केला. त्यामध्ये कोणतीही अनुभवाची अट टाकली नाही. परंतु, शैक्षणिक विभागाच्या नियमावलीत सहायक प्राध्यापक सेवेत रुजू होताना पीएचडी असल्यास, पाच वर्षांचा अनुभव आणि सेवेत रुजू झाल्यानंतर पीएचडी केल्यास १० वर्षांचा अनुभव पाहिजे, अशी अट घातली आहे. केंद्र सरकारच्या राजपत्रात आणि विद्या परिषदेने केलेल्या ठरावात वयाची अट नसताना शैक्षणिक विभाग स्वतःचे नियम अमलात आणत आहे. त्यामुळे प्राध्यापकांचे नुकसान होत आहे. ही अट रद्द करून विद्या परिषदेने मंजूर केलेल्या ठरावाची तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी डॉ. दरेकर यांनी केली आहे. राज्यातील इतर विद्यापीठांमध्ये सहायक प्राध्यापक हे गाइड म्हणून काम करू शकतात.

Sakaal: 19.12.2020

# शिष्यवृत्ती बंद करण्याचा केंद्राचा घाट : डॉ. थोरात



सुखदेव थोरात

नागपूर, ता. १८ : केंद्रीय सामाजिक न्याय विभागाने शिष्यवृत्तीचा वाटा ६०-४० करण्याच्या प्रस्ताव दिला असताना प्रधानमंत्री कार्यालय दहा टक्केच निधी देण्याच्या तयारीत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ७६ वर्षांपूर्वी सुरू केलेली पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्तीची योजना बंद करण्याचा प्रयत्नात केंद्र सरकार असल्याचा आरोप विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष व असोसिएशन फॉर सोशल अँड इकॉनॉमिक इक्वॅलिटी अध्यक्ष डॉ. सुखदेव थोरात यांनी शुक्रवारी पत्रपरिषदेत केला.

अनुसूचित जाती, जमाती व ओबीसींच्या शैक्षणिक प्रगतीत खुंटेल, असे ही ते म्हणाले. या विषयावर सोमवारी (ता. २०) संविधान चौकात विविध संघटनांतर्फे धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**आयआयटी, आयआयएममध्ये आरक्षण रद्द**

आयआयटी, आयआयएममधील प्राध्यापकांची गुणवत्ता वाढविण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीच्या शिफराशीवरून दोन्ही संस्थांमध्ये आरक्षणच रद्द करण्यात आल्याची माहिती डॉ. थोरात यांनी दिली.

Sakaal: 19.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# महाविद्यालये सुरू होणार, सोमवारी शिक्कामोर्तब

## कुलगुरू नितीन करमळकर : वसतिगृहातील विद्यार्थ्यांना उशिरा बोलवणार

■ लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये सुरू करण्याबाबत विद्यापीठ प्रशासन, प्राचार्य व प्राध्यापकांनी सकारात्मकता दाखवली असली, तरी येत्या सोमवारी (दि.२१) विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत त्यावर शिक्कामोर्तब होणार आहे. त्यात विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसह प्राध्यापकांच्या व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कोरोना तपासणीबाबतही चर्चा केली जाणार आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ व संलग्न महाविद्यालये बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु, गेल्या काही दिवसांपासून पुणे जिल्ह्यातील कोरोना रुग्णांच्या संख्येत घट होत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पुण्यासह अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील महाविद्यालये सुरू करण्याबाबत विद्यापीठाने सकारात्मकता दर्शविली आहे. मात्र, पुणे महापालिका प्रशासनाने येत्या 3 जानेवारीपर्यंत शहरातील शाळा व कनिष्ठ महाविद्यालये सुरू करण्यास परवानगी दिली नाही. परिणामी, 3 जानेवारीनंतरच महाविद्यालये सुरू होणार आहेत. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्रा.नंदकुमार निकम म्हणाले, कोरोना रुग्णांचे प्रमाण कमी होत असल्यामुळे सर्वांनीच महाविद्यालये सुरू करण्यास अनुकूलता दर्शविली आहे. परंतु, विद्यार्थ्यांना महाविद्यालयात बोलवण्यापूर्वी विद्यापीठाला विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने काळजी घेण्यासाठी नियोजन करावे लागेल. त्याचप्रमाणे प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचा विद्यार्थ्यांशी थेट संपर्क येणार असल्याने त्यांची कोरोना तपासणी करून घ्यावी लागेल.

> जानेवारीमध्ये महाविद्यालये सुरू करण्याबाबत स्थानिक प्रशासनाकडे पत्रव्यवहार करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे येत्या सोमवारी होणाऱ्या विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीसमोर विविध मुद्यावर चर्चा करून आवश्यक निर्णय घेतले जाणार आहेत. तसेच महाविद्यालयातील वसतिगृहात राहून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना आत्ताच महाविद्यालयात बोलवू नये, अशा सूचना प्राचार्यांना दिल्या आहेत.
>
> - डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Lokmat: 21.12.2020

पुढारी

# विशेष फेरीचे वेळापत्रक जाहीर



मिशन-ॲडमिशन

● आजपासून तीन दिवस पसंतीक्रम भरता येणार

● गुरुवारी निवड यादी

पुणे : पुढारी वृत्तसेवा

पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरातील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या विशेष फेरीला रविवार (दि.२०)पासून सुरुवात होणार असून २४ डिसेंबर रोजी निवड यादी जाहीर करण्यात येणार आहे. या विशेष फेरीचे वेळापत्रक अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

विद्यार्थ्यांना २० ते २२ डिसेंबर या कालावधीत अर्जातील भाग एकमध्ये सुधारित माहिती भरता येणार असून, भाग दोनमधील महाविद्यालयांचे पर्याय अपडेट करता येणार आहेत. विशेष फेरीत आता प्रवेश प्रक्रियेत नोंदणी न करणाऱ्या विद्यार्थ्यांना नोंदणी करता येणार आहे. वेळापत्रकानुसार २३ डिसेंबरचा दिवस विद्यार्थ्यांची माहिती तपासण्यासाठी राखीव ठेवण्यात आला आहे.

त्यानंतर २४ डिसेंबर रोजी जाहीर होणाऱ्या निवड यादीत महाविद्यालय मिळणाऱ्या विद्यार्थ्यांना २४ ते २६ डिसेंबर या कालावधीत प्रवेश घ्यावा लागणार आहे. पुढील विशेष फेरीसाठी २७ डिसेंबर रोजी प्रवेशक्षमता जाहीर करण्यात येईल.

दरम्यान तिसऱ्या फेरीसाठी १२ हजार ४६१ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर करण्यात आला होता. त्यापैकी ८ हजार १७६ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेला नाही.

आता शालेय परीक्षेत

Pune Edition
Dec 20, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# अकरावी प्रवेश विशेष फेरीचे वेळापत्रक जाहीर

## आजपासून कार्यवाही

## पुणे व पिंपरी-चिंचवड हद्दीतील विद्यार्थ्यांसाठी फेऱ्या

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १९ - पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील इयत्ता अकरावी ऑनलाइन प्रवेशाच्या विशेष फेरीचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. या प्रवेश फेरीची कार्यवाही रविवार (दि.२०) पासून सुरू होणार आहे.

अकरावीच्या नियमित प्रवेशाच्या तीन फेऱ्या पूर्ण झाल्या आहेत. ३०४ कनिष्ठ महाविद्यालयात एकूण १ लाख ७ हजार ३० जागा दर्शविण्यात आल्या होत्या. त्यासाठी १ लाख १ हजार ४५९ विद्यार्थ्यांची नोंदणी झाली आहे. त्यातील ८५ हजार १५४ विद्यार्थ्यांनी अर्ज भरून 'लॉक' केले आहे. ८४ हजार ८९३ अर्जांची पडताळणी करण्यात आलेली आहे. ७७ हजार २२२ विद्यार्थ्यांनी पसंती क्रम नोंदविलेले आहेत. ४५ हजार ४४८ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले असून ६१ हजार ५८२ इतक्या प्रवेशाच्या जागा रिक्तच पडलेल्या आहेत.

विशेष फेरीसाठी प्रवेशाच्या रिक्त जागांचा तपशील २० डिसेंबरला जाहीर करण्यात येणार आहे. यात व्यवस्थापन, अल्पसंख्याक व इनहाऊस कोट्यातून प्रत्यार्पित केलेल्या रिक्त जागांचा ही समावेश असणार आहे. २२ डिसेंबरपर्यंत विद्यार्थ्यांना अर्जाचा भाग-१ व २ मध्ये बदल करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. २४ डिसेंबरला कनिष्ठ महाविद्यालयांची यादी व विद्यार्थ्यांची यादी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. २४ ते २६ डिसेंबर दरम्यान विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रवेश निश्चित प्रक्रिया पूर्ण करावी.

Prabhat: 20.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# दुसऱ्या सत्रातील परीक्षांची शुल्कवाढ रद्द



पुणे, ता. १९ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाच्या दुसऱ्या सत्रातही वाढीव परीक्षा शुल्क न घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे. यापूर्वी पहिल्या सत्राचे वाढीव परीक्षा शुल्क रद्द करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला होता.

पुणे विद्यापीठाने २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात शुल्कवाढ करण्याचा निर्णय घेतला होता. कोरोना काळात अनेक पालकांची नोकरी गेल्याने, व्यवसाय ठप्प झाल्याने आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे शैक्षणिक शुल्कवाढ पुढच्या वर्षापासून करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला होता; पण परीक्षा शुल्काबाबत कोणताही निर्णय घेण्यात आला नव्हता.

२०२०-२१ मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची प्रथम सत्राची परीक्षा घेण्यात येणार आहे. त्यापूर्वी परीक्षा विभागाने शुल्कवाढ करताना त्यामध्ये प्रोजेक्ट शुल्क व इतर कारणांनी शुल्क घेतले जात असल्याने शुल्क मोठ्या प्रमाणात वाढल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी केली होती. कोरोनाची स्थिती पाहता प्रथम सत्रासाठी २०१९-२० या वर्षाप्रमाणेच शुल्क घ्यावे, वाढीव शुल्क घेऊ नये, असे आदेश गेल्या महिन्यात दिले होते; परंतु हा निर्णय घेताना दुसऱ्या सत्राचा विचार विद्यापीठाने केलेला नव्हता. सकाळ

> विद्यापीठाने दुसऱ्या सत्राचेही वाढीव परीक्षा शुल्क घेण्यास स्थगिती दिली आहे. याबाबत परीक्षा मंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे. विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांनी दुसऱ्या सत्रातही गतवर्षीप्रमाणे परीक्षा शुल्क घ्यावे. वाढीव शुल्क घेऊ नये.
>
> - डॉ. महेश काकडे, संचालक, परीक्षा मंडळ

Sakaal: 20.12.2020

# वाढीव परीक्षा शुल्कास ब्रेक

प्रभात वृत्तसेवा 20/12/2020



प्रभात

पुणे, दि. १९ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने यंदाच्या शैक्षणिक वर्षातील दुसऱ्या सत्रातही वाढीव परीक्षा शुल्क न आकारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. यापूर्वी पहिल्या सत्राचे वाढीव परीक्षा शुल्कास स्थगिती दिली होती.

यापूर्वीच पुणे विद्यापीठाने २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात शुल्कवाढ करण्याचा निर्णय घेतला होता. करोना काळात अनेक पालकांची आर्थिक घडी विस्कटली होती. अनेकांची नोकरी गेल्याने, व्यवसाय ठप्प झाल्याने आर्थिक नुकसान झाले आहे. त्यामुळे ही शैक्षणिक वाढ पुढच्या वर्षापासून करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला होता. पण परीक्षा शुल्काबाबत कोणताही निर्णय घेण्यात आला नव्हता. आता पहिल्या सत्रासह दुसऱ्या सत्रातील वाढीव परीक्षा शुल्क न घेण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे.

दरम्यान, करोनाच्या विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर उद्भवलेल्या आर्थिक अडचणी विचारात घेऊन विद्यार्थ्यांच्या हितासाठी विद्यापीठ अधिकार मंडळाने द्वितीय सत्रातीलही सर्व अभ्यासक्रम परीक्षांचे परीक्षा व अनुषंगिक शुल्कात कुठल्याही प्रकारची वाढ न करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे मागील शैक्षणिक वर्ष २०१९-२० याप्रमाणे परीक्षा शुल्क आकारण्यात यावे, असे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी स्पष्ट केले आहे. याबाबतचे परिपत्रक परीक्षा विभागाने प्रसिद्ध केले आहे.

Prabhat: 20.12.2020

# प्राध्यापक पदोन्नतीसाठी उद्यापासून मुलाखती

पुणे, ता. २० : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांमधील सहयोगी प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठी सेवांतर्गत प्रगती योजनेतून (करीअर ॲडव्हान्समेंट स्कीम-कॅस) २२ ते २८ डिसेंबर या कालावधीत मुलाखती घेतल्या जाणार आहेत. विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाने याचे वेळापत्रक जाहीर केले आहे.

अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांमधील प्राध्यापकांना ठराविक कालावधीनंतर पदोन्नतीसाठी 'कॅस'च्या मुलाखतींना सामोरे जावे लागते. त्यासाठी ओरिएंटेशन कोर्स, फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम, रिफ्रेशर कोर्ससह राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदेत शोधनिबंधही सादर झालेले असणे आवश्यक आहे. ही सर्व माहिती 'कॅस'च्या मुलाखतींसाठी महत्त्वाची ठरते. यापूर्वी पुणे विद्यापीठाने पान ४ वर »

### प्रत्येक महिन्याला मुलाखती

विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) 'कॅस' मुलाखतीच्या कामात सुधारणा करण्याची सूचना केल्या आहेत. त्यानुसार राज्य सरकारने जुलै २०१९ मध्ये आदेश काढला. त्यानंतर उच्च शिक्षण पुणे सहसंचालक कार्यालयाने १२ डिसेंबर २०२० ला पुणे विद्यापीठाने प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात 'कॅस'च्या मुलाखती घ्याव्यात, असा आदेश दिला आहे. पुणे विद्यापीठात वर्षातून एकदाच मुलाखती होत असल्याने प्राध्यापकांच्या पदोन्नतीच्या लाभाचा आणि आर्थिक लाभ याचे नुकसान होत असल्याने शासनाच्या आदेशाप्रमाणे मुलाखती घ्याव्यात, अशी मागणी यापूर्वी प्राध्यापक संघटनांनी केली आहे.

# प्राध्यापक पदोन्नतीसाठी उद्यापासून मुलाखती

» पान १ वरून

संलग्न महाविद्यालयांतील सहयोगी प्राध्यापकांसाठी मार्च २०२० मध्ये मुलाखती घेण्याचे ठरवले होते; पण कोरोनाची साथ सुरू झाल्याने मुलाखती स्थगित केल्या. त्यानंतर सप्टेंबरमध्ये मुलाखती होणार होत्या; पण अंतिम वर्षाच्या परीक्षांचे काम आणि लॉकडाउनमुळे प्रवासावरील बंधने यामुळे प्राध्यापकांनी विरोध केल्याने त्या पुन्हा एकदा स्थगित केल्या.

विद्यापीठाने अंतिम वर्ष व अंतिम पूर्व बॅकलॉग परीक्षांचा ताण संपल्यानंतर रखडलेल्या 'कॅस'च्या मुलाखती २२ ते २८ डिसेंबर या कालावधीत घेण्याचे निश्चित केले आहे. यामध्ये ४८४ प्राध्यापकांचा समावेश आहे. नोंदणी केलेल्या सहयोगी प्राध्यापकांनी त्यांना ठरवून दिलेल्या तारखेला व वेळेत मूळ सेवा पुस्तक, यापूर्वी कॅस अंतर्गत वेतन निश्चितीचे पत्र, शैक्षणिक पात्रतेची मूळ कागदपत्रे, विद्यापीठ मान्यता पत्र, स्वतःचो व प्राचार्यांची स्वाक्षरी असलेली चेकलिस्ट फॉर्म याच्या चार फाइल तयार करून सोबत घेऊन यावे, असे शैक्षणिक विभागाने आदेशात नमूद केले आहे.

Sakaal: 21.12.2020

## News Paper Clippings During December 2020

### Section: Education

# विद्यापीठाची जानेवारीत अधिसभा

पुणे, ता. २० : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने यापूर्वी अंदाजपत्रक मंजूर करण्यासाठी ऑनलाइन अधिसभा घेतली; पण सभा ऑनलाइन का घेतली, यावरूनच वाद झाले. त्यानंतर आता जानेवारी महिन्यात ९ आणि १० तारखेला अधिसभेचे आयोजन करण्यात आले असून, जवळपास वर्षभरानंतर दोन दिवसांची थेट अधिसभा होणार आहे.



पुणे विद्यापीठाच्या अधिसभेत पुणे, नगर व नाशिक या तीन जिल्ह्यातील प्राध्यापक, प्राचार्य व संस्थाचालक प्रतिनिधींसह राज्यपाल नियुक्त असे एकूण ७० सदस्य आहेत. त्यांच्या उपस्थितीत वर्षातून दोन वेळा अधिसभेची बैठक होते. यामध्ये शैक्षणिक धोरणासह प्रशासकीय निर्णय, योजना यावरही चर्चा केली जाते. गेल्या वर्षी १४ डिसेंबर २०१९ रोजी अधिसभेची प्रत्यक्षात बैठक झाली होती. त्यानंतर मार्च २०२० मध्ये अधिसभेची बैठक घेतली जाणार होती; पण कोरोनामुळे ही बैठक पुढे ढकलली. त्यानंतर २५ जून रोजी ऑनलाइन पद्धतीने ही बैठक घेतली होती. त्यानंतर एकही बैठक झाली नाही.

कोरोनाचा प्रभाव कमी झाल्याने आता विद्यापीठाने नवीन वर्षात ९ व १० जानेवारी रोजी राज्यपालांच्या परवानगीने बैठक घेण्याचा निर्णय घेतला आहे. या बैठकीत ऑनलाइन परीक्षा, निकाल, ऑनलाइन शिक्षण यांसह इतर विषयांवर चर्चेला पुरेसा वेळ मिळणार आहे.

Sakaal: 21.12.2020

# शाळांमध्ये ऑनलाइन प्रीलिम परीक्षा

**विद्यार्थ्यांच्या तयारीसाठी असल्याचे स्पष्टीकरण**



- सरकारची अद्यापही स्पष्ट सूचना नाही
- संभ्रम असतानाही दिल्लीतील शाळांच्या ऑनलाइन परीक्षा
- विद्यार्थ्यांच्या तयारीसाठी परीक्षा घेत असल्याचे स्पष्टीकरण

**"आम्ही सध्या विद्यार्थी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा विचार करून ऑनलाइन प्रीलिम परीक्षा घेत आहोत. अर्थात, एवढी तयारी पुरेशी नसून, आम्ही सीबीएसईच्या मार्गदर्शक सूचनांतर्गत प्रत्यक्ष परीक्षा घेण्याचाही विचार करीत आहोत.**

**– प्रियांका बरारा, प्राचार्य**

**बोर्डाच्या बहुतांश परीक्षा या ८० गुणांच्या असतात. त्यामुळे विद्यार्थांना पूर्ण प्रश्नपत्रिका सोडवण्याचा सराव व्हायला हवा, असे आम्हाला वाटते. त्यानुसार आम्ही डिसेंबरच्या सुरुवातीला ऑनलाइन पद्धतीने यशस्वीरीत्या प्रीलिम परीक्षा घेतली. पुढची प्रीलिम आणि चाचणी परीक्षा प्रत्यक्ष पद्धतीने घेण्याचा विचार आहे.**

**– रश्मी बिस्वाल, प्राचार्य**

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

पुढील वर्षीच्या बोर्डाच्या परीक्षांच्या तारखांबाबत अद्याप स्पष्टता नसतानाही शाळांनी ऑनलाइन प्रीलिम परीक्षा घेण्यास सुरुवात केली आहे. बोर्डाच्या परीक्षांची घोषणा झाल्यास विद्यार्थी त्यासाठी तयार असावेत, यासाठी ही परीक्षा घेतली जात असल्याचे शाळांकडून सांगण्यात आले.

शिक्षण मंत्रालयाने १०वी व १२वीच्या मुख्य परीक्षांच्या तारखांबाबत अजूनही स्पष्ट सूचना केलेली नाही. मात्र, ही परीक्षा प्रत्यक्ष पद्धतीनेच होईल, असे नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर दिल्लीतील शाळांनी ऑनलाइन प्रीलिम परीक्षा घेण्यास सुरुवात केली आहे. गुरगाव, गाझियाबाद आणि नॉएडामध्ये लॉकडाउनमध्ये शिथिलता असल्याने प्रीलिम परीक्षा प्रत्यक्ष पद्धतीने घेण्यावर विचार सुरू आहे. करोनाचा प्रादुर्भाव जोरात असतानाही सीबीएसईने नीट व जेईई या परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेतल्या. साहजिकच १०वी आणि १२वीच्या विद्यार्थ्यांनीसुद्धा प्रत्यक्ष परीक्षेसाठी तयार राहायला हवे. आम्ही सध्या विद्यार्थी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा विचार करून ऑनलाइन प्रीलिम परीक्षा घेत आहोत. अर्थात, एवढी तयारी पुरेशी नसून, आम्ही सीबीएसईच्या मार्गदर्शक सूचनांतर्गत प्रत्यक्ष परीक्षा घेण्याचाही विचार करत आहोत, असे दिल्लीतील रोहिणी येथील एमआरजी शाळेच्या प्राचार्य प्रियांका बरारा यांनी सांगितले.

गाझियाबादमधील डीपीएस-आरएनई शाळेच्या प्राचार्य पल्लवी उपाध्येय यांच्या म्हणण्यानुसार, करोना संसर्गकाळातही शाळेकडून बोर्डाच्या परीक्षेसाठीचा आवश्यक अभ्यासक्रम पूर्ण करून घेण्यात आला आहे. तसेच सीबीएसईच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शाळेने ऑनलाइन परीक्षा घेतली आहे. ही परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी तत्पूर्वी विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांसोबत डिजिटल संवादसत्र आयोजित करण्यात आले होते. आता जानेवारीत प्रत्यक्षरित्या परीक्षा घेण्याची तयारी सुरू आहे. पुष्पांजली विहारस्थित डीएव्ही पब्लिक स्कूलच्या प्राचार्य रश्मी बिस्वाल यांनी सांगितले की, बोर्डाच्या बहुतांश परीक्षा या ८० गुणांच्या असतात. त्यामुळे विद्यार्थांना पूर्ण प्रश्नपत्रिका सोडवण्याचा सराव व्हायला हवा, असे आम्हाला वाटते. त्यानुसार आम्ही डिसेंबरच्या सुरुवातीला ऑनलाइन पद्धतीने यशस्वीरीत्या प्रीलिम परीक्षा घेतली. पुढची प्रीलिम आणि चाचणी परीक्षा प्रत्यक्ष पद्धतीने घेण्याचा विचार आहे.

Maharashtra Times: 21.12.2020



## News Paper Clippings During December 2020

### Section: Education

# अनुभव अभावाने शिक्षणाचे 'अव्यवस्थापन'

**करोनामुळे समर प्लेसमेंट, इंटर्नशिप, स्टडी टूर अनुपलब्ध**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

लॉकडाउनपासून राज्यातील कॉलेजे बंद असल्याने व्यवस्थापनशास्त्र अभ्यासक्रमाचे विद्यार्थी अडचणीत आले आहेत. कॉलेजे ऑनलाइन सुरू असली, तरी समर प्लेसमेंट्स, इंटर्नशिप, स्टडी टूर अशा अनेक गोष्टींवर विद्यार्थ्यांना पाणी सोडावे लागले आहे. त्यामुळे सध्या द्वितीय वर्षात शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांच्या अनुभवांशिवायच व्यवस्थापनशास्त्राची पदवी मिळण्याची शक्यता आहे.

करोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे मार्च महिन्यात लॉकडाउन लागू झाला. तेव्हापासून शाळा-कॉलेजे बंद ठेवण्यात आली. आता २०२० हे वर्ष संपत आले, तरी राज्यातील कॉलेजे सुरू झालेली नाहीत. सुप्रीम कोर्ट आणि 'यूजीसी'च्या निर्देशांनुसार अंतिम वर्षासाठीच्या परीक्षा ऑनलाइन-ऑफलाइन पद्धतीने घेतल्या गेल्या. अन्य वर्षांत शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना सरासरी गुण देऊन पुढील वर्गात प्रवेश दिला गेला. त्यातील अनेकांचे शिक्षण ऑनलाइन पद्धतीने सुरू आहे. मात्र, इतर उपक्रम राबवले जात नसल्याने या विद्यार्थ्यांना त्या अनुभवाला मुकावे लागत असल्याचे चित्र आहे.

व्यवस्थापनशास्त्राच्या अभ्यासक्रमात प्रत्यक्ष अनुभवालाही महत्त्व आहे. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम पूर्ण करता करता प्रत्यक्ष कामाचा अनुभवही मिळावा, यासाठी या अभ्यासक्रमात स्टडी टूर, फिल्ड व्हिजिट, समर प्लेसमेंट्स, इंटर्नशिपचाही समावेश असतो. यातून विद्यार्थ्यांचे अनुभवविश्व समृद्ध होते. यंदा द्वितीय वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना या अनुभवाला मुकावे लागले आहे.

**अविद्येचे 'प्रात्यक्षिक'**

"'एमबीए'मध्ये समर प्लेसमेंट असतात. या दीड-दोन महिन्यांच्या कालावधीत आम्हाला एखाद्या कंपनीत काम करून अनुभव घेता येतो. त्याचे प्रमाणपत्र आणि गुणाही मिळतात. यंदा करोनामुळे लॉकडाउन झाल्याने ही संधी हुकली. त्याचबरोबर कॉलेज बंद असल्याने प्रॅक्टिकल, स्टडी व्हिजिट किंवा स्टडी टूरही झाल्या नाहीत. ऑनलाइन लेक्चर्स होत असली, तरी लवकरात लवकर कॉलेजेस सुरू व्हायला हवी.

– विक्रम सराफ, विद्यार्थी



एमबीएच्या अभ्यासक्रमात प्रॅक्टिकलचाही समावेश असतो. परंतु, लॉकडाउनपासून सर्व काही ठप्प आहे. गावाकडे असलेल्या विद्यार्थ्यांना कनेक्टिव्हिटीची समस्या येते. त्यामुळे ऑनलाइन शिक्षणावरही मर्यादा येतात. समर प्लेसमेंट, इंटर्नशिप करता न आल्याने आम्हाला प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेता आलेला नाही.

– प्रज्ञा दोशी, विद्यार्थिनी

यंदा आम्हाला इंटर्नशिप करता आली नाही. प्रकल्पासाठी माहिती गोळा करण्यासाठीही कंपनीत जाता आले नाही. त्यामुळे इंटरनेटवर उपलब्ध असणारी माहिती आणि फोनवरून मिळालेली माहिती यावरच प्रकल्प पूर्ण करावा लागला.

– अक्षय शेळके, विद्यार्थी एमबीए

लॉकडाउनमुळे समर प्लेसमेंट, इंटर्नशिपला विद्यार्थ्यांना मुकावे लागले. ऑनलाइन पद्धतीने अभ्यासक्रम, गेस्ट लेक्चरही होत आहेत. अद्याप बहुतांश कंपन्यांमध्ये मर्यादित मनुष्यबळ कार्यरत आहे. त्यामुळे या कंपन्या कोणत्याही प्रशिक्षणार्थ्यांना प्रवेश देण्यास तयार नाहीत. त्याचबरोबर विद्यार्थी मूळ गावी असणे, एकत्रित प्रवासावरील मर्यादा यामुळे स्टडी टूर, फिल्ड व्हिजिट रद्दच कराव्या लागल्या.

– सुधीर कुलकर्णी, प्राध्यापक

Maharashtra Times: 21.12.2020

# सॉफ्टवेअर वापरामुळे वाङ्मय चौर्याला आळा बसेल

पुणे, दि. २० (प्रतिनिधी) – विद्यापीठाकडून वाङ्मय चौर्य शोधणाऱ्या यंत्रणेकडून प्रबंधाची तपासणी केली जाणार आहे; तसेच प्रत्येक निरीक्षकाला संशोधकाने केलेले काम हे वाङ्मय चौर्यमुक्त असल्याचे प्रमाणपत्र द्यावे लागणार आहे. यामुळे वाङ्मय चौर्य प्रकाराला पायंबद बसेल, असे मत शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केले.

एमआयटी आर्ट, डिझाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठ आणि इनोव्हेशन कौन्सिल व रिसर्च एण्ड कन्सल्टन्सी सेल यांच्या संयुक्त विद्यमाने 'उरकुंड' या संशोधनात वाङ्मय चौर्य प्रतिबंधात्मक सॉफ्टवेअरसंदर्भात कार्यशाळा घेण्यात आली. कार्यशाळेचे उद्घाटन ई-ग्लाक्टिकचे प्रमुख प्रकाश सारडा, ई-ग्लाक्टिकच्या प्रशिक्षण व्यवस्थापिका प्रीती राठी, एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष आणि कुलगुरू प्रा. डॉ. मंगेश कराड यांच्या हस्ते झाले. यावेळी एमआयटी स्कूल ऑफ इंजिनीअरिंगचे प्राचार्य डॉ. किशोर रवांदे, विद्यापीठाचे व्यवस्थापक प्रा. सुराज भोयर, प्रा. डॉ. वीरेंद्र भोजवानी उपस्थित होते.

Saamana: 21.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# 'भारत कौशल्याची राजधानी होईल'

**'नॅशनल टीचर्स कॉंग्रेस'चा समारोप समारंभ**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणामध्ये कौशल्य विकास आणि उद्योजकतेवर अधिक भर देण्यात येणार आहे. या धोरणामुळे देशाने जागतिक कौशल्याची राजधानी बनण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे, असे मत केंद्रीय कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री महेंद्रनाथ पांडे यांनी व्यक्त केले.

'एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी पुणे'तर्फे आयोजित चौथ्या नॅशनल टीचर्स कॉंग्रेसच्या समारोपाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. या वर्षीची परिषद 'राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी) २०२०- उपलब्ध संधी' या मुख्य विषयावर होती. या प्रसंगी हिमाचल प्रदेशाचे उच्च शिक्षण मंत्री गोविंदसिंग ठाकूर, रिसर्च अँड इनोव्हेशन सर्कल हैदराबाद'चे महासंचालक डॉ. अजित रांगणेकर आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी 'एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी'चे संस्थापक अध्यक्ष डॉ. विश्वनाथ कराड होते. या प्रसंगी खासदार डॉ. अच्युत समंता यांना 'जीवनगौरव पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले.

पांडे म्हणाले, 'भविष्य ओळखून देशात २६ हजार सेटअप, दोन हजारपेक्षा अधिक ट्रेनिंग संस्था उभ्या केल्या गेल्या आहेत. त्या माध्यमातून एक कोटीपेक्षा अधिक महिलांच्या कौशल्यांना वाव दिला जात आहे. २०२५ पर्यंत देशातील ५० टक्के विद्यार्थ्यांना कौशल्य विकास क्षेत्रात सामावून घेतले जाईल. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणामध्ये शिक्षणाला एकत्रित करून योग्य दिशा देण्याचे काम केले जात आहे. आम्ही विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासावर अधिक भर देत आहोत. पंतप्रधान कौशल्य विकास योजना आता तिसऱ्या टप्प्यात आहे. यामध्ये काही विशेष पाठ्यक्रम शिकविले जाणार आहेत. परिसरातील मागणीनुसार त्या त्या ठिकाणी कौशल्य शिक्षणावर भर देण्यात येणार आहे, असेही पांडे यांनी सांगितले. डॉ. एन. टी. राव यांनी प्रास्ताविक केले.

**'शिक्षण, नवनिर्मिती हे कळीचे मुद्दे'**



डॉ. रघुनाथ माशेलकर

नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणामुळे देशाला नवीन आकार मिळणार आहे. यामुळे शिक्षकांचे भवितव्यसुद्धा उज्ज्वल होईल. शिक्षण आणि नवनिर्मिती हे या शतकातील कळीचे मुद्दे आहेत. शिक्षकांच्या अंतःकरणात प्रेरणा आणि स्फूर्ती असावी. त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये ऐकणे, विचार करणे आणि विचार घडविण्यासारखे गुण निर्माण करावे, असे डॉ. माशेलकर यांनी सांगितले.

**'दर्जेदार शिक्षण हाच उपाय'**

नवनिर्मिती, पृथक्करण व एकीकरण ही शिक्षणाची त्रिसूत्री आहे. गरीब आणि आदिवासी मुलांना दारिद्र्य व अज्ञानातून वर काढायचे असेल; तर दर्जेदार शिक्षण हाच एक उपाय आहे. शिक्षण हा मानवाचा तिसरा डोळा आहे. इंटरनेटच्या युगात शिक्षकाची भूमिका अधिक जबाबदारीची झालेली आहे. शिक्षणपद्धती लवचिक बनवावी. नवीन राष्ट्रीय शिक्षण पद्धती ही मूलभूत बदल घडवून आणणार आहे. आम्ही नापास झालेल्या विद्यार्थ्यांकडे अधिक लक्ष देऊन त्यांना क्रीडा क्षेत्रात प्रवीण केले. त्यामुळे या देशाला राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू मिळाले आहेत, असे समंता यांनी सांगितले.

Maharashtra Times: 21.12.2020

**पुढारी**

# पसंतीक्रम नोंदविणाऱ्यांनाच प्रवेशाची संधी




पुणे : पुढारी वृत्तसेवा

अकरावी प्रवेशासाठी तीन फेऱ्या झाल्यानंतर आता विशेष फेरी राबविण्यात येणार आहे. परंतु या फेरीत आता नव्याने पसंतीक्रम भरणाऱ्या विद्यार्थ्यांनाच प्रवेशाची संधी देण्यात येणार आहे. त्यासाठी सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज अनलॉक करण्यात आले असून विद्यार्थ्यांनी पसंतीक्रम भरून अर्ज लॉक केल्यानंतरच त्यांना प्रवेशाची संधी मिळणार असल्याची माहिती प्रवेश नियंत्रण समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिली आहे.

शेंडकर म्हणाल्या, अकरावी प्रवेशासाठी तीन फेऱ्यांमध्ये विद्यार्थ्यांना महाविद्यालयांचे दहा पसंतीक्रम हे ऐच्छिक होते. एखाद्या फेरीत विद्यार्थ्यांनी पसंतीक्रम नाही भरले तर जुनेच पसंतीक्रम पुढच्या फेरीसाठी ग्राह्य धरण्यात येऊन त्याला त्यानुसार महाविद्यालये अ‍ॅलॉट करण्यात येत होती. परंतु आता मात्र विशेष फेरीसाठी विद्यार्थ्यांना अगोदर संमती द्यावी लागणार आहे. त्यानंतर नव्याने पसंतीक्रम भरावे लागणार आहेत. जर विद्यार्थ्यांनी नव्याने पसंतीक्रम भरले नाहीत तर अशा विद्यार्थ्यांचा प्रवेशप्रक्रियेत विचार केला जाणार नाही.

त्यासाठी सर्व विद्यार्थ्यांचे फॉर्म अनलॉक करण्यात आले असून, तसा मेसेज त्यांच्या लॉगिनवर उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांना विशेष फेरीत सहभागी व्हायचे आहे अशा सर्व विद्यार्थ्यांनी आपले पसंतीक्रम नव्याने नोंदवून अर्ज लॉक केल्यानंतरच अर्ज प्रक्रियेसाठी पुढे उपलब्ध होणार असल्याचे शेंडकर यांनी स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांना २० ते २२ डिसेंबरदरम्यान अर्जात बदल करता येतील. वेळापत्रकानुसार २३ डिसेंबरला विद्यार्थ्यांची माहिती तपासण्यासाठी राखीव ठेवण्यात आला आहे. त्यानंतर २४ डिसेंबरला निवड यादी जाहीर करण्यात येणार आहे. निवड यादीत महाविद्यालय जाहीर होणाऱ्या विद्यार्थ्यांना २४ ते २६ डिसेंबर या कालावधीत प्रवेश घ्यावा लागणार आहे. पुढील विशेष फेरीसाठी २७ डिसेंबरला प्रवेशक्षमता जाहीर करण्यात येईल.

Pune Edition
Dec 21, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# विद्यापीठाचे स्टार्टअप धोरण

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील स्टार्टअप्सला पाठबळ देण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. या परिसरातील नवउद्योजक; तसेच नवीन उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी पुणे विद्यापीठातर्फे प्रयत्न केले जाणार असून, नवी स्टार्टअप पॉलिसी तयार करण्यासोबतच स्टार्टअप्सची निवड करणे आणि कार्यरत स्टार्टअप्सला मार्गदर्शन करणे अशा प्रमुख जबाबदाऱ्या पुणे विद्यापीठाकडून पार पाडल्या जाणार आहेत.

या अनुषंगाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे नव उपक्रम, नवसंशोधन व उपक्रम केंद्र आणि पिंपरी-चिंचवड स्टार्टअप इनोव्हेशन सेंटर यांच्यात करार करण्यात आला. या वेळी महापौर माई ढोरे, कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त श्रावण हर्डीकर, उपकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, नीलकंठ पोमण आदी उपस्थित होते. नवउद्योजकांना मार्गदर्शन त्याचप्रमाणे संशोधन व प्रकल्प विकासासाठी सवलतीच्या दरात ऑटो क्लस्टर येथील पायाभूत सुविधा मिळतील, असे सांगण्यात आले आहे.

> नवे स्टार्टअप्स पुढे येण्यासाठी कराराचा फायदा होणार आहे. नवउद्योजक आणि संशोधकांना ऑटो क्लस्टरच्या सुविधांचा लाभ अतिशय माफक दरात मिळवता येईल. पुणे विद्यापीठातील संशोधक; तसेच उच्चशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नवकल्पनांना चालना मिळेल.
>
> - डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**या करारांतर्गत पुणे विद्यापीठाची जबाबदारी**

- तांत्रिक ज्ञान आणि मार्गदर्शन देणे, ऑनलाइन-ऑफलाइन प्रशिक्षण देणे
- स्टार्टअपसाठी हॅकेथॉन / कार्यक्रम / प्रमोशनल इव्हेंन्टस आयोजित करणे
- स्टार्टअपसाठी आवश्यक मदतीसह विविध संस्थांबरोबर संपर्क करणे
- स्टार्टअपसाठी गुंतवणूकदारांशी संपर्क करणे
- अपप्रेंडेशन प्रोग्रॅमसाठी अधिकाऱ्यांसोबत सभा आयोजित करणे.

**पिंपरी-चिंचवड स्टार्टअप इनोव्हेशन सेंटरची जबाबदारी**

- नाममात्र शुल्क आकारून इनक्युबेशन सेंटरमध्ये जागा उपलब्ध करणे
- आवश्यक संगणक / लॅपटॉप / उपकरणे / इंटरनेट उपलब्ध करून देणे
- स्टार्टअपला आवश्यक प्रोटोटाइप विकासासाठी नाममात्र शुल्कामध्ये ऑटो क्लस्टर येथील उपकरणे उपलब्ध करणे
- स्टार्टअपसंबंधी प्रशासकीय कामकाजासाठी मनुष्यबळ; तसेच आवश्यक निधी उपलब्ध करणे
- यशस्वी नवकल्पना / नवप्रकल्पांना उद्योगविषयक सहकार्य मिळवून देणे
- पिंपरी-चिंचवड स्टार्टअप सेंटरमधील नवकल्पनांची छाननी करणे
- इतर इनक्युबेशन सेंटरशी संलग्न करणे.

Maharashtra Times: 21.12.2020

# एका वर्षानंतर प्रत्यक्षात होणार अधिसभेची बैठक

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : कोरोनामुळे २०२० मध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेची प्रत्यक्ष बैठक एकदाही आयोजित करता आली नाही. मात्र, येत्या ९ व १० जानेवारी २०२१ रोजी म्हणजेच एका वर्षानंतर विद्यापीठाच्या अधिसभेची प्रत्यक्षात बैठक घेतली जाणार आहे. त्यामुळे अधिसभा सदस्यांना शिक्षण विषयक सर्व प्रश्नांवर विस्ताराने चर्चा करणे शक्य होणार आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पुणे, अहमदनगर व नाशिक या तीनही जिल्ह्यांमधून प्राध्यापक, प्राचार्य व संस्थाचालक यांच्यातून अधिसभेवर निवडून गेलेल्या सदस्यांसह कुलगुरूंनी नियुक्त केलेल्या सदस्यांच्या उपस्थितीत अधिसभेची बैठक वर्षातून दोन वेळा घेतली जाते. त्यात विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसह, प्राध्यापक, प्राचार्य, संस्थाचालक व सर्व शैक्षणिक विषयांवर सखोल चर्चा केली जाते. ववद्यापीठातर्फे मार्च २०२० मध्ये अधिसभेची बैठक घेतली जाणार होती.

तसेच त्यात विद्यापीठाचा अर्थसंकल्प मंजूर केला जाणार होता. मात्र, कोरोनामुळे ही बैठक रद्द करून त्यानंतर ऑनलाईन पद्धतीने घेण्यत आली. ऑनलाईन बैठकीत अनेक सदस्यांना आपले प्रश्न मांडता आले नाही. त्यामुळे सदस्यांनी नाराजी व्यक्त केली.

कोरोना रुग्णांची संख्या वाढत असल्याने २०२० मध्ये एकदाही प्रत्यक्षात अधिसभेची बैठक झाली नाही. परंतु, आता येत्या ९ व १० डिसेंबर रोजी राज्यपालांच्या परवानगीने विद्यापीठातर्फे दोन दिवस ही बैठक घेण्यात येणार आहे.

> अधिसभा सदस्यांना प्रश्नोत्तरांना पुरेसा वेळ मिळावा, या उद्देशाने जानेवारी महिन्यात दोन दिवस अधिसभेचे प्रत्यक्षात कामकाज केले जाणार आहे. अधिसभेच्या नियोजनाच्या दृष्टीने येत्या सोमवारी (दि.२१) विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेत चर्चा करण्यात येईल.
>
> - राजेश पांडे, सदस्य, व्यवस्थापन परिषद, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Lokmat: 21.12.2020

**पुढारी**

# शुल्कवाढ नाही; विद्यापीठाचा निर्णय

पुणे : पुढारी वृत्तसेवा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने यंदाच्या शैक्षणिक वर्षातील दुसऱ्या सत्रातही वाढीव परीक्षा शुल्क न आकारण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. यापूर्वी पहिल्या सत्राच्या वाढीव परीक्षा शुल्कास स्थगिती दिली होती. याबाबतचे परिपत्रक परीक्षा व मूल्यमापन मंडळाने प्रसिद्ध केले आहे.

कोरोनाकाळात अनेक पालकांची आर्थिक घडी विस्कटली होती. अनेकांची नोकरी गेल्याने, व्यवसाय ठप्प झाल्याने आर्थिक नुकसान झाल्यामुळे शैक्षणिक शुल्कवाढ पुढच्या वर्षापासून करण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला होता. परंतु परीक्षा शुल्काबाबत कोणताही निर्णय घेण्यात आला नव्हता. आता वाढीव परीक्षा शुल्क न घेण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला आहे.

दरम्यान, उद्भवलेल्या आर्थिक अडचणी विचारात घेऊन विद्यार्थ्यांच्या हितासाठी विद्यापीठ अधिकार मंडळाने द्वितीय सत्रातीलही सर्व अभ्यासक्रम परीक्षांचे परीक्षा व अनुषंगिक शुल्कात कुठल्याही प्रकारची वाढ न करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे मागील शैक्षणिक वर्ष २०१९-२० याप्रमाणे परीक्षा शुल्क आकारण्यात यावे, असे विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी स्पष्ट केले आहे.

Pune Edition
Dec 21, 2020 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# भाषा शिक्षणाकडे वाढता कल

## 'फ्रेंच' भाषा शिकण्याला सर्वाधिक पसंती

म. टा. प्रतिनिधी, पुणे

बहुतांश भारतीय विद्यार्थ्यांमध्ये अतिरिक्त भाषा शिकण्याची इच्छा असल्याचे एका सर्वेक्षणात समोर आले आहे. त्यामुळे शिक्षणात इंग्रजी, हिंदी आणि स्थानिक भाषेसह अन्य भाषा शिक्षणाचाही समावेश असणे गरजेचे असल्याचा निष्कर्षही मांडण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांमध्ये प्राधान्य व पसंतीची भाषा शोधण्यासाठी 'ब्रेनली' या ऑनलाइन लर्निंग प्लॅटफॉर्मतर्फे 'पॉप्युलर फॉरिन लँग्वेज कन्सिडर्ड बाय इंडियन स्टुडंट' हे सर्वेक्षण करण्यात आले. या सर्वेक्षणात तीन हजार २०६ विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया नोंदविण्यात आल्या. त्यामध्ये ३६.२ टक्के विद्यार्थ्यांनी परदेशी भाषा शिकणार असल्याचे सांगितले; तर ३५.४ टक्के विद्यार्थ्यांनी प्रादेशिक भाषेचा पर्याय निवडला.

परदेशी भाषांमध्ये फ्रेंच भाषेला सर्वाधिक पसंती असून, ३२.१ टक्के विद्यार्थ्यांनी फ्रेंच भाषा शिकण्यात आवड असल्याचे सांगितले. स्पॅनिश, जर्मन आणि चीनमध्ये बोलल्या जाणाऱ्या मँडरीन भाषांना अनुक्रमे ११.७ टक्के, १०.९ टक्के, ५.६ टक्के जणांनी पसंती दर्शवली. सुमारे ३९.७ टक्के विद्यार्थ्यांनी अन्य प्रादेशिक व परदेशी भाषांचा पर्याय निवडला.



"करिअरच्या दृष्टीने फायदेशीर असलेली भाषा शिकण्यास विद्यार्थी प्राधान्य देतात. आतापर्यंत विद्यार्थ्यांमध्ये जर्मन किंवा फ्रेंच भाषा शिकण्याची जास्त उत्सुकता असायची; पण आता भारताची जपानसोबतची भागीदारी वाढत आहे. त्यामुळे जपानी भाषा शिकण्याकडेही विद्यार्थ्यांचा कल वाढला आहे.

– शिरीष सहस्रबुद्धे, माजी प्रमुख, सिम्बायोसिस इन्स्टिट्यूट ऑफ फॉरिन अँड इंडियन लँग्वेजेस

### सर्वेक्षणातील निरीक्षणे

- सर्वेक्षणात तीन हजार २०६ विद्यार्थ्यांच्या प्रतिक्रिया नोंदविण्यात आल्या.
- सहभागी विद्यार्थ्यांपैकी ८६ टक्के विद्यार्थी इंग्रजी माध्यमाचे आहेत. सुमारे ८.५ टक्के विद्यार्थी हिंदी; तर उर्वरित ५.५ टक्के प्रादेशिक भाषेतून शिकत आहेत.
- सर्वेक्षणात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांच्या शाळांपैकी ५५.५ टक्के शाळांमध्ये प्रादेशिक भाषा शिकविणे बंधनकारक.
- उर्वरित ४४.५ टक्के शाळांमध्ये प्रादेशिक भाषा शिकविण्याचे बंधन नाही.
- परदेशी भाषांचा विचार केल्यास २४.८ टक्के विद्यार्थ्यांच्या शाळेत फ्रेंच शिकवले जाते.
- १०.७ टक्के शाळांत जर्मन आणि ८.१ टक्के शाळांत स्पॅनिश; तर ४.१ टक्के शाळांमध्ये मँडरीन शिकवले जाते. तीन चतुर्थांश शाळांमध्ये वेगळ्या आंतरराष्ट्रीय भाषा शिकवल्या जातात.

Maharashtra Times: 21.12.2020

पुढारी

# विद्यार्थ्यांच्या मदतीला सीईटी सेल

## समुपदेशनासाठी सीईटी कार्यालयात अधिकारी

मुंबई : पुढारी वृत्तसेवा

- महाविद्यालयांच्या तांत्रिक अडचणी, कॅप प्रवेश प्रक्रिया आदी कारणामुळे कोणत्याही परिस्थितीत प्रवेश प्रक्रिया रेंगाळू नये म्हणून राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत (सीईटी सेल) ही तयारी आहे.
- तंत्रशिक्षण, औषध निर्माणशास्त्र, कृषी या व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेताना विद्यार्थ्यांचा गोंधळ उडू नये म्हणून महाविद्यालय स्तरावरील अडचणी व विद्यार्थ्यांच्या प्रवेशातील सर्व सोडविण्यासाठी विशेष मदत व्हावी, हा या मागचा उद्देश आहे.

सीईटीनंतर प्रवेश घेताना विद्यार्थ्यांना अडचणी येऊ नयेत म्हणून आता सीईटी सेलने विभागीय स्तरावर सीईटीच्या मुख्य कार्यालयात अधिकाऱ्यांची नेमणूक केली आहे. प्रवेश घेताना विद्यार्थ्यांच्या तसेच पालकांच्या मनात असलेल्या शंका व अडचणी दूर करताना हे अधिकारी दिसत आहेत.

कोरोनामुळे प्रवेशांना उशिरा प्रारंभ झाला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अडचणी अनेक आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यास हेल्पलाईनच्या माध्यमातून समुपदेशन केले जात असले तरी कार्यालयात लांबून येणाऱ्या विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारची अडचण होऊ नये यासाठी सीईटी सेलच्या माध्यमातून मार्गदर्शन केले जात आहे.

राज्यभरातील अनेक विद्यार्थ्यांना दरवर्षी अर्धवट माहितीमुळे तसेच प्रवेश प्रक्रियेतील ऑनलाईन अर्ज भरताना चुकीच्या समुपदेशनामुळे प्रवेशात अडचणी निर्माण होतात. येणाऱ्या वर्षात चुकीच्या माहितीमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून महाविद्यालयांच्या प्रतिनिधींशी सीईटी सेल आता थेट संपर्क साधून मार्गदर्शन करत आहे.

सीईटी सेलच्या दोन्ही मजल्यावर प्रत्येक अभ्यासक्रमनिहाय अधिकारी उपलब्ध केले आहेत. या माध्यमातून तांत्रिक तसेच अभ्यासक्रमाच्या अडचणी सोडवल्या जात आहेत. प्रवेशप्रक्रिया सुरळीत व्हावी आणि विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन होण्यासाठी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, कृषी, कला, वैद्यकीय शिक्षण विभागातील अधिकारी उपलब्ध केले आहेत. यासाठी अधिकाऱ्यांच्या विशेष आयटी तसेच मार्गदर्शन तज्ज्ञांचीही नियुक्ती केली आहे. अभियांत्रिकी, औषध निर्माणशास्त्र, एमबीए, एमएमएस, एमसीए, हॉटेल मॅनेजमेंट, आर्किटेक्चर या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया सुरळीत करण्यासाठी परीक्षा समन्वयक व विशेष कार्यकारी अधिकारी काम करणार आहेत. प्रवेश प्रक्रिया, संस्था व महाविद्यालयांची परिपूर्ण माहिती, अभ्यासक्रम कसे असणार, शैक्षणिक शुल्क, आरक्षण कोटा, प्रवेश मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांनी काय करावे आदी इत्थंभूत माहिती विद्यार्थ्यांना विनासायास मिळण्यासाठी हे अधिकारी सीईटी सेलच्या माध्यमातून काम करत आहेत.

Pune Edition
Dec 21, 2020 Page No. 2
newspaper.pudhari.co.in



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# SPPU students can now opt for "out of course" subjects

HT Correspondent
puneletters@htlive.com

**PUNE:** Soon, students at the Savitribai Phule Pune University (SPPU) will be able to study any subject apart from their chosen course, under a new "school system" introduced from this academic year.

As per the new system, a student who wants to learn any subject from any department can opt for it and use that department's library, laboratory and other facilities.

"Along with the student's course s/he is studying for, they can now learn another subject from any other department which is useful for their career. Accordingly, their timetable will also be scheduled to accommodate the new subject. The school system facility is available at several centralised universities in the country and the National Assessment and Accreditation Council (NAAC) had instructed us to start this at the SPPU. Accordingly, we decided to start it and over the last month preparations to start were initiated. Under this, a

A TOTAL OF 18 'SCHOOLS' WILL BE STARTED UNDER 52 DEPARTMENTS AND STUDY CENTRES AT THE SPPU

total of 18 'schools' will be started under 52 departments and study centres at the SPPU. For each school, a director will be appointed," said SPPU pro-vice- chancellor NS Umrani.

"It is an important decision taken by the SPPU for upgradation in education. Faculty with same motive of studying and research will benefit and also tying up with international universities with a school system in place will be more useful for us," said Umrani.

Students have welcomed the decision. Pooja Rathod, a final-year Bachelor of Science student said, "While studying the subjects in our syllabus I always wanted to study about computers, which is part of another course. The school system will benefit our career plans."

Hindustan Times: 21.12.2020

# FYJC admission: special-round schedule declared from Dec 20

Dheeraj Bengrut
dheeraj.bengrut@htlive.com

**PUNE:** The detailed schedule of the special round of the first year junior college (FYJC) Class 11 admissions for Pune region was declared on Saturday by the deputy director of education (DYDE), Pune.

Earlier in the three regular rounds, of the total intake of 1,07,030 seats in Pune region, 45,671 students completed the admission process and 61,359 seats are still vacant.

Due to the interim stay given by the Supreme Court (SC) on the implementation of the quota for the Maratha community in jobs and education, the state education department had stopped the admission process for Class 11 (FYJC) since September 9 and it resumed on November 26.

As per the new schedule of the special round, on December 20 at 10am, the vacancy list for admission in the special round will be displayed online, including quota seats surrendered by junior colleges. On December 22 till 5pm, the application form (Part-1) edit and choice filling or updating of option form (Part-2) for special round will be available online. "All students who were restricted in the previous rounds are now allowed to participate in this special round to process their admission. Every student must give his/her consent to participate in this special round. And then students need to check if option form is locked or not," said Dattatray Jagtap, director of secondary and higher secondary education department. On December 24 at 11am, junior college allotment list for special round admissions will be displayed online. Accordingly display of cut-off list for special admission round will be done and SMS will be sent to students. "Then from December 24 at 11am to December 26 at 6pm, students need to confirm their admission in the allotted colleges. Admission confirmation, rejection or cancellation needs to be done by student login. In view of the Covid-19 pandemic situation, junior colleges should collect their admission fees only through digital payment modes, like payment gateway, bank transfer (NEFT/RTGS/IMPS/UPI), any e-wallets approved by the government of India or Reserve Bank of India to contain the spreading of coronavirus," added Jagtap.

**IMPORTANT DATES**

- Dec 20: Special round updated merit list will be declared
- Dec 20-22: Application form edit and choice filling or updating option form for special round will start
- Dec 24: Display of junior college allotment list for special round admissions and cut-off list
- Dec 24- 26: Students need to confirm their admission in allotted junior college
- Dec 27 - Vacancy list after completion of special round

Hindustan Times: 21.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

Section: Education

# २६० महाविद्यालयांना नोटीस

## विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्याप्रकरणी कार्यवाही

- सहायक आयुक्त संगीता डावखर यांची माहिती
- पाच दिवसांत खुलासा देण्याचे आदेश

**प्रभात वृत्तसेवा**




पुणे, दि. २१ - मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित ठेवत, त्याची माहिती सामाजिक न्याय विभागास देण्यास महाविद्यालयांनी टाळाटाळ केली. त्यामुळे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्याप्रकरणी जिल्ह्यातील २६० महाविद्यालयांना सामाजिक न्याय विभागाने कारणे दाखवा नोटीस बजावली. याचा खुलासा पाच दिवसांत देण्याचे आदेश सहायक आयुक्त संगीता डावखर यांनी दिले.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिक्षण घेताना शैक्षणिक शुल्क अथवा परीक्षा शुल्क अभावी आर्थिक अडचण होऊ नये, यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या वतीने दरवर्षी सामाजिक न्याय विभागाकडून महाविद्यालयांच्या माध्यमातून शिष्यवृत्ती दिली जाते. परंतु, ती देतांना विद्यार्थ्यांकडून जी माहिती घेवून सामाजिक न्याय विभागाला वेळेत देणे अपेक्षित असते. याबाबतीत अनेक महाविद्यालय टाळाटाळ करतात. असाच प्रकार पुणे शहर व जिल्ह्यात घडला असून जिल्ह्यातील जवळपास २६० महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. त्यामुळे शिष्यवृत्तीचे अर्ज निकाली न काढता प्रलंबित ठेवणारे महाविद्यालये अडचणीत येण्याची चिन्हे आहेत.

२०१८-१९ व २०१९-२० या शैक्षणिक वर्षातील भारत सरकारची शिष्यवृत्ती शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क या योजनेअंतर्गत महाडीबीटी संकेतस्थळाद्वारे शिष्यवृत्ती मंजूर झालेली आहे, त्याची शिष्यवृत्तीची रक्कम ही विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा होते. परंतु, विद्यार्थ्यांचे बँक खाते क्रमांक चुकीचे असणे, बँक खात्यास आधार कार्ड संलग्नित न करणे, बँक निष्क्रीय असणे आदी त्रुटीची पूर्तता करून प्रलंबित अर्ज जलद निकाली काढण्याबाबत सामाजिक न्याय विभागाने जिल्ह्यातील शेकडो महाविद्यालयांना २६ नोव्हेंबर रोजी पहिले स्मरणपत्र तसेच २ डिसेंबर रोजी दुसरे स्मरणपत्र पाठवूनही या २६० महाविद्यालयांनी वेळेत माहिती पुरवलेली नाही.

या महाविद्यालयांची दि. ३ ते ५ डिसेंबर २०२० रोजी ऑनलाइन बैठक घेण्यात आली. त्यामध्ये सहायक आयुक्त संगिता डावखर यांनी सर्वांना मार्गदर्शन करून पीएफएमएस प्रणालीवरील सर्व प्रलंबित विद्यार्थ्यांचे अर्ज निकाली काढण्याबाबत सूचना दिल्या.

तसेच, पुणे कार्यालयाने दि. ६ डिसेंबर रोजी सर्व महाविद्यालयांना यासंदर्भात तिसरे स्मरणपत्र दिले. असे असूनही महाविद्यालयांनी वेळेत कार्यवाही न केल्याने समाज कल्याण आयुक्त यांनी ८ डिसेंबर पुणे येथे झालेल्या बैठकीत नाराजी व्यक्त केली.

Prabhat: 22.12.2020

# २६० महाविद्यालयांना नोटीस

## समाज कल्याण विभागाचा दणका; पाच दिवसांत खुलासा करण्याचे आदेश

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : महाविद्यालयीन शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दरवर्षी शासनाच्या सामाजिक न्याय विभागाकडून महाविद्यालयांच्या माध्यमातून शिष्यवृत्ती दिली जाते. परंतु, काही महाविद्यालये विद्यार्थ्यांकडून शिष्यवृत्तीसाठी आवश्यक माहिती घेऊन सामाजिक न्याय विभागाला वेळेत देत नाहीत. तसेच माहिती देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करत आहेत. त्यामुळे अशा पुणे शहर व जिल्ह्यातील २६० महाविद्यालयांना सामाजिक न्याय विभागाने कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

महाडीबीटी पोर्टलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या बँक खात्यवर मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम जमा केली जाते. मात्र, विद्यार्थ्यांचे बँक खाते क्रमांक चुकीचे असणे, बँक खात्यास आधार कार्ड संलग्नित न करणे, बँक निष्क्रिय असणे आदी त्रुटीची पूर्तता करून प्रलंबित अर्ज जलद निकाली काढण्याबाबत सामाजिक न्याय विभागाकडून महाविद्यालयांना दोन स्मरणपत्र पाठवण्यात आले. या स्मरणपत्रांना प्रतिसाद न देणाऱ्या २६० महाविद्यालयांना नोटीस बजावण्यात आली आहे. तसेच पाच दिवसांत याबाबत खुलासा सादर करण्याचे आदेश सहाय्यक आयुक्त संगीता डावखर यांनी दिले आहेत.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देय असलेली शिष्यवृत्ती अदा करण्यास झालेल्या विलंबास अनेक वेळा महाविद्यालये कारणीभूत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास किंवा त्यांना फ्रीशिप रक्कम न मिळाल्यास त्यास सर्वस्वी संबंधित महाविद्यालयाचे संस्थाचालक,

Lokmat: 22.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

Section: Education

पुढारी

# प्रवेश रद्द केल्यास विद्यापीठांनी शुल्क परत करावे

**विद्यापीठ अनुदान आयोगाचा आदेश**

**नवी दिल्ली : पुढारी वृत्तसेवा**

पदवी अथवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या एखाद्या विद्यार्थ्यास काही कारणास्तव जर आपला प्रवेश रद्द करावा लागला तर विद्यापीठांनी अशा विद्यार्थ्यांचे संपूर्ण शुल्क परत करावे, असे आदेश विद्यापीठ अनुदान आयोग अर्थात यूजीसीने सोमवारी दिले.

३० नोव्हेंबरपर्यंत ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द केले आहेत, त्यांना या आदेशानुसार संपूर्ण शुल्क परत मिळणार असून जे विद्यार्थी ३१ डिसेंबरपर्यंत प्रवेश रद्द करतील, त्यांना एक हजार रुपये प्रोसेसिंग फी कापून बाकीची रक्कम परत मिळेल.

पान २ वर

Pune Edition
Dec 22, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

पुढारी

पान 1 वरून

## प्रवेश रद्द केल्यास विद्यापीठांनी शुल्क परत करावे

कोरोना संकट तसेच इतर काही कारणांमुळे असंख्य पालकांना आर्थिक तंगीचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर विद्यापीठ अनुदान आयोगाने वरील निर्णय घेतला असून तो केवळ चालूवर्षी लागू राहणार असल्याचे युजीसीने स्पष्ट केले आहे. शुल्क परत करण्याचा निर्णय सर्व विद्यापीठांना लागू असणार आहे. काही पालक व विद्यार्थ्यांनी शुल्क परत केले जात नसल्याची तक्रार केली होती, त्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच जी विद्यापीठे हा आदेश पाळणार नाहीत, त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाणार असल्याचेही यूजीसीने आदेशात म्हटले आहे.

पुढारी

# शिष्यवृत्तीप्रकरणी २६० महाविद्यालयांना नोटीस

## विलंबाबाबत पाच दिवसांत खुलासा करा : 'सामाजिक न्याय'चा आदेश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**सामाजिक न्याय विभागाकडून दिली जाणारी शिष्यवृत्ती नाकारल्याप्रकरणी जिल्ह्यातील २६० महाविद्यालयांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. याप्रकरणी पाच दिवसांत खुलासा करण्याचा आदेश सामाजिक न्याय विभागाच्या सहायक आयुक्त संगीता डावखरे यांनी दिला आहे.**



केंद्र व राज्य सरकारच्या वतीने सामाजिक न्याय विभागाकडून महाविद्यालयीन, व्यावसायिक, अभियांत्रिकी, वैद्यकीय क्षेत्रात शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना महाविद्यालयांच्या माध्यमातून शिष्यवृत्ती दिली जाते. मात्र, अनेक महाविद्यालये शिष्यवृत्ती देण्याचे जाणीवपूर्वक टाळतात.

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ व २०१९-२० मध्ये भारत सरकारची शिष्यवृत्ती शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क या योजनेअंतर्गत महाडीबीटी संकेतस्थळाद्वारे मंजूर झालेली असून या शिष्यवृत्तीची रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा होते. परंतु विद्यार्थ्यांचे बँक खाते क्रमांक चुकीचे असणे, बँक खात्यास आधारकार्ड संलग्नित न करणे, बँक खाते निष्क्रिय असणे आदी त्रुटींची पूर्तता करून प्रलंबित अर्ज जलद निकाली काढा, असे स्मरणपत्र सामाजिक न्याय विभागाने महाविद्यालयांना २६ नोव्हेंबर, तसेच २ डिसेंबरला पाठवूनही या २६० महाविद्यालयांनी वेळेत माहिती पुरवलेली नाही.

मागासवर्गीय विद्यार्थ्यांना देय असलेली शिष्यवृत्ती अदा करण्यास झालेल्या विलंबास संबंधित महाविद्यालये कारणीभूत असल्याचे स्पष्ट आहे.

मागासवर्गीय विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास अथवा त्या विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती, फ्रीशिप रक्कम न मिळाल्यास त्याला सर्वस्वी संबंधित महाविद्यालयाचे संस्थाचालक, प्राचार्य जबाबदार राहतील, असे या कारणे दाखवा नोटीसद्वारे सूचित केले आहे.

Pune Edition
Dec 22, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During December 2020

## Section: Education

पुढारी

### पुणे विद्यापीठाची अधिसभा ९, १० जानेवारीला

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक सोमवारी पार पडली. यामध्ये विद्यापीठाची अधिसभा ९ आणि १० जानेवारीला घेण्याचा निर्णय झाला. तर महाविद्यालये सुरू करण्याबाबत डॉ. व्ही. बी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली समितीची नियुक्ती करून अहवाल देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

अधिसभेसाठी राज्यपालांकडून मान्यताही घेण्यात आली आहे. विद्यापीठाने महाविद्यालये सुरू करण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. महाविद्यालये सुरू करण्याबाबत विद्यापीठाने डॉ. व्ही. बी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली समितीची नियुक्ती केली आहे. 'विद्यापीठाने नेमलेल्या समितीने महाविद्यालये सुरू करण्याबाबत विद्यापीठातील शैक्षणिक विभाग, संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य अशा सर्व घटकांशी चर्चा करून पुढील आठवड्यापर्यंत अहवाल देण्याची सूचना समितीला करण्यात आली आहे, अशी माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

Pune Edition
Dec 22, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

### नवीन शिक्षण धोरणात उद्योजकतेवर भर

#### महेंद्रनाथ पांडे : 'नॅशनल टीचर्स काँग्रेस'चा समारोप

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २१ - नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणामध्ये कौशल्य विकास आणि उद्योजकतेवर अधिक भर देण्यात येणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली येणारे हे धोरण २१ व्या शतकात जागतिक कौशल्य राजधानी बनविण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे, असे उद्‌गार केंद्रीय कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री महेंद्रनाथ पांडे यांनी काढले.**

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी, पुणेतर्फे आयोजित 'नॅशनल टीचर्स काँग्रेस'च्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी हिमाचल प्रदेशचे उच्च शिक्षण मंत्री गोविंदसिंग ठाकूर, रिसर्च अॅण्ड इन्व्होवेशन सर्कल हैदराबादचे महासंचालक डॉ. अजित रांगणेकर आणि शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर हे सन्माननीय पाहुणे म्हणून उपस्थित होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड हे होते. यावेळी खासदार डॉ. अच्युत समंता यांना 'जीवनगौरव पुरस्कारा'ने सन्मानित केले.

एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे कुलगुरू डॉ. एन.टी. राव आणि प्र. कुलगुरू प्रा. डॉ. आर. एम. चिटणीस उपस्थित होते.

ही परिषद संस्थेचे कार्याध्यक्ष राहुल कराड यांच्या संकल्पनेतून व पुढाकाराने भरविली गेली होती.

महेंद्रनाथ पांडे म्हणाले, नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणामध्ये शिक्षणाला एकत्रित करून योग्य दिशा देण्याचे काम केले जात आहे. आम्ही विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासावर अधिक भर देत आहोत. पंतप्रधान कौशल्य विकास योजना आता तिसऱ्या चरणात आहे. यामध्ये काही विशेष पाठ्यक्रम शिकविले जाणार आहेत. परिसरातील मागणीनुसार त्या त्या ठिकाणी कौशल्य शिक्षणावर भर देण्यात येणार आहे. २१ व्या शतकात शिक्षण संस्था आणि शिक्षक भारताला पुढे घेऊन जाणार आहे आणि वसुधैव कुटुम्बकमनुसार मानवाची सेवा घडेल.

डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणामुळे देशाला नवीन आकार मिळणार असल्याचे म्हटले आहे. डॉ. अच्युत समंता यांनी आता नापास झालेल्या विद्यार्थ्यांकडे अधिक लक्ष दिले जाणार असल्याचे सांगितले. डॉ. विश्वनाथ कराड यांनी नवीन शैक्षणिक धोरण हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याचे नमूद केले.

Prabhat: 22.12.2020

### सह. प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठी आजपासून विद्यापीठात मुलाखती

प्रभात वृत्तसेवा



पुणे, दि. २१ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयामधील सहयोगी प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठी 'सेवांतर्गत प्रगती योजनेतून' (करिअर अॅडव्हान्समेंट स्कीम-कॅस) २२ डिसेंबर ते २८ डिसेंबर या कालावधीत मुलाखती होत आहेत. त्याचे वेळापत्रक विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाने प्रसिद्ध केले आहे.

अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांमधील प्राध्यापकांना ठराविक कालावधीनंतर पदोन्नतीसाठी 'कॅस' मुलाखतींना सामोरे जावे लागते. त्यासाठी ओरिएंटेशन कोर्स, फॅकल्टी डेव्हलपमेंट प्रोग्रॅम, रिफ्रेशर कोर्ससह राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदेत शोधनिबंधही सादर झालेले असणे आवश्यक आहे. ही सर्व माहिती 'कॅस'च्या मुलाखतींसाठी महत्त्वाची आहे. यापूर्वी पुणे विद्यापीठाने संलग्न महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापकांसाठी मार्च २०२० मध्ये मुलाखतींचे घेण्याचे निश्चित केले होते. पण, करोनामुळे मुलाखती स्थगित केल्या होत्या. 'कॅस'च्या मुलाखतीत ४८४ प्राध्यापकांचा समावेश आहे.

Prabhat: 22.12.2020



News Paper Clippings During December 2020

Section: Education

### प्राध्यापक भरती सुरू करण्यासाठी पात्रताधारक आंदोलनाच्या पवित्र्यात

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : राज्य शासनाने प्राध्यापक भरती प्रक्रियेवरील बंदी न उठवल्यास पात्रताधारक राज्यभर आंदोलन करण्याच्या तयारीत आहेत. शिक्षक भरतीला मान्यता दिल्यानंतर आता प्राध्यापक भरती, घड्याळी तासिका तत्त्वावरील (सीएचबी) प्राध्यापकांचे प्रश्न तातडीने सोडवण्याची मागणी पात्रताधारकांकडून करण्यात येत आहे.

राज्यातील प्राध्यापक भरती प्रक्रिया पदभरती बंदीच्या निर्णयामुळे ठप्प आहे. विद्यापीठे आणि महाविद्यालयांतील रिक्त पदांच्या केवळ ४० टक्केच पदांवर भरती होत असूनही ही प्रक्रिया पुढे सरकत नसल्याने पात्रताधारकांमध्ये नाराजी आहे. शिक्षक भरती प्रक्रिया पदभरती बंदीतून वगळण्यात आल्यानंतर आता प्राध्यापक भरती प्रक्रियाही सुरू करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

महाराष्ट्र नवप्राध्यापक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संदीप पाथ्रीकर म्हणाले, की राज्यात शिक्षक भरतीला मान्यता दिल्यानंतर आता प्राध्यापक भरती प्रक्रिया तातडीने सुरू करण्याची गरज आहे. तसेच घड्याळी तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या नियुक्तीचाही प्रश्न बऱ्याच काळापासून प्रलंबित आहे. हे दोन्ही विषय मार्गी लावण्याचे आश्वासन उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी दिले होते. तसेच पदवीधर निवडणुकीवेळी गृहमंत्री अनिल देशमुख यांनीही प्राध्यापक भरती प्रक्रिया राबवण्याचे आश्वासन दिले होते. त्यामुळे आता प्राध्यापक भरती प्रक्रिया आणि घड्याळी तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांचे शासनाने प्रश्न न सोडवल्यास राज्यभर आंदोलन करण्यात येणार आहे.

> "प्राध्यापक भरती प्रक्रिया सुरू करण्याचा प्रस्ताव शासनाला सादर केलेला आहे. त्याबाबतीत बैठकाही झाल्या आहेत. आता लवकरच त्याबाबतचा निर्णय होण्याची अपेक्षा आहे.
> - डॉ. धनराज माने, उच्च शिक्षण संचालक

#### पदे कमी करण्यासाठी शासनाची पावले

राज्यातील विनाअनुदानित महाविद्यालयांची संख्या चार हजारांच्या घरात आहे. तर अनुदानित महाविद्यालयांची संख्या १ हजार १७१ आहे. शासन अनुदानित महाविद्यालयांतील प्राध्यापकांची पदे कमी करण्यासाठीच पावले टाकत आहे. एकतर शासनाने विनाअनुदानित महाविद्यालयांना अनुदान द्यावे आणि नवीन महाविद्यालयांना परवानगी न देता अनुदानित महाविद्यालयातील विनाअनुदानित तुकड्यांना अनुदान द्यावे, असेही डॉ. पाथ्रीकर यांनी सांगितले.

विज्ञापन संख्या 110/2020
राष्ट्रीय केमिकल्स
पद के लिए
लोक उद्यम चयन
अंतिम तिथि 24 फरव

शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ साठी
www.unipune.ac.i
Colleges/ Institutes - Affilia
जाहिरात क्र. २१
दि.२२/१२/२०२०

Estd. 1999 | Suryadatta Educati
SURYADATTA GROUP
ISO 9001 : 2015 Certified Institutes & Accred
Opportunity for XII[th] Pass

लोकसत्ता Tue, 22 December 2020
https://epaper.loksatta.com/c/57205378



### 'प्रवेश रद्द केलेल्यांना पूर्ण फी परत द्या'

**नवी दिल्ली** : 'देशातील महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये जे प्रवेश रद्द झाले आहेत. अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या पूर्ण फीचा परतावा देण्यात यावा,' असे आदेश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिले आहेत. पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणाच्या २०२०-२०२१ या वर्षासाठी ज्या विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश रद्द केले आहेत, त्यांना फी परत दिली जावी, असेही सांगण्यात आले.

यूजीसीच्या अधिसूचनेनुसार, 'लॉकडाउनच्या काळात अनेक पालकांना आर्थिक संकटाचा सामना करावा लागत आहे. त्या पार्श्वभूमीवर ३० नोव्हेंबरपर्यंत ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द करण्याची मागणी केली आहे, त्या विद्यार्थ्यांना महाविद्यालये आणि विद्यापीठांनी भरलेली फी परत द्यावी. प्रवेश रद्द करण्यासाठी कोणतेही अतिरिक्त शुल्कही आकारले जावू नये. ३१ डिसेंबरपर्यंत प्रवेश रद्द करणाऱ्या विद्यार्थ्यांनाही फी परत दिली जावी. मात्र, त्यासाठी प्रक्रिया शुल्क फीमधून कापून घ्यावे. मात्र, हे शुल्क एक हजार रुपयांपेक्षा जास्त नसावे.' प्रवेश रद्द झाल्यानंतरही देशातील महाविद्यालये, विद्यापीठांनी फी परत न दिल्याच्या अनेक तक्रारी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे आल्या होत्या.

Maharashtra Times: 22.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

## 'कॉलेजांबाबत अहवाल द्या'

पुणे : लॉकडाउनपासून राज्यातील महाविद्यालये अद्याप बंदच आहेत. मात्र, किमान प्रात्यक्षिकांसाठी तरी पुरेशी खबरदारी घेऊन महाविद्यालये खुली करण्याची मागणी होत आहे. या पार्श्वभूमीवर नेमण्यात आलेल्या समितीने पुढील आठवड्यापर्यंत अहवाल द्यावा, अशी सूचना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. नितीन करमळकर यांनी समितीला केली.

करोनाचा प्रादुर्भाव कमी होत असल्याने विद्यापीठानेही महाविद्यालये सुरू करण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. राज्यातील महाविद्यालये तातडीने सुरू करण्याबाबत 'महाराष्ट्र टाइम्स' पाठपुरावा केला. सोमवारी झालेल्या विद्यापीठाच्या व्यवस्थापन समितीच्या बैठकीतही या मुद्द्यावर चर्चा झाली. महाविद्यालये सुरू करण्याबाबत चाचपणी करण्यासाठी विद्यापीठाने प्रा. डॉ. व्ही. बी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली आहे. या समितीने विद्यापीठातील शैक्षणिक विभाग, संलग्न महाविद्यालयाचे प्राचार्य अशा सर्व घटकांशी चर्चा करून पुढील आठवड्यापर्यंत अहवाल सादर करावा, अशी सूचना करण्यात आली आहे, असे डॉ. करमळकर यांनी स्पष्ट केले.

Maharashtra Times: 22.12.2020

## ९, १० जानेवारीला विद्यापीठाची अधिसभा

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अधिसभा ९ आणि १० जानेवारीला होणार आहे. एका वर्षानंतर दोन दिवसांची अधिसभा होणार असून, विद्यापीठाने घेतलेल्या ऑनलाइन परीक्षा, परीक्षा आणि निकालातील त्रुटी यावरून अधिसभेत जोरदार चर्चा होण्याची शक्यता आहे.

विद्यापीठाची वर्षातून दोन वेळा अधिसभा होते. त्यात शैक्षणिक, प्रशासकीय विषयांवर चर्चा केली जाते. गेल्यावर्षी डिसेंबरमध्ये अधिसभा झाली होती. त्यानंतर मार्चमध्ये अर्थसंकल्पीय अधिसभा करोना संसर्गामुळे होऊ शकली नाही. त्यानंतर जूनमध्ये ऑनलाइन पद्धतीने ही अधिसभा घेण्यात आली. मात्र ऑनलाइन अधिसभेला वेळेची मर्यादा असल्याने सविस्तर चर्चा करता येणार नसल्याचे सांगत काही सदस्यांनी ऑनलाइन अधिसभेला विरोध केला होता.

आता करोनाचा प्रादुर्भाव कमी होत असल्याने ९ आणि १० जानेवारीला प्रत्यक्ष अधिसभा होणार आहे. त्यासाठी राज्यपालांकडून मान्यताही घेण्यात आली आहे. विद्यापीठाच्या प्रशासकीय, शैक्षणिक धोरणे, परीक्षा, निकालांतील त्रुटींबाबत अधिसभा सदस्यांकडून विद्यापीठ प्रशासनाला धारेवर धरले जाण्याची शक्यता आहे.

### महाविद्यालये सुरू करण्याबाबत समितीला अहवाल देण्याची सूचना

करोनाचा प्रादुर्भाव कमी होत असल्याने विद्यापीठाने महाविद्यालये सुरू करण्यासाठी हालचाली सुरू केल्या आहेत. महाविद्यालये सुरू करण्याबाबत विद्यापीठाने डॉ. व्ही. बी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली समितीची नियुक्ती केली आहे. जानेवारीत होत असलेल्या अधिसभेच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सोमवारी बैठक झाली. त्यात महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भात चर्चा झाली. 'महाविद्यालये सुरू करण्याबाबत विद्यापीठातील शैक्षणिक विभाग, संलग्न महाविद्यालयाचे प्राचार्य अशा सर्व घटकांशी चर्चा करून पुढील आठवड्यापर्यंत अहवाल देण्याची सूचना समितीला करण्यात आली आहे,' अशी माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी दिली.

लोकसत्ता Tue, 22 December 2020 https://epaper.loksatta.com/c/57204891

## समितीच्या अहवालानंतर महाविद्यालये सुरू होणार

### विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेत चर्चा

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे: कोरोनानंतर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये सुरू करण्यासाठी आवश्यक नियमावली तयार करण्यासाठी समिती स्थापन केली असून या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील महाविद्यालये सुरू होणार आहेत. त्यामुळे लवकरच महाविद्यालयांचे प्रवेशद्वार विद्यार्थ्यांसाठी खुले होईल, अशी आशा निर्माण झाली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या या पूर्वीच झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत महाविद्यालये सुरू करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. व्ही. बी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. मात्र,या समितीला विद्यापीठाकडून पत्र प्राप्त न झाल्याने समितीची एकही बैठक झाली नाही.

परंतु, सोमवारी (दि.२१) झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत गायकवाड यांच्या समितीने लवकर अहवाल सादर करावा, अशी चर्चा झाली. तसेच समितीने केलेल्या शिफारशी स्वीकारून महाविद्यालये सुरू करण्याबाबत अंतिम निर्णय घेण्यात येईल, असे निश्चित करण्यात आले.

> महाविद्यालये सुरु करण्यासाठी स्थापन झालेल्या समितीने आपला अहवाल लवकर सादर करावा, असे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेत निश्चित करण्यात आले.तसेच समितीचा अहवाल स्वीकारल्यानंतर महाविद्यालये सुरु करण्याचा ठराव करण्यात आला.
>
> - डॉ. प्रफुल्ल पवार, कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Lokmat: 23.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

## पूर्ण शुल्काचा परतावा न केल्यास कारवाई

### यूजीसीकडून विद्यापीठांना इशारा

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : पदवीपूर्व आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी ३० नोव्हेंबरपूर्वी प्रवेश रद्द करणाऱ्या किंवा स्थलांतरित विद्यार्थ्यांना त्यांच्या शुल्काची पूर्ण रक्कम परत करण्याचे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) देशभरातील विद्यापीठांना दिले आहेत. या निर्देशांचे पालन करणे अनिवार्य असून, उल्लंघन केल्यास कारवाई करण्याचा स्पष्ट इशारा यूजीसीने दिला आहे.

करोना संसर्गामुळे लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे पालक आणि विद्यार्थ्यांसमोर आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे पालक आणि विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी यूजीसीने शुल्क परताव्याबाबत ऑक्टोबरमध्ये मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या होत्या.

मात्र शुल्क मिळत नसल्याबाबत, विद्यापीठांकडून मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन होत असल्याबाबत माहिती अधिकार अर्ज, तक्रारी दाखल करण्यात येत आहेत. त्याची दखल घेऊन यूजीसीने परिपत्रक संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१मध्ये विशेष सवलत म्हणून ३० नोव्हेंबरपर्यंत प्रवेश रद्द करणाऱ्या किंवा स्थलांतर करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या शुल्काची पूर्ण रक्कम कोणतेही प्रकारे अन्य शुल्क न आकारता परत करावे.

त्यानंतर ३१ डिसेंबरपर्यंत प्रवेश रद्द करणाऱ्या किंवा स्थलांतर करणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांनी भरलेल्या शुल्काच्या रकमेतून एक हजार रुपये प्रक्रिया शुल्क म्हणून आकारून उर्वरित पूर्ण रक्कम परत करावी, असे यूजीसीने परिपत्रकात नमूद केले आहे. तसेच यूजीसीच्या निर्देशांचे पालन करणे अनिवार्य असून, कोणत्याही संस्थेकडून किंवा विद्यापीठाकडून उल्लंघन झाल्याचे आढळून आल्यास, विद्यार्थ्यांना पूर्ण शुल्काचा परतावा न केल्यास संबंधित संस्थेवर कारवाई करण्यात येईल, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

लोकसत्ता Tue, 22 December 2020 https://epaper.loksatta.com/c/57200741

## दहावी-बारावीच्या पुरवणी परीक्षेचा आज निकाल

पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये घेतलेल्या दहावी आणि बारावीच्या पुरवणी परीक्षेचा निकाल आज (बुधवारी) दुपारी एक वाजता जाहीर करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना हा निकाल www.mahresult.nic.in या संकेतस्थळावर विषयनिहाय गुणांसह पाहता येणार असून, त्या माहितीची प्रत (प्रिंट आउट) काढता येणार आहे, अशी माहिती मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी दिली आहे.

राज्य शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत दहावी-बारावीच्या पुरवणी परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. दहावीची पुरवणी परीक्षा २० नोव्हेंबर ते ५ डिसेंबर, तर बारावीची परीक्षा २० नोव्हेंबर ते १० डिसेंबर दरम्यान झाली होती. या परीक्षेच्या ऑनलाइन निकालानंतर लगेचच दुसऱ्या दिवसापासून दहावी आणि बारावीच्या पुरवणी परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांना स्वत:च्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतिरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात त्यांना मिळालेल्या गुणांची गुणपडताळणी आणि उत्तरपत्रिकांच्या छायाप्रत, पुनर्मूल्यांकन व स्थलांतर प्रमाणपत्रासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाइन पद्धतीने अर्ज करता येणार आहे. गुणपडताळणीसाठी दि. २४ डिसेंबर २०२० ते २ जानेवारी २०२१ तर छायाप्रतीसाठी दि. २४ डिसेंबर २०२० ते १२ जानेवारी २०२१ पर्यंत मुदत असणार आहे.

Kesari: 23.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

Section: Education

# गणित, विज्ञान मातृभाषेतून शिकवावे

### मराठीप्रेमी पालक महासंमेलनात जाणकारांचे मत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** गणित, विज्ञान विषयांत संकल्पना समजणे जास्त महत्त्वाचे असते आणि संकल्पना मातृभाषेतूनच अधिक स्पष्ट होतात. त्यामुळे गणित, विज्ञान विषयांचे शिक्षण मातृभाषेतूनच दिले गेले पाहिजे, असे मत मराठीप्रेमी पालक महासंमेलनात सहभागी झालेल्या जाणकारांनी व्यक्त केले.

संमेलनात रविवारी 'मराठीतून गणित, विज्ञान सद्य:स्थिती आणि आव्हाने' या सत्रात आनंद निकेतन शाळेच्या संस्थाचालक विनोदिनी काळगी, मराठी विज्ञान परिषदेचे कार्यवाह डॉ. जयंत जोशी, शैक्षणिक सल्लागार हेमंत लागवणकर, संशोधक सलील बेडकिहाळ सहभागी झाले होते.

'गणित ही आकलनावर आधारित क्रिया आहे. गणिते सोडवताना सहसंबंध लक्षात येणे आणि तर्कविचार या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. इथे विचारांचा संबंध येतो. घरात बोलली जाणारी भाषा ही विद्यार्थ्यांच्या विचारांची भाषा असते. त्यामुळे गणित हे मातृभाषेतूनच शिकवले गेले पाहिजे,' असे मत विनोदिनी यांनी मांडले. तसेच 'लहानपणी शिकलेल्या गणिताच्या आधारावर वरच्या इयत्तांतील गणित शिकवले जाते. परभाषेतून गणित शिकत असताना शब्दांचा अर्थ समजत नसल्याने प्राथमिक स्तरावरचे गणित कच्चे राहते,' असे निरीक्षण नोंदवत त्यांनी सेमी इंग्रजीला विरोध केला.

'उत्तर अमेरिका ते युरोप या भागातील लोकांच्या भाषा वेगवेगळ्या असल्या तरीही त्यांचा धर्म एकच आहे. त्यामुळे त्यांनी केलेल्या गणित, विज्ञानावर आधारित लेखनाला एकाच संस्कृतीचा आधार आहे. आपल्या देशात गणित, विज्ञान शिकवताना स्थानिक, सांस्कृतिक संदर्भ लक्षात घेतले गेले पाहिजेत. हेमाडपंथी मंदिर हे उत्तम भौमितिक रचनेचे उदाहरण गणिताच्या पुस्तकात आले पाहिजे,' अशी सूचना सलील यांनी केली.

दहावीपर्यंतचे शिक्षण मराठी माध्यमातून झाल्याने गणित, विज्ञानाच्या संकल्पना स्पष्ट झाल्या होत्या. त्यामुळे अकरावीला इंग्रजीतून विज्ञान शिकताना अडचण आली नाही,' असेही त्यांनी सांगितले.

'भाषा शिकणे आणि विषय शिकणे या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत. मातृभाषेतून शिकलेल्या विद्यार्थ्यांना इतर भाषांमध्येही व्यक्त होता येते. मराठी शब्द क्लिष्ट आहेत, असा गैरसमज विनाकारण पसरवला जातो. शब्द वारंवार वापरले गेले आणि त्यांची अनुभूती आली की ते सोपे वाटू लागतात,' असे सांगत डॉ. जोशी यांनी गणित, विज्ञान मराठीतून शिकण्याची गरज व्यक्त केली.




**व्यवहारभाषा वापरावी!**

विज्ञानाच्या पुस्तकात 'मृदा' असा शब्द वापरला जातो. मात्र व्यवहारात 'माती' असा शब्द आपण वापरतो. त्यामुळे संस्कृत प्रचुर शब्दांचा आग्रह सोडून पाठ्यपुस्तकांनी व्यवहारातील भाषेचा वापर केला पाहिजे. भाषा समाजाभिमुख असावी, पण दूषित नको, अशी सूचना हेमंत यांनी केली. तसेच जी भाषा आपण घरात बोलतो त्या भाषेत आकलन चांगले होत असल्याचे सांगितले.

लोकसत्ता Tue, 22 December 2020 https://epaper.loksatta.com/c/

# SPPU FORMS COMMITTEE TO INITIATE COLLEGE REOPENING PROCESS

**Dheeraj Bengrut**
puneletters@htlive.com

**PUNE:** A committee has been formed to decide on reopening of colleges affiliated to Savitribai Phule Pune University (SPPU), said officials during the meeting of management council on Monday.

This committee will interact with principals about the safety arrangements and other necessary steps to reopen the colleges.

"A committee has been formed to work on the reopening process. They will talk to college principals and understand various issues related to the reopening of colleges. Accordingly, we will need permissions from several government bodies. And in next five days this committee will submit their report about the same," said Prof Nitin Karmalkar, vice-chancellor, SPPU.

On November 5 the University Grants Commission (UGC) issued guidelines regarding reopening of colleges to all the universities. So to take a review of the colleges affiliated with SPPU a two-day interaction programme was conducted by SPPU in November where the vice-chancellor interacted with principals of various colleges from Pune, Nashik and Ahmednagar districts. Dr Ravindra Pardeshi, principal, Fergusson College, said, "We do not want to risk the safety of students and so it is important to analyse the local situation and then decide. We agree the classes should start, but the safety of students should always be the top priority."

Rohan Nalawade, a second-year science student, said, "I hardly understand anything which is taught online by teachers, nothing can replace the classroom teaching and so it is important to reopen the colleges."

Hindustan Times: 22.12.2020



*News Paper Clippings During December 2020*

Section: Education

# पुरवणी परीक्षेचा आज निकाल

### दहावी, बारावीची परीक्षा : संकेतस्थळावर निकाल उपलब्ध

**पुणे, ता. २२ : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे नोव्हेंबर-डिसेंबरमध्ये घेतलेल्या दहावी आणि बारावीच्या पुरवणी परीक्षेचा निकाल बुधवारी (ता. २३) दुपारी एक वाजता जाहीर करण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना हा निकाल 'www.mahresult.nic.in' या संकेतस्थळावर विषयनिहाय गुणांसह पाहता येणार असून, त्या माहितीची प्रत (प्रिंट आउट) काढता येणार आहे, अशी माहिती मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी दिली आहे.**

**गुणांच्या पडताळणीसाठी येथे करा अर्ज**

- दहावीसाठी : 'http://verification.mh-ssc.ac.in'
- बारावीसाठी : 'http://verification.mh-hsc.ac.in'

**अर्जासाठीचा कालावधी**

- गुणपडताळणीसाठी : २४ डिसेंबर २०२० ते २ जानेवारी २०२१
- छायाप्रतीसाठी : २४ डिसेंबर २०२० ते १२ जानेवारी २०२१

राज्य शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर आणि कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत दहावी-बारावीच्या पुरवणी परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. दहावीची पुरवणी परीक्षा २० नोव्हेंबर ते ५ डिसेंबर, तर बारावीची परीक्षा २० नोव्हेंबर ते १० डिसेंबर दरम्यान झाली होती.

या परीक्षेच्या ऑनलाइन निकालानंतर लगेचच दुसऱ्या दिवसापासून दहावी आणि बारावीच्या पुरवणी परीक्षेस प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांना स्वतः:च्या अनिवार्य विषयांपैकी (श्रेणी विषयांव्यतीरिक्त) कोणत्याही विशिष्ट विषयात त्यांना मिळालेल्या गुणांची गुणपडताळणी आणि उत्तरपत्रिकांच्या छायाप्रत, पुनर्मूल्यांकन व स्थलांतर प्रमाणपत्रासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाइन पद्धतीने अर्ज करता येणार आहे.

नोव्हेंबर-डिसेंबर २०२० पुरवणी परीक्षेतील उत्तरपत्रिकेच्या पुनर्मूल्यांकनासाठी ऑनलाइन पद्धतीने अर्ज मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावरून करण्यासाठी प्रथम उत्तरपत्रिकेची छायाप्रत घेणे अनिवार्य आहे. ती मिळाल्याच्या दिवसापासुन कार्यालयीन कामाच्या पाच दिवसांत पुनर्मूल्यांकनाच्या कार्यपद्धतीचा अवलंब करून, दिलेले शुल्क भरून संबंधित विभागीय मंडळाकडे विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने अर्ज करणे आवश्यक आहे. उत्तरपत्रिकेच्या पुनर्मूल्यांकनासाठी विद्यार्थ्यांनी संबंधित विभागीय मंडळाकडे संपर्क साधावा, असे आवाहन राज्य मंडळाने केले आहे.

दहावी-बारावीच्या २०२१ मध्ये होणारी परीक्षा देणारे पुनर्परीक्षार्थी विद्यार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खासगी विद्यार्थी तसेच श्रेणीसुधार योजनेअंतर्गत प्रविष्ट होणारे व अन्य विद्यार्थ्यांची आवेदनपत्र ऑनलाइन पद्धतीने स्वीकारली जाणार आहेत. परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना श्रेणी सुधार योजनेअंतर्गत परीक्षेस पुन्हा प्रविष्ट होण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे, असे डॉ. भोसले यांनी सांगितले.

### दहावीच्या परीक्षेसाठी आजपासून भरा अर्ज

पुणे, ता. २२ : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या दहावीच्या परीक्षेस नियमित, पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले विद्यार्थी, तसेच श्रेणीसुधार योजनेतर्गत व तुरळक विषय घेऊन, प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांना बुधवारपासून (ता. २३) ऑनलाइन अर्ज करता येणार आहे.

दहावीची परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना 'www.mahahsscboard.in' या संकेतस्थळावर आवेदनपत्र ऑनलाइन पद्धतीने भरता येणार आहे. दहावीच्या परीक्षेसाठी नियमित विद्यार्थ्यांना २३ डिसेंबर २०२० ते ११ जानेवारी २०२१ पर्यंत, तर पुनर्परीक्षार्थी, खासगी विद्यार्थी, श्रेणी सुधार व तुरळक विषय घेऊन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना १२ ते २५ जानेवारी २०२१ दरम्यान अर्ज करता येणार आहे.

दहावीच्या परीक्षेसाठी आवेदनपत्रे ही ऑनलाइन पद्धतीने स्वीकारण्यात येणार आहेत. तसेच विद्यार्थ्यांनी ही आवेदनपत्रे त्यांच्या माध्यमिक शाळांमार्फत भरावीत, असे आवाहन राज्य मंडळाने केले आहे.

यावर्षी नव्याने फॉर्म नंबर १७ द्वारे नोंदणी करणाऱ्या विद्यार्थ्यांची २०२१ मधील परीक्षेची आवेदनपत्रे भरण्याचा कालावधी स्वतंत्रपणे निश्चित केला जाणार आहे. त्यामुळे या कालावधीत या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरण्यात येऊ नयेत, असेही राज्य मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी सांगितले आहे.

Sakaal: 23.12.2020

# दहावी-बारावी पुरवणी परीक्षेचा आज निकाल

### गुणपडताळणीसाठी गुरुवारपासून ऑनलाइन अर्ज करता येणार

**ऑनलाइन निकाल पाहण्यासाठी संकेतस्थळ www.mahresult.nic.in**

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २२ -** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी व बारावीच्या पुरवणी परीक्षेचा ऑनलाइन निकाल बुधवारी (दि.२३) दुपारी १ वाजता जाहीर होणार आहे. बोर्डाच्या संकेतस्थळावर विद्यार्थ्यांना विषयनिहाय गुण उपलब्ध होतील. तसेच, माहितीची प्रत घेता येणार आहे, अशी माहिती राज्य मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी दिली.

दहावी व बारावीच्या लेखी परीक्षेत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची दरवर्षी पुरवणी परीक्षा घेतली जाते. फेब्रुवारी-मार्च २०२० मध्ये बारावी व दहावीची लेखी परीक्षा घेण्यात आली. साधारण मार्चच्या शेवटच्या आठवड्यात करोनामुळे लॉकडाऊन जाहीर झाले. यानंतर जुलैमध्ये निकाल जाहीर झाले. करोनाच्या प्रभावामुळे पुरवणी परीक्षा होणार की नाही याबाबत साशंकता होती. राज्य मंडळाकडून ऑक्टोबरमध्ये पुरवणी परीक्षेच्या आयोजनाबाबत शासनास प्रस्ताव पाठवला होता. करोनाची परिस्थिती पाहून नोव्हेंबर-डिसेंबर या कालावधीत परीक्षा झाली. यानंतर लगेचच निकाल जाहीर होत आहे.

ऑनलाइननिकालानंतरलगेचच दुसऱ्या दिवसापासून विद्यार्थ्यांना गुणपडताळणी व उत्तरपत्रिकांच्या छायाप्रत, पुनर्मूल्यांकन व स्थलांतर प्रमाणपत्रासाठी संबंधित विभागीय मंडळाकडे ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. गुणपडताळणीसाठी दि. २४ डिसेंबर ते १२ जानेवारी व छायाप्रतीसाठी दि. २४ डिसेंबर ते १२ जानेवारी या कालावधीत ऑनलाइन पद्धतीने अर्ज करता येईल. परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना त्यांची श्रेणी/गुणसुधार योजनेंतर्गत परीक्षेस पुन्हा प्रविष्ठ होण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यानुसार नोव्हेंबर-डिसेंबरच्या दहावी व बारावी परीक्षेत सर्व विषय घेऊन प्रथमच उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांसाठी पुढील सलग दोन संधी उपलब्ध राहणार आहेत.




**दहावी परीक्षा अर्जप्रक्रियेला आजपासून सुरुवात**

राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या इयत्ता दहावी परीक्षेच्या ऑनलाइन अर्जप्रक्रियेला बुधवारपासून (दि.२३) सुरुवात होत आहे. दि. ११ जानेवारीपर्यंत नियमित विद्यार्थ्यांना अर्ज करता येईल. तसेच पुनर्परीक्षार्थी, श्रेणीसुधार, खासगी व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांना दि. १२ ते २५ जानेवारी २०२१ या कालावधीत ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. विद्यार्थ्यांनी राज्य मंडळाच्या संकेतस्थळावरून ऑनलाइन अर्ज भरायचे आहेत. करोना प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर शासनाने व विशेषत: आरोग्य विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सर्व सूचनांचे व नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षात घ्यावी. त्याचप्रमाणे नियमित विद्यार्थ्यांची ऑनलाइन अर्ज स्वीकारण्यासाठी सरल डेटाबेसमध्ये विद्यार्थ्यांची अद्ययावत नोंद असणे आवश्यक आहे. कौशल्य सेतु अभियानाचे ट्रान्सफर ऑफ क्रेडिट मागणाऱ्या विद्यार्थ्यांनीदेखील ऑनलाइन पद्धतीने अर्ज भरून विषयासमोर ट्रान्सफर ऑफ क्रेडिटची नोंद करावी. अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क चलनाद्वारे भरायचे आहे. नव्याने फॉर्म नं. १७ द्वारे नोंदणी करणाऱ्या खासगी विद्यार्थ्यांची २०२१ मधील परीक्षेची अर्ज भरण्याचा कालावधी स्वतंत्रपणे निश्चित केला जाणार असल्याने या विद्यार्थ्यांचे अर्ज भरण्यात येवू नयेत. शाळांनी दि. २३ डिसेंबर ते १ फेब्रुवारी या कालावधीत अर्जाचे चलन डाऊनलोड करून बँकेत शुल्क भरायचे आहे, अशी माहिती राज्य मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले यांनी दिली.

Prabhat: 23.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# पुण्यात अकरावीच्या ६१,५०० जागा रिक्त

## राज्यातील आकडा सव्वातीन लाखांच्या घरात | विशेष फेरीची निवड यादी उद्या

सकाळ EXCLUSIVE

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. २२ : राज्यात ऑनलाइन केंद्रीय पद्धतीने राबविण्यात येणाऱ्या अकरावीच्या पहिल्या तीन नियमित फेऱ्यांमध्ये दोन लाख ३८ हजार ७४४ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून, तीन लाख २० हजार २६ जागा रिक्त आहेत. पुण्यात ६१ हजार ५८५, तर मुंबईमध्ये एक लाख ८४ हजार ९६० जागा रिक्त आहेत. या जागांवरील प्रवेशासाठी पहिल्या विशेष फेरीची निवड यादी गुरुवारी (ता. २४) जाहीर केली जाणार आहे.

पहिल्या तीन प्रवेश फेऱ्यांमध्ये निवड यादीत नाव लागूनही अनेकांनी प्रत्यक्ष प्रवेश घेतला नसल्याची माहिती समोर आली. त्यामुळे विशेष फेरीसाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालयांचा पसंतीक्रम बदलून अर्ज लॉक करणे अनिवार्य करण्यात आले. यंदा विशेष फेरीत रिक्त जागांची संख्या तुलनेने अधिक आहे.

**प्रमुख शहरांतील चित्र**

| शहर | महाविद्यालये | प्रवेश क्षमता | प्रवेश घेतलेले विद्यार्थी | रिक्त जागा |
|---|---|---|---|---|
| मुंबई | ८४३ | ३,२०,३९० | १,३५,४३० | १,८४,९६० |
| पुणे | ३०४ | १,०७,०३० | ४५,४४५ | ६१,५८५ |
| नागपूर | २१६ | ५९,२५० | २४,७९० | ३४,४६० |
| नाशिक | ६० | २५,२७० | १२,३६७ | १२,९०३ |
| औरंगाबाद | ११६ | ३१,४७० | १२,४२९ | १९,०४१ |
| अमरावती | ६३ | १५,३६० | ८,२८३ | ७०७७ |

" शहरातील नामांकित महाविद्यालयात आपल्याला प्रवेश मिळावा, या अपेक्षेने विद्यार्थी पुढील फेरीसाठी प्रतीक्षा करतात. काही विद्यार्थी ऑनलाइन प्रवेशाचा अर्ज भरून प्रत्यक्ष शहराबाहेरील महाविद्यालयांमध्ये ऑफलाइन प्रवेश घेत असावेत. त्याशिवाय, आयटीआय आणि अन्य पदविका अभ्यासक्रमाला प्रवेशासाठी विद्यार्थी प्रयत्न करत असतील. त्यामुळे विद्यार्थी ऑनलाइन प्रक्रियेअंतर्गत प्रवेशात सहभागी होत नसावेत. प्रवेशासाठी असणाऱ्या एकूण जागा आणि आलेले अर्ज पाहता, प्रवेशाच्या जागा अधिक असल्याचे दिसून येते.

\- मीना शेंडकर, सचिव, इयत्ता अकरावी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश समिती

" बाहेरगावाहून अकरावीसाठी पुण्यात येणारे विद्यार्थी प्रवेश फेरीदरम्यान निवड यादीत नाव लागूनही प्रवेश घेत नसल्याचे दिसून येते. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पालक विद्यार्थ्यांना पुण्यात पाठविण्याबाबत द्विधा मनःस्थितीत आहेत. तसेच, पहिल्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय मिळावे, म्हणून अनेक विद्यार्थी पुढील फेरीच्या प्रतीक्षेत आहेत. निवड झालेल्या विद्यार्थ्यांशी प्रवेशाबाबत फोनद्वारे संपर्क साधला जात आहे, त्यातून ही माहिती समोर येत आहे.

\- विनायक सोलापूरकर, प्राचार्य, सर परशुरामभाऊ महाविद्यालय

Sakaal: 23.12.2020

# प्रात्यक्षिक परीक्षा दुसऱ्या सत्रातच

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्य सरकारने कॉलेज उघडण्याबाबत अजूनही कोणताच निर्णय न घेतल्याने, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१च्या अभ्यासक्रमांतील प्रथम सत्राच्या प्रात्यक्षिक परीक्षा, प्रकल्प परीक्षा, मौखिक परीक्षा दुसऱ्या सत्राच्या परीक्षांसह घेण्याची वेळ आली आहे. करोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यावर सुरक्षित अंतराचे सर्व नियम पाळून कॉलेजांमधील प्रयोगशाळा सुरू केल्या असत्या, तर प्रात्यक्षिके पुढे ढकलण्याची वेळ आली नसती.

**अविद्येचे 'प्रात्यक्षिक'**

या निर्णयाचे परिपत्रक विद्यापीठ प्रशासनाकडून प्रसिद्ध करण्यात आले आहे. पुणे विद्यापीठाच्या या निर्णयामुळे आता महाविद्यालये सुरू झाल्यावर, दुसऱ्या सत्रात स्वतंत्रपणे दोन्ही सत्राच्या प्रात्यक्षिक आणि मौखिक परीक्षा होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. करोना संसर्ग कमी झाल्यावरही महाविद्यालये सुरू होऊ शकलेली नाहीत. प्रयोगशाळा व ग्रंथालयांना अजूनही टाळे आहे. त्यामुळे अभियांत्रिकी, वास्तुकला, फार्मसी, विज्ञान अशा विविध अभ्यासक्रमांच्या प्रथम सत्राच्या प्रात्यक्षिक, प्रोजेक्ट, मौखिक परीक्षा कशा होणार, असा प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने मंगळवारी परिपत्रकाद्वारे प्रथम सत्राच्या प्रात्यक्षिक, मौखिक परीक्षा द्वितीय सत्राच्या परीक्षांबरोबर घेण्याचे आदेश दिले आहेत. तांत्रिक अडचणी येऊ नयेत, यासाठी नियमित विद्यार्थ्यांचे प्रथम सत्रातील विद्यापीठ परीक्षांचे निकाल केवळ ऑनलाइन पद्धतीने जाहीर करण्यात येतील. प्रथम आणि द्वितीय सत्राच्या मूळ गुणपत्रिका एकत्रितपणे द्वितीय सत्राच्या गुणपत्रिकांसह स्वतंत्रपणे एकाच महाविद्यालयात पाठवण्यात येतील.

Maharashtra Times: 23.12.2020

# सीबीएसई बोर्डाच्या परीक्षा फेब्रुवारीनंतरच

**पाच लाख कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण**

नवी दिल्ली, दि. २२- केंद्रीय शिक्षणमंत्री रमेश पोखरियाल निशंक देशातील शिक्षकांशी सीबीएसई परीक्षा २०२१ आणि जेईई मेन परीक्षांविषयीच्या अडचणींबाबत संवाद साधत आहेत. १० वी आणि १२ वीच्या सीबीएसई बोर्ड परीक्षा फेब्रुवारी २०२१ पर्यंत होणार नसल्याची घोषणा रमेश पोखरियाल यांनी केली आहे. तसेच आतापर्यंत ४ लाख ८० हजार शिक्षकांना ऑनलाइन शिक्षणाबाबत प्रशिक्षण दिल्याची माहिती पोखरियाल यांनी दिली.

परीक्षा रद्द करणे आणि विद्यार्थ्यांना पुढील वर्गात प्रमोट करणं हे विद्यार्थ्यांना भविष्यात अडचणीचे आणणारे ठरेल. नोकरी आणि प्रवेश मिळवताना पुढील काळात अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे १० वी आणि १२ वीच्या परीक्षा रद्द न करता पुढे ढकलल्या जातील. काही विद्यार्थ्यांना अजून समान संधी मिळत नाही. सध्या आपण ऑनलाइन क्लासेस घेत आहोत. सीबीएसई परीक्षांचा ३० टक्के अभ्यासक्रम कमी करण्यात आला आहे, अशी माहिती त्यांनी दिली. जेईई मेन २०२१ परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांसमोर अधिक पर्याय उपलब्ध असतील. जेईई परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना ९० प्रश्नांच्या दोन विभागातील फक्त ७५ प्रश्न सोडवणे आवश्यक असल्याचंही त्यांनी सांगितलं.

Prabhat: 23.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# प्रथम सत्राच्या प्रात्यक्षिक, मौखिक परीक्षा दुसऱ्या सत्राच्या परीक्षांसह

**विद्यापीठाचा निर्णय**

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ तील प्रथम सत्राच्या महाविद्यालय स्तरावरील प्रात्यक्षिक परीक्षा, मौखिक परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षेअंतर्गत लेखी परीक्षा दुसऱ्या सत्राच्या परीक्षांसह घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता महाविद्यालये सुरू झाल्यावर प्रथम आणि द्वितीय सत्राच्या प्रात्यक्षिक आणि मौखिक परीक्षा एकावेळी होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

करोना संसर्गामुळे अद्याप महाविद्यालये सुरू होऊ शकलेली नाही. त्यामुळे अभियांत्रिकी, वास्तुकला, विज्ञान अशा विविध अभ्यासक्रमांच्या प्रथम सत्राच्या प्रात्यक्षिक, मौखिक परीक्षा, प्रात्यक्षिक परीक्षेअंतर्गत लेखी परीक्षा कशा होणार असा प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे यांनी मंगळवारी परिपत्रकाद्वारे प्रथम सत्राच्या प्रात्यक्षिक, मौखिक परीक्षा द्वितीय सत्राच्या परीक्षांबरोबर घेण्याचे निर्देश संलग्न महाविद्यालयांना दिले आहेत.

नियमित विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरताना ऑनलाइन अर्जाच्या प्रक्रियेत काहीही बदल न करता लेखी परीक्षांसह प्रात्यक्षिक, मौखिक परीक्षांची माहिती प्रचलित पद्धतीनुसार भरावी. तांत्रिक अडचणी येऊ नयेत यासाठी नियमित विद्यार्थ्यांचे प्रथम सत्रातील विद्यापीठ परीक्षांचे निकाल केवळ ऑनलाइन पद्धतीने जाहीर करण्यात येतील.

तसेच प्रथम आणि द्वितीय सत्राच्या मूळ गुणपत्रिका एकत्रितरीत्या द्वितीय सत्राच्या गुणपत्रिकांसह स्वतंत्रपणे एकाच महाविद्यालयात पाठवण्यात येतील. विषय राहिलेल्या (बॅकलॉग) विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक, मौखिक परीक्षा नेहमीप्रमाणे घेऊन त्यांचे निकाल प्रथम सत्राच्या लेखी परीक्षेनंतर जाहीर करण्यात येतील, असे विद्यापीठाने परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

लोकसत्ता Wed, 23 December 2020 https://epaper.loksatta.com/c/57

# CET cell declares MBA & MMS plan, first list on Dec 28

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** The State Common Entrance Test (CET) cell declared new dates for the centralised admission process on Tuesday after Bombay high court on December 11 permitted the addition of ATMA, MAT and XAT results for the management admission process for the academic year 2020-21.

The eligibility criteria says that students must have a non-zero score in MAH MBA/MMS-CET 2020 or obtained a non-zero positive score in any one of the examinations like GMAT, CAT, MAT, ATMA, XAT and CMAT.

The last date for online registration is December 25 and the first provisional merit list would be declared on December 28.

The move brings relief to students who had previously applied on the basis of their CET score despite getting a better score in ATMA or the other examinations.

"The candidates who have already registered and confirmed their application form through e-scrutiny centre (E-SC) and want to apply for MBA/MMS courses on the basis of ATMA, MAT, XAT examination can submit a grievance at the E-SC. After approval of such grievances, candidates can add their additional CET details through their login and submit for re-verification to the E-SC," the directive on the official website said.

Parag Kalkar, professor and director at Sinhgad Institute of Business Administration and Computer Application, said all students are brought at par after they fill up their forms.

**RELIEF FOR PUPILS**

"All examinations have different difficulty levels and characteristics. The CAP committee uses formulae where the total number of students, the highest score, the lowest score and other factors are used to arrive at the equivalent score for the student who has qualified in an examination other than the state CET," he said.

The academic activities will begin from January 11 while the cut-off date for admissions will be January 24.

The Times of India: 23.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# SPPU puts off practicals to 2nd semester

**Ardhra.Nair@timesgroup.com**

**Pune:** Savitribai Phule Pune University has postponed all practicals, oral, seminars, projects examinations for the first semester to the second semester.

Mahesh Kakade, director of examination and evaluation, said colleges have not reopened and students have not been able to conduct practicals hence the decision to postpone it to the end of the term.

"The kind of exposure in a laboratory that the students are expected to get has not happened this year. After a discussion with all board of studies and other bodies of the university, it was decided that while the theory examinations conducted by the university will happen as per the plan, the practicals will be pushed to the next semester," Kakade said.

However, students have to fill up forms in a regular way, mentioning their willingness to appear in the respective semester's practical exam.

Results will be given only in the online format at the end of the first semester. Only after the student completes both the semesters, will they receive the physical copy of their results.

The university will conduct exams for students with backlogs in their practicals or viva.

The Times of India: 23.12.2020

# No board exams will be held till Feb-end: Minister

**HT Correspondent**

letters@hindustantimes.com



Ramesh Pokhriyal

**NEW DELHI:** Union education minister Ramesh Pokhriyal said on Tuesday that the board exams will not be held in January or February.

"No board examinations will be conducted in January or February. A decision on the conduct of examinations will be taken later," Pokhriyal said during a virtual interaction with teachers.

He also said that it is not possible to conduct the board exams in online mode. "The CBSE board exams will be conducted on a reduced syllabus. Thirty per cent of the total syllabus has been scrapped. While some states have declared as much, others are likely to make an announcement soon. There will also be 33 per cent internal choice in the exam," the minister said in an online interaction with stakeholders.

The CBSE had earlier this month announced that board exams in 2021 will be conducted in written mode and not online.

Schools across the country were closed in March to contain the spread of the Covid-19 pandemic. They were partially reopened in some states from October 15. However, a few states have decided to keep them closed in view of a spike in the number of infections.

Board exams had to be postponed mid-way in March. They were later cancelled, and results announced on the basis of an alternative assessment scheme.

Pokhriyal had on December 10 interacted with students and answered questions about various concerns regarding the conduct of upcoming board exams. He had said during the interaction that consultations with stakeholders are in progress for deciding the dates for board examinations for classes 10 and 12. There have been demands for postponement of board exams to May in view of the continued closure of schools and teaching-learning activities being conducted entirely online.

Hindustan Times: 23.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# Colleges rapped for scholarship students' data

## Over 260 colleges receive notice from state dept, since many continue to delay process for disbursal of grant money to chosen pupils

**Sukhada.Khandge@timesgroup.com**

TWEETS @Sukhadak_Mirror

With the state's social justice and special assistance department issuing notices to 260 colleges in Pune district for delaying submission of information pertaining to scholarship students, student activists have now demanded that action should be taken against these errant colleges.

Sangeeta Davkar, assistant commissioner of the department, informed that some colleges have been dragging their feet in furnishing details of students eligible for scholarship, which is impacting the disbursal of the funds through direct bank transfers to the student accounts. This has happened despite several reminders issued to the colleges, compelling the department to issue the notices pursuant to a decision taken earlier this week.

Davkar pointed out, "Usually, colleges send the student information and later, discrepancies are found in the furnished details such as incorrect bank account number, or the bank account not being linked to Aadhaar card or a bank branch that is not functional. To get past such issues, the department has demanded the colleges send updated information, so that there is no hassle in processing and disbursing the scholarships to the students."

Kuldip Ambekar, a student activist, explained, "Students have the option to apply for the Rajashree Shahu Maharaj Scholarship or the Dr Babasheb Ambedkar Swadhar Scholarship. When we apply for these scholarships, we expect to receive the grant amount regularly, on time. But many students don't get it on time. When we enquire, there are no answers forthcoming from the department or the college. But since we wait for the money to come in, it becomes difficult to pay up the college fees."

Faulting the college administrations, Ambekar added, "We diligently provide all the information to the colleges, keeping to the deadline for submission of forms. We offer support to eligible students in going through the process. But on account of the delay in submission of the information by the colleges, the students suffer. We've demanded that action should be taken against the colleges that delay the process unnecessarily."

Other students elaborated that though the scholarships are available to them on paper, they don't get implemented on time. They also urged that colleges be made accountable to ensure the timely processing of the precious scholarships.

In line with this demand, the notices sent out by the department also mention that if a college fails to submit the required information for scholarship students on time, the blame will be pinned on the principal concerned.

FILE PHOTO



**Students want action against the errant colleges, asserting that they stick to all deadines while applying for the grants and genuinely require the money**

Pune Mirror: 23.12.2020

# दहावीचा निकाल वाढला; बारावीचा घटला

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाच्या इयत्ता दहावी आणि बारावीचे पुरवणी परीक्षांचे निकाल बुधवारी जाहीर झाले असून, दहावीच्या निकालात ३२.६० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे. तर, बारावीच्या निकालात १८.४१ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. गेल्या वर्षाच्या तुलनेत बारावीचा निकाल ४.७६ टक्क्यांनी घसरला आहे; याउलट दहावीच्या निकालात ९.७४ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

दहावी आणि बारावीच्या नियमित परीक्षेत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये, यासाठी जुलै-ऑगस्ट महिन्यात फेरपरीक्षा घेण्यात येते. यंदा मात्र करोनाच्या पार्श्वभूमीवर ही फेरपरीक्षा नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात पार पडली. दहावीची प्रात्यक्षिक परीक्षा १८ नोव्हेंबर ते ५ डिसेंबर व लेखी परीक्षा २० नोव्हेंबर ते ५ डिसेंबर या कालावधीत आयोजित केली होती. बारावीची प्रात्यक्षिक परीक्षा १८ नोव्हेंबर ते १० डिसेंबर व लेखी परीक्षा २० नोव्हेंबर ते १० डिसेंबर या कालावधीत आयोजित केली होती. या दोन्ही परीक्षांचा निकाल राज्य मंडळाकडून लवकर जाहीर करण्यात आला. दहावीच्या परीक्षेला राज्यातून ४१,३९७ विद्यार्थी बसले होते, त्यापैकी १३,४९५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. बारावीची परीक्षा देणाऱ्या ६९,२७४ विद्यार्थ्यांपैकी १२,७५१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले, अशी माहिती राज्य मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले आणि अध्यक्ष शकुंतला काळे यांनी दिली. विद्यार्थ्यांना सविस्तर निकाल आणि सूचना राज्य मंडळाच्या www.mahresult.nic.in या वेबसाइटवर विद्यार्थ्यांना ऑनलाइन निकाल पाहता येईल.

### गुणपडताळणी कधी?

ऑनलाइन निकालानंतर दुसऱ्या दिवसापासून म्हणजेच २४ डिसेंबरपासून विद्यार्थ्यांना गुणपडताळणी, उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती, पुनर्मूल्यांकन व स्थलांतर प्रमाणपत्र यासाठी ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. गुणपडताळणीसाठी अर्ज करण्याची मुदत २४ डिसेंबर ते २ जानेवारी आहे, तर उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतींसाठी अर्ज करण्याची मुदत २४ डिसेंबर ते १२ जानेवारी आहे. अर्जासाठी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी ://https.verification.mh-ssc.ac.in या लिंकवर, तर बारावीच्या विद्यार्थ्यांनी ://https.verification.mh-hsc.ac.in या लिंकचा वापर करावा, असे आवाहन डॉ. भोसले यांनी केले.

### अकरावी प्रवेशासाठी विशेष फेरी

**पुणे :** दहावी फेरपरीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर, उत्तीर्ण विद्यार्थ्यांना इयत्ता अकरावीत प्रवेश देण्यासाठी २६ डिसेंबरनंतर विशेष फेरीचे आयोजन करण्यात येणार आहे. या फेरीचे सविस्तर वेळापत्रक लवकर जाहीर करण्यात येणार आहे.

दहावी फेरपरीक्षेचा निकाल बुधवारी जाहीर करण्यात आला असून, त्यामध्ये १३,४९५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये पुणे व पिंपरी चिंचवड परिसरातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांना इयत्ता अकरावीत प्रवेश मिळावा, सध्या अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेच्या तीन फेऱ्या पूर्ण झाल्या असून, विशेष फेरीचे आयोजन करण्यात येत आहे. त्यानंतर फेरपरीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष फेरीचे आयोजन करण्यात येईल, अशी समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिली.

दरम्यान, दहावीच्या फेरपरीक्षेत उत्तीर्ण झालेले, अनेक विद्यार्थी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत (आयटीआय) प्रवेश घेतात. फेरपरीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाकडून (डीव्हीईटी) विशेष प्रवेश फेरी राबविण्यात येते. मात्र, यंदा प्रवेशासाठी अंतिम मुदत ३१ डिसेंबर देण्यात आली आहे; तसेच अर्ज प्रक्रिया थांबविण्यात आली आहे. एवढ्या कमी कालावधीत प्रवेश प्रक्रिया राबविणे कठीण आहे. त्यामुळे 'डीव्हीईटी'कडून ३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढीसाठी परवानगी मागितली आहे. परवानगी मिळाल्यास, विशेष फेरीचे आयोजन करता येईल, अशी माहिती 'डीव्हीईटी'च्या अधिकाऱ्यांनी दिली आहे.

Maharashtra Times: 24.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

### विद्यापीठ अधिसभा ९, १० जानेवारीला

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची बहुप्रतीक्षित अधिसभा येत्या ९ व १० जानेवारी रोजी होणार आहे. जूनमध्ये झालेल्या अर्थसंकल्पीय ऑनलाइन अधिसभेनंतर आता दोन दिवस प्रत्यक्ष अधिसभा होणार असल्याने ही अधिसभा वादळी ठरण्याची चिन्हे आहेत. पहिल्यांदाच झालेल्या ऑनलाइन परीक्षा, त्यातील तांत्रिक त्रुटी हे मुद्दे या अधिसभेत गाजतील, अशी शक्यता वर्तविली जात आहे.

येत्या ९ व १० जानेवारी रोजी विद्यापीठाची अधिसभा घेण्यासाठी विद्यापीठाचे कुलपती व राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची मान्यता घेण्यात आली आहे. त्यासाठी विद्यापीठ स्तरावर नियोजनही सुरू झाले आहे. वर्षातून दोन वेळा विद्यापीठाची अधिसभा घेतली जाते. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये अधिसभा पार पडली. त्यानंतर करोना व लॉकडाउनमुळे मार्चमध्ये आयोजित अर्थसंकल्पीय अधिसभा रद्द करावी लागली. त्यानंतर जूनमध्ये ऑनलाइन पद्धतीने ही अधिसभा पार पडली. त्यानंतर पहिल्यांदाच प्रत्यक्ष अधिसभा होणार आहे. येत्या अधिसभेत या परीक्षेतील तांत्रिक समस्या, निकालातील त्रुटी हे मुद्दे ऐरणीवर येतील, अशी शक्यता आहे.

Maharashtra Times: 24.12.2020



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या निकालातील अडचणी सोडवाव्यात, यासाठी 'युक्रांद'ने बुधवारी आंदोलन सुरू केले. रात्री उशिरापर्यंत ते सुरू होते.

### कडाक्याच्या थंडीत विद्यार्थ्यांचा एल्गार

#### अंतिम वर्षाच्या परीक्षेचा सुधारित निकाल देण्यासाठी आंदोलन

पुणे, ता. २३ : परीक्षेच्या निकालात अजूनही त्रुटी असल्याने याविरोधात युवक क्रांती दलाच्या विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आंदोलन सुरू केले आहे. दिवसभर या आंदोलकांची दखल न घेतल्याने रात्री उशिरापर्यंत कडाक्याच्या थंडीतही आंदोलन सुरू होते.

पुणे विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या परीक्षा घेतल्या. त्यात मोठ्या प्रमाणात चुका झाल्याने हजारो तक्रारी परीक्षा विभागाकडे आल्या होत्या. विद्यापीठाने या तक्रारींची दखल घेऊन सुधारित निकाल जाहीर केला जाईल, असे स्पष्ट केले. तरीही या सुधारित निकालात शून्य गुण, अनुपस्थित दाखविणे अशा त्रुटी असल्याचे समोर आले. या विरोधात

> **विद्यापीठाने सुधारित निकाल जाहीर केले आहेत. आणखी कोणाच्या अडचणी असतील, तर त्या तपासून निकाल लावण्यासाठी दोन अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. विद्यार्थ्यांशी संवाद सुरू आहे. त्यांनी त्यांच्या अडचणी सांगाव्यात.**
> **-डॉ. महेश काकडे,** संचालक, परीक्षा मंडळ

'युक्रांद'ने सात डिसेंबर रोजी आंदोलन केले होते. त्यानंतर १५ डिसेंबरपर्यंत पुन्हा एकदा सुधारित निकाल जाहीर केला जाईल, असे स्पष्ट केले होते. सुमारे साडेसहा हजार विद्यार्थ्यांचा निकाल विद्यापीठाने लावला आहे. तरीही अद्याप काही त्रुटी आहेत.

विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडविल्या गेल्या नसल्याने 'युक्रांद'ने बुधवारी सकाळपासून आंदोलन सुरू केले; परंतु विद्यापीठाने त्यांची दखल घेतली नसल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला असून, रात्री उशिराही कडाक्याच्या थंडीत विद्यार्थी मुख्य इमारतीजवळ बसून होते. 'युक्रांद'चे शहराध्यक्ष सचिन पांडुळे म्हणाले, "विद्यापीठाने अनेक विद्यार्थ्यांचे सुधारित निकाल जाहीर केले; पण अजून सुमारे २०० विद्यार्थ्यांच्या अडचणी कायम आहेत. यापूर्वी आंदोलन केले; पण आश्वासन देऊनही सर्वांना न्याय मिळत नसल्याने नाइलाजास्तव आम्हाला रात्रीही सत्याग्रह सुरूच ठेवावा लागणार आहे."

Sakaal: 24.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

### अनुसूचित जाती विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठीच्या शिष्यवृत्तीत बदल

#### मोदी सरकारचा मोठा निर्णय, ५ वर्षांत मिळणार ५९००० कोटी रुपये

**नवी दिल्ली, दि. २३ - केंद्र सरकारने अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. पुढील ५ वर्षांत ४ कोटींपेक्षा जास्त एससी विद्यार्थ्यांसाठी ५९००० कोटी रुपयांच्या पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्तींची घोषणा करण्यात आली आहे. या योजनेला केंद्रीय मंत्रिमंडळाने बुधवारी मंजूरी दिली. या योजनेत केंद्र सरकार ३५,५३४ कोटी (६०%) आणि उर्वरित ४० टक्के रक्कम राज्य सरकार खर्च करणार आहे. या योजनेचा १ कोटींपेक्षा जास्त विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे.**

गेल्या अनेक वर्षांपासून ही योजना सुरू आहे. त्यात अनेक अडचणी येत होत्या. केंद्र आणि राज्यांमध्येही समन्वय नव्हता. केंद्र सरकार दरवर्षी एक हजार कोटींच्या आसपास यावर निधी देत होता. आता दरवर्षी त्याच्या पाचपट जास्त म्हणजे ५ हजार कोटींपर्यंत निधी देणार आहे, अशी माहिती केंद्रीय समाजकल्याण मंत्री थावरचंद गेहलोत यांनी दिली.

दरवर्षी या निधीमध्ये वाढ होणार आहे. यावर्षी सर्व राज्यांना ५ हजार कोटी रुपये देण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना पैसे थेट त्यांच्या बँकेत जमा होणार आहेत. राज्यांनी त्यांच्या वाट्याचे पैसे जमा केल्यानंतर केंद्र सरकारही लगेच पैसे जमा करणार आहे. राज्यांकडून विद्यार्थ्यांची यादी मागविण्यात येणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.




दहावीनंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या १ कोटी ३६ लाख विद्यार्थ्यांना याचा फायदा होईल. पैसे थेट मुलांच्या खात्यात जाणार असल्याने पैशांची गळती थांबेल, अशी माहितीही त्यांनी दिली.

Prabhat: 24.12.2020

### बॅकलॉगच्या सोळाशे विषयांची पुणे विद्यापीठाकडून परीक्षा पूर्ण

**पुणे, ता. २३ :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे घेण्यात येणाऱ्या अंतिम वर्ष पूर्व वर्गातील बॅकलॉग व श्रेणीसुधारच्या परीक्षा अंतिम टप्प्यात आल्या आहेत. आतापर्यंत १ हजार ५९५ विषयांच्या परीक्षा झाल्या असून, सुमारे ३ लाख ७२ हजार विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली आहे, अशी माहिती परीक्षा संचालक डॉ. महेश काकडे यांनी दिली आहे.

पुणे विद्यापीठाने ८ डिसेंबरपासून बॅकलॉगची परीक्षा सुरू केली आहे. त्यापूर्वी ऑक्टोबर व नोव्हेंबरमध्ये अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने घेतली आहे. पण या परीक्षेच्या आयोजनात आलेल्या तांत्रिक अडचणींमुळे ही परीक्षा चांगलीच वादात सापडली. त्यानंतर निकालातील गोंधळ समोर आला आहे, तो सुधारित करण्याची प्रक्रिया अद्याप सुरूच आहे. बॅकलॉग परीक्षेसाठी सुमारे २ हजार विषय आहेत. या परीक्षा ३१ डिसेंबर पर्यंत चालणार असून, यावेळी ऑनलाइन यंत्रणेतील त्रुटी दूर केल्याने व कॉपी थांबविण्यासाठी प्रॉक्टर्ड मेथडचा वापर केल्याने गोंधळ झाला नाही. तांत्रिक अडचणी असल्यातरी त्यांची त्वरित नोंद करण्यासाठी स्टुडंट लॉगइनला सुविधा उपलब्ध करून दिल्याने वादही टळले आहेत. "आतापर्यंत बॅकलॉगच्या १ हजार ५९५ विषयांची परीक्षा झाली आहे, तसेच आतापर्यंत परीक्षेत ज्या विद्यार्थ्यांना अडचणी आल्या आहेत, त्यांची मंगळवारपासून (ता. २२) फेरपरीक्षा सुरू झाली आहे. पुढील चार पाच दिवस या विद्यार्थ्यांची परीक्षा होईल. तसेच ऑनलाइन परीक्षा झाल्यानंतर पुढील दोन दिवसात विद्यार्थ्यांना त्यांची परीक्षेतील कामगिरी कशी आहे, याबद्दल माहिती दिली जात असल्याने त्यांचा निकाल कसा लागेल, याचा अंदाज येत आहे," असे काकडे यांनी सांगितले.

Sakaal: 24.12.2020

पुढारी

### अकरावीसाठी २६ डिसेंबरनंतर विशेष फेरी

#### दहावी फेरपरीक्षेतील विद्यार्थ्यांना घेता येणार प्रवेश

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

दहावी फेरपरीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर, उत्तीर्ण विद्यार्थ्यांना इयत्ता अकरावीत प्रवेश देण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने पावले उचलली असून, २६ डिसेंबरनंतर विशेष फेरीचे आयोजन करण्यात येणार आहे. या फेरीचे सविस्तर वेळापत्रक लवकर जाहीर करण्यात येईल, अशी माहिती प्रवेश नियंत्रण समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिली आहे.

दहावी फेरपरीक्षेचा निकाल बुधवारी जाहीर करण्यात आला असून, त्यामध्ये १२ हजार ४९८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांना इयत्ता अकरावीत प्रवेश मिळावा, यासाठी अकरावी प्रवेश नियंत्रण समितीद्वारे तयारी करण्यात येत आहे. सध्या अकरावी प्रवेश नियंत्रण समितीद्वारे अकरावी ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेच्या तीन फेऱ्या पूर्ण झाल्या असून, विशेष फेरीचे आयोजन करण्यात येत आहे. ही प्रवेश फेरी २६ डिसेंबर रोजी पूर्ण होणार आहे. त्यानंतर फेरपरीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विशेष फेरीचे आयोजन करण्यात येईल, अशी




माहिती प्रवेश नियंत्रण समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिली. या फेरीबाबत सविस्तर सूचना आणि वेळापत्रक ऑनलाइन प्रवेशप्रक्रियेच्या वेबसाईटवर जाहीर करण्यात येईल, अशी माहितीही समितीच्या वतीने देण्यात आली आहे

**आयटीआयच्या विशेष फेरी होणार**

उत्तीर्ण झालेले, अनेक विद्यार्थी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत (आयटीआय) प्रवेश घेतात. फेरपरीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाकडून (डीव्हीईटी) विशेष प्रवेश फेरी राबविण्यात येते. मात्र, यंदा प्रवेशासाठी अंतिम मुदत ३१ डिसेंबर देण्यात आली आहे; तसेच अर्ज प्रक्रिया थांबविण्यात आली आहे. एवढ्या कमी कालावधीत प्रवेशप्रक्रिया राबविणे कठीण आहे. त्यामुळे डीव्हीईटीकडून ३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढीसाठी परवानगी मागितली आहे. परवानगी मिळाल्यास, विशेष फेरीचे आयोजन करता येईल, अशी माहिती डीव्हीईटीच्या अधिकाऱ्यांनी दिली

Pune Edition
Dec 24, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# तासिका प्राध्यापकांचे वेतनासाठी मंत्र्यांना साकडे

पुणे, ता. २३ : राज्यातील तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांची स्थिती कोरोनामुळे गंभीर झाली आहे. त्याकडे राज्य सरकारने लक्ष देऊन या पदाची कायमस्वरूपी भरती होईपर्यंत या प्राध्यापकांची पश्चिम बंगाल, हिमाचल प्रदेश, केरळच्या धर्तीवर कंत्राटी नेमणूक करावी. त्यांना मासिक किमान २५ ते ३० हजार रुपये मानधन द्यावे, अशी मागणी महाराष्ट्र स्टुडंट्स युनियनने (मासु) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांच्याकडे केली आहे.

कायमस्वरूपी प्राध्यापकांना मासिक ६५ हजार ते एक लाखापेक्षा जास्त पगार मिळतो. तर तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांना १० हजार रुपये देखील मिळत नाहीत. यंदा कोरोनामुळे महाविद्यालये सुरू न झाल्याने व करारांना मुदतवाढ न दिल्याने संकटात आहेत. पुढील शैक्षणिक वर्ष २०२१-२२ बाबत कोणताही निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभागाने घेतला नाही. त्यामुळे सेट, नेट, एमएफील, पी. एचडी या उच्च शिक्षित प्राध्यापकांपुढे कुटुंबांचा गाडा कसा हाकायचा, हा प्रश्न त्यांच्यासमोर उभा राहिला आहे, असे मासु'चे अध्यक्ष ॲड. सिद्धार्थ इंगळे यांनी सांगितले.

Sakaal: 24.12.2020

# प्राध्यापक करणार आंदोलन

## 'कॅस'च्या मुलाखती पुन्हा रद्द केल्याने नाराजी

पुणे, ता. २३ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांतील सहयोगी प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठी कॅस (करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम) अंतर्गत घेतल्या जाणाऱ्या मुलाखती पुन्हा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. त्यामुळे पदोन्नतीच्या प्रतीक्षेत असलेल्या प्राध्यापकांनी नाराजी व्यक्त केली आहे. येत्या काही दिवसांत 'कॅस'चे कामकाज पूर्ण न झाल्यास विद्यापीठाच्या ९ आणि १० जानेवारी रोजी होणाऱ्या अधिसभेसमोर आंदोलन केले जाईल, असा इशारा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व महाविद्यालयीन अध्यापक संघटनेने (स्पुक्टो) दिला आहे.

> प्राध्यापकांच्या 'कॅस'बाबत शासनाने आदेश दिले असताना विद्यापीठाकडून प्राध्यापकांच्या मुलाखती वारंवार रद्द केल्या जात आहेत. त्यामुळे प्राध्यापक संघटनेच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला आहे.
> – प्रा. एस. पी. लवांडे, सचिव, स्पुक्टो

पान ८ वर »

# प्राध्यापक करणार आंदोलन

» पान १ वरून

विद्यापीठातर्फे मार्च-२०२० मध्ये संलग्न महाविद्यालयांतील सहयोगी प्राध्यापकांच्या 'कॅस'च्या मुलाखती घेतल्या जाणार होत्या; परंतु कोरोनाच्या पार्श्वभूमीवर या मुलाखतींना स्थगित देण्यात आली. त्यानंतर सप्टेंबर महिन्यात मुलाखती घेण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, अंतिम वर्षाच्या परीक्षांचे काम आणि लॉकडाउनमुळे प्रवासावर येणाऱ्या बंधनामुळे त्यावेळीही 'कॅस'च्या मुलाखती स्थगित केल्या. त्यानंतर विद्यापीठाने २२ ते २८ डिसेंबर दरम्यान ४८४ प्राध्यापकांच्या मुलाखती घेतल्या जातील, असे स्पष्ट केले होते; परंतु पुन्हा एकदा विद्यापीठाने मुलाखती पुढे ढकलल्या. विद्यापीठाकडून वारंवार प्राध्यापकांच्या मुलाखती पुढे ढकलल्या जात असल्याने अध्यापक संघटनेतर्फे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना निवेदन देऊन नाराजी व्यक्त केली. ८ जानेवारीपर्यंत कॅसची प्रक्रिया पूर्ण न केल्यास अधिसभेसमोर धरणे आंदोलन करण्यात येईल, असेही संघटनेने स्पष्ट केले आहे.

Sakaal: 24.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# युवक क्रांती दलाचे विद्यापीठात आंदोलन

पुणे : कमी गुण मिळणे, तांत्रिक अडचणींमुळे अनुत्तीर्ण होणे, शून्य गुण मिळणे या विविध तक्रारींच्या विरोधात युवक क्रांती दलाकडून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात बुधवारी आंदोलन करण्यात आले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्ष परीक्षांच्या निकालाबाबत विद्यार्थ्यांच्या समस्यांचे निराकरण होईपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्यात येणार असल्याची माहिती युवक क्रांती दलाच्या वतीने देण्यात आली आहे. या आंदोलनात ६० ते ७० विद्यार्थी आंदोलनात सहभागी झाले. विद्यापीठ प्रशासन दखल घेण्यास तयार नाही. वारंवार फक्त आश्वासने दिले जात आहेत. त्यातच विद्यापीठ प्रशासनाकडून अरेरावीची भाषा वापरली जात आहे. त्यामुळेच निकालांमधे बदल होत नाही, तोपर्यंत सत्याग्रही मार्गाने आंदोलन चालूच राहणार असल्याचा युक्रांदचा निर्धार आहे. आंदोलन सुरू असताना, विद्यार्थ्यांनी दुपारचे जेवण आणि चहा आंदोलकांनी आंदोलनस्थळीच तयार केला. रात्री उशिरापर्यंत आंदोलनसुरू राहणार आहे.

Kesari: 24.12.2020

# पुरवणी परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना विशेष फेरीतून अकरावीला प्रवेश

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : पुरवणी परीक्षेतील दहावीच्या उत्तीर्ण विद्यार्थ्यांना विशेष फेरीतून अकरावी प्रवेशाची संधी दिली जाणार आहे. या विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करून घेण्यासाठी २७ डिसेंबरपासून विशेष फेरी होणार असून या फेरीचे सविस्तर वेळापत्रक २६ डिसेंबरला जाहीर करण्यात येणार आहे.

राज्य मंडळाने दहावीच्या पुरवणी परीक्षेच्या जाहीर केलेल्या निकालात १३ हजार ४९५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. त्यात पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील विद्यार्थ्यांचाही समावेश आहे. या विद्यार्थ्यांना अकरावीत प्रवेश मिळण्यासाठी प्रवेश नियंत्रण समितीकडून विशेष फेरी घेतली जाणार आहे. अकरावीच्या केंद्रीय प्रवेशाच्या आतापर्यंत तीन नियमित फेऱ्या झाल्या आहेत. तर विशेष फेरीची प्रक्रिया सध्या सुरू आहे. ही विषेश फेरी २६ डिसेंबरला पूर्ण झाल्यावर फेरपरीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत सहभागी होता येईल, अशी माहिती प्रवेश समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिली. या फेरीत सहभागी होऊन प्रवेश अर्ज भरणे आणि वेळापत्रक आदी तपशील संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल असेही त्यांनी सांगितले.

## आयटीआय प्रवेशासाठी विशेष फेरी?

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाकडून (डीव्हीईटी) सुरू असलेली औद्योगिक प्रशिक्षण संस्थांतील (आयटीआय) प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ३१ डिसेंबरची मुदत देण्यात आली आहे. तसेच अर्ज भरण्याची प्रक्रियाही थांबवण्यात आली आहे. त्यामुळे पुरवणी परीक्षेतील विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत समाविष्ट करून घेण्याच्या दृष्टीने प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ३१ जानेवारीपर्यंत मुदतवाढीचा प्रस्ताव देण्यात आला आहे. मुदतवाढीला परवानगी मिळाल्यास पुरवणी परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी विशेष फेरी घेता येईल, अशी माहिती डीव्हीईटीकडून देण्यात आली.

लोकसत्ता Thu, 24 December 2020 https://epaper.loksatta.com/c/5

## *News Paper Clippings During December 2020*

**Section: Education**

# विद्यापीठाकडून कॅसच्या मुलाखती पुन्हा रद्द

## प्राध्यापक संघटनेचा अधिसभेसमोर आंदोलनाचा इशारा

▪ लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठी कॅस (करिअर अॅडव्हान्समेंट स्कीम) अंतर्गत घेतल्या जाणाऱ्या मुलाखती दोनदा रद्द करण्यात आल्या. वारंवार मुलाखती रद्द केल्या जात असल्याने प्राध्यापकांनी संताप व्यक्त केला आहे. येत्या ९ व १० जानेवारीपूर्वी 'कॅस'चे कामकाज पूर्ण केले नाही तर विद्यापीठाच्या अधिसभेसमोर आंदोलन करण्याचा इशारा 'स्पुक्टो' संघटनेने दिला आहे.



पुणे विद्यापीठातर्फे मार्च २०२० मध्ये संलग्न महाविद्यालयातील सहयोगी प्राध्यापकांच्या 'कॅस'च्या मुलाखती घेतल्या जाणार होत्या. परंतु, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर या मुलाखती स्थगित करण्यात आल्या. त्यानंतर सप्टेंबर महिन्यात मुलाखती घेण्याचे नियोजन होते. मात्र, अंतिम वर्षाच्या परीक्षांचे काम आणि लॉकडाऊनमुळे त्या पुन्हा एकदा स्थगित केल्या. विद्यापीठाने नुकतेच परिपत्रक प्रसिद्ध करून येत्या २२ ते २८ डिसेंबर या कालावधीत 'कॅस' अंतर्गत ४८४ प्राध्यापकांच्या मुलाखती घेतल्या जातील, असे स्पष्ट केले होते. मात्र, पुन्हा एकदा विद्यापीठाने मुलाखती पुढे ढकलल्या.

विद्यापीठाकडून वारंवार प्राध्यापकांच्या मुलाखती रद्द केल्या जात असल्याने संघटनेने नाराजी व्यक्त केली.

कॅसबाबत शासनाने निर्देश दिलेले असतानाही विद्यापीठाकडून 'कॅस' अंतर्गत घेतल्या जाणाऱ्या मुलाखती वारंवार रद्द केल्या जात आहेत. विद्यापीठाकडून महाविद्यालयातील प्राध्यापकांना सावत्रपणाची वागणूक दिली जात आहे. त्यामुळे प्राध्यापक संघटनेच्या बैठकीत ९ व १० जानेवारीला होणाऱ्या अधिसभेसमोर धरणे आंदोलन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

- प्रा. एस. पी. लवांडे,
सचिव, एम. फुक्टो.

Lokmat: 24.12.2020

# 62k FYJC seats still vacant, list for special round today

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** The centralised admission committee for the first-year junior college (FYJC) admissions will display the merit list of the first special round on Thursday.

Till Wednesday, 45,445 students had taken admission and 61,585 seats were vacant across 304 junior colleges in Pune and Pimpri Chinchwad municipal corporation areas.

Meena Shendkar, assistant director of education of Pune division, said, "As of now, in most of the renowned colleges, more than 95% seats have filled up. Students who get the allotment in this round should decide before giving up the seat hoping to get a college of their choice in the next round. There will be another centralised round of admissions after December 25."

### TAKING IT FORWARD

- Students to click proceed for admission if ok with allotted college
- Confirmation of admission in the allotted college by students
- Admission confirmation, rejection & cancellation at college login
- Quota admission process also continues
- In-house and minority quota seats can be filled and/or surrendered hereafter, along with management quota
- Display of vacancy list on Sunday after special round is done including all quota seats surrendered by colleges

Shendkar said there is no stay on junior colleges starting their online classes for students who have already been admitted. "It has been the norm that after the college gets more than 50% admission, it can start classes. On November 23, the government had allowed the physical reopening of classes for standards IX, X and XII. However, colleges have not reopened physically in Pune and Pimpri Chinchwad. There is no restriction on imparting online education to admitted FYJC students if the college wishes to do so now," she said.

In the three CAP rounds so far, of the 1,48,527 registered students, 75,594 had been allotted seats. Among them, only 36,967 students took admission. In the management quota, in-house quota and minority quota, 2,348 students were admitted.

The Times of India: 24.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

**Section: Education**

पुढारी

# दहावीच्या निकालाचा टक्का वाढला

## बारावीचा घसरला; पुरवणी परीक्षेचा निकाल जाहीर

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाच्या इयत्ता दहावी आणि बारावीचे पुरवणी परीक्षांचे निकाल बुधवारी जाहीर झाले. यामध्ये दहावीच्या निकालात ३२.६० टक्के विद्यार्थी, तर बारावीच्या निकालात १८.४१ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत बारावीचा निकाल ४.७६ टक्क्यांनी घसरला आहे; याउलट दहावीच्या निकालात ९.७४ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

दहावी आणि बारावीच्या नियमित परीक्षेत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये, यासाठी जुलै-ऑगस्ट महिन्यात फेरपरीक्षा घेण्यात येते. यंदा मात्र कोरोनाच्या पार्श्वभूमीवर ही फेरपरीक्षा नोव्हेंबर-डिसेंबर महिन्यात पार पडली. या दोन्ही परीक्षांचा निकाल राज्य मंडळाकडून जाहीर करण्यात आला. दहावीच्या परीक्षेला राज्यातून ४१ हजार ३९७ विद्यार्थी बसले होते, त्यापैकी १३ हजार ४९५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. बारावीची परीक्षा देणाऱ्या ६९ हजार २७४ विद्यार्थ्यांपैकी १२ हजार ७५१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले, अशी माहिती राज्य मंडळाचे सचिव डॉ. अशोक भोसले आणि अध्यक्ष शकुंतला काळे यांनी दिली. विद्यार्थ्यांना सविस्तर निकाल आणि सूचना राज्य मंडळाच्या www.mahresult.nic.in या वेबसाइटवर विद्यार्थ्यांना ऑनलाइन निकाल पाहता येईल.



| मंडळ | दहावी | बारावी |
|---|---|---|
| पुणे | ३०.७६ | १४.९४ |
| नागपूर | २९.५२ | १८.६३ |
| औरंगाबाद | ३९.११ | २७.६३ |
| मुंबई | २९.८८ | १६.४२ |
| कोल्हापूर | ३०.१७ | १४.८० |
| अमरावती | ३२.५३ | १६.२६ |
| नाशिक | ३७.४२ | २३.६३ |
| लातूर | ३३.५९ | २२.०५ |
| कोकण | ३४.०५ | १४.४२ |
| एकूण | ३२.६० | १८.४१ |

### विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या तारखा



ऑनलाइन निकालानंतर दुसऱ्या दिवसापासून म्हणजेच २४ डिसेंबरपासून विद्यार्थ्यांना गुणपडताळणी, उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती, पुनर्मूल्यांकन व स्थलांतर प्रमाणपत्र यासाठी ऑनलाइन अर्ज करता येणार आहे. गुणपडताळणीसाठी अर्ज करण्याची मुदत २४ डिसेंबर ते २ जानेवारी आहे, तर उत्तरपत्रिकांच्या छायाप्रतींसाठी अर्ज करण्याची मुदत २४ डिसेंबर ते १२ जानेवारी आहे. अर्जासाठी इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी https.verification.mh-ssc.ac.in या लिंकवर, तर बारावीच्या विद्यार्थ्यांनी https.verification.mh-hsc.ac.in या लिंकचा वापर करावा, असे आवाहन डॉ. भोसले यांनी केले.

### निकालात औरंगाबाद विभागाची बाजी...

इयत्ता बारावीच्या विभागनिहाय निकालात औरंगाबाद विभागाचा सर्वाधिक २७.६३ टक्के निकाल लागला आहे. तर, सर्वात कमी निकाल कोकण विभागाचा १४.४२ टक्के लागला आहे. बारावीचा २०१८ मध्ये पुरवणी परीक्षेचा निकाल २२.६५ टक्के, तर २०१९ मध्ये निकाल २३.१७ टक्के लागला होता. इयत्ता दहावीच्या विभागनिहाय निकालात औरंगाबाद विभागाचा सर्वाधिक ३९.११ टक्के, तर सर्वात कमी निकाल नागपूर विभागाचा २९.५२ टक्के लागला आहे. दहावीचा २०१८ वर्षीचा निकाल २३.६६ टक्के, तर २०१९ वर्षीचा निकाल २२.८६ टक्के लागला.

Pune Edition
Dec 24, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# SPPU POSTPONES DATES FOR FIRST TERM PRACTICALS

**PUNE:** All the practicals, oral exams, seminars and project examinations for the first term in colleges affiliated to Savitribai Phule Pune University (SPPU) has been postponed to the second semester. The decision was taken by the SPPU's board of examination and evaluation which later issued a circular. As physical classroom lectures have not yet started by SPPU due to the Covid-19 pandemic, practicals and other teaching sessions are pending for students.

"Due to the Covid-19 pandemic, academic projects and other teachings that need laboratory have not started. Hence, it was decided that practicals, orals and other project works will be postponed to the second semester," said Mahesh Kakade, director of SPPU's board of examination and evaluation.

"Students need to fill up their examination forms in a regular way and give their consent about appearing for the respective semester's practical exams. All the results of the first and second semester will be declared online at the end of the semester," said Kakade.

Hindustan Times: 24.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# संरक्षण मंत्रालयातर्फे एनसीसी विद्यार्थ्यांसाठी डिजिटल व्यासपीठ

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २४ - देशभरात लाखोंच्या संख्येने असलेल्या एनसीसीच्या विद्यार्थ्यांना डिजिटल इंडिया मोहिमेशी जोडून घेण्यासाठी संरक्षण मंत्रालयातर्फे एक पाऊल टाकले आहे. मंत्रालयातर्फे विद्यार्थ्यांना व्यक्त होण्यासाठी 'डिजिटल फोरम' हे हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहे.

राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) महासंचालक कार्यालयातर्फे आयोजित कार्यक्रमात संरक्षण सचिव डॉ. अजयकुमार यांनी 'डीजी एनसीसी डिजिटल फोरमचे' लोकार्पण केले. याप्रसंगी एनसीसीचे महासंचालक लेफ्टनंट जनरल राजीव चोप्रा उपस्थित होते. देशभरातील एनसीसी छात्र या माध्यमातून त्यांचे उपक्रम, प्रशिक्षण, विविध कार्यक्रमांची माहिती तसेच विविध घडामोडींसंदर्भात आपली मते व्यक्त करण्याबरोबरच काही नावीन्यपूर्ण संकल्पनांचे सादरीकरण करू शकतील. छात्रांना डिजिटल मोहिमेशी जोडून घेण्यासाठी हा उपक्रम फायदेशीर ठरेल, अशी प्रतिक्रिया व्यक्त करत, डॉ. अजयकुमार यांनी करोनाकाळात एनसीसी छात्रांनी केलेल्या कामांचे कौतुक केले.

Prabhat: 25.12.2020

प्रभात पुणे, शुक्रवार, दि. २५ डिसेंबर २०२० ॥ ३

माध्यमिक शिक्षण संचालक दत्तात्रय जगताप यांची माहिती

# 'ईडब्लूएस'नुसार आरक्षणामुळे गुणवत्ता यादी स्थगित

**११वी प्रवेश प्रक्रियेत मराठा समाजातील विद्यार्थ्यांना लाभ मिळणार**

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २४ - इयत्ता अकरावी प्रवेशप्रक्रियेत मराठा समाजातील (एसईबीसी) विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचा (ईडब्लूएस) आरक्षणाचा लाभ देण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यानुसार दि. २६ डिसेंबरला एसईबीसी विद्यार्थ्यांना ईडब्लूएस किंवा खुला प्रवर्ग निवडण्यासाठी मुदत देण्यात आली आहे. या बदलामुळे गुरुवारी जाहीर होणारी विशेष फेरीची गुणवत्ता यादी स्थगित करण्यात आली आहे. त्याचे सुधारित वेळापत्रक संकेतस्थळावर जाहीर करण्यात येणार असल्याचे माध्यमिक शिक्षण संचालक दत्तात्रय जगताप यांनी सांगितले.

पुणे व पिंपरी-चिंचवड येथील कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये इयत्ता अकरावीची ऑनलाइन प्रवेशप्रक्रिया सुरू आहे. ११वीच्या एकूण तीन फेऱ्या पूर्ण झाल्या आहेत. सध्या, विशेष फेरीनुसार प्रवेश दिले जात आहे. गुरुवारी विशेष फेरीनुसार महाविद्यालय देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची यादी प्रसिद्ध होणार होती. परंतु, राज्य शासनाने मराठा समाजातील विद्यार्थ्यांना (एसईबीसी) आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचा लाभ देण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे या निर्णयाच्या आधारे अकरावी प्रवेशप्रक्रिया राबविण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला. अकरावी प्रवेश घेतलेल्या मराठा समाजातील विद्यार्थ्यांना ईडब्लूएस आरक्षणाचा लाभ दिला जाणार आहे. यासाठी विद्यार्थ्यांना ऑनलाइन अर्जामध्ये प्रवर्ग बदलण्याची मुभा देण्यात आली आहे.

दि. २६ डिसेंबरला हा बदल विद्यार्थ्यांना करायचा आहे. यापूर्वी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश रद्द करता येईल व विशेष फेरीसाठी लगेच अर्ज सादर करता येणार आहे.कनिष्ठ महाविद्यालयांनी देखील विद्यार्थी विनंतीनुसार प्रवेश रद्द करून द्यायचे आहेत. दि. ३१ डिसेंबरला महाविद्यालयांनी झालेले प्रवेश संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदवायचे आहेत. दि. १ जानेवारी २०२१ला रिक्त जागांचा तपशील जाहीर केला आहे.

**केवळ प्रवेशशुल्क घेण्याच्या सूचना...**

विद्यार्थ्यास घेतलेला प्रवेश रद्द करावयाचा असल्यास तशी विनंती संबंधित उच्च माध्यमिक विद्यालयास करावी आणि आपला प्रवेश रद्द करून घ्यावा. प्रवेश रद्द करण्यापूर्वी विद्यार्थ्यांनी शांतपणे विचार करावा. कारण प्रवेश प्रक्रियेच्या नियोजित फेऱ्यांपैकी ही अखेरची प्रवेश फेरी आहे. कोविड-१९ साथ रोग परिस्थिती, करोना विषाणू संसर्गाची शक्यता टाळण्यासाठी सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांनी त्यांचे प्रवेशशुल्क विद्यार्थ्यांकडून केवळ ऑनलाइन पद्धतीने जमा करून घ्यावे, अशा स्पष्ट सूचना शालेय शिक्षण विभागाने केल्या आहेत.

# प्रकल्पांअभावी 'प्लेसमेंट'वर परिणाम

**अविद्येचे 'प्रात्यक्षिक'**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्यातील कॉलेज बंद असल्याने, पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके, प्रकल्प, इंटर्नशिप करता येत नसल्याचा परिणाम थेट प्लेसमेंटवर होणार आहे. खासगी उत्पादन कंपन्या, आयटी कंपन्या, लघु-मध्यम उद्योगात उत्तम प्रकारचे कौशल्य; तसेच प्रॅक्टिकल नॉलेज असणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरीची संधी दिली जाते. मात्र, कॉलेज बंद असल्याने, विद्यार्थ्यांना नोकरीसाठी आवश्यक असणारे ज्ञान मिळत नसल्याचे चित्र आहे.

आता केवळ पुस्तकी ज्ञान मिळत असून, प्रकल्प, कौशल्यावर आधारित ज्ञान मिळत नसल्याची माहिती ऐश्वर्या पाटील या विद्यार्थिनीने दिली. 'नोकरीसाठी आवश्यक असणारे ज्ञानच मिळत नाही. आता नोकरी मिळण्यात अडचणी येणार नाहीत, याची काळजी सरकारने घ्यावी,' असे एमसीएला शिकणाऱ्या ऋषीकेशने सांगितले.

**उच्च व तंत्रशिक्षण विभाग मागे**

आयटीआयच्या विद्यार्थ्यांसाठी प्रात्याक्षिके महत्त्वाचे असते. नोकरीसाठी प्रात्याक्षिकांचे ज्ञान; तसेच कौशल्ये अधिक असणाऱ्या विद्यार्थ्यांना नोकरीच्या चांगल्या संधी उपलब्ध होतात. हा विचार करून व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने (डीव्हीईटी) गेल्या महिन्यापासून, राज्यातील आयटीआय सुरू केल्या. सुरक्षित अंतराचे नियम पाळून विद्यार्थ्यांना योग्य प्रॅक्टिकल नॉलेज; तसेच प्रशिक्षण देण्यात येत आहे. मात्र, अनेक व्यावसायिक अभ्यासक्रमांवर नियंत्रण ठेवणाऱ्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने अजूनही कोणताच निर्णय घेतलेला नाही.

**"इंजिनीअरिंगसारख्या अभ्यासक्रमांचा ४० टक्के सिलॅबस प्रात्यक्षिके आणि प्रकल्पांवर आधारित असतो. प्रकल्पांतून विद्यार्थ्यांना पुढे प्लेसमेंट उपलब्ध होते. यंदा ही प्रक्रिया थंडावल्याचा परिणाम प्लेसमेंटवर होणार आहे.**

– प्रा. विराज बर्गे, टीपीओ, झील कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग

Maharashtra Times: 25.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# सावित्रीबाई फुले यांची जयंती 'महिला शिक्षण दिन' म्हणून साजरी होणार!



मुंबई, दि. २४ - क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचा तीन जानेवारी हा जन्मदिवस हा राज्यातील सर्व माध्यमांच्या शाळांमध्ये सावित्रीबाई फुले महिला शिक्षण दिन म्हणून साजरा केला जाईल, अशी माहिती शालेय शिक्षणमंत्री प्रा. वर्षा गायकवाड यांनी दिली आहे. याबाबत मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय घेण्यात आला.

स्त्री शिक्षणातील क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे योगदान आणि त्यांचे कार्य समाजातील सर्व घटकांपर्यंत पोहोचविणे गरजेचे असल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला. या दिवशी शाळांमध्ये क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित भाषणे, निबंध, वक्तृत्व, परिसंवाद व एकांकिकांचे आयोजन करण्यात येईल. त्याचप्रमाणे, सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयांत, शाळेत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात येईल. त्यांच्या नावाने स्त्री शिक्षणात कार्यरत शिक्षिका, अधिकारी, सामाजिक कार्यकर्त्या यांना पुरस्कार देण्यात येईल, ऑनलाइन तसेच ऑफलाइन चर्चासत्र आयोजित केले जातील आणि समाजमाध्यमांवर मी सावित्री, महिला शिक्षण दिन असे हॅशटॅग वापरून नव्या पिढीला यात सामावून घेतले जाईल. अशी माहिती प्रा. गायकवाड यांनी दिली आहे.

Prabhat: 25.12.2020

# नववर्षात वाजणार शाळेची घंटा

**दि. ४ जानेवारीपासून नववी ते बारावीपर्यंतच्या शाळा सुरू करण्यास परवानगी**

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २४ - पुणे महानगरपालिका हद्दीतील नववी ते बारावीपर्यंतच्या शाळा दि. ४ जानेवारी २०२१ पासून सुरू होणार आहेत. याबाबतचे आदेश महापालिका आयुक्त विक्रमकुमार यांनी गुरूवारी काढले. वर्ग सुरू करताना शासनाच्या नियमांचे पालन करणे बंधनकारक असणार आहे. नववी ते बारावीचे वर्ग सुरू करण्याचा निर्णय राज्य सरकारकडून घेण्यात आला होता. करोनाची परिस्थिती पाहून शाळा सुरू करायच्या की नाही याबाबत निर्णय घेण्याचे अधिकार स्थानिक प्रशासनाला दिले होते.

करोनामुळे मार्चमध्ये संपूर्ण देशात लॉकडाऊन पुकारण्यात आला होता. त्यानंतर नऊ महिन्यांचा कालावधी उलटला तरीही अद्याप शाळा सुरू झालेल्याच नाहीत. शहरातील परिस्थिती पाहून शाळा दि. ३ जानेवारीपर्यंत सुरू न करण्याचा निर्णय महापालिकेकडून पाठीमागे घेण्यात आला होता. मात्र, आता परिस्थिती काहीशी नियंत्रणात असल्याने दि. ४ जानेवारीपासून नववी ते बारावीचे वर्ग सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे. (पान २ पहा) ▸▸

पान १ वरून

## नववर्षात वाजणार शाळेची घंटा

वर्ग सुरू करताना शासनाने घालून दिलेल्या अटींचे पालन शाळा आणि महाविद्यालयांना करावे लागणार आहे. शाळेत स्वच्छता राखणे तसेच निर्जंतुकीकरण करने बंधनकारक असणार आहे. विद्यार्थ्यांची थर्मल गनने तसेच पल्स ऑक्सिमीटरने तपासणी करणे आवश्यक आहे. शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची करोना चाचणी करणे बंधनकारक आहे. 'एका बाकावर एक' अशी बैठक व्यवस्था करावी लागणार आहे. विद्यार्थ्यांना शाळेत येण्यापूर्वी पालकांची लेखी संमती शाळा प्रमुखांना सादर करावी लागणार आहे. विद्यार्थ्यांच्या वाहतुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांचे दिवसातून किमान दोन वेळा निर्जंतुकीकरण करणे आवश्यक आहे. मास्कचा वापर करा, सुरक्षित अंतर ठेवणे आवश्यक आहे, याबाबत जनजागृती करणारे पोस्टर्स/स्टिकर्स शाळेच्या दर्शनी भागात लावणे आवश्यक आहे. शाळेत येण्या-जाण्याचे मार्ग निश्चित करणाऱ्या बाणाच्या खुणा करणे आवश्यक आहे, हे करण्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापनाची आहे. शाळा सुरू करण्याची पूर्व तयारी म्हणून शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दि. २८ डिसेंबरपासून शाळेत उपस्थित राहण्याच्या सूचना शाळांना कराव्या लागणार आहेत. महापालिकेकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या आदेशाचे पालन करण्यात यावे, असे आयुक्तांनी काढलेल्या आदेशात म्हटले आहे.

Prabhat: 25.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

Section: Education

# अकरावी प्रवेशाचे सुधारित वेळापत्रक जाहीर

**पुणे** : राज्य सरकारने सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील (एसईबीसी) विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून (ईडब्ल्यूएस) लाभ देण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार मराठा आरक्षण लागू असणाऱ्या विद्यार्थ्यांना ईडब्ल्यूएस प्रवर्ग किंवा खुला प्रवर्ग निवडण्यासाठी इयत्ता अकरावीच्या ऑनलाइन प्रवेशाच्या पोर्टलवर सुविधा उपलब्ध करून दिली असून त्याचे सुधारित वेळापत्रक संकेतस्थळावर जाहीर केले आहे. त्यामुळे प्रवेश प्रक्रियेतील विशेष फेरीअंतर्गत गुरुवारी जाहीर होणाऱ्या निवड यादीला स्थगिती देण्यात आली असल्याची माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयातर्फे देण्यात आली. सुधारित वेळापत्रकानुसार आता विशेष फेरीची निवड यादी (कॉलेज ऍलॉटमेंट) दि. २८ डिसेंबर रोजी जाहीर केली जाणार आहे.

प्रवेशातंर्गत विशेष फेरीची निवड यादी गुरुवारी सकाळी अकरा वाजता जाहीर होणार होती. मात्र नियोजित वेळेत ही यादी जाहीर न झाल्याने प्रवेशाच्या प्रतीक्षेत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रवेश प्रक्रिया राबविणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने विशेष फेरीतील निवड यादीला स्थगिती दिल्याची माहिती दुपारी संकेतस्थळावर अपडेट केली.

अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेतंर्गत एसईबीसीच्या विद्यार्थ्यांना ईडब्ल्यूएस वर्ग किंवा खुला प्रवर्ग निवडण्याची सुविधा प्रवेशाच्या पोर्टलवर उपलब्ध करून दिली असून त्याचे सुधारित वेळापत्रक संकेतस्थळावर जाहीर केले आहे. अकरावीच्या प्रवेशाची पुढील कार्यवाही सुधारित वेळापत्रकानुसार करावी आणि या वाढीव वेळेत बाकी असलेल्या विद्यार्थ्यांनाही अर्ज भरता येतील, असेही शिक्षण संचालनालयाने जाहीर केले आहे.

Kesari: 25.12.2020

# 'वाणिज्य'च्या विद्यार्थ्यांना कौशल्याभिमुख शिक्षणाची संधी

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व आयसीएआयमध्ये शैक्षणिक सामंजस्य करार

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व आयसीएआय यांच्यात शैक्षणिक सामंजस्य करार झाला आहे. याद्वारे वाणिज्य शाखेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक, तसेच अर्थविषयक कौशल्य, रोजगाराभिमुख शिक्षणाची संधी मिळणार आहे. तसेच शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना विविध औद्योगिक कंपन्या, सनदी लेखापाल संस्था यामध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेता येणार आहे. विद्यार्थी व प्राध्यापकांसाठी नवनवे उपक्रम, अभ्यासक्रम, मार्गदर्शन सत्रांद्वारे प्रशिक्षण देण्यास मदत होईल, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटस् ऑफ इंडिया (आयसीएआय) यांच्यात शैक्षणिक सामंजस्य करार झाला. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर आणि आयसीएआयचे उपाध्यक्ष सीए निहार जांबूसरिया यांनी या कराराचे आदानप्रदान केले. यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, आयसीएआयच्या केंद्रीय समितीचे सदस्य सीए चंद्रशेखर चितळे, एओएसएसजीचे अध्यक्ष डॉ. एस. बी. झावरे, डब्ल्यूआयआरसीचे अध्यक्ष सीए ललित बजाज, 'आयसीएआय' पुणे शाखेचे अध्यक्ष सीए अभिषेक धामणे, उपाध्यक्ष सीए समीर लड्डा, सचिव व खजिनदार सीए काशीनाथ पठारे, सीए यशवंत कासार, सीए मुर्तजा काचवाला, उद्योग-व्यवसाय समितीचे अध्यक्ष सीए राजेश शर्मा, सीए हंस राज चुग, एम. एस. जाधव, उदय गुजर, विद्यापीठातील नवोपक्रम, नावसंशोधन आणि साहचर्य मंडळाच्या संचालिका डॉ. अपूर्वा पालकर, सिनेट सदस्य प्रसेनजीत फडणवीस, वाणिज्य व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पराग काळकर आदी उपस्थित होते.

डॉ. नितीन करमळकर म्हणाले, समाजात होणारी स्थित्यंतरे विद्यापीठातही होणे गरजेचे आहे. कोविड काळात परीक्षा घेणे हीच एक मोठी परीक्षा होती. या काळात अनेक त्रुटींबद्दल विचार करायला वेळ मिळाला. वेगवेगळ्या इन्स्टिट्यूटच्या बरोबर करार करत आहोत.

Kesari: 25.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

Section: Education

# अकरावी विशेष फेरी यादीला स्थगिती

## मराठा आरक्षणातील विद्यार्थ्यांना आता अर्जात बदल करण्याची सुविधा



**पुणे, ता. २४** : राज्य सरकारने सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील (एसईबीसी) विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून (ईडब्ल्यूएस) लाभ देण्यास मान्यता दिली आहे. त्यानुसार मराठा समाजातील विद्यार्थ्यांना ईडब्ल्यूएस किंवा खुला प्रवर्ग निवडण्यासाठी अकरावीच्या ऑनलाइन प्रवेशाच्या पोर्टलवर सुविधा उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे प्रवेश प्रक्रियेतील विशेषफेरी अंतर्गत गुरुवारी जाहीर होणाऱ्या निवड यादीला (कॉलेज ॲलॉटमेंट) स्थगिती दिल्याची माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने दिली. सुधारित वेळापत्रकानुसार आता विशेष फेरीची निवड यादी सोमवारी (ता.२८) जाहीर केली जाणार आहे.

अकरावी प्रवेशातंर्गत विशेष फेरीची निवड यादी गुरुवारी सकाळी अकरा वाजता जाहीर होणे अपेक्षित होते. मात्र, ही यादी जाहीर न झाल्याने विद्यार्थ्यांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. प्रवेश प्रक्रिया राबविणाऱ्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने विशेष फेरीतील निवड यादीला स्थगिती दिल्याची माहिती दुपारी संकेतस्थळावर अपडेट केली.

अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेतंर्गत मराठा समाजाच्या विद्यार्थ्यांना ईडब्ल्यूएस किंवा खुला प्रवर्ग निवडण्याची सुविधा प्रवेशाच्या पोर्टलवर उपलब्ध करून दिली आहे.

### विद्यार्थी आणि पालकांसाठी सूचना...

- प्रवेश रद्द करायचा असल्यास तशी विनंती संबंधित महाविद्यालयास करावी
- प्रवेश रद्द करण्यापूर्वी शांतपणे विचार करावा, कारण ही अखेरची फेरी आहे
- या फेरीत सहभागासाठी ऑनलाइन संमती बंधनकारक आहे
- आपला पसंतीक्रम ऑप्शन फॉर्म भाग दोन वेळेत लॉक केल्याची खात्री करावी
- यापूर्वी अर्ज भरणे राहून गेलेल्यांनाही या वाढीव वेळेत अर्ज सादर करता येणार
- द्विलक्षी विषयांच्या प्रवेशाची कार्यपद्धती लवकरच जाहीर करण्यात येईल
- प्रवेशाचे अधिकृत संकेतस्थळ : https://११thadmission.org.in

### ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचे सुधारित वेळापत्रक (कालावधी : कार्यवाहीचा तपशील)

**२४ ते २६ डिसेंबर :**
- ईएसबीसी विद्यार्थ्यांनी ईडब्ल्यूएस किंवा खुला प्रवर्ग निवडणे.
- अंडरटेकिंग अपलोड करणे. अर्जाचा भाग एक भरून लॉक करून व्हेरीफाय करणे.
- इतर विद्यार्थ्यांनाही आपला अर्ज भाग-एक भरता येईल व त्यामध्ये बदलही करता येईल.
- यापूर्वी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश रद्द करता येईल व विशेष फेरीसाठी अर्ज सादर करता येईल.

**२७ डिसेंबर :**
- प्रवेशासाठी पसंतीक्रम नोंदविणे व लॉक करणे.
- यापूर्वी ऑप्शन फॉर्म भरला असल्यास त्यामध्ये बदल करता येतील.

**२८ डिसेंबर (सायंकाळी पाच वाजता) :**
- प्रवेशफेरीअंतर्गत प्रवेशासाठी निवड/गुणवत्ता यादी प्रदर्शित करणे.
- प्रवेशफेरीचे कट-ऑफ संकेतस्थळावर दर्शविणे.

**२९ ते ३१ डिसेंबर (सायंकाळी सहा वाजेपर्यंत) :**
- कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा असल्यास प्रोसिड फॉर ॲडमिशन करणे.
- महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे प्रवेश ऑनलाइन निश्चित करणे, घेतलेला प्रवेश रद्द करणे किंवा नाकारणे.
- व्यवस्थापन कोट्यासह इनहाऊस आणि अल्पसंख्याक कोट्यांतर्गत जागा येथून पुढे भरता येतील.

**३१ डिसेंबर (सायंकाळी आठ वाजेपर्यंत) :**
- झालेले प्रवेश संकेतस्थळावर नोंदविण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयांसाठी अतिरिक्त वेळ.

**०१ जानेवारी २०२१ :**
- प्रवेशाची विशेषफेरी पूर्ण झाल्यानंतर रिक्त जागांचा तपशील जाहीर करणे.

Sakaal: 25.12.2020

पुढारी

# विशेष फेरीची गुणवत्ता यादी स्थगित

## ईडब्ल्यूएस आरक्षणामुळे अर्जात बदलाची विद्यार्थ्यांना संधी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्य सरकारने सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील (एसईबीसी) विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून (ईडब्ल्यूएस) आरक्षणाचा लाभ देण्याचा निर्णय जाहीर केला आहे. त्यामुळे विशेष फेरीची गुणवत्ता यादी स्थगित करण्यात आली असून प्रवेशाचे सुधारित वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यामुळे मराठा आरक्षण लागू असणाऱ्या विद्यार्थ्यांना ईडब्ल्यूएस प्रवर्ग किंवा खुला प्रवर्ग निवडण्यासाठी प्रवेशाच्या पोर्टलवर सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

अकरावीच्या प्रवेशाची पुढील कार्यवाही सुधारित वेळापत्रकानुसार करावी आणि या वाढीव वेळेत बाकी असलेल्या विद्यार्थ्यांनाही अर्ज भरता येतील, असे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालयाने विशेष फेरीतील निवड यादीला स्थगिती देताना स्पष्ट केले आहे.

### प्रवेशप्रक्रियेचे सुधारित वेळापत्रक

**२४ ते २६ डिसेंबर**
- ईएसबीसी विद्यार्थ्यांनी ईडब्ल्यूएस किंवा खुला प्रवर्ग निवडणे.
- अंडरटेकिंग अपलोड करणे अर्जाचा भाग एक भरून लॉक करणे व व्हेरीफाय करून घेणे. (बदल करावयाचा नसल्यास अर्ज भाग एक अनलॉक करू नये.)
- या कालावधीत इतर विद्यार्थ्यांनाही आपला अर्ज भाग - एक भरता येईल, त्यामध्ये बदल करता येईल.
- यापूर्वी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश रद्द करता येईल व विशेष फेरीसाठी लगेच अर्ज सादर करता येईल.

**२७ डिसेंबर**

प्रवेशासाठी पसंतीक्रम नोंदविणे (भाग - दोन भरणे) व लॉक करणे.
- यापूर्वी ऑप्शन फॉर्म भरला असल्यास त्यामध्ये बदल करता येतील.

**२८ डिसेंबर**
- प्रवेश फेरी अंतर्गत प्रवेशासाठी निवड, गुणवत्ता यादी प्रदर्शित करणे.
- प्रवेश फेरीचे कट-ऑफ संकेतस्थळावर दर्शविणे.

**२९ ते ३१ डिसेंबर**
- विद्यार्थ्यांनी मिळालेल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घ्यायचा असल्यास प्रोसिड फॉर ॲडमिशन करणे.
- विद्यार्थ्यांनि मिळालेल्या महाविद्यालयात प्रवेश निश्चित करणे.
- महाविद्यालयाने विद्यार्थ्यांचे प्रवेश ऑनलाइन निश्चित करणे, घेतलेला प्रवेश रद्द करणे, तसेच प्रवेश नाकारता येणे.
- सर्व तीनही कोटांतर्गत प्रवेश सुरू राहतील. व्यवस्थापन कोट्यासह इनहाऊस आणि अल्पसंख्याक कोट्यांतर्गत जागा येथून पुढे भरता येतील, तसेच त्यांचे प्रत्यार्पण करता येईल.

**३१ डिसेंबर**
- झालेले प्रवेश संकेतस्थळावर नोंदविण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयांसाठी अतिरिक्त वेळ.

**१ जानेवारी**
- प्रवेशाची विशेष फेरी पूर्ण झाल्यानंतर रिक्त राहणाऱ्या जागांचा तपशील जाहीर करणे.

Pune Edition
Dec 25, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

## News Paper Clippings During December 2020

### Section: Education

# वाणिज्यच्या विद्यार्थ्यांना कौशल्याभिमुख शिक्षण

**विद्यापीठ आणि 'आयसीएआय'मध्ये करार**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व 'आयसीएआय' यांच्यात झालेल्या शैक्षणिक करारामुळे वाणिज्य शाखेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक; तसेच अर्थविषयक कौशल्य, रोजगाराभिमुख शिक्षणाची संधी मिळणार आहे. शिकतानाच विद्यार्थ्यांना औद्योगिक कंपन्या, सनदी लेखापाल संस्था यामध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेता येणार आहे. विद्यार्थी-प्राध्यापकांसाठी नवनवे उपक्रम, अभ्यासक्रम, मार्गदर्शन सत्रांद्वारे प्रशिक्षण देण्यास मदत होणार आहे, अशी माहिती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी गुरुवारी दिली.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ (एसीपीपीयू) आणि 'दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडिया' (आयसीएआय) यांच्यात शैक्षणिक करार झाला. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर आणि 'आयसीएआय'चे उपाध्यक्ष सीए निहार जांबुसरिया यांनी करारावर सह्या केल्या. या वेळी उपकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, 'आयसीएआय'च्या केंद्रीय समितीचे सदस्य सीए चंद्रशेखर चितळे, 'एओएसएसजी'चे अध्यक्ष डॉ. एस. बी. झावरे, 'आयसीएआय' पुणे शाखेचे अध्यक्ष सीए अभिषेक धामणे आदी उपस्थित होते. जांबुसरिया म्हणाले, 'पुस्तकी ज्ञानाला प्रात्यक्षिकांची जोड मिळायला हवी. यामुळे विद्यार्थी दशेपासूनच कंपन्यांमध्ये जाऊन काम करता येईल. त्यातून अनुभव संपन्नता वाढेल. सनदी लेखापालांनाही वाणिज्य शाखेत डॉक्टरेट व अन्य शिक्षण घेण्यासाठी नवे व्यासपीठ मिळेल.'

डॉ. उमराणी म्हणाले, 'विद्यापीठात ४० टक्के विद्यार्थी वाणिज्य शाखेचे आहेत. या करारामुळे विद्यार्थ्यांची कार्यक्षमता वाढेल. प्लेसमेंटसाठी मदत होईल. पाठ्यपुस्तक आणि प्रात्यक्षिक ज्ञान यामधील पोकळी भरून निघेल. प्राध्यापक आणि विद्यार्थी दोघांसाठी चांगले उपक्रम राबविण्यात येतील.'

Maharashtra Times: 25.12.2020

# पुण्यातील शाळा ४ जानेवारीपासून

## नववी ते बारावीचे वर्ग सुरू करण्याला परवानगी

पुणे, ता. २४ : राज्यातील जवळपास ७० टक्के शाळांमधील नववी ते बारावीचे वर्ग सुरू झाले असतानाच, आता पुण्यातील शाळा सुरू होण्याचा मार्ग खुला झाला आहे. पुणे महापालिका क्षेत्रामधील सर्व शाळांमधील नववी ते बारावीचे वर्ग ४ जानेवारीपासून सुरू करण्यात येणार आहेत, अशी माहिती महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी गुरुवारी दिली.

राज्यातील शाळांमधील नववी ते बारावीचे वर्ग २३ नोव्हेंबरला सुरू करण्यात आले आहेत. मात्र, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर महापालिका क्षेत्रातील सर्व शाळा सुरवातीला १३ डिसेंबरपर्यंत बंद राहतील, असे महापालिका प्रशासनाने जाहीर केले होते. त्यानंतर पुन्हा तीन जानेवारी २०२१ पर्यंत शाळा बंद राहतील, असा आदेश महापालिकेने १२ डिसेंबरला काढला होता.

**अशा आहेत मार्गदर्शक सूचना**

1. शाळेची स्वच्छता आणि निर्जंतुकीकरण करणे.
2. थर्मल स्कॅनर, ऑक्सिमीटर, जंतुनाशक अशा आवश्यक वस्तूंची उपलब्धता असेल याबाबत शाळा प्रशासनाने दक्षता घ्यावी.
3. शाळा वाहतूक सुविधांचे नियमित निर्जंतुकीकरण आणि त्याची शाळा व्यवस्थापनामार्फत पडताळणी आवश्यक.
4. सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची 'कोविड-१९'साठीची आरटीपीसीआर चाचणी बंधनकारक.
5. वर्गखोली तसेच स्टाफरूममधील बैठक व्यवस्था शारीरिक अंतराच्या नियमानुसार असावी.
6. वर्गामध्ये एका बाकावर एक विद्यार्थी याप्रमाणे बैठक व्यवस्था करावी.
7. शाळेच्या दर्शनी भागावर शारीरिक अंतर, मास्कचा वापर, याबाबत मार्गदर्शक सूचना असाव्यात.
8. विद्यार्थ्यांनी शाळेत उपस्थित राहण्यापूर्वी पालकांची लेखी सहमती शाळाप्रमुखांना किंवा पर्यवेक्षकांना सादर करावी.



आता महापालिका क्षेत्रातील सर्व शाळांमधील नववी ते बारावीचे वर्ग ४ जानेवारीपासून सुरू करण्याला परवानगी दिल्याचे आदेश विक्रम कुमार यांनी काढले आहेत. शाळा सुरू करण्याबाबत शालेय शिक्षण विभागाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक असेल, असेही त्यांनी आदेशात स्पष्ट केले आहे.

Sakaal: 25.12.2020

# अखेर शाळांची घंटा वाजणार

## चार जानेवारीपासून नववी ते बारावीचे वर्ग सुरू; पालकांची संमती हवी

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील महापालिका आणि खासगी शाळा अखेरीस चार जानेवारीपासून सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. इयत्ता नववी ते बारावीपर्यंतच्या शाळा सुरू होणार असून, विद्यार्थ्यांच्या उपस्थितीबाबत पालकांची लेखी संमती घेण्याचे बंधन शाळा प्रमुखांना घालण्यात आले आहे. पालकांनी दिलेली लेखी संमती माध्यमिक शिक्षण विभागाच्या शिक्षण पर्यवेक्षकांना पाठविण्यात यावी, असे महापालिका आयुक्त विक्रमकुमार यांनी आदेशात नमूद केले आहे.

मार्च महिन्यात लॉकडाउनचा निर्णय जाहीर झाल्यापासून बंद झालेल्या शाळा नवीन वर्षातच उघडणार आहेत. राज्य सरकारने नोव्हेंबर महिन्यात शाळा उघडण्यास परवानगी दिली होती. मात्र, मुंबई महापालिकेने शाळा लगेचच उघडण्यास दिलेला नकार, तसेच पालकांचाही फारसा सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने महापौर मुरलीधर मोहोळ आणि महापालिका आयुक्त विक्रमकुमार यांनी दोन वेळा शाळा सुरू करण्यास मुदतवाढ दिली होती. अखेरीस, या शाळा चार जानेवारीपासून सुरू करण्याचे आदेश देण्यात आले असून, शाळा प्रशासनास पुरेसा कालावधी मिळावा म्हणून हा निर्णय दहा दिवस आधी जाहीर करण्यात आला आहे. करोनाचा दुसरी लाट, ब्रिटनमधील नवीन करोना विषाणू, या पार्श्वभूमीवर पालकांकडून किती सकारात्मक प्रतिसाद मिळेल, याबाबत प्रशासनालाही शंका आहे. मात्र, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी पालकांच्या संमतीने शाळा सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**शाळांसाठी नियमावली**

- एका बाकावर एकच विद्यार्थी
- सरकारच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन बंधनकारक.
- शाळेत स्वच्छता, निर्जंतुकीकरण आवश्यक.
- शाळेत थर्मल गन, थर्मामीटर, पल्स ऑक्सिमीटर आवश्यक.
- शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची कोव्हिड चाचणी बंधनकारक.
- चाचणीचा अहवाल वैद्यकीय अधिकारी, क्षेत्रिय वैद्यकीय अधिकाऱ्यांना सादर करावा.
- विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या वाहनांचे सातत्याने निर्जंतुकीकरण गरजेचे.

**महाविद्यालये कधी सुरू होणार?**

एकीकडे शाळा सुरू करण्याची घोषणा करण्यात आलेली असताना महाविद्यालये कधी सुरू होणार, याबाबतचा संभ्रम अद्याप दूर झालेला नाही. व्यावसायिक व अन्य अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षाच्या प्रवेशाची प्रक्रिया अद्याप सुरू आहे. तर, दुसऱ्या व तिसऱ्या वर्षाचे विद्यार्थी मात्र गेली अनेक महिने घरीच आहेत. महाविद्यालये बंद असल्याने त्यांचे शिक्षण विस्कळित झाले आहे. आता शाळा सुरू करण्यात येत असताना महाविद्यालयांबाबतही सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

राज्य सरकारने नोव्हेंबर महिन्यात शाळा सुरू करण्यास परवानगी दिल्यानंतर पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील शाळा सुरू करायच्या की नाहीत, यावर जोरदार चर्चा झडली होती. करोनाची संभाव्य दुसरी लाट आणि मुंबई, ठाणे महानगरपालिकांनी तेथील शाळा बंद ठेवण्याचा निर्णय घेतल्याने पुणे आणि पिंपरी-चिंचवड या दोन्ही शहरांतही शाळा बंद ठेवण्याकडेच कल दिसत होता. या पार्श्वभूमीवर दोन्ही महानगरपालिकांनी त्यांच्या हद्दीतील खासगी आणि महापालिकांच्या शाळा १३ डिसेंबरपर्यंत बंदच ठेवण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे या शाळा १४ डिसेंबरला सुरू करायच्या की नाहीत, याचा निर्णय होणे अपेक्षित होते. पालकांकडून अपेक्षित प्रतिसाद न मिळाल्याने या शाळा पुन्हा तीन जानेवारीपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय झाला. आता अखेरीस या शाळा चार जानेवारीपासून सुरू होणार आहेत.

Maharashtra Times: 25.12.2020



## News Paper Clippings During December 2020

### Section: Education

# विद्यापीठ, आयसीएआय यांच्यात सामंजस्य करार

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** अर्थविषयक कौशल्य, रोजगाराभिमुख शिक्षण, प्राध्यापकांच्या कौशल्यवृद्धीसाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटन्ट्स ऑफ इंडिया यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य करारामुळे विद्यार्थ्यांना सनदी लेखापाल, कंपन्यांमध्ये प्रत्यक्ष कामाची संधी मिळू शकणार आहे.

सामंजस्य करारावेळी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, आयसीएआयचे उपाध्यक्ष नीहार जांबूसरिया, आयसीएआयच्या केंद्रीय समितीचे सदस्य चंद्रशेखर चितळे, डॉ. एस. बी. झावरे, आयसीएआयच्या पश्चिम विभागीय परिषदेचे अध्यक्ष ललित बजाज, आयसीएआय पुणे शाखेचे अध्यक्ष अभिषेक धामणे आदी या वेळी उपस्थित होते.

डॉ. करमळकर म्हणाले, विद्यापीठाने समाजाशी जोडले जाणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने विविध संस्थांसह आदानप्रदान झाले पाहिजे. या सहकार्यातून नवीन उपक्रमांना मूर्त स्वरूप येत आहे. नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने हे सकारात्मक पाऊल आहे.

विद्यार्थ्यांना रोजगारासाठी पुस्तकी ज्ञानासोबतच प्रत्यक्ष अनुभवाची जोड मिळायला हवी. या सामंजस्य करारामुळे विद्यार्थी शिकतानाच सनदी लेखापालांकडे, कंपन्यांमध्ये काम करू शकतील. सनदी लेखापालांनाही वाणिज्य शाखेत पीएच.डी.सारखे अभ्यासक्रम करण्याची संधी मिळेल, असे नीहार जांबूसरिया यांनी सांगितले.

लोकसत्ता Fri, 25 December 2020
https://epaper.loksatta.com/c/57298862

# Schools in PMC & PCMC areas to reopen for stds IX to XII from Jan 4

▶ Continued from Page 1

Pimpri Chinchwad municipal commissioner Shravan Hardikar said an order to allow reopening of schools from January 4 will be issued on Monday.

Before the November 23 reopening, the Maharashtra Rajya Shikshan Sanstha Mahamandal had demanded payment of pending non-salary grants to schools, payment of a lump sum as per students' strength for hygiene and filling up of class IV vacancies in schools.

Anubha Sahai, president of Indiawide Parents' Association, based in Pune, said parents would not be willing to send their children to school.

"There is a new strain of the virus and parents will not give their consent. Most parents and teachers are happy with online classes. In rural schools too, the attendance has been less than 50%. This reopening may lead schools' managements to extract more money from the parents for fumigation and sanitisation of campuses," she said.

Some principals said they would go with the PMC's decision.

"We will equip ourselves to conduct physical classes. But, we respect parents' decision to not send their children. We hope to build confidence and make parents trust the school's management," Jayashree Venkatraman, principal of SNBP International School, said.

After three weeks, the attendance of students in classes in the rural areas in standards IX, X and XII had almost doubled by mid-December. Pune district was a poor performer.

Of the 56 lakh students from over 22,200 schools, nearly 19% (10.6 lakh) were attending physical classes on Monday, data released by the Maharashtra State Council of Education Research and Training showed.

About 70% schools had reopened and the state education department was aiming at reopening all schools by the year-end.

But the poor attendance in Pune district schools could be attributed to students who had gone back to their villages and not returned as yet. In many cases, parents had come back to work but their children are still at their native places.

**RT-PCR TEST FOR ALL TEACHERS**

- Schools must keep thermal scanners, pulse oximeters, sanitisers, soap and water
- Ensure regular fumigation of school buses
- Physical distancing in classrooms and staff rooms
- Only one student on a bench with enough distance
- Display of posters on physical distancing, wearing masks
- Sign posts determining 6 feet distance in the corridors
- Arrows inside the campus to determine different ways to enter and exit classrooms and school
- Consent letter from students before allowing them inside
- Ventilation must, all windows and doors must be kept open at all times
- No classes inside closed classrooms
- Action against those flouting norms issued by PMC as per existing rules and regulations



The Times of India: 25.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# Women's edu day to be observed on Savitribai's b'day

**January 3 chosen to promote girls' education as Phule was a crusader of the cause, says edu min**

Sukhada.Khandge
@timesgroup.com
TWEETS @Sukhadak_Mirror


Gaikwad (R) said the decision was backed by the Cabinet members

In a bid to pay homage to social reformer and educationalist Savitribai Phule, who was born on January 3, 1831, and worked tirelessly towards educating young girls in the state, the day she was born has now been chosen to celebrate women's education in Maharashtra.

State education minister Varsha Gaikwad on Thursday declared that the move is aimed at giving due impetus to female education and providing them with equal opportunity as received by members of the opposite sex.

Commenting on the development, Gaikwad said, "The decision to observe January 3 as women's education day was well-thought out in the Cabinet. Phule was a crusader of female education and her efforts have touched every section of the society. It is only natural that we carry forward her rich legacy and impart her values among young girls. We will ensure that schools encourage children to celebrate the day with enthusiasm."

As part of the celebrations, the state school education department has asked academic institutes to organise various programmes such as hosting lectures on the topic, discussions and plays that revolve around girls' education.

All this while, January 3 was observed only as the birth anniversary of Phule in all government offices and educational institutes. The new directives will ensure women's education also gets focus from now on, bringing girls from rural corners into the fold of the celebrations.

Teachers and social workers working in the field of women's education will also be awarded on this day to ensure their work is recognised.

> **To make it more youth-friendly, we will circulate hashtags related to the cause**
> —Varsha Gaikwad, state education minister

"To make it more youth-friendly, we will circulate hashtags related to the cause. We encourage schools to stay flexible and hold the event online/offline depending on the mode of education offered," added Gaikwad.

Phule, the first female teacher the country can boast of and a fierce feminist figure of her time, not only encouraged girls to take up education, but also taught them to fight caste and gender discriminations.

Pune Mirror: 25.12.2020

# SPPU and ICAI sign MoU to further skill-oriented education for commerce students, faculty

EXPRESS NEWS SERVICE
PUNE, DECEMBER 24

VICE-CHANCELLOR of Savitribai Phule Pune University (SPPU), Nitin Karmalkar, on Thursday said that the university and the Institute of Chartered Accountants of India (ICAI) have signed an educational memorandum of understanding (MoU) to provide practical, employment and skill-oriented education to commerce students and faculty members.

"It will be helpful for extending academic cooperation for various commerce courses of the university, conducting faculty development programs for the staff, facilitating the process of students seeking jobs with CA firms and enhancing their knowledge through webinars and seminars," Karmalkar said. He was addressing mediapersons after exchanging the MoU with CA Nihar Jambusaria at JW Marriott, SB Road, Pune, on Thursday.

"Changes in the society need to take place in the university as well. Taking exams was a big challenge during the Covid-19 pandemic... We considered many errors during this period. We are signing MoUs with different institutes; this is a positive step in terms of new education policy implementation," Karmalkar added.

CA Nihar Jambusaria said, "The MoU with the university is a historic moment for the CA fraternity. It will enable students to work in companies while learning and enhance their experiences. It will also help CAs pursue post doctoral education."

"Forty per cent of students in the university are in the commerce stream. This MoU will help in their placements. The gap between theory and practical knowledge will be filled and better activities will be implemented for both faculty and students," said SPPU Pro Vice-Chancellor, NS Umrani.

The Indian Express: 25.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# FYJC admissions delayed yet again, allotment list date pushed to Dec 28 to accommodate quota admissions

ALIFIYA KHAN
PUNE, DECEMBER 24

DELAYED BY several months over the Maratha reservation issue and the subsequent court case, first year junior college (FYJC) admissions in the state, which started a couple of weeks ago, have once again hit a roadblock.

The state Education department has extended the Class XI admission schedule, yet again, by a few days. While Thursday was set to be the day for the display of allotments to junior colleges as per the first special round, the date has now been pushed to December 28.

The move followed a government notification released on Wednesday to allow SEBC (Socially and Educationally Backward Class) quota students to avail benefits of the EWS (Economically Weaker Section) Category.

Till now, three regular rounds of admissions to junior colleges have been completed, with three special rounds to follow. In the first two rounds, the SEBC quota was applied, but later, when the Supreme Court put a stay on the quota, the entire admission process came to a halt for over two months. A third round of admissions took place last week, when students who earlier applied under the SEBC quota were told to fill applications in the open quota.

However, on the day when the allotment list was to be displayed for Special Round 1, the Education department has once again stalled the process and stated that SEBC quota students now have the option of either applying through the open category or the EWS category.

According to the new timeline, students have until 5 pm on December 26 to select quota and fill Part I of online application forms. By 12pm on December 27, students have to fill the choice form and the allotment list will now be released on December 28. Students can secure their admissions until December 31, and the vacancy list for the next round of admissions would be displayed on January 1, 2021.

The Indian Express: 25.12.2020

# SEBC pupils can pick EWS, general quota

## Parents Say Delays To Hit FYJC Studies

Ardhra.Nair @timesgroup.com

**SPECIAL ROUND ALLOTMENT ON DECEMBER 28**

- SEBC students already admitted can also get their admissions cancelled and apply for the special round
- If a student applies for cancellation, junior colleges have been told to immediately process their application
- Even those who have not applied can do so in this round up to **December 26**
- However, SEBC students who want no changes need not unlock their part I form
- Students who have made changes, need to submit and lock the part II of their forms by **December 27**
- Special round allotment list will be declared online on **December 28**
- Students can see the collegewise cut-off list



**Pune:** Angry parents of students hoping to get admission to FYJC said the entire admission process this year seems to be on shifting grounds all the time. The CAP committee postponed the announcement of the special round merit list slotted for Thursday after the government resolution on December 23 to accommodate socially and educationally backward classes students in the EWS, and general categories.

Manika D'Silva, a parent of a standard XI student, said she was completely clueless about what the state government is doing with the admissions.

"This process is a complete mess, and if the government thinks it can wrap up standard XI in 3-4 months, and directly promote the students to standard XII, it would be making a bad mistake. The online classes the government has started for them is erratic. A link to join classes arrives at the organisers' whim. Standard XI is crucial for students to understand the basics on which their HSC education is based. The fundamentals of subjects is never going to be strong if they don't get enough teaching hours and time," she said.

The CAP committee said the special round allotment list will be declared online on December 28, where students would also be able to see the collegewise cut-off list.

The SEBC students who get allotted colleges in this round can process their admissions from December 29 by clicking on proceed for admission if they are ready to accept the allotted junior college.

They also need to confirm their admission in the junior college. If they want to cancel or reject their allotment, they need to do so by December 31.

"If a student wishes to cancel confirmed admission, they can request the concerned junior college. However, students should re-think before cancellation," Dattatray Jagtap, director of education, secondary & higher secondary, said.

Pratha Joshi, a standard XI student, said the situation was stressful and the government was not taking note of what students are going through.

"The government should look at our plight too. How are we supposed to cope with this vast syllabus in a short time. Even if they have to slash some syllabus and plan to cut more of it, our fundamentals will not be strong. Coping with standard XII without learning much in standard XI is difficult. The government must decide in favour of our future," Joshi said.

Vaishali Bafna, an education activist who knows about FYJC admissions, said many parents wanted to know when the process will be complete and when colleges will reopen. She said this year should have been declared a zero year.

"Completing the portion in such a short time is impossible. Standard XI is not like school. Students learn the basis of future education. The government should have put up structured online classes. When colleges open, there will be a huge pressure on both teachers and students to catch up," she said.

The Times of India: 25.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# FYJC admission postponed post GR on EWS category

**PUNE:** The online admission for first year junior college (FYJC) has been postponed by deputy director of education (DYDE), Pune on Thursday. After the Maratha community students, declared as socially and educationally backward class (SEBC) by the government, has been allowed to avail the benefits of the EWS by state government, the admission was postponed.

**Important dates**

Up to December 26 till 5 pm: SEBC students need to choose one of the EWS or general category, upload revised undertaking, lock their form and get the form verified. Up to December 27: Application form (Part-1) edit and choice filling or updating of option form (Part-2) for special round will start.

December 28: Display of allotment list for special round admissions, cut-off for admission. December 29 to 31: Students need to do confirmation of admission. January 1 - Vacancy list after completion of special round will be declared. HTC

Hindustan Times: 25.12.2020

# अंतिम वर्ष परीक्षा गोंधळाचा मुद्दा अधिसभेत गाजणार

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २५** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची अधिसभा (सिनेट) दि. ९ व १० जानेवारी रोजी होणार आहे. जूनमध्ये झालेल्या अर्थसंकल्पीय ऑनलाइन अधिसभेनंतर आता दोन दिवस प्रत्यक्ष अधिसभा होणार आहे. पहिल्यांदाच झालेल्या ऑनलाइन परीक्षा, त्यातील तांत्रिक त्रुटी हे मुद्दे यात गाजणार असल्याची चिन्हे आहेत.

जानेवारीमध्ये विद्यापीठाची अधिसभा घेण्यासाठी विद्यापीठाचे कुलपती व राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांची मान्यता घेण्यात आली. त्यासाठी विद्यापीठस्तरावर नियोजनही सुरू झाले आहे. वर्षातून दोनवेळा विद्यापीठाची अधिसभा घेतली जाते. गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये अधिसभा झाली. त्यानंतर करोना व लॉकडाऊनमुळे मार्चमध्ये आयोजित अर्थसंकल्पीय अधिसभा रद्द करावी लागली. त्यानंतर जूनमध्ये ऑनलाइन पद्धतीने ही अधिसभा झाली. त्यानंतर पहिल्यांदाच प्रत्यक्ष अधिसभा होणार आहे. यूजीसी व सुप्रीम कोर्टाच्या आदेशाने ऑनलाइन व ऑफलाइन दोन्ही माध्यमातून बहुपर्यायी पद्धतीने झालेल्या अंतिम वर्षांच्या परीक्षेतील गोंधळ गाजला होता. या पार्श्वभूमीवर येत्या अधिसभेत या परीक्षेतील तांत्रिक समस्या, निकालातील त्रुटी हे मुद्दे ऐरणीवर येणार असल्याची शक्यता आहे.

Prabhat: 26.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# पुणे विद्यापीठातर्फे निबंध स्पर्धा

**पुणे, दि. २५** - नवे शैक्षणिक धोरण अंमलबजावणी समिती, विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या वतीने विद्यापीठस्तरीय खुल्या निबंध स्पर्धेचे आयोजन १ जानेवारीपासून केले आहे. या स्पर्धेची घोषणा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी केली. ही स्पर्धा पदवीस्तरीय विद्यार्थी, पदव्युत्तर तथा संशोधक विद्यार्थी, शिक्षक, प्राचार्य, शिक्षणप्रेमी समाज प्रतिनिधी, पालक या सर्वांसाठी असणार आहे. सर्व घटकांना नव्या शैक्षणिक धोरणावर आधारित स्पर्धेचे विषय निश्चित केले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन विद्यापीठाने केले आहे.

Prabhat: 26.12.2020

१०|| प्रभात पुणे, शनिवार, दि. २६ डिसेंबर २०२०

# महाविद्यालये सुरू झाल्यानंतर प्रात्यक्षिक, तोंडी परीक्षा

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २५ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत यंदाच्या शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्राच्या प्रात्यक्षिक परीक्षा, तोंडी परीक्षा दुसऱ्या सत्राच्या परीक्षांसह घेण्यात येणार आहे. त्यामुळे आता महाविद्यालये सुरू झाल्यावर प्रात्यक्षिक आणि मौखिक परीक्षा होणार असल्याचे दिसून येत आहे.**

करोनामुळे अद्याप महाविद्यालये सुरू होऊ शकलेली नाहीत. त्यामुळे अभियांत्रिकी, वास्तुकला, विज्ञान अशा विविध अभ्यासक्रमांच्या प्रथम सत्राच्या प्रात्यक्षिक, तोंडी परीक्षा कशा होणार, असा प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने परिपत्रकाद्वारे प्रथम सत्राच्या प्रात्यक्षिक, तोंडी परीक्षा द्वितीय सत्राच्या परीक्षांबरोबर घेण्याचे निर्देश दिले आहेत. नियमित विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरताना ऑनलाइन अर्जाच्या प्रक्रियेत काहीही बदल न करता लेखी परीक्षांसह

**प्रथम सत्र विद्यार्थ्यांमधील संभ्रम विद्यापीठाकडून दूर**

प्रात्यक्षिक, तोंडी परीक्षांची माहिती प्रचलित पद्धतीनुसार भरावी.

तांत्रिक अडचणी येऊ नयेत यासाठी नियमित विद्यार्थ्यांचे प्रथम सत्रातील विद्यापीठ परीक्षांचे निकाल केवळ ऑनलाइन पद्धतीने जाहीर करण्यात येतील. तसेच प्रथम आणि द्वितीय सत्राच्या मूळ गुणपत्रिका एकत्रितरित्या द्वितीय सत्राच्या गुणपत्रिकांसह स्वतंत्रपणे एकाच महाविद्यालयात पाठवण्यात येतील. विषय राहिलेल्या (बॅकलॉग) विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक, तोंडी परीक्षा नेहमीप्रमाणे घेऊन त्यांचे निकाल प्रथम सत्राच्या लेखी परीक्षेनंतर जाहीर करण्यात येणार आहेत.

# कौशल्याभिमुख शिक्षणाची 'वाणिज्य'च्या विद्यार्थ्यांना संधी - डॉ. करमळकर

पुणे, दि. २५ (प्रतिनिधी) - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व 'आयसीएआय' यांच्यात झालेल्या शैक्षणिक सामंजस्य करारामुळे वाणिज्य शाखेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक, तसेच अर्थविषयक कौशल्य, रोजगाराभिमुख शिक्षणाची संधी मिळणार आहे. शिकतानाच विद्यार्थ्यांना विविध औद्योगिक कंपन्या, सनदी लेखापाल संस्था यामध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेता येणार आहे, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट्स ऑफ इंडिया (आयसीएआय) यांच्यात शैक्षणिक सामंजस्य करार झाला. कुलगुरू डॉ. नितीन करमळकर आणि 'आयसीएआय'चे उपाध्यक्ष सीए निहार जांबूसरिया यांनी या कराराचे आदानप्रदान केले, यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाला प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, 'आयसीएआय'च्या केंद्रीय समितीचे सदस्य सीए चंद्रशेखर चितळे, डॉ. एस. बी. झावरे, सीए ललित बजाज, सीए अभिषेक धामणे, सीए समीर लड्डा आदी उपस्थित होते.

डॉ. करमळकर म्हणाले, समाजात होणारी स्थित्यंतरे विद्यापीठातही होणे गरजेचे आहे. कोविड काळात परीक्षा घेणे हीच एक मोठी परीक्षा होती. या काळात अनेक त्रुटींबद्दल विचार करायला वेळ मिळाला. वेगवेगळ्या इन्स्टिट्यूटच्या बरोबर करार करीत आहोत. एकमेकांच्या सहकार्यातून नवीन उपक्रमांना मूर्त स्वरूप येत आहे.

Saamana: 26.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

Section: Education

# महाविद्यालये ५ जानेवारीपासून?

## सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांचे संकेत

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये येत्या पाच जानेवारीपासून सुरू करण्याबाबतचे नियोजन सुरू असल्याची माहिती कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी दिली. एकीकडे शहरात इयत्ता नववी ते बारावीच्या शाळा चार जानेवारीपासून सुरू होत असताना, महाविद्यालये का सुरू होत नाहीत, असा प्रश्न विद्यार्थ्यांकडून उपस्थित केला जात होता. त्याबाबत कुलगुरूंशी संपर्क साधला असता, त्यांनी ही माहिती दिली.

'महाविद्यालये सुरू करण्याबाबत समिती नेमण्यात आली होती. त्याचे काम लवकरच पूर्ण होऊन येत्या पाच जानेवारीपासून महाविद्यालये सुरू करण्याबाबत नियोजन सुरू आहे,' असे डॉ. करमळकर यांनी सांगितले. विद्यार्थ्यांचे ऑनलाइन शिक्षण सुरू असले, तरी महाविद्यालये बंद असल्याने विज्ञान, तंत्रज्ञान आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी आवश्यक प्रात्यक्षिके सध्या होत नाहीत. त्यामुळे या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. या अभ्यासक्रमांचे विद्यार्थी आणि प्राध्यापकांशी संवाद साधून 'महाराष्ट्र टाइम्स'ने याबाबतची वस्तुस्थिती वृत्तमालिकेद्वारे मांडली आहे. त्या पार्श्वभूमीवर, कुलगुरूंनी महाविद्यालये सुरू होण्याबाबतचे संकेत दिले आहेत.

दरम्यान, विद्यापीठाने महाविद्यालये सुरू करण्याबाबत समिती नेमून आठवडा उलटलेला असला, तरी समितीच्या अध्यक्षांना त्याबाबतचे पत्रच प्राप्त झालेले नसल्याची माहितीही समोर आली आहे. परिणामी, समितीला महाविद्यालये सुरू करण्याबाबत विद्यापीठ प्रशासनाला अहवाल देता येत नसल्याचे समितीचे म्हणणे आहे. शालेय शिक्षण विभागाने इयत्ता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी टप्प्याटप्प्याने शाळा उघडण्याचा निर्णय घेतला. मात्र, विद्यापीठ क्षेत्रातील पुणे, नगर व नाशिक जिल्ह्यातील कॉलेजांना अजूनही टाळे कायम आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाला असणाऱ्या; तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी सुरक्षित वावराचे नियम पाळून टप्प्याटप्प्याने कॉलेज सुरू करण्याची भूमिका तज्ज्ञांनी मांडली आहे. त्यामुळे महाविद्यालये सुरू करण्यासाठी नियमावली तयार करण्याबाबत विद्यापीठाने डॉ. व्ही. बी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच समितीही नेमली आहे. मात्र, डॉ. गायकवाड यांना समितीचे पत्रच मिळाले नसल्याने, याबाबत बैठका घेऊन कोणत्याच प्रकारची कार्यवाही करता येत नसल्याचे समोर आले आहे. विद्यापीठ प्रशासन महाविद्यालये सुरू करण्याबाबत गंभीर आहे का, असा प्रश्न यामुळे उपस्थित झाल्याची शैक्षणिक वर्तुळात चर्चा आहे.

अविद्येचे 'प्रात्यक्षिक'

**प्रत्यक्ष होऊ द्या प्रात्यक्षिक**

व्यावसायिक अभ्यासक्रमांची महाविद्यालये सुरू करण्याची मागणी



**... तर तातडीने बैठक आणि अहवाल**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून समितीबाबत पत्र मिळाल्यानंतर लगेचच बैठक घेऊन महाविद्यालये सुरू करण्याबाबत नियमावलीसोबतच अहवाल तयार करता येईल. मात्र, पत्रच मिळाले नसल्याने कोणत्याही प्रकारची कार्यवाही करता येत नाही. एकही बैठक अजून झालेली नाही. विद्यापीठाकडून पत्र मिळाले, की तत्काळ कार्यवाही करता येईल, असे समितीतर्फे सांगण्यात आले.

Maharashtra Times: 26.12.2020

# वेबसीरीजद्वारे उच्च शिक्षणाचे धडे

म. टा. विशेष प्रतिनिधी, पुणे



डॉ. भूषण पटवर्धन

> पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांना या वेबसीरीजची क्रेडिट घेता येतील. येत्या शैक्षणिक वर्षापासूनच हा प्रकल्प कार्यरत करण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे.
> – प्रा. डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

शिक्षणातील नीरसता दूर करण्यासाठी मनोरंजनात्मक आशयातून विद्यार्थ्यांपर्यंत विषय पोहोचविण्याचा अनोखा प्रकल्प सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात साकारतो आहे. 'सायन्स ऑफ योगा' आणि 'नॉलेज लीडर्स ऑफ एन्शंट भारत' या दोन वेबसीरीज विद्यापीठाच्या 'लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीम'वर (एलएमएस) उपलब्ध होणार असून, त्यावरून विद्यार्थ्यांना या दोन विषयांचा लघु अभ्यासक्रम पूर्ण करता येईल. याचे क्रेडिटही मिळणार आहेत; शिवाय कोणत्याही विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांना ते करता येतील.

विद्यापीठ अनुदान आयोगाचे उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनी शुक्रवारी 'मटा'च्या कार्यालयाला सदिच्छा भेट दिली. त्या वेळी त्यांनी याबाबत माहिती दिली. 'नव्या शैक्षणिक धोरणात ऑनलाइन शिक्षणावर ४० टक्के भर देण्यात यावा, असे सुचविण्यात आले आहे. सध्या करोनामुळे ऑनलाइन शिक्षण सुरू असले, तरी भारतात ते अजून उत्क्रांत होण्यास वाव आहे. मनोरंजन आणि शिक्षणाची सांगड घालून नवे प्रयोग करता येतील का, याचा विचार व्हायला हवा,' अशी भूमिका मांडून पटवर्धन यांनी विद्यापीठात साकारत असलेल्या प्रकल्पाची माहिती दिली.

योगावरील वेबसीरीजमध्ये विद्यार्थ्यांना योगासनांच्या शास्त्रीय माहितीबरोबरच त्याकडे वैज्ञानिक दृष्टिकोनातून कसे पाहायचे, याचे दर्शन घडणार आहे. 'नॉलेज लीडर्स'मध्ये पाणिनी, भास्कराचार्य, सुश्रुत, कौटिल्य, कणाद, चरक आदींच्या कार्याची ओळख करून दिली जाणार आहे. जुन्या काळातील ज्ञानाची माहिती करून घेण्याबरोबरच त्यातून भविष्याचा वेध घेण्याचे भान मिळावे, असा याचा उद्देश आहे. वेबसीरीजचा भाग पाहताना विद्यार्थ्यांना त्याबद्दलची मजकूर स्वरूपातील अधिक माहिती, सराव प्रश्न याकडे वळविण्यासाठीची सुविधा उपलब्ध असेल. दोन्ही सीरीज प्रत्येकी १० भागांच्या असून, प्रत्येक भागावर दोन तासांचे अध्ययन करता येईल. हे पूर्ण केल्यावर विद्यार्थ्यांना त्याचे क्रेडिट मिळणार आहेत. ज्येष्ठ दिग्दर्शक श्रीरंग गोडबोले या वेबसीरीजचे संकल्पक आणि सहनिर्माते आहेत. या वेबसीरीज प्रेक्षकांसाठी यू-ट्यूबवरही उपलब्ध करून देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

Maharashtra Times: 26.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

Section: Education

# 'सीईटी'ची काठिण्यपातळी 'जेईई मेन', 'नीट'प्रमाणे

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्य सामाइक प्रवेश परीक्षा कक्षाद्वारे (सीईटी सेल) इंजिनीअरिंग, फार्मसी, कृषीच्या पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक असणाऱ्या एमएचटी सीईटी २०२१चा सिलॅबस जाहीर करण्यात आला आहे. शालेय शिक्षण विभागाने कमी केलेल्या सिलॅबसवर यंदाची परीक्षा होणार आहे. सीईटी परीक्षेत २० टक्के प्रश्न अकरावीच्या अभ्यासक्रमावर, तर बारावीच्या ८० टक्के अभ्यासक्रमावर परीक्षा होणार आहे. त्याचप्रमाणे प्रश्नांची काठिण्यपातळी 'जेईई मेन' आणि 'नीट' परीक्षेप्रमाणे राहणार आहे.

सीईटी सेलकडून विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सीईटी प्रवेश परीक्षांचे सिलॅबस जाहीर करण्यात आले आहेत. करोनाच्या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण विभागाने इयत्ता पहिली ते बारावीचा अभ्यासक्रम २५ टक्क्यांनी कमी केला आहे. हा २५ टक्के अभ्यासक्रम वगळून उर्वरित ७५ टक्के सिलॅबसवर परीक्षा होणार आहे.

परीक्षेत निगेटिव्ह मार्किंग नसेल; तसेच संपूर्ण परीक्षा एमसीक्यू प्रश्नांवर होणार आहे. पीसीएम गटाची परीक्षा फिजिक्स, केमिस्ट्री, मॅथ्स, अशा विषयांवर, तर पीसीबी गटाची परीक्षा फिजिक्स, केमिस्ट्री, बायोलॉजी अशा विषयांवर होणार आहे. संपूर्ण सिलॅबस सीईटी सेलच्या www.mahacet.org वेबसाइटवर देण्यात आला आहे.

**एमबीए, एमसीएचाही सिलॅबस जाहीर**

सीईटी सेलने एमएचटी सीईटीसोबतच एमबीए, एमसीए, एम-एचएमसीटी, बी-एचएमसीटी, एम-आर्च अशा अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी आवश्यक असणाऱ्या सीईटी परीक्षांचे सिलॅबस जाहीर केला आहे. त्याची माहिती सीईटी सेलच्या वेबसाइटवर प्रकाशित करण्यात आली आहे.

Maharashtra times: 26.12.2020

पुढारी

# उच्च, तंत्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेशप्रक्रियेसाठी मुदतवाढ

## सुधारित वेळापत्रक सीईटी संकेतस्थळावर, कॅपचा तपशील जाहीर

पुणे : पुढारी वृत्तसेवा

सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) प्रवर्गातील घटकांना खुल्या प्रवर्गातील अर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा (ईडब्ल्यूएस) लाभ देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनाही त्याचा लाभ मिळावा यासाठी शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अभ्यासक्रमनिहाय ऑनलाइन अर्ज करण्यास मुदतवाढ दिली आहे.

सीईटी सेलने सुधारित वेळापत्रक संकेतस्थळावर जाहीर केले आहे. त्यानुसार फार्मसी, अभियांत्रिकी (बीई, बीटेक), एमसीए, एमबीए, हॉटेल मॅनेजमेंट, आर्किटेक्चर, एमई, एलएलबी यासारख्या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत ऑनलाइन अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.

याआधीही अनेक तांत्रिक अडचणी विद्यार्थ्यांना येत असल्याने आठवडाभराची मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र, २२ ते २५ डिसेंबरदरम्यान यातील अनेक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची मुदतवाढ संपत असल्याने आणखी काही दिवस मुदत वाढवून देऊन विद्यार्थ्यांना दिलासा देण्यात आला आहे.



एमबीए, एमएमएस, बी.आर्क, एम.आर्क, हॉटेल मॅनेजमेंट, एमसीए
**२९ डिसेंबर**

बीई, बीटेक, बी.फार्मसी, एम.फार्मसी, एमई, एमटेक, मास्टर ऑफ हॉटेल मॅनेजमेंट, डीएसई, डीएसपी
**३० डिसेंबर**

या तारखांनुसार अभ्यासक्रमांसाठी नोंदणी करता येणार आहे.

Pune Edition
Dec 26, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# विद्यार्थी-शिक्षकांना भेटण्याची उत्सुकता

## नववी ते बारावीचे वर्ग सुरू करण्यासाठी शाळांकडून तयारी सुरू

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील नववी ते बारावीचे वर्ग सुरू करण्याच्या निर्णयाचे शाळांकडून स्वागत करण्यात आले आहे. विद्यार्थी शाळेत येण्यापूर्वी करोना प्रतिबंधक तयारी शाळांकडून करण्यात येत आहे, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष भेटण्यासाठी शिक्षकांमध्येही उत्सुकता आहे.

राज्यभरातील नववी ते बारावीचे वर्ग २३ डिसेंबरपासून सुरू झाले. मात्र करोना संसर्गामुळे खबरदारीचा उपाय म्हणून पुणे महानगरपालिकेने शहरातील शाळा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला होता. अखेरीस ४ जानेवारीपासून नववी ते बारावीचे वर्ग सुरू करण्यास परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे शाळा व्यवस्थापनांकडून निर्जंतुकीकरण, सुरक्षित अंतराच्या दृष्टीने बैठक व्यवस्था, शिक्षक-शिक्षके तर कर्मचाऱ्यांच्या करोना चाचण्या आदी उपायांची तयारी करण्यात येत आहे.

ज्ञान प्रबोधिनीचे मुख्याध्यापक मिलिंद नाईक म्हणाले, की करोना प्रतिबंधक सर्व तयारी झालेली आहे. विद्यार्थ्यांना वर्गात शिकवण्यासह ऑनलाइन वर्ग सुरूच ठेवले जातील. शाळा उशिरा सुरू होत असल्या, तरी सकारात्मकतेने आता शिक्षण प्रक्रिया पूर्वपदावर आणण्याचा प्रयत्न आहे. मुलांनी एकमेकांना भेटणे, त्यांच्यातील संवाद, प्रात्यक्षिक, संगीत-कला असे गटाने करायचे उपक्रम, मुलांच्या मानसिकतेवर काम करणे यावर भर देण्याचा प्रयत्न आहे.

कात्रजच्या अभिनव एज्युकेशन सोसायटीच्या इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका वर्षा शर्मा म्हणाल्या, की नववी ते बारावीचे वर्ग सुरू करण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. वर्गातील शिक्षणासह ऑनलाइन वर्गही सुरू ठेवले जातील. विशेषतः दहावी-बारावीच्या प्रात्यक्षिकांना प्राधान्य, पूर्वपरीक्षा, उजळणीवर भर दिला जाईल. ऑनलाइन शिक्षणात विद्यार्थ्यांची लिहिण्याची सवय कमी झालेली असल्याने लिहिण्याचा सराव करून घेतला जाईल.

मोठ्या खंडानंतर विद्यार्थी प्रत्यक्ष शाळेत येणार असल्याने त्यांच्याशी संवाद साधला जाईल. मुलांना एकमेकांशी संवाद साधण्यासाठीही वेळ द्यावी लागेल. तसेच अभ्यासाबाबतच्या एकूण नियोजनाबाबत पुढील काही दिवसांत ठरवता येऊ शकेल, असे अक्षरनंदन शाळेच्या लारा पटवर्धन यांनी सांगितले.

शाळा सुरू होत आहेत, ही अतिशय चांगली बाब आहे. सर्व शिक्षक विद्यार्थ्यांना भेटायला आणि शाळेत येण्यासाठी विद्यार्थीही उत्सुक आहेत. ऑनलाइन शिक्षणाचा आता कंटाळा आल्यासारखे झाले आहे. शाळा सुरू झाल्यावर ऑनलाइन शिक्षणाची सुविधा नसलेले विद्यार्थीही प्रवाहात येतील. दहावीच्या विद्यार्थ्यांची परीक्षा डोळ्यासमोर ठेवून त्यांच्या अभ्यासावर भर दिला जाईल, असे टिळक रस्त्यावरील न्यू इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका मनीषा मिनोचा म्हणाल्या.

लोकसत्ता Sat, 26 December 2020
https://epaper.loksatta.com/c/57295831

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# शिक्षकाला प्रतिष्ठा मिळाली नाही तर देश कसा घडणार ?

## डॉ. रघुनाथ माशेलकर : देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते 'अटल संस्कृती गौरव' पुरस्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : "शिक्षकांना समाजात पूर्वीसारखी प्रतिष्ठा मिळायला हवी, असे अटलजींना नेहमी वाटायचे. सध्या नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी राज्य सरकारने स्थापन केलेल्या समितीचा मी अध्यक्ष आहे. त्यात शिक्षकांना प्रतिष्ठा देण्यावर भर देण्यात येणार आहे. शिक्षकांना प्रतिष्ठा मिळाली नाही तर देश कसा घडणार," असा प्रश्न ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी उपस्थित केला.

संस्कृती प्रतिष्ठानतर्फे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त यंदाचा 'अटल संस्कृती गौरव पुरस्कार' माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते डॉ. माशेलकर यांना शुक्रवारी (दि. २५) प्रदान करण्यात आला. प्रतिष्ठानचे अध्यक्ष महापौर मुरलीधर मोहोळ, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील, खासदार गिरीश बापट, सिद्धार्थ शिरोळे, गायिका पद्मजा फेणाणी-जोगळेकर, वैशाली माशेलकर, 'संवाद'चे सुनील महाजन आदी या वेळी उपस्थित होते.



यंदाचा 'अटल संस्कृती गौरव पुरस्कार' देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते डॉ. रघुनाथ माशेलकर यांना शुक्रवारी प्रदान करण्यात आला.

माशेलकर म्हणाले, "सीएसआरला लौकिक मिळण्याचे संपूर्ण श्रेय अटलजींना जाते. परिवर्तन करताना कठीण निर्णय घ्यावे लागतात आणि त्याला राजकीय पाठिंबा लागतो. अटलजींनी केवळ पाठिंबाच नाही, तर संपूर्ण स्वातंत्र्य दिले. आजपर्यंत १७ माशेलकर समित्या स्थापन झाल्या. सरकार अडचणीत असते, तेव्हा माशेलकर समिती स्थापन करते, असे अटलजी म्हणाले होते. पोखरण येथील अणुचाचणीनंतर भारताला खऱ्या अर्थाने तंत्रज्ञानातील स्वातंत्र्य मिळाले. ११ मे हा तंत्रज्ञान दिवस म्हणून घोषित करण्याचा निर्णयही अटलजींचाच होता."

मिलिंद कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन केले. मुरलीधर मोहोळ यांनी प्रास्ताविक केले. सुनील महाजन यांनी आभार मानले.

### गीत नया गाता हूँ...

- अटलबिहारी वाजपेयी यांच्या कवितांवर आधारित 'गीत नया गाता हूँ' हा गीत, संगीत आणि नृत्यावर आधारित दृकश्राव्य कार्यक्रम या वेळी झाला.
- ज्येष्ठ गायिका पद्मजा फेणाणी-जोगळेकर यांनी यात अटलबिहारी वाजपेयी यांच्या कविता सादर केल्या. अभिनेत्री भार्गवी चिरमुले यांनी नृत्य सादर केले.

शेतकऱ्याला आता शेतमालाच्या थेट विक्रीचा अधिकार मिळाला आहे. कोणत्याही आडत्याशिवाय त्यांना जगभरातील बाजारपेठ खुली झाली आहे. तरुणांनी सुरू केलेल्या स्टार्ट-अपमुळे हे शक्य झाले. या धोरणाचे श्रेय डॉ. माशेलकर सरांना जाते.

- देवेंद्र फडणवीस

Lokmat: 26.12.2020

# शिक्षण घेतानाच मिळेल कामाचे प्रशिक्षण; विद्यापीठ-आयसीएआय सामंजस्य करार

## नितीन करमळकर : लेखापाल संस्थेत प्रत्यक्ष कामाचा अनुभव

पुणे : 'सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंट्स ऑफ इंडिया (आयसीएआय) यांच्यात शैक्षणिक सामंजस्य करार झाला असून, विद्यार्थ्यांना शिक्षण सुरू असताना विविध औद्योगिक कंपन्या, सनदी लेखापाल संस्था यामध्ये प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेता येणार आहे. तसेच वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक, तसेच अर्थविषयक कौशल्य, रोजगाराभिमुख शिक्षणाची संधी मिळणार आहेत, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी केले.

पुणे विद्यापीठ व आयसीएआय यांच्यात झालेल्या शैक्षणिक सामंजस्य करारावर गुरूवारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर आणि 'आयसीएआय'चे उपाध्यक्ष सीए निहार जांबूसरिया यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

यावेळी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, वाणिज्य व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. पराग काळकर 'आयसीएआय'च्या केंद्रीय समितीचे सदस्य सीए, चंद्रशेखर चितळे, 'एओएसएसजी' चे अध्यक्ष डॉ. एस. बी. झावरे, 'डब्ल्यूआयआरसी' चे अध्यक्ष सीए ललित बजाज, 'आयसीएआय' पुणे शाखेचे अध्यक्ष सीए अभिषेक धामणे, उपाध्यक्ष सीए समीर लड्डा आदी उपस्थित होते.

डॉ. एन. एस. उमराणी म्हणाले, विद्यापीठात सुमारे ४० टक्के विद्यार्थी वाणिज्य शाखेचे असून या करारामुळे विद्यार्थ्यांची कार्यक्षमता वाढेल. प्लेसमेंटसाठी मदत होईल.

समाजात होणारी स्थित्यंतरे विद्यापीठातही होणे गरजेचे आहे. कोरोना काळात अनेक त्रुटींबद्दल विचार करायला वेळ मिळाला. सध्या वेगवेगळ्या इन्स्टिट्यूटच्या बरोबर करार करत आहोत. नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने हे सकारात्मक पाऊल आहे.

-डॉ. नितीन करमळकर

Lokmat: 26.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# SPPU signs MoU with CA institute to help pupils

TIMES NEWS NETWORK

**Pune:** The Savitribai Phule Pune University (SPPU) has signed a memorandum of understanding (MoU) with the Institute of Chartered Accountants of India (ICAI) to help students at the university pursuing commerce, to gain industry experience with accountants.

The move is supposed to help with skill development of the university faculty as well. The agreement was signed at a city hotel on Thursday by Nitin Karmalkar, the vice-chancellor of SPPU, and officials of the ICAI, including Nihar Jambusaria, the vice-president of ICAI, along with functionaries of regional, state and local chapters of the ICAI.

"The MoU will provide practical, skill and employment oriented education to commerce students and faculty. It will be helpful to extend academic cooperation for various commerce courses, conduct faculty development programmes, help students seeking jobs with CA firms and enhance skill sets of students through webinars and seminars. We are signing MoU's with different institutes and this is a positive step towards new education policy implementation," said Karmalkar.

File photo



SKILL DEVELOPMENT

The Times of India: 26.12.2020

# Admission to professional courses delayed, yet again

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** The last dates to register for admission to all professional courses in the state have now been revised to December 29 or 30, depending on the course. The extension has been issued following a government resolution on December 23, seeking to accommodate socially and educationally backward classes students in the EWS and general categories.

Students and parents are unhappy with the frequent postponing of admission process. Many say that the students, who had their hopes pinned on state colleges, would suffer in comparison to the ones admitted in deemed university colleges where the academic year started online in September-October.

Kshitij Salunke, an engineering aspirant, said he had been allotted a college via JEE marks but didn't take it up as he wanted to wait for admission in a state college. "However, there has been a huge delay. Many of my friends who are in private universities say that their classes have already started. As there has been no allotment yet, none of us has joined any tuition classes either," Salunkhe said.

Soham Dhumane, another engineering aspirant, said his parents are extremely frustrated with the delay and keep wondering when the academic year will start. "The process had been delayed twice already," Dhumane said.

Yash Kulkarni, a student, has added concerns.

"The other colleges, especially the deemed universities, have gone really ahead. Some of my friends who go to these colleges have their term-end examinations next week and here we are, yet to even get first merit list. My biggest concern is how the colleges will finish the syllabus. There is a huge chance that the teachers will now try to rush through the syllabus, hoping to complete it as soon as possible. Engineering syllabus is very vast and tough. With poor fundamental knowledge, it will be very hard for us to study the subjects in the coming years. All of us were already stressed when the CET exams got delayed and now this extension is really frustrating," Kulkarni said.

### DATES TO REMEMBER

- MBA/MMS, BArch, MArch, BHMCT, MCA — DEC 29 2020
- BE/BTech, BPharmacy, MPharmacy, ME/MTech, MHMCT, DSE, DSP — DEC 30 2020

(Last date for application)

- The deadline has been revised for the second time now

**WHY THE EXTENSION?**

- The state on Wednesday decided that socially and educationally backward classes will be eligible to avail the reservation benefits extended to the economically weaker section (EWS) category
- The deadline was extended to allow colleges to accommodate the necessary changes

### GR puts off FYJC process too

The government resolution (GR) on December 23 said socially and educationally backward classes students can choose one of the Economically Weaker Section (EWS) or general categories in their application forms for FYJC. It postponed the special merit list, which will now be announced on Monday. The postponement is likely to move the next round of admissions to 2021. Angry parents of students hoping to get admission to FYJC said the entire admission process this year seems to be on shifting grounds all the time. Students said the situation was stressful and the state was not taking note of what they are going through. TNN

The Times of India: 26.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education



सदाशिव पेठ : बारावीपर्यंतच्या शाळा सुरू करण्याचे आदेश सरकारने व महापालिकेने दिल्यानंतर महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीच्या भावे हायस्कूलमधील वर्गखोल्यांच्या स्वच्छतेचे काम शुक्रवारी सुरू करण्यात आले.

# शाळांची तयारी अंतिम टप्प्यात

## कोरोना चाचणी, निर्जंतुकीकरण पुन्हा करावे लागणार

पुणे, ता. २५ : तब्बल नऊ महिन्यांच्या प्रतीक्षेनंतर आता नव्या वर्षात म्हणजेच जानेवारी २०२१ मध्ये शहरातील शाळा सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी शाळांची तयारी अंतिम टप्प्यात आली असून, जवळपास ७० ते ८० टक्के तयारी पूर्ण झाली आहे. आता केवळ शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पुन्हा कोरोना चाचणी आणि शाळेचे निर्जंतुकीकरण एवढेच काम बाकी आहे.

महापालिका क्षेत्रातील सर्व शाळांमधील नववी ते बारावीचे वर्ग ४ जानेवारीपासून सुरू करण्यास महापालिका आयुक्त विक्रम कुमार यांनी परवानगी दिली आहे. या पार्श्वभूमीवर शहरातील शाळांमधील तयारीचा प्रातिनिधिक स्वरूपात आढावा घेतला असता, शाळा पुन्हा सुरू करण्याची तयारी अंतिम टप्प्यात आल्याचे दिसून येते. राज्य सरकारने २३ नोव्हेंबरपासून राज्यातील शाळा सुरू होणार असल्याचे जाहीर केले. त्यावेळीच सर्व शाळा व्यवस्थापनाने शाळा पुन्हा सुरू करण्याची तयारी केली होती. परंतु १३ डिसेंबरपर्यंत महापालिका क्षेत्रातील शाळा बंद राहतील, असा निर्णय महापालिकेने जाहीर केला. त्यानंतर १४ डिसेंबरला शाळा सुरू होतील, या आशेने शाळांनी यापूर्वी केलेल्या तयारीचा पुन्हा आढावा घेतला. मात्र, पुन्हा महापालिकेने ३ जानेवारीपर्यंत शाळा बंद राहतील, असा आदेश काढला. त्यानंतर गुरुवारी महापालिकेने ४ जानेवारीपासून शाळा सुरू करण्यास मान्यता दिली आणि शाळांनी यापूर्वी केलेल्या तयारीचा पुन्हा आढावा घेण्यास सुरवात केली. यापूर्वी कोरोना चाचणी केली असली, तरीही कर्मचाऱ्यांना आता पुन्हा चाचणी करावी लागणार आहे.

**आरोग्याची काळजी घेणार**

- विद्यार्थ्यांची आसन व्यवस्था
- सॅनिटायझर, थर्मामीटर, ऑक्सिमीटर अशा उपकरणांचे संकलन
- प्रत्येक वर्गात काय-काय आणि कसे शिकवायचे याचे वेळापत्रक
- ऑफलाइन आणि ऑनलाइन वर्ग एकाच वेळी सुरू ठेवण्याचे नियोजन
- आरोग्याच्या सुरक्षिततेबाबत संदेश फलक

**शाळांना हे पुन्हा करावे लागणार**

- संपूर्ण शाळेचे निर्जंतुकीकरण
- शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची कोरोना चाचणी
- पालकांचे संमती पत्र

येत्या दोन दिवसांत शिक्षकांची बैठक घेतली जाईल. तसेच शिक्षकांमार्फत प्रत्येक वर्गातील पालकांची ऑनलाइन बैठक होईल. त्या वेळी पालकांना शाळा सुरू करण्याबाबतच्या सूचना दिल्या जातील.
- संजीवनी ओमासे, मुख्याध्यापिका, नूतन मराठी विद्यालय (मुलांचे)

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी सॅनिटायझर, थर्मामीटर, ऑक्सिमीटर अशी आवश्यक उपकरणे यापूर्वी शाळेत संकलित केली आहेत. त्याशिवाय विद्यार्थ्यांना वर्गात कसे बसवायचे, अभ्यासक्रमाचे वेळापत्रक कसे असेल, विद्यार्थ्यांना दिवसाआड शाळेत बोलवत असतानाच उर्वरित विद्यार्थ्यांच्या ऑनलाइन तासिका, याबाबत नियोजन झाले आहे. त्यामुळे शाळा पुन्हा सुरू करण्याची ७० टक्के तयारी पूर्ण झाली आहे.
- जालिंदर भागवत, मुख्याध्यापक, गेनबा सोपानराव मोझे प्रशाला (माध्यमिक विभाग)

Sakaal: 26.12.2020



# शुल्ककपातीला ठेंगा

## 'एफआरए'च्या आवाहनाला महाविद्यालयांचा प्रतिसाद शून्य

सकाळ EXCLUSIVE

पुणे, ता. २५ : 'कोरोना'च्या काळात पालकांची आर्थिक स्थिती नाजूक झाल्याने व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थांनी शुल्ककपात करून विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा, असे आवाहन शुल्क प्राधिकरण समितीने (फी रेग्युलेशन अँथॉरिटी-एफआरए) केले होते. मात्र राज्यभरातील महाविद्यालयांनी या आवाहनाला ठेंगा दाखवला आहे. राज्यभरात केवळ वाशीतील एका महाविद्यालयाने ५ हजार रुपये शुल्क कमी केले आहे.

**महाराष्ट्रातील व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था**

| अभ्यासक्रम | महाविद्यालय संख्या | विद्यार्थी क्षमता |
|---|---|---|
| अभियांत्रिकी | ३६३ | १५०७७७ |
| हॉटेल मॅनेजमेंट | १४ | १०६२ |
| एमबीए | ३१६ | ८७८८१ |
| एमसीए | ९९ | ७१३८ |
| फार्मसी | ११४ | ११४७१ |

'सीईटी सेल'तर्फे सध्या अभियांत्रिकी, एमबीए, आर्किटेक्चर, फार्मसी, एमसीए, हॉटेल मॅनेजमेंट यांसह इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या पदवी व पदव्युत्तर पदवीचे प्रवेश प्रक्रिया राबवली जात आहे. महाविद्यालये जानेवारी महिन्यात प्रवेशाची पहिली फेरी संपली की सुरू होण्याची शक्यता आहे. 'कोरोना'मुळे शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक कोलमडून गेले आहे. त्यामुळे यंदाच्या २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील सहा महिन्यांचा कालावधी वाया गेला आहे. जानेवारी महिन्यात प्रथम वर्षाचे वर्ग सुरू झाले तरी ते पूर्ण क्षमतेने प्रत्यक्षात महाविद्यालये कधी सुरू होतील, हे सांगता येत नाही.

पालकांची आर्थिक स्थिती चांगली नाही. येत्या वर्षात विद्यार्थ्यांना महाविद्यालयातील ग्रंथालय, कॉम्प्युटर लॅब, प्रयोगशाळा, क्रीडांगणे अशा सुविधा वापरता येणार नाहीत. त्यामुळे विकास शुल्कासह यामध्ये कपात करावी, असे आवाहन 'एफआरए'ने व्यावसायिक शिक्षण संस्थांच्या प्रतिनिधींची बैठक घेऊन केले होते. तसेच विद्यापीठांना पत्र पाठवून याबाबत संलग्न महाविद्यालयांना सूचना द्याव्यात, असेही सांगितले होते. परंतु यास कोणताही प्रतिसाद मिळालेला नसल्याने गतवर्षी जेवढे शुल्क होते, तेवढे विद्यार्थ्यांना भरावे लागणार आहे.

व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्थांचे डेव्हलपमेंट शुल्कासह ग्रंथालय, क्रीडा याचे शुल्क कमी होऊ शकते. तसेच, या संस्थांमधील प्राध्यापकांची दरवर्षी वेतनवाढ होतेच असे नाही. त्यामुळे शुल्ककपात करावी, असे आवाहन बैठकीत केले होते. यास संस्थांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. वाशीतील एका महाविद्यालयाचे १० हजार शुल्क आहे, त्यांनी ५ हजार रुपये कमी केले आहेत. इतर काही महाविद्यालयांनी तयारी दर्शविली आहे; पण ही कपात खूप कमी आहे.
- डॉ. आर. एस. माळी, सदस्य, 'एफआरए'

गेल्या वर्षी केलेल्या खर्चाच्या आधारे यंदाचे शुल्क निश्चित झाले आहे, त्यामुळे शुल्ककपात करणे शक्य नाही. कपात केली तर त्याचा परिणाम शिक्षकांच्या नोकऱ्यांवर होईल. यंदाचा संस्थांचा खर्च कमी झाल्यास त्याचा फायदा २०२२-२३ चे शैक्षणिक वर्षाचे शुल्क निश्चित होताना विद्यार्थ्यांना मिळेल.
- डॉ. एकनाथ खेडकर, अध्यक्ष, असोसिएशन ऑफ मॅनेजमेंट ऑफ एमबीए इन्स्टिट्यूट

Sakaal: 26.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education



# प्रथम सत्राच्या प्रात्यक्षिक परीक्षा द्वितीय सत्राच्या परीक्षांबरोबर घेण्याचे निर्देश

पुणे, दि. २६ (प्रतिनिधी) - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत यंदाच्या शैक्षणिक वर्षातील प्रथम सत्राच्या प्रात्यक्षिक परीक्षा, तोंडी परीक्षा दुसऱ्या सत्राच्या परीक्षांसह घेण्यात येणार आहे. विद्यापीठाने परिपत्रकाद्वारे प्रथम सत्राच्या प्रात्यक्षिक, तोंडी परीक्षा द्वितीय सत्राच्या परीक्षांबरोबर घेण्याचे निर्देश दिले आहेत. सामना

कोरोनामुळे अद्याप महाविद्यालये सुरू होऊ शकलेली नाहीत. त्यामुळे अभियांत्रिकी, वास्तुकला, विज्ञान अशा विविध अभ्यासक्रमांच्या प्रथम सत्राच्या प्रात्यक्षिक, तोंडी परीक्षा कशा होणार, असा प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने परिपत्रकाद्वारे प्रथम सत्राच्या प्रात्यक्षिक, तोंडी परीक्षा द्वितीय सत्राच्या परीक्षांबरोबर घेण्याचे निर्देश दिले आहेत. नियमित विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरताना ऑनलाईन अर्जाच्या प्रक्रियेत काहीही बदल न करता लेखी परीक्षांसह प्रात्यक्षिक, तोंडी परीक्षांची माहिती प्रचलित पद्धतीनुसार भरावी.

तांत्रिक अडचणी येऊ नयेत, यासाठी नियमित विद्यार्थ्यांचे प्रथम सत्रातील विद्यापीठ परीक्षांचे निकाल केवळ ऑनलाईन पद्धतीने जाहीर करण्यात येतील; तसेच प्रथम आणि द्वितीय सत्राच्या मूळ गुणपत्रिका एकत्रितरीत्या द्वितीय सत्राच्या गुणपत्रिकांसह स्वतंत्रपणे एकाच महाविद्यालयात पाठवण्यात येतील. विषय राहिलेल्या (बॅकलॉग) विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक, तोंडी परीक्षा नेहमीप्रमाणे घेऊन त्यांचे निकाल प्रथम सत्राच्या लेखी परीक्षेनंतर जाहीर करण्यात येणार आहेत.

Saamana: 27.12.2020



# कापडाचा फुटबॉल अन् मास्तरांची छडी

## शालेय आठवणीत रमले मॉडर्न शाळेचे माजी विद्यार्थी; नामफलकाचे अनावरण

गोखलेनगर, ता. २६ : 'सायकलवरून शाळेत यावे लागे, तर कधी पायपीट करावी लागे. काळ बदलला आता, घरात बसून मोबाईल शिक्षण सुरू झाले आहे,'' असे मत मॉडर्न शाळेचे माजी विद्यार्थी विनायक निम्हण यांनी व्यक्त केले.

मुख्याध्यापिका संगीता लोकरे यांनी यंदाचा निकाल शंभर टक्के लागला, असे सांगितले तेव्हा समोर असलेल्या माजी विद्यार्थ्यांमधून आवाज आला 'आमच्या वेळी का बरं निकाल पन्नास टक्के लागायचा', तेव्हा हशा पिकला. कापडाचा फुटबॉल, रगडा, चार अन्याची भेळ, पेरूची फोड, पेनातले शाईचे डाग, मास्तरांची छडी, अशा किती तरी आठवणीत दोनशेपेक्षा जास्त माजी विद्यार्थी रमले होते. मॉडर्न शाळेत माजी विद्यार्थी नामफलकाचे अनावरण माजी आमदार विनायक निम्हण यांच्या हस्ते करण्यात आले. माजी नगरसेवक माजी विद्यार्थी उदय महाले यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले होते. प्रशांत जगताप यांनी प्रास्ताविक केले. मंगेश लोखंडे, दीपक बंडगर, सचिन गुंजाळ, धैर्यशील येवलेकर, नितीन मोरे आदी उपस्थित होते. अभय भोर यांनी आभार मानले.

शिवाजीनगर : माजी विद्यार्थी मित्र मंडळ फलकाचे अनावरण करताना शाळेचे माजी विद्यार्थी.

Sakaal:27.12.2020



# कॉलेज सुरू करण्याचा निर्णय बुधवारी?

महाराष्ट्र टाइम्स 27/12/2020

**विद्यार्थ्यांसाठी नियमावली करण्याचे सूतोवाच**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात कॉलेज सुरू करण्याबाबत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात येत्या बुधवारी बैठक होणार असून, त्यात विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिके, प्रकल्प, इंटर्नशिप सुरू करण्याबाबत निर्णय होणार आहे, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाकडून देण्यात आली आहे. कॉलेज सुरू करण्याबाबतच नियमावली आखण्यासाठी डॉ. व्ही. बी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचे पत्र डॉ. गायकवाड यांना पाठविले आहे. ते त्यांना लगेचच मिळेल, अशी माहितीही विद्यापीठ प्रशासनाने दिली.

करोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर राज्यात इयत्ता नववी ते बारावीच्या शाळा सुरू झाल्या. मात्र, कॉलेज अद्यापही बंद असून, विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याचे चित्र आहे. कॉलेजांमध्ये व्यावसायिक अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून टप्प्याटप्प्याने कॉलेज खुली करून, विद्यार्थ्यांना प्रयोगशाळेत प्रात्यक्षिक व प्रकल्प करण्याची संधी द्यावी. यासाठी सुरक्षित अंतराचे नियम पाळून टप्प्याटप्प्याने कॉलेज सुरू करण्याची भूमिका 'महाराष्ट्र टाइम्स'ने वृत्ताद्वारे मांडली. त्यानंतर विद्यापीठाने डॉ. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली कॉलेज सुरू करण्यासाठी नियमावली तयार करण्याबाबत समिती नेमली. मात्र, डॉ. व्ही. बी. गायकवाड यांना समितीचे पत्रच मिळाले नसल्याने, त्यांना बैठक घेऊन कोणत्याच प्रकारची कार्यवाही करता येत नसल्याचे समोर आले. याबाबतचे वृत्त शनिवारी प्रकाशित झाल्यानंतर, डॉ. गायकवाड यांना पत्र लगेचच मिळेल आणि समितीचे काम सुरू होईल, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनाकडून देण्यात आली. त्याचप्रमाणे कॉलेज सुरू करण्याबाबत येत्या बुधवारी ३० डिसेंबर रोजी बैठक होईल. या बैठकीत कॉलेज सुरू करण्याबाबतची नियमावली तयार करण्यात येईल. त्यानंतर जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात कॉलेज सुरू करण्याबाबतचा निर्णय घेण्यात येईल, असे सूतोवाच विद्यापीठाकडून देण्यात आले.

**अविद्येचे 'प्रात्यक्षिक'**

**'टप्प्याटप्प्याने कॉलेज सुरू करू'**

काही दिवसांपूर्वी कॉलेज सुरू करण्याबाबत कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्यासह संलग्न कॉलेजांच्या प्राचार्यांशी संवाद साधला. त्यात कॉलेज सुरू करण्याबाबत अनेक प्राचार्यांनी अनुकूलता दर्शवली. सुरुवातीला संशोधन अभ्यासक्रमांना असणाऱ्या विद्यार्थ्यांचे पारंपरिक शिक्षण सुरू करण्यात येईल. त्यानंतर व्यावसायिक अभ्यासक्रमांची प्रात्यक्षिके सुरू करता येतील. विद्यार्थी संख्या अधिक असलेल्या कॉलेजांमध्ये तीन टप्प्यांत विद्यार्थ्यांना बोलवता येईल, अशा प्रकारची आखणी विद्यापीठाकडून करण्यात येत आहे. याबाबत स्थापन केलेल्या समितीची बुधवारी बैठक होणे अपेक्षित असून, त्यामध्ये निर्णय घेण्यात येईल, असे उपकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांनी सांगितले.

Maharashtra Times:27.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

Section: Education

पुढारी

# अंतिम वर्षाच्या परीक्षांचे शुल्क परत करण्याची मागणी

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

अंतिम वर्षाच्या परीक्षा महाविद्यालयांनीच घेतलेल्या असल्यामुळे या परीक्षांसाठी विद्यापीठांनी वसूल केलेले परीक्षा शुल्क परत करण्याची मागणी प्रहार विद्यार्थी संघटना आणि युवा जनता दल (से) मुंबईने केली आहे.

गतवर्षीच्या (शैक्षणिक वर्ष २०१९-२०) पदवीच्या अंतिम वर्षाच्या (तृतीय वर्ष) परीक्षा कोरोनामुळे वेळेवर होऊ शकल्या नव्हत्या. अनेक वेळा पुढे ढकलल्यानंतर या परीक्षा घेण्याची जबाबदारी अंतिमतः त्या त्या महाविद्यालयांवर सोपविण्यात आली. यासाठी महाविद्यालय व्यवस्थापनाला स्वत:कडील पैसे खर्च करावे लागले आहेत. प्रत्यक्षात विद्यापीठांनी महाविद्यालयांकडून परीक्षा शुल्क म्हणून प्रत्येक विद्यार्थ्यांमागे सुमारे एक हजार रुपये शुल्क घेतले होते. यातून विद्यापीठांकडे करोडो रुपये जमा झाले. प्रत्यक्षात मात्र परीक्षा घेण्याचे काम हे महाविद्यालयांनीच केले आहे.

Pune Edition
Dec 28, 2020 Page No. 8
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# महाविद्यालये, अभियांत्रिकी कॉलेज सुरू करण्याचा तूर्त विचार नाही

## उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांची माहिती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील नववी ते बारावीपर्यंतचे वर्ग सुरू झाले असले तरी महाविद्यालये व अभियांत्रिकी कॉलेज सुरू करण्याचा निर्णय अद्याप घेतलेला नाही, अशी माहिती राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी रविवारी कोल्हापुरात दिली.

कोल्हापूर दौऱ्यावर असताना शासकीय विश्रामगृह येथे त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. सामंत म्हणाले, परदेशात कोरोनाचा नवीन विषाणू आला आहे. राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाशी चर्चा करून सर्व जिल्ह्यांतील महाविद्यालयांची परिस्थिती काय आहे, वसतिगृह महाविद्यालयांच्या ताब्यात दिली आहेत का, याचा विचार केला जाईल. कोरोना लसीच्या उपलब्धतेनंतर आपत्ती व्यवस्थापनाच्या निर्णयानुसार लवकर सुरू करण्याचा प्रयत्न राहील. विद्यापीठाच्या कर्मचाऱ्यांची सातव्या वेतन आयोगाची मागणी पूर्ण केली आहे. आश्वासित प्रगती योजनेबाबत शासन सकारात्मक असून त्याच्या बैठका सुरू आहेत.

सर्वोच्च न्यायालयात मराठा आरक्षणाबाबत सुनावणी सुरू आहे. शासन भक्कमपणे मराठा समाजाबरोबर आहे. 'ईडब्ल्यूएस'बाबतची भूमिका उपसमितीचे अध्यक्ष अशोक चव्हाण यांनी मांडली. मुख्यमंत्री ठाकरे यांनी ओबीसी समाजाचा वाटा काढून इतरांना देणार नसल्याचे सभागृहात सांगितले. सीमाभागात शिवाजी विद्यापीठाच्या वतीने नवीन वर्षात शैक्षणिक संकुल उभारण्यात येणार आहे. त्याचे काम अंतिम टप्प्यात असल्याचे मंत्री सामंत यांनी सांगितले.

### राज्य विद्यापीठ कर्मचारी संघटनेला सल्ला

सातव्या वेतन आयोगाची सर्व अकृषी विद्यापीठांना अंमलबजावणी करावी लागेल. संघटनांनी आंदोलन करण्यापेक्षा काय त्रुटी आहेत, हे सांगितले पाहिजे. त्रुटी असतील तर त्या बाजूला करण्याचा प्रयत्न करू. परंतु बाहेर आंदोलन, चर्चा करून निरोप पाठवू नये, असा सल्ला मंत्री सामंत यांनी राज्य विद्यापीठ कर्मचारी संघटनांना देत त्यांचे कान टोचले.

Pune Edition
Dec 28, 2020 Page No. 7
newspaper.pudhari.co.in



## *News Paper Clippings During December 2020*

Section: Education

पुढारी

# प्रथम सत्राच्या प्रात्यक्षिक, मौखिक परीक्षा दुसऱ्या सत्राच्या परीक्षांसह

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२०-२१च्या प्रथम सत्राच्या प्रात्यक्षिक आणि मौखिक परीक्षा दुसऱ्या सत्राच्या परीक्षांसह घेण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आता महाविद्यालये सुरू झाल्यावर प्रात्यक्षिक आणि मौखिक परीक्षा होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

विद्यापीठाने परिपत्रकाद्वारे प्रथम सत्राच्या प्रात्यक्षिक, मौखिक परीक्षा द्वितीय सत्राच्या परीक्षांबरोबर घेण्याचे निर्देश दिले आहेत. नियमित विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरताना ऑनलाइन अर्जाच्या प्रक्रियेत काहीही बदल न करता लेखी परीक्षांसह प्रात्यक्षिक, मौखिक परीक्षांची माहिती प्रचलित पद्धतीनुसार भरावी. तांत्रिक अडचणी येऊ नयेत, यासाठी नियमित विद्यार्थ्यांचे प्रथम सत्रातील विद्यापीठ परीक्षांचे निकाल केवळ ऑनलाइन पद्धतीने जाहीर करण्यात येतील. तसेच प्रथम आणि द्वितीय सत्राच्या मूळ गुणपत्रिका एकत्रितरीत्या द्वितीय सत्राच्या गुणपत्रिकांसह स्वतंत्रपणे एकाच महाविद्यालयात पाठवण्यात येतील. विषय राहिलेल्या (बॅकलॉग) विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक, मौखिक परीक्षा नेहमीप्रमाणे घेऊन त्यांचे निकाल प्रथम सत्राच्या लेखी परीक्षेनंतर जाहीर करण्यात येतील, असे विद्यापीठाने परिपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे.

Pune Edition
Dec 28, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# अकरावीची यादी आज जाहीर होणार

पुणे : ज्युनिअर कॉलेजांमध्ये इयत्ता अकरावी प्रवेशाच्या विशेष फेरीसाठी सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार या फेरीसाठी आज, सोमवारी (२८ डिसेंबर) निवड यादी जाहीर करण्यात येणार आहे.

निवड यादीत कॉलेज जाहीर होणाऱ्या विद्यार्थ्यांना २९ ते ३१ डिसेंबर या कालावधीत कॉलेजमध्ये प्रवेश घेता येईल, अशी माहिती अकरावी प्रवेश नियंत्रण समितीच्या वतीने देण्यात आली आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील ज्युनिअर कॉलेजांमध्ये प्रवेशासाठी अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. राज्य सरकारने सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील (एसईबीसी) विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून (ईडब्ल्यूएस) आरक्षणाचा लाभ देण्याच्या निर्णय घेतला. या निर्णयामुळे निवड यादी स्थगित करून अकरावी प्रवेशासाठी विशेष फेरीचे सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांना अर्जात बदल करून प्रवेश प्रक्रियेत सहभागी होता येणार आहे.

अकरावी प्रवेशासाठी ३०४ ज्युनिअर कॉलेजांत एक लाख सात हजार ३० जागा उपलब्ध आहेत. त्यापैकी ४५ हजार २९२ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

Maharashtra Times: 28.12.2020

# नव्या शैक्षणिक धोरणाविषयी निबंध स्पर्धा

## कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांची माहिती

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

नवे शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणी समिती, विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजनेतर्फे विद्यापीठस्तरीय खुल्या निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा पदवीस्तरीय विद्यार्थी, पदव्युत्तर तथा संशोधक विद्यार्थी, शिक्षक, प्राचार्य, शिक्षणप्रेमी समाज प्रतिनिधी, पालक या सर्वांसाठी खुली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी ही माहिती दिली. ही स्पर्धा एक जानेवारीपासून सुरू होईल. पदवीस्तरीय विद्यार्थ्यांसाठी 'नवे शैक्षणिक धोरण आणि अभिजात भारतीय शिक्षण परंपरा', 'नवे शैक्षणिक धोरण आणि समाज', 'नव्या शैक्षणिक धोरणव्यवस्थेकडून माझ्या अपेक्षा' हे विषय आहेत. पदव्युत्तर तथा संशोधन अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी 'नव्या शैक्षणिक धोरणात सृजनात्मक नवता', 'नवे शैक्षणिक धोरण आणि वैश्विकीकरण', 'नवे शैक्षणिक धोरण आणि मी' असे विषय देण्यात आले आहेत.



शिक्षकांसाठी 'अभिजात भारतीय शिक्षणमूल्ये आणि नवे शैक्षणिक धोरण', 'नवे शैक्षणिक धोरण - आव्हाने आणि संधी', 'नव्या शैक्षणिक धोरणात संशोधन आणि संशोधनाचे उपयोजन (उपयोजित संशोधन)' हे विषय देण्यात आले आहेत. प्राचार्य गटासाठी 'नवे शैक्षणिक धोरण : उद्दिष्टपूर्तीच्या आव्हानाला सामोरे जाताना', 'नव्या शैक्षणिक धोरणातून व्यक्तिमत्त्व, क्षमता व कौशल्यविकास', 'नव्या शैक्षणिक धोरणात भाषा विभागांचे महत्त्व' असे विषय देण्यात आले आहेत. शिक्षणप्रेमी समाज, प्रतिनिधी, पालक इत्यादींसाठी 'शिक्षणोपचार की शिक्षणसंस्कार', 'नवे शैक्षिणिक धोरण आणि सामाजिक दायित्व', 'नवे शैक्षणिक धोरण आणि आत्मनिर्भर भारत' हे विषय आहेत. विजेत्यांना एकूण एक लाख दहा हजार रुपयांची पारितोषिके देण्यात येणार आहेत.

Maharashtra Times: 28.12.2020

## News Paper Clippings During December 2020

### Section: Education

# महाविद्यालये सुरू करण्यासाठी ४ जानेवारीला बैठक

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये सुरू करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीची बुधवारी पहिली बैठक घेण्यात आली. मात्र, अद्याप महाविद्यालये सुरू करण्याबाबत अंतिम निर्णय झालेला नाही. आता या समितीची दुसरी बैठक येत्या ४ जानेवारी रोजी होणार आहे.

कोरोनानंतर बंद केलेली महाविद्यालये सुरू करावी, अशी मागणी काही दिवसांपासून जोर धरू लागली आहे.



त्यामुळे विद्यापीठाने महाविद्यालय सुरू करण्यासंदर्भात अहवाल सादर करण्यासाठी समिती स्थापन केली आहे. या समितीमध्ये विविध विद्या शाखांमधील प्राध्यापक व प्राचार्य यांचा समावेश आहे. महाविद्यालय सुरू करण्यासाठी कोणती खबरदारी घ्यावी?

महाविद्यालय प्रशासनाकडून विद्यार्थ्यांची सुरक्षित व आरोग्यदायी वातावरणात बैठक व्यवस्था करता येऊ शकते का?, सुरवातीला अंतिम वर्षाच्या किंवा स्पेशल विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांचे वर्ग सुरू करता येतील का?, विज्ञान विषयाचे प्रॅक्टिकल्स सुरु करणे उचित ठरेल का? यांबाबत बैठकीत चर्चा केल्याचे समजते.

समितीकडून तयार केलेला अहवाल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर आणि विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवला जाणार आहे. त्यानंतरच महाविद्यालय सुरू करण्याबाबत अंतिम निर्णय होईल, असे सूत्रांनी सांगितले.

# पदवी प्रमाणपत्रासाठी १५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २८ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामार्फत पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज मागविण्यात येत आहे. मात्र, अजूनही काही विद्यार्थ्यांना मूळ गुणपत्रिका न मिळाल्याने पदवी प्रमाणपत्रासाठी मुदतवाढ देण्याची मागणी होत होती. त्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने दि. १५ जानेवारीपर्यंत अर्ज करण्यास मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.

पुणे विद्यापीठाचा ११८वा पदवी प्रदान समारंभ मार्च-एप्रिल २०२१मध्ये होणार आहे. त्यासाठी विद्यापीठाने पदवी व पदविका प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र घेण्यासाठी ऑनलाइन अर्ज मागविले आहे. त्याची मुदत ३१ डिसेंबरपर्यंत आहे.

मात्र, पहिल्याच वर्षी झालेल्या ऑनलाइन परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. पण अजूनही काही विद्यार्थ्यांना महाविद्यालयामार्फत मूळ गुणपत्रिका प्राप्त झालेल्या नाहीत. त्यामुळे पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज कसा करायचा, असा प्रश्न विद्यार्थ्यांपुढे पडला होता. विद्यापीठाच्या या निर्णयामुळे प्रश्न सुटला आहे.

Prabhat: 29.12.2020

# 'एसईबीसी'च्या विद्यार्थ्यांना 'ईडब्ल्यूएस'मधून प्रवेश द्या

## डॉ. धनराज माने यांच्या शिक्षण संस्थांना सूचना

प्रभात वृत्तसेवा २९/१२/२०२०

पुणे, दि. २८ - राज्य सरकारने सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गातील विद्यार्थ्यांना खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा लाभ देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार यंदाच्या शैक्षणिक वर्षातील प्रवेशप्रक्रिया राबवावी, असे उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांनी सर्व विद्यापीठ व शिक्षण संस्थांना सांगितले आहे.

मराठा आरक्षणास अंतरिम स्थगितीचा आदेश विचारात घेत सद्य:स्थितीत 'एसईबीसी' वर्गातील उमेदवारांना २०२०-२१ या वर्षातील शैक्षणिक प्रवेश घेण्यासाठी आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचे (ईडब्ल्यूएस) प्रमाणपत्र देण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे.

याबाबत राज्य शासनाने निर्णय घेतला असून, त्यानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश उच्च शिक्षण विभागास दिले आहे. त्यानुसार उच्च शिक्षण विभागाने सर्व विद्यापीठांना 'एसईबीसी' वर्गातील विद्यार्थ्यांना 'ईडब्ल्यूएस' वर्गातून प्रवेश देण्याची कार्यवाही करावी, असे सूचित केले आहे. त्याबाबतचे परिपत्रक उच्च शिक्षण विभागाने प्रसिद्ध केले आहे.

शासन निर्णयानुसार यंदाच्या शैक्षणिक वर्षातील प्रवेशाबाबत सर्व विद्यापीठ, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित, स्वायत्त कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी कार्यवाही करण्यात यावी. त्याचा अहवाल उच्च शिक्षण विभागास सादर करावा, असे पुणे विभागीय उच्च शिक्षण सहसंचालक डॉ. मोहन खताळ यांनी सांगितले.

Prabhat: 29.12.2020



## News Paper Clippings During December 2020

### Section: Education

२९/१२/२०२० सकाळ

# जानेवारीच्या शेवटी प्रथम सत्र परीक्षा?

## पुणे विद्यापीठापुढे सुमारे सहा लाख विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे आव्हान

सकाळ EXCLUSIVE

पुणे, ता. २८ : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने दोन टप्प्यांत अंतिमवर्ष आणि अंतिम पूर्व वर्षांतील बॅकलॉग व श्रेणीसुधार परीक्षा घेतली. आता प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ वर्षाच्या पहिल्या सत्राच्या नियमित परीक्षा घेण्याचे आव्हान विद्यापीठापुढे आहे. ही परीक्षा ऑनलाइन होणार की ऑफलाइन, हे अद्याप स्पष्ट झालेले नसले, तरी जानेवारीच्या शेवटी किंवा फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात परीक्षा होण्याची शक्यता आहे.

पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयात पारंपरिक अभ्यासक्रमांचे प्रथम, द्वितीय, तृतीय वर्षाचे आणि व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रथम वर्ष वगळता इतर वर्षांचे प्रथम सत्राचे ऑनलाइन वर्ग जुलै-ऑगस्ट महिन्यात सुरू झाले. प्रथम सत्रातील अभ्यासक्रम संपत आला असून, विद्यार्थ्यांना आता प्रथम सत्राच्या परीक्षा कधी होणार, याची प्रतीक्षा आहे.

ऑक्टोबर महिन्यात अंतिम वर्षाच्या अडीच लाख विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली. त्यापैकी दोन लाख जणांनी ऑनलाइन परीक्षा दिली. यामध्ये अनेक तांत्रिक समस्या निर्माण झाल्याने गोंधळ निर्माण झाला. त्यात सुधारणा करत डिसेंबर महिन्यात बॅकलॉग व श्रेणी सुधारच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेतल्या. ज्या विषयांच्या परीक्षा झाल्या, त्यांचे निकालही तयार करण्याचे काम सुरू आहे. तसेच बॅकलॉग परीक्षेत प्रॉक्टर्ड मेथडचा वापर केल्याने गैरप्रकारांवरही चाप बसला. मात्र, आता प्रथम सत्राच्या परीक्षांकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे.



**विद्यार्थिसंख्या सहा लाख**

व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रथम वर्ष वगळता इतर सर्व वर्ग व अभ्यासक्रमांचे ऑनलाइन वर्ग सुरू झाले आहेत. त्यामुळे प्रथम सत्रात सुमारे सहा लाख विद्यार्थ्यांची परीक्षा विद्यापीठाला घ्यायची आहे. ही परीक्षा ऑनलाइन होणार की ऑफलाइन, हे अद्याप स्पष्ट झालेले नसले तरी कमी कालावधीत ही परीक्षा घेण्यासाठी विद्यापीठ, महाविद्यालयांना तयारी करावी लागणार आहे.

"ऑनलाइन क्लासेस झाल्याने शिकवलेले संपूर्ण समजलेले नसले तरी आमचा प्रथम सत्राचा अभ्यासक्रम जवळपास संपत आला आहे. जानेवारी महिन्यात द्वितीय सत्र सुरू करण्यात येईल; पण त्यापूर्वी प्रथम सत्राच्या परीक्षा कधी होणार, हे विद्यापीठाने लवकर स्पष्ट करावे. तसेच, ही परीक्षा ऑनलाइन होणार की ऑफलाइन, याबाबतही स्पष्टता आणावी.
- संकेत बोन्हाडे, बीएस्सी तृतीय वर्ष, विद्यार्थी

"प्रथम सत्र परीक्षा जानेवारीचा शेवटचा आठवडा किंवा फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात होऊ शकतील, त्या ऑफलाइन होणार की ऑनलाइन, याबाबत परीक्षा मंडळाच्या बैठकीत निर्णय होईल.
- डॉ. मनोहर चासकर, अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा

"पहिल्या सत्राचा सरासरी ९० टक्के अभ्यासक्रम शिकवून पूर्ण झाला आहे. विद्यापीठाकडून प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरून घेण्याची प्रक्रिया सुरू केली आहे. त्यानंतर द्वितीय, तृतीय वर्षांचेही अर्ज भरून घेतले जातील.
- डॉ. पी. बी. बुचडे, प्राचार्य, गरवारे महाविद्यालय

## महाविद्यालयांबाबत उद्या होणार निर्णय

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये सुरू करण्यासाठी नेमलेल्या समितीची बैठक बुधवारी (ता. ३०) होणार असून, त्याच दिवशी तारीख देखील जाहीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नवीन वर्षात विद्यार्थ्यांचे पाऊल महाविद्यालयात पडणार आहे.

राज्य शासन, महापालिकेच्या मान्यतेनंतर पुणे शहरातील शाळा चार जानेवारीपासून सुरू होणार आहेत. त्यासाठी तयारी सुरू झाली आहे. पण महाविद्यालये सुरू करण्यासाठी शासनापेक्षा विद्यापीठाचा निर्णय महत्त्वाचा आहे. त्यामुळे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी महाविद्यालयांच्या प्राचार्यांची बैठक घेऊन याबाबत चर्चा केली होती. व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत यासाठी प्राचार्य डॉ. व्ही. बी. गायकवाड यांची समिती गठित केली आहे.

दोन तीन आठवडे उलटून गेले तरी नियुक्तीचे पत्र न मिळाल्याने समितीला कामकाज करता आले नव्हते. याबाबत 'सकाळ'ने १९ डिसेंबर रोजी वृत्त प्रकाशित केले होते. त्यानंतर २२ डिसेंबर रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत इतिवृत्त मान्य करून पत्र देण्यात आले. त्यानुसार आता बैठक घेऊन महाविद्यालय सुरू करण्याची तारीख, त्यासाठीच्या उपाय योजना, शिफारशी याची चर्चा होणार आहे.

समितीचे अध्यक्ष व्ही. बी. गायकवाड म्हणाले, "महाविद्यालये सुरू करण्याबाबत बुधवारी बैठक होणार आहे, त्याच दिवशी व्यवस्थापन समितीला आमचा अहवाल सादर केला जाईल. याच दिवशी महाविद्यालये कधी सुरू होणार याची तारीख देखील जाहीर होऊ शकते. समितीतील सर्व सदस्यांची मते जाणून घेऊन ही तारीख निश्चित केली जाईल."

Sakaal: 29.12.2020

# अकरावीच्या प्रवेशापासून अडीच हजार विद्यार्थी दूरच

## पहिल्या फेरीत १७ हजार ७२२ जणांना प्रवेश

पुणे, ता. २८ : इयत्ता अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेतील पहिल्या विशेष फेरीसाठी ५२ हजार ५७७ जागा रिक्त होत्या. त्यासाठी २० हजार ३४७ विद्यार्थ्यांनी अर्ज केले. त्यातील जवळपास ८७ टक्के विद्यार्थ्यांना विशेष फेरीत प्रवेश मिळाला आहे. मात्र, विद्यार्थ्यांना मिळालेले गुण, त्यांनी भरलेले पसंतीक्रम, संबंधित महाविद्यालयांचा कट ऑफ यांचा मेळ न बसल्यामुळे दोन हजार ६२५ जणांना प्रवेश मिळू शकला नाही.

अकरावीच्या पहिल्या विशेष फेरीत कनिष्ठ महाविद्यालय अॅलॉट झालेल्या १७ हजार ७२२ विद्यार्थ्यांपैकी १२ हजार ३०६ जणांना पहिल्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय मिळाले, तर दोन हजार ५०५ विद्यार्थ्यांना दुसऱ्या आणि एक हजार १७० विद्यार्थ्यांना तिसऱ्या पसंतीक्रमाचे महाविद्यालय मिळाले. नियमित तीन फेऱ्यांमध्ये रिक्त राहिलेल्या राखीव प्रवर्गाच्या जागा त्या प्रवर्गाचे उमेदवार उपलब्ध नसल्याने सर्वसाधारण गुणवत्ता यादीनुसार भरल्या आहेत. त्यामुळे विशेष फेरीनंतर प्रवेशाचा

पान ५ वर »

**पहिल्या विशेष फेरीतील तपशील**

| शाखा | रिक्त जागा | अर्ज | अॅलॉट विद्यार्थी |
|---|---|---|---|
| कला | ९,२०८ | १,४६४ | १,२४१ |
| वाणिज्य | २०,७३० | ८,६१५ | ७,२५५ |
| विज्ञान | १९,७५१ | ९,८२५ | ८,७७१ |
| एचएसव्हीसी | २,८८८ | ४४३ | ४३१ |
| एकूण | ५२,५७७ | २०,३४७ | १७,७२२ |

सकाळ

**प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक**

- २९ ते ३१ डिसेंबर : प्रवेश फेरीत निवडलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी प्रोसिड फॉर अॅडमिशन करावे.
- मिळालेल्या महाविद्यालयात प्रवेश निश्चित करणे.
- सर्व कोट्यांतर्गत प्रवेश सुरू राहणार. २३/१२/२०२०
- व्यवस्थापन, इनहाउस आणि अल्पसंख्याक कोट्यांतर्गत जागा येथून पुढे भरता येतील, तसेच त्यांचे प्रत्यार्पण करता येईल.
- ३१ डिसेंबर : झालेले प्रवेश संकेतस्थळावर ऑनलाइन नोंदविण्यासाठी महाविद्यालयांना अतिरिक्त वेळ.
- १ जानेवारी २०२१ : प्रवेशाची विशेष फेरी पूर्ण झाल्यानंतर रिक्त जागांचा तपशील जाहीर करणे.

# अकरावीच्या प्रवेशापासून अडीच हजार विद्यार्थी दूरच

» पान १ वरून

टक्का वाढणार आहे. या फेरीनंतर प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी पुढील कार्यवाहीचा तपशील संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल, असे इयत्ता अकरावी केंद्रीय ऑनलाइन प्रवेश समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी सांगितले.

**पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांना संधी**

राज्य सरकारच्या निर्णयानुसार सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील (एसईबीसी) विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून (ईडब्ल्यूएस) अंतर्गत लाभ देण्याला मान्यता दिली. त्यावेळी अकरावी प्रवेशाच्या विशेष फेरीतील गुणवत्ता यादीला स्थगिती देऊन अर्जात बदल करण्यासाठी मुदतवाढ दिली होती.

याच दरम्यान राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावीच्या पुरवणी परीक्षेचा निकालही जाहीर केला. यात उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना मुदतवाढीत अकरावीच्या प्रवेशासाठी नव्याने अर्ज करण्याची सोय उपलब्ध होती. अशा प्रकारे दहावीच्या पुरवणी परीक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेशाच्या विशेष फेरीत सहभागी करून घेतले आहे, असे शेंडकर यांनी स्पष्ट केले.

सकाळ

**विशेष फेरीत नव्वदीत कट-ऑफ**

- फर्ग्युसन महाविद्यालय : विज्ञान : ९४ टक्के
- डॉ. कलमाडी श्यामराव हायस्कूल अॅण्ड ज्युनिअर कॉलेज : कला : ९२.६० टक्के व विज्ञान : ९१.८० टक्के
- सर परशुरामभाऊ कनिष्ठ महाविद्यालय : विज्ञान : ९१.६० टक्के

Sakaal: 29.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

२९/१२/२०२० **पदवी–पदविका प्रमाणपत्रासाठी मुदतवाढ**

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा ११८ वा पदवी प्रदान समारंभ मार्च–एप्रिल २०२१ मध्ये होणार आहे. त्यासाठी विद्यापीठाने पदवी व पदविका प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र घेण्यासाठी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन केले आहे. अर्ज भरण्याची मुदत ३१ डिसेंबरपर्यंत होती. अंतिम वर्षाच्या परीक्षेचा निकाल उशिरा लागल्याने अद्याप गुणपत्रिका मिळाल्या नाहीत. त्यामुळे विलंब शुल्कासह १५ जानेवारी २०२१ पर्यंत मुदत वाढविण्यात आली आहे.

सावित्रीबाई फुले विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे ऑनलाइन निकाल जाहीर करण्यात आहेत. मूळ गुणपत्रिका महाविद्यालयातून उपलब्ध होते. मात्र आणखी ती मिळाली नाही. त्यामुळे पदवी प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन गुणपत्रिका ग्राह्य धरली जाणार नाही. विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या परीक्षेचा निकाल जाहीर केला आहे, मात्र अद्याप अनेक विद्यार्थ्यांना महाविद्यालयांकडून गुणपत्रिका मिळालेली नसल्याने अर्ज भरता आलेला नाही. ही मुदत संपण्यासाठी तीन दिवसांचाच कालावधी शिल्लक राहिल्याने परीक्षा विभागाने आता नोंदणीसाठी १५ जानेवारीपर्यंत मुदत वाढवली आहे. अर्ज करण्यासाठी विद्यार्थ्यांनी convocation.unipune.ac.in या संकेतस्थळास भेट देण्याचे आवाहन विद्यापीठाने केले. केसरी

Kesari: 29.12.2020

म. टा. २९/१२/२०२०

**१७ हजार विद्यार्थ्यांना प्रवेश**

**विशेष फेरीत बहुतेकांना पहिल्या पसंतीचे कॉलेज**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

**जाहीर झालेले शाखानिहाय प्रवेश**

| | |
|---|---|
| कला | : एक हजार २४९ |
| वाणिज्य | : सात हजार २५५ |
| विज्ञान | : आठ हजार ७७९ |
| व्यवसाय शिक्षण | : ४३९ |
| एकूण | : १७ हजार ७२२ |



**अकरावी प्रवेश**

अकरावीच्या केंद्रीय प्रवेशप्रक्रियेच्या विशेष गुणवत्ता फेरीत १७ हजार ७२२ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाले. यापैकी १२ हजार ३०६ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतिक्रमाच्याच महाविद्यालयात प्रवेश मिळाले. त्यामुळे या फेरीत मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी प्रवेश घेतील, अशी शक्यता वर्तविली जात आहे.

पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील ज्युनिअर कॉलेजांमध्ये प्रवेशासाठी अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. यातील विशेष फेरीची गुणवत्ता यादी सोमवारी जाहीर झाली. 'अकरावी प्रवेशासाठी ३०४ महाविद्यालयांमध्ये एक लाख सात हजार ३० जागा उपलब्ध आहेत. यातील ७५ हजार ३१८ विद्यार्थ्यांनी सोमवारपर्यंत प्रवेशप्रक्रिया पूर्ण केली,' अशी माहिती प्रवेश समितीच्या सचिव मीना शेंडकर यांनी दिली.

विशेष फेरीसाठी ५२ हजार ५७७ जागा उपलब्ध होत्या. त्यासाठी २० हजार ३४७ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. यापैकी १७ हजार ७२२ विद्यार्थ्यांना या फेरीद्वारे प्रवेश मिळाला आहे. या फेरीत प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना ३१ डिसेंबरपर्यंत प्रवेश निश्चित करता येईल. एक जानेवारी रोजी रिक्त जागांचा तपशील जाहीर होईल. सोमवारी जाहीर झालेल्या प्रवेशांमध्ये १२ हजार ३०६ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालयात प्रवेश जाहीर झाला आहे. त्यांना या जागेवर प्रवेश घेणे बंधनकारक आहे. दोन हजार ५०५ विद्यार्थ्यांना दुसऱ्या; एक हजार १७० विद्यार्थ्यांना तिसऱ्या, ६४९ विद्यार्थ्यांना चौथ्या, ३९८ विद्यार्थ्यांना पाचव्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले. यासह अन्य विद्यार्थ्यांना पाचव्या ते दहाव्या पसंतीचे महाविद्यालय मिळाले आहे.

विशेष फेरीमध्ये काही नामांकित महाविद्यालयांच्या 'कट ऑफ' मध्ये घट झाली असली, तरी अद्याप या महाविद्यालयांचा कट ऑफ ९० टक्क्यांहून अधिक आहे. सिम्बायोसिसमध्ये वाणिज्य शाखेतील प्रवेशासाठी ९२.६० टक्के, डॉ. कलमाडी शामराव कनिष्ठ महाविद्यालयात कला शाखेसाठी ९२.६० टक्के आणि विज्ञान शाखेसाठी ९१.८० टक्के, फर्ग्युसन महाविद्यालयात विज्ञान शाखेसाठी ९४ टक्के, स. प. महाविद्यालयात विज्ञान शाखेसाठी ९१.६० टक्के गुण आवश्यक आहेत.

Maharashtra Times 29.12.2020

**Colleges can send plans by Thursday**

TIMES NEWS NETWORK

29/12/2020

**Pune:** New affiliations, courses and satellite centres of the Savitribai Phule Pune University (SPPU) will get extended time till December 31 to submit their proposals. The earlier deadline was September 30.

A notification issued by SPPU on December 16 said due to the Covid pandemic, the varsity has decided to give more time to colleges and institutions to make their proposals which can be made online on the varsity's website 'www.unipune.ac.in' in the Board of Director online affiliation section.

The institutions that have planned to introduce new subjects and courses, topics, divisions, branches, satellite centres affiliated to SPPU, and research centres within their colleges can fill up the online proposal forms.

The Times of India: 29.12.2020

१० || प्रभात पुणे, बुधवार, दि. ३० डिसेंबर २०२०

**प्राध्यापक भरतीकडे दुर्लक्ष**

**नेट-सेट, पीएच.डी. धारक संघर्ष समितीने मागितला खुलासा**

प्रभात वृत्तसेवा

**पुणे, दि. २९ -** विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) २०१९ मध्ये चार महिन्यांत पाच परिपत्रके काढून अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरूंना प्राध्यापक भरती करण्याचे आदेश दिले होते. मात्र, या आदेशाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत प्राध्यापक भरतीसाठी काहीच पावले उचलली गेली नाहीत. त्याबाबत खुलासा करावा, अशी मागणी नेट-सेट, पीएच. डी. धारक संघर्ष समितीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने केली आहे.



'यूसीजी'ने विद्यापीठ आणि अनुदानित महाविद्यालयांमधील सहायक प्राध्यापकांच्या रिक्त असलेल्या जागा पूर्ण क्षमतेने भरण्याचे आदेश यापूर्वीच दिले होते; परंतु राज्य शासन, संबंधित विद्यापीठांचे कुलगुरूंनी या परिपत्रकांकडे लक्ष दिले नाही.

लॉकडाऊनमध्ये परीक्षा व्हाव्यात किंवा होऊ नये, यासाठी राज्यपाल आणि राज्य सरकार न्यायालयात याचिका दाखल करतात; पण विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी प्राध्यापक हवेत यासाठी कोणीही गांभीर्याने विचार करत नाहीत. याकडे लक्ष वेधण्यासाठी शांततेच्या मार्गाने उपोषण किंवा आंदोलन करण्याचा प्रयत्न केला तर पोलीस परवानगी देत नाहीत, असेही संघर्ष समितीचे समन्वयक प्रा. सुरेश देवढे-पाटील यांनी सांगितले.

गेल्या आठ महिन्यांपासून नेट, सेट, पीएच. डी. पात्रताधारक प्राध्यापकविना वेतन आहे. या परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पुणे विद्यापीठाने 'यूजीसी'च्या परिपत्रकानुसार काय कार्यवाही केली याचा खुलासा करावा, अशा मागणीचे निवेदन कुलगुरूंना दिल्याचे देवढे यांनी सांगितले.



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

**प्रमाणपत्रासाठी १५पर्यंत मुदत**

पुणे : करोनाच्या प्रादुर्भावामुळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अंतिम वर्ष परीक्षेचा निकाल उशिरा जाहीर होणार असून, विद्यार्थ्यांना गुणपत्रिका उशिराने मिळत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रासाठी अर्ज करण्याची मुदत १५ जानेवारीपर्यंत वाढवण्यात आली आहे.

पुणे विद्यापीठाचा ११८ वा पदवी प्रदान समारंभ पुढील वर्षी मार्च-एप्रिलमध्ये होण्याची शक्यता आहे. त्यासाठी विद्यापीठाने पदवी आणि पदविका प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र घेण्यासाठी ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन केले आहे. यापूर्वी अर्ज भरण्याची मुदत ३१ डिसेंबरपर्यंत आणि विलंब शुल्कासह १५ जानेवारी २०२१पर्यंत मुदत होती. विद्यापीठाने अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचे ऑनलाइन निकाल जाहीर केले असले, तरी मूळ गुणपत्रिका कॉलेजमधून उपलब्ध होते. पदवी प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन गुणपत्रिका ग्राह्य धरली जाणार नाही, त्यासाठी गुणपत्रिकेची हार्डकॉपी स्कॅन करून अपलोड करणे आवश्यक आहे. परीक्षा विभागाने आता नोंदणीसाठी १५ जानेवारीपर्यंत मुदत वाढवली आहे. अर्ज करण्यासाठी विद्यार्थ्यांनी convocation.unipune.ac.in या वेबसाइटला भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

Maharashtra Times: 30.12.2020

**महापौरांची माहिती : ४ जानेवारीपासून सुरू होणार का?**

**पालकांचे संमतीपत्र नसल्यास शाळा उघडण्याचा पुनर्विचार**

सुपर एक्सक्लुसिव

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** "विद्यार्थ्यांना शाळेत पाठविण्याबाबत पालकांची संमतीपत्रे कमी आल्यास, येत्या ४ जानेवारीपासून महापालिकेच्या नववी ते बारावीपर्यंतच्या शाळा सुरू करायच्या की नाही, याबाबत पुनर्विचार होऊ शकतो," असे महापौर मुरलीधर मोहोळ यांनी 'लोकमत'ला सांगितले.

'कोरोना'चा प्रभाव कमी झाल्याने बहुतांशी क्षेत्रे खुली करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुणे महापालिकेने यापूर्वीही २३ नोव्हेंबरपासून पहिल्या टप्प्यात नववी ते बारावीपर्यंतच्या शाळा सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. दरम्यान, दिवाळीनंतर कोरोनाच्या रुग्णांमध्ये वाढ दिसल्याने ३ जानेवारीपर्यंत शाळा सुरू करण्याचा निर्णय पुढे ढकलण्यात आला. परंतु दहावी व बारावीच्या परीक्षा जवळ आल्याने महापालिकेने ४ जानेवारीपासून नववी ते बारावीपर्यंतचे वर्ग सुरू करण्याचे आदेश गेल्या आठवड्यात दिले हिते. मात्र यासाठी शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या पालकांचे संमतीपत्र आवश्यक करण्यात आले आहे.

**निम्मे पालकही नाहीत राजी**

पुणे महापालिका माध्यमिक शिक्षण विभागाने दिलेल्या माहितीनुसार, पुणे महापालिकेच्या नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारे ८ हजार आहे. यापैकी आजमितीला २ हजार १०० च्या आसपास संमतीपत्रे प्राप्त झाली आहेत. म्हणजेच अद्याप निम्म्या विद्यार्थ्यांच्या पालकांनीही पाल्यांना शाळेत पाठवण्यास संमती दिलेली नाही.

**संमतीपत्रे आली अतिशय कमी**

आजमितीस पाल्याला शाळेत पाठविण्यासाठी पालकांची संमतीपत्रे अतिशय कमी आली आहेत. त्यामुळे पुढील तीन-चार दिवसांत पालकांच्या संमतीपत्रांची संख्या विचारात घेऊन आणि कोरोना विषाणूच्या नव्या प्रकाराचा संसर्ग विचारात घेऊन शाळा सुरु करण्याबाबतचा पुनर्विचार केला जाणार आहे.

Lokmat: 30.12.2020

मटा अँकर **सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून चाचपणी सुरू; यंदा प्रवेश घेणाऱ्यांना लाभ होण्याची चिन्हे**

**शैक्षणिक वर्ष तीन सत्रांत विभागण्याचे नियोजन?**

Harsh.Dudhe
@timesgroup.com
Tweet : @HarshDudheMT

पुणे : करोनामुळे शैक्षणिक वर्षाची विस्कटलेली घडी बसवण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने यंदाच्या २०२०-२१ शैक्षणिक वर्षाचे नियोजन ट्रायमिस्टर पॅटर्नने करण्याबाबत चाचपणी सुरु केली आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी पुढच्या वर्षाच्या परीक्षांचेही योग्य नियोजन करून, २०२१-२२ हे शैक्षणिक वर्ष सुरळीत करण्याबाबत तयारी सुरू आहे. यंदाच्या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ट्रायमिस्टरचा लाभ मिळू शकतो, असेही सूतोवाच विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

"करोनाच्या प्रादुर्भावामुळे, यंदाचे शैक्षणिक वर्ष लांबत आहे. अशा परिस्थितीत शैक्षणिक वर्ष व परीक्षा वेळेत पूर्ण करण्यासाठी ट्रायमिस्टर पद्धतीचा अवलंब करण्याबाबत विचार सुरू आहे. ट्रायमिस्टरचा निर्णय झाल्यास त्याचा लाभ यंदा प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळू शकतो. एमबीएच्या अभ्यासक्रमांत असे प्रयोग यशस्वी झाले आहेत.

– डॉ. नितीन करमळकर,
कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ



**ट्रायमिस्टर म्हणजे काय?**

सेमिस्टर पद्धतीत एका वर्षात दोन सेमिस्टर होतात आणि त्यानुसार परीक्षा घेतल्या जातात. ट्रायमिस्टर पद्धतीमध्ये एका वर्षात तीन, अशी दोन वर्षांत सहा सत्रे घेण्यात येतात; तसेच त्यानुसार परीक्षांचे नियोजन करण्यात येते. सध्या पुणे विद्यापीठाच्या 'पुम्बा'मध्ये ट्रायमिस्टर पॅटर्नने एमबीए अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण केला जातो. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला ट्रायमिस्टर पद्धती राबविताना यंदा प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांचे पुढील शैक्षणिक वर्ष लवकर सुरू करावे लागणार आहे.

करोनाच्या प्रादुर्भावामुळे राज्यातील विद्यापीठे आणि कॉलेजांमध्ये अद्यापही पारंपरिक शिक्षणासाठी दारे बंद असून, ऑनलाइन पद्धतीने विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू आहे. विद्यापीठे आणि कॉलेजांमध्ये जानेवारीत विद्यार्थ्यांचे पारंपरिक शिक्षण सुरू होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत इंजिनीअरिंग, फार्मसी, आर्किटेक्चर, लॉ, बीएड, बीपीएड, एमसीए, हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी आदी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. त्यामुळे शैक्षणिक प्रक्रिया जानेवारीच्या अखेरीस सुरू होण्याची शक्यता आहे. तर, आर्टस्, सायन्स, कॉमर्सच्या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया पूर्ण झाल्या आहेत, मात्र त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण होण्यात अडचणी आहेत. त्यामुळे शैक्षणिक वर्ष वेळेत कसे संपेल; तसेच सत्र परीक्षा वेळेत कशा होतील, याबाबत विद्यापीठासमोर मोठा प्रश्न आहे. यावर उपाय म्हणून यंदाचे शैक्षणिक वर्ष ट्रायमिस्टर पद्धतीने पूर्ण करण्याबाबत विद्यापीठ पातळीवर विचार सुरू आहे. ट्रायमिस्टरने शैक्षणिक वर्षाचे नियोजन केल्यास, यंदाच्या शैक्षणिक वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांचे पदवी किंवा पदव्युत्तरचे शिक्षण वेळेत पूर्ण होणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना देशात व परदेशात उच्चशिक्षण व रोजगाराच्या संधी वेळेत उपलब्ध होतील, असे तज्ज्ञांनी सांगितले.

Maharashtra Times: 30.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी लागणारे साहित्य सेस फंडातून घ्यावे



उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या सूचना

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २९ - करोनाच्या पार्श्वभूमीवर शहरी व ग्रामीण भागातील शाळा सुरू होण्यापूर्वी त्याची स्वच्छता, सॅनिटाइज करून घ्याव्यात, तसेच मुलांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक साहित्य जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून खरेदी करून देण्याबाबत प्रशासनाने योग्य कार्यवाही करावी, अशा सूचना विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केल्या आहेत.

ग्रामीण व शहरी भागातील शाळा सुरू करण्यासंदर्भात शिक्षण विभागाचे वरिष्ठ अधिकारी, पालक आणि संस्थाचालक यांच्याशी दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक पार पडली. त्यावेळी डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, पालक व शिक्षण संस्थांनी शाळा सुरू करण्यासाठी सकारात्मक राहावे व ऑनलाइन शिक्षणाचा फायदा घ्यावा. ज्यांना पुढील शिक्षण घेण्याची इच्छा आहे, त्यांनी फॉर्म नंबर १७ भरून परीक्षा द्यावी. राज्याच्या बोर्ड परीक्षेला जसे फॉर्म नंबर १७ चालतो तसा तो सीबीएसई, आईसीएससी शाळाबाबत चालेल का, याबाबत शिक्षण विभागाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करावा, अशी सूचनादेखील डॉ. गोऱ्हे यांनी शिक्षण विभागाला केली. जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून शाळा सुरू करण्यापूर्वी आवश्यक सोडियम हायपोक्लोराइड खरेदी करावे व त्याची फवारणी संपूर्ण शाळा परिसरात करावी.

**शासनाच्या सूचना डावलून फी वाढ केली असेल तर कळवा...**

ज्या शाळांनी शासनाच्या सूचना डावलून फीवाढ केली आहे, त्या पालकांनी शिक्षण विभागास कळवावे, असेही आवाहन डॉ. नीलम गोऱ्हे यांनी केले आहे, तसेच मान्यता नसलेल्या शाळा सुरू असल्याबाबत पिंपरी-चिंचवडमधील पालकांनी मुद्दा उपस्थित केल्यावर शाळा सुरू करणे हा गंभीर गुन्हा आहे. त्याबाबत तत्काळ फौजदारी गुन्हा नोंद करावा व शिक्षण विभागाला कळवावे. शिक्षण विभागाने तत्काळ कारवाई करावी मुले, शिक्षक व पालक यांचे मानसिक आरोग्य जपावे. शाळांनी तापमान मोजण्यासाठी थर्मामीटर, ऑक्सिजन तपासण्यासाठी ऑक्सिमीटर घ्यावेत.

Prabhat: 30.12.2020

# राज्यात अकरावीच्या तीन लाखांहून अधिक जागा रिक्त

## कनिष्ठ महाविद्यालयांसाठी धोक्याची घंटा; ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेचा फटका

देवेश गोंडाणे, लोकसत्ता



**नागपूर :** मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक व अमरावती या शहरांतील महापालिका क्षेत्रात अकरावी प्रवेशाच्या विशेष फेरीपर्यंत ३ लाख २० हजार जागा रिक्त आहेत. ऑनलाइन प्रवेशामुळे हा फटका बसला असून मुंबईमध्ये १ लाख ८४ हजार, पुण्यात ६१ हजार तर नागपुरात ३४ हजारांवर अकरावीच्या जागा रिक्त राहिल्या. मागील वर्षीच्या तुलनेत रिक्त जागांमध्ये जवळपास दुपटीने वाढ झाल्याने भविष्यात काही कनिष्ठ महाविद्यालये, तुकड्या बंद होण्यासह येथील शिक्षक अतिरिक्त ठरण्याचा धोका निर्माण झाला आहे.

अकरावी प्रवेशाच्या तीन फेऱ्या संपून आता विशेष फेरीमधून प्रवेश सुरू आहेत. मात्र, मुख्य फेऱ्या झाल्या असून राज्यातील सहा महापालिका क्षेत्रातील शहरांमधील १ हजार ६०२ महाविद्यालयांमधील ५ लाख ५८ हजार ७७० जागांसाठी प्रवेश झाले. यातील केवळ २ लाख ३८ हजार ७४४ जागांवर प्रवेश झाले असून ३ लाख २० हजार २६ जागा रिक्त आहेत. मागील वर्षी मुंबईमध्ये अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेत १ लाख ०८ हजार जागा रिक्त राहिल्या होत्या. यात सर्वात जास्त विज्ञान शाखेच्या ४६,९२०, त्यानंतर वाणिज्यच्या ४२,५२३ तर कला शाखेच्या १६,२२४ जागा रिक्त होत्या. अशीच स्थिती पुणे, नागपूर व अन्य शहरांतील होती. यंदा मुंबईच्या रिक्त जागांमध्ये तब्बल ८० हजारांनी वाढ झाली आहे. नागपूर, पुणे, औरंगाबाद, नाशिक आणि अमरावतीतही रिक्त जागांमध्ये मोठी वाढ झाली आहे. शहरातील कनिष्ठ महाविद्यालयांसाठी ही धोक्याची घंटा असल्याचे बोलले जात आहे. यंदा मराठा आरक्षणाच्या स्थगितीमुळे अकरावीचे ऑनलाइन प्रवेश थांबले होते. त्यामुळेही विद्यार्थ्यांनी ग्रामीण भागाकडे आपला मोर्चा वळवल्याने शहरी भागातील महाविद्यालयांना त्याचा फटका बसला आहे.

| शहर | प्रवेश क्षमता | झालेले प्रवेश | रिक्त जागा |
|---|---|---|---|
| मुंबई | ३,२०,९३० | १,३५,४३० | १,८४,९६० |
| पुणे | १,०७,०३० | ४५,४४५ | ६१,५८५ |
| नागपूर | ५९,२५० | २४,७९० | ३४४६० |
| नाशिक | २५,२७० | १२,३६७ | १२,९०३ |
| औरंगाबाद | ३१,४७० | १२,४२९ | १९,०४१ |
| अमरावती | १५,३६० | ८,२८३ | ७,०७७ |
| एकूण | ५,५८७७० | २,३८७४४ | ३,२०,०२६ |

**कारणे काय?**

शिकवणी वर्गांमधील विद्यार्थी इयत्ता अकरावी आणि बारावीच्या दोन्ही वर्षी पूर्ण वेळ शिकवणीमध्येच देतात. केवळ प्रात्यक्षिक परीक्षेपुरता त्यांचा महाविद्यालयांशी संबंध असतो. विद्यार्थ्यांना महाविद्यालयात न पाठवता उपस्थिती लावावी, असा छुपा करार शिकवणी वर्ग आणि कनिष्ठ महाविद्यालयात झालेला असतो. ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेमुळे आपल्या शिकवणीतील विद्यार्थ्याला नेमक्या कुठल्या महाविद्यालयात प्रवेश मिळेल हे निश्चित नसते. त्यामुळे या सर्व प्रक्रियेतून बाहेर पडण्यासाठी शिकवणी वर्ग शहरालगतच्या महाविद्यालयांमध्ये प्रवेशाला प्राधान्य देतात. परिणामी, शहरी महाविद्यालयांमधील जागा रिक्त राहतात.

लोकसत्ता Wed, 30 December 2020 https://epaper.loksatta.com/c/57382195



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# शंभरहून अधिक नवे अभ्यासक्रम 'स्वयम्' संकेतस्थळावर उपलब्ध

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी)पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील शंभरहून अधिक अभ्यासक्रम स्वयम् संकेतस्थळाद्वारे ऑनलाइन शिकण्यासाठी उपलब्ध करून दिले आहेत. त्यात पदवी स्तरावरील ७८ आणि पदव्युत्तर स्तरावरील ४८ अभ्यासक्रमांचा समावेश असून, जानेवारी २०२१च्या सत्रापासून हे अभ्यासक्रम शिकता येतील.

स्वयम् संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या नव्या अभ्यासक्रमांचा तपशील यूजीसीने संकेतस्थळावर उपलब्ध करून दिला आहे. विद्यापीठांमध्ये पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना श्रेयांक (क्रेडिट) घेऊन स्वयम् संकेतस्थळावरील अभ्यासक्रम करता येतात. करोना संसर्गामुळे यूजीसीने स्वयम् संकेतस्थळावरील अभ्यासक्रमांसाठीची मर्यादा ४० टक्क्यांपर्यंत वाढवली आहे. हे अभ्यासक्रम विनामूल्य असून विद्यार्थ्यांना केवळ परीक्षा शुल्क भरावे लागते. राष्ट्रीय परीक्षा मंडळाकडून (एनटीए) परीक्षा घेतली जाते.

पदवी आणि पदव्युत्तर स्तरावर उपलब्ध करण्यात आलेले नवे अभ्यासक्रम बहुविद्याशाखीय, व्यवस्थापन, संगणकशास्त्र, विज्ञान, वाणिज्य, विधी, मानव्यता आणि समाजशास्त्र अशा विविध विद्याशाखांतील आहेत.

Loksatta: 30.12.2020

पुढारी

# यूजीसीकडून 'स्वयम'वर नवे अभ्यासक्रम उपलब्ध

पुणे : विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) पदवी आणि पदव्युत्तर स्तरावरील शंभरहून अधिक अभ्यासक्रम 'स्वयम'वर ऑनलाइन शिकण्यासाठी उपलब्ध करून दिले आहेत. त्यात पदवी स्तरावरील ७८ आणि पदव्युत्तर स्तरावरील ४८ अभ्यासक्रमांचा समावेश असून, जानेवारी २०२१च्या सत्रापासून हे अभ्यासक्रम शिकता येणार आहेत.

'स्वयम' संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या नव्या अभ्यासक्रमांचा तपशील यूजीसीने उपलब्ध करून दिला आहे. विद्यापीठांमध्ये पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना श्रेयांक घेऊन 'स्वयम' संकेतस्थळावरील अभ्यासक्रम करता येतात. कोरोना संसर्गामुळे यूजीसीने अभ्यासक्रमांसाठीची मर्यादा ४० टक्क्यांपर्यंत वाढवली आहे. हे अभ्यासक्रम विनामूल्य असून विद्यार्थ्यांना केवळ परीक्षा शुल्क भरावे लागते. राष्ट्रीय परीक्षा मंडळाकडून (एनटीए) परीक्षा घेतली जाते. पदवी आणि पदव्युत्तरस्तरावर उपलब्ध करण्यात आलेले अभ्यासक्रम बहुविद्याशाखीय, व्यवस्थापन, संगणकशास्त्र, विज्ञान, वाणिज्य, विधी, मानव्यता आणि समाजशास्त्र अशा विविध विद्याशाखांतील आहेत.

Pune Edition
Dec 30, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# विद्यापीठ रिक्त जागांवरील प्रवेशासाठी प्रक्रिया राबवणार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदविका, प्रमाणपत्र आणि पदव्युत्तर विभागाच्या प्रवेशाच्या काही जागा रिक्त राहिल्या आहेत. या रिक्त जागांवरील प्रवेशासाठी विद्यापीठामार्फत प्रवेशप्रक्रिया राबविण्यात येणार आहे. त्यासाठी अर्ज करण्यासाठी ३० डिसेंबर ते ८ जानेवारी या मुदतीत अर्ज करावे लागणार आहेत.

विद्यापीठातील विविध पदव्युत्तर विभाग, पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रम प्रवेशासाठी यापूर्वीच प्रवेशप्रक्रिया राबविण्यात आली होती. त्यानुसार प्रवेश परीक्षा घेऊन गुणवत्तेनुसार विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला आहे. मात्र त्यानंतरही काही जागा रिक्त असल्याचे दिसून आले. त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी संधी देण्याचा निर्णय घेतला आहे.

विशेषत: संस्कृत, पाली, मराठी विषयाच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या जागा मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा नाही. मात्र पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश परीक्षा द्यावी लागणार आहे. विद्यार्थ्यांना कोणत्या विभागात किती जागा रिक्त आहेत, त्याची यादी संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. त्यानुसार विद्यार्थ्यांनी अर्ज करावेत, असे आवाहन विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रवेश विभागाने केले आहे.

Pune Edition
Dec 30, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2020*

Section: Education

पुढारी

# शाळा सुरू करण्याबाबत पुनर्विचार शक्य

पुणे : पुढारी वृत्तसेवा

**संमतीपत्रांना पालकांचा पुन्हा अल्प प्रतिसाद**

शहरातील महापालिकेच्या आणि खासगी शाळा येत्या ४ जानेवारीपासून सुरू करण्यासंदर्भात पालकांचा पुन्हा एकदा अल्प प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे शाळा सुरू करण्याचा पुनर्विचार होऊ शकतो, असे मत महापौर मुरलीधर मोहोळ यांनी व्यक्त केले आहे.

कोरोना साथीमुळे गेले सात ते आठ महिने बंद असलेल्या शाळा २३ नोव्हेंबरपासून सुरू करण्याचा आदेश शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी यापूर्वीच दिला आहे. हा आदेश काढताना त्यांनी शाळा सुरू करण्याचा निर्णय स्थानिक पातळीवर घेण्याची मुभा दिली. शासनाच्या आदेशानुसार पालिका प्रशासनाने ९ वी ते १२ वीपर्यंतच्या शाळा सुरू करण्याची तयारी सुरू केली होती. मात्र, केंद्रीय पथकाने दिवाळीनंतर कोरोनाची दुसरी पान २ वर

Pune Edition
Dec 30, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

## शाळा सुरू करण्याबाबत पुनर्विचार शक्य

लाट येईल, असा अंदाज व्यक्त केल्याने शाळा सुरू करण्यास पालकांनी प्रतिसाद दिला नाही. त्यानुसार शहरातील शाळा सुरू करण्याचा निर्णय १४ डिसेंबरला घेतला जाईल, असे जाहीर करण्यात आले होते. त्यानंतर पुन्हा एकदा शाळा सुरू करण्याचा निर्णय ३ जानेवारीनंतर घेतला जाईल, असे जाहीर करण्यात आले. त्यानुसार काही दिवसांपूर्वी महापालिका आयुक्तांनी शहरातील ९ वी ते १२ वीपर्यंतच्या पालिकेच्या व खासगी शाळा ४ जानेवारीपासून सुरू करण्याचे आदेश काढले आहेत.

तत्पूर्वी शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या पालकांचे संमतीपत्र घेण्यात येत आहे. मात्र, संमतीपत्र देण्यास पुन्हा एकदा पालकांनी अल्प प्रतिसाद दिला आहे. पुढील तीन-चार दिवसांत किती पालकांची संमतीपत्रे प्राप्त होतात, ही बाब व कोरोना विषाणूच्या नव्या प्रकाराचा संसर्ग विचारात घेऊन, शाळा सुरू करण्याबाबत पुनर्विचार होऊ शकतो, असे महापौर मोहोळ यांनी सांगितले.

**निम्म्या पालकांचाही प्रतिसाद नाही :** पुणे महापालिकेच्या शाळेतील ९ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांची संख्या सुमारे ८ हजार आहे. यापैकी आजमितीला केवळ २ हजारांच्या आसपास संमतीपत्रे प्राप्त झाली आहेत. ही संख्या विचारात घेता अद्याप ५० टक्के पालकांनीही पाल्यांना शाळेत पाठविण्यास असमर्थता दर्शविली आहे.

नवभारत

# कॉलेज खुलने के बाद ही होंगे प्रैक्टिकल

नवभारत न्यूज नेटवर्क

**पुणे.** सावित्रीबाई फुले पुणे यूनिवर्सिटी (SPPU) के वर्तमान शैक्षिक वर्ष के सेमिस्टर की प्रैक्टिकल व मौखिक परीक्षाएं (VIVA या ORAL) कॉलेज खुलने के बाद ली जाएंगी. यूनिवर्सिटी की ओर से यह जानकारी दी गई. बता दें कि कोरोना महामारी की वजह से ये परीक्षाएं स्थगित की गई थी. यूनिवर्सिटी द्वारा जारी सर्कुलर के अनुसार फर्स्ट सेमिस्टर की प्रैक्टिकल तथा दूसरे सेमिस्टर की VIVA कॉलेज खुलने के बाद लेने का निर्णय लिया गया है. इससे विद्यार्थियों का असमंजस दूर हो गया है. कोरोना के मद्देनजर अभी कॉलेज नहीं खुले हैं. इस वजह से इंजीनियरिंग, आर्किटेक्ट, साइंस आदि पाठ्यक्रमों के फर्स्ट सेमिस्टर के प्रैक्टिकल व VIVA को लेकर विद्यार्थियों में असमंजस पैदा हो गया था. परीक्षा लेते समय किसी भी तरह की बाधा न आये इसलिए यूनिवर्सिटी ने रेगुलर विद्यार्थियों के फर्स्ट सेमिस्टर सिर्फ ऑनलाइन रिजल्ट घोषित करने का निर्णय लिया है.

Pune Edition
30-december-2020 Page No. 4
epaper.enavabharat.com



## *News Paper Clippings During December 2020*

Section: Education

# SPPU students seek clarity over first-semester exams

**Since major chunk of syllabus has been covered online, pupils want to start next term soon**

| Sukhada.Khandge
@timesgroup.com
TWEETS @Sukhadak_Mirror

After classes for the first semester of the new academic year of all the courses of Savitribai Phule Pune University (SPPU) commenced online from July this year in view of the coronavirus pandemic, students have now sought clarity regarding the end timeline of the semester and rest of the scholastic year. Students have claimed that most of the syllabus has been covered in the online classes during the lockdown. Traditionally, the new semester for the varsity courses starts from December for students in all the three years. With most of their course materials completed, students have now sought clarity over the term-end examination for their ongoing semester.



FILE PHOTO

Pupils also want exams to be held online and not in the offline way

Commenting on the matter, a final-year undergraduate student from the science stream said, "Our classes began online in July and most of the syllabus has already been completed. Usually by this time, we get done with the first-semester examinations and even get started with our second-semester classes. As of now, we have not received any information about when the end-term exams will take place."

Another student from the commerce stream suggested, "If our semester classes were held online, then our tests should also be conducted through the digital mode. If the examinations are now conducted in the offline manner, then a lot of time will be wasted in completing the entire process, leading to further delay for the students to start with the next semester. It would be beneficial for the students if exams are scheduled online. Also, the exams should be conducted as soon as possible."

SPPU officials, on their part, have confirmed that the planning for the first-semester examinations has begun, but the format for holding the tests is yet to be decided. The varsity is expected to conduct the exams from end-January and get done with the tests by February.

Officials also confirmed that the decision on reopening the colleges will be taken soon. Once that gets decided, a board of examination meeting will take a call on scheduling end-term exams for the first-semester courses.

Elaborating on the issue, MG Chaskar, dean, science and technology department, SPPU, said, "The planning to reopen the colleges has just begun and we hope to come to a decision soon. The board of examination meeting will further discuss whether exams for the first semester will be held online or physically."

Officials also confirmed that around 90 per cent of the syllabus have been covered through online classes. They hope to plan on holding the exams accordingly so that the second semester classes do not get delayed.

Pune Mirror: 30.12.2020

**मटा अँकर** विद्यार्थ्यांना शाळेत पाठविण्याबाबत बहुतांश पालक अद्यापही अनुत्सुक

# पुण्यातील शाळांचे 'अनलॉक' लांबणीवर

म. टा. प्रतिनिधी, पुणे



> ब्रिटनमध्ये करोनाचा वेगळा विषाणू आढळल्यानंतर मुंबईतील शाळा १५ जानेवारीपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय मुंबई महापालिकेने नुकताच घेतला. या पार्श्वभूमीवर, पुण्यातील शाळांबाबत स्थानिक परिस्थिती, पालकांची भूमिका लक्षात घेऊन चार जानेवारी रोजी निर्णय घेण्यात येईल.
> 
> - मुरलीधर मोहोळ, महापौर, पुणे

करोनामुळे बंद झालेली शहरातील शाळांची दारे पुन्हा उघडण्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पुणे महापालिकेच्या हद्दीतील शाळा सुरू करण्याबाबत चार जानेवारी रोजी निर्णय घेतला जाणार आहे. परंतु, करोनाची दुसरी लाट आणि ब्रिटनमध्ये आढळलेल्या दुसऱ्या प्रकारच्या विषाणूमुळे पालकांमध्ये वाढलेल्या भीतीच्या पार्श्वभूमीवर शाळा सुरू करण्याचा निर्णय आणखी पुढे ढकलला जाण्याचीच शक्यता आहे.

अनलॉक प्रक्रियेअंतर्गत राज्य सरकारने २३ नोव्हेंबरपासून राज्यातील नववी ते बारावीपर्यंतच्या शाळा सुरू करण्यास परवानगी दिली होती. त्यासाठी पालकांचे लेखी संमतिपत्र बंधनकारक करण्यात आले होते. शाळा सुरू करण्यासंदर्भात सरकारने मार्गदर्शक सूचनाही प्रसिद्ध केल्या होत्या. परंतु, करोनाच्या रुग्णांची वाढती संख्या आणि पालकांचा नकार यामुळे पुणे, मुंबई, ठाणे या शहरांसह अन्य काही शहरांमधील शाळा डिसेंबरअखेरपर्यंत बंद ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परिस्थितीचा आढावा घेतल्यानंतरच हा निर्णय घेतला जाईल, असे प्रशासनाने वारंवार स्पष्ट केले होते.

सरकारच्या मार्गदर्शन सूचनांनुसार नववी ते बारावीच्या पाल्यांना शाळेत पाठविण्यासाठी पालकांचे संमतिपत्र आवश्यक आहे. परंतु, करोनाची दुसरी लाट, ब्रिटनमधील करोना विषाणूचा नवा प्रकार यामुळे बहुसंख्य पालकांची विद्यार्थ्यांना शाळेत पाठविण्याची तयारी नाही. बहुतेक शाळांनी केलेल्या चाचपणीत ६० ते ७० टक्के पालकांचा विद्यार्थ्यांना शाळेत पाठविण्यास विरोध असल्याचे स्पष्ट झाले. अनेक पालकांनी तर संमतिपत्राविषयीच्या ई-मेल किंवा पत्राला उत्तरही दिलेले नाही. त्यातच लॉकडाउन झाल्यानंतर काही विद्यार्थी अद्याप त्यांच्या मूळ गावीच आहेत. परिस्थिती सर्वसाधारण झाल्यानंतरच विद्यार्थ्यांना शाळेत पाठवण्याची पालकांची भूमिका आहे. सरकारने घालून दिलेले नियम पाल्यांकडून पाळले जातीलच, याची खात्री नसल्याने पालकांकडून शाळा सुरू करण्यास विरोध होत आहे.

Maharashtra Times: 31.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

Section: Education

प्रभात पुणे, गुरुवार, दि. ३१ डिसेंबर २०२० || ५

# टीचर्स ट्रेनिंग ॲकॅडमीवरून झाडाझडती

## पैसे देऊनही इमारत रखडली : उच्च शिक्षणमंत्री सामंत यांनी घेतले फैलावर

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. ३० - टीचर्स ट्रेनिंग ॲकॅडमीचे बांधकाम दिलेल्या मुदतीत पूर्ण न झाल्याने राज्याचे उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी बुधवारी तंत्रशिक्षण, एमएसबीटीई, उच्चशिक्षण तसेच बांधकामाशी संबंधित सर्वांची झाडाझडती घेतली. त्यावेळी बांधकाम वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणासाठी महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या (एमएसबीटीई) जागेत टीचर्स ट्रेनिंग ॲकॅडमी सुरू करण्यात येणार आहे. त्यासाठी मॉडेल कॉलनीत सुसज्ज इमारत उभारण्यात येत आहे. मात्र, या इमारतीचे बांधकाम सहा वर्षांपासून रेंगाळले आहे. त्यामुळे या बांधकामाचा आढावा सामंत यांनी यापूर्वी ऑगस्टमध्ये घेतला होता. त्यावेळी निम्म्याहून अधिक रक्कम देऊनसुद्धा त्याप्रमाणात कामच झाले नसल्याचे दिसून आले.



त्यावेळी काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या होत्या. या बैठकीत ॲकॅडमीचे उद्घाटन १ जानेवारीला मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत होणार असल्याचे जाहीर केले होते. मात्र, प्रत्यक्षात इमारतीचे अजूनही बांधकामच पूर्ण झाले नाही. त्यामुळे बुधवारी झालेल्या आढावा बैठकीत सामंत यांनी प्रकल्प पूर्ण करण्यास प्राधान्य देण्याचे आदेश दिले आहेत. दरम्यान, या इमारतीत ॲकडमी आणि तंत्रशिक्षण मंडळाचे कार्यालय होणार आहे. सध्या एमएसबीटीईसाठी आवश्यक काम बंद असून ॲकॅडमीच्या कामाला प्राधान्य देण्यात येत आहे. या इमारतीत कॅन्टिन, निवासाची सोय, अद्ययावत स्टुडिओ तसेच परदेशी पाहुण्यांसाठी तीन व्हीव्हीआयपी रूम तयार करण्यात येणार आहे.

# पुण्यातील महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय लांबणीवर

पुणे, ता. ३० : शहरातील माध्यमिक शाळांमधील नववी ते बारावीचे वर्ग येत्या सोमवारपासून (ता. ४) सुरू होणार असले, तरी महाविद्यालये सुरू होण्यासाठी आणखी प्रतीक्षा करावी लागण्याची शक्यता आहे.

महाविद्यालये सुरू करण्याबाबत स्थापन केलेल्या समितीची पहिली बैठक आज झाली; मात्र कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही. या समितीची दुसरी बैठक सोमवारी (ता. ४) होणार आहे. तीत महाविद्यालये सुरू करण्याबाबत निर्णय होण्याची शक्यता आहे.

माध्यमिक शाळांमधील नववी ते बारावीचे वर्ग सुरू करण्याला हिरवा कंदील मिळाल्यानंतर महाविद्यालये सुरू करावीत, अशी मागणी जोर धरू लागली आहे. त्यामुळे विद्यापीठाने महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भात अहवाल सादर करण्यासाठी समिती स्थापन केली आहे. महाविद्यालय सुरू करण्यासाठी कोणती खबरदारी घ्यावी, बैठकव्यवस्था कशी असावी? सुरुवातीला अंतिम वर्षाच्या किंवा विशेष विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांचे वर्ग सुरू करता येतील का? अशा विविध विषयांवर बैठकीत चर्चा केल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाने दिली.

Sakaal: 31.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

Section: Education

# महाविद्यालये सुरू करण्यासाठी ४ जानेवारीला बैठक

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालये सुरू करण्यासाठी स्थापन केलेल्या समितीची बुधवारी पहिली बैठक घेण्यात आली. मात्र, अद्याप महाविद्यालये सुरू करण्याबाबत अंतिम निर्णय झालेला नाही. आता या समितीची दुसरी बैठक येत्या ४ जानेवारी रोजी होणार आहे.

कोरोनानंतर बंद केलेली महाविद्यालये सुरू करावी, अशी मागणी काही दिवसांपासून जोर धरू लागली आहे.



त्यामुळे विद्यापीठाने महाविद्यालय सुरू करण्यासंदर्भात अहवाल सादर करण्यासाठी समिती स्थापन केली आहे. या समितीमध्ये विविध विद्या शाखांमधील प्राध्यापक व प्राचार्य यांचा समावेश आहे. महाविद्यालय सुरू करण्यासाठी कोणती खबरदारी घ्यावी?

महाविद्यालय प्रशासनाकडून विद्यार्थ्यांची सुरक्षित व आरोग्यदायी वातावरणात बैठक व्यवस्था करता येऊ शकते का?, सुरवातीला अंतिम वर्षाच्या किंवा स्पेशल विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांचे वर्ग सुरू करता येतील का?, विज्ञान विषयाचे प्रॅक्टिकल्स सुरु करणे उचित ठरेल का? यांबाबत बैठकीत चर्चा केल्याचे समजते.

समितीकडून तयार केलेला अहवाल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर आणि विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेसमोर ठेवला जाणार आहे. त्यानंतरच महाविद्यालय सुरू करण्याबाबत अंतिम निर्णय होईल, असे सूत्रांनी सांगितले.

Lokmat: 31.12.2020

पुढारी

# साडेअकरा हजार विद्यार्थ्यांचे प्रवेश

पुणे : पुढारी वृत्तसेवा

अकरावी प्रवेशासाठी जाहीर झालेल्या विशेष फेरीच्या गुणवत्ता यादीत १७ हजार ७२२ विद्यार्थ्यांना प्रवेश जाहीर झाला आहे. यातील तब्बल ११ हजार ५३६ विद्यार्थ्यांनी बुधवारपर्यंत प्रवेश घेतला आहे. प्रवेशासाठी आज दि. ३१ रोजी शेवटची संधी राहणार असून, १ जानेवारीला रिक्त जागा जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती उपसंचालक कार्यालयातून देण्यात आली आहे.

पुणे आणि पिंपरी चिंचवड परिसरातील ज्युनिअर कॉलेजांमध्ये प्रवेशासाठी अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. अकरावी प्रवेशासाठी ३०४ महाविद्यालयांमध्ये १ लाख ७ हजार ३० जागा उपलब्ध आहेत. यातील ५६ हजार ८२० विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश निश्चित केले आहेत. प्रवेशासाठी अद्यापही ५० हजार २१० जागा रिक्त असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे दहावीच्या पुरवणी परीक्षेतील विद्यार्थ्यांसह अन्य विद्यार्थ्यांना देखील प्रवेशाची संधी मिळणार असल्याचे दिसून येत आहे.

Pune Edition
Dec 31, 2020 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2020*

Section: Education

# महाविद्यालये सुरू करण्याबाबत अद्याप अनिश्चितताच

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये प्रत्यक्ष अध्यापन सुरू होण्याबाबत अद्याप अनिश्चितताच आहे. महाविद्यालये सुरू करण्याबाबत विद्यापीठाकडून हालचाली सुरू करण्यात आल्या असल्या, तरी अद्याप त्याबाबत निर्णय झालेला नाही.

करोना संसर्गामुळे महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे शिक्षण ऑनलाइन पद्धतीने सुरू आहे. राज्यात नववी ते बारावीचे वर्ग सुरू करण्यास राज्य शासनाने मान्यता दिल्यामुळे महाविद्यालयांमध्ये शैक्षणिक कामकाज सुरू करण्यासंदर्भातील चर्चा सुरू झाली. या पार्श्वभूमीवर पुणे, नगर आणि नाशिक जिल्ह्यातील संलग्न महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भात विद्यापीठाने व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. व्ही. बी. गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आहे. या समितीची बुधवारी बैठक झाली. या बैठकीत सध्या सुरू असलेली प्रवेश प्रक्रिया, प्रथम सत्रातील विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिके, करोनाच्या नव्या प्रकाराच्या संसर्गाची शक्यता अशा विविध मुद्द्यांवर चर्चा झाली. प्रथम सत्रातील प्रात्यक्षिकांचे काम पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना टप्प्याटप्प्याने महाविद्यालयात बोलवता येऊ शकेल का, या संदर्भातही आढावा घेण्यात आला.

समितीची ४ जानेवारीला पुन्हा एक बैठक होणार आहे. त्या बैठकीत एकूण परिस्थितीचा सर्वंकष आढावा घेऊन महाविद्यालये प्रत्यक्ष सुरू करण्याबाबत समितीच्या शिफारशी असलेला अहवाल कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांना सादर करण्यात येईल. त्यानंतर कुलगुरूंकडून महाविद्यालये सुरू करण्याबाबतचा निर्णय जाहीर करण्यात येईल, अशी माहिती समिती सदस्यांनी दिली.

> महाविद्यालयांमध्ये प्रत्यक्ष अध्यापन प्रक्रिया सुरू करण्याबाबत प्राचार्यांकडून अनुकूलता दर्शवण्यात आली आहे. त्या संदर्भात वेळोवेळी प्राचार्यांशी संवाद साधून त्यांची मते विचारात घेण्यात आली. आता ४ जानेवारीला समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर पुढील निर्णय घेतला जाईल.
>
> – डॉ. एन. एस. उमराणी, प्रकुलगुरू सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

लोकसत्ता Thu, 31 December 2020 https://epaper.loksatta.com/c/5…

२ WWW.LOKSATTA.COM गुरुवार, ३१ डिसेंबर २०२०

# प्रवेश रद्द झाल्यास संपूर्ण शुल्क परत

**नागपूर** : व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द केल्यास त्यांना संपूर्ण शुल्क परत करण्यात यावे, असे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) दिले आहेत.

'यूजीसी'ने नव्या शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक प्रसिद्ध करण्याबाबत मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या. त्यात विद्यार्थ्यांनी प्रवेश रद्द केल्यानंतर त्यांच्याकडून कोणत्याही प्रकारची शुल्काची कपात करू नये, असे नमूद केले आहे. टाळेबंदीमुळे पालकांचे आर्थिक नियोजन कोलमडले आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेले विद्यार्थी मुख्यतः पारंपरिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेऊ शकतात. त्यामुळे काही विद्यार्थी व्यावसायिक अभ्यासक्रमांचे प्रवेश रद्द करून दुसरीकडे प्रवेश घेण्याची शक्यता आहे. प्रवेश रद्द केल्यानंतर भरलेले शुल्क संस्थांकडून परत मिळणे शक्य नसते. अशा स्थितीत पालकांची आर्थिक परवड होऊ नये, यासाठी यूजीसीने हे स्पष्ट निर्देश दिले आहेत. तसेच डिसेंबरअखेरपर्यंत एक हजार रुपयांपर्यंत प्रक्रिया शुल्क कमी करून बाकी सर्व शुल्क परत करण्यात यावे, असेही यूजीसीने म्हटले आहे.

लोकसत्ता Thu, 31 … https:/…



*News Paper Clippings During December 2020*

Section: Education

# शिक्षक प्रशिक्षण अकादमीचे बांधकाम अद्याप अपूर्णच

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : राज्यातील शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठीच्या शिक्षक प्रशिक्षण अकादमीचे काम अद्याप अपूर्णच असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते १ डिसेंबरला शिक्षक अकादमीच्या इमारतीचे उद्घाटन करण्याची उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांची घोषणा प्रत्यक्षात आलेली नाही.

शिक्षण क्षेत्रात सातत्याने होत असलेल्या बदलांचा अवलंब करण्यासाठी राज्यातील शिक्षकांना प्रशिक्षित करण्याची गरज लक्षात घेऊन शिक्षक प्रशिक्षण अकादमी (टीचर्स ट्रेनिंग अॅकॅडमी) सुरू करण्याचा निर्णय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी घेतला. त्यानुसार महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या (एमएसबीटीई) मॉडेल कॉलनी येथील जागेत शिक्षक प्रशिक्षण अकादमीची इमारत उभारण्यात येत आहे. ऑगस्टमध्ये सामंत यांनी या इमारतीला भेट देऊन कामाचा आढावा घेतला होता. त्या वेळी या कामासाठी निम्म्याहून अधिक रक्कम देऊनही काम होत नसल्याने त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांची झाडाझडती घेऊन तातडीने काम पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या.

त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत १ डिसेंबरला या इमारतीचे उद्घाटन करण्यात येणार असल्याची माहिती सामंत यांनी दिली होती. प्रत्यक्षात या इमारतीचे काम अद्यापही पूर्ण झालेले नाही.

या पार्श्वभूमीवर सामंत यांनी मंगळवारी पुन्हा इमारतीच्या कामाची पाहणी करून अधिकाऱ्यांची बैठक घेतली. लवकरात लवकर प्रकल्प पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

### माहिती न देण्याची सूचना

सामंत यांनी घेतलेल्या बैठकीसंदर्भात माहिती घेण्यासाठी एमएसबीटीईच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधला असता माध्यमांना बैठकीबाबत माहिती न देण्याची सूचना सामंत यांनी दिल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

लोकसत्ता Thu, 31 December 2020 https://epaper.loksatta.com/c/57401976

## *News Paper Clippings During December 2020*

Section: Education

डॉ. सौमित्र आठवले यांचे वडील प्रा.व्ही.के.आठवले हे मॉडर्न महाविद्यालय पुणे ५ येथे गणित विभागात प्राध्यापक होते त्यांचे अभिनंदन.



आई डॉ. रोहिणी व वडील प्रा. विनायक आठवले यांच्यासोबत सौमित्र.

# पुणेरी रसायनशास्त्रज्ञाचा जगभरामध्ये डंका !

### डॉ. सौमित्र आठवले यांनी १३२ संघांना नमवले

सकाळ EXCLUSIVE

**पुणे, ता. १४ :** पुण्यातील भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेचा (आयसर) माजी विद्यार्थी असलेल्या डॉ. सौमित्र आठवले यांच्या बुद्धिमत्तेचा डंका जगभरात वाजला आहे. रसायनशास्त्रात प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या 'मर्क कंपाउंड चॅलेंज' या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत आठवले याने बाजी मारत जगभरातील तब्बल १३२ संघांना नमवले आहे. एका विशिष्ट रसायनांच्या निर्मितीचा मार्ग सौमित्रने ९६ तासांच्या स्पर्धेत यशस्वीरीत्या शोधला आहे.

सौमित्रचे वडील प्रा. विनायक आठवले सांगतात, "लहानपणापासूनच संशोधनात करिअर करायचे सौमित्रने ठरविले होते. त्यामुळे आयआयटीत मिळणारा प्रवेश नाकारून त्याने 'आयसर'मध्ये पदवी शिक्षण घेऊन संशोधनात करिअर करण्याचा निर्णय घेतला. रसायनशास्त्रज्ञ स्कॉट डेन्मार्क यांच्याकडे त्याने पीएच.डी. केली आणि विविध शोधनिबंध शोधपत्रिकांमध्ये प्रसिद्ध केले."

'आयसर'मध्ये पदवी शिक्षण पूर्ण केल्यानंतर सौमित्रने अमेरिकेतील इलिनॉय विद्यापीठात

पान ५ वर »

### काय आहे 'मर्क कंपाउंड चॅलेंज' ?

- रसायनशास्त्रातील प्रसिद्ध संस्थेतर्फे जगभरातील संशोधकांना एका विशिष्ट प्रकारच्या रसायनाचे उदाहरण दिले जाते.
- एखादे विशिष्ट रसायन (कंपाउंड) विकसित करण्यासाठी रेणूला त्याचा प्रवास करण्यासाठी रसायनशास्त्राचा आधार घेत सर्वोत्तम असा मार्ग निर्माण करून द्यायचा असतो.
- यासाठी स्पर्धकांना ९६ तासांचा अवधी दिला जातो. स्पर्धेत वैयक्तिक किंवा संघासह सहभागी होता येते.
- स्पर्धेच्या पहिल्या भागात प्रत्येक स्पर्धकाला उर्वरित आठ जणांचा रासायनिक मार्ग तपासायला दिला जातो. त्यातून सर्वोत्तम दहा स्पर्धक निवडले जातात. दुसऱ्या भागात या दहा स्पर्धकांचे रासायनिक मार्ग जर्मनी येथे मर्कच्या प्रयोगशाळेत तपासले जातात. विजेत्यांना दहा हजार युरोचे बक्षीस दिले जाते.

# पुणेरी रसायनशास्त्रज्ञाचा जगभरात डंका

» पान १ वरून

पीएच.डी. पूर्ण केली. सध्या कॅल्टेक येथे नोबेल विजेत्या प्रा. फ्रान्सिस अर्नोल्ड यांच्याकडे तो पोस्टडॉक करत आहे.

सौमित्रने शोधलेला रासायनिक मार्ग हा सर्वोत्तम ठरला आहे. त्याच्यासोबत जर्मनीतील एक चमूही विजेता ठरला. या दोन्ही चमूंना दहा हजार युरोचे बक्षीस विभागून दिले. सौमित्र सध्या कॅलिफोर्निया इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये पोस्ट डॉक्टरल स्कॉलर आहे.

**'आयसर'मध्ये रचला गेलेला संशोधनाचा पाया यासाठी खूप उपयुक्त ठरला आहे. तरुण विद्यार्थ्यांनी आपल्याला आवडेल त्या क्षेत्रात करिअर करावे. हे करत असताना त्यामध्ये झोकून देण्याची तयारी असावी. याचबरोबर परिस्थिती आणि व्यवहार्यता याचा विचार करूनही निर्णय घ्यावा.**

**– डॉ. सौमित्र आठवले, संशोधक**



## *News Paper Clippings During December 2020*

Section: Education

क्रीडा व्यवस्थापन व खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी निर्णय

# पुणे विद्यापीठ-डेक्कन जिमखाना यांच्यात सामंजस्य करार



**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १५** - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि डेक्कन जिमखाना यांच्यात क्रीडा व्यवस्थापन व खेळाडूंना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने नुकतेच सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, नवोपक्रमच्या संचालिका डॉ. अपूर्वा पालकर, डेक्कन जिमखान्याचे सरचिटणीस मिहिर केळकर, विश्वास लोकरे, श्रीरंग गोडबोले उपस्थित होते.

या कराराद्वारे विद्यापीठात क्रीडा विषयक नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. या विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी जिमखाना उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासाठी आवश्यक सुविधा विद्यापीठातर्फे उपलब्ध करून दिले जाईल. कराराद्वारे विद्यार्थ्यांना डेक्कन जिमखाना येथील क्रीडा तज्ज्ञांकडून मार्गदर्शन देण्यात येणार आहे. डेक्कन जिमखाना यांच्या देश, विदेशातील क्रीडा क्लबच्या असलेल्या संलग्निकरणाचा फायदा विद्यार्थ्यांना होणार आहे.

कुलगुरू डॉ. करमळकर म्हणाले, 'क्रीडा विषयक दर्जेदार व व्यावसायिक प्रशिक्षण हे विद्यार्थ्यांना अत्यंत गरजेचे आहे. विद्यापीठाने सर्व क्षेत्रांमध्ये उत्कृष्ट दर्जाची कामगिरी केली असून, क्रीडा या विषयात या कराराद्वारे उत्कृष्ट दर्जाचे खेळाडू तयार होण्यास मदत होईल.'

Prabhat: 16.12.2020

# विद्यार्थ्यांसाठी नवीन क्रीडा अभ्यासक्रम

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

क्रीडा व्यवस्थापनातील स्टार्टअप कंपन्या आणि खेळाडूंना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये क्रीडा विषयक नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. त्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि डेक्कन जिमखाना यांच्यामध्ये सोमवारी करार करण्यात आला. या वेळी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, डेक्कन जिमखान्याचे सरचिटणीस विश्वास लोकरे, मिहिर केळकर, श्रीरंग गोडबोले आदी मान्यवर उपस्थित होते.

क्रीडा आणि क्रीडा व्यवस्थापन या विषयांत नवकल्पना व नवप्रकल्पांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने विद्यापीठाच्या नवउपक्रम, नवसंशोधन व उपक्रम मंडळाद्वारे विविध कार्यक्रम कार्यान्वित करण्यात येणार आहेत. या विद्यार्थ्यांना डेक्कन जिमखाना येथील क्रीडा तज्ज्ञ यांच्याकडून मार्गदर्शन देण्यात येणार आहे. या कराराद्वारे विद्यापीठ व डेक्कन जिमखान्यातर्फे विविध सेमिनार आणि कार्यशाळाही आयोजित केल्या जाणार आहेत.

**"विद्यार्थ्यांना क्रीडाविषयक दर्जेदार व व्यावसायिक प्रशिक्षण मिळणे अत्यावश्यक आहे. त्या हेतूने केलेल्या या कराराद्वारे उत्कृष्ट दर्जाचे खेळाडू तयार होण्यास मदत होईल.**

**– डॉ. नितीन करमळकर,** कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि डेक्कन जिमखाना या दोन नामवंत संस्था एकत्र आल्या आहेत. त्यामुळे आगामी काळात विद्यार्थी क्रीडा क्षेत्रात भरीव कार्य करतील याची खात्री आहे.**

**– विश्वास लोकरे,** सरचिटणीस, डेक्कन जिमखाना

Maharashtra times: 16.12.2020

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

# SPPU signs MoU to help startups

TIMES NEWS NETWORK

**Pimpri Chinchwad:** A start-up incubation centre under the Pimpri Chinchwad Smart City Limited on Tuesday signed an MoU with the Savitribai Phule Pune University's (SPPU) Centre for Innovation, Incubation, and Enterprise to support new industries.

"The MoU will facilitate necessary support, guidance and space for the establishment of new industries/businesses for the budding entrepreneurs through the incubation centre," an official from the start-up incubation centre said.

"Every year, thousands of young people in Pimpri Chinchwad explore the possibility of starting their own businesses. The start-up incubation centre will guide them," the official said.

The official stated that SPPU's innovation centre will identify emerging entrepreneurs, formulate policies for them, provide counselling and technical help, and assist them in contacting potential investors.

The Pimpri Chinchwad start-up incubation centre was established on December 25 last year, a special purpose vehicle under the Pimpri Chinchwad Smart City Limited. The SPPU's CIIE will now assist it for programme planning, procedures, skill development and capacity building.

The official added that they held various events in the past to guide the budding entrepreneurs, including pitch festival, hackathons and conferences, among others.

The Times of India: 16.12.2020

केसरी पुणे, १७ डिसेंबर २०२० ५

# स्टार्टअप इन्क्युबेशन सेंटर व पुणे विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार



पिंपरी : पिंपरी चिंचवड स्टार्टअप इन्क्युबेशन सेंटर व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेंटर फॉर इनोव्हेशन इन्क्युबेशन अण्ड एंटरप्राईज (SPPU's CIIE) यांचेमध्ये सामंजस्य करार (Memorandum of Understanding) मंगळवार, दिनांक १५/१२/२०२० रोजी सायंकाळी ४.३० वाजता पिंपरी चिंचवड स्टार्टअप इन्क्युबेशन सेंटर, ऑटोक्लस्टर डेव्हलपमेंट एॅण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट, चिंचवड येथे पार पडला. प्रसंगी, पिंपरी चिंचवड स्टार्टअप इन्क्युबेशन सेंटरच्या अधिकृत बोधचिन्हाचे अनावरणही करण्यात आले. यावेळी महापौर उषा ढोरे, सत्तारुढ पक्षनेते नामदेव ढाके, स्थायी समिती अध्यक्ष संतोष लोंढे, संचालक सचिन चिखले, आयुक्त तथा मुख्य कार्यकारी अधिकारी श्रावण हर्डीकर, अतिरिक्त आयुक्त प्रविण तुपे, सह मुख्य कार्यकारी अधिकारी निळकंठ पोमण, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कुलगुरु डॉ. नितिन करमरकर, उपकुलगुरु उमराणी सर, रजिस्टार प्रफुल्ल पवार, एक्झीबीशन सेंटर प्रमुख अपुर्वा पालकर, सिनेट सदस्य संतोष ढोरे आदी उपस्थित होते.

Kesari:: 17.12.2020

# SPPU to start sports mgmt courses, inks tie-up with Deccan Gymkhana

TIMES NEWS NETWORK

File photo



The deal was signed on Monday

**Pune:** The Savitribai Phule Pune University (SPPU) has tied up with Deccan Gymkhana for its sports management courses. It will enable sportspersons from the university to use the facilities. The deal was signed on Monday.

Vice-chancellor Nitin Karmalkar said new courses in sports management will be started. "Students who take admission under these courses will be able to train at Deccan Gymkhana. The tie-up will help in introducing modern courses in sports and sports management and experts from Deccan Gymkhana will guide the students."

Both will organise seminars and workshops. The Deccan Gymkhana was established in 1902 and many national and international sports persons have trained here.

At the SPPU, an international 400m running track, swimming pool, tennis court, indoor sports arena have been developed which can be used by the university's sportspersons and from colleges affiliated to the university.

Director of the Centre for Innovation, Incubation, and Enterprise at SPPU, Apoorva Palkar, said, "Startups in the field of sports are needed. This tie-up will ensure new ideas come about and help new entrepreneurs."

The Times of India: 16.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

लोकमत

पदविका अभ्यासक्रम होणार सुरु : साहसी क्रीडा प्रकारातील पहिलाच अभ्यासक्रम

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ देणार गिर्यारोहणाचे धडे

■ लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे/पिंपरी-चिंचवड : गिर्यारोहण या साहसी क्रीडा प्रकारातील तंत्रशुद्ध प्रशिक्षण घेण्याची संधी राज्यातील क्रीडाप्रेमींना मिळणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि गार्डीयन गिरीप्रेमी संस्थेमध्ये याबाबत नुकताच परस्पर सामंजस्य करार झाला. त्या अंतर्गत नवीन वर्षापासून विद्यापीठात पदविका आणि प्रमाणत्र अभ्यासक्रम सुरु केले जाणार आहेत.

विद्येचे माहेरघर समजल्या जाणारे पुणे विद्यापीठ साहसी क्रीडा प्रकारांचा अभ्यासक्रम घेणारी देशातील पहिली संस्था ठरणार आहे. पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर, प्र कुलगुरु डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, क्रीडा संचालक डॉ. दीपक माने, डॉ. अपूर्वा पालकर, गार्डीयन गिरीप्रेमी संस्थेचे संस्थापक संचालक उमेश झिरपे यांच्या उपस्थितीत बुधवारी (दि.१६) झालेल्या बैठकीत परस्पर सामंजस्य करार करण्यात आला.

जानेवारी-२०२१ पासून हा अभ्यासक्रम सर्वांसाठी खुला होणार आहे. पदविका अभ्यासक्रम सहा महिन्यांचा असून, प्रमाणपत्र अभ्यासक्रम तीन महिन्यांचा असेल. प्रत्येकी ३५ विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिला जाईल. या अभ्यासक्रमासाठी बारावी उत्तीर्ण झालेले उमेदवार पात्र ठरतील.

झिरपे म्हणाले, गिर्यारोहण हा साहसी क्रीडा प्रकार लोकप्रिय होत आहे. त्या माध्यमातून मोठी रोजगार निर्मिती होत आहे. डोंगरराजीत वसलेल्या गावातील नागरिकांनाही या माध्यमातून रोजगाराचे साधन उपलब्ध झाले आहे.



गिर्यारोहण अभ्यासक्रमाबाबत परस्पर सामंजस्य करारावेळी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर आणि उमेश झिरपे.

■ पुणे विद्यापीठाच्या सहकार्याने साहसी क्रीडा प्रकाराचे तंत्रशुद्ध शिक्षण मिळणार आहे. पुणे विद्यापीठ गिर्यारोहणाचे प्रशिक्षण देणारे देशातील पहिले विद्यापीठ ठरणार आहे. हा पुण्याचा मान असेल.

■ गिर्यारोहण हा क्रीडा प्रकार आता ज्यांना आवड आहे त्यांना शिकता येणार आहे. त्यामधील करिअरदेखील विद्यार्थ्यांना समजणार आहे. त्यामुळे या अभ्यासक्रमाचा उपयोग चांगला होण्याची शक्यता आहे.

### अभ्यासक्रमात काय असेल...

- गिर्यारोहण अभ्यासक्रम प्रात्यक्षिक आणि पुस्तकीज्ञान अशा दोन प्रकारांत असेल. गिर्यारोहणाची माहिती, त्यासाठी आवश्यक घटक, दगडांचा प्रकार पाहून बोल्ट लावणे, रोपचा वापर, कॅंपिंग कशापद्धतीने करावे आणि पर्यावरण अशा विविध घटकांवर प्रकाश टाकण्यात येईल.
- डोंगरराजीत जाऊन प्रात्यक्षिकही घेतले जाईल, असे गार्डियन गिरीप्रेमी संस्थेचे संस्थापक संचालक उमेश झिरपे यांनी सांगितले.

Pune Main
Page No. 5 Dec 18, 2020
Powered by: erelego.com

# विद्यापीठात गिर्यारोहणाचे धडे

म. टा. प्रतिनिधी, पुणे

गिर्यारोहणात अभ्यासपूर्ण योगदान देण्यासाठी तसेच या क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पुढाकार घेतला आहे. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांमध्ये 'गिर्यारोहण आणि संलग्न साहसी क्रीडाप्रकार' या आणखी एका नव्या अभ्यासक्रमाचा समावेश होणार आहे. या उपक्रमात विद्यापीठाला गार्डियन गिरिप्रेमी इन्स्टिट्यूट ऑफ माउंटेनीयरिंग (जीजीआयएम) संस्थेची साथ लाभणार आहे.

विद्यापीठात बुधवारी झालेल्या बैठकीदरम्यान जीजीआयएम आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्यामध्ये गिर्यारोहण आणि संलग्न साहसी क्रीडा प्रकारासाठी पदविका अभ्यासक्रम आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रम



संयुक्तरित्या राबविण्यासंदर्भात करार झाला. या वेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, डॉ. एन. एस. उमराणी, डॉ. प्रफुल्ल पवार, डॉ. दीपक माने, डॉ. अपूर्वा पालकर, जीजीआयएमचे संस्थापक संचालक उमेश झिरपे, संचालक चंदन चव्हाण, श्रीपाद गोखले, भूषण हर्षे आणि डॉ. सुमीत मांदळे उपस्थित होते.

उमेश झिरपे म्हणाले, 'साहसी खेळ आणि गिर्यारोहण यातील प्रशिक्षण; तसेच त्या क्षेत्राच्या विकासाची गरज लक्षात घेऊन करार करण्यात आला आहे. हे सर्व अभ्यासक्रम विद्यापीठामध्ये लवकरच सुरू होतील आणि साहसी क्षेत्रामध्ये एक पद्धतशीर अभ्यासक्रमाचा पर्याय सर्व तरुणांना उपलब्ध होईल.'

जीजीआयएमतर्फे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहकार्याने अभ्यासक्रमांसाठी सर्व व्यवस्थापन आणि प्रशिक्षण पार पडेल. यापूर्वी स्थापनेपासून गेल्या पाच वर्षांच्या कालावधीत जीजीआयएमतर्फे शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन युवक, नोकरदार, व्यावसायिक, महिला आणि पुरुष या सर्वांसाठी विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम; तसेच प्रशिक्षण वर्ग राबविले जातात. तसेच महाराष्ट्राच्या वन विभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी देखील जीजीआयएमतर्फे सुरक्षा प्रशिक्षण अभ्यासक्रम विकसित करण्यात आला आहे.

Maharashtra Times: 18.12.2020

## News Paper Clippings During December 2020

Section: Education

# पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांचा मानाचा शिरपेच

## 'अन्वेषण' राष्ट्रीय स्पर्धेत प्रथम आणि तृतीय क्रमांकाचे पारितोषिक पटकाविले

पुणे, ता. १७ : रेल्वे क्रॉसिंगवर होणारे अपघात टाळण्यासाठी रेल्वे क्रॉसिंगवर ॲटो सिग्नल आणि ट्रेनचा वेग नियंत्रण करणारी आणि ट्रेनचे 'लाइव्ह ट्रॅकिंग' करणारा प्रकल्प विकसित करणाऱ्या पुण्यातील अनुराग लंबोर आणि गौरव दुधे या विद्यार्थ्यांना 'अन्वेषण' या राष्ट्रीय स्तरावरील संशोधन स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे.

नवी दिल्ली येथील भारतीय विश्वविद्यालय संघ आणि मध्य प्रदेशातील राजीव गांधी प्रोद्योगिकी विश्वविद्यालय गांधीनगर (भोपाळ) यांच्या संयुक्त विद्यमाने ही स्पर्धा नुकतीच घेण्यात आली. या स्पर्धेत अनुराग आणि गौरव यांच्या 'ऑटोमेटेड रेल्वे क्रॉसिंग विथ ॲटो ट्रेन स्पीड कंट्रोल ॲण्ड लाइव्ह ट्रॅकिंग' या प्रकल्पाला प्रथम क्रमांक मिळाला आहे. हे दोघेही पुण्यातील ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरिअल सोसायटीच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात शिक्षण घेत आहेत. अनुराग इलेक्ट्रॉनिक इंजिनिअरिंग, तर गौरव सिव्हिल इंजिनिअरिंग करत आहे. याच सोसायटीच्या फार्मसी महाविद्यालयातील अनिश पानवलकर आणि आशुतोष महामुनी यांनी केलेल्या 'स्पेरोफास्ट : द गेम चेंजर इन पेलट मॅन्युफॅक्चरिंग' या प्रकल्पाला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे.

संबंधित विद्याशाखेत प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या स्पर्धकांसाठी आयोजित सर्व विद्याशाखीय स्पर्धेमध्ये सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या अनुराग आणि गौरव यांच्या संशोधन प्रकल्पाला सुवर्णपदक आणि ७५ हजार रुपये रोख पारितोषिक मिळाले आहे.

Sakaal: 18.12.2020

पुढारी

# गिर्यारोहण आता विद्यापीठ अभ्यासक्रमात

## पुणे विद्यापीठाचा गार्डीयन गिरिप्रेमी इन्स्टिट्यूट ऑफ माउंटेनिअरिंगशी सामंजस्य करार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने आपल्या अभ्यासक्रमांमध्ये 'गिर्यारोहण आणि संलग्न साहसी क्रीडाप्रकार' या नव्या अभ्यासक्रमाचा समावेश करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी विद्यापीठाला पुण्यातील गिरिप्रेमी या अग्रगण्य गिर्यारोहण संस्थेद्वारे स्थापन केल्या गेलेल्या गार्डीयन गिरिप्रेमी इन्स्टिटयूट ऑफ माउंटेनिअरिंग (जीजीआयएम) संस्थेची साथ लाभणार आहे. बुधवारी (दि.१७) या दोन संस्थांमध्ये सामंजस्य करार करण्यात आला.

या वेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र. कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, डॉ. दीपक माने (संचालक क्रीडा), जीजीआयएमतर्फे संस्थापक संचालक उमेश झिरपे, संचालक चंदन चव्हाण आदी उपस्थित होते.

गेल्या काही वर्षांत पुण्याची ओळख भारतातील गिर्यारोहणाचे केंद्रस्थान अशीदेखील झाली आहे. देशात सर्वाधिक प्रशिक्षित आणि कुशल गिर्यारोहक पुणे शहरामध्ये मोठ्या संख्येने आहेत. तसेच गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रामध्ये गिर्यारोहण आणि साहसी खेळांमध्ये भाग घेणाऱ्यांची संख्या वाढली आहे. परंतु, या विषयातील तंत्रशुद्ध प्रशिक्षण मिळण्याची व्यवस्था कोणत्याही विद्यापीठामध्ये उपलब्ध नाही. या सामंजस्य करारामुळे अशा प्रकारचा पदविका आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे भारतातील पहिले विद्यापीठ ठरणार आहे.

हे अभ्यासक्रम विद्यापीठात लवकरच सुरू होतील आणि साहसी क्षेत्रात पद्धतशीर अभ्यासक्रमाचा पर्याय उपलब्ध होईल. यातून संबंधित क्षेत्रात काम करण्यासाठी तरुण पुढे येतील आणि एक सशक्त साहसी समाज घडण्यासाठी त्याचा उपयोग होईल. जीजीआयएमतर्फे विद्यापीठाच्या सहकार्याने अभ्यासक्रमांसाठी व्यवस्थापन आणि प्रशिक्षण पार पडेल.



**जीजीआयएम आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्यातील सामंजस्य करारप्रसंगी उपस्थित मान्यवर.**

> गिर्यारोहण आणि संलग्न साहसी क्रीडाप्रकारामध्ये ज्यांना व्यावसायिक करिअर करायचे आहे, त्यांच्यासाठी हा अभ्यासक्रम उपयुक्त आहे. त्यादृष्टीने हा सामंजस्य करार महत्त्वाचा आहे.
> **डॉ. नितीन करमळकर,** कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

My Pune Edition
Dec 18, 2020 Page No. 4
newspaper.pudhari.co.in



## News Paper Clippings During December 2020

Section: Education

# Mountaineering courses from SPPU

TIMES NEWS NETWORK

**Pune:** Students of Savitribai Phule Pune University and its affiliated colleges will now be able to take up courses in mountaineering, and conduct research in this sport.

A certificate course in mountaineering and adventure sports will be introduced as part of SPPU's tie-up with the Guardian Giripremi Institute of Mountaineering (GGIM). An agreement was signed on December 16.

Pune is emerging as a hotspot for budding mountaineers in the country. There has been a sizeable number of participants emerging from Maharashtra in mountaineering and adventure activities.

The institute felt technical training and understanding was necessary for such enthusiasts. Its founder, Umesh Zirpe, said, "In order to introduce an academic curriculum and overall development of this field, we have tied up with SPPU."

"GGIM shall provide the expertise to conduct such training, research, provide inputs for curriculum development. SPPU shall offer these courses and training for those wanting to pursue these careers," Zirpe said. The courses shall be announced soon and benefit students, professionals and others, vice-chancellor Nitin Karmalkar said.

# शिक्षकांनी कालानुरूप बदलणे गरजेचे

'ग्लोबल टीचर प्राइझ' विजेते सोलापूर जिल्हा परिषदेचे शिक्षक रणजितसिंह डिसले यांच्याशी हर्ष दुधे यांनी साधलेला संवाद.



मटा टॉकटाइम

■ **'ग्लोबल टीचर प्राइझ'च्या यशानंतर पुढील वाटचाल कशी असेल?**

शिक्षक म्हणून आपल्यासोबतच्या इतर शिक्षकांना अधिक गुणवत्तापूर्ण काम कसे करता येईल आणि त्याचबरोबर विद्यार्थ्यांना नावीन्यपूर्ण शिक्षण कसे देता येईल, या दोन प्रमुख गोष्टींवर आगामी काळात काम करण्याचे ठरवले आहे. शिक्षकांना बदलत्या काळानुसार चांगले प्रशिक्षण मिळण्यासोबतच, नावीन्यपूर्ण बाबींची माहिती होण्यासाठी 'टीचर इनोव्हेशन फंड'ची स्थापना करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यात पुरस्काराची काही रक्कम देणार आहे. विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील ज्ञान देण्यासोबतच 'सस्टेनेबल डेव्हलपमेंट गोल' या उद्दिष्टानुसार प्रशिक्षित करण्याचे ठरविले आहे. विद्यार्थ्यांमार्फत जगात शांततेचा प्रसार व प्रचार करण्यासाठी 'पीस आर्मी'ची निर्मिती करण्याचे ठरवले आहे.

■ **देशातील शिक्षकांना काय सांगाल?**

शिक्षकांनी कालानुरूप बदलणे गरजेचे आहे. यापूर्वी शिकवताना तंत्रज्ञानाची मदत घेण्यात येत होती, किंवा गरजेप्रमाणे वापर करण्यात येत होता. मात्र, करोनामुळे शिकवताना तंत्रज्ञानाचा वापर करणे, हा सर्वांसाठी अविभाज्य घटक झाला. याची प्रचिती आपल्या सर्वांना करोना काळात आली. देशात शिक्षकी पेशाला चांगली मान्यता मिळवून द्यायची असेल, तर शिक्षकांचे माहिती तंत्रज्ञान (आयटी) आणि व्यावसायिक प्रशिक्षण होणे गरजेचे आहे. त्यासाठी केंद्र व राज्य सरकारने पुढाकार घेऊन याबाबतचे प्रशिक्षण आयोजित करण्याची आवश्यकता आहे. शिक्षकांमध्ये विद्यादानाबाबतची आवश्यक कौशल्ये विकसित करणे अत्यावश्यक असून, त्या आधारे आपल्याला पुढील वाटचाल करावी लागणार आहे.

■ **एका शिक्षकाला दोन ते तीन तुकड्या सांभाळाव्या लागतात. यावर काय उपाय सांगाल?**

शाळांमधील शिक्षकांच्या पदांची रचना कालबाह्य झाली आहे. सध्या विद्यार्थ्यांची संख्या कमी होत असल्याने, सध्या कार्यरत असणारे शिक्षक अतिरिक्त होताना दिसत आहेत. पदसंख्येचे निकष बदलवण्याचे निर्णय घेण्यात येतात. विद्यादानाव्यतिरिक्त असणाऱ्या इतर कामांचा शिक्षकांवर मोठा ताण आहे. या ताणामुळे शिक्षकांना त्यांच्या कामावर लक्ष केंद्रित करता येत नाही. शिक्षकांना सहायक असायला हवेत; जेणेकरून ते त्यांच्या मूळ कामावर लक्ष केंद्रित करू शकतील.

■ **शिक्षकी पेशा स्वीकारू इच्छिणाऱ्यांना काय संदेश द्याल?**

शिक्षक विद्यार्थ्यांना शिक्षित करून त्यांच्यामार्फत देशाचे भविष्य घडवतात. शिक्षण क्षेत्रात काम करण्याची अजूनही भरपूर संधी आहे. त्यामुळे युवावर्गाने उत्तम शिक्षक म्हणून आपले करिअर घडवण्यासाठी समोर आले पाहिजे. शिक्षण क्षेत्रात भरपूर काम करणे गरजेचे आहे. अशा परिस्थितीत सध्या जे विद्यार्थी आहेत, त्यांनी या पेशात येण्याचे ठरवून उत्तम शिक्षक होण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

■ **सरकारने शालेय शिक्षण आणि सरकारी शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी काय करावे?**

शिक्षक आणि सरकार या दोघांमध्ये समन्वय असायला हवा. शिक्षकांच्या काही मागण्या असतील किंवा त्यांचे म्हणणे असेल, तर ते सरकारने ऐकायला पाहिजे. शिक्षकांना समाजात सन्मानाची वागणूक मिळायला हवी. त्यासाठी सरकारने प्रयत्न करणे गरजेचे आहे. सरकारच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजना, धोरणे राबविण्याचे काम शिक्षकांनी मन लावून केले पाहिजे.

The Times of India: 18.12.2020

# पिंपरी-चिंचवडमध्ये विद्यापीठाचे सॅटेलाइट केंद्र

## उद्योजकता, संशोधन, कौशल्य अभ्यासक्रम राबवण्याची कल्पना

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे पिंपरी-चिंचवडमध्ये सॅटेलाइट केंद्र सुरू होणार आहे. पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटीच्या सहकार्याने या केंद्राची उभारणी करण्यात येणार असून या माध्यमातून परिसरातील उद्योग क्षेत्राचा विद्यार्थ्यांना उपयोग होण्यासाठी उद्योजकता, संशोधन, कौशल्य अभ्यासक्रम राबवणार आहेत.

अलीकडील काळात उद्योग आणि शिक्षण या दोन्ही क्षेत्रांना एकत्रित आणून उद्योजगता, संशोधन, रोजगारसंधीसाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटीच्या अखत्यारित असलेल्या इन्क्युबेशन सेंटरच्या माध्यमातून विद्यापीठाचे सॅटेलाइट केंद्र पिंपरी-चिंचवडमध्ये सुरू करण्यात येत आहे.

> पिंपरी-चिंचवड परिसरातील उद्योग क्षेत्राचा विद्यार्थ्यांसाठी उपयोग करणे शक्य आहे. त्या दृष्टीने सॅटेलाइट केंद्राच्या माध्यमातून उद्योजकता, संशोधन आणि कौशल्य आधारित अभ्यासक्रम राबवले जाणार आहेत. त्यामुळे त्या परिसरातील विद्यार्थ्यांना शिक्षणासाठीची, उद्योजकता विकसनाची सुविधा उपलब्ध होऊ शकेल. या केंद्रासाठी पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी यांच्यासह सामंजस्य करार केला जाईल.
> – डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

विद्यापीठाच्या नवउपक्रम, नवसंशोधन आणि साहचय मंडळाच्या संचालिका डॉ. अपूव पालकर म्हणाल्या, की पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी यांच्या सहकार्याने ऑटो क्लस्टरमध्ये केंद्र सुरू करण्यात येणार आहे. या कें द्रासाठी पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटीकडून जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

लोकसत्ता Wed, 09 December 2020
https://epaper.loksatta.com/c/56899755

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Education

### 'अन्वेषण' संशोधन स्पर्धेत यश

पुणे, दि. १८ - नवी दिल्ली येथील भारतीय विश्वविद्यालय संघ व भोपाळमधील राजीव गांधी प्रोद्योगिकी विश्व विद्यालय यांच्या वतीने आयोजित राष्ट्रीय 'अन्वेषण' संशोधन स्पर्धेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी पारितोषिके मिळविली आहेत. इंजिनिअरींग आणि टेक्नॉलॉजी या विभागात अनुराग लंबोर व गौरव दुधे यांना सुवर्णपदक मिळाले आहे. आरोग्य विज्ञान विभागात अनिश पानवलकर, आशुतोष महामुनी यांनी तृतीय क्रमांक मिळविला आहे.

Prabhat: 19.12.2020

### गिर्यारोहणावरील अभ्यासक्रम

#### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि गार्डियन गिरिप्रेमी इन्स्टिट्यूट यांच्यात करार

पुणे, ता. १८ : शिक्षणाचे माहेरघर अशी ओळख असणाऱ्या पुण्यात देशातील प्रशिक्षित व कुशल गिर्यारोहकांची सर्वाधिक संख्या आहे. असे असले तरीही गिर्यारोहणाबाबतचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण अद्यापही कुठल्याही विद्यापीठामध्ये उपलब्ध नाही. या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने पुढाकार घेत विद्यापीठाच्या अभ्यासक्रमामध्ये 'गिर्यारोहण आणि संलग्न साहसी क्रीडा प्रकार' या नव्या पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचा समावेश केला आहे. त्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व गार्डियन गिरिप्रेमी इन्स्टिट्यूट ऑफ माउंटेनीअरिंग (जीजीआयएम) या संस्थेमध्ये सामंजस्य करार झाला आहे.

. विद्यापीठाचे अधिकारी व गार्डियन गिरिप्रेमी संस्थेचे पदाधिकारी यांची नुकतीच कुलगुरूंच्या कार्यालयात बैठक झाली. यामध्ये गिर्यारोहण व संलग्न साहसी क्रीडाप्रकारांसाठी पदविका अभ्यासक्रम आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रम संयुक्तरीत्या राबविण्याचा सामंजस्य करार झाला. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, क्रीडा संचालक डॉ. दीपक माने, 'आयआयएल'च्या संचालक डॉ. अपूर्वा पालकर, संस्थेचे उमेश झिरपे, संचालक चंदन चव्हाण, श्रीपाद गोखले, प्रशिक्षण प्रमुख भूषण हर्षे व वरिष्ठ प्रशिक्षक डॉ. सुमीत मांदळे उपस्थित होते.

या करारामुळे अशा प्रकारचा पदविका आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रम राबविणारे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ हे भारतातील पहिले विद्यापीठ ठरणार आहे. गिर्यारोहण आणि संलग्न साहसी क्रीडाप्रकारामध्ये व्यावसायिक करिअर करायची इच्छा असणाऱ्यांसाठी हा सामंजस्य करार उपयुक्त आहे, असे डॉ. करमळकर यांनी सांगितले. तर 'जीजीआयएम' समवेत झालेला हा सामंजस्य करार विद्यार्थ्यांना व अन्य भागधारकांना सराव व प्रशिक्षण घेण्यासाठी मदत करील, असे डॉ. माने यांनी स्पष्ट केले.

**अभ्यासक्रमाचे फायदे**

- साहसी क्षेत्रासाठी वैशिष्ट्यपूर्ण अभ्यासक्रमाचा पर्याय
- प्रशिक्षणातून या क्षेत्रात काम करण्यासाठी अनेक तरुण पुढे येण्याची शक्यता
- विद्यापीठाच्या सहकार्याने 'जीजीआयएम' करणार अभ्यासक्रमांसाठीचे व्यवस्थापन व प्रशिक्षण

Sakaal: 19.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Sports

लोकमत

### पुण्यातील नव्या क्रीडा विद्यापीठात येत्या शैक्षणिक वर्षापासून मिळेल प्रवेश

■ लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : देशातील पहिले आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ पुणे येथील बालेवाडीत उभारण्यावर ४०० कोटी रुपयांचा खर्च करण्यात येणार आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून या विद्यापीठात प्रवेश दिले जातील, अशी माहिती क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनील केदार यांनी गुरुवारी पत्र परिषदेत दिली.

या विद्यापीठाच्या उभारणीसंबंधीचे विधेयक मंगळवारी विधानसभेत मंजूर करण्यात आले होते. विद्यापीठ स्थापनेनंतर प्रथम वर्षी स्पोर्ट्स सायन्स, स्पोर्ट्स टेक्नॉलॉजी व स्पोर्ट्स कोचिंग व ट्रेनिंग हे ३ अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. याकरिता प्रत्येक अभ्यासक्रमात ५० विद्यार्थी प्रवेश संख्या निश्चित करण्यात आली आहे. त्यानंतर पुढील वर्षामध्ये मागणीनुसार व आवश्यकतेनुसार आणखी अभ्यासक्रम सुरू करता येतील. यामुळे शारीरिक शिक्षण, क्रीडा विज्ञान, क्रीडा वैद्यकशास्त्र, क्रीडा तंत्रज्ञान, क्रीडा प्रशासन, क्रीडा व्यवस्थापन, क्रीडा माध्यम व कम्युनिकेशन, क्रीडा प्रशिक्षण यामध्ये शिक्षणाच्या व नोकरीच्या संधी उपलब्ध होतील. तसेच, क्रीडा क्षेत्रातील तांत्रिक मनुष्यबळदेखील मोठ्या प्रमाणात उपलब्ध होईल. शारीरिक शिक्षण, क्रीडा शिक्षण यामध्ये संशोधन व विकास चांगल्या (पान ३ वर)

**आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा**

राज्यात सध्या पुणे जिल्ह्यातील बालेवाडी येथे शिवछत्रपती क्रीडा संकुल सुरू आहे. या क्रीडा संकुलात विविध खेळांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. या सुविधांचे अद्ययावतीकरण तसेच नवीन सुविधा उपलब्ध करण्याची कार्यवाही सातत्याने होत असते. यामुळे हे विद्यापीठ सध्या शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी येथे कार्यान्वित करण्यात येणार आहे व नंतरच्या कालावधीत या विद्यापीठाकरिता स्वतंत्र इमारत बांधकाम करण्यात येईल.

Pune Main
Page No. 5 Dec 18, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

### योगासनाला मिळाला स्पर्धात्मक खेळाचा दर्जा

नवी दिल्ली : क्रीडा मंत्रालयाने योगासनाला स्पर्धात्मक खेळ म्हणून गुरुवारी औपचारिक मान्यता प्रदान केली. यामुळे या खेळाला आणि खेळाडूंना शासनाचे लाभ मिळू शकतील. क्रीडामंत्री किरेन रिजिजू यांनी केंद्रीय आयुषमंत्री श्रीपाद नाईक यांच्यासोबत झालेल्या एका कार्यक्रमात योगासनाला स्पर्धात्मक खेळाचा दर्जा बहाल करण्यात येत असल्याची घोषणा केली.

'योगासन दीर्घकाळापासून स्पर्धेच्या रूपात खेळविण्यात येत असला तरी अधिकृत आणि मान्यताप्राप्त क्रीडा प्रकार म्हणून केंद्र शासनाच्या मान्यतेची गरज होती. आज आम्हा सर्वांसाठी मोठा दिवस असून योगासनाला स्पर्धात्मक क्रीडा प्रकार म्हणून आम्ही मान्य करीत आहोत,' असे रिजिजू यांनी म्हटले आहे.

मागच्यावर्षी योगगुरू बाबा रामदेव यांच्या अध्यक्षतेखाली आंतरराष्ट्रीय योगासन क्रीडा महासंघाची स्थापना झाली होती. डॉ. एच. आर. नागेंद्र हे महासचिव आहेत. याशिवाय भारतीय योगासन क्रीडा महासंघाचीदेखील स्थापना झाली.

मागच्या महिन्यात क्रीडा मंत्रालयाने महासंघाला राष्ट्रीय क्रीडा महासंघाचा दर्जा बहाल केला होता. क्रीडा मंत्रालय या महासंघाला आर्थिक साहाय्य देणार असून योगासनाचा समावेश खेलो इंडिया कार्यक्रमातदेखील करण्यात येईल.

Pune Main
Page No. 12 Dec 18, 2020
Powered by: erelego.com

लोकमत

### पुण्यातील नव्या क्रीडा विद्यापीठात येत्या वर्षापासून प्रवेश

**(पान १ वरून)** प्रकारे होईल. ऑलिम्पिकसह राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये जास्तीत जास्त सुवर्णपदके मिळवण्यासाठी आंतरराष्ट्रीय प्रशिक्षकही या ठिकाणी आमंत्रित करण्यात येतील आणि आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा निर्माण करण्यात येणार असल्याचेही केदार यांनी सांगितले. विदर्भ, मराठवाड्यातही विद्यापीठ बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुल यासाठी योग्य आणि केंद्र शासनाच्या मानकांची पूर्तता करणारे आहे. या पार्श्वभूमीवर बालेवाडी येथे आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ स्थापन करण्यात आले आहे. तसेच या ठिकाणी तत्काळ कार्यवाही सुरू करण्यास वाव असल्याने या ठिकाणास प्राधान्य देण्यात आले आहे. टप्प्याटप्प्याने मराठवाडा व विदर्भातही विद्यापीठ स्थापन करण्यात येईल.

Pune Main
Page No. 7 Dec 18, 2020
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Sports

पुढारी

# क्रीडा विद्यापीठाचे शैक्षणिक वर्ष जूनपासून

- कुलगुरूपदावर कोणाची वर्णी?
- २७ प्राध्यापकांची होणार भरती
- आराखडा तयार करण्याचे काम
- शासनस्तरावर होणार निर्णय

पुणे : सुनील जगताप

राज्याची क्रीडाविषयक कामगिरी आणखी उंचावणे, क्रीडा क्षेत्रात आंतरराष्ट्रीयस्तरावर उपलब्ध असलेली विविध क्षेत्रे विचारात घेऊन आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठनिर्मितीचा निर्णय शासनाने घेतला आहे. केवळ निर्णय घेतला नव्हे तर जून २०२१ पासून प्रत्यक्षात शैक्षणिक वर्ष ही सुरू करण्यात येणार आहे.

क्रीडा विद्यापीठाच्या स्थापनेसाठी आवश्यक अधिनियम प्रारूप तयार करण्यासाठी मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. विजय खोले यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने सादर केलेल्या अधिनियम प्रारूप विधेयकास विधी व न्याय विभागाच्या मान्यतेनंतर मंत्रिमंडळाने ही मान्यता दिली. प्रथम वर्षी स्पोर्ट्स सायन्स, स्पोर्ट्स टेक्नॉलॉजी व स्पोर्ट्स कोचिंग आणि ट्रेनिंग हे तीन अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. त्यामध्ये स्पोर्ट्स सायन्स आणि स्पोर्ट्स टेक्नॉलॉजी हे प्रत्येकी तीन वर्षांचे अभ्यासक्रम असून स्पोर्ट्स कोचिंग व ट्रेनिंग हा अभ्यासक्रम तीन महिन्यांचा असणार आहे.

या अभ्यासक्रमामधून प्रशिक्षित झालेल्या विद्यार्थ्यांना विविध खेळांमध्ये प्रशिक्षक म्हणून संधी मिळू शकणार आहे. सध्या या

पुढारी विशेष

अभ्यासक्रमाची फी किती असावी, अभ्यासक्रमात कोणत्या विषयांचा समावेश असावा, कोणत्या विषयाला किती प्राध्यापक आदी बाबींचा आराखडा तयार करण्याचे काम सुरू असून एकूण २७ प्राध्यापकांची आवश्यकता असल्याचा अहवाल क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने पाठविला आहे.

विद्यापीठासाठी सध्याच्या आवश्यकतेनुसार ५ वर्षांकरिता २१३ पदे अपेक्षित आहेत. त्यामध्ये ही नियमित वेतनश्रेणीतील १६६ पदे व ठोक वेतनावरील ४७ पदे भरण्याचे नियोजित आहे. या सर्वांमधून पहिल्या वर्षी १३३ पदे भरण्यात येणार आहेत. यामध्ये कुलगुरू, रजिस्ट्रार त्यांची कार्यालयीन पदे, शिक्षकीय पदे व प्रशासकीय पदे यांचा समावेश आहे.

> आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठाला मान्यता मिळाली असून त्यासाठी ४०० कोटींचा प्राथमिक निधी मंजूर झाला आहे. हे विद्यापीठ बालेवाडी येथे होणार असून स्टेडियमची चाचपणी सुरू आहे. प्रथमतः कुलगुरू आणि रजिस्ट्रारपदाची भरती होणार असून फी किती असावी, प्राध्यापक, विषयांची निवड, कर्मचारी आदींचा निर्णय नवनियुक्त कुलगुरूंच्या अधिपत्याखाली होणार आहे. हे संपूर्ण विद्यापीठ शासनाच्या आदेशानुसारच चालणार असून क्रीडा व युवक सेवा संचालनालय केवळ सहकार्याची भूमिका ठेवणार आहे.
>
> - **ओमप्रकाश बकोरिया,** आयुक्त, क्रीडा व युवक सेवा

My Pune Edition
Dec 24, 2020 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# महाराष्ट्राचे नाव आंतरराष्ट्रीय क्रीडापटलावर झळकणार!

## सुनील केदार यांचा विश्वास; क्रीडा विद्यापीठामुळे नोकरीच्या संधी उपलब्ध होणार

पुणे : पुण्यातील बालेवाडी क्रीडासंकुलात उभे राहत असलेल्या आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठामुळे महाराष्ट्राचे नाव आंतरराष्ट्रीय क्रीडापटलावर झळकणार आहे. क्रीडाक्षेत्राला गतिमान करण्यासाठी प्रगत अभ्यासक्रम... क्रीडाक्षेत्रात नोकरी व प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करणे... तरुणवर्गाला क्रीडा क्षेत्रात येण्यास प्रोत्साहन मिळावे... दर्जेदार खेळाडू, प्रशिक्षक, ट्रेनर, घडावेत आणि एकूण महाराष्ट्रातील क्रीडा संस्कृतीचा विकास व्हावा असा दूरदर्शी विचार डोळ्यांसमोर ठेवून महाराष्ट्र राज्य सरकारने हे आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

महाराष्ट्र राज्याचे क्रीडामंत्री सुनील केदार यांनी शुक्रवारी बालेवाडीत झालेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी क्रीडाआयुक्त ओमप्रकाश बकोरिया, क्रीडा संचालक आनंद व्यंकटेश्वर व डॉ. जवाहर सुरिशेट्टी हे उपस्थित होते. येत्या शैक्षणिक वर्षापासून (जून २०२१)



> 'आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ हे राज्य शासनाच्या पुढाकारातून उभे राहत आहे. यात खासगी क्षेत्राचा शिरकाव होणार नाही, अशी घटनेत तरतूद करण्यात येईल. शासनाच्या मदतीने सुरू होणारे हे विद्यापीठ भविष्यात नक्कीच स्वयंपूर्ण होईल. या विद्यापीठातून क्रीडा क्षेत्रातील तांत्रिक मनुष्यबळही मोठ्या प्रमाणात उपलब्ध होईल.'
>
> - सुनील केदार (क्रीडामंत्री, महाराष्ट्र राज्य)

या आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठाचा श्रीगणेशा होणार असून, पुढील तीन वर्षांत टप्प्याटप्प्याने आम्ही या विद्यापीठाची गाडी व्यवस्थित रुळावर आणण्याचा प्रयत्न करू, अशी ग्वाही क्रीडामंत्र्यांनी दिली.

**...म्हणून बालेवाडीला पसंती**

बालेवाडीतील श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात बहुतांश पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. यामुळे मोठी आर्थिक बचतही होणार असून, पुण्यातील वातावरणही पोषक आहे. शिवाय येथे आधीपासून क्रीडा संस्कृती रुजलेली असल्याने त्याचाही फायदा होणार आहे. त्यामुळे क्रीडा विद्यापीठासाठी बालेवाडीला पसंती देण्यात आली, अशी माहिती क्रीडामंत्री सुनील केदार यांनी दिली.

**मुख्य स्टेडियममध्ये सुरू होणार क्रीडा विद्यापीठ**

बालेवाडी क्रीडा संकुलातील मुख्य स्टेडियममधील वरच्या मजल्यावर सध्या क्रीडा विद्यापीठ सुरू होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर क्रीडामंत्री सुनील केदार यांनी या वरच्या मजल्याची पाहणी केली. नंतरच्या कालावधीत या विद्यापीठाकरिता स्वतंत्र इमारत बांधण्यात येईल. यासाठी राज्य शासनाकडून ४०० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला जाणार आहे, असेही क्रीडामंत्र्यांनी सांगितले.

Saamana: 26.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Sports

# पुण्यातील क्रीडा संस्कृतीचा विद्यापीठाला फायदा : केदार

पुणे, ता. २५ : पुण्यात क्रीडा क्षेत्रासाठी असणाऱ्या पायाभुत सुविधा, पोषक वातावरण आणि क्रीडा संस्कृती रुजली आहे. येथील सोयीसुविधांचा वापर करून लगेचच देशातील पहिले आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ पुण्यातील शिवछत्रपती क्रीडा संकुलात सुरू करता येईल, असा विचार करून निर्णय घेतला. त्यामुळे वेळ आणि खर्चातही बचत होणार आहे, अशी माहिती क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनील केदार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

केदार यांनी सांगितले की, इतर ठिकाणी विद्यापीठ सुरू करण्यास अडचण नव्हती, परंतु विद्यापीठासाठी लागणाऱ्या सुविधा नव्याने निर्माण कराव्या लागल्या असत्या. विधीमंडळात क्रीडा विद्यापीठाचे बिल एकमताने मंजूर झाले. त्यामुळे विद्यापीठासाठी निधी मिळविताना अडचणी येणार नाहीत. विद्यापीठाचा निर्णय झाल्यानंतर जलदगतीने कामे करण्यास सुरवात केली. विद्यापीठाला

**अभ्यासक्रम**

- स्पोर्टस सायन्स : कालावधी ३ वर्षे, प्रशिक्षणार्थी संख्या ५०
- स्पोर्ट्स टेक्नॉलॉजी : कालावधी ३ वर्ष, प्रशिक्षणार्थी संख्या ५०
- स्पोर्टस कोचिंग व ट्रेनिंग : कालावधी ३ महिने, प्रशिक्षणार्थी संख्या ५०

विस्तीर्ण स्वरूप येण्यास तीन वर्षांचा कालावधी लागेल.

पुढील काळात या विद्यापीठाकरिता स्वतंत्र इमारत बांधण्यात येणार असून यासाठी २०० कोटी व विद्यापीठ कार्पेस फंडसाठी २०० कोटी याप्रमाणे एकूण ४०० कोटी खर्च अपेक्षित आहे. युजीसीच्या मागदर्शक सूचना आणि निकषांच्या आधारे अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत, असेही केदार यांनी सांगितले.

Sakaal: 26.12.2020

# आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ शैक्षणिक वर्षापासून सुरू

## क्रीडामंत्री सुनील केदार यांची घोषणा

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : क्रीडा क्षेत्रातील राज्याची कामगिरी उंचावण्याबरोबरच आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडाविषयक विविध क्षेत्रांमध्ये प्रगती करण्याच्या उद्देशातून राज्य शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार बालेवाडी येथील आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ नव्या शैक्षणिक वर्षापासून म्हणजेच जूनपासून सुरू होणार आहे. हे क्रीडा विद्यापीठ जागतिक दर्जाचे असेल.

राज्याचे क्रीडामंत्री सुनील केदार यांनी शुक्रवारी ही घोषणा केली. बालेवाडी येथे कार्यान्वित होणाऱ्या क्रीडा विद्यापीठाच्या स्थापनेसाठी आवश्यक अधिनियम प्रारूप तयार करण्यासाठी मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु डॉ. विजय खोले यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली होती.

या समितीने सादर केलेल्या अधिनियम प्रारूप विधेयकास विधि आणि न्याय विभागाच्या मान्यतेनंतर मंत्रिमंडळाने क्रीडा विद्यापीठाच्या स्थापनेस मान्यता दिली. पहिल्या वर्षी क्रीडा शास्त्र, क्रीडा तंत्रज्ञान हे प्रत्येकी तीन वर्षांचे आणि क्रीडा प्रशिक्षण व शिबीर हा तीन महिन्यांचा असे तीन अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहेत. यातून प्रशिक्षित झालेल्या विद्यार्थ्यांना विविध खेळांचे प्रशिक्षक म्हणून संधी मिळू शकणार आहे, असे केदार यांनी सांगितले.

अभ्यासक्रमामध्ये कोणत्या विषयांचा समावेश असावा, कोणत्या विषयाला किती प्राध्यापक, अभ्यासक्रमाचे शुल्क किती असावे याचा आराखडा तयार करण्याचे काम सुरू आहे. सध्या २७ प्राध्यापकांची आवश्यकतेचा अहवाल क्रीडा व युवक सेवा संचालनालयाने पाठविला आहे.

लोकसत्ता Sat, 26 December 2020
https://epaper.loksatta.com/c/57297808

पुढारी

# आवश्यक सुविधा असल्यानेच क्रीडा विद्यापीठ पुण्यात : केदार

पुणे : पुढारी वृत्तसेवा

आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ पुण्यालाच का, अशी विचारणा झाली. परंतु पुण्यात क्रीडा क्षेत्रासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, पोषक वातावरण आणि क्रीडा संस्कृती रुजली आहे. येथील सोयीसुविधांचा वापर करून लगेचच क्रीडा विद्यापीठ सुरू करता येईल, असा विचार करून निर्णय घेतला. त्यामुळे वेळ आणि खर्चातही बचत होणार आहे, अशी माहिती क्रीडा व युवक कल्याणमंत्री सुनील केदार यांनी दिली.

देशातील पहिले आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ पुण्यातील शिवछत्रपती क्रीडा संकुलात स्थापन होत आहे. याविषयी त्यांनी पत्रकार परिषदेत माहिती दिली. यावेळी क्रीडा आयुक्त ओमप्रकाश बकोरिया, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) आयुक्त सुहास दिवसे, आमदार अशोक पवार, शिक्षणतज्ज्ञ डॉ. जवाहर सुरीशेट्टी आदी उपस्थित होते.

केदार म्हणाले, इतर ठिकाणी विद्यापीठ सुरू करण्यास अडचण नव्हती. परंतु विद्यापीठासाठी लागणाऱ्या सुविधा नव्याने निर्माण कराव्या लागल्या असत्या. विधिमंडळात क्रीडा विद्यापीठाचे विधेयक एकमताने मंजूर झाले. त्यामुळे विद्यापीठासाठी निधी मिळविताना अडचणी येणार नाहीत. बालेवाडी येथील सुविधांचे अद्ययावतीकरण, तसेच नवीन सुविधा उपलब्ध करण्याची कार्यवाही सुरू आहे. विद्यापीठा आकार येण्यास तीन वर्षांचा कालावधी लागेल. तोपर्यंत काही अभ्यासक्रम आणि शिक्षक, कर्मचाऱ्यांची भरती केली जाणार आहे.

नंतरच्या कालावधीत या विद्यापीठाकरिता स्वतंत्र इमारत बांधण्यात येणार असून यासाठी २०० कोटी व विद्यापीठ कॉर्पस फंडासाठी २०० कोटी याप्रमाणे एकूण ४०० कोटी खर्च अपेक्षित आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मागदर्शक सूचना आणि निकषांच्या आधारे अभ्यासक्रम सुरू केले जाणार आहेत. या विद्यापीठात मागासवर्गीय कुटुंबातील मुलींना प्राधान्याये संधी दिली जाणार असल्याचे केदार यांनी सांगितले.

Pune Edition
Dec 26, 2020 Page No. 9
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Sports

# क्रीडा विद्यापीठ महाराष्ट्राला जगाच्या नकाशावर नेणार

## सुनील केदार यांना विश्वास : देशातील पहिली 'इंटरनॅशनल स्पोर्ट्स युनिव्हर्सिटी' पुण्यात

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : "जागतिक नकाशावर महाराष्ट्राचे नाव कोरले जाईल या दर्जाचे देशातील पहिले आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ आम्ही पुण्यात उभारतो आहोत. या विद्यापीठातून सर्वसामान्य, मध्यमवर्गीय घरातील 'टॅलेंट'ला वाव मिळेल. देशाच्या क्रीडा विकासात अमूल्य भर टाकणारे हे विद्यापीठ ठरेल. येत्या वर्षभरात या विद्यापीठातले अभ्यासक्रम चालू होतील तर तीन वर्षात पूर्ण क्षमतेने हे विद्यापीठ कार्यरत होईल," असा विश्वास राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनील केदार यांनी शुक्रवारी (दि. २५) व्यक्त केला.

आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठाच्या विधेयकास मंत्रीमंडळाने मान्यता दिल्यानंतर यासंबंधीचे अधिनियम नुकत्याच झालेल्या विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनातही एकमताने मंजूर करण्यात आले. या पार्श्वभूमीवर केदार यांनी म्हाळुंगे-बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात ज्येष्ठ क्रीडापटू, प्रशिक्षक, संघटक आदींची बैठक घेतली. देशातले पहिले आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ कसे असावे, या संदर्भात यावेळी ज्येष्ठांनी मते व्यक्त केली. त्यानंतर केदार यांनी पत्रकारांशी संवाद साधला. राज्याचे क्रीडा आयुक्त ओमप्रकाश बकोरिया, क्रीडा सहसंचालक सुहास पाटील, तज्ज्ञ डॉ. जवाहर सुरीशेट्टी आदी यावेळी उपस्थित होते.

प्रश्न : पहिले आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ पुण्यातच का?

केदार : बालेवाडीच्या शिवछत्रपती क्रीडा संकुलाच्या १५२ एकर जागेत आंतरराष्ट्रीय पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत. त्यामुळे पहिल्या टप्प्यातील विद्यापीठाचे कामकाज सुरु होण्यास अनुकूल स्थिती आहे. पुण्यातील वातावरण क्रीडा क्षेत्रास पोषक आहे, येथे अनेक खेळांचे तज्ज्ञ, प्रशिक्षक उपलब्ध आहेत. क्रीडा संस्कृती विकसित झालेले हे शहर असल्याने पुण्याची निवड विद्यापीठ उभारणीसाठी केली.

प्रश्न : क्रीडा संबंधित एवढ्या संस्था, प्रबोधिनी असताना क्रीडा विद्यापीठ का गरजेचे आहे?

केदार : आंतरराष्ट्रीय दर्जाचा एक खेळाडू तयार करायचा तर त्याच्यामागे आई-वडिलांपासून ते प्रशिक्षक, आहारतज्ज्ञ वगैरे जवळपास १७० ते २०० लोकांचे पाठबळ लागते. यामुळे क्रीडा क्षेत्र ही सामान्य कुटुंबातील तरुण-तरुणींना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळवून देण्याची क्षमता असणारी मोठी 'इंडस्ट्री' बनली आहे. क्रीडा क्षेत्रात येणारा प्रत्येकजण आंतरराष्ट्रीय स्तरावर मेडल मिळवू शकत नाही. त्या स्तरापर्यंत पोहोचणाऱ्यांना संबंधित क्षेत्रांमध्ये प्रचंड वाव आहे. हे कुशल मनुष्यबळ या विद्यापीठातून तयार होऊ शकेल.

प्रश्न : आंतरराष्ट्रीय विद्यापीठाचा आग्रह का?

केदार : राजीव गांधी यांनी संगणक आणला तेव्हा म्हटले गेले की दहा लोकांचे काम एकच संगणक करेल आणि यामुळे बेकारी होईल. प्रत्यक्षात आयटीच्या माध्यमातून आज कोट्यवधी रुपयांची उलाढाल सुरु झाली आहे. हाच धागा पकडून आंतरराष्ट्रीय विद्यापीठाची मुहूर्तमेढ आपण रोवतो आहोत.

आपली स्पर्धा जगाशी असेल. या विद्यापीठाच्या माध्यमातून सामान्य तरुण-तरुणींचे भवितव्य सुरक्षित करण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे. परदेशातील विद्यापीठे, क्रीडा संस्था यांच्याशी आपले विद्यापीठ जोडले जाणार आहे. अद्ययावत तंत्रज्ञानाचा पुरेपुर वापर आपण करणार आहोत.

### काय असेल विद्यापीठात?

- केंद्रीय विद्यापीठ अनुदान आयोग (युजीसी)च्या निकषांवर उभारले जाणार.
- पहिल्या टप्प्यात स्पोर्ट्स सायन्स, स्पोर्ट्स टेक्नॉलॉजी आणि स्पोर्ट्स कोचिंग व ट्रेनिंग हे तीन अभ्यासक्रम
- पाच वर्षाकरीता कुलगुरु, रजिस्ट्रार, त्यांची कार्यालयीन पदे आदी एकूण १३३ पदे पहिल्या वर्षात प्रस्तावित.
- दोन वर्षात ग्रामीण महाराष्ट्रात विद्यापीठाची उपकेंद्रे निर्माण करणार.

### नफेखोरीचा उद्देशच नाही



राज्य सरकारचे विद्यापीठ असल्याने नफेखोरीचा विषय नाही. विद्यापीठात खासगीची घुसखोरी होऊ देणार नाही. सर्वसामान्यांना जास्तीत जास्त संधी मिळेल याची काळजी घेऊ. महाराष्ट्रात जास्तीत जास्त प्रशिक्षक, खेळाडू, क्रीडा वैद्यक तज्ज्ञ तयार करुन क्रीडा संस्कृतीच्या माध्यमातून राज्याच्या रोजगार निर्मिती आणि सर्वांगिण विकासाचे उद्दीष्ट ठेवले आहे. -सुनील केदार, क्रीडा मंत्री, महाराष्ट्र

Lokmat: 26.12.2020



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Sports

पुढारी

# हवे सक्षम क्रीडा विद्यापीठ अन् खुली मैदाने



**पुणे : सुनील जगताप**

**नुकत्याच जाहीर झालेल्या आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठाच्या स्थापनेसाठी महत्त्वपूर्ण पावले उचलणे, महापालिकेच्या फायलीत बंद असलेल्या क्रीडा धोरणाला चालना, मुलांना शहराच्या विविध भागांत मैदाने मिळण्याकरिता प्रयत्न करणे तसेच खेळाडूंच्या मानसिक आणि शारीरिक प्रशिक्षणावर भर देणे हा आहे. पुण्याच्या क्रीडा क्षेत्रासाठीचा पुढील वर्षाचा अजेंडा.**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर २०२० या वर्षात सर्वच क्रीडा स्पर्धा रद्द झाल्या असून, खेळाडूंना सरावालाही अपेक्षित वेळ मिळाला नाही. परंतु, येणारे २०२१ चे वर्ष पुन्हा भरगच्च क्रीडास्पर्धांचे असावे, अशी पुणेकरांची अपेक्षा आहे.

केंद्र सरकारने आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ जाहीर केले आहे. हे विद्यापीठ नव्या वर्षात पूर्ण क्षमतेने सुरू होणेही खेळाडूंना पुन्हा क्रीडा क्षेत्राच्या प्रगतीच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरणार आहे. क्रीडापटू आणि एकूणच क्रीडा क्षेत्रासाठी २०२० हे वर्ष अपयशी ठरले आहे. कोणत्याच प्रकारच्या स्पर्धा जिल्हा, राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर न झाल्याने अनेक खेळाडूंच्या ग्रेस गुणांसह शिष्यवृत्तीचा प्रश्न उपस्थित झाला आहे.

स्पर्धाच न झाल्याने अशा प्रकारची योजना राबविताना क्रीडा विभागालाही अडचणी निर्माण झालेल्या आहेत. या सर्व प्रकारातून मार्ग काढत येणाऱ्या वर्षात तरी अशा अडचणी येऊ नयेत म्हणून खेळाडूंच्या आशा विद्यापीठाने पल्लवित झाल्या आहेत.

### यासाठी हवे नियोजन

- शहराच्या प्रत्येक भागात मोकळ्या मैदानांची आवश्यकता
- क्रीडा विद्यापीठाची सक्षम उभारणी
- २०१८ च्या क्रीडा धोरणातील योजनांची अंमलबजावणी
- महाराष्ट्र केसरी स्पर्धा होणे गरजेचे
- गिर्यारोहणावर आता पदविका अभ्यासक्रम
- स्पर्धात्मक खेळाऐवजी शारीरिक तंदुरुस्ती, मानसिकतेवर अधिक भर

**अजेंडा 2021 पुणेकरांचा | क्रीडा |**



संग्रहित छायाचित्र

### ▸▸ धोरणातील तरतुदींवर करावे लागणार काम

महापालिका हद्दीमध्ये असणाऱ्या खेळाडूंसाठी पुणे महापालिकेच्या वतीने नवीन क्रीडा धोरण २०१८ मध्ये मांडण्यात आले. या क्रीडा धोरणाला मुख्य सभेने मान्यताही दिली होती. परंतु, गेल्या दोन वर्षांमध्ये या धोरणाप्रमाणे अपेक्षित काहीच झालेले दिसून आलेले नाही. त्याचबरोबर शहराच्या सर्व भागांत मुलांना खेळण्यासाठी मोकळे मैदान नसल्याने मुलांची कुंचबणा होत आहे. महापालिका अथवा शासनाकडून शहरात मैदाने खुली करून देणे गरजेचे आहे. परंतु, त्यांची मानसिकता सध्या तरी दिसून येत नाही. मुलांना खेळण्यासाठी मोकळे मैदानच नसल्याने त्यांचा ओढा सोशल मीडियाकडे अधिक झुकत चालल्याचे दिसून येत आहे.

याबाबत दै. 'पुढारी'शी बोलताना महापालिकेच्या क्रीडा उपायुक्त किशोरी शिंदे म्हणाल्या की, कोविडमुळे सर्वच स्पर्धा रद्द करण्यात आलेल्या आहेत. सध्या फक्त सरावाला परवानगी मिळाली असून, शासनाच्या पुढील निर्देशाप्रमाणे क्रीडा विभागात योग्य ते निर्णय घेतले जातील. शहराच्या चारही बाजूला खेळाडूंसाठी मोकळे मैदान नसले, तरी त्याबाबतचा निर्णय शासकीय पातळीवर अपेक्षित असून, कोविडमुळे हा विषय त्वरित मार्गी लागणे अशक्य आहे. कोविडची परिस्थिती नियंत्रणात आल्यानंतर २०१८ साली मुख्य सभेने मंजूर केलेल्या क्रीडा धोरणातील विविध योजना प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकडे आमचा अधिक कल असणार आहे.

### ▸▸ उच्च शिक्षणाची खेळाडूंना संधी

याबाबत दै. 'पुढारी'शी बोलताना क्रीडा आयुक्त ओमप्रकाश बकोरिया म्हणाले की, नवीन वर्षामध्ये खेळाडूंसह प्रशिक्षकांसाठी आंतरराष्ट्रीय क्रीडा विद्यापीठ हे महत्त्वाचे असणार आहे. या विद्यापीठाच्या माध्यमातून अनेकांना उच्च शिक्षणाची संधी मिळणार असून, प्रत्येक विषयाचा अभ्यासही होणार आहे. त्याचबरोबर प्रत्येक तालुक्यातील क्रीडा संकुलांच्या सक्षमीकरणासाठी ही प्रयत्न राहणार आहेत. बालेवाडीतील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या प्रत्येक स्टेडियमचा वापर खेळाडूंसाठी जास्तीत जास्त करून देण्याच्या उद्देशाने स्पर्धात्मक निर्णय शासनाच्या निर्देशाप्रमाणे घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

### ▸▸ खेळाडूंच्या सुविधांसाठी अधिक काम

आगामी क्रीडा स्पर्धा आणि क्रीडा संस्कृतीबाबत बोलताना महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक संघटनेचे सचिव आणि महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेचे महासचिव बाळासाहेब लांडगे म्हणाले की, या वर्षी डिसेंबरमध्ये होणारी महाराष्ट्र केसरी ही महत्त्वाची स्पर्धा रखडली आहे. पुढील महिन्यामध्ये राज्य पातळीवरील स्पर्धा उत्तर प्रदेशमध्ये घेण्याचा निर्णय झाला असून नव्या वर्षात कुस्तीपटूंना महाराष्ट्र केसरीची मेजवाणी देण्याचा विचार सुरू आहे. त्याचबरोबर खेळाडूंच्या दृष्टीने ऑलिम्पिक संघटनेच्या माध्यमातून कोणत्या सुविधा आणि योजना देण्यात येतील याबाबत विचारविनिमय करण्यासाठी बैठक ही बोलावण्यात आली असून, त्यातून खेळाडूंसाठी नक्कीच योग्य तो निर्णय करू.

### ▸▸ गिर्यारोहणावर आता पदविका अभ्यासक्रम

गिर्यारोहण आणि संलग्न साहसी क्रीडाप्रकारासाठी पदविका अभ्यासक्रम आणि प्रमाणपत्र अभ्यासक्रम संयुक्तरीत्या राबविण्यासंदर्भात सामंजस्य करार करण्यात आला आहे. साहसी खेळ आणि पान ४ वर

My Pune Edition
Dec 31, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# हवे सक्षम क्रीडा विद्यापीठ अन् खुली मैदाने

(पान १ वरून)

गिर्यारोहण यातील प्रशिक्षण तसेच त्या क्षेत्राच्या विकासाची गरज लक्षात घेऊन हा सामंजस्य करार करण्यात आला आहे. हे सर्व अभ्यासक्रम विद्यापीठामध्ये लवकरच सुरू होतील आणि साहसी क्षेत्रामध्ये एक पद्धतशीर अभ्यासक्रमाचा पर्याय सर्व तरुणांना उपलब्ध होईल. तसेच या प्रशिक्षणातून संबंधित क्षेत्रात काम करण्यासाठी अनेक तरुण पुढे येतील आणि एक सशक्त साहसी समाज घडण्यासाठी त्याचा उपयोग होईल.

जीजीआयएमतर्फे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहकार्याने अभ्यासक्रमांसाठी सर्व व्यवस्थापन आणि प्रशिक्षण पार पडेल. या पूर्वी स्थापनेपासून गेल्या पाच वर्षांच्या कालावधीत जीजीआयएमतर्फे शालेय विद्यार्थी, महाविद्यालयीन युवक, नोकरदार, व्यावसायिक, महिला पुरुष या सर्वांसाठी विविध प्रमाणपत्र अभ्यासक्रम तसेच प्रशिक्षण वर्ग राबविले जातात. तसेच, महाराष्ट्राच्या वनविभागातील अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठीदेखील जीजीआयएमतर्फे सुरक्षा प्रशिक्षण अभ्यासक्रम विकसित करण्यात आला असल्याचे जीजीआयएमचे अध्यक्ष उमेश झिरपे यांनी सांगितले.

### मानसिक प्रशिक्षणाची जास्त भर

येत्या वर्षाला कोरोनाची पार्श्वभूमी असल्याने वर्षाची सुरुवात मात्र आपल्या हळुवारपणे करावी लागणार आहे. कारण कोरोनामुळे प्रत्येक व्यक्तीच्या शारीरिक क्षमता आणि तंदुरुस्तीचा कस लागलेला आहे. याचा अनुभव घेता आगामी वर्षात खेळाडूंना प्रत्येक खेळाच्या प्रशिक्षणाबरोबरच मानसिकतेच्या प्रशिक्षणाची ही जास्त गरज आहे. स्पर्धात्मक खेळाऐवजी शारीरिक तंदुरुस्ती, संयम, आणि मानसिकता भक्कम करणे गरजेचे असल्याचे मत महाराष्ट्र राज्य जिम्नॅस्टिक असोसिएशनचे उपाध्यक्ष धनंजय दामले यांनी सांगितले.

My Pune Edition
Dec 31, 2020 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Research



# पुण्यातील विद्यार्थ्यांनी लावला सहा लघुग्रहांचा शोध

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २० - पुण्यातील दोन विद्यार्थिनींनी सहा नवीन लघुग्रहांचा शोध लावण्यात यश मिळवले. त्यांनी अब्दुल कलाम अवकाश संशोधन संस्थेत एका उपक्रमात सहभाग घेत हे यश मिळवले. त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

सूर्यमालेतील महत्त्वाचा घटक असलेल्या लघुग्रहांबद्दल सातत्याने संशोधकांकडून अभ्यास केला जातो. यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. अशाच उपक्रमात शालेय विद्यार्थ्यांनी २७ नवीन लघुग्रहांचा शोध लावला आहे. त्यात यामध्ये पुण्यातील विखे पाटील शाळेतील आर्या पुलाटे आणि श्रेया वाघमारे या दोघींनी मंगळ आणि गुरूच्या कक्षेतील सहा नवीन लघुग्रहांचा शोध लावला आहे.

कलाम सेंटर आणि आंतरराष्ट्रीय लघुग्रह शोधिका सहयोग (आयएएससी) यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय स्तरावरील लघुग्रह शोधमोहिमेचे आयोजन करण्यात आले होते. या मोहिमेत जगभरातून २२ स्पर्धक सहभागी झाले होते. जगभरात ९ नोव्हेंबर ते ३ डिसेंबरदरम्यान आयोजित विविध उपक्रमांच्या माध्यमातून, अतिशय खडतर निवड प्रक्रियेद्वारे ही निवड केली होती. यानंतर त्यांना

(पान २ पहा) ▶▶

> अवकाशातील फिरत्या खडकांचा म्हणजेच लघुग्रहांचा अभ्यास करणे, त्यांचे निरीक्षण करणे हा अंतराळ संदर्भातील अभ्यासाचा एक महत्त्वाचा भाग आहे.
>
> – श्रीजन पाल, कलाम सेंटरचे संस्थापक

Prabhat: 21.12.2020



लोकमत

स्थानिक निसर्गप्रेमींना दिसले दुर्मीळ 'लाजवंती'

# आंबोली-दोडामार्गच्या जंगलात दुर्मीळ 'माकडा'चा वावर

■ संदीप आडनाईक
लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबोली-दोडामार्गच्या जंगलात स्थानिक निसर्गप्रेमींना दुर्मीळ 'लाजवंती' म्हणजेच 'स्लेंडर लोरीस' या माकड कुळातील प्राण्याचे दर्शन शनिवारी घडले. आंबोली आणि दोडामार्ग या संवर्धन राखीव वनक्षेत्रात हा प्राणी आढळला आहे. मात्र, या दुर्मीळ प्राण्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने 'कॉन्झर्वेशन रिझर्व्ह'मधील त्याचे नेमके स्थान गुप्त ठेवण्यात आले आहे.

'लाजवंती' निशाचर असून, तो अत्यंत हळू हालचाल करतो. हुबेहूब एखाद्या लहान मुलासारखा दिसत असल्यामुळे त्याला 'वनमानव'ही म्हटले जाते. वन्यजीव संरक्षण कायद्यांतर्गत या प्राण्याला प्रथम श्रेणीचे म्हणजेच वाघाच्या दर्जाचे संरक्षण मिळाले आहे. लाजवंतीचा आकार ४० सेंटिमीटर असून, त्याचे वजन १८० ग्रॅम असते.

'लाजवंती' या माकड कुळातील दुर्मीळ प्राण्याचे वास्तव्य भारत आणि श्रीलंकेतील घनदाट जंगलांमध्ये आढळते. पश्चिम घाटाच्या जंगलामध्ये 'लाजवंती'चे वास्तव्य असून, सिंधुदुर्ग जिल्ह्यातही केवळ तिलारी आणि परिसरातच हा प्राणी आढळतो.

## राखीव वनक्षेत्रात आढळले

गेल्याच महिन्यात राज्य वन्यजीव मंडळाच्या शिफारशीने सरकारने नव्यानेच घोषित केलेल्या 'आंबोली-दोडामार्ग' संवर्धन राखीव वनक्षेत्रामध्ये या दुर्मीळ प्राण्याचे दर्शन स्थानिक निसर्गप्रेमी संजय सावंत, तुषार देसाई, अभित सुतार आणि संजय नाटेकर यांना झाले.

> शनिवारी रात्री निसर्गभ्रमंतीच्या दरम्यान 'लाजवंती' हा प्राणी आम्हाला आढळून आला आहे. या प्राण्याचे छायाचित्रही मिळविण्यात यश आले आहे.
>
> - संजय सावंत, निसर्गप्रेमी

Pune Main
Page No. 5 Dec 22, 2020
Powered by: erelego.com



## *News Paper Clippings During December 2020*

### Section: Research





# नगरमध्ये आढळली दुर्मिळ प्रजातींची बेडकं

**नगर : यंदा पावसाळ्यात पहिल्यांदाच नगर जिल्हा निसर्गप्रेमी तथा जैवविविधता संशोधन व संवर्धन केंद्राच्या वतीने जिल्ह्यातील उभयचर प्राणी सर्वेक्षण करण्यात आले. यामध्ये वेगवेगळ्या ठिकाणाहून ३१ पेक्षा अधिक प्रजातींच्या बेडकांची नोंद घेण्यात आली. अशा प्रकारचे राज्यातील पहिल्याचे प्रकारचे सर्वेक्षण ठरले आहे.**

**राज्यातील पहिलेच उभयचर प्राणी सर्वेक्षण**

या सर्वेक्षणामध्ये २५ निसर्गप्रेमींनी सहभाग घेतला. ऑगस्ट ते सप्टेंबर महिन्यात पानथळ ठिकाणी तसेच या निसर्गप्रेमींनी आपापल्या परिसरात आढळणाऱ्या बेडकांचे छायाचित्रे संकलित केले गेले. निसर्गअभ्यासक शिक्षक जयराम सातपुते यांच्या मार्गदर्शनाने या सर्वेक्षणाचे आयोजन केले होते. सर्वेक्षणात आढळलेल्या वैविध्यपूर्ण बेडकांची अचूक ओळख पटवण्याचे व त्यांच्याबाबत सविस्तर माहिती देत मार्गदर्शन उभयचर प्राणी अभ्यासक डॉ. वरद गिरी व प्राणिशास्त्रज्ञ डॉ. सुमन पवार यांनी केले.

या सर्वेक्षणात आशा कसबे यांनी घेतलेली बलुन फ्रॉग, भट्टीवाडी (करंजी) येथील शालेय विद्यार्थ्यांनी घेतलेली फन्गॉईड व देशातील सर्वांत मोठ्या आकाराच्या इंडियन बुलफ्रॉग, रवींद्र गोल्हार यांनी घेतलेली कॉमन ट्री फ्रॉग तर स्नेहा ढाकणे यांनी घेतलेली राईस फ्रॉग या नोंदी वैशिष्ट्यपूर्ण व महत्त्वाच्या ठरल्या आहेत. तसेच प्रतिमा ढगे, अमित गायकवाड, शिवकुमार वाघुंबरे, सचिन चव्हाण, संदीप राठोड, अक्षय पाभारे, संजय बोकंद, खुशाल शिंदे, विठ्ठल पवार, संदीप फंड, विजय परदेशी या मुख्य निरीक्षकांनीही मोलाच्या नोंदी नोंदवल्या आहेत.

अशा प्रकारचे राज्यातील पहिलेच सर्वेक्षण ठरले आहे. यासाठी जिल्हा उपवन संरक्षक अधिकारी एम. आदर्श रेड्डी यांचे सहकार्य लाभले. या सर्वेक्षणात सहभागी झालेल्यांना प्रमाणपत्र देणार आहे.

> सर्वप्रथम पृथ्वीवर पाण्यात जलचरांच्या रूपाने जीवसृष्टीचा उगम झाला. उभयचरवर्गीय प्राणी हे जलचर व भूचर प्राण्यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहेत. निसर्गचक्रात या उभयचरांना महत्त्वाचे स्थान असूनही हा घटक दुर्लक्षितच राहतो. या घटकांवरही जाणीवपूर्वक अभ्यास, निरीक्षण व नोंदी होणे अतिशय गरजेचे आहे, या उद्देशाने जिल्ह्यात सर्वेक्षणाचे आयोजन केले होते. नगर जिल्ह्यापासून या सर्वेक्षणाची सुरुवात होत असल्याची बाब आनंदाची आहे.
>
> – जयराम सातपुते, जिल्हाध्यक्ष, नगर जिल्हा निसर्गप्रेमी संघटना तथा जैवविविधता संशोधन व संवर्धन केंद्र.

Saamana: 24.12.2020



लोकमत

# भीमा नदीत आढळली शंकराची मूर्ती

## एक टन वजन असलेला मुखवटा : आणखी अवशेष सापडण्याची शक्यता

लोकमत न्यूज नेटवर्क

दौंड : येथील भीमा नदी पात्रातील २८ मोऱ्यांच्या रेल्वे पूलाजवळ शंकराचे मुख असलेली जवळपास १५० वर्षापूर्वीची दगडी मूर्ती खोदकामात सापडली आहे. मूर्तीचे तोंड पाच फुट असून वजन एक टनाच्या जवळपास आहे.

दौंड-नगर रेल्वे लोहमार्गासाठी गेल्या १५० वर्षापूर्वी इंग्रजांनी दगडी कामातील पूल उभारला आहे. या पूलाच्या बाजूलाच दुसरा रेल्वे पूलाच्या पायाभरणीचे काम सध्या सुरु आहे. या ठिकाणी शनिवारी खोदकाम सुरू असताना एका खड्ड्यात ही मूर्ती सापडली. कामगारांनी ही मूर्ती जेसीबीच्या सहाय्याने काढून बाजूला ठेवली आहे. स्थानिकांच्यामते ही मूर्ती पाण्याच्या प्रवाहात वाहून आलेली आहे. मात्र, मूर्तीचे वजन जास्त असल्याने ही मूर्ती वाहून येऊ शकत नाही. ती या ठिकाणचीच असल्याची माहिती काही तज्ज्ञांनी व्यक्त केली. मूर्तीच्या मुखाचा भाग सापडला असून, याच परिसरात इतर अवशेषही सापडण्याची शक्यता आहे. त्यामुळे तज्ज्ञ लोक यावर अभ्यास करून ही मूर्ती कुठून आली, याचा शोध घेतील.

भीमा नदी पात्रात सापडलेली एक टन वजनाची दगडी शंकराची मूर्ती. (छायाचित्र : मनोहर बोडखे)

## प्राचीन मूर्ती दौंड परिसरातलीच

> पाण्याचा कितीही मोठा प्रवाह असला तरीही एक टन दगडाच्या वजनाची मूर्ती दूरवरुन वाहून येऊ शकत नाही. पाण्याच्या प्रवाहामुळे थोड्या अंतरापर्यंत या मूर्तीची हालचाल होऊ शकते. गेल्या दोन वर्षात भीमा नदीला जोराचा पाण्याचा प्रवाह असलेला पूर आलेला नाही. त्यामुळे ही प्राचीन मूर्ती या ठिकाणचीच असण्याची शक्यता आहे.
>
> - रवींद्र जाधव, सेवा निवृत्त पाटबंधारे अभियंता

Pune Main
Page No. 2 Dec 27, 2020
Powered by: erelego.com

## *News Paper Clippings During December 2020*

Section: Research

### आघारकर संशोधन संस्थेतील संशोधकांचे संशोधन

# वनस्पतींच्या औषधी भागांचे चित्रमय दस्तऐवजीकरण

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** औषध निर्मितीमध्ये महत्त्व असलेल्या वनस्पतींच्या औषधी भागाचे चित्रमय दस्तऐवजीकरण आघारकर संशोधन संस्थेतील संशोधकांनी केले आहे. या अंतर्गत राज्यभरातील १७४ औषधी वनस्पतीच्या प्रजातींमधील १९८ भागांची छायाचित्रे आणि माहिती संकलित करून त्याचे 'कॉम्पेन्डियम ऑफ रॉ बॉटनिकल ड्रग्ज ऑफ महाराष्ट्र' हे पुस्तक प्रसिद्ध करण्यात आले आहे.

दातार यांनी हे संशोधन केले आहे. या पुस्तकासाठी पाच वर्षे राज्यभरात फिरून वनस्पतींची छायाचित्रे, माहिती आणि नमुने संकलित करण्यात आले. तसेच हे नमुने आघारकर संशोधन संस्थेमध्ये शास्त्रीय पद्धतीने जतन करण्यात आले आहेत. या कामासाठी मुंबईच्या राजीव गांधी सायन्स अँड टेक्नोलॉजी कमिशनने निधी उपलब्ध करून दिला. औषधी वनस्पतीचा औषधांमध्ये वापरला जाणारा भाग दिसतो कसा हे उद्दिष्ट ठेवून संकलन केले आहे.




विद्यार्थी यांना हे पुस्तक मार्गदर्शक ठरेल...

**विनामूल्य डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध**

'कॉम्पेन्डियम ऑफ रॉ बॉटनिकल ड्रग्ज ऑफ महाराष्ट्र' आणि या पूर्वीचे 'फॉरेस्ट फूड्स ऑफ नॉर्दन वेस्टर्न घाट' ही दोन पुस्तके आघारकर संशोधन संस्थेच्या संकेतस्थळावरून ई बुक स्वरूपात विनामूल्य डाऊनलोड करण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

> या पूर्वी वेगवेगळ्या राज्यांतील औषधी वनस्पतींचे सर्वेक्षण केले होते. तर आता राज्याच्या वेगवेगळ्या भागांतील औषधी वनस्पतीमधील बारकावे आणि फिजिकल कॉन्स्टन्ट दाखवले गेले आहेत. त्यामुळे राज्यातील उच्च औषधीमूल्य असलेल्या वनौषधींच्या मानकांचे निश्चितीकरण झाले आहे. लोक वापरत असलेल्या वनौषधींची ओळखखूण दाखवणे, वनस्पतींमध्ये होणारे बदल दाखवण्याचा या अभ्यासाचा प्रयत्न होता. असे संशोधन देशपातळीवर करायला हवे. जेणेकरून पारंपरिक वनौषधींची सर्वसमावेशक माहिती संग्रहित होऊ शकेल. औषधी वनस्पती, त्यांचे गुणधर्म आणि पृथक्करण या संदर्भात आणखी संशोधनही करणे शक्य आहे. त्यासाठी औषध निर्मिती कंपन्यांनी पुढे यायला हवे.
>
> – डॉ. अनुराधा उपाध्ये, संशोधक

लोकसत्ता Fri, 25 December 2020
https://epaper.loksatta.com/c/57280584

### 'चन्ना एरिस्टोनी' असे नामकरण

# मेघालयमध्ये 'स्नेकहेड' माशाची नवी प्रजाती

लोकसत्ता खास प्रतिनिधी



**महाराष्ट्रातून नामशेष...**

महाराष्ट्रात चन्ना कुळातील प्रजाती 'डाकू' या नावाने ओळखली जाते, असे जयसिन्हा यांनी सांगितले. गेल्या काही वर्षांत राज्यातून या प्रजातीचे अस्तित्व जवळपास नामशेष झाले असून, गेल्या वर्षी रत्नागिरीजवळ नोंद झाली होती.

**मुंबई :** मेघालयच्या डोंगराळ भागात 'स्नेकहेड' या माशाच्या नव्या प्रजातीचा शोध लागला आहे. चमकदार रंग आणि सापाप्रमाणे तोंड असणाऱ्या चन्ना कुळातील माशांची संख्या मेघालयात मोठ्या प्रमाणात असून, या कुळातील नवीन प्रजाती नुकतीच समोर आली आहे.

भारतीय कृषी संशोधन परिषदेचे संशोधक प्रवीणराज जयसिन्हा, अरुमुगम उमा, एन.मौलीथरन, गजेंद्र सिंह, बंकित के. मुखिम आणि तेजस ठाकरे यांच्या चमूने या प्रजातीवर संशोधन केले आहे. नुकतेच अमेरिकन सोसायटी ऑफ इचिथोलॉजिस्ट आणि हर्पेटोलॉजिस्टच्या 'कोपिया' या नियतकालिकामध्ये यासंदर्भात शोधनिबंध प्रकाशित झाला.

गेल्या वर्षी नोव्हेंबरमध्ये मेघालयमधील एरिस्टोन रेडॉन्संगी यांनी या प्रजातीचे छायाचित्र जयसिन्हा यांना पाठवले. त्यानंतर त्यांनी आपल्या चमूसह मेघालयाचा दौरा करून या प्रजातीचा अभ्यास केला. गुणसूत्रे, आकारशास्त्राच्या अभ्यासाद्वारे जयसिन्हा यांनी त्यावर जानेवारीमध्ये शोधनिबंध लिहिला. त्यानंतर एक वर्षाने कोपियाने त्यावर शिक्कामोर्तब केले.

एरिस्टोन यांनी ही प्रजाती सर्वप्रथम आमच्या निदर्शनास आणून दिल्यामुळे या प्रजातीचे नामकरण 'चन्ना एरिस्टोनी' असे करण्यात आल्याचे जयसिन्हा यांनी सांगितले. डोंगराळ भागातील वाहत्या पाण्याच्या प्रवाहांमध्ये हा मासा हमखास सापडतो. तसेच पाण्यात दगडांच्या सांद्रीमधून त्याचा अधिवास असतो असे त्यांनी नमूद केले. तसेच या माशास वर्षभर थंड पाणी आणि भरपूर ऑक्सिजनची गरज असते. या माशास चांगली मागणी असते.

लोकसत्ता Fri, 25 December 2020
https://epaper.loksatta.com/c/57269144



*News Paper Clippings During December 2020*

Section: Research

पुढारी

# तोरणागडाचा अभेद्य दरवाजा उजेडात

## मावळ्या पहारेकऱ्यांच्या खडतर परिश्रमाने तब्बल साडेतीनशे वर्षांनंतर लागला शोध

- शोधकामात रुपयाही झाला नाही खर्च; चार ते पाच महिन्यांत मोहीम फत्ते
- जिवाची पर्वा न करता दुर्गम ठिकाणी केले शोधकाम



**जिवाची पर्वा न करता काबाडकष्ट करून पहारेकऱ्यांनी खोदकाम करून उजेडात आणलेला तोरणागडाचा वाळंजजाई दरवाजा.**

दत्तात्रय नलावडे

पुढारी विशेष

**वेल्हे :** छत्रपती शिवरायांनी वेल्हे तालुक्यातील अतिदुर्गम तोरणागड (प्रचंडगड) जिंकून हिंदवी स्वराज्याचे पहिले तोरण बांधले. शेकडो वर्षांच्या काळाच्या ओघात लुप्त झालेला तोरणागडाचा अभेद्य वाळंजजाई दरवाजा, तसेच शिवकालीन पायऱ्या निधड्या छातीच्या तिघा मावळ्या पहारेकऱ्यांनी जिवाची पर्वा न करता प्रतिकूल परिस्थितीत काबाडकष्ट करून उजेडात आणल्या आहेत. यासाठी पुरातत्त्व खात्याने एक रुपयाचाही सरकारी निधी खर्च केला नाही.

राजगडावरील लुप्त झालेला चोर दरवाजा व शिवकालीन वस्तू काही दिवसांपूर्वी सापडल्या. त्यानंतर आता मातीच्या ढिगाऱ्यात गाडलेला एक दरवाजा उजेडात आला आहे. मातीत गाडलेल्या चित्ता दरवाजाचा मार्ग मोकळा करण्याचे काम सुरू आहे. पुरातत्त्व खात्याने तोरणागडाची देखभाल व स्वच्छता व्हावी, यासाठी चिंतामणी सामाजिक पान ४ वर»

**गडाच्या रक्षणासाठी मावळ्यांचे साहस**

छत्रपती शिवरायांनी शेकडो वर्षांच्या गुलामगिरीत खितपत पडलेल्या भारतीय भूमिपुत्रांना स्वातंत्र्याचा महामंत्र दिला. स्वतंत्र राष्ट्रनिर्माणाचे ध्येय मावळ्यांसमोर ठेवले. अठरापगड जाती-धर्मांच्या मावळ्यांनी स्वराज्याच्या रक्षणासाठी बलिदान दिले. तोरणागडाच्या पायथ्याला असलेल्या पाबे येथील वीर मावळ्यांचे वारसदार अप्पासाहेब रेणुसे तोरणागडाच्या रक्षणासाठी पुढे आले. ते चिंतामणी शैक्षणिक संस्थेच्या वतीने तोरणागडाच्या देखभालीसाठी दोन पहारेकऱ्यांचे मानधन देत आहेत. शिवरायांच्या गडावर काम करण्याची संधी मिळाली त्याचे सोने करावे, या ध्येयातून कष्टकरी पहारेकरी साहसी काम करीत आहेत. त्यांनी राष्ट्रसेवेचा अनोखा आदर्श निर्माण केला आहे.

Pune Edition
Dec 26, 2020 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

## News Paper Clippings During December 2020

### Section: Miscellaneous

# गदिमांचे आत्मचरित्र इंग्रजीत

म. टा. प्रतिनिधी, पुणे



ग. दि. माडगूळकर

सिद्धहस्त लेखणीतून 'गीतरामायण' अजरामर करणारे आधुनिक वाल्मिकी ग. दि. माडगूळकर यांचे 'वाटेवरल्या सावल्या' हे आत्मचरित्र इंग्रजी भाषेत उपलब्ध झाले आहे. 'द शाडोज ऑफ सोलास ऑन द पथ' या नावाने पुस्तकाचा अनुवाद करण्यात आला आहे.

गदिमांच्या १०१व्या जयंतीनिमित्ताने गदिमा साहित्य कला अकादमीतर्फे गदिमांचे नातू सुमित्र माडगूळकर, नातसून प्राजक्ता आणि घटनातज्ज्ञ प्रा. उल्हास बापट यांच्या वतीने हे पुस्तक उपलब्ध करून देण्यात आले आहे.

प्रा. विनया बापट यांनी पुस्तकाचा इंग्रजी भाषेत अनुवाद केला आहे. 'गदिमांच्या जन्मशताब्दीनिमित्त दोन वर्षांपूर्वी गदिमांच्या निवडक १४ कथांचा 'सिलेक्ट शॉर्ट स्टोरिज ऑफ जी. डी. माडगूळकर' या नावाने प्रा. विनया बापट यांनी इंग्रजीत अनुवाद केला आहे. आता आत्मचरित्राने गदिमांच्या आयुष्यातील संघर्षाचा व तत्कालीन समाजजीवनाचा नवीन पैलू इंग्रजी वाचकांसमोर येत आहे. इंग्रजीतील हे आत्मचरित्र गदिमांचे ज्येष्ठ पुत्र श्रीधर माडगूळकर यांना अर्पण करण्यात आले आहे,' असे सुमित्र माडगूळकर यांनी सांगितले.

गदिमांना जन्मताच मृत घोषित करण्यात आले होते. तेव्हापासूनचा संघर्ष, वंदे मातरम चित्रपट प्रसिद्ध होईपर्यंत झालेला प्रवास गदिमांनी या आत्मचरित्रात वर्णन केला आहे. विशेष म्हणजे गदिमांचे अपूर्ण आत्मचरित्र जेथे संपते तेथूनच गदिमांच्या पत्नी विद्या माडगूळकर यांचे 'आकाशाशी जडले नाते' आत्मचरित्र सुरू होते. १९७७ मध्ये गदिमांच्या अकाली निधनाने हे आत्मचरित्र पूर्ण होऊ शकले नाही. तरीही गदिमांच्या जन्मापासून, बालपण ते संघर्ष काळातला प्रवास वाचकांना एक वेगळाच आनंद देऊन जातो.

'वाटेवरल्या सावल्या' या आत्मचरित्राच्या निवेदनाच्या ओघामध्ये गदिमांनी मातोश्री बनुताई; तसेच मा. विनायक, आचार्य अत्रे, बाबूराव पेंढारकर, वि. स. खांडेकर, बाबूराव पेंटर, सुधीर फडके अशी अनेक व्यक्तिचित्रे नेमक्या शब्दांत आणि सहज शैलीने रेखाटली आहेत.

> मराठीतील हे साहित्य जागतिक भाषेमध्ये अक्षय्य वाङ्मय ठरेल असे वाटते. इंग्रजीतील साहित्यामुळे जागतिक दर्जाच्या ग. द. माडगूणकर यांची प्रतिमा देशाच्या सीमा ओलांडून तेथील रसिकांच्या प्रेमाला पात्र झाली आहे. गदिमांचे साहित्य नवीन पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी स्थापन केलेल्या गदिमा साहित्य कला अकादमीने त्यांचे साहित्य-चित्रपटांचा प्रचार आणि प्रसार करणे, गदिमांचे स्मारक बांधणे ही उद्दिष्टे समोर ठेवली आहेत.
>
> – सुमित्र माडगूळकर, गदिमांचे नातू

Maharashtra Times: 7.12.2020

मटा अँकर नेपाळ आणि चीनच्या संयुक्त सर्वेक्षणातील माहिती; शिखराची उंची आता ८,८४८.८६ मीटर

# 'माउंट एव्हरेस्ट'ने गाठली आणखी 'उंची'

वृत्तसंस्था, काठमांडू



**असे झाले सर्वेक्षण**

- नेपाळ आणि चीनची सीमा एव्हरेस्टच्या शिखरावरून जात असल्यामुळे या दोन्ही देशांनी पर्वताची उंची मोजण्यासाठी संयुक्त सर्वेक्षण करण्याचे निश्चित केले.
- नेपाळने गेल्या वर्षी, तर चीनने मे २०२०मध्ये एव्हरेस्टची उंची मोजण्यासाठी सर्वेक्षकांची विशेष मोहीम पाठवली.
- नेपाळच्या मोहिमेत भारत-नेपाळ सीमेपासून सुमारे २५० किलोमीटरच्या भूभागाचे टप्प्याटप्प्याने सर्वेक्षण करण्यात आले. बंगालच्या उपसागरापासून भारत- नेपाळ सीमेपर्यंतच्या उंचीसाठी भारतीय नोंदी गृहीत धरण्यात आल्या.

जगातील सर्वोच्च शिखर असणाऱ्या 'माउंट एव्हरेस्ट'ची उंची गेल्या ६६ वर्षांत ८६ सेंटिमीटरने वाढली असल्याचे नव्या सर्वेक्षणातून समोर आले आहे. नेपाळ आणि चीनने संयुक्त हे सर्वेक्षण केले असून, 'एव्हरेस्ट'ची समुद्रसपाटीपासूनची उंची सध्या ८८४८.८६ मीटर असल्याचे दोन्ही देशांनी मंगळवारी जाहीर केले. या आधी 'सर्व्हे ऑफ इंडिया'ने १९५४मध्ये एव्हरेस्टची उंची ८८४८ मीटर निश्चित केली होती.

नेपाळमध्ये २०१५मध्ये आलेल्या ७.८ स्केलच्या भूकंपामुळे काठमांडूजवळील काही पर्वतांची उंची कमी झाल्याचे भूशास्त्रीय सर्वेक्षणातून समोर आले होते. 'एव्हरेस्ट'च्या उंचीवरही त्या भूकंपाचा परिणाम झाला असावा, अशी शक्यता भूगर्भशास्त्रज्ञ वर्तवत होते. ऑक्टोबर २०१९मध्ये नेपाळ आणि चीनने एव्हरेस्ट शिखराची उंची नव्याने मोजण्याचा करार केला. या करारानुसार दोन्ही देशांच्या सर्वेक्षकांनी त्रिकोणमिती पद्धत आणि ग्लोबल पोझिशनिंग सिस्टीम (जीपीएस) वापरून एव्हरेस्टचे नव्याने सर्वेक्षण केले. या सर्वेक्षणानुसार एव्हरेस्टची सध्याची उंची ८८४८.८६ मीटर निश्चित करण्यात आली असून, १९५४मध्ये भारताने केलेल्या सर्वेक्षणाच्या तुलनेत ती ८६ सेंटीमीटरने जास्त आहे. नेपाळने बंगालच्या उपसागरापासून, तर चीनने 'यलो सी'पासून एव्हरेस्टची उंची मोजली. भारताने याआधी बंगालच्या उपसागरापासून नेपाळच्या सीमेपर्यंतच्या भागाची उंची मोजली होती. त्या नोंदी गृहीत धरून त्या पुढील 'एव्हरेस्ट'च्या शिखरापर्यंतची उंची नेपाळतर्फे प्रथमच स्वतःची यंत्रणा वापरून मोजण्यात आली.

Maharashtra Times: 9.12.2020



## News Paper Clippings During December 2020

### Section: Miscellaneous

लोकमत

# पीएफ-ग्रॅच्युईटीत वाढणार रक्कम

## वेतनसंहितेत बदल : नोकरदारांचे भविष्य सुरक्षित करण्याचा प्रयत्न

इन्फो स्टोरी

लोकमत न्यूज नेटवर्क

पिंपरी : केंद्र सरकार वेतन संहितेत बदल केल्याने नोकरदारांच्या वेतनपद्धतीत बदल होणार आहेत. दरमहा हाती येणारे वेतन कमी होणार असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, भविष्य निर्वाह निधीतील रक्कम (ईपीएफ) आणि सेवाकाल संपुष्टात आल्यानंतर मिळणाऱ्या ग्रॅच्युईटीची रक्कम वाढणार आहे.

एप्रिल २०२१ पासून केंद्र सरकारने वेतन संहिता २०१९ लागू करण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे देशातील कामगारांच्या वेतनाची पुनर्रचना होणार आहे. पूर्वी रोजगारकर्ते कर्मचाऱ्यांचे मूळ वेतनही कमी दाखवत. तसेच, अनेकदा भत्त्यांची मूळ वेतनापेक्षा अधिक असायची. त्यामुळे भविष्य निर्वाह निधी आणि ग्रॅच्युईटीमध्ये रोजगारकर्त्यांना तुलनेने कमी भरावी लागत होती.

सीए दिलीप सातभाई म्हणाले नव्या वेतनसंहितेमध्ये कर्मचाऱ्यांच्या एकूण वेतनाच्या ५० टक्क्यांहून अधिक रक्कम भत्ते स्वरूपात देण्यास मनाई केली आहे.

भविष्य निर्वाह निधी आणि ग्रॅच्युईटीमधील कंपन्यांचे (रोजगारकर्त्यांचे) योगदान वाढणार आहे. या नियमामुळे आता मूळ वेतन एकूण वेतनाच्या ५० टक्के होईल. सध्या भविष्यनिर्वाह निधी मूळ वेतनाच्या १२ टक्के अथवा १८०० रुपये या पैकी जी रक्कम कमी आहे, ती पीएफ खात्यात कंपनी जमा करते. आता पन्नास टक्के मूळ रकमेवर १२ टक्के पीएफ द्यावा लागणार असल्याने कर्मचाऱ्यांना अधिक फायदा होईल.

सेवाकालातील प्रत्येक वर्षाला पंधरा दिवस याप्रमाणे मूळ वेतनाची रक्कम ग्रॅच्युईटी म्हणून दिली जात होती. आता मूळ रक्कम वाढणार असल्याने ग्रॅच्युईटीच्या रक्कमेतही वाढ होण्याची शक्यता आहे. त्या बाबतचे नियम येतील तेव्हा त्यात अधिक स्पष्टता येईल.

**अशी मिळेल भविष्य निर्वाह रक्कम**

- एखाद्या सेवकास मूळ वेतन आणि भत्ते मिळून मासिक वेतन ५० हजार रुपये जरी असले तरी जास्तीत जास्त १८०० रुपये भविष्यनिर्वाह निधीत भरण्याचे बंधन होते.
- नवीन बदलानुसार ५० हजार रुपये वेतनाच्या निम्म्या रक्कमेवर म्हणजे २५ हजार रुपयांच्या बारा टक्के म्हणजे दरमहा ३ हजार रुपये भरावे लागतील. तीनशे महिन्यांच्या सेवेनंतर पूर्वी दरमहा ३६०० रुपयांनुसार (कंपनी-कामगार रक्कम धरून) १० लाख ८० हजार रुपये मिळाले असते. आता ही रक्कम १८ लाख होईल.

Pune Main
Page No. 2 Dec 18, 2020
Powered by: erelego.com



खगोल विश्व संस्थेच्या वतीने गुरू - शनी युती दर्शनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



गुरू व शनी या ग्रहांमधील अंतर चारशे वर्षांत सर्वांत कमी झाल्याचे सोमवारी दिसून आले.

# टेलिस्कोपमध्ये ग्रहांचे 'संमेलन'

**गुरू- शनी महायुती पाहण्यासाठी आकाशप्रेमींचा उत्साह**

पुणे : गुरू आणि शनी हे दोन वायुरूपी ग्रह आणि त्यांचे एकूण सहा चंद्र असे खगोलीय संमेलन टेलिस्कोपच्या एका दृश्यात पाहण्याचा अद्‌भुत योग आकाशप्रेमींनी सोमवारी साधला. निमित्त होते गुरू- शनी महायुतीचे. चारशे वर्षांनंतर दिसणाऱ्या या दुर्मीळ घटनेची छबी टिपण्यासाठी खगोल अभ्यासकांसह हौशी आकाशप्रेमीही सरसावले.

सोमवारी या दोन ग्रहांमधील अंतर फक्त ०.१ अंश (पौर्णिमेच्या चंद्राच्या व्यासापेक्षा पाच पटींनी कमी) इतके झाल्याचे दिसून आले. साध्या डोळ्यांनी पाहताना गुरू आणि शनी हे जोडग्रह असल्याचे दृश्य होते. खगोल विश्व संस्थेच्या वतीने मावळ तालुक्यातील पुसाणे येथे गुरू - शनी युती दर्शनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सोमवारी संध्याकाळी साडेसहाला नैर्ऋत्येच्या आकाशात साध्या डोळ्यांना गुरू आणि शनीची जोडी दिसून आली. टेलिस्कोपमधून पाहिले असता गुरूसोबत आयो, युरोपा, गॅनिमिड, कॅलिस्टो हे चार चंद्र, तसेच शनीसोबत टायटन आणि रिहा हे दोन चंद्र एकाच दृश्यात दिसत असल्यामुळे आकाशप्रेमींच्या डोळ्यांचे पारणे फिटले. ही घटना फेसबुक लाइव्हद्वारेही दाखवण्यात आली.

ज्योतिर्विद्या परिसंस्थेच्या वतीने गुरू - शनी युती पाहण्यासाठी केसरीवाडा येथे टेलिस्कोपची व्यवस्था करण्यात आली होती. सोमवारी सुमारे दोनशे आकाशप्रेमींनी ही दुर्मीळ घटना टेलिस्कोपमधून पाहिल्याचे संस्थेचे अनिरुद्ध देशपांडे यांनी सांगितले. संस्थेच्या वतीने आयोजित लाइव्ह स्ट्रीमलाही मोठा प्रतिसाद मिळाला. मंगळवारीही गुरू- शनी युती टेलिस्कोपमधून दाखवणार असल्याचे देशपांडे यांनी सांगितले.

Maharashtra Times: 22.12.2020

## News Paper Clippings During December 2020

### Section: Miscellaneous

पुढारी

# नवोदितांसह दिग्गजांच्या पुस्तकांची कामे सुरू

## प्रकाशकांच्या कामांना वेग; मात्र पुस्तकविक्रीबाबतचा पेच कायम

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनामुळे थांबलेली पुस्तकनिर्मिती पुन्हा नव्या जोमाने सुरू झाली आहे. प्रकाशकांकडे नवोदितांसह दिग्गज लेखकांच्या पुस्तकनिर्मितीचे काम सुरू असून, पुस्तकाच्या मुद्रितशोधनापासून ते छपाईपर्यंतची कामे सर्व खबरदारी घेऊन वेगात सुरू आहेत. असे असले तरी बाजारात आलेल्या नव्या पुस्तकांच्या विक्रीचा प्रश्न प्रकाशकांना मोठ्या प्रमाणात भेडसावत आहे.

शाळा-महाविद्यालये आणि ग्रंथालयांचे अनुदान थकल्याने पुस्तक व्यवसाय अडचणीत आला आहे. त्यामुळे प्रकाशकही आर्थिक अडचणीत आहेत. तरीही प्रकाशकांनी पुस्तकनिर्मितीला गती दिली आहे. कोरोनाच्या ज्वलंत विषयांपासून ते कवितासंग्रहापर्यंत वेगवेगळ्या विषयांवर पुस्तकनिर्मिती होत असून, पुस्तकनिर्मिती प्रक्रिया व्यवस्थित सुरू असल्याचे प्रकाशकांचे म्हणणे आहे.

> पुस्तकनिर्मिती सध्या कमी प्रमाणात सुरू आहे. जे होत आहे त्याचे प्रमाण मोठे नाही. कारण अजूनही प्रकाशक आणि ग्रंथालयांना अनुदान मिळालेले नाही. तोच प्रश्न अजून भेडसावत आहे. अनुदान मिळाले की पुस्तकनिर्मितीलाही गती मिळेल. सध्या तरी प्रकाशन व्यवसाय अडचणीत आहे.
>
> - **राजीव बर्वे,** अध्यक्ष, अखिल भारतीय मराठी प्रकाशक संघ

याविषयी प्रकाशक अरविंद पाटकर म्हणाले, छापील पुस्तकनिर्मितीही सुरूच आहे. त्याचे प्रमाण फारसे नाही. त्याचे मूळ कारण म्हणजे पुस्तकांची विक्री ज्या प्रमाणात व्हायला हवी, त्याप्रमाणे होताना दिसत नाही. तो एक मोठा प्रश्न प्रकाशकांसमोर आहे. ग्रंथालयांना अनुदान रखडलेले आहे. त्यामुळे त्यांनी नवी पुस्तक खरेदी केलेली नाही. शाळा-महाविद्यालये बंद आहेत, म्हणूनच शाळा-महाविद्यालयांतील ग्रंथालयांकडूनही पुस्तक खरेदी झालेली नाही. फक्त पुस्तक दालने आणि वाचक एवढीच पुस्तक विक्री सुरू आहे. अवांतर पुस्तकांची खरेदी फारशी होताना दिसत नाही. सध्या आमच्याकडे ७२ पुस्तकांच्या निर्मितीचे काम सुरू आहे. पुस्तकनिर्मितीची संख्या येत्या काळात वाढेल, अशी आशा आहे.

प्रकाशक चेतन कोळी यांच्या म्हणण्यानुसार, पुस्तकनिर्मिती प्रक्रिया मध्यंतरीच्या काळात मंदावली होती. पण, आता त्याला थोड्या प्रमाणात गती मिळाली आहे. दिवाळीनंतर पुस्तकनिर्मितीची मागणी वाढली आहे. लॉकडाऊनकाळात लिखाण केलेल्या नवोदित लेखकांकडुन मागणी आहे. आता मात्र पुस्तकाच्या मुद्रितशोधनापासून ते छपाईपर्यंतची कामे सर्व खबरदारी घेऊन सुरू आहेत. नव्या पुस्तकांचे प्रकाशन छोटेखानी स्वरूपातील कार्यक्रमात होत आहे. २०२१ मध्ये प्रत्यक्ष पुस्तक प्रकाशनाच्या कार्यक्रमाला सुरुवात होईल, असा अंदाज आहे.

My Pune Edition
Dec 23, 2020 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

लोकसत्ता

# देवनागरीत मुद्रित झालेला जगातील पहिला ग्रंथ मिरजेत!

**दिगंबर शिंदे, लोकसत्ता**

**सांगली :** देवनागरी लिपीमध्ये मुद्रित झालेला जगातील पहिला ग्रंथ आणि जगातील पहिली मुद्रित भगवद्गीता मिरज इतिहास संशोधन मंडळाच्या संग्रहात समाविष्ट झाली आहे. इसवीसन १८०५ मध्ये छपाई झालेल्या या भगवद्गीतेनंतरच देवनागरीमध्ये ग्रंथ छपाईची परंपरा सुरू झाली. इतिहास संशोधक मानसिंगराव कुमठेकर यांच्या संग्रहात असलेल्या या ग्रंथाचा अभ्यास करण्यासाठी जगभरातील संशोधक मिरजेस भेट देत आहेत.

कुरूक्षेत्रावर झालेल्या कौरव-पांडव युद्धावेळी श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितलेले तत्त्वज्ञान म्हणजे गीता हा ग्रंथ. श्रीकृष्णाने गीतेतून अर्जुनाला केलेले हे उपदेश आजच्या जगालाही तेवढेच लागू आहेत, असे मानले जाते. त्यामुळेच शेकडो वर्षांनंतरही भगवद्गीता या ग्रंथाचा प्रभाव भारतीय समाजावर तर दिसतोच, पण या ग्रंथातील या तत्त्वज्ञानाचा शोध घेत अनेक परदेशी अभ्यासकही भारताकडे आकर्षित होत असतात. यातील अनेक जण या महाकाव्याचा आणि त्यानिमित्ताने त्याच्या पहिल्या मुद्रित प्रतीचा शोध घेत अगदी मिरजेतही दाखल होतात. आज, २५ डिसेंबरच्या गीता जयंतीनिमित्त हा ग्रंथ पाहण्यास खुला ठेवला आहे.

**गीता जयंतीनिमित्त आज सर्वांसाठी 'भगवद्गीता' प्रतदर्शन**



**१६६ पृष्ठांची गीता**

या ग्रंथासाठी प्रथम तांब्याच्या पत्र्यावर भगवद्गीता कोरण्यात आली. या ठशांच्या आधारे पुढे छपाई करत या भगवद्गीतेच्या काही प्रती मुद्रित करून घेण्यात आल्या. या प्रथम मुद्रित प्रतीमधील एक प्रत मिरज इतिहास संशोधन मंडळाच्या संग्रहात आहे. १६६ पृष्ठांच्या या भगवद्गीता ग्रंथाच्या शेवटी मुद्रणस्थळ, काळाचा उल्लेख केला आहे. यामध्ये मिरजेचा उल्लेख 'मार्कंडेय मुनीक्षेत्रे' असा तर काळाचा उल्लेख 'शके १७२७, क्रोधननाम संवत्सरे' असा आलेला आहे.

देवनागरीमध्ये छपाई सुरू होण्यापूर्वी गीतेच्या हस्तलिखित प्रती काढण्यात येत होत्या. परंतु या पद्धतीत प्रती तयार करण्यावर मर्यादा होत्या. त्यामुळे हा ग्रंथ सामान्यांना सहजप्राप्त होत नव्हता. ब्रिटिशांच्या आगमनानंतर मुद्रणकलेला प्रारंभ झाला. मात्र सुरुवातीस देवनागरीतील ही छपाई रोमन लिपीमध्ये केली जात होती.

इसवीसन १८०५ मध्ये बंगालमध्ये श्रीरामपूर येथे विल्यम कॅरे याने देवनागरी लिपीमध्ये 'ग्रामर ऑफ मराठा लँग्वेज' प्रसिद्ध केले होते. याच वर्षी पुणे येथे सवाई माधवरावांच्या दरबारात असलेला इंग्रज वकील चार्लस् मॅलेट याने येथील एका तांबट कारागिराला तांब्याच्या पत्र्यावर मुद्रण करण्यास शिकविले. त्याच्याकडून त्याचवर्षी देवनागरी लिपीतून छपाईस प्रारंभ होणार होता. हे समजल्यावर या कारागिराला मिरजेचे तत्कालीन संस्थानिक गंगाधरराव पटवर्धन उर्फ पहिले बाळासाहेब यांनी मिरजेत बोलावून घेतले. त्याच्याकडून देवनागरीतील पहिला मुद्रित ग्रंथ म्हणून भगवद्गीतेची छपाई करवून घेतली. एकप्रकारे १८०५ मध्येच छपाई झालेला हा ग्रंथही देवनागरीतील पहिला मुद्रित ग्रंथ ठरला.

लोकसत्ता Fri, 25 December 2020
https://epaper.loksatta.com/c/57262233



## Upcoming Events

### January 2021

| Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 1 | 2 |
| 3 *Savitribai Phule Jayanti*  | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 11 | 12 *Rajmata Jijamata Jayani & Swami Vivekanand Jayanti*   | 13 | 14 | 15 | 16 |
| 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 *Netaji Subhashchandra Bose-Jayanti*  |
| 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |
| 31 | | | | | | |

Image Courtesy: Google Images

**Education is the most powerful weapon which you can use to change the world.**

Nelson Mandela

*Other than the College Photos, Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., PInterest, Freepik.Com.*

*Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the*